जा.क्र.मनपा/मुलेप/२०१४/
कार्यालय महानगरपालिका,औरंगाबाद.
दिनांक : /१०/२०१४

प्रति,
**मा.सभापती,**
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

विषय :- **सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबादचा लेखापरीक्षणाचा वार्षिक अहवाल.**

**महोदय,**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०६ (३) अन्वये लेखापरीक्षण विभागाच्या कामकाज विषयक आणि हिशेब तपासणीबाबतचा सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षासाठीचा वार्षिक अहवाल या सोबत करीत आहे.

अ) अहवाल वर्षात लेखापरीक्षण विभागात खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी कार्यरत होते.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मंजूर पदे** | **कार्यरत कर्मचारी / अधिकारी** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य लेखापरीक्षक | ०१ | ०१ | २ मे २०१२ रोजी शासनाकडून प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात आली आहे. |
| २ | उप मुख्य लेखापरीक्षक | ०१ | -- | अहवाल वर्षात सदरचे पद रिक्त आहे. |
| ३ | वरिष्ठ लेखापरीक्षक (कार्यालय अधिक्षक संवर्ग) | -- | ०१ | |
| ४ | कनिष्ठ लेखापरीक्षक(वरीष्ठ लिपीक संवर्ग) | ०४ | ०२ | अहवाल वर्षात दोन पदावर कर्मचारी कार्यरत असून दोन पदे अद्यापही रिक्त आहेत. |
| ५ | कनिष्ठ लिपीक | ०४ | ०४ | |
| ६ | वाहनचालक | ०१ | ०१ | |
| ७ | शिपाई | ०२ | ०२ | |
| | **एकूण** | **१३** | **११** | |

वरील पदावरील अधिकारी / कर्मचा-यां व्यतिरिक्त एक दैनिक वेतन संगणक ऑपरेटर सध्या कार्यरत आहे.

सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेचे निव्वळ महसूली उत्पन्न हे रू.३८३.३८ कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू.१२.१७ कोटी) इतके असून खर्च रू.३७६.५१ कोटी इतका आहे. त्याचप्रमाणे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेचे निव्वळ महसूली उत्पन्न रू. ६१८.८० कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू. ६.८७ कोटी) इतके असून खर्च रू. ५२५.९१ कोटी इतका झाल्याचे दिसून आले.

अहवाल वर्षात मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिका,औरंगाबाद या पदाचा पदभार हा २ मे २०१२ रोजी मी स्विकारला आहे. मुख्य लेखापरीक्षक या पदाचा पदभार स्विकारल्यानंतर कामकाज पाहत असतांना महानगरपालिके अंतर्गत विविध विभागाकडून वेतन निश्चिती पडताळणीस्तव सादर होणा-या बहुतांश प्रकरणांमध्ये १९७६,१९८६,१९९६ व २००६ चे वेतन आयोगानुसार अनुज्ञेय सुधारित वेतननिश्चिती तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सेवापुस्तके वेळोवेळी नियमाप्रमाणे तात्काळ तपासणी करण्यात आलेली आहेत.

महानगरपालिका स्तरावरील लेखापरीक्षणाचे स्वरूप आणि व्याप्ती विचारात घेता लेखापरीक्षण विभागासाठी पुरेसा कर्मचारी उपलब्ध व्हावा या दृष्टीने जा.क्र.मनपा/मुलेप/२४, दिनांक २४.०१.२०१३ अन्वये एकूण २६ नविन पदांसाठी मान्यता मिळविण्याच्या दृष्टीने शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. तरी अस्तित्वात असलेल्या कर्मचारी वृंदाकडून अहवाल वर्षात एकूण ०९ विभागाचे लेखापरीक्षण (थकित लेखापरीक्षणासह) पूर्ण करण्यात आलेले आहे. शिवाय मा.महापौर, मा.सभापती, स्थायी समिती ,मा.आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार विशेष लेखापरीक्षण करून त्याबाबतचे अहवालही विहित वेळेत संबंधित महोदयांना सादर करण्यात आलेले आहेत. अहवाल वर्षात पूर्ण करण्यात आलेल्या लेखापरीक्षणाबाबतचा अहवाल व विशेष तपासणी / चौकशी बाबतचा अहवाल हा या अहवालामध्ये अनुक्रमे भाग १ व भाग २ या स्वरूपात सादर करण्यात आलेला आहे.लेखापरीक्षण विभागाव्दारे दैनंदिन कामकाज करीत असतांना निदर्शनास आलेल्या गंभीर स्वरूपाच्या आक्षेपार्ह / अपहार / अनियमित बाबी या वेळोवळी मा.आयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या आहेत.

घटनात्मक व वैधानिक दर्जा असलेल्या केंद्रीय दक्षता आयोग यांचे परिपत्रक क्र.९८/ORD/१ Office Order No.२०.४.२००४, दिनांक ८ एप्रिल २००४ व परिपत्रक क्र.००५ ORD/१, Office Order No.११.३.२००५ नवि दिल्ली अन्वये असे स्पष्ट आदेश देण्यात आले की, विकास कामे करणारे कंत्राटदार विविध सेवा पुरविणारे पुरवठाधारक, साहित्य पुरविणारे पुरवठाधारक यांची देयके अदा करण्यासाठी केंद्र शासनाच्या व्यवस्थापनात सुधारणा होण्याच्या दृष्टीने अनियमितता व भ्रष्टाचारास आळा बसावा व विलंब टळावा यासाठी इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सिस्टीम (ECS) इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (EFT) ई-पेमेन्ट आणि ई-रिसीव्ह द्वारे देयके अदा करणेबाबत "First Come First serve" basis या पध्दतीच्या वापराबाबत केंद्रीय दक्षता आयोगाचे बंधन टाकण्यात आल्यामुळे ते पाळणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाने संदर्भिय शासन निर्णयात शासना तर्फे होणारी सर्व प्रकराची प्रदाने ईसीएस/एनईएफटी मार्फत करणे बाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदरील शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व महामंडळे, शासकीय / निम शासकीय /अनुदानित स्वायत्त संस्था, अनुदानित कृषी /अकृषीक विद्यापीठ यांना सुध्दा लागु आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते संबंधितांच्या बॅक खात्यावर जमा केले जातात, परंतु औरंगाबाद महानगरपालिकेत विविध विकास कामे करणारे कंत्राटदार, विविध सेवा पुरविणारे सेवा पुरवठा धारक, साहित्य पुरविणारे पुरवठा धारक इ. ना प्रदान करण्यात येणाऱ्या रक्कमा या धनादेशाद्वारे अदा करण्यात येत आहेत. संदर्भिय शासन निर्णय द्वारे शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन सर्व प्रकारची प्रदाने ईसीएस / एनईएफटी सुविधे मार्फत केल्यास औरंगाबाद महानगरपालिकेस खालील प्रमाणे फायदे होऊ शकतात.

१) धनादेश लिहणे, धनादेशावर अधिकाऱ्यांनी संयुक्त स्वाक्षऱ्या करणे, धनादेश लिहीताना होणाऱ्या विविध चुका व दुरुत्या तसेच त्यांच्या विविध नोंदी घेणे इ. बाबी साठी लागणारे मनुष्य बळ वाचणार आहे.

२) औरंगाबाद महानगरपालिकेने हाती घेतलेला ई-गर्व्हनन्स योजनेच्या एका बाबीची पुर्तता होईल व वित्तीय आणि प्रशासकीय सुधारणेच्या दुष्टीने एक टप्पा साध्य करता येईल.

३) प्रशासकीय व लेखा विषयक कामात पारदर्शकता येईल.

४) लेखा विभागामध्ये संबंधित कंत्राटदार, पुरवठाधारक व सेवा पुरवठाधारक इ.ना वारवांर त्यांची प्रदाने मिळविण्याकरिता पाठपुरावा करावा लागणार नाही. तद्वतच महानगरपालिकेने विविध विकास कामे करण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदार, पुरवठा धारक व सेवा पुरवठा धारक यांना महानगरपालिकेकडुन त्यांच्या बॅक खात्यावर प्रदाने जमा झाल्यानंतर त्यांचे समाधान होईल, व महानगरपालिकेत काम केल्यानंतर मिळणाऱ्या मावेजा बाबत हमी संबंधिताना प्राप्त होईल.

५) पुरवठाधारक/कंत्राटदार यांच्या प्रदान मिळविण्याकरीता वारवांर येण्याने, विचारणा व वादविवाद इ.मुळे लेखा विभागातील अधिकारी / कर्मचारी यांचे दैनंदिन कामात यामुळे होणारा कालापव्यय टळू शकेल व त्यांना त्यांची कामे अधिक तत्परतेने पार पाडता येतील.

करीता उपरोक्त प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत काम करणारे कंत्राटदार, पुरवठाधारक व सेवा पुरवठा धारक यांना करण्यात येणारी विविध प्रदाने ईसीएस/एनईएफटी द्वारेच करण्याची शासनाने अवलंबिलेली पध्दत महानगरपालिकेत देखील राबविण्याची कार्यवाही करणे बाबत आवश्यक आदेश निर्गमित व्हावेत, असे यापूर्वी कळविण्यात आलेले आहे. मात्र याबाबत दीड वर्षाचा कालावधी झालेला असून देखील अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही प्रशासना तर्फे करण्यात आलेली नसल्यामुळे सदरची बाब खेदाची वाटते.

आपला विश्वासू,

**(मो.रा.थत्ते)**
मुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका,औरंगाबाद.

**औरंगाबाद :**
**दिनांक** :

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर :</u>**

मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.
# सन १९९९-२०११ पर्यंतचे लेखा परीक्षण
# प्रलंबित परिच्छेदांचा तपशिल

| अ.क्र. | विभागाचे नांव | एकूण परिच्छेद | वगळलेले परिच्छेद | प्रलंबित परिच्छेद |
|---|---|---|---|---|
| १ | **मुख्य लेखाधिकारी** | | | |
| | लेखा विभाग | ८९ | ४५ | ४४ |
| २ | **उपायुक्त महसूल** | | | |
| | जकात विभाग | ८७ | ७० | १७ |
| | शिक्षण विभाग | २२ | ०५ | १७ |
| | आस्थापना विभाग -१ | ०९ | ०१ | ०८ |
| | विधी विभाग | २४ | -- | २४ |
| | भांडार विभाग | ०३ | -- | ०३ |
| ३ | **उपायुक्त प्रशासन** | | | |
| | आस्थापना विभाग-२ | ०७ | ०३ | ०४ |
| | प्रकल्प विभाग | १५ | १४ | ०१ |
| | अभिलेख कक्ष विभाग | ०३ | ०१ | ०२ |
| | सांस्कृतिक विभाग | ११ | ०२ | ०९ |
| | क्रिडा विभाग | ०३ | ०२ | ०१ |
| | जनसंपर्क विभाग | ०८ | ०४ | ०४ |
| | नगरसचिव विभाग | ०५ | ०१ | ०४ |
| ४ | **उपायुक्त सिडको** | | | |
| | मालमत्ता विभाग | ६५ | ०७ | ५८ |
| | वाहतूक शाखेतर्फे दंड वसूली | ०१ | ०१ | -- |
| | प्रशासकीय विभाग | ०६ | ०२ | ०४ |
| ५ | **कर मुल्य निर्धारण विभाग** | ९९ | २० | ७९ |
| | वॉर्ड - अ कार्यालय | ४३ | १९ | २४ |
| | वॉर्ड - ब कार्यालय | २३ | ०१ | २२ |
| | वॉर्ड - क कार्यालय | ३६ | १३ | २३ |
| | वॉर्ड - ड कार्यालय | ५६ | २९ | २७ |
| | वॉर्ड - ई कार्यालय | ०६ | ०२ | ०४ |
| | वॉर्ड - फ कार्यालय | ४८ | ०९ | ३९ |
| ६ | **शहर अभियंता विभाग** | ०२ | -- | ०२ |
| | वॉर्ड अभियंता - अ | ०६ | -- | ०६ |
| | वॉर्ड अभियंता - ब | ०१ | -- | ०१ |
| | वॉर्ड अभियंता - क | ०७ | ०१ | ०६ |
| | वॉर्ड अभियंता - ड | ०९ | -- | ०९ |
| | वॉर्ड अभियंता - ई | १० | ०७ | ०३ |
| | वॉर्ड अभियंता - फ | ११ | -- | ११ |
| | पाणीपुरवठा विभाग-१ | ३६ | ०७ | २९ |

| अ.क्र. | विभागाचे नांव | एकूण परिच्छेद | वगळलेले परिच्छेद | प्रलंबित परिच्छेद |
|---|---|---|---|---|
| | **शहर अभियंता विभाग** | | | |
| | पाणीपुरवठा विभाग-२ | ४० | ०२ | ३८ |
| | ड्रेनेज विभाग -१ | १८ | ०७ | ११ |
| | ड्रेनेज विभाग -२ | १२ | ०९ | ०३ |
| | बांधकाम विभाग -१ | ३२ | ०८ | २४ |
| | बांधकाम विभाग -२ | ३० | ०४ | २६ |
| | विद्युत विभाग -१ | ६३ | ५० | १३ |
| | विद्युत विभाग -२ | २२ | ०६ | १६ |
| | सिध्दार्थ जलतरण तलाव | २६ | ०९ | १७ |
| | सिध्दार्थ उद्यान विभाग | १० | ०७ | ०३ |
| | स्लम विभाग -१ | २० | १९ | ०१ |
| | स्लम विभाग -२ | ०१ | ०१ | -- |
| | इमारती बांधकाम विभाग | ३० | १० | २० |
| | रस्ते बांधकाम विभाग | ०१ | -- | ०१ |
| | यांत्रिकी विभाग | ४५ | ०७ | ३८ |
| | जायकवाडी स्थापत्य विभाग | ३३ | १४ | १९ |
| | ई-टेंडरिंग विभाग | ०४ | ०४ | -- |
| | पाणीपुरवठा मशिनरी विभाग | ०६ | ०४ | ०२ |
| | जायकवाडी यांत्रिकी विभाग | ११ | ०९ | ०२ |
| ७ | **नगररचना विभाग** | २१ | ०८ | १३ |
| ८ | **पशु संवर्धन विभाग** | ०३ | ०२ | ०१ |
| ९ | **आरोग्य विभाग** | ४८ | १३ | ३५ |
| १० | **अग्निशमन विभाग** | २३ | ०६ | १७ |
| | **एकूण** | **१२५०** | **४६४** | **७८६** |

# लेखा विभाग
# सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४
# लेखापरीक्षण अहवाल.

**अहवाल वर्षात महानगरपालिका अंतर्गत जमा व खर्चाचा आढावा हा लेखा विभागाकडील अभिलेख्यांच्या आधारे घेण्यात आला आहे. त्यानुसार सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष जमा प्रारंभीच्या शिल्लक रकमेसह रक्कम रू. ३८३ कोटी इतकी असून प्रत्यक्ष खर्च रू. ३७६.५१ कोटी इतका आहे. ( अहवाल वर्षात महापालिका अंतर्गत पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांना वेळोवेळी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमा व त्यांचे समायोजन याबाबत लेखा विभागाकडून माहिती घेण्यात आली. तसेच न वटलेले धनादेश व त्यानुषंगाने वसूल झालेल्या रकमा या बाबतही तपशिल मागविण्यात आलेला आहे. प्राप्त तपशिलानुसार खालील प्रमाणे अभिप्राय नमूद करण्यात येत आहेत.)**

**परिच्छेद क्र.१ : अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रकमेतील तफावतीबाबत :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये महापालिकेचे अपेक्षित उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक प्रतीवर्ष तयार करण्यात येते. सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्च याबाबत तपासणी केली असता असे दिसून आले की, महापालिकेस प्रत्यक्षात प्राप्त रकमा आणि महापालिकेद्वारा करण्यात आलेला प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पिय तरतूदीपेक्षा १९% ते ३६% कमी अथवा जादा झालेला आहे. त्याबाबतचा तपशिल हा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| वर्ष | जमा (रूपये) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मूळ अर्थसंकल्पिय तरतूद | सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद | प्रत्यक्ष जमा | कमी अथवा जादा रक्कम | टक्केवारी |
| २०११-२०१२ | ४१८.६५ | ४४८.७१ | ३००.०० | १४८.७१ | ३३% |
| २०१२-२०१३ | ७८६.१४ | ४८२.५६ | ३८३.०० | ९९.५६ | २१% |
| २०१३-२०१४ | ९०१.२०<br>(मूळ अंदाजपत्रक तरतूद)<br>८०१.५५<br>(सुधारित अंदाजपत्रकातील तरतूद) | ५१८.१८ | ६१८.८० | १००.६२ | १९% |
| | खर्च (रूपये) | | | | |
| वर्ष | मूळ अर्थसंकल्पिय तरतूद | सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद | प्रत्यक्ष खर्च | कमी अथवा जादा रक्कम | टक्केवारी |
| २०११-२०१२ | ४१८.८८ | ४४८.८२ | २८७.८३ | १६०.६९ | ३६% |
| २०१२-२०१३ | ७८६.११ | ४९४.३८ | ३७६.५१ | ११७.८७ | २४% |
| २०१३-२०१४ | ९०१.१६ | ५२५.०२ | ५२५.९१ | -- | -- |

वरील तपशिलाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वार्षिक अंदाजपत्रक तयार करतांना मागील वर्षीच्या प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या प्रमाणात तरतूद ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार जमा व खर्चाची रक्कम आणि प्रत्यक्ष जमा व खर्च यामध्ये तफावत दिसून येते.

तसेच सन २०१३-१४ या वर्षात मूळ अंदाजपत्रकीय तरतूद रक्कम रू.९०१.२० कोटी ठेवण्यात आलेली होती. परंतू सुधारित अंदाजपत्रक तयार करतांना मूळ तरतूद रकमेत दुरूस्ती करून रू.८०१.५५ कोटी तरतूद दर्शविण्यात आली. रू. ९९.६५ कोटी फरकाबाबत लेखापरीक्षण विभागास लेखा शाखेकडून स्पष्टीकरण प्राप्त झालेले नाही.

मागील वार्षिक अहवालात भविष्यात अशी तफावत होणार नाही याची दक्षता घेण्याविषयी सूचित करण्यात आले होते. तरीही लेखा शाखेने अंदाजपत्रकातील तफावती बाबतची बाब गांभिर्याने घेतलेली नाही.

**परिच्छेद क्र. २: अधिकारी / कर्मचारी यांचेकडील कार्यालयीन कामासाठी / औषधोपचारासाठी अ) देण्यात आलेल्या प्रलंबित अग्रिम रकमेबाबत.**

महापालिका अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजास्तव व औषधोपाचारासाठी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमेपैकी सन सन २०१२-२०१३ ते सन २०१३-२०१४ मधील रक्कम रूपये **२,५०,७९,३७४/-** इतक्या अग्रिम रकमेचे समायोजन अद्यापपावेतो करण्यात आलेले नाही.

## अधिकारी / कर्मचारी यांचेकडील प्रलंबित अग्रिम रकमेबाबतचा तपशिल : सन २०१२ - २०१३ (३१.५.२०१४ पर्यंत)

## सन २०१२-२०१३

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७.४.२०१२ | Md.Wasil | ३०००००/- | ADTP | Land Acq. |
| २ | १२.४.२०१२ | C.M.Abhand | १००००/- | ESt-२ | Postal Exp |
| ३ | १९.४.२०१२ | Ganesh Ramesh Shinde | ५०००/- | Ward - A | SFW |
| ४ | १९.४.२०१२ | Asaram Tukaram Kadam | ५००००/- | Jawan Adm.sec | Xerox Photo |
| ५ | १४.५.२०१२ | Pandharinath P.Pachlore | २५००/- | Legal Sec. | Apeal |
| ६ | १४.५.२०१२ | D.K.Pardeshi | १०००००/- | Ward - A | Nala safai |
| ७ | १४.५.२०१२ | Farooq Khan | १०००००/- | Ward - A | Nala safai |
| ८ | १४.५.२०१२ | V.R.Bhoya | १०००००/- | Ward - A | Nala safai |
| ९ | १४.५.२०१२ | Prashant L.Vitekar | १०००००/- | Ward - A | Nala safai |
| १० | २५.५.२०१२ | Pandharinath P.Pachlore | ५००/- | Legal Sec. | Court Apeal |
| ११ | २८.५.२०१२ | Dr.Jayshri Kulkarni | १०००००/- | MOH | Camera & Dress purchase |
| १२ | ३१.५.२०१२ | Pandharinath P.Pachlore | १५००/- | Legal Sec. | Court Apeal |
| १३ | २०.०६.२०१२ | Rajendra P.Waghmare | १९८५००/- | Sec.Eng. | Registration |
| १४ | २०.०६.२०१२ | Rajendra P.Waghmare | ९६५००/- | Sec.Eng. | Registration |
| १५ | २९.०६.२०१२ | S.K.Joshi | १००००/- | Ward - F | Census |
| १६ | ३०.०६.२०१२ | Abhay Deshmukh | २००००/- | Swimming pool | Mumbai Tour |
| १७ | ०९.०७.२०१२ | K.R.Kulkarni | १००००/- | Dy.Eng. | Training |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | १९.०७.२०१२ | P.G.Pawar | २०००००/- | Ward E | Nala safai |
| १९ | ०९.०८.२०१२ | Rajendra P.Waghmare | ५०४००/- | Sec.Eng. | Registration |
| २० | १४.०८.२०१२ | Rajesh R.Gavit | ४४०००/- | Education | Biscuit |
| २१ | १७.०८.२०१२ | Sheshrao L.Pawar | २०००००/- | Dy.Eng. | Road Patch Work |
| २२ | ०१.०९.२०१२ | Rahul Chavan | ५०००/- | SFW. Ward-D | Petrol |
| २३ | ०१.०९.२०१२ | Sachin K.Waikar | ५०००/- | Jr.Eng.Mech Section | Petrol |
| २४ | ०३.०९.२०१२ | Shree samarth Electricals | २५०००००/- | N.B.Kulkarni contractor | For Ganpati Festival |
| २५ | १०.०९.२०१२ | Vijay B.Patil | ४००००/- | Garden Superintinding | Adv.for १७ th sept.celebration |
| २६ | १५.०९.२०१२ | Asadullah Khan | २५०००/- | Sanitary Inspector Ward-D | Advance for Ganpati |
| २७ | १५.०९.२०१२ | R.P.Waghmare | १७०३८५/- | Section Eng.Adtp Section | Land Acquisition |
| २८ | ०४.१०.२०१२ | Shree samarth Electricals | २५००००० | N.B.Kulkarni Contractor | For Ganpati Festival |
| २९ | ०५.१०.२०१२ | Dr.Premlata Karad | २५००० | Women & child welfare | Shirdi Tour |
| ३० | २२.१०.२०१२ | Anant J.jadhav | ५०००० | LSS-Zoo section | Bakri Idd |
| ३१ | २२.१०.२०१२ | Sachin K.Waikar | २११०० | J.E.Mech Section | Dasera |
| ३२ | ३१.१०.२०१२ | Nivrutti Gawande | ८०००० | Sectional Eng Ward -B | Ganpati |
| ३३ | ०९.११.२०१२ | Chief Fire Officer | ५०००० | Fire | Petrol |
| ३४ | १६.११.२०१२ | Chief Fire Officer | ४०००० | Fire | Workshop |
| ३५ | २९.११.२०१२ | Govind Pralhad Phate | ८०००० | Sectional Eng.Tech Cell | Delhi Tour |
| ३६ | ०९.०१.२०१३ | B.K.Chavan | १२००० | Sports Section | २६ th Januarey |
| ३७ | १७.०१.२०१३ | R.P.Waghmare | १०४००० | Sectional Eng.ADTP Sec | Registration |
| ३८ | १७.०१.२०१३ | Dr.Padalkar | ११७३१८३ | RCH-health | Pulse Poloi |
| ३९ | २१.०२.२०१३ | Dr.Jayshri Kulkarni | ५००० | MOH | Miscelanceous |
| ४० | १३.०३.२०१३ | Chief Fire Officer | ५०००० | Fire section | Petrol |
| ४१ | २१.०३.२०१३ | Rita Bandekar | ५००० | Computer | Miscellaneous |
| | | **Total** | **८६,३९,५६८/-** | | |

## सन् २०१३-२०१४

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१.०४.२०१३ | V.B.Patil | ३७५००० | Garden Supretiendent | Environment Report |
| २ | ०१.०४.२०१३ | Mohammed Jaffar Khan | १००००० | Fire Section | Fire week |
| ३ | ०६.०४.२०१३ | Chief Fire Officer | ५०००० | Fire Section | Training |
| ४ | ०६.०४.२०१३ | Ward Officer,Ward - A | १६८६३७५ | Ward Officer | Census,Hon Distribution |
| ५ | ०६.०४.२०१३ | Ward Officer,Ward - B | १६२४२७५ | Ward Officer | Census,Hon Distribution |
| ६ | ०६.०४.२०१३ | Ward Officer,Ward - C | १५५०२५० | Ward Officer | Census,Hon Distribution |
| ७ | १२.०४.२०१३ | Rita Bandekar | ५००० | Computer section | Internet purpose |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | २०.०४.२०१३ | Sanjay Markad | ५००० | Sports section | Ist May |
| ९ | २०.०४.२०१३ | B.K.Chavan | ५००० | Sports section | Ist May |
| १० | २२.०४.२०१३ | D.K.Pandit | ७५००० | Dy.Eng.Mechanical | Mumbai Ramky purpose |
| ११ | २५.०४.२०१३ | Est.Officer II,N.L.chavan | १०००० | Establishment | Postal Expenses |
| १२ | २५.०४.२०१३ | Dr.Premlata Karad | २५००० | Mahila Bal kalyan | Study Tour |
| १३ | १६.०५.२०१३ | Est.Officer II N.L.chavan | १०००० | Establishment | Postal Expenses |
| १४ | ३१.०५.२०१३ | Kalyan More | ५००० | SFW Ward -F | Petrol |
| १५ | ०३.०६.२०१३ | D.P.Design & asso.city Eng | ५००००० | City Engineer | Nehre Ambari |
| १६ | १३.०६.२०१३ | Rahul Chavan | ५००० | SFW Ward -D | Adv.For fogging machine petrol |
| १७ | २५.०६.२०१३ | Dr.Vandana Tikhe | ३००० | Medical officer Health | Miscellaneous Exp |
| १८ | २८.०६.२०१३ | Sanjeev Sonar | २०००० | H.M.Indiranagar | Gunwanth Puraskar |
| १९ | २८.०६.२०१३ | V.D.Rathod | ५००० | Ward | Miscellaneous Exp |
| २० | १७.०७.२०१३ | B.K. Chavan | २००० | Sport Section | Study Tour |
| २१ | २०.०७.२०१३ | V.D.Rathod | ५००० | Ward Officer Ward -F | Miscellaneous Exp |
| २२ | २२.०७.२०१३ | Lata Dharmaraj Kakde | ३००० | Sewing Class Tearcher,Project | exam fees |
| २३ | ०१.०८.२०१३ | Pramod Khobragade | ३०००० | Dr.B.Ambedkar Centre | Dhamma Pathan |
| २४ | १३.०८.२०१३ | Prakash Sirdeshpande | ५००० | Jr.Clerk Ward- B | १५ th Aug |
| २५ | २८.०८.२०१३ | Abhay Pramanik | २००० | Est I,Clerk | Training |
| २६ | ३०.०८.२०१३ | Vilas P.Bagdame | ५००० | SFW Maleria | Delhi Tour |
| २७ | ०४.०९.२०१३ | Sanju Ballaiya | २००००० | Sports Section | Hon.Distribution |
| २८ | १७.१०.२०१३ | Shaikh Shahed | ५००० | Zoo | Bakri Idd |
| २९ | १०.१०.२०१३ | Sanju Ballaiya | २००००० | Sports Section | Honarium distribution |
| ३० | १९.१०.२०१३ | C.S.Shahane | २५००० | Estate Manager | Miscellaneous exp |
| ३१ | ३०.१०.२०१३ | Anuja Chitale | ५००० | Teacher | Sports Section |
| ३२ | ३०.१०.२०१३ | B.K.Chavan | ५००० | Sport Officer | Sports Section |
| ३३ | १३.११.२०१३ | Syed Salimuddin | २०००० | Sport teacher | Sports Section |
| ३४ | २२.११.२०१३ | Rita Bandekar | ५००० | Cler,computer section | Computer Section |
| ३५ | २२.११.२०१३ | Sanjeev Sonar | ७००० | Cultural officer | Satkar |
| ३६ | ०५.१२.२०१३ | Rita Bandekar | ५३००० | Clerk | Computer Section |
| ३७ | १८.१२.२०१३ | Rahul Chavan | ५००० | SFW,Ward-D | Petrol |
| ३८ | ०१.०१.२०१४ | Dr.Premlata Karad | १५००० | W & C | Seiving Machine purpose |
| ३९ | ०६.०१.२०१४ | Shivaji Zanzan | ५०००० | Fire Section | Petrol |
| ४० | ०६.०१.२०१४ | Dr.Sandhya Takalkar | २४२६८६ | Medical Officer N-८ | Medicine purchase |
| ४१ | ०६.०१.२०१४ | Dr.Sandhya Takakar | ४४५२४० | Medical Officer N-८ | Medicine Purchase |
| ४२ | ०७.०१.२०१४ | Vinod Hiwale | ५००० | SFW,Ward-E | Petrol |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४३ | ०७.०१.२०१४ | Vinod Hiwale | २५००० | SFW,Ward-E | Petrol |
| ४४ | ०९.०१.२०१४ | Azmat Khan | २५००० | Ward officer-A | Property Tax and WW recovery |
| ४५ | ०९.०१.२०१४ | Ankush Lad | २५००० | Ward officer-B | Property Tax and WW recovery |
| ४६ | ०९.०१.२०१४ | Pryanka Kesarkar | २५००० | Ward officer-C | Property Tax and WW recovery |
| ४७ | ०९.०१.२०१४ | S.R.Jarare | २५००० | Ward officer-D | Property Tax and WW recovery |
| ४८ | ०९.०१.२०१४ | Vithal Dake | २५००० | Ward officer-E | Property Tax and WW recovery |
| ४९ | ०९.०१.२०१४ | V.D.Rathod | २५००० | Ward officer-F | Property Tax and WW recovery |
| ५० | १५.०१.२०१४ | Sanjeev Balliya | २५००० | Sports | Tournament |
| ५१ | १८.०१.२०१४ | Pramod Khobragade | ८०००० | Secretary Section | Kolhapur Thane tour |
| ५२ | २३.०१.२०१४ | B.K.Chavan | १५००० | Sport | २६ th January |
| ५३ | २४.०१.२०१४ | Syed Qayum | १०००० | Ward A,SI | २६ th January |
| ५४ | १८.०२.२०१४ | Anil Tanpure | ३५००० | Sec.Eng | Shoping center |
| ५५ | ०६.०३.२०१४ | Azmat Khan | ३८०२५० | Ward officer-A | Advance for census |
| ५६ | ०६.०३.२०१४ | Ankush Lad | ३६०७५० | Ward officer-B | Advance for census |
| ५७ | ०६.०३.२०१४ | Pryanka Kesarkar | ३३५२५० | Ward officer-C | Advance for census |
| ५८ | ०६.०३.२०१४ | S.R.Jarare | २६०२५० | Ward officer-D | Advance for census |
| ५९ | ०६.०३.२०१४ | Vithal Dake | ३७५००० | Ward officer-E | Advance for census |
| ६० | ०६.०३.२०१४ | V.D.Rathod | ३५१७५० | Ward officer-F | Advance for census |
| ६१ | ०६.०३.२०१४ | Azmat Khan | ५४१५ | Ward officer-A | Advance for census |
| ६२ | ०६.०३.२०१४ | Ankush Lad | ५०५९ | Ward officer-B | Advance for census |
| ६३ | ०६.०३.२०१४ | Pryanka Kesarkar | ४७३० | Ward officer-C | Advance for census |
| ६४ | ०६.०३.२०१४ | S.R.Jarare | ३५६५ | Ward officer-D | Advance for census |
| ६५ | ०६.०३.२०१४ | Vithal Dake | ५९२९ | Ward officer-E | Advance for census |
| ६६ | ०६.०३.२०१४ | V.D.Rathod | ५०३२ | Ward officer-F | Advance for census |
| ६७ | १२.०३.२०१४ | C.S.Shahane | २५००० | Estate Manager Clerk | Cidco Natyagraha Repairing |
| ६८ | १४.०३.२०१४ | Ganesh Ramesh Shinde | ५००० | Ward A,SFW | Petrol |
| ६९ | १४.०३.२०१४ | Avchit More | ५००० | Ward D,SFW | Petrol |
| ७० | २१.०३.२०१४ | Rita Bandekar | २४००० | Computer section | Internet Purpose |
| ७१ | २९.०३.२०१४ | Vilas P.Bagdane | ५००० | Maleria,SFW | Petrol |
| ७२ | २९.०३.२०१४ | R.P.Dandge | १००००० | Fire officer | Fire week |
| ७३ | २९.०३.२०१४ | Dr.Smita Nalgirkar | २५००० | MO Silk Mill Colony | Workshop |
| ७४ | २९.०३.२०१४ | Azmat Khan | ८८३८०० | Ward officer-A | Adv.for Statistics financial survey |
| ७५ | २९.०३.२०१४ | Ankush Lad | ८३६००० | Ward officer-B | Adv.for Statistics financial survey |
| ७६ | २९.०३.२०१४ | Pryanka Kesarkar | ७७६७०० | Ward officer-C | Adv.for Statistics financial survey |
| ७७ | २९.०३.२०१४ | S.R.Jarare | ६६९७०० | Ward officer-D | Adv.for Statistics financial survey |
| ७८ | २९.०३.२०१४ | Vithal Dake | ८७८१०० | Ward officer-E | Adv.for Statistics financial survey |
| ७९ | २९.०३.२०१४ | V.D.Rathod | ८१४७०० | Ward officer-F | Adv.for Statistics financial survey |
| | | **Total** | **१,४८,७९,८०६/-** | | |

## अधिकारी / कर्मचारी यांचेकडील औषधोपचार अग्रिमांचा प्रलंबित रकमेचा तपशिल.
## सन २०१२ - २०१३ ( ३१.५.२०१४ पर्यंतची स्थिती)

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२.०२.२०१३ | Shaikh Rasheed Shaikh Jafar | १५००००/- | Fire-section | Heart Operation |
| | | | | | |
| | | **Total** | **१,५०,०००/-** | | |

| सन २०१३-२०१४ | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५.०६.२०१३ | Tukaram Laxman Hiwale | १००००/- | **Labour Ward -D** | Accident |
| १३.०६.२०१३ | Quazi Nishat Anjum, Cigme | १५००००/- | **Asstt Teacher** | Breast Cancer |
| ०१.०८.२०१३ | Chandrashekhar Damodhar | १५००००/- | **J.E.Electrical Asstt Teacher** | Heart Treatment |
| २९.०८.२०१३ | Aasha Haribhau Kshirsagar | १५००००/- | **Chikalthana** | Cancer |
| ०५.०९.२०१३ | Ram singh Mahendra singh | ५००००/- | **Labour Ward-F** | Accident |
| २९.१०.२०१३ | Sangeeta S.Gaikawad | १५००००/- | **Ward -A** | Angioplasty |
| २४.०१.२०१४ | Gorakh Vinayakrao Tupe | १५००००/- | **Maleria Labour** | Angioplasty |
| ०६.०२.२०१४ | Panchsheela Eknath Salve | १५००००/- | **Garden Mali** | Angioplasty |
| ०६.०२.२०१४ | Raju Saoji Shu | १५००००/- | | |
| १२.०३.२०१४ | Uttam Balasaheb Ghaitilak | १५००००/- | **Peon, Valuation** | Cancer |
| २८.०३.२०१४ | Rajesh S.Jadhav | १५००००/- | **Clerk, Valuation** | Heart Operation |
| | | **१४,१०,०००/-** | | |

**ब) पदाधिकारी यांचेकडील प्रलंबित अग्रिम रकमेबाबत :**

महापालिका पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजास्तव मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमेपैकी सन सन २०१२-२०१३ ते सन २०१३-२०१४ मधील रक्कम रूपये ३,००,०००/ इतक्या अग्रिम रकमेचे समायोजन अद्यापपावेतो करण्यात आलेले नाही.

## पदाधिकारी यांचेकडील प्रलंबित अग्रिम रकमेबाबतचा तपशिल :
## सन २०१२ - २०१३ (३१.५.२०१४ पर्यंतची स्थिती)

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०.१०.२०१२ | Renuka Krushna Wadekar | २५००० | Ward Chairman-C | Mumbai Tour |
| २ | ११.१२.२०१२ | Jyoti Roopchand Waghmare | २०००० | Ward Chairman-A | Nanded Tour |
| ३ | २९.०१.२०१३ | Sanjay Ramdas Joshi | २५००० | Deputy Mayor | Panjim Tour |
| ४ | २९.०१.२०१३ | Jyoti Roopchand Waghmare | २०००० | Ward Chairman-A | Mumbai Tour |
| ५ | ११.०२.२०१३ | Vijay Laxman Waghchoure | ४०००० | Ward Chairman-D | Pune Tour |
| ६ | १३.०२.२०१३ | Baban Pandit Narwade | ३०००० | Health Chairman | Nagpur Tour |
| | | **Total** | **१,६०,०००/-** | | |

## सन २०१३-२०१४

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| १ | १.०७.२०१३ | Sanjay Ramdas Joshi | ४०००० | Deputy Mayor | Mount Abu Tour |
| २ | २५.१०.२०१३ | Mahesh Malwatkar | २५००० | Education chairman | Kolhapur Tour |
| ३ | २४.०१.२०१४ | Manish C.Dahihande | ५०००० | Health chairman | Nagpur Tour |
| ४ | १२.०२.२०१४ | Mahesh Malwatkar | २५००० | Education chairman | Thane Nasik Tour |
| | | **Total** | **१,४०,०००/-** | | |

उपरोक्त प्रमाणे पदाधिकारी ,अधिकारी व कर्मचारी यांचेकडे सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात एकूण रू. २,५३,७९,३७४/- अग्रिम रकमा प्रलंबित आहेत. विभागाने संबंधितांकडे वेळोवेळी पाठपुरावा करुन अग्रिम रकमांचे समायोजन करणे अपेक्षित आहे. परंतू लेखा शाखेने उपरोक्त प्रमाणे पाठपुरावा न केल्यामुळे महानगरपालिकेची अग्रिम रकमेचा त्याच कामासाठी खर्च झालेला आहे किंवा नाही याचा ताळमेळ घेता आला नाही. तसेच पूर्वी दिलेल्या अग्रिमाचे समायोजन झालेले नसतांनाही पुन्हा अग्रिम मंजूर करण्यात येतात, त्यामुळे अग्रिम रकमा वाढत गेलेल्या दिसून येतात.

करिता, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून अग्रिम समायोजनाबाबत कार्यवाही करुन लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३ : लेखा विभागाकडे विना तजविज परत आलेल्या धनादेशांबाबत : (न वटलेले धनादेश)**

अहवाल वर्षात महापालिकेस मालमत्ता कर, पाणीपट्टी व अन्य करापोटी संबंधित व्यक्तिंकडून धनादेशाद्वारे रकमेचे प्रदान करण्यात आलेले आहे. मात्र काही वेळा काही धनादेश हे संबंधिताच्या बँक खात्यामध्ये पुरेसे पैसे नसल्यामुळे वटलेले नाहीत. सन २०११-२०१२ मधील **११६** धनादेशांची एकूण रक्कम रू. **१८,३८,००७/-** आणि सन २०१२-२०१३ मधील **६५** धनादेशांची एकूण रक्कम रू. **२४,२०,८४०/** चे धनादेश अद्यापही वटलेले नाही असे प्राप्त.

**विभागनिहाय न वटलेल्या धनादेशांचा तपशिल हा खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.**

### सन २०११-२०१२ या वर्षातील न वटलेले धनादेश.

| अ.क्र. | विभागाचे नांव | धनादेशांची संख्या | धनादेशाची रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | वॉर्ड - अ कार्यालय | १५ | २५३०२०/- |
| २ | वॉर्ड - ब कार्यालय | ४७ | ९३२७२२/- |
| ३ | वॉर्ड - क कार्यालय | ०४ | ९६२४३/- |
| ४ | वॉर्ड - ड कार्यालय | १३ | १४८५०७/- |
| ५ | वॉर्ड - ई कार्यालय | ११ | १५३५७२/- |
| ६ | वॉर्ड - फ कार्यालय | २६ | २५३९४३/- |
| | **एकूण** | **११६** | **१८३८००७/-** |

विभागाने वरील प्रमाणे रक्कम वसूलीबाबत ठोस कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

## सन २०१२-२०१३ या वर्षातील न वटलेले धनादेश.

| अ.क्र. | विभागाचे नांव | धनादेशांची संख्या | धनादेशाची रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | वॉर्ड - अ कार्यालय | ११ | ३२३५३०/- |
| २ | वॉर्ड - ब कार्यालय | १४ | १२२३५१७/- |
| ३ | वॉर्ड - क कार्यालय | १० | २२८३०३/- |
| ४ | वॉर्ड - ड कार्यालय | १५ | २५६६०५/- |
| ५ | वॉर्ड - ई कार्यालय | ०८ | ८९४२५/- |
| ६ | वॉर्ड - फ कार्यालय | ०७ | २९९४६०/- |
| | **एकूण** | **६५** | **२४२०८४०/-** |

न वटलेल्या धनादेशा संदर्भाने लेखा विभाग, संबंधित विभाग व वॉर्ड कार्यालया कडून होत असलेली कार्यवाही अत्यंत सौम्य असून धिम्यागतीने न वटलेल्या धनादेशाची रक्कम वसूल केल्या जाते. प्रत्यक्षात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे कार्यवाही होणे गरजेचे आहे. त्यानुसार लेखा विभागाने व इतर विभागाने कार्यवाही करावी तसेच न वटलेल्या धनादेशांच्या रकमेच्या वसूलीसह अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. ४:** सन २०११-१२, २०१२-१३ व सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात लेखापरीक्षण विभागाच्या निदर्शनास आलेल्या प्रकरणांपैकी खाली दिलेल्या प्रकरणांमध्ये कर्मचा-यांना अतिप्रदान रकमा रू.१८,९५,८१९/- वितरीत केल्याचे निदर्शनास आलेले होते. त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे स्वतंत्र देण्यात येत आहे. अशा रकमा संबंधितांकडून वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करणे आवश्यक आहे. सदरील रकमा भरणा झाल्याची खात्री करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करणे बाबत वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. विभागाने कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | अतिप्रदान रक्कम रू. | | पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती मैमुना बेगम शे.बशिर | २९९९/- | अति.प्र. | मजूर |
| २ | श्रीमती कुसुमबाई सुधाकर भुईगळ | ८२८२/- | पेन्शन कॅ. | सह.शिक्षिका |
| ३ | श्रीमती तान्हाबाई दलपत नवगिरे | १७६५१/- | अति.प्र. | मजूर |
| ४ | श्री.संभाजी राणूजी सुरडकर | ७६१४/- | अति.प्र. | मजूर |
| ५ | श्रीमती तान्हाबाई श्रावण करमाडकर | १३,२७७/- | अति.प्र. | मजूर |
| ६ | श्रीमती प्रेमा जगदिश परदेशी | १०४४/- | अति.प्र. | सह.शिक्षिका |
| ७ | श्रीमती कविता कालीदास जोशी | १०,३२३/-<br>१४०४/- | पेन्शन | सह.शिक्षिका |
| ८ | श्रीमती तान्हाबाई वामन साबळे | २३१७/- | अति.प्र. | मजूर |
| ९ | श्रीमती शांताबाई सुर्यभान गवळे | १७०९७/- | अति.प्र. | मजूर |
| १० | श्री. मो.अथरोद्दीन कुरैशी | ८,७७७/- | अति.प्र. | दु.आवेक्षक |
| ११ | श्री.रामा लक्ष्मण खरात | १२०२१/- | अति.प्र. | मजूर |
| १२ | श्री. खान महेमुद उन्नीसा | ८२५/- | पेन्शन कॅ. | सह.शिक्षक |
| १३ | श्रीमती गयाबाई सुर्यभान सोनवणे | २३९२५/- | अति.प्र | मजूर |
| १४ | श्रीमती अंतिकाबाई हरिदास कुलकर्णी | २४६५६/-<br>+३८९८/- | अति.प्र<br>पेन्शन कॉ. | सह.शिक्षिका |
| १५ | श्रीमती येणुबाई गंगाधार सदाफुले | २०६५/- | अति.प्र | मजूर |
| १६ | श्री.दिलीप नारायण सुरडकर | १७५९/- | अति.प्र | मजूर |
| १७ | श्रीमती अलका शहाणे | १०५०/- | अति.प्र | सह.शिक्षिका |
| १८ | श्रीमती सलमा निशाण | १०५०/- | अति.प्र | सह.शिक्षिका |
| १९ | श्री.लक्ष्मण संजय पवार | १३५१४/- | अति.प्र | दु.आवेक्षक |
| २० | ईश्वर सुरजा तुसंबड | १८४२०/- | अति.प्र | मजूर |
| २१ | उत्तम वामन बावस्कर | २१४७/- | अति.प्र | मजूर |
| २२ | यमुनाबाई बबन सरोदे | ५४३४/- | अति.प्र | मजूर |
| २३ | श्रीमती शाहिन बेगम फारूख्र सिद्यीकी | ५२१३०/- | अति.प्र | ए.एन.एम. |
| २४ | श्रीमती हबीबा ख्रातून ख्रान | ६७५३/- | पेन्शन कॉ. | सह.शिक्षिका |
| २५ | श्रीमती सरीता सुरेश देशपांडे | ८२९७/- | पेन्शन कॉ. | सह.शिक्षिका |
| २६ | श्री.सुख्रदेव सख्राराम जगताप | २२४९/- | अति.प्र. | मजूर |
| २७ | श्री.नारायण नामदेव दौंड | ३४७१७/- | अति.प्र. | लाईनमन पापु |
| २८ | श्रीमती सुमनबाई आसाराम कुलकर्णी | २२५८/- | अति.प्र. | मजूर |
| २९ | श्री.उत्तम नामदेव कांबळे | २२५८/- | अति.प्र. | मजूर |
| ३० | श्री.कैलास गंगाराम पवार | ३२५१६/- | घरभाडे | मजूर |
| ३१ | श्री.शेख्र नूर शे. महेमुद | १८७३८/- | अति.प्र. | हमाल |
| ३२ | श्री.सुख्रदेव आनंदा दाभाडे | ३११८/- | अति.प्र. | मजूर |

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | अतिप्रदान रक्कम रु. | | पदनाम |
|---|---|---|---|---|
| ३३ | श्री.वसंत दगडू बिडवे | २७,२८२/- | अति.प्र. | SFW |
| ३४ | श्री.प्रभाकर किसन पाटील | ४६६०/- | अति.प्र. | वा.चा. |
| ३५ | श्री.अंबादास अन्ना गायकवाड | १९४८५/- | अति.प्र. | वा.चा. |
| ३६ | श्री.चंद्रगिरी केरबा गिरी | ४४,४४२/- | अति.प्र. | वा.चा. |
| ३७ | श्री.देवराव सयाजी आव्हाड | ३५२२/- | अति.प्र. | मजूर |
| ३८ | श्री.राजपती बद्रीनारायण चावरिया | १६,१२५/- | अति.प्र. | मजूर |
| ३९ | श्रीमती केसरबाई लक्ष्मण गायकवाड | २२,३५०/- | अति.प्र. | मजूर |
| ४० | श्रीमती बरखा हरलाल रिडलान | ५९१२/- | अति.प्र. | मजूर |
| ४१ | श्री.अशोक दिगंबर बाविस्कर | १०७२४/- | पेन्शन कॉ. | मजूर |
| ४२ | श्री.श्रीरंग शिवाजी दाभाडे | २४०१/- | पेन्शन कॉ. | मजूर |
| ४३ | श्री.अन्वर हफीज अ.रहेमान | ३४०/- | | हेल्पर |
| ४४ | श्री.जनार्धन लक्ष्मण गायकवाड | १४६४/- | | मजूर |
| ४५ | श्री.रबीब अहेमद खॉन | ६६५/- | अति.प्र. | शिपाई |
| ४६ | श्री.वसंत रखमाजी कदम | ५२५४/- | अति.प्र. | पा.पु.लाईनमन |
| ४७ | श्रीमती धनेबाई रामदास रिडलॉन | ३११८/- | अति.प्र. | मजूर |
| ४८ | श्री.अशोक केरुबा वाघुले | १७९००/- | अति.प्र. | मजूर |
| ४९ | श्री.पालसिंग शंकर चावरिया | ९११६०/- | अति.प्र. | मजूर |
| ५० | श्री.बाबु गंगाराम पाखरे | २४८७८/- | अति.प्र. | मजूर |
| ५१ | श्री.विनायक काशिनाथ साबळे | १७८५९/- | अति.प्र. | मजूर |
| ५२ | श्रीमती येणुबाई हिरामन शिंदे | १८०००/- | अति.प्र. | मजूर |
| ५३ | श्री.विजय गणपत न्यायधिश | १७९९/- | अति.प्र. | मजूर |
| ५४ | श्री.कचरू धोंडिराम वाघ | ३३१/- | अति.प्र. | माळी |
| ५५ | श्री.भिमराव आनंदा कांबळे | १९७८/- | अति.प्र. | मजूर |
| ५६ | श्री.श्रीकृष्ण विश्वनाथ भाले | ६७६५/- | अति.प्र. | मजूर |
| ५७ | श्री.देविदास चोखाजी मगरे | ५३६५/- | अति.प्र. | वॉचमन |
| ५८ | श्री.राजपाल सुरजितसिंग चावरीया | ३११८/- | अति.प्र. | मजूर |
| ५९ | श्री.गौतम रतन नगराळे | २६,३८५/- | स्वे.से. | मजूर |
| ६० | श्री.सतीश नामदेव उमाळकर | ५५८६/- | स्वे.से. | उप.अभि. |
| ६१ | श्रीमती आशा प्रकाश दौलताबादकर | १५६४/- | पेन्शन कॉ. | सह.शिक्षिका |
| ६२ | श्रीमती धौपदाबाई किसन त्रिभूवन | १७६५०/- | अति.प्र. | माळी |
| ६३ | श्री.राजेश मालय्या नगरकर | ६००/- | अति.प्र. | SFW |
| ६४ | श्री.कैलास ताकवाले | २८,६१६/- | अति.प्र. | मजूर |
| ६५ | श्री.खालेदबिन अहमद | ४३,०४५/- | अति.प्र. | मजूर |
| ६६ | श्रीमती वृषाली गजरे | ७७५/- | अति.प्र. | प्रयोगशाळा |
| ६७ | श्रीमती वर्षा जयकिसन भालेराव | २४,९९९/- | अति.प्र. | परिचारिका |
| ६८ | श्री.मोहन खोबा सितापुरे | ६६,२६५/- | अति.प्र. | स्व.निरिक्षक |

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | अतिप्रदान रक्कम रू. | | पदनाम |
|---|---|---|---|---|
| ६९ | श्री.साईनाथ भिवाजी राऊत | १९,९८३/- | अति.प्र. | मजूर |
| ७० | श्री.शे.हमीद शे.महेमुद | ४२५४/- | अति.प्र. | वा.चा. |
| ७१ | श्री.गोविंद बाबुराव वाघमारे | ६९७/- | अति.प्र. | MPW |
| ७२ | श्री.रामदर्शन चव्हाण | २७९५/- | अति.प्र. | मजूर |
| ७३ | श्री.शे.मुनिर मो.साहेब | ३११८/- | अति.प्र. | शिपाई |
| ७४ | श्रीमती उषा श्रीपत साबळे | ५६७५/- | अति.प्र. | NMA |
| ७५ | श्री.शे.मो. शे.जानु | ४४८०/- | अति.प्र. | वा.चा. |
| ७६ | श्री.एस.बी.खरात | ५२९२७/- | अति.प्र. | वा.चा. |
| ७७ | श्री.पंडीत वाघाजी कांबळे | २६१८७/- | अति.प्र. | मलेरिया मजूर |
| ७८ | श्री.सय्यद बशिर अहेमद | ३,२१,९२०/- | अति.प्र. | लिपीक |
| ७९ | श्रीमती सिताबाई किसन वाहुळ | ५७९/- | अति.प्र. | मजूर |
| ८० | श्री.भिमराव दगडू जगधने | ५७७६/- | अति.प्र. | लाईनमन |
| ८१ | श्री.रमेश भिमराव सोनवणे | २०१८९/- | अति.प्र. | मजूर |
| ८२ | श्रीमती गिता सुभाषराव साठेलकर | ६०,५२६/- | अति.प्र. | परिचारिका |
| ८३ | श्री.अरविंद वि.कुलकर्णी | ३४,६३६/- | अति.प्र. | सु.जमादार |
| ८४ | श्री.व्ही.एल.पाडळकर | ३६०४/- | अति.प्र. | कार्य.अभि |
| ८५ | श्री.शे.वाहेद शे.निजाम | २६,८३३/- | अति.प्र. | L.S.S |
| ८६ | श्री.खलील अहेमद शे. | २,३०३/- | अति.प्र. | दु.आवेक्षक |
| ८७ | श्री.आश्रु दुधाजी दुधाडे | १२,२३६/- | अति.प्र. | स.मजूर |
| ८८ | श्री.शे.नसरूलखान शे.दाऊद | ५९,०९८/- | अति.प्र. | ज्ये.वा.चा. |
| ८९ | श्रीमती केलाबाई कवरसिंग चावरिया | १९,७५०/- | अति.प्र. | मजूर |
| ९० | श्रीमती गुंफाबाई काशिनाथ नावकर | ३८७९/- | अति.प्र. | मजूर |
| ९१ | श्री.सय्यद अहेमद स.मुर्तुजा | २०,८०६/- | अति.प्र. | वॉचमन |
| ९२ | श्री.मधुकर पंडितराव गजभारे | ५३,४१२/- | अति.प्र. | समन्वयक |
| ९३ | श्री.बापु सपकाळ | ६५,८६८/- | अति.प्र. | सु.रक्षक |
| ९४ | श्री.रंगनाथ जाधव | ५,९२४/- | अति.प्र. | वाहन चालक |
| ९५ | श्री.श्रावण चौथमल | १७,८५१/- | अति.प्र. | हेल्पर |
| ९६ | श्री.सय्यद कबीर अहेमद | ३४,३३२/- | अति.प्र. | माळी |
| ९७ | श्रीमती आसराबाई सुदाम शेजूळ | १५,५१९/- | अति.प्र. | मजूर |
| ९८ | श्रीमती वैजयंतीबाई शामराव शिंदे | ३४,७०९/- | अति.प्र. | मजूर |
| ९९ | श्री.रमेश केशरीलाल गजरा | ६८,५५८/- | अति.प्र. | सुरक्षा रक्षक |
| | **एकूण** | **१८,९५,८१९/-** | | |

परिच्छेद क्र. ५: **शासनाच्या विविध कराच्या रकमांची वसूली झाल्यानंतर रकमा वेळोवळी शासकीय कोषागारात भरणा न करणे बाबत.**

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले आहे की, लेखा शाखेने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात विविध देयकातून केलेल्या कपाती या शासनाच्या संबंधित विभागाकडे वेळेवर जमा करणे बंधनकारक असतांना सुध्दा रकमा जमा केलेल्या नाहीत.

विभागाने वेळोवेळी शासकीय रकमा शासकीय कोषागारात भरणा कराव्यात जेणे करून संबंधित विभागाकडून होऊ शकणारी अप्रिय कार्यवाही टाळता येईल.

उपरोक्त बाबींबाबत निष्काळजीपणा केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांविरूध्द प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन दर्शवावे.

परिच्छेद क्र. ६ : **नविन अंशदान निवृत्ती योजने बाबत. (Defind Contributory Pension Scheme)**

शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ अन्वये १ नोव्हेंबर २००५ व त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन अनुज्ञेय असणार नाही. याबाबत शासनाने शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. औरंगाबाद मनपामध्ये दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्ती दिलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना नियुक्ती आदेशात या अर्थाची अट नमूद केलेली असते, परंतू प्रत्यक्षात लेखा विभागातर्फे योजना लागू करणेबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. उक्त योजना गेल्या ९ वर्षापासून अंमलात आणणे आवश्यक होते. तथापि लेखा शाखेने सदरील योजनेचे अंमलबजावणी केलेली नसल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्या सोबतच महानगरपालिकेवर सुध्दा योजना अंमलबजावणी साठीच्या खर्चाचे दायित्व वाढलेले आहे. या दरम्यान एखाद्या कर्मचा-याचा आकस्मित मृत्यू झाल्यास अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या सर्व बाबीचे गांभिर्य लेखा शाखेने घेवून तात्काळ योजनेची अंमलबजावणी करावी . तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

परिच्छेद क्र.७ : **द्विनोंद लेखा पध्दतीच्या अंमलबजावणी बाबत.**

शासनाच्या निर्देशानुसार द्विनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. औरंगाबाद महानगरपालिके मध्ये या पध्दतीचा अवलंब केलेला नाही. तसेच National Municipal Account Manual मधील नमुन्यानुसार महानगरपालिकेचे लेखे ठेवलेले नाहीत. या पध्दती अवलंबिल्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचे अचूक चित्र स्पष्ट होवू शकते.

लेखा शाखेने प्राधान्याने लेखा विभागातील सर्व कामे द्विनोंद लेख पध्दतीने व National Municipal Account Manual मधील नमुन्यात लेखे ठेवण्यासाठीची कार्यवाही तातडीने करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

# वॉर्ड -अ कार्यालय
# सन २००७-०८ ते सन २०११-१२
# लेखापरीक्षण अहवाल

प्रस्तावना :

महानगरपालिके अंतर्गतच्या वॉर्ड - अ कार्यालयाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ पर्यंतचे जमा बाजूचे चाचणी स्वरूपाचे नियमित लेखापरीक्षण उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानुसार करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने मालमत्ता वसूली पावती पुस्तके व पाणीपुरवठा पावती पुस्तकांमध्ये वसूल केलेली रक्कम इरसाल रजिस्टरसोबत वेळोवेळी संबंधित विभागामार्फत भरणा केल्याबाबत तपासणी करण्यात आली असून डिमांड रजिस्टरची सुध्दा तपासणी करण्यात आली आहे. याशिवाय कर्मचा-यांच्या सेवापटाची तसेच सेवापुस्तकाची तपासणी करण्यात आली आहे. तपासणी दरम्यान जमा बाजूचे एकूण **३२** परिच्छेद व खर्च बाजूचे वॉर्ड - अभियंता यांचे केवळ दोन परिच्छेद समाविष्ट करण्यात आलेले असून वॉर्ड अभियंता वॉर्ड- अ यांना वेळोवेळी लेखी व तोंडी सूचना देवूनही संबंधिताकडून अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे वॉर्ड अभियंता यांचे कार्यालयातील झालेला खर्च संशयास्पद आहे.

**वॉर्ड अधिकारी यांच्या कार्यकाळाबाबत :**

सन २००७- २००८ ते सन २०११-१२ या कालाधीत वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता म्हणून कार्यरत अधिका-यांची नांवे आस्थापना -१ विभागाकडून प्राप्त झालेली आहेत ती खालीलप्रमाणे -

**वॉर्ड अधिकारी -अ**

| अ. क्र | अधिका-याचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री.महंमद खान (सेवानिवृत्त) | दि.१.४.२००७ ते दि.३१.१२.२००७ |
| २ | श्री.शिरीष रामटेके, उपअभियंता (अ.का.) | दि.१.१.२००८ ते दि.०७.०२.२००८ |
| ३ | श्री.व्ही.डी.राठोड | दि.१.१.२००८ ते दि.२६.११.२००८ |
| ४ | श्री.संजय पवार | दि.२७.११.२००८ ते दि.२५.५.२००९<br>दि.०६.०७.२००९ ते दि.२२.८.२०१० |
| ५ | श्री.अजमत खान (प्रभारी) | दि.२६.०५.२००९ ते दि.०५.७.२००९<br>दि.०२.०५.२०१० ते दि.१३.६.२०१० |
| ६ | श्री.ए.ई.लाड (अ.का.) | दि.२२.३.२०१० ते दि.०१.५.२०१०<br>दि.२३.८.२०१० ते आजपावेतो (नियमित) |

**वॉर्ड अभियंता -अ**

| अ.क्र | अधिका-याचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री.शिरीष रामटेके | दि.१.४.२००७ ते नोव्हेंबर -२०१० |
| २ | श्री.ए.बी.देशमुख | दि.२१.५.२००८ ते दि.२५.५.२००८ |
| ३ | श्री.शफीक अहेमद, शाखा अभियंता (अ.का.) | दि.२६.५.२००८ ते दि.५.६.२००८ |
| ४ | श्री.आय.बी.खाजा | डिसेंबर -२०१० ते दि.२०.०१.२०११ |
| ५ | श्री.फारूख खान (प्रभारी) | दि.२१.१.२०११ ते जून -२०११ |
| ६ | श्री.आर.एन.संधा (प्रभारी) | जुलै -२०११ ते आजपावेतो. |

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-याची नांवे :**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक श्री.मो.रा.थत्ते यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे -

१. श्री.नासेर लईख, प्र.कार्यालयीन अधिक्षक (पथक प्रमुख)
२. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक
३. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक
४. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक
५. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक
६. श्रीमती पंचशिला खरात, कनिष्ठ लिपीक

यापूर्वी झालेल्या लेखा परीक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांची स्थिती.यापूर्वीच्या लेखा परीक्षण अहवालातील पुढील परिच्छेद अद्यापही प्रलंबित असल्याचे दिसून आले आहे.

सन १९९९-२०००, परि.क्र.ब, ११,१२ व १३, सन २०००-२००१, परि.क्र. अ, ब, सन २००१-२००२ चा परिच्छेद, सन २००२-०३ ते २००३-२००४,परि.क्र.१,२,३,४,सन २००४-२००५, परि.क्र.२,सन २००६-०७ ते २००७-०८,परि.क्र.ब,३,५, ६,वॉर्ड अभियंता खर्च बाजू, परि.क्र. १ ,२ ,सन २००८-२००९ ,१,२,४,५,६,११,१२,१४,१५,१९,२१,२२,२३,२४,वॉर्ड अभियंता खर्च बाजू, परि.क्र.१,२,३,४

प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन तात्काळ सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**<u>परिच्छेद क्र.१</u>** : सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीबाबत मागणी रजिस्टरचा वार्षिक ताळेबंद वॉर्ड - अ कार्यालयाकडून मागविण्यात आला असता खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

| मालमत्ता कर | | | |
|---|---|---|---|
| **अ.क** | **वर्ष** | **एकूण मागणी** | **संदर्भ वर्षातील वसूली** |
| १ | २००६-०७ | ४,८७,४५,६२२/- | २,३०,०४,३०५/- |
| २ | २००७-०८ | ४,७०,६४,३०८/- | २,४३,२७,२८५/- |
| ३ | २००८-०९ | ४,४९,०२,३६०/- | २,७५,४१,४३३/- |
| ४ | २००९-१० | ४५८९१७४४/- | २,७२,७४,१६५/- |
| ५ | २०१०-११ | ६,३६,८०,३८९/- | ३,७७,१९,१११/- |
| ६ | २०११-१२ | ६,५२,९२,७६५/- | ४,५७,४२,४६७/- |
| | **एकूण** | **३१,५५,७७,१८८** | **१८,५६,०८,७६६/-** |

| पाणीपट्टी कर | | | |
|---|---|---|---|
| **अ.क** | **वर्ष** | **एकूण मागणी** | **संदर्भ वर्षातील वसूली** |
| १ | २००६-०७ | ४,४३,९७,०९८/- | १,२४,४४,५४७/- |
| २ | २००७-०८ | ७,५०,२५,९६१/- | १,८८,५४,०८७/- |
| ३ | २००८-०९ | ६,८२,५५,६७०/- | १,७७,४३,९४८/- |
| ४ | २००९-१० | ६,५१,८६,३७२/- | १,७१,८७,३२३/- |
| ५ | २०१०-११ | ६,३८,२१,४९९/- | १,९६,९०,५९६/- |
| ६ | २०११-१२ | ६,५५,४४,४२८/- | १,६२,३४,९४६/- |
| | **एकूण** | **३८,२२,३१,०२८/-** | **१०,२१,५५,४४७/-** |

उपरोक्त प्रमाणे माहिती प्राप्त झालेली असून वॉर्ड - अ कार्यालयाने चालू मागणी , थकबाकी वसूली इत्यादींचा दिलेला तक्ता सोबत जोडण्यात आलेला आहे. प्रलंबित मालमत्ताधारकाची एकूण मागणीच्या प्रमाणात वसूलीचे प्रमाण फक्त ५८.८१% इतकेच आहे. प्रलंबित वसूली रू.१२,९९,६८,४२२/- एवढ्या मोठ्या प्रमाणावर आहे. ती वसूल होण्याचे दृष्टीने तातडीने प्रयत्न करून अनुपालन दर्शवावे. तद्वतच पाणीपट्टी वसूलीचे प्रमाण केवळ २६.७२% आहे व रू.२८,००,७५,५८१/- एवढ्या मोठ्या रकमेची वसूली होणे बाकी आहे. वसूली करीता विशेष प्रयत्न करून निष्कर्षासह अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.२** : सन २००७-२००८ ते सन २०११ -१२ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूंच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यांत आली असून तपासणी कालावधीत खाली नमूद केल्यानुसार पावती पुस्तकांची पडताळणी करण्यात अली. तपासणी करण्यात आलेल्या पावती पुस्तकांबाबतचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | मालमत्ता पुस्तक | पाणीपुरवठा | जनरल | अ.कृषीकर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००७-०८ | ६८ | ४३ | २५ | -- |
| २ | २००८-०९ | ७१ | ४२ | २८ | -- |
| ३ | २००९-१० | ७२ | ४४ | ३१ | -- |
| ४ | २०१०-११ | ७६ | ४७ | ३० | ०३ |
| ५ | २०११-१२ | ८४ | ४२ | २४ | ०४ |
| | | **३७१** | **२१८** | **१३८** | **०७** |

उक्त पावती पुस्तकांद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेवून महापालिका फंडात जमा केले बाबत तपासणी करण्यात आली. तसेच संबंधित मालमत्ता धारकांकडील वसूल करावयाच्या कर नोंदी ह्या मागणी रजिस्टर प्रमाणे घेतलेल्या आहेत / नाहीत याबाबतची खातरजमा करण्याच्या दृष्टीने चाचणी लेखापरीक्षण ही करण्यात आले. तपासणी दरम्यान वॉर्ड - अ कार्यालयातील उपलब्ध अभिलेखे ही अद्यावत ठेवलेले नाहीत. तसेच अभिलेख्यांची स्थिती समाधानकारक नाही. विहित नमुन्यात अभिलेख अद्यावत करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३** : सन २००७-२००८ ते सन २०११-१२ या कालावधीचे वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता, पाणीपट्टी करापोटी व जनरल पावती पुस्तकाआधारे वसूल करण्यात आलेल्या रकमा महाराष्ट्र नगरपरिषद संहिता १९७१ चे नियम ११ अन्वये वसूल केलेली रक्कम मनपा फंडात तात्काळ भरणा करणे आवश्यक होते. परंतु वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, वसूल केलेली रक्कम रू.**६०७९८**/- मनपा फंडात भरणा केलेली नाही म्हणजेच उपरोक्त रकमेचा अपहार केल्याचे दिसून येते. संबंधितांनी लेखा संहितेतील तरतूदीचा भंग केला असल्याने अपहारीत रक्कम वसूल करावी व जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे. अपहारीत रक्कम रू.**६०७९८**/- रकमेचे सविस्तर विवरण पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | मालमत्ता कर पाणीपट्टी कर व जनरल पावती पुस्तक व पावती क्रमांक | दिनांक | मालमत्ता धारकाचे नांव | पावतीची रक्कम | मनपा फंडात भरणा रक्कम | कमी भरणा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०७८/२०७७९७ | २५.२.२००८ | श्री.व्यंकटेश यशवंतराव खाडीलकर | ७११३/- | ३११३/- | ४०००/- |
| २ | २०८०/२०७९८६ | ०५.०३.२००८ | श्री.शहदेव राघुजी जाधव | ५२१७/- | २१०४/- | ३११३/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २०४५/२२४४२२ | २७.०३.२००८ | -- | ८२५१/- | १५६१/- | ६६९०/- |
| ४ | २८८०/२८७९७२ | ०२.०२.२००८ | श्री.सुखदेव तुपे | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| ५ | २६८७/२६८६७८ | २१.०८.२००७ | | १८००/- | १०००/- | ८००/- |
| ६ | २९६८/२९६७३५ | ०५.०३.२००८ | | ५४००/- | १८००/- | ३६००/- |
| ७ | २९७५/२९७४१४ | १२.०३.२००८ | | १४०४४/- | ७९४४/- | ६१००/- |
| ८ | २६३८/२६३७४२ | ०७.०६.२००७ | | ४९५०/- | १८००/- | ३१५०/- |
| ९ | २६३८/२६३७४५ | ०८.०६.२००७ | | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| १० | २५००/२४९९९५ | ०७.०१.२००८ | | ५०/- | -- | ५०/- |
| ११ | २५००/२४९९९६ | ०७.०१.२००८ | | २५०/- | -- | २५०/- |
| १२ | २५००/२४९९९७ | ०७.०१.२००८ | | ७२००/- | -- | ७२००/- |
| १३ | २५००/२४९९९८ | ०७.०१.२००८ | | ३४५/- | -- | ३४५/- |
| १४ | २५००/२४९९९९ | ०९.०१.२००८ | | १५०/- | -- | १५०/- |
| १५ | २५००/२५०००० | ०९.०१.२००८ | | १५०/- | -- | १५०/- |
| १६ | ३५३१/३५३०४६ | ३१.०३.२००९ | श्री.विजयकुमार शंकरराव पवार | ५४००/- | -- | ५४००/- |
| १७ | ३१८७/३१८६२१ | १८.८.२००८ | | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| १८ | ४१७२/४१७१७४ | ०६.३.२०११ | श्री.मो.अब्दुल रहीम | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| १९ | ४१०९/४१०८८० | ०९.७.२०१० | श्रीमती रंजना भागीराम शिंदे | १८००/- | -- | १८००/- |
| २० | ४१६९/४१६८०६ | | | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| २१ | ४६४०/४६३९२८ | २१.४.२०११ | श्रीमती नजिमुन्नीसा बेगम | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| २२ | ४५४७/४५४६३५ | २३.८.२०११ | अलिमखान मुन्नावर खान | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| २३ | १२३/१२२९१ | १७.९.२०१२ | आर.एम. गायकवाड | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| २४ | ४५४५/४५४४५० | ३०.३.२०१२ | पंडीत धोंडीराम लक्ष्मण | ३६००/- | -- | ३६००/- |
| | **एकूण** | | | **९४५२०/-** | **३३७२२/-** | **६०७९८/-** |

**<u>परिच्छेद क्र.४ :</u>** सन २००७-२००८ ते सन २०११-१२ या कालावधीचे वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता, पाणीपट्टी करापोटी व जनरल पावती पुस्तकाआधारे वसूल करण्यात आलेल्या रकमापैकी इरसाल रजिस्टरमध्ये नोंदी घेतांना बेरजेत तफावत असल्यामुळे कमी भरणा झालेला आहे. असा कमी झालेला भरणा तात्काळ महानगरपालिका फंडात जमा करणे क्रमप्राप्त होते. महाराष्ट्र नगरपरिषद संहिता १९७१ चे नियम ११ प्रमाणे वसूल केलेली रक्कम महानगरपालिका फंडात भरणा न करून लेखा संहितेतील उपरोक्त कलमाचा भंग झालेला आहे. बेरजेत तफावत असलेल्या रकमा ज्या लेखापरीक्षणा दरम्यान निदर्शनास आल्या अशी रक्कम **रू.१,५२,३१३/-** महानगरपालिका फंडात भरणा केलेली नाही म्हणजेच उपरोक्त रकमेचा अपहार केल्याचे दिसून येते. संबंधितांनी लेखा संहितेतील तरतूदीचा भंग केला असल्याने अपहारीत रक्कम वसूल करावी व जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे. अपहारीत रक्कम रू. **रू.१,५२,३१३/-** रकमेचे सविस्तर विवरण पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | इरसाल रजिस्टर क्र/ पा. क्र. | इरसाल रजिस्टरवरील दिनांक | प्रत्यक्षात पाहिजे असलेली एकूण रक्कम | दर्शविलेली एकूण रक्कम | फरक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १/६७ ते ७० | १९.५.२००७ | ७०६६७/- | ६०६६७/- | १०,०००/- |
| २ | ७/१९ ते २३ | २५.१.२००८ | २५९३३५/- | २४३३५४/- | १५,९८१/- |
| ३ | ७/२४ ते २९ | २८.१.२००८ | १,९५,१९५/- | १,८७,३९५/- | ७,८००/- |
| ४ | ९/३५ | ०६.३.२००८ | ७,९०,९१९/- | ७,८३,८६६/- | ७०५३/- |
| ५ | १०/६९ | ३०.३.२००८ | ६,४७,७५०/- | ६,४७,१४८/- | ६०२/- |
| ६ | ७/३३ | २९.१.२००८ | १,५०,८७७/- | १,४७,८७७/- | ३०००/- |
| ७ | ७/२७ | ३०.१.२००८ | २,०४,७०८/- | १,९६,३०८/- | ८,४००/- |
| ८ | ७/३८ | १.०२.२००८ | १,९८,४३२/- | १,९१,२३२/- | ७,२००/- |
| ९ | ७/५६ | ५.२.२००८ | ६,३६,६३०/- | ६,१६,६२७/- | २०,००३/- |
| १० | ८/१० | ८.२.२००८ | ३,८४,२२९/- | ३,६४,२२९/- | २०,०००/- |
| ११ | ९/१०७ | १७.३.२००८ | २,६०,५०९/- | २,५९,५१२/- | ९९७/- |
| १२ | १०/७४ | ३०.३.२००८ | ९,९९,८५४/- | ९,५१,३७३/- | ४८,४८१/- |
| १३ | १०/३२ | ३१.३.२०१२ | ९५,६३,३५८/- | ९५,६०,५६२/- | २७९६/- |
| | | एकूण | १,४३,६२,४६३/- | १,४२,१०,१५०/- | १५२३१३/- |

**<u>परिच्छेद क्र.५</u>** : सन २००७-२००८ ते सन २०११-१२ या कालावधीचे वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता, पाणीपट्टी करापोटी व जनरल पावती पुस्तकाआधारे वसूल करण्यात आलेल्या रकमा महाराष्ट्र नगरपरिषद संहिता १९७१ चे नियम ११ प्रमाणे वसूल केलेली रक्कम महानगरपालिका फंडात तात्काळ भरणा करणे आवश्यक होते. परंतु वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान संबंधितांना याबाबत अवगत केले असता संबंधितांनी लेखापरीक्षणा दरम्यान वसूल झालेल्या थकित रकमा महानगरपालिका फंडात भरणा केलेल्या आहे. विभागाने लेखापरीक्षणात निदर्शनास आल्यानंतर रकमा भरणा केलेल्या असल्यामुळे तात्पुरता अपहार झाल्याचे दिसून येते. संबंधितांनी लेखा संहितेतील तरतूदीचा भंग केला असल्याने अपहारीत रक्कम विलंबाने आक्षेपाअंती भरणा केलेली असल्यामुळे वसूली दिनांक व भरणा दिनांक यातील तफावतीनुसार संबंधितांकडून महापालिकेच्या झालेल्या नुकसानीचे भरपाई करावी व जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे. वॉर्ड- अ कार्यालयात अशा प्रकारे लेखापरीक्षणा दरम्यान अपहारीत रक्कम रू. **७३६७/-** भरणा केलेली असून त्याचे सविस्तर विवरण खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मालमत्ता कर पाणीपट्टी कर व जनरल पावती पुस्तक व पावती क्रमांक | दिनांक | मालमत्ता धारकाचे नांव | पावतीची रक्कम | मनपा फंडात भरणा रक्कम | कमी भरणा | आक्षेपा अंती भरणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २९६७/ १ ते १०० | | | १०००/- | -- | १०००/- | १०००/- |
| २ | १५७/१५६१३ | ३१.७.२००८ | | ६९०/- | ३४५/- | ३४५/- | ३४५/- |
| ३ | ३९३०/३९२९७६ | ११.३.२०१० | श्री.एस.बी.पवार | २०००/- | १८००/- | २००/- | २००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १९२/१९१४८ | ३१.३.२०१० | श्री.महेंद्रकुमार | ६४९/- | ६४/- | ५८५/- | ५८५/- |
| ५ | ३७८१/३७८०४८ | २२.१.२०१० | श्री.जी.ए.गोमटे | २०००/- | -- | २०००/- | २०००/- |
| ६ | ३६६७/३६६६४७ | १५.३.२०१० | श्री.निर्मलक्रीष्णा देहाडे | २२००/- | २०००/- | २००/- | २००/- |
| ७ | ३५३७/३५३६५६ | २२.१.२०१० | -- | ७३७५/- | ७३२५/- | ५०/- | ५०/- |
| ८ | ३५३७/३५३६५७ | २२.१.२०१० | -- | ७३७५/- | ७३२५/- | ५०/- | ५०/- |
| ९ | ३५३७/३५३६५८ | २२.१.२०१० | -- | ७३७५/- | ७३२५/- | ५०/- | ५०/- |
| १० | ३५३७/३५३६५९ | २२.१.२०१० | -- | ७३७५/- | ७३२५/- | ५०/- | ५०/- |
| ११ | ३५३०/३५२९१६ | ९.१०.२००९ | | १११३/- | ८१३/- | १०००/- | १०००/- |
| १२ | ४१०६/४१०५२४ | १९.४.२०१० | -- | २५५०/- | २२५०/- | ३००/- | ३००/- |
| १३ | ७९७/७९६३४ | २८.३.२०११ | | २५३४/- | २३५४/- | १८०/- | १८०/- |
| १४ | ७९१/७९०११ | २३.३.२०११ | | २०००/- | १९००/- | १००/- | १००/- |
| १५ | ०१/०११ | २०.८.२०१० | | १५१/- | -- | १५१/- | १५१/- |
| १६ | ०१/०९८ | १८.११.२०१० | | १७५/- | -- | १७५/- | १७५/- |
| १७ | ०१/०९९ | १८.११.२०१० | | १३५/- | -- | १३५/- | १३५/- |
| १८ | १४१०/१४०९६२ | ३०.३.२०१२ | | ४९२/- | २४६/- | २४६/- | २४६/- |
| १९ | २४७/२४६३६ | २१.३.२०१२ | श्रीमती अमिना बेगम शे.मेहबूब | १०९००/- | १०८००/- | १००/- | १००/- |
| २० | ४५/४४६३ | १६.९.२०११ | | १९४०/- | १४९०/- | ४५०/- | ४५०/- |
| | | | **एकूण** | **६०,०२९/-** | **५३,३६२/-** | **७३६७/-** | **७३६७/-** |

**<u>परिच्छेद क्र.६ :</u>** सन २००७-२००८ ते सन २०११-१२ या कालावधीचे वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता, पाणीपट्टी करापोटी व जनरल पावती पुस्तकाआधारे वसूल करण्यात आलेल्या रकमांच्या नोंदी इरसाल रजिस्टरमध्ये घेतल्यानंतर इरसाल रजिस्टरच्या बेरजेत तफावत असलेल्या रकमा महाराष्ट्र नगरपरिषद संहिता १९७१ चे नियम ११ प्रमाणे वसूल केलेली रक्कम महानगरपालिका फंडात तात्काळ भरणा करणे आवश्यक होते. परंतु वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान संबंधितांना याबाबत अवगत केले असता संबंधितांनी लेखापरीक्षणा दरम्यान वसूल झालेल्या थकित रकमा महानगरपालिका फंडात भरणा केलेल्या आहे. विभागाने लेखापरीक्षणात निदर्शनास आल्यानंतर रकमा भरणा केलेल्या असल्यामुळे तात्पुरता अपहार झाल्याचे दिसून येते. संबंधितांनी लेखा संहितेतील तरतूदीचा भंग केला असल्याने अपहारीत रक्कम विलंबाने आक्षेपाअंती भरणा केलेली असल्यामुळे वसूली दिनांक व भरणा दिनांक यातील तफावतीनुसार संबंधितांकडून महापालिकेच्या झालेल्या नुकसानीचे भरपाई करावी वसूल करावी व जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे. वॉर्ड- अ कार्यालयात अशा प्रकारे लेखापरीक्षणा दरम्यान अपहारीत रक्कम रू. **९३०/-** भरणा केलेली असून त्याचे सविस्तर विवरण खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | इरसाल रजिस्टर क्र/ पा. क्र. | इरसाल रजिस्टरवरील दिनांक | प्रत्यक्षात पाहिजे असलेली एकूण रक्कम | दर्शविलेली एकूण रक्कम | फरक रक्कम | आक्षेपाअंती भरणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९/२३ | २४.३.२०१० | २,६२,८०६२- | २,६१,९७६/- | ८३०/- | ८३०/- |
| २ | ४/४८ | ३.११.२०१० | १,९३,९४७/- | १,९३,८४७/- | १००/- | १००/- |
| | | **एकूण** | **४,५६,७५३/-** | **४,५५,८२३/-** | **९३०/-** | **९३०/-** |

**परिच्छेद क्र.७ :** सन २००७-२००८ ते सन २०११-१२ या कालावधीचे वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता, पाणीपट्टी करापोटी व जनरल पावती पुस्तकाआधारे वसूल करण्यात आलेल्या रकमांचा विलंबाने महानगरपालिका फंडात भरणा केलेला आहे. सरासरी ११० दिवस विलंबाने रकमा महानगरपालिका फंडात भरणा केल्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात अपहार झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र नगरपरिषद संहिता १९७१ चे नियम ११ प्रमाणे वसूल केलेली रक्कम महानगरपालिका फंडात तात्काळ भरणा करणे आवश्यक होते. वॉर्ड - अ कार्यालयात विलंबाने भरणा केलेली रक्कम रू.१३,१३,११९/- असून सरासरी प्रमाणे ११० दिवस रक्कम संबंधितांनी वापरल्यामुळे महानगरपालिकेचे ११० इतक्या दिवसाचे व्याजाचे नुकसान झालेले आहे. संबंधितांनी लेखा संहितेतील तरतूदीचा भंग केला असल्याने तात्पुरत्या अपहारीत रकमेवरील व्याजाची वसूली करावी व जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे. विलंबाने भरणा केलेल्या रकमांचा तपशिल पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | पुस्तक क्र. | पान क्र. | वसूल दिनांक | भरणा दिनांक | दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८२९ | १८२८०१ | १०.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | २१००/- |
| २ | १८२९ | १८२८०२ | १०.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | १४९२/- |
| ३ | १८२९ | १८२८०३ | १०.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ७६९/- |
| ४ | १८२९ | १८२८०४ | १०.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ११६६/- |
| ५ | १८२९ | १८२८०५ | १०.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ८४३/- |
| ६ | १८२९ | १८२८०६ | १०.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ७८०/- |
| ७ | १८२९ | १८२८०७ | १०.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | १५५३/- |
| ८ | १८२९ | १८२८०८ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ८७४/- |
| ९ | १८२९ | १८२८०९ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ३८०/- |
| १० | १८२९ | १८२८१० | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ७९४/- |
| ११ | १८२९ | १८२८११ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ७५०/- |
| १२ | १८२९ | १८२८१२ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ८१७/- |
| १३ | १८२९ | १८२८१३ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ३५४/- |
| १४ | १८२९ | १८२८१४ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | २०९/- |
| १५ | १८२९ | १८२८१५ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ९४०/- |
| १६ | १ | १८२८१६ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | २४८/- |
| १७ | १८२९ | १८२८१७ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ८३९/- |
| १८ | १८२९ | १८२८१८ | ११.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ३३२/- |
| १९ | १८२९ | १८२८१९ | १६.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ८७०३/- |
| २० | १८२९ | १८२८२० | १६.४.०७ | २९.३.०८ | ३६५ | ६०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | १८२९ | १८२८२१ | ५.५.०७ | २९.३.०८ | ३६५ | १८५९८/- |
| २२ | २०१९ | २०१८९७ | ७.१.२००८ | २८.१.०८ | २१ | १२,२३२/- |
| २३ | २०१९ | २०१८९८ | ७.१.२००८ | २८.१.०८ | २१ | ३,६६६/- |
| २४ | २०१९ | २०१८९९ | ८.१.२००८ | २८.१.०८ | २० | ९६/- |
| २५ | २०१९ | २०१९०० | ८.१.२००८ | २८.१.०८ | २० | ४२७/- |
| २६ | २०७४ | २०७३०१ | ४.१.२००८ | १४.१.०८ | १० | ५२३/- |
| २७ | २०७४ | २०७३०२ | ४.१.२००८ | १४.१.०८ | १० | ५००/- |
| २८ | २०७४ | २०७३०३ | ५.१.२००८ | १४.१.०८ | ९ | ६९१/- |
| २९ | २०७४ | २०७३०४ | ५.१.२००८ | १४.१.०८ | ९ | ४६०३/- |
| ३० | २०७४ | २०७३०५ | ५.१.२००८ | १४.१.०८ | ९ | ४६०३/- |
| ३१ | २०७४ | २०७००६ | ७.१.२००८ | १५.१.०८ | ९ | २१४५/- |
| ३२ | २०७४ | २०७००७ | ७.१.२००८ | १५.१.०८ | ९ | १३६२/- |
| ३३ | २०७४ | २०७००८ | ७.१.२००८ | १५.१.०८ | ९ | १२८६/- |
| ३४ | २०७४ | २०७००९ | ७.१.२००८ | १६.१.०८ | १० | ३०३०/- |
| ३५ | २०७४ | २०७०१० | ७.१.२००८ | १६.१.०८ | १० | १५१५/- |
| ३६ | २०७४ | २०७०११ | ८.१.२००८ | १६.१.०८ | ९ | ११४८/- |
| ३७ | २०७४ | २०७०१२ | ८.१.२००८ | १६.१.०८ | ९ | ८१४/- |
| ३८ | २०७८ | २०७७९५ | २०.२.०८ | ३.३.०८ | १४ | ८४१/- |
| ३९ | २०७८ | २०७७९६ | २०.२.०८ | ३.३.०८ | १४ | १७०२/- |
| ४० | २०७८ | २०७७९८ | १.३.०८ | १०.३.०८ | १० | २५५६/- |
| ४१ | २०७८ | २०७७९९ | ५.३.०८ | १०.३.०८ | ५ | ३९८४/- |
| ४२ | २०७८ | २०७८०० | ५.३.०८ | १०.३.०८ | ५ | २६६५/- |
| ४३ | २०७६ | २०७५८१ ते २०७५८४ | २०.२.०८ | ८.३.०८ | १८ | ७०९७/- |
| ४४ | २०७६ | २०७५८५ | २१.२.०८ | १०.३.०८ | २० | १३०८९/- |
| ४५ | २०७६ | २०७५८६ ते २०७५९३ | २२.२.०८ | ११.३.०८ | ११ | ६३२६/- |
| ४६ | २०७६ | २०७५९३ ते २०७६०० | २३.२.०८ | १२.३.०८ | २० | ६९६१/- |
| ४७ | २०७४ | २०७३७० ते २०७३७२ | २१.२.०८ | १३.३.०८ | २३ | ६४५६/- |
| ४८ | २०७४ | २०७३७३ ते २०७३७६ | २२.२.०८ | १४.३.०८ | २२ | ५७३०/- |
| ४९ | २०७४ | २०७३७७ ते २०७३९० | २६.२.०८ | १९.३.०८ | २४ | २४०६९/- |
| ५० | २०७४ | २०७३९१ ते २०७४०० | ४.३.०८ | २५.३.०८ | २० | १४८८/- |
| ५१ | २२३७ | २२३६१२ | १०.३.०८ | २५.३.०८ | १५ | १७,६६३/- |
| ५२ | १८२४ | १८२३१२ | ३.१.०८ | ७.२.०८ | ३२ | १२४९/- |

| अ. क्र. | पुस्तक क्र. | पान क्र. | वसूल दिनांक | भरणा दिनांक | दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३ | १८२४ | १८२३१३ | ४.१.०८ | ७.२.०८ | ३१ | ३१२३/- |
| ५४ | १८२४ | १८२३१४ | ४.१.०८ | ७.२.०८ | ३१ | २५८६/- |
| ५५ | १८२४ | १८२३१५ | १.२.०८ | ७.२.०८ | ०६ | ३५००/- |
| ५६ | १९४२ | १९४१६६ | २९.९.०७ | ८.१०.०७ | १० | १३५९३/- |
| ५७ | १७२२ | १७२१०१ | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ५८ | १७२२ | १७२१०२ | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ५९ | १७२२ | १७२१०३ | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ६० | १७२२ | १७२१०४ | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ६१ | १७२२ | १७२१०६ | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ६२ | १७२२ | १७२१०७ | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ६३ | १७२२ | १७२१०८ | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ६४ | १७२२ | १७२१०९ | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ६५ | १७२२ | १७२११० | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ६६ | १७२२ | १७२१११ | ३१.३.०७ | २३.८.०७ | १४३ | ३०६०/- |
| ६७ | १७२२ | १७२११२ | ३१.३.०७ | २४.८.०७ | १४४ | ३०६०/- |
| ६८ | १७२२ | १७२११३ | ३१.३.०७ | २८.८.०७ | १४९ | ३०६०/- |
| ६९ | १७२२ | १७२११४ | ३१.३.०७ | २८.८.०७ | १४९ | ३०६०/- |
| ७० | १७२२ | १७२११५ | ३१.३.०७ | २८.८.०७ | १४९ | ३०६०/- |
| ७१ | १७२२ | १७२११६ | ३१.३.०७ | २८.८.०७ | १४९ | ३०६०/- |
| ७२ | १७२२ | १७२११७ | ३१.३.०७ | २८.८.०७ | १४९ | ३०६०/- |
| ७३ | १७२२ | १७२११८ | ३१.३.०७ | २९.८.०७ | १५० | २२५/- |
| ७४ | १७२२ | १७२११९ | ३१.३.०७ | ३०.८.०७ | १५० | २६५०/- |
| ७५ | १७२२ | १७२१२० | ३१.३.०७ | ३०.८.०७ | १५० | ३७००/- |
| ७६ | १७२२ | १७२१२५ | ३०.९.०७ | २५.१०.०७ | २५ | ३०६०/- |
| ७७ | १७२२ | १७२१२६ | ३०.९.०७ | २५.१०.०७ | २५ | १०००/- |
| ७८ | १७२२ | १७२१२७ | ३०.९.०७ | २५.१०.०७ | २५ | २१६०/- |
| ७९ | १७२२ | १७२१२८ | २४.१०.०७ | ३१.३.०८ | १५० | ३०६०/- |
| ८० | १७२२ | १७२१२९ | २४.१०.०७ | ३१.३.०८ | १५० | २१६०/- |
| ८१ | १७२२ | १७२१३० | २४.१०.०७ | ३१.३.०८ | १५० | ३०६०/- |
| ८२ | १७२२ | १७२१३१ | २४.१०.०७ | ३१.३.०८ | १५० | ३०६०/- |
| ८३ | १७२२ | १७२१३२ | २४.१०.०७ | ३१.३.०८ | १५० | ३०६०/- |
| ८४ | १७२२ | १७२१३३ | २४.१०.०७ | ३१.३.०८ | १५० | ३०६०/- |
| ८५ | १७२२ | १७२१३४ | २४.१०.०७ | ३१.३.०८ | १५० | ३०६०/- |
| ८६ | २२३० | २२२९२४ | १३.८.०७ | ३.९.०७ | १९ | ३०६०/- |
| ८७ | २२३० | २२२९२५ | २२.८.०७ | ३.९.०७ | ११ | ३०६०/- |
| ८८ | २२३० | २२२९२६ | २२.८.०७ | ३.९.०७ | ११ | ३०६०/- |
| ८९ | २२३० | २२२९२७ | २२.८.०७ | ३.९.०७ | ११ | २१६०/- |
| ९० | १९२४ | १९२३०१ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | १५७५/- |
| ९१ | १९२४ | १९२३०२ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | १५७५/- |
| ९२ | १९२४ | १९२३०३ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | १५७५/- |
| ९३ | १९२४ | १९२३०४ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | २४५०/- |
| ९४ | १९२४ | १९२३०५ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | २४५०/- |
| ९५ | १९२४ | १९२३०६ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | २४५०/- |
| ९६ | १९२४ | १९२३०७ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | ६५०/- |

| अ.क्र. | पुस्तक क्र. | पान क्र. | वसूल दिनांक | भरणा दिनांक | दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ९७ | १९२४ | १९२३०८ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | ३५०/- |
| ९८ | १९२४ | १९२३०९ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | ३५०/- |
| ९९ | १९२४ | १९२३१० | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | १५०/- |
| १०० | १९२४ | १९२३११ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | ३५०/- |
| १०१ | १९२४ | १९२३१२ | ४.०४.०७ | १.८.०७ | १२० | ३५०/- |
| १०२ | २२२२ | २२२१०१ | २४.४.०७ | २८.६.०७ | ६६ | ३६००/- |
| १०३ | २२२२ | २२२१०२ | २४.४.०७ | २८.६.०७ | ६६ | १८००/- |
| १०४ | २२२२ | २२२१०३ | २४.४.०७ | २८.६.०७ | ६६ | १८००/- |
| १०५ | २२२२ | २२२१०४ | ३०.४.०७ | २८.६.०७ | ५९ | ११००/- |
| १०६ | २२२२ | २२२१०५ | १७.५.०७ | २८.६.०७ | ४३ | १८००/- |
| १०७ | २२२२ | २२२१०६ | १७.५.०७ | २८.६.०७ | ४३ | १८००/- |
| १०८ | २२२२ | २२२१०७ | १७.५.०७ | २८.६.०७ | ४३ | १८००/- |
| १०९ | २२२२ | २२२१०८ | २८.५.०७ | २८.६.०७ | ३० | ३६००/- |
| ११० | २२२२ | २२२१०९ | १३.६.०७ | २८.६.०७ | १५ | १८००/- |
| १११ | २२२२ | २२२११० | १३.६.०७ | २८.६.०७ | १५ | १८००/- |
| ११२ | २२२२ | २२२१११ | १४.६.०७ | २८.६.०७ | १४ | १८००/- |
| ११३ | २२२२ | २२२११२ | १४.६.०७ | २८.६.०७ | १४ | ३६००/- |
| ११४ | २२२२ | २२२११३ | १४.६.०७ | २८.६.०७ | १४ | ७२००/- |
| ११५ | २२२२ | २२२१२७ | २२.१०.०७ | ९.१.०८ | ८० | ३६००/- |
| ११६ | २२२२ | २२२१२८ | २२.१०.०७ | ९.१.०८ | ८० | १८००/- |
| ११७ | २२२२ | २२२१२९ | ०१.१०.०७ | ९.१.०८ | ४० | १८००/- |
| ११८ | २२२२ | २२२१३० | ०८.११.०७ | ९.१.०८ | ३३ | ३६००/- |
| ११९ | २२२२ | २२२१३१ | ०८.११.०७ | ९.१.०८ | ३३ | १८००/- |
| १२० | २२२२ | २२२१३२ | ०८.११.०७ | ९.१.०८ | ३३ | १८००/- |
| १२१ | २२२२ | २२२१३३ | २१.११.०७ | ९.१.०८ | २० | १८००/- |
| १२२ | २२२२ | २२२१३४ | २१.११.०७ | ९.१.०८ | २० | १८००/- |
| १२३ | २२२२ | २२२१३५ | २७.११.०७ | ९.१.०८ | १४ | १८००/- |
| १२४ | २२२२ | २२२१३६ | २७.११.०७ | ९.१.०८ | १४ | १८००/- |
| १२५ | २२२२ | २२२१३७ | २५.०२.०८ | ११.३.०८ | १५ | १८००/- |
| १२६ | २१ | २००१ | ०८.०२.०९ | २४.३.०९ | ४४ | २३४९/- |
| १२७ | २१ | २००२ | ०८.०२.०९ | २४.३.०९ | ४४ | १३८६/- |
| १२८ | २१ | २००३ | १२.२.०९ | २४.३.०९ | ४० | ३५८६/- |
| १२९ | २१ | २००४ | १३.२.०९ | २४.३.०९ | ३९ | १८०२/- |

| अ.क्र. | पुस्तक क्र. | पान क्र. | वसूल दिनांक | भरणा दिनांक | दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १३० | २१ | २००५ | ०३.०३.०९ | २४.३.०९ | २१ | १५४४/- |
| १३१ | २१ | २००६ | ०६.०३.०९ | २४.३.०९ | १८ | १०४४/- |
| १३२ | २१ | २००७ | ०७.०३.०९ | २४.३.०९ | १७ | ४७५३/- |
| १३३ | २१ | २००८ | ०९.०३.०९ | २४.३.०९ | १५ | ८०८८/- |
| १३४ | २१ | २००९ | १२.३.०९ | २४.३.०९ | १२ | ८६/- |
| १३५ | २१ | २०१० | १२.३.२००९ | २४.३.२००९ | १२ | १५२९९/- |
| १३६ | २१ | २०११ | २३.३.०९ | ३१.३.०९ | ८ | २००/- |
| १३७ | २१ | २०१२ | २३.३.०९ | ३१.३.०९ | ८ | १९९२/- |
| १३८ | २१ | २०१३ | २५.३.०९ | ३१.३.०९ | ६ | ४८५५/- |
| १३९ | २१ | २०१४ | २५.३.०९ | ३१.३.०९ | ६ | २७०४/- |
| १४० | २१ | २०१५ | २६.३.०९ | ३१.३.०९ | ५ | १५४७/- |
| १४१ | २३ | २२०६ | २४.४.०८ | ०४.०७.०८ | ७१ | ९९०१/- |
| १४२ | २३ | २२०७ | २४.४.०८ | ०४.०७.०८ | ७१ | १५९७/- |
| १४३ | २३ | २२०८ | ३०.४.०८ | ०४.०७.०८ | ६५ | ४६२/- |
| १४४ | २३ | २२०९ | १३.५.०८ | ०४.०७.०८ | ५१ | २०००/- |
| १४५ | २३ | २२१० | १३.५.००८ | ०४.०७.०८ | ५१ | ५८८/- |
| १४६ | २३ | २२११ | ११.६.०८ | ०४.०७.०८ | २३ | ८१५६/- |
| १४७ | २३ | २२१२ | १७.६.०८ | ०४.०७.०८ | १७ | ८७५६/- |
| १४८ | २३ | २२१३ | २४.६.०८ | ३१.३.०९ | २७८ | ७९५/- |
| १४९ | २३ | २२१४ | २४.६.०८ | ३१.३.०९ | २७८ | १६२४/- |
| १५० | २३ | २२१५ | ३०.६.०८ | ३१.३.०९ | २७० | ५७२/- |
| १५१ | २३ | २२१६ | ३०.६.०८ | ३१.३.०९ | २७० | ५०२/- |
| १५२ | २३ | २२१७ | ०१.७.०८ | ३१.३.०९ | २७० | ३३०५/- |
| १५३ | २३ | २२१८ | ०३.७.०८ | ३१.३.०९ | २७० | २८३२४/- |
| १५४ | २३ | २२१९ | ०३.७.०८ | ३१.३.०९ | २७० | ११४७/- |
| १५५ | २३ | २२२० | ०७.७.०८ | ३१.३.०९ | २६३ | २९४९/- |
| १५६ | २३ | २२२१ | ३१.७.०८ | ३१.३.०९ | २४० | ३०००/- |
| १५७ | २३ | २२२२ | ०४.८.०८ | ३१.३.०९ | २४० | ९०५१/- |
| १५८ | २३ | २२२३ | १३.८.०८ | ३१.३.०९ | २२७ | २८०२/- |
| १५९ | २३ | २२२४ | १३.८.०८ | ३१.३.०९ | २२७ | ६४२३/- |
| १६० | २३ | २२२५ | २६.८.०८ | ३१.३.०९ | २१७ | १०००/- |
| १६१ | २३ | २२२६ | ३०.८.०८ | ३१.३.०९ | २१७ | १६३१/- |
| १६२ | २३ | २२२७ | ११.९.०८ | ३१.३.०९ | २०० | १५६६८/- |
| १६३ | २३ | २२२८ | १६.९.०८ | ३१.३.०९ | १९५ | ५१६८/- |
| १६४ | २३ | २२२९ | २६.९.०८ | ३१.३.०९ | १९५ | ५००/- |
| १६५ | २३ | २२३० | १३.१०.०८ | ३१.३.०९ | १६७ | १४७९/- |
| १६६ | २३ | २२३१ | १७.१०.०८ | ३१.३.०९ | १५३ | ४२८८/- |
| १६७ | २३ | २२३२ | १७.१०.०८ | ३१.३.०९ | १६३ | ५४८५/- |
| १६८ | २३ | २२३३ | १७.११.०८ | ३१.३.०९ | १५३ | १३०५३/- |
| १६९ | २३ | २२३४ | २१.११.०८ | ३१.३.०९ | १३० | १८२६/- |

| अ.क्र. | पुस्तक क्र. | पान क्र. | वसूल दिनांक | भरणा दिनांक | दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १७० | २३ | २२३५ | २४.११.०८ | ३१.३.०९ | १२७ | १६९४/- |
| १७१ | ६४ | ६३६६ | ३१.७.२८ | ०७.७.०८ | ८ | २२१०/- |
| १७२ | ६४ | ६३६७ | ३१.७.०८ | ०७.७.०८ | ८ | ५४०/- |
| १७३ | ६४ | ६३६८ | ३१.७.०८ | ०७.७.०८ | ८ | ९५०३/- |
| १७४ | ६४ | ६३६९ | ३१.७.०८ | ०७.७.०८ | ८ | १४४८/- |
| १७५ | २८७६ | २८७५०१ | ०४.१.०८ | ११.४.०८ | १२० | ६५००/- |
| १७६ | २८७६ | २८७५०२ | ०४.१.०८ | ११.४.०८ | १२० | १८००/- |
| १७७ | २८७६ | २८७५०३ | ०४.१.०८ | ११.४.०८ | १२० | ५४००/- |
| १७८ | २८७६ | २८७५०४ | ०४.१.०८ | ११.४.०८ | १२० | १८००/- |
| १७९ | २८७६ | २८७५०५ | ०४.१.०८ | ११.४.०८ | १२० | ५४००/- |
| १८० | २८७६ | २८७५०६ | ०५.१.०८ | ११.४.०८ | १२० | १८००/- |
| १८१ | २८७६ | २८७५०७ | ०५.१.०८ | ११.४.०८ | १२० | १८००/- |
| १८२ | २८७६ | २८७५०८ | ०७.१.०८ | ११.४.०८ | १२० | ३०००/- |
| १८३ | २८७६ | २८७५०९ | ०७.१.०८ | ११.४.०८ | १२० | १८००/- |
| १८४ | २८७६ | २८७५१० | ०७.१.०८ | ११.४.०८ | १२० | ३६००/- |
| १८५ | २८७६ | २८७५११ | ०७.१.०८ | ११.४.०८ | १२० | १८००/- |
| १८६ | २८७६ | २८७५१२ | ०७.१.०८ | ११.४.०८ | १२० | २७००/- |
| १८७ | २८७६ | २८७५१३ | ०८.१.०८ | ११.४.०८ | १२० | १८००/- |
| १८८ | २८७६ | २८७५१४ | ०८.१.०८ | ११.४.०८ | १२० | १८००/- |
| १८९ | ८६१ | १ ते ४४ | १५.४.११<br>ते २.८.११ | १९.११.११ | ११० | १,६५,६०३/- |
| १९० | ४१४७ | -- | -- | -- | २० | ६४८१४/- |
| १९१ | ६१४ | -- | -- | -- | २० | ३५१३६६/- |
| १९२ | ९८६ | ९८५०१ | १०.६.११ | २९.११.११ | १८० | १०२६२/- |
| १९३ | ९८६ | ९८५०२ | १०.६.११ | २९.११.११ | १८० | १०२६२/- |
| १९४ | ९८६ | ९८५०३ | १०.६.११ | २९.११.११ | १८० | १०२६२/- |
| १९५ | ९८६ | ९८५०४ | २९.७.११ | २९.११.११ | १५० | ३७८४/- |
| १९६ | ९८६ | ९८५०५ | १८.८.११ | २९.११.११ | १२० | १०६००/- |
| १९७ | ९८६ | ९८५०६ | १८.८.११ | २९.११.११ | १२० | ३४४३/- |
| १९८ | ९८६ | ९८५०७ | २५.२.१२ | ३१.३.१२ | ३४ | ३१०९/- |
| १९९ | ९८६ | ९८५०८ | २६.२.१२ | ३१.३.१२ | ३३ | ६७०६/- |
| २०० | ९८६ | ९८५०९ | २६.२.१२ | ३१.३.१२ | ३३ | १८२४/- |
| २०१ | ९८६ | ९८५११ | २६.२.१२ | ३१.३.१२ | ३३ | ४०९८/- |
| २०२ | ९८६ | ९८५१२ | २७.२.१२ | ३१.३.१२ | ३२ | ३००/- |
| २०३ | ९८६ | ९८५१३ | २७.२.१२ | ३१.३.१२ | ३२ | १८४७/- |
| २०४ | ९८६ | ९८५१४ | २८.२.१२ | ३१.३.१२ | ३१ | १५९३/- |
| २०५ | ९८६ | ९८५१५ | २८.२.१२ | ३१.३.१२ | ३१ | ३७०८/- |
| २०६ | ९८६ | ९८५१६ | २९.२.१२ | ३१.३.१२ | ३० | १२८४/- |
| २०७ | ९८६ | ९८५१७ | २१.३.१२ | ३१.३.१२ | ९ | २८८०/- |

| अ.क्र. | पुस्तक क्र. | पान क्र. | वसूल दिनांक | भरणा दिनांक | दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २०८ | ९८६ | ९८५१८ | २१.३.१२ | ३१.३.१२ | ९ | १५२७/- |
| २०९ | ९८६ | ९८५१९ | २१.३.१२ | ३१.३.१२ | ९ | ५३६१/- |
| २१० | ९८६ | ९८५२० | २१.३.१२ | ३१.३.१२ | ९ | ६९४९/- |
| २११ | ९८६ | ९८५२१ | २१.३.१२ | ३१.३.१२ | ९ | १५२०५/- |
| | | | | **एकूण** | २३११६ | **१३,१३,११९/-** |

**परिच्छेद क्र.८: जनरल पावती पुस्तक क्रमांक २७५५ लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणे बाबत.**

प्रभाग - अ विभागाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००८-०९ या वर्षात जनरल पावती पुस्तक क्रमांक २७५५, लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नसून ते त्वरीत उपलब्ध करून देण्यात यावे असे विभागास वारंवार तोंडी व लेखी सूचित करूनही लेखापरीक्षणा दरम्यान सदरील पुस्तक उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. अभिलेख उपलब्ध न करून देणे ही बाब संशयास्पद असून त्या पावती पुस्तकाच्या आधारे वसूल केलेल्या रकमेचा अपहार झाल्याचे दिसून येते.

करिता, संबंधिताविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.९: आर्थिक वर्ष २००७-०८ ते २०११-१२ मधील कॅश रजिस्टरच्या अनियमिततेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये वॉर्ड कार्यालय - अ येथील उक्त आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून वॉर्ड कार्यालयाचे उक्त आर्थिक वर्षाचे कॅश रजिस्टर (इरसाल रजिस्टर) पाहिले असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) कॅश रजिस्टरला पेजींग व्यवस्थित केलेले नाही.
२) कॅश रजिस्टरला पेजींग करून एकूण किती पेज आहे ते शेवटच्या पानावर प्रमाणित करून वॉर्ड अधिकारी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक असतांना कॅश रजिस्टर प्रमाणित केलेले नाही.
३) कॅश रजिस्टरला वॉर्ड अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेल्या नाही.
४) कॅश रजिस्टरला मालमत्ताधारक / पाणीपट्टीधारक यांचे पावतीवर अथवा डीमांड रजिस्टरला दर्शविलेले संपूर्ण नांव असणे आवश्यक असतांना कॅश रजिस्टरवर पूर्ण नांव दर्शविलेले नाही.

करिता, उक्त बाबी तपासून पूर्तता करून अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत लेखापरीक्षणा दरम्यान सूचित केले होते. आता कॅश रजिस्टरच्या अनियमिततेबाबत पूर्तता करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

तथापि, महाराष्ट्र नगरपरिषद संहिता १९७१ चे नियम ८ या तरतूदीचा भंग झालेला आहे.

**परिच्छेद क्र.१०: मालमत्ता कर मागणी नोंद वहीत नामांतर न करता त्याच मालमत्तेच्या नळपट्टी मागणी नोंदवहीत परस्पर नामांतर करणे संबंधी.**

वॉर्ड - अ कार्यालयाच्या लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. लेखापरीक्षणा दरम्यान एन-१३ ६/८ या मालमत्तेबाबत मालमत्ता कर नोंदवही मध्ये श्रीमती शाहानूर बेग असे नांव आहे. त्याबाबत संबंधित नोंदवहीत पान क्र.८५ वर नोंद आढळून आली.

परंतु याच मालमत्तेत असलेल्या नळ कनेक्शन बाबतच्या मागणी नोंद वहीत श्रीमती शाहनूर बेग यांच्या नावास आळे मारून राजेंद्र लक्ष्मण थोरात या नावे रजिस्टर क्र. एन-३ सी -१ पान क्र.८८ वर नोंद घेतली आहे आणि त्यानुसार पाणीपट्टी कर वसूलीची पावती निर्गमित केली. सदरील कृत्य करतांना संबंधीत रजिस्टर मध्ये नामांतर आदेश डकविणे किंवा आदेशाची नोंद घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात संबंधितांकडे उपरोक्त बाबी संबंधाने कार्यालयीन आदेशाबाबत विचारणा केली असता वॉर्ड अधिकारी यांनी कोणतेही कागदपत्रे उपलब्ध करून दिलेले नाहीत.

नामांतराबाबत झालेल्या नोंदी या कायदेशीर असल्याबाबत पुरावा सादर करण्याविषयी वॉर्ड अधिकारी यांना कळविण्यात आलेले होते. सद्यस्थितीत वॉर्ड अधिकारी यांनी उपरोक्त बाबी संबंधी पूर्तता करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे व संबंधिताविरूध्द योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करावी.

**परिच्छेद क्र.११: मालमत्तेच्या विभाजनापूर्वी संबंधीत मालमत्तेवर थकीत मालमत्ता कर वसूल करणे बाबत.**

वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. उक्त कालावधीचे लेखापरीक्षणा दरम्यान असे आढळून आले आहे की, सन २००१ ते २००८ या कालावधीचे कासारीबाजार येथील घर क्र.३-६-४६ वर श्रीकृष्ण बन्सीधर जगधणे यांचे नांवे रू.१,००,४२१/- मालमत्ता कर थकीत आहे. याबाबतची नोंद मालमत्ता कर नोंदवही क्र.५/८ पान क्र.१०४ वर घेण्यात आलेली आहे. तद्नंतर सदरील मालमत्तेचे विभाजन जा.क्र./वॉर्ड अ/ १८९०/०८ दिनांक ३०/८/०८ अन्वये करून प्लॉट क्र.४,५,७ करण्यात आले त्याची नोंद वही क्र. ५/१/२/३ पान क्र. २५८ ते २६३ वर घेण्यात आली. विभाजन करतांना मालमत्ता कराची थकीत रक्कम वसूल होणे आवश्यक होते. विभाजन करतांना सन २००८ मध्ये मागील थकीत वसूली करण्यात आली नाही याबाबत वॉर्ड कार्यालयात झालेल्या अनियमिततेसंबंधी जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२: वॉर्ड - अ कार्यालय अंतर्गत कार्यरत कर्मचारी / अधिकारी यांचे मूळ सेवापट / सेवापुस्तक तपासणीअंती निदर्शनास आलेल्या त्रुटी बाबत.**

वॉर्ड-अ या कार्यालयाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले असून वॉर्ड - अ अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांचे ठेवलेले सेवा पुस्तक/ सेवापटांचे चाचणी स्वरूपामध्ये तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या आक्षेपित बाबी खालील प्रमाणे आहेत.

१) श्रीमती लिलाबाई हिरामन सोनवणे - मजूर यांचे मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता -प्रथम नियुक्ती दिनांक ३०.१.१९९७ रोजीची आहे. मात्र सन २००० मध्ये श्रेणी

२५५०-३२०० ऐवजी वरिष्ठ वेतनश्रेणी २६१०-४००० अशी नोंद आहे. याबाबत विभागाने दुरूस्ती करून झालेले अतिप्रदान वेतन वसूली करावी.

खाती शिल्लक रजेच्या नोंदी तपासणी केली, सन १९९७ ते २००४ या कालावधीत एकूण शिल्लक ६० अर्जित रजा आहेत. मात्र ७३ रजा शिल्लक बाबत नोंद आहे. म्हणजे (१३) अर्जित रजा जास्तीच्या दर्शविल्या आहेत. जास्तीच्या रजेबाबतचे वेतन निश्चित करून वसूल करावे किंवा पुढील जमा रजेतून तितक्या रजा समायोजित करून तशा नोंदी सेवापटात घेवून अनुपालन अहवाल सादर करावा.

२) श्री.प्रकाश किसन साळवे - मजूर मूळ सेवापट तपासले, या दरम्यान वार्षिक वेतनवाढी ५ व्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती रजा नोंद तपासणी केली.

३) श्री.कश्मिरा प्यारेलाल रिडलान - मजूर मूळ सेवापट तपासले, दिनांक १.१०.१९९४ पासून ७ वर्षाची निवड श्रेणीचा लाभ दिलेला आहे. सदरची वेतन निश्चिती वेतन नियम ११ (४) प्रमाणे सुधारित करून अतिप्रदान वेतन वसूल करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

४) श्री.रखमाजी किसन शेजूळ - मजूर मूळ सेवापट तपासले, दिनांक ९.६.१९९४ पासून निवड श्रेणीचा लाभ प्रदान आहे. सदरचा वेतन निश्चती वेतन नियम ११ (४) प्रमाणे सुधारित करून अतिप्रदान वेतन वसूल करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

५) श्रीमती वच्छलाबाई लक्ष्मण बागूल - मजूर निवड श्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे करून अतिप्रदान वसूल करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

६) श्रीमती राजपतीबाई राजू चव्हाण - मजूर मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता - निवड श्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे सुधारित करून नोंदी लेखापरीक्षण विभागास अनुपालनास्तव दर्शविण्यात याव्यात.

सहाव्या वेतन आयोगाची सुधारित वेतन निश्चिती करून अतिप्रदान रक्कम वसूली करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

७) श्रीमती गंगाबाई बाबुलाल तुसंबड - मजूर मूळ सेवापटाची तपासणी केली असता - निवड श्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे करून ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चिती करून अतिप्रदान रक्कम वसूली करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

८) श्री.सत्यनारायण विष्णु सुर्यवंशी -जवान , निवड श्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे सुधारित करून तशी सेवापटामध्ये नोंद घेवून, अतिप्रदान रक्कम वसूल करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

९) श्रीमती भातेबाई रघुविरसिंग सौदे - मजूर, निवड श्रेणीतील वेतन निश्चिती नियम ११ (४) प्रमाणे करून ५ व्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती व ६ व्या वेतन आयोगाची केलेली वेतन निश्चिती सुधारित करून दरम्यानचे कालावधीतील अति प्रदान वेतन वसूली करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

१०) श्री.नजीर खाँन दाऊद खान - माळी -निवडश्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे सुधारित करणेत यावी.

विविध रजेच्या नोंदी सेवा पटामध्ये घेण्यात यावी व नोंदी प्रमाणित करण्यात याव्या.

अतिप्रदान रक्कम निश्चित करून वसूली करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

११) श्री.जनार्धन रूंजाजी मोरे - मजूर,सेवापटाचे प्रथम पृष्ठावरील महत्वाच्या नोंदी सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्यात याव्यात.निवड श्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे सुधारित करावी. तसेच ६ वा वेतन आयोगाची सुधारित वेतन निश्चिती करावी, अतिप्रदान रक्कम वसूल करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

१२) श्रीमती लिलाबाई पांडुरंग रगडे - मजूर , निवड श्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे सुधारित करून अनुषंगिक कार्यवाही करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

१३) श्री.राधेशाम पांडुरंग शेजूळ - मजूर मूळ सेवा पटाचे अवलोकन केले असता -आदेश क्र. मनपा/आस्था-१/३२५२/९३, दिनांक १५.९.१९९३ अन्वये संबंधिताच्या दोन (२) वार्षिक वेतनवाढी गोठविण्यात आलेल्या आहेत. मात्र सेवा पटामध्ये आदेशाप्रमाणे कार्यवाही/ तशा नोंदी दिसून येत नाही. तपासून खातरजमा करून अनुषंगिक कार्यवाही करावी. निवड श्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे सुधारित करून अतिप्रदान रक्कम वसूल करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

१४) श्री.भाऊसाहेब पांडुरंग हिवराळे, मजूर - विविध रजेच्या नोंदी सेवा पटामध्ये घेण्यात याव्यात. आरोग्य वैद्यकीय तपासणी अहवाल/ पोलिस चारित्र्य पडताळणी अहवाल इ. नोंदी सेवा पटामध्ये घेण्यात याव्यात.

१५) श्रीमती कुसुम दामोधर दोडके, मजूर मूळ सेवापटाचे प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित नाहीत. सर्व रजेच्या नोंदी घेवून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

१६) श्री.दशरथ शामराव नवले - मजूर सेवापटातील प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित - नाही. परिविक्षाधीन कालावधी खुला केल्याबाबत नोंद नाही. विविध रजेच्या नोंदी/ चारित्र्य पडताळणी / शारिरीक तपासणी इ. नोंदी नाही. प्रकरणांत उपरोक्त नोंदी घेवून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

१७) श्री.मो.फहिम मो. ईस्माईल शिपाई -दिनांक ९.६.१९९४ पासून निवड श्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे सुधारित करणेत यावी. विविध रजा नोंदी / चारित्र्य पडताळणी / शारिरीक आरोग्य तपासणी इ. नोंद सेवा पटामध्ये अद्ययावत करणेत येवून अनुपालन सादर करावे.

१८) श्री.संतोष अशोक ताकवाले - मजूर , चारित्र्य पडताळणी / शारिरीक आरोग्य तपासणी/ रजा नोंदी /एकूण सेवा नोंद इ.अद्ययावत करणेत येवून अनुपालन सादर करावे.

१९) श्री.वाय.के.खोतकर - मजूर, सेवापटाचे प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित करण्यात याव्यात. चारित्र्य पडताळणी / शारिरीक आरोग्य तपासणी अहवाल इ.नोंदी सेवापटामध्ये घेण्यात येवून अनुपालन सादर करावे.

२०) श्रीमती छबाबाई रंगनाथ खरात, मजूर सेवापटाचे प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित नाही.चारित्र्य पडताळणी / शारिरीक आरोग्य अहवाल इ. नोंदी घेण्यात येवून अनुपालन सादर करावे.

२१) श्री.शेख दादा शे.हुसेन - कनिष्ठ लिपीक यांचे मूळ सेवा पुस्तक तपासले असता - निवड श्रेणीतील वेतन निश्चिती ११ (४) प्रमाणे सुधारित करण्यात यावी. अतिप्रदान रक्कम निश्चित करून वसूली करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

२२) श्री.पी.बी.चव्हाण - ज्येष्ठ स्वच्छता निरिक्षक, निवड श्रेणीतील ११ (४) वेतन निश्चिती

करण्यात यावी. प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित नाही. ६ व्या वेतन आयोगाची वेता निश्चिती सुधारित करावी. दरम्यानचे कालावधीत अतिप्रदान झालेले वेतन वसूली करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

२३) श्री.अफजल बेग मो. कलंदर, कनिष्ठ लिपीक यांचे मुळ सेवा पुस्तकाचे तपासणी केली असता दिनांक १.१.२००६ रोजीची केलेली वेतन निश्चिती तपासणी केली असता दिनांक १.७.२००६ रोजीची वार्षिक वेतनवाढ रू.४००/- इतकी दिलेली आहे. मात्र रू.३९०/- अशी निश्चित करून सुधारित / दुरूस्ती करून अतिप्रदान रक्कम वसूल करून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

२४) श्रीमती तान्हाबाई चंद्रकांत गवळे - मजूर, दिनांक १.२.१९९५ पासून निवडश्रेणीचा लाभ प्रदान आहे. सदरची वेतन निश्चिती नियम ११ (४) प्रमाणे सुधारित करून अनुपालन सादर करावे.

२५) श्री.मनोज मोतीराम पवार, मजूर मूळ सेवा पटाचे तपासणी मध्ये असे निदर्शनास आले की, दिनांक १.७.२००६ पासून पुढे वार्षिक वेतन वाढी दिल्याच्या नोंदी निदर्शनास आल्या नाहीत. याबाबतची तपासणी करून अनुपालन अहवाल सादर करावा.

२६) श्री.राहुल नारायण वाहूळ - मजूर दिनांक १.१.२००६ पासून सहाव्या वेतन आयोगाची सुधारित वेतन निश्चिती केल्याचे दिसून येत नाही. तसेच विविध रजेच्या नोंदी / हिशोब नोंदी नाहीत. अभिलेखे अद्यावत करून अनुपालन अहवाल सादर करावा.

२७) श्री. धनराज रंगनाथ हिवराळे, मजूर मूळ सेवा पटाची तपासणी केली असता रजेच्या हिशोबी / उपभोगलेल्या रजेच्या नोंदी सेवापटामध्ये घेण्यात येवून अनुपालन अहवाल सादर करावा.

उक्त एकूण (२७) सेवापट/ सेवा पुस्तकांचे चाचणी स्वरूपामध्ये तपासणी केली त्यामध्ये निदर्शनास आलेल्या आक्षेपित बाबी वरील प्रमाणे नमूद असून कर्मचा-यांच्या सेवा नियमित केल्याची नोंद सेवापुस्तकात कुठेही आढळून आलेली नाही.

तसेच वॉर्ड - अ कार्यालयास विविध संवर्गातील एकूण किती पदे मंजूर आहेत, एकूण किती कर्मचारी कार्यरत आहेत याचीही माहिती मागविण्यात आली होती. लेखापरीक्षणा दरम्यान माहिती प्राप्त झालेली नसून संबंधितांनी त्यांचे विभागाचे पुढील लेखापरीक्षणा पूर्वी माहिती उपलब्ध करून द्यावी.

विभागाने उक्त अनियमिततां / त्रुट्यांबाबत प्रत्यक्ष तपासून खातरजमा करावी व आपल्या विभागातील इतर सर्व सेवापुस्तक / सेवापट तपासून अद्ययावत करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित करण्यात आलेले आहे. विभागाने आपल्या स्तरावर पूर्तता करून अनुपालन सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३:मालमत्ता कराच्या मागणी नोंदवहीतील नोंदीबाबत.**

वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आलेले असून मालमत्ता कर मागणी नोंद वही क्र. २०A कोतवालपुरा पान क्र. १५० वर कमरून्नीसाबेगम पिता एस.एम.अजीम भाडेकरू जिल्हा समादेशक होमगार्ड अधिकारी कार्यालय अशी नोंद घर क्र. ५-२-४५ वर आहे. या मालमत्तेबाबत नोंदवहीत घेण्यात आलेल्या नोंदीत रक्कम रू.२०७६५ वसूल केल्याची नोंद आहे. परंतु पावती क्र. पुस्तक क्र. दिनांक इत्यादीचा उल्लेख नाही.

याबाबत घेण्यात आलेल्या नोंदीची शहानिशा करून पावती क्र. पुस्तक क्रमांक दिनांक इत्यादींबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले होते. विभागाने लेखापरीक्षणा दरम्यान अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नसल्यामुळे रक्कम रू. २०७६५/- ची नोंद संशयास्पद वाटते. तसेच २०७६५/- रकमेचा अपहार झाल्याचेही दिसून येते. विभागाने याबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.१४: मालमत्ता कर मागणी नोंदवहीतील नोंदीबाबत.**

उक्त संदर्भिय आदेशानुसार वॉर्ड - अ कार्यालयाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, मालमत्ता कर मागणी नोंदवही C १ मी पान क्र.१४६,१४७,१४८,१५० वर कर मुल्य निर्धारण अधिकारी, कर आकारणी विभाग - १ यांनी जा.क्र. मनपा/कर आकारणी-१/३२९/ २०००, दिनांक २३/५/५२००० अन्वये सय्यद अकबर कादरी यांचे घर क्र. १-१६-७३/पी सीटीएस क्र.३४०६१ ब आ.क्र.२८९६/९७-९८ बाबत मालमत्ता कराचे विभाजन प्लॉट क्र. १ ते ७ मध्ये केले आहे. करआकारणी विभागाने फ्लॅटनिहाय करयोग्य मुल्य सन २००० मध्ये दिलेले असतांना वॉर्ड कार्यालयाने अद्यापही म्हणजे तब्बल १२ वर्षापर्यंत मालमत्ता धारकास मालमत्ता कराची नोटीस बजावलेली नाही. याबाबत महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

तरी विभागाने सदरील मालमत्तांचे मालमत्ता करासंबंधी पुनर्विलोकन करून, मालमत्ता कराची वसूली करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.१५: मालमत्ता कराच्या मागणी नोंदवहीतील नोंदीबाबत.**

वॉर्ड - अ कार्यालयाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आलेले असून मालमत्ता कर मागणी रजिस्टरवर भोगवटाधारक नांव : श्रीमती फौजिया खान इब्राहिम खान एन-१३ A, प्लॉट क्र. ४६४७, सिडको मागणी रजिस्टर क्रमांक एन/१३/३, पान क्रमांक ३९ वर संबंधित

मालमत्ता धारकाकडे सन १.४.२००६ ते सन २०११-१२ पर्यंत थकबाकी नोंद घेण्यात आली व रकमेचा भरणा केलेला नाही.

परंतु मागणी रजिस्टर क्रमांक २१/७ पान क्र.८५ वर संबंधित मालमत्ता धारकाची नोंद घेतांना सन २००६ ते २००८ पर्यंतची नोंद मागणी रजिस्टरला न दर्शविता सन २००८-०९ ते सन २०११-१२ पर्यंतची नोंद दर्शविण्यात आली.

म्हणजेच सन २००६-०७ ते सन २००७-०८ पर्यंतची एकूण मालमत्ता कर रक्कम रू.१७०६४/- ची नोंद न दर्शविता पुढील रकमेची नोंद दर्शविण्यात आली आहे.

करिता, रक्कम रू.१७०६४/- ची नोंद पुढील वर्षाच्या मागणी नोंदवही मध्ये नोंद न घेणे ही बाब गंभीर असून रू.१७०६४/- चा अपहार झाल्याचे दिसून येते. याबाबत विभागाने जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

### परिच्छेद क्र.१६ : मालमत्ता धारक एस.एम.बलवीर नंदनवन कॉलनी यांचा आर्थिक वर्ष २००४-२००८ पर्यंतचा मालमत्ता कर रक्कम रू.१०३५९ चा भरणा नसल्याबाबत.

वॉर्ड कार्यालय - अ मधील मालमत्ताधारक श्री.एस.एम.बलवीर प्लॉट नं.८/बी नंदनवन कॉलनी मागणी रजिस्टर क्रमांक २/८ पान क्रमांक ७७ वर आर्थिक वर्ष २००४-२००८ पर्यंत रक्कम रू.१०३५९/- एवढी थकबाकी आहे.

परंतु संबंधिताने मागणी रजिस्टर क्र. ७/८/१२ पान क्रमांक २२७ पहा असे लिहिले आहे व त्यावर मालमत्ता नोंद पाहिली असता आर्थिक वर्ष २००४-२००८ ची थकबाकी रक्कम न वसूल करता आर्थिक वर्ष २००८-०९ ची रक्कम वसूल केलेली आहे. म्हणजेच संबंधिताने रक्कम रू.१०३५९/- चा भरणा केलेला नाही.

करिता, रक्कम रू.१०३५९/- ची नोंद पुढील वर्षाच्या मागणी नोंदवही मध्ये नोंद न घेणे ही बाब गंभीर असून रू.१०३५९/- चा अपहार झाल्याचे दिसून येते. याबाबत विभागाने जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

### परिच्छेद क्र.१७: वैद्यकीय खर्च प्रतीपूर्ती संचिकांना मंजूरी न घेता मंजूरी आदेश, देयक अदा करणे बाबत.

उक्त संदर्भिय आदेशानुसार वॉर्ड- अ कार्यालयाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले असून वॉर्ड कार्यालयातील कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्च प्रतीपूर्ती मंजूर संचिका तपासल्या असता संबंधित संचिकेत वैद्यकीय खर्च प्रतीपूर्ती मंजूर करणा-या प्राधिका-याची मंजूरी संचिकेत आढळून आली नाही. अशा संचिकांची यादी पुढील प्रमाणे :

| अ.क्र | कर्मचा-याचे नांव | पद | परतावा खर्च रक्कम | मंजुरीचे विवरण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.एस.व्ही.म्हेत्रे | दु.आ. | ८३१३/- | वॉर्ड अ/८०१/२०१२ दि.२८.५.२०१२ |
| २ | श्री.अंकुश ए.लाड | वॉर्ड अधिकारी | ७९९९/- | वॉर्ड अ/२२१/२०१२ दि.१६.५.२०१२ |
| ३ | श्री.अशोक एकनाथ दाभाडे | मजुर | ३१३३७/- | वॉर्ड अ/१८७/२०१२ दि.२१.२.२०१२ |
| ४ | श्री.विजय बापु साबळे | मजुर | २४४६०/- | वॉर्ड अ/२९७/२०१२ दि.३.३.२०१२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | श्री.सुनिल अनुपसिंग रिडलॉन | स्वीपर | ६१६१०/- | वॉर्ड अ/७९२/२०१२ दि.२५.५.२०१२ |
| ६ | श्री.जिया उल्ल हक्क समी उल्ल हक्क | ला.म.पा.पु. मजुर | २०७५१/- | वॉर्ड अ/२१३/२०११ दि.२८.१२.२०१२ |
| ७ | श्रीमती संगिताबाई सिताराम गायकवाड | मजुर | ८३२४/- | वॉर्ड अ/६९९/२०११ दि.६.६.२०११ |
| ८ | श्री.बी.एम.मामोडे | क.लि. | १३७०७/- | वॉर्ड अ/६९७/२०११ दि. ६.६.२०११ |
| ९ | श्री.दादाराव मल्हारी शेजुळ | मजुर | ९८५०/- | वॉर्ड अ/९३७/२०१० दि.५.७.२०१० |
| १० | श्री.गिरधारी बाबुराव खरात | मजुर | ३०३८०/- | वॉर्ड अ/९७६/२०११ दि.१६.७.२०११ |
| ११ | श्री.बबन कोंडीराम उमप | मजुर | २३४२८/- | वॉर्ड अ/८०१/२०११ दि.२२.६.२०११ |

उक्त प्रकरणांत वॉर्ड अधिकारी यांनी संचिकांची शहानिशा करून वैद्यकीय खर्च प्रतीपूर्ती मंजूर प्राधिका-याची मान्यता घेवून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास ७ दिवसांत सादर करावा असे सूचित केले होते. विभागाने सदरील प्रकरणी संबंधित प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता घेवून अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.१८: मालमत्ता कर मागणी नोंदवहीतील नविन रजिस्टर मध्ये नोंद नसल्याबाबत.**

उक्त संदर्भिय आदेशानुसार वॉर्ड - अ कार्यालयाचे सन २००७-२००८ ते सन २०११-१२ या वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, मालमत्ता कर मागणी नोंदवही जुने ३/C पान क्र.१०९ बाबुलाल बेचरभाई जव्हेरी घर क्र.३-६-४१ सराफा याची नोंद नविन रजिस्टर क्र. ३/C पान क्र.१०९ वर सन २००१-०६ ते सन २००६-०७ या वर्षाचे थकीत रक्कम रू.३६७४३०/- घेण्यात आली इ नसल्याने व पुढील वर्षाचे मालमत्ता कराबाबतही कोणतीही नोंद नाही. सदरील मालमत्ता कराची नोंद का घेण्यात आली नाही.

करिता, रक्कम रू.३,६७,४३०/- ची नोंद पुढील वर्षाच्या मागणी नोंदवही मध्ये नोंद न घेणे ही बाब गंभीर असून रू.३,६७,४३०/- चा अपहार झाल्याचे दिसून येते. याबाबत विभागाने जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.१९: पाणी पुरवठा मागणी रजिस्टर वर पावतीची चुकीची नोंद दर्शविल्याबाबत.**

**(रक्कम रू.१०,२००/-)**

प्रभाग - अ या विभागाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणा अंतर्गत रोजाबाग येथील पुरवठा मागणी रजिस्टर पान क्रमांक १५६,१५७ वर श्री.आर.बी.आवाड, प्रोफेसर कॉलनी प्लॉट क्र.३५ नळखाते क्रमांक ५७१४३ यांच्याकडे मार्च - २००८ पर्यंतची एकूण थकबाकी रक्कम रू.१०२००/- होती. परंतु मागणी पाणीपुरवठा रजिस्टरवर पावती पुस्तक क्रमांक २९०७ पा.क्र. २९०६५७ दिनांक ५.२.२००८ रक्कम रू.१०,२००/- मार्च २००८ पर्यंतची नोंद घेण्यात आली. परंतु सदरील पावती पुस्तक सन

२००७-०८ या आर्थिक वर्षात भांडार विभागामार्फत सदरील पुस्तक देण्यात आलेले नसल्याने अशा क्रमांकाची नोंद कशाचे आधारे घे्ण्यात आली हे स्पष्ट झाले नाही.

करिता, विभागाने याबाबत खातरजमा करून रू.१०२००/- च्या घेतलेल्या नोंदीबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.२०: पाणीपट्टी डिमांड रजिस्टर वरील थकबाकी कमी दर्शविले बाबत.**

**(रक्कम रू.७८००/-)**

वॉर्ड कार्यालय- अ येथील लेखापरीक्षण कार्यरत असून नळधारक कैसरोद्दीन हबीबोद्दीन बियाबानी राहणार रोहिला गल्ली, खाते क्रमांक ४९८५ वरील पाणीपट्टी डिमांड रजिस्टर पाहिले असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१ . पाणीपट्टी रजिस्टर क्रमांक ४८ रोहिलागल्ली पान क्रमांक ४८,४९ वर मागील थकबाकी १३४८८ व सन २००४-०५ ते सन २००७-०८ पर्यंत ७२००/- असे एकूण २०६८८ एवढी मागणी दर्शविलेली आहे व भरणा केलेला नाही.

२. पाणीपट्टी रजिस्टर क्रमांक ५/1 देवडीबाजार पान क्रमांक ९६,९५ वर थकबाकी ९९/०२ खाडाखोड करून ३४०० व सन २००२-०३ ते सन २००६-०७ पर्यंत ८४००/- असे एकूण ११८००/- एवढी मागणी दर्शविलेली आहे व त्यापैकी १९९९ ते २००७ पर्यंत ११८००/- चा भरणा करून निरंक दर्शविले आहे.

३. खाते क्रमांक ४९८५, ५८८७७ असे दोन खाते क्रमांक दर्शविले आहे.म्हणजेच संबंधिताने ७८००/- मागील थकबाकी वसूल न करता पुढील रकमेचा भरणा केल्याचे दिसून येते. तरी मुद्या क्रमांक १,२,३ बाबत विभागाने शहानिशा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.२१: पाणी पुरवठा मागणी रजिस्टर क्र.५/७ पान क्र.७ वरील अनियमिततांबाबत.**

प्रभाग - अ या विभागाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ पर्यंतचे लेखापरीक्षण कार्यरत असून पाणी पुरवठा मागणी रजिस्टर क्रमांक ५/७ पान क्रमांक ७ वर श्री.सरदार खान अ हमीद खान, रा.किलेअर्क नळखाते क्रमांक २७१९८, ५९१०२ निवासी (व्यास) १/२" सदरील नळधारकाकडे सन २००१ ते २००२ ते सन २००६-०७ पर्यंतची एकूण थकबाकी रू.९६००/- होती. परंतु सन २००१-०३ पर्यंतची रक्कम रू.२४०० व सन २००५-०७ पर्यंतची थकबाकी रक्कम रू.३६००/- अशी एकूण थकबाकी रक्कम रू.६०००/- चा भरणा करण्यात आला. म्हणजेच सन २००३-०४ ते सन २००४-०५ ची एकूण थकबाकी रक्कम रू.३६००/- चा भरणा करण्यात आलेला नाही.

उक्त नळधारकाकडे दोन नळ खाते क्रमांक दर्शविण्यात आले आहे. खाते क्रमांक २७१९८, ५९१०२ असे दोन खाते क्रमांक दर्शविण्यात आले आहे. म्हणजेच संबंधिताकडे दोन नळ कनेक्शन असल्याचे उक्त क्रमांकावरून दिसून येते.

करिता रक्कम रू.३६००/- व दोन खाते क्रमांका बाबत विभागाने खातरजमा करून जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.२२ : पाणी पुरवठा मागणी रजिस्टर मधील नोंद बाबत.**

प्रभाग - अ या विभागाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षातील चाचणी लेखापरीक्षणा अंतर्गत मागणी पाणी पुरवठा रजिस्टरची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१ . पाणी पुरवठा मागणी रजिस्टर क्रमांक २१३ पान क्रमांक २८२,२८३ वर श्री.राजेश पंढरीनाथ मुंढे प्लॉट नं.५७, पहाडसिंगपुरा यांच्या नावाची नोंद असतांना खाडाखोड करून व्हाईटनर लावून सदरील नळ धारकाची कायम स्वरूपी नोंद मिटविण्यात आली व संबंधित नळाधारकाने सन २००५-०६ पर्यंतचा भरणा केलेला आहे.

२. पाणीपुरवठा मागणी रजिस्टर वर नळधारक श्री.डॉ.चव्हाण, पद्मपाणी कॉलनी, गरमपाणी प्लॉट नं.४ पा.पु.मा.रजिस्टर क्रमांक ५५ पा.क्रमांक ६२,६३ वर सदरील नळधारकाच्या नांवे पा.पु.क्रमांक २९६७ पा.क्रमांक २९६६२६ दिनांक २९.२.२००८ अन्वये रक्कम रू.५४००/- मार्च -२००८ पर्यंतची वसूली दर्शविण्यात आली.

तरी मुद्दा क्र. १,२ बाबत च्या नोंदी संशयास्पद असून घेतलेल्या नोंदीबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. २३: मालमत्ता / पाणीपट्टी डिमांड रजिस्टरच्या अनियमिततेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये वॉर्ड कार्यालय- अ येथील उक्त कालावधीचे लेखापरीक्षण कार्यरत असून विभागातील मालमत्ता / पाणीपट्टी डिमांड रजिस्टरची चाचणी स्वरूपात पाहणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. डिमांड रजिस्टर पाहिले असता ब-याच डिमांड रजिस्टरचे समोरील व मागील पाने फाटलेले आहे.

२. डिमांड रजिस्टरला पेजींग बरोबर नाही व रजिस्टर प्रमाणित केलेले नाही.

३. मागील थकबाकी पाहणेसाठी मागील आर्थिक वर्षाचे डिमांड रजिस्टर (२००६-०७) उपलब्ध झालेले नाही.

४. डिमांड रजिस्टर मध्ये मागील थकबाकी काही ठिकाणी बरोबर ओढलेली नाही.

५. मालमत्ता/ पाणीपुरवठा डिमांड रजिस्टरला वर्षनिहाय मागणी दर्शविलेली नाही.

उपरोक्त बाबीसंबंधाने मालमत्ता व पाणीपट्टी मागणी नोंदवहीचे अभिलेखे सुस्थितीत करून अद्यावत नोंदी घेवून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२४: आर्थिक वर्ष २००६-०७ ते सन २०११-१२ मध्ये वॉर्ड कार्यालय - अ येथे भांडार विभागामधून वितरीत केलेल्या स्वच्छता साहित्याचे लेखे उपलब्ध करून देण्याबाबत.**

वॉर्ड कार्यालय - अ या विभागाचे उक्त आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून आपणास उक्त संदर्भान्वये स्वच्छता साहित्याचे लेखे, स्टॉक रजिस्टर, डेड स्टॉक रजिस्टर वितरण रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्याबाबत पत्र देवूनही अद्यापपर्यंत लेखे उपलब्ध झालेले नाही.

करिता उक्त लेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून न देणे म्हणजे संबंधित विभागात असलेल्या साहित्याच्या खरेदीबाबत साशंकता निर्माण होते. तरी विभागाचे पुढील लेखापरीक्षणावेळी अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावे.

**परिच्छेद क्र.२५ : सन २००७-०८ ते सन २०११-१२ च्या मागणी रजिस्टरचा वार्षिक ताळेबंद देणे बाबत.**

प्रभाग - अ कार्यालयातील मागणी रजिस्टरचा वार्षिक ताळेबंद (प्रत्येक रजिस्टरनुसार) मागील शिल्लक अधिक चालु येणे बरोबर एकूण येणे मधून वसूल वजा जाता वर्षाअखेरची शिल्लक तसेच डिमान्ड वसूल रक्कम किर्द वसूली बरोबर जुळणे आवश्यक आहे व त्यास सक्षम प्राधिकृत अधिकारी यांनी ताळेबंद तपासणी करून प्रमाणित केला असावा याप्रमाणे वार्षिक ताळेबंद तयार करण्यात येवून लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून द्यावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो वार्षिक ताळेबंद तयार करून उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

महानगरपालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत मालमत्ता कर आहे. मालमत्ता कराच्या मागणी नोंदवहीचा ताळेबंद विभागाने ठेवणे क्रमप्राप्त आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२६: प्रत्यक्ष हजेरीपटावर गैरहजर कर्मचा-यांना हजेरी पत्रकावर हजर दर्शविणे बाबत.**

वॉर्ड- अ कार्यालयाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले असून वॉर्ड कार्यालयातील कर्मचा-यांचे हजेरी पट, मासिक हजेरी पत्रक व मासिक देयक यांची एकत्रित तपासणी करण्यात आली असता या दरम्यान असे निदर्शनास आले की, खालील कर्मचारी काही दिवस गैरहजर असतांनाही त्यांना हजर असल्याचे दर्शविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

## महिना जुन - जुलै २००७

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना जून -२००७ दि.२१ ते दि.३० | महिना जुलै-०७ दि. १ ते २० | एकुण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.सिध्दार्थ दाभाडे, मजूर | २४, २५, २६, | -- | ०३ | |
| २ | श्री.अनंत ग नवगिरे | २६, | १९ | ०२ | |
| ३ | अशोक रंगनाथ खरात | ३० | -- | ०१ | |
| ४ | गौतम लंक्ष्मण खिल्लारे | -- | १८,१९ | ०२ | |
| ५ | विजय रमेश साठे | -- | १७ | ०१ | |
| ६ | सतिश छगन म्हस्के | ३० | १२ | ०२ | |
| ७ | चंद्रकांत प्रल्हाद थोरात | -- | १३ | ०१ | |
| ८ | बाबु विठ्ठल जाधव | ३० | -- | ०१ | |
| ९ | साहेबराव साबळे | २१,३० | ११ | ०३ | |
| १० | लक्ष्मीनारायण बाहोत | ३० | ४ | ०२ | |
| ११ | रमेश रतन ताकवाले | ३० | -- | ०१ | |
| १२ | दिनेश राजाराम दिवेकर | ३० | -- | ०१ | |
| १३ | कौतीक सखाराम दुधे | ३० | १६ | ०२ | |
| १४ | संजय साळवे | ३० | -- | ०१ | |
| १५ | विशाल प्र. हंबीर | ---- | ३,४,५ | ०३ | |
| १६ | सिताबाई तुळशीराम मुजमुले | ३० | -- | ०१ | |
| १७ | हौसाबाई सुर्यभान साळवे | ३० | २ | ०२ | |
| १८ | कौसाबाई रोकडे | ३० | -- | ०१ | |
| १९ | अनुसयाबाई सिताराम | ३० | -- | ०१ | |
| २० | हौसाबाई लक्ष्मण रगडे | ३० | १७ | ०२ | |
| २१ | आशाबाई रायभान जाधव | ३० | १९,१० | ०३ | |
| २२ | शशिकला नामदेव मोठे | ३० | -- | ०१ | |

## महिना एप्रिल - मे २००७

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना एप्रिल -२००७ दि.२१ ते दि.३० | महिना मे ०७ दि. १ ते २० | एकुण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | रमेश नारायण भुईगड | -- | १९ | ०१ | |
| २ | अशोक रंगााथ खरात | -- | १६,१७ | ०२ | |
| ३ | विजय साठे | -- | ८ | ०१ | |
| ४ | सतिश म्हस्के | २७,२८,२९,३० | -- | ०४ | |
| ५ | साहेबराव साबळे | ३० | -- | ०१ | |
| ६ | रमेश ताकवाले | -- | १५ | ०१ | |
| ७ | कडुब रंगनाथ | -- | १५,१६,१७,१८ | ०४ | |
| ८ | दिनेश राजाराम दिवकेर | -- | १६ | ०१ | |
| ९ | संजय साळवे | -- | ११,१२,१३,१६ | ०४ | |
| १० | विशाल हंबीर | ३० | १,२,३,४,५ | ०५ | |
| ११ | बन्शी तुकाराम | -- | १२,१३,१४ | ०३ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | ग्यान प्रकाश हरणे | २१ ते २९ | १८,१४ | ०२ | |
| १३ | सिताबाई मजमुले | | | पूर्ण महिना गैरहजर | |
| १४ | हौसाबाई सुर्यभान साळवे | -- | १४,१९,२० | ०३ | |
| १५ | हौसाबाई लक्ष्मण | -- | २,११ | ०२ | |
| १६ | सुशिलाबाई मिसाळ | -- | १९,२० | ०२ | |
| १७ | धन्नुबाई रामहारी | -- | ५,१२,१९ | ०३ | |
| १८ | रवी गणपत बारे | -- | -- | पूर्ण महिना गैरहजर | |
| १९ | लक्ष्मण राठोड | -- | -- | | |
| २० | सुधाकर तुळशिराम | -- | -- | | |
| २१ | कचरू आसाराम | -- | -- | दि.१.५.०७ ते २०.५.०७ पर्यंत हजेरी रजि.मध्ये नोंद नाही. मात्र हजेरीपत्रकावर हजर नोंद आहे. | |
| २२ | गिरधारी बाबुराव | -- | -- | | |
| २३ | राजु अशोक मिसाळ | -- | -- | | |
| २४ | विजय भुजंगराव | -- | -- | | |
| २५ | मो.फय्याज मो.सिद्यीकी | -- | -- | | |
| २६ | शांताबाई हरी नाडे | -- | -- | | |
| २७ | मिनाबाई सखाराम | -- | -- | | |
| २८ | अरूणाबाई थोरात | -- | -- | | |
| २९ | आशाबाई भाऊसाहेब | -- | -- | | |
| ३० | कौसाबाई रामदास | -- | -- | | |
| ३१ | शशिकला म्हस्के | -- | -- | | |

**महिना मार्च - एप्रिल २००७**

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना मार्च -२००७ दि.२१ ते दि.३१ | महिना एप्रिल ०७ दि. १ ते २० | एकूण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | गौतम लक्ष्मण खिल्लारे | -- | २ | ०१ | |
| २ | सुधाकर तुळशीराम कांबळे | -- | पूर्ण महिना गैरहजर | | |
| ३ | लक्ष्मण राठोड | -- | | | |
| ४ | रवि बारे | -- | | | |
| ५ | विजय मुजमुले | -- | | | |
| ६ | साहेबराव शामराव साबळे | २३ | -- | ०१ | |
| ७ | ग्यानप्रकाश हरणे | -- | १४,१५ | ०२ | |
| ८ | चंद्रकांत थोरात | २३ ते ३१ | -- | ०६ | हजेरी रजिस्टरवर गैरहजर मात्र हजेरी पत्रकावर हजर |
| ९ | कौशल्याबाई रामदास | -- | १७ | ०२ | |
| १० | शशिकला वा.म्हस्के | -- | १९ | ०१ | |
| ११ | रविंद्र जमधडे | २६ | -- | ०१ | |

## महिना नोव्हेंबर - डिसेंबर २००७

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना मार्च -२००७ दि.२१ ते दि.३० | महिना एप्रिल ०७ दि. १ ते २० | एकूण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | आशाबाई रायभान जाधव | -- | -- | | |
| २ | सुशिला निताळ | -- | -- | | |
| ३ | रमेश रतन ताकवाले | -- | -- | | |

## महिना मार्च - एप्रिल २००८

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना मार्च -२००७ दि.२१ ते दि.३० | महिना एप्रिल ०७ दि. १ ते २० | एकूण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | साहेबराव साबळे | -- | १२,१३ | ०२ | |
| २ | दिनेश राजाराम दिवेकर | २४ | ४ | ०२ | |
| ३ | चंद्रकांत थोरात | -- | -- | पूर्ण महिना गैरहजर | |
| ४ | गोरक ताकवाले | -- | -- | | |
| | रवि बारे | -- | -- | | |
| | सुधाकर तुळशिराम | -- | -- | | |
| | विशाल प्रमेश्वर हंबीर | -- | १३ | ०१ | |
| | लक्ष्मीनारायण बाहोर | -- | -- | निलंबीत केल्याची - नोंद आहे. | |

### महिना एप्रिल - मे २००८

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना एप्रिल -२००८ दि.२१ ते दि.३० | महिना मे ०८ दि. १ ते २० | एकूण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | साहेबराव शामराव साबळे | २७.४.२००८ पासून बदली अशी नोंद आहे. | | | |

### महिना मे - जून २००८

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना मे -२००८ दि.२१ ते दि.३० | महिना जू ०८ दि. १ ते २० | एकूण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | चंद्रकांत थोरात | -- | -- | | |
| २ | सुधाकर कांबळे | -- | -- | | |
| ३ | लक्ष्मीनारायण बाहोत | -- | -- | निलंबीत | |
| ४ | विशाल प्रमेश्वर हंबीर | २४ | ०१ | | |
| ५ | चंद्रकांत थोरात | -- | -- | | |
| ६ | सुधाकर थोरात | -- | -- | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | चंद्रकांत थोरात | -- | -- | पूर्ण गैरहजर | |
| ८ | सुधाकर कांबळे | -- | -- | | |
| ९ | लक्ष्मीनारायण बाहोत | -- | -- | निलंबीत | |
| १० | हौसाबाई सुर्यभान साळवे | -- | १,२,३ | ०३ | |

**महिना जुलै - ऑगस्ट २००८**

| अ. क्र. | कर्मचा-याचे ाांव व पद | महिना जुलै -२००८ दि.२१ ते दि.३० | महिना ऑगस्ट- ०८ दि. १ ते २० | एकूण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | चंद्रकांत थोरात | -- | -- | पूर्ण महिना गैरहजर | |
| २ | सुधाकर कांबळे | -- | -- | | |
| ३ | गोरक रतन ताकवाले | -- | -- | | |
| ४ | लक्ष्मीनारायण बाहोत | -- | -- | निलंबीत | |

**महिना ऑगस्ट- सप्टेंबर २००८**

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना सप्टेंबर -२००८ दि.२१ ते दि.३० | महिना ऑक्टोबर ०८ दि. १ ते २० | एकूण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | कौतीक सखाराम दुधे | -- | १२ | ०१ | |

**महिना मार्च - एप्रिल २०१०**

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना मार्च -२०१० दि.२१ ते दि.३१ | महिना एप्रिल १० दि. १ ते २० | एकूण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | बबन बाळासाहेब घायतिलक | -- | -- | पूर्ण गैरहजर | |
| २ | गणेश भानुदास साळवे | -- | -- | पूर्ण गैरहजर | |

**महिना मे - जून २०१०**

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव व पद | महिना मे- २०१० दि.२१ ते दि.३१ | महिना जून -१० दि. १ ते २० | एकूण गैरहजर दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुरूषोत्तम भिकाराम मुजमुले | -- | २० | ०१ | |
| २ | बबन बा.घायतिलक | -- | -- | पूर्ण गैरहजर | |

<u>**मुद्दे :**</u>

१) दैनंदिन हजेरीपट पृष्ठक्रमांक देणेत आलेले नाही.

२) सदरचे हजेरीपट हे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेले नाही.

३) एकाच साईटवरचे दोन -दोन हजेरीपट ठेवण्यात आल्याचे दिसून येते.

४) हजेरी पटावर कर्मचा-याचे नांव व हजेरी पत्रकावरचे नांवामध्ये फरक दिसून आला.

५) संबंधित कर्मचा-यांच्या किरकोळ रजाची नोंद घेतलेली दिसून येत नाही.

६) कर्मचारी बरेच महिने गैरहजर असल्याचे हजेरी पटावरून दिसते. त्या कर्मचा-यावर नियमाप्रमाणे कोणती कार्यवाही केली, याचा अहवाल द्यावा.

७) श्रीमती लिलाबाई पांडुरंग रगडे - मजूर माहे जून २०१० / मे -२०१० चे दैनंदिन हजेरी पटाचे अवलोकन केले असता दिनांक २१.५.२०१० ते दि.२९.५.२०१० पर्यंत अर्जित रजा अशी नोंद आहे. मात्र दैनिक हजेरी पत्रकावर दिनांक २१.५.२०१० ते २९.५.२०१० हजर होते अशी नोंद आहे. याचा बोध होत नाही लेखी खुलासा सादर करावा.

८) श्री.राजु रामराव आव्हाड- मजूर वॉर्ड अ येथे कार्यरत असून लेखापरीक्षणा दरम्यान त्यांचे साईटवर ठेवण्यात येणारे हजेरीपट व दैनिक हजेरी पत्रक एकत्रित तपासणी केली असता असे दिसून येते की, माहे फेब्रुवारी -२००७ रोजीची हजेरी पत्रक हे SI यांनी संबंधित दिनांक २०.१२.२००६ रोजी बडतर्फी केल्याची नोंद घेतली मात्र माहे जानेवारी -२००७ चे दैनंदिन हजेरी पट पाहिले असता संबंधिताने माहे जानेवारी २००७ मध्ये दिनांक १.१.२००७ ते २०.१.२००७ पर्यंत काही दिवस गैरहजर व काही दिवस हजर असल्याची नोंद आहे. तसेच सदरचे दैनिक हजेरी पटावर दिनांक २१.१.२००७ रोजी बडतर्फ अशी नोंद आहे. नोंदी संयुक्तिक नाही. खुलासा करावा.

उक्त लेख्यांची चाचणी स्वरूपात तपासणी केली असता कर्मचा-यांचे उपलब्ध दैनंदिन हजेरीपट हे पृष्ठ क्रमांकित केलेले नसून ते सक्षम अधिका-यामार्फत प्रमाणित केलेले नाही. तरी सदरील हजेरीपट हे अद्ययावत करून तात्काळ लेखापरीक्षण कामी सादर करावेत असे सूचित केले होते. अभिलेखे उपलब्ध न करून देणे ही गंभीर बाब आहे. विभागाने जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा

९) उपरोक्त तपशिलात दर्शविलेल्या अनुपस्थित कालावधीचे वेतन भत्ते अदा केलेले नसल्याबाबत खात्री करावी.व अदा केले असल्यास ते वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२७: वॉर्ड - अ विभागातील मंजूर पदांची माहिती देणेबाबत.**

प्रभाग -अ विभागात विविध संवर्गनिहाय एकूण किती मंजूर पदे आहेत, याबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये भरून देण्यात यावी.

| अ.क्र. | पदनाम | एकूण मंजूर पदे | कार्यरत कर्मचारी | रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

उक्त नमुन्यामध्ये मंजूर पदांबाबतची माहिती लेखापरीक्षण विभागास तात्काळ सादर करण्यात यावी असे वारंवार लेखी व तोंडी कळवूनही अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. करिता, विभागाने जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२८: आर्थिक वर्ष २००६-०७ ते सन २०११-१२ या वर्षातील भांडार विभागातून प्राप्त नळकनेक्शन फॉर्मची क्रमांकासह माहिती व लेखे उपलब्ध करून देण्याबाबत.**

आर्थिक वर्ष २००६-०७ ते सन २०११-१२ या कालावधीत वॉर्ड अभियंता - अ कार्यालयास महानगरपालिका अंतर्गत भांडार विभागातून नळ कनेक्शन फॉर्म वितरीत करण्यात आले असून उक्त कालावधीत प्राप्त नळ कनेक्शन फॉर्मची क्रमांकासह माहिती व त्या अनुषंगिक वसूल रकमा भरणा केले बाबतचे लेखे लेखापरीक्षण विभागास तात्काळ उपलब्ध करून द्यावे असे विभागास वारंवार लेखी व तोंडी सूचित करण्यात आले होते. अभिलेखे उपलब्ध न करून दिल्याबाबत विभागाने जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२९ :पाणीपट्टी मागणी नोंदवही मध्ये वसुलीबाबतच्या संशयास्पद नोंदी.**

**रुपये ९०००/-**

श्री.सुखदेव तुपे,मो.पहाडसिंगपूरा यांचे पाणीपट्टी खाते क्र. २४५७४ असून मागणी नोंदवही क्र. २५ पान क्र.९२/९३ तपासले असता सन २००० ते २००६ पर्यंत रु. ९०००/- वसूल केल्याचे दर्शविले परंतू दर्शविलेली पावतीचा क्रमांक अवाचणीय असून दि. १३.२.२००५ असा आहे. सदरील नोंद संशयास्पद निदर्शनास येत असून याबाबत विभागाने आपल्या स्तरावर सदरील पावतीची शहानिशा करुन अहवाल द्यावा. त्याचप्रमाणे डीमांड नोंदवहीमध्ये उपरोक्त पानावर हिरव्या शाईने PAID असा सरसकट शेरा नोंदविलेला दिसतो. अशा प्रकारे नोंदिवलेले शेऱ्या बाबतसुध्दा खातरजमा करुन अहवाल लेखा परिक्षण विभागात सादर करावा असे सुचित केले असता विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

तथापि महाराष्ट्र नगरपरिषद संहिता १९७१ चे नियम क्र. ११ या तरतुदीचा भंग झाला असल्याने संबंधिताकडून अपहारित रक्कम वसूल करावी व जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.३० : आर्थिक वर्ष २००७-०८, सन २०११-१२ या वर्षातील मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसूल रकमेचे धनादेशाबाबत.(रक्कम रूपये ३,९४,२८६/-)**

वॉर्ड - अ कार्यालयाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीचे लेखापरीक्षण कार्यरत असून वॉर्ड कार्यालय मध्ये धनादेशा द्वारे मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसूल करण्यात आला आहे. त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) सन २००७-०८ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षात धनादेशाद्वारे रक्कम वसूल केलेली आहे व सदरील धनादेश न वटलेले असतांनाही अद्यापपर्यंत रक्कम वसूल केलेली नाही.

२) मालमत्ताधारकाकडून मालमत्ता कर / पाणीपट्टीची रक्कम वसूल करतांना जर मालमत्ताधारकाने धनादेश स्वरूपात रक्कम अदा केली असता धनादेश पावती मालमत्ता धारकास कार्यालयाकडून वितरीत करणे क्रमप्राप्त आहे. परंतु लेखापरीक्षणा दरम्यान अशा बाबी निदर्शनास येत आहे की, धनादेशाद्वारे संबंधिताकडून येणा-या वसूली बाबत मालमत्ता धारकास मालमत्ता कराची/ पाणीपट्टी करांची मूळ पावती वितरीत केलेली आहे. कालांतराने मालमत्ताधारकाने दिलेला धनादेश हा न वटता परत येतो व तद्नंतर न वटलेल्या धनादेशाची रक्कम संबंधित मालमत्ता धारकाकडून विहीत पध्दतीचा अवलंब न होता तशीच रक्कम प्रलंबित राहते. तसेच लेखापरीक्षणा दरम्यान अशा बाबी निदर्शनास आल्या आहे की, न वटलेल्या धनादेशाच्या प्रलंबित रकमा संबंधित मालमत्ता धारकाकडून येणे असून ही पुढील आर्थिक वर्षाची वसूली मागील न वटलेल्या धनादेशाची प्रलंबित वसूली न करता नव्याने नविन वर्षाची वसूली केलेली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

३) सदरील चेक न वटले बाबत निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे नियम १३८ नुसार विभागामार्फत याबाबत काय कार्यवाही करण्यात आली.

न वटलेल्या धनादेशाबाबतच्या रकमेसंबंधी वसूलीबाबतची जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे. (**सोबत : विवरणपत्र)**

**सन २००७-०८ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षातील**
**वॉर्ड अभियंता - अ कार्यालय**
**लेखापरीक्षण अहवाल.**

**परिच्छेद क्र.०१: लेखापरीक्षण पथकास सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीचे अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

वॉर्ड अभियंता - अ कार्यालयाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. या कामासाठी वॉर्ड अभियंता कार्यालयात वारंवार प्रत्यक्ष भेटी दिल्या असता संबंधित कर्मचारी उपलब्ध होत नाहीत.

करिता वॉर्ड अभियंता कार्यालयाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून द्यावे. त्याचप्रमाणे संबंधित कामासाठी स्वतंत्र कर्मचा-याची नियुक्ती करून लेखापरीक्षण पथकास अवगत करावे असे कळविले होते. परंतु लेखापरीक्षणा दरम्यान अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. विभागाअंतर्गत झालेला खर्च हा संशयास्पद वाटतो.

**परिच्छेद क्र.०२: विविध शिर्षाअंतर्गत केलेल्या कामाच्या माहेवार खर्चाचा तपशिल व गुंठेवारीच्या संचिका उपलब्ध करून देणे बाबत.**

वॉर्ड अभियंता - अ सन २००७-०८ ते सन २०११-१२ या वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून या कामी आपल्या विभागाकडील विविध शिर्षातर्गत केलेल्या कामाच्या माहेवार खर्चाचा तपशिल लेखा विभागातील तरतूद (प्रोव्हिजन रजिस्टर) पुस्तिकेनुसार व गुंठेवारी करणेत आलेल्या संचिका लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात याव्यात असे सूचित केले असता लेखापरीक्षणा दरम्यान लेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. विभागाअंतर्गत झालेला खर्च हा संशयास्पद वाटतो.

# वॉर्ड ब कार्यालय
# सन २००६-०७ ते सन २०१२-१३
# लेखापरीक्षण अहवाल

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गतच्या वॉर्ड - ब कार्यालयाचे सन २००६-०७ ते सन २०१२-१३ या कालावधीचे लेखापरीक्षण करणे करीता कार्यालयीन आदेश क्र. मनपा /मुलेप / २०१३/२२८, दिनांक १.१०.२०१३ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. वॉर्ड कार्यालयाचे लेखापरीक्षण करतांना संबंधित विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांनुसार चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

लेखापरीक्षणामध्ये प्रामुख्याने वॉर्ड कार्यालयाने वसूल केलेला मालमत्ता कर, पाणीपट्टी, अकृषि कर व सामान्य पावती पुस्तकान्वये प्राप्त रकमा बाबतची पावती पुस्तके तपासण्यात आली. वॉर्ड -ब कार्यालयाने वेळोवेळी भरणा केलेल्या रकमांचा ताळमेळ घेण्यात आला. वॉर्ड कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे सेवापुस्तके / सेवापट, वैद्यकीय प्रतीपूर्ती संचिका तपासण्यात आल्या. वॉर्ड कार्यालयाने केलेल्या मालमत्ता फेर आकारणी संचिका, नामांतर संचिका तपासल्या. विवाह नोंदणी संचिका तपासल्या. वॉर्ड कार्यालयाने सन २००६-०७ ते सन २०११-१२ पर्यंतचे रोखकिर्द उपलब्ध करून दिलेले असल्यामुळे सन २०११-१२ पर्यंतचे लेखापरीक्षण करण्यात आले. वॉर्ड - ब कार्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या मालमत्ता व पाणीपट्टी मागणी रजिस्टर मध्ये नोंदविलेल्या नोंदी तपासण्यात आल्या. तपासणी दरम्यान जमा बाजूचे एकूण **७१** परिच्छेद समाविष्ट करण्यात आलेले आहेत. लेखापरीक्षणात आक्षेपित मुद्यांचा सविस्तर अहवाल पुढील प्रमाणे -

**वॉर्ड अधिकारी यांच्या कार्यकाळाबाबत :**

सन २००६- २००७ ते सन २०१२-१३ या कालावधीत वॉर्ड अधिकारी म्हणून कार्यरत अधिका-यांची नांवे आस्थापना -१ विभागाकडून प्राप्त झालेली आहेत ती खालीलप्रमाणे -

**वॉर्ड अधिकारी - ब**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री.डी.डी.सुर्यवंशी | १.४.२००६ ते १९.१०.२०१० |
| २ | श्री.एस.एल.पवार (वॉर्ड अभियंता) | २०.१०.२०१० ते १४.११.२०१० |
| ३ | कु.सपना वसावा | १५.११.२०१० ते २०.१२.२०१० |
| ४ | श्री.टी.जी.जाधव | २१.१२.२०१० ते ३०.४.२०११ |
| ५ | श्री.डी.डी.सुर्यवंशी | १.५.२०११ ते नोव्हेंबर २०११ |
| ६ | श्री.अजमत खान | नोव्हेंबर २०११ ते ४.७.२०१३ |
| ७ | श्री.ए.ई.लाड | ५.७.२०१३ ते आजपावेतो |

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-याची नांवे :**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक श्री.मो.रा.थत्ते यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे -

१. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक (पथक प्रमुख)
२. श्री. नासेर लईख, वरीष्ठ लिपीक

३. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक
४. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक,
५. श्रीमती पंचशिला खरात, कनिष्ठ लिपीक
६. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक

प्रभाग - ब कार्यालयाकडील प्रलंबित लेखा परीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे आहे. प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन करून त्वरित निराकरण करून घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र | आर्थिक वर्ष | आक्षेप क्रमांक | आक्षेपित रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | २,३ (एकूण २) | १९००/- |
| ४ | २००२-२००३<br>२००३-२००४ | अ - १,२,३ (ब)<br>क - १ ते ८ (एकूण १२) | १९,६८,२३४/- |
| ५ | २००४-२००५ | ३ ते ९ (एकूण ७) | २६,४६३/- |
| ७ | २००६-२००७ | अ,ब,क,ड,ई ई,उ,ऊ<br>(एकूण ८) | ३,८६७/- |
| | | | **२०,००,४६४/-** |

**वॉर्ड - ब कार्यालयातील लेखा परीक्षणा दरम्यान तपासण्यात आलेल्या पावती पुस्तकांचा गोषवारा**

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | मालमत्ता कर पावती पुस्तके | पाणीपट्टी पावती पुस्तके | सामान्य पावती पुस्तके | अकृषि कर पावती पुस्तके |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००६-२००७ | २६ | १६७ | २६ | -- |
| २ | २००७-२००८ | ६४ | १६३ | २० | -- |
| ३ | २००८-२००९ | १२२ | १४८ | २५ | -- |
| ४ | २००९-२०१० | ११३ | १६७ | ३९ | -- |
| ५ | २०१०-२०११ | १३९ | १६३ | २३ | ०४ |
| ६ | २०११-२०१२ | १४७ | १२८ | २८ | १० |
| | **एकूण** | **६११** | **९३६** | **१६१** | **१४** |

**परिच्छेद क्र. १ : लेख्यांची सर्वसाधारण स्थिती.**

वॉर्ड - ब कार्यालयाचे सन २००६-०७ ते सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी विभागाने सन २००६-०७ ते सन २०११-१२ या कालावधीचे अभिलेखे उपलब्ध करून दिले. विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यातील मालमत्ता मागणी नोंदवही, पाणीपट्टी मागणी नोंदवही, दैनंदिन वसूल केलेल्या करांची नोंद केलेली रोखकिर्द इत्यादी अभिलेखे तपासली. मालमत्ता व पाणीपट्टी मागणी नोंदवहीतील घेण्यात आलेल्या नोंदी अपूर्ण आढळल्या. मागणी नोंदवहीची एकूणच स्थिती अत्यंत खराब व दयनीय आहे. मागणी नोंदवहीत पुढील आणि मागील पाने फाटलेली असल्याने नोंदी अस्पष्ट आहेत. मागणी नोंदवही वर नोंदी घेणा-या कर्मचारी / अधिकारी यांचे सांक्षाकन नाही. मागणी नोंदवही ही कायम जतन करणा-या अभिलेख्यातील अभिलेखे असल्याचे गांभीर्य विभागास नसल्याचे दिसून आले. रोखकिर्दच्या आडव्या व उभ्या स्तंभाच्या बेरजांचा ताळमेळ न घेता रकमा मनपा निधीत जमा केलेल्या आहेत. रोखकिर्दवर नियंत्रण ठेवणा-या अधिका-याचे सांक्षाकन नाही. त्यामुळे कागदपत्रांची वैधता सिध्द होत नाही.

करीता विभागाने मालमत्ता मागणी नोंदवही व पाणीपट्टी मागणी नोंदवहीची स्थिती तपासावी. रजिस्टरच्या पुढील व मागील पानावरील नोंदी नष्ट होणार नाही याबाबत तातडीने नविन मागणी नोंदवही तयार करून संबंधित कर्मचारी / अधिका-यांचे नोंदवहीवर साक्षांकन करून घ्यावे. मागणी नोंदवहीतील अपूर्ण नोंदी जसे कर आकारणी संदर्भ, कर आकारणी मूल्य, एकूण कर योग्य असल्याची खातरजमा करावी. रोखकिर्द मधील नोंदीचा उभ्या व आडव्या स्तंभातील रकमांचा ताळमेळ घ्यावा. मनपा फंडात जमा केलेली रक्कम बरोबर असल्याची खात्री करावी.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.२ : लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

वॉड- ब कार्यालयाच्या लेखापरीक्षणा दरम्यान अर्धसमास क्र. १ अन्वये संबंधितांना लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतू लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत खालील अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत.

१. सन २०११-१२ व सन २०१२-१३ या वर्षाचे वॉर्ड - ब क्षेत्रातील मालमत्तांना आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराचे करनिर्धारण संचिका.
२. सन २००६-०७ ते सन २०१२-१३ या काळात प्रभाग - ब क्षेत्रातील मालमत्तांचे नामातंर केलेल्या संचिका.
३. जन्म - मृत्यू नोंद अभिलेखे.
४. बेबाकी प्रमाणपत्र अभिलेखे.
५. धनादेश पावती पुस्तके व स्टॉक रजिस्टर.

६. स्वच्छता साहित्याची माहिती.
७. बचत गटामार्फत साफसफाईच्या संचिका.
८. कंत्राटदारामार्फतच्या साफसफाईच्या संचिका.
९. अधिकारी कर्मचारी हजेरीपत्रक , दैनंदिन अहवाल  मासिक पगारपत्रके ,पुरवणी देयके इत्यादी.
१०. जड संग्रह नोंदवही.
११. स्टॉक रजिस्टर (१०९, ११० व १११)
१२. न वटलेले धनादेशाची वर्षनिहाय यादी.
१३. आवक - जावक नोंदवही.

विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब संशयास्पद आहे. तसेच अभिलेखे दडवून ठेवणे ही बाब आक्षेपार्ह आहे. पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपरोक्त अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध ठेवावेत. तसेच भांडार विभागाने धनादेश पुस्तके,पावती पुस्तकांची माहिती दिलेली नाही. करिता वॉर्ड- ब कार्यालय व भांडार विभाग यांचेवर संयुक्त जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ३ :मालमत्ता कर मागणी नोंदवही व पाणीपट्टी कर मागणी नोंदवही उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता कर  मागणी नोंदवही तपासली असता असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ ची मागणी नोंदवहीत स्वतंत्रपणे नोंदविलेली नाही. मागणी नोंदवहीबाबत संबंधित कर निरिक्षकांना अभिलेख्यांची मागणी केली असता त्यांनी मालमत्ता कराचे अभिलेखे संगणकीकृत झालेले असल्यामुळे नविन रजिस्टर तयार केलेले नाही, असे लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षणा दरम्यान सांगितले. जर मालमत्ता कराचे १००% संगणकीकरण  झालेले असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र लेखापरीक्षण विभागास सादर करावे नसता मागणी रजिस्टर तयार करून लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून द्यावे असे कळविण्यात आले होते. परंतू लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत मागणी रजिस्टर उपलब्ध झालेले नाहीत. मागील मागणी रजिस्टर मध्येच सन २०१२-१३, सन २०१३-१४ या वर्षाच्या वसूल रकमांच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका,अधिनियम १९४९ चे अनुसूचि -ड चे प्रकरण (८) चे नियम २१ (२) नुसार विभागाने कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ४ : सन २०१२-१३ मध्ये एफ-१ अन्वये मालमत्ता कर वसूली बाबतच्या नोंदी संगणकीकरणा दरम्यान अद्ययावत केलेल्या नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, वॉर्ड- ब अंतर्गत येणा-या मालमत्ता धारकांनी (ज्यांचे संगणकीकरण झालेले नाही अशा नागरीकांनी) भरलेल्या कराच्या एफ-१ या सॉफ्टवेअर मधील पावत्या वितरीत केलेल्या आहेत. तद्नंतर सदरील पावत्यांची नोंद अद्ययावत करणे आवश्यक असतांनाही पुढील आर्थिक वर्षात नागरीकांवर एफ-१ पावत्यांन्वये भरणा केलेल्या रकमांची थकबाकी दर्शविलेली आहे.

त्यामुळे सन २०१२-१३ या वर्षात वॉर्ड - ब कार्यालया अंतर्गत येणा-या मालमत्ता धारकांनी मालमत्ता कराचा भरणा भरूनही त्याची नोंद अभिलेखात न झाल्याने ती रक्कम संबंधितांच्या खाती थकित दिसत आहे व याचा नागरीकांना त्रास होवून परिणाम स्वरूप महानगरपालिकेची प्रतिमा डागाळली जात आहे. एफ-१ अंतर्गत भरणा केलेल्या करांच्या पावत्यांची माहिती लेखापरीक्षण पथकास देण्यात यावी. तसेच अशा पावत्यांची नोंद संगणकीकरणात करून अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही. एफ-१ या सॉफ्टवेअर मधील पावत्यांच्या नोंदी ऑनलाईन मालमत्ता कराच्या सॉफ्टवेअर मध्ये समाविष्ट न केल्यामुळे नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच दुरूस्तीच्या नावाखाली संबंधितांना मुख्यालयी पाठविण्यात येते ही बाब महानगरपालिके करीता हितावह नाही. तसेच यामुळे महानगरपालिकेची प्रतिमा डागाळली जात आहे.

विभागाने उपरोक्त बाबींबाबत दखल घेवून आवश्यक ती उपाययोजना करून तसेच नागरीकांना होत असलेल्या त्रासाबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ५ : सन २००६-०७ ते सन २०१२-१३ पर्यंतच्या करांच्या नोंदी इरसाल (कॅश रजिस्टर) मध्ये अद्ययावत करणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, रोखपालामार्फत रोखकिर्द मध्ये नोंदी घेतांना पावती क्रमांक व रकमेचा उल्लेख केलेला आहे. परंतू ज्या मालमत्ता धारकाने सदरील करांचा भरणा केलेला असेल त्यांच्या नावाची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे लेखापरीक्षणास अडचणी निर्माण झाल्या. रोखकिर्द लिहितांना अशा प्रकारे चूका होणे ही अयोग्य बाब आहे.

विभागाने उपरोक्त कालावधीतील इरसाल (रोखकिर्द ) मधील नोंदी अद्ययावत करून लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात याव्यात असे विभागास कळविण्यात आलेले होते. परंतू लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने रोखकिर्द अद्ययावत करून दिलेली नाही. पुढील लेखापरीक्षणापूर्वी नोंदी अद्ययावत करून रोखकिर्द उपलब्ध ठेवावीत. तसेच संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ६ : सन २००६-०७ ते २०१२-१३ या कालावधीत वॉर्ड अधिका-यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराच्या आदेशाच्या प्रती लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

वॉर्ड - ब कार्यालयास विविध कामासाठी (जसे की,मालमत्तांचे नामांतर करणे, मालमत्ता करासंबंधी कराचे पुर्नमूल्यांकन करणे, नविन मालमत्तांना कर लावणे ई.) प्रदान केलेल्या अधिकाराच्या प्रती लेखापरीक्षण कामी आवश्यक असून त्या उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतू विभागाने संबंधित प्रती उपलब्ध करून देण्यास असमर्थता दर्शविली आहे. एकूणच विभागाने त्यांचे अभिलेखे अद्ययावत ठेवलेले नसल्याचे लेखापरीक्षणा दरम्यान स्पष्ट झाले.

विभागाने त्यांना प्राप्त अधिकाराचे सर्व आदेश पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपलब्ध ठेवावेत. तसेच या कामी नियुक्त कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. ७ : सन २००६-०७ ते सन २०१२-१३ या वर्षातील वॉर्ड -ब कार्यालयात जमा झालेल्या विविध रकमांच्या रोखकिर्दीवर संबंधित वॉर्ड अधिका-यांचे साक्षांकन नसणेबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, संदर्भ वर्षामध्ये वॉर्ड कार्यालयास प्राप्त झालेल्या विविध करांच्या रकमांच्या नोंदीचे रोखकिर्द वॉर्ड अधिका-यांच्या स्वाक्षरीविना अंतिम केलेली आहे. वॉर्ड कार्यालयाचे नियंत्रण अधिकारी म्हणून वॉर्ड अधिकारी कार्यरत आहे. रोख रकमा संबंधित रोखपालाने महानगरपालिका फंडात भरणा केले किंवा नाही याचा दररोज आढावा घेवून संबंधित रोखकिर्दीवर रोजच्या रोज स्वाक्षरी केल्यावरच त्या रोखकिर्दीस वैधता प्राप्त होते.

उपरोक्त कालावधीतील रोखकिर्दीवर संबधित रोखपालाने ज्या वॉर्ड अधिका-यांच्या स्वाक्ष-या नसतील अशा वॉर्ड अधिका-यांशी संपर्क करून संबंधित रोखकिर्दीवर स्वाक्ष-या घेवून, लेखे अद्ययावत करून तसा अहवाल लेखापरीक्षण पथकास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत विभागाने उपरोक्त प्रकरणी कार्यवाही केलेली नाही. रोखकिर्दीवर सक्षम अधिका-यांच्या स्वाक्षरीविना अभिलेखे वैधता प्राप्त ठरत नाहीत. करिता पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे अद्ययावत ठेवून संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.८ : सन २०११-१२ मध्ये वापरलेले सामान्य पावती पुस्तक ४१७१, ४१७४ व ४१७५ च्या पावत्यांच्या मुळ प्रती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

सन २०११-१२ या वर्षातील सामान्य पावती पुस्तक क्र.४१७१, ४१७४ व ४१७५ अन्वये विविध कामाच्या पावत्या वितरीत केलेल्या आहे. साधारणपणे यामध्ये जन्म-मृत्यू प्रमाणपत्र फीच्या पावत्यांचा समावेश आहे. जन्म-मृत्यू प्रमाणपत्र फीच्या पावत्या वॉर्ड कार्यालयातील एका कर्मचा-याच्या नांवे तयार करून त्यात अनेक प्रमाणपत्रांचे क्रमांक नोंदविले आहे. पावती वरील रक्कम पावती तयार केल्यानंतर नोंदविली जी बाब आक्षेपार्ह आहे. सदरील रकमांचा ताळमेळ घेण्यासाठी पावत्यांच्या मूळ प्रतींची आवश्यकता आहे. करिता पावत्यांच्या मूळ प्रती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून द्याव्यात असे कळवून सुध्दा लेखापरीक्षण पूर्ण होईपावेतो मूळ प्रती उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे उपरोक्त तिन्ही पुस्तकांचे अन्वये प्राप्त रकमांचे भरणा बाबतचे लेखापरीक्षण करता आले नाही. विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपरोक्त अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. तसेच संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ९ : सन २०११-१२ या वर्षात पाणीपट्टी कर वसूलीचे पा.पुस्तक क्र.४७३० व ४७३१ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

सन २०११-१२ या वर्षात पाणीपट्टी कर वसूलीसाठी वापरलेले पावती पुस्तक क्र.४७३० व ४७३१ लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे दोन्ही पावती पुस्तकान्वये प्राप्त जमा रकमांचे लेखापरीक्षण करता आले नाही. दोन्ही पावती पुस्तकातील पावत्यांच्या रकमा व

रोखकिर्दमधील रकमा योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही. पावती पुस्तके उपलब्ध करून न देणे ही बाब संशयास्पद असून या संबंधी स्वतंत्रपणे चौकशी प्रस्तावित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. १० : सन २००६-०७ ते सन २०१२-१३ या वर्षाचे महानगरपालिका फंडात जमा रकमेचे चालन बुक लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

लेखापरीक्षण कामी सन २००६-०७ ते सन २०१२-१३ या वर्षाचे महानगरपालिका फंडात जमा रकमेचे चालन बुक लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात यावेत असे कळविण्यात आले होते. परंतू लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत उपरोक्त अभिलेखे प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे महानगरपालिका फंडात भरणा केलेल्या रकमा व चालानवरील रकमा यांचा ताळमेळ घेता आला नाही. विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपरोक्त अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. तसेच संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.११ : लेखापरीक्षणासाठी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे कॅश बुक व पावती पुस्तके उपलब्ध करुन न दिल्याबाबत.**

सन २०१२-१३ या वर्षातील कॅशबुक व पावती पुस्तके लेखापरीक्षण कामी लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात यावेत असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षणा दरम्यान अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत. तसेच सन २०१२-१३ मध्ये वॉर्ड कार्यालयाचे भरणा रकमांचे लिखित स्वरूपात रोखकिर्द उपलब्ध नाही असे संबंधित रोखपालाने सांगितले. रकमांचा ऑनलाईन भरणा झाल्यानंतर त्या अभिलेख्यांचे छापील रोखकिर्दचे जतन करणे हे संबंधित कार्यालयाचे कर्तव्य आहे. परंतू विभागाने कॅशबुक सारखे महत्वाचे अभिलेखे जे कायमस्वरूपी जतन करावे लागतात ते ठेवलेले नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आलेले आहे ही बाब गंभीर स्वरूपाची आहे.

विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपरोक्त अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. तसेच संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१२ : कर आकारणीच्या संचिका उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

लेखापरीक्षणासाठी खालील नाममात्र संचिका तातडीने उपलब्ध करून देण्यात याव्यात असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतिम होईपर्यंत संचिका प्राप्त झालेल्या नाहीत.

१. हॉटेल ताज, एन-१२.
२. इंडीयन इन्स्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, एन-१२
३. एम्पायर मॉल प्रा.लि. एम.आय.डी.सी. चिकलठाणा.
४. प्राचार्य फोस्टर डेव्हललपमेंट होमीओपॅथी हॉस्टेल एन-५
५. ग्रॅमफर्थ कंपनी, चिकलठाणा.
६. राखी सेंटर, जाधववाडी.
७. एम.आय.डी.सी. कार्यालय, कोर्टकेसेस संचिकेसह
८. लुपीन लॅबरोटरीज कंपनी
९. शांतीनिकेतन इंग्लिश स्कूल, एन-८.

उपरोक्त संचिका विभागाने उपलब्ध करून दिलेल्या नसल्याने पुढील लेखापरीक्षणापूर्वी संचिका अद्ययावत ठेवण्यात याव्यात. तसेच संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१३ : वॉर्ड - ब कार्यालया अंतर्गत विविध मालमत्तांचे नामांतर संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेल्या नसल्याबाबत.**

वॉर्ड - ब कार्यालयाने विविध मालमत्तांचे नामांतर केल्याचे मागणी रजिस्टर मधील नोंदीनुसार निदर्शनास आलेले आहे. अशा मालमत्तांचे नामांतराबाबतच्या संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करणे अभिप्रेत आहे. अर्धसमास पत्र क्र.१०६ सोबत दिलेल्या यादीनुसार नामांतराबाबतच्या संचिका उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे नामांतरासाठी आवश्यक बाबींची पूर्तता संबंधितांनी केल्याबाबतची खात्री लेखापरीक्षण पथकास झाली नाही.

विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी नामांतराबाबतचे सर्व अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. अभिलेखे उपलब्ध न करून दिल्याबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१४ : वॉर्ड - ब अंतर्गत मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कराची माहिती उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड कार्यालय - ब अंतर्गत कोणत्या मोहल्ल्यात किती मालमत्ताधारकांच्या इमारतींवर / मोकळ्या जागेवर मोबाईल टॉवर उभारलेले आहेत, याबाबतची सविस्तर यादी व आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून द्यावे असे कळविण्यात आले होते. विभागाने लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत संचिका उपलब्ध करून न दिल्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही. तसेच मोबाईल टॉवर बाबत आकारण्यात येणारा मालमत्ता कर वसूल केला जातो किंवा नाही याची खात्री झाली नाही.

विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी संचिका उपलब्ध ठेवाव्यात. लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न करून दिल्याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.१५ : वॉर्ड - ब अंतर्गत येत असलेल्या शासकीय इमारतींच्या मालमत्ता कराची माहिती उपलब्ध न करून दिल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, वॉर्ड-ब कार्यालया अंतर्गत असलेल्या शासकीय इमारतींची / जागेंची माहिती विहित नमुन्यात मागविण्यात आली होती. तथापि लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत विभागाने माहिती सादर केलेली नाही.

विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी संचिका उपलब्ध ठेवाव्यात व अभिलेखे उपलब्ध न करून दिल्याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.१६ : इमारत आणि जमिनीवरील कर आकारणीचे गोषवारा पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, वॉर्ड - ब कार्यालया अंतर्गत येणा-या इमारती / जमिनीवर आकारलेला मालमत्ता कर आकारणी गोषवारा पुस्तक लेखापरीक्षण

पथकास उपलब्ध करून दिलेले नाही. कर आकारणीचे अभिलेख्यासोबत कर आकारणी गोषवारा पुस्तक उपलब्ध करून देणे अभिप्रेत होते.

विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. अभिलेखे उपलब्ध न करून दिल्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१७ : व्यावसायिक मालमत्ता कर आकारणी करतांना प्राप्त अभिलेख्यात मालमत्तेचा वापर व्यावसायिक कोणत्या तारखेपासून केला याबाबत अभिलेखे उपलब्ध नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान बंसल उषा अशोक, भाडकेरू बँक ऑफ महाराष्ट्र, एन-५, बी/एम/१७/GF, सिडको या मालमत्तेचा क्र. BOO27101 यास कर आकारणी संदर्भ क्र. ९४५/१०-११ अन्वये कर योग्य मूल्य रू.२८०४८/- दि. १/२/२०११ पासून आकारलेले आहे. कर आकारणी कागदपत्रात माहिती पत्रक व कर आकारणी हिशोब तक्ता जोडलेला आहे.

प्रकरणांत बँक ऑफ महाराष्ट्र यांना सदरील मालमत्ता कोणत्या तारखेपासून किरायाने दिली त्यांचे भाडे करारनामा अभिलेखे कर आकारणी केलेल्या संचिकेत उपलब्ध नाही. त्यामुळे दिनांक १.२.२०११ पासून केलेली व्यावसायिक जागेची कर आकारणी बाबत खात्री झाली नाही.

विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाहीत. पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे अद्ययावत ठेवावेत. अभिलेखे उपलब्ध न करून दिल्याबद्यल संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१८ :वॉर्ड -ब कार्यालयास कर आकारणी विभागातून प्राप्त अभिलेख्यात संचिकेत कागदपत्रे नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, वॉर्ड - ब कार्यालया अंतर्गत असलेल्या मालमत्तांना आकारण्यात आलेला मालमत्ता कराच्या संचिका कर आकारणी विभागातून लेखा परिक्षणास वॉर्ड - ब कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त संचिकांची चाचणी स्वरूपात तपासणी केली असता अर्धसमास पत्र क्र.१०३ सोबत दिलेल्या प्रपत्रात शेरा या कॉलममध्ये संचिकेतील अपूर्ण कागदपत्रांचा तपशील नोंदविलेला आहे. संचिकेचा क्रमांक को-या कागदावर टाकून त्या संबंधीचे कागदपत्रे संलग्न नाहीत, त्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही.

विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अभिलेखे पुरविले नसल्याने लेखापरीक्षण करता आले नाही. पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. तसेच अभिलेखे उपलब्ध करून न दिल्यामुळे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१९ : सन २००६-०७ ते सन २०११-१२ या कालावधीत वॉर्ड - ब कार्यालयात जमा झालेला मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, अकृषिक कर व इतर रकमांचा कमी भरणा करणे बाबत. (रक्कम रू. १०,७३,०२६)**

वॉर्ड - ब कार्यालयाच्या लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, अकृषिक कर व इतर जमा रकमांच्या नोंदी रोखकिर्द मध्ये तपासल्या असता खालील विवरणात नमूद केल्याप्रमाणे कमी रकमेचा भरणा वॉर्ड कार्यालयातर्फे झालेला आहे. वॉर्ड कार्यालयास

लेखापरीक्षणा दरम्यान स्वतंत्रपणे कमी भरणाबाबतचे सविस्तर विवरणाचे अर्धसमास देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | अर्धसमास पत्र क्र. | संदर्भ वर्ष (सन) | वसूली शिर्ष | कमी भरणा रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११ | २००८-०९ | मालमत्ता कर | ३९८४/- | |
| २ | १८ | २००८-०९ | मालमत्ता कर | ३५,५०८/- | |
| ३ | १७ | २०१०-११ | मालमत्ता कर | ८४,३३६/- | |
| ४ | २० | २०१०-११ | मालमत्ता कर | १,१२,०००/- | |
| ५ | २२ | २०११-१२ | मालमत्ता कर | ९६,६३२/- | |
| ६ | ०४ | २००६-०७ | पाणीपट्टी कर | ३,६००/- | |
| ७ | ०७ | २००७-०८ | पाणीपट्टी कर | २,६००/- | |
| ८ | ०६ | २००८-०९ | पाणीपट्टी कर | २४,११६/- | |
| ९ | ०८ | २००९-१० | पाणीपट्टी कर | १३,४३५/- | |
| १० | १२ | २००९-१० | पाणीपट्टी कर | ३४,३५०/- | |
| ११ | २३ | २०१०-११ | पाणीपट्टी कर | १,९४,९३०/- | |
| १२ | ३० | २०११-१२ | पाणीपट्टी कर | ४,४४,२८५/- | |
| १३ | १५ | २०१०-११ | अकृषिक कर | ९९१/- | |
| १४ | २४ | २०११-१२ | अकृषिक कर | २,३९३/- | |
| १५ | १० | २००७-०८ | इतर कर | ३,८००/- | |
| १६ | ०९ | २००८-०९ | इतर कर | १,३३०/- | |
| १७ | १४ | २००९-१० | इतर कर | १८००/- | |
| १८ | १६ | २०१०-११ | इतर कर | ५३८६/- | |
| १९ | २५ | २०१०-११ | इतर कर | ७५५०/- | |
| | | | **एकूण** | **१०,७३,०२६/-** | |

उपरोक्त प्रमाणे कमी भरणा रक्कम वॉर्ड कार्यालयाने लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत भरणा करून अनुपालन सादर केलेले नाही. कमी भरणा रक्कम तातडीने महानगरपालिका फंडात भरणा करून संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा.

**वसूलीस पात्र रक्कम रू.१०,७३,०२६/-**

**परिच्छेद क्र.२० : सन २००६-०७ ते २०११-१२ या कालावधीतील विविध करांचा भरणा केलेल्या कॅश बुकच्या नोंदीचे उभ्या व आडव्या बेरजेतील तफावतीबाबत.**

वॉर्ड -ब कार्यालयाने नागरीकांकडून विविध करापोटी वसूल केलेल्या रकमा वेळोवेळी महानगरपालिका फंडात जमा केल्याबाबत दैनंदिन रोखकिर्द वॉर्ड कार्यालयात उपलब्ध असल्यानुसार लेखापरीक्षण पथकाने त्यातील काही नोंदी तपासल्या. उभ्या व आडव्या बेरजेत तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे.

रोखकिर्दीच्या पानावरील उभी बेरीज ही आडव्या बेरजेपेक्षा जास्त / कमी असेल अशा बाबींसंबंधी वॉर्ड कार्यालयाने प्रत्येक नोंदी पावतीशी पडताळून त्या-त्या पानावरील उभ्या व आडव्या बेरजेचा ताळमेळ साधणे आवश्यक आहे.

रोखकिर्दीमधील ज्या पानांची उभ्या बेरजेमध्ये तफावत असून (मनपा फंडात जमा केलेली रक्कम) लेखापरीक्षणा अंती रक्कम कमी भरणा केल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याबाबतचे स्वतंत्र विवरण अर्धसमास पत्र क्र. ३१ मध्ये नमूद केलेले आहेत. विभागाने तपासणी करून कमी भरणा रक्कम महानगरपालिका फंडात जमा करणे क्रमप्राप्त आहे.

लेखापरीक्षण पथकाने अर्धसमासात नमूद नोंदी नाममात्र तपासल्या असून प्रत्येक वर्षाची सविस्तर तपासणी करून उभ्या व आडव्या बेरजेचे ताळमेळ घेवून तसा अहवाल तात्काळ सादर करावा असे कळविले असतांना लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

प्रकरणांत वॉर्ड -कार्यालयाच्या जमा बाजूच्या नोंदी रोखकिर्द मध्ये अचूक नोंदविणे ही संबंधितांची जबाबदारी असतांना त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेत भरणा केलेली रक्कम योग्य असल्याची खात्री झालेली नाही. रोखकिर्दच्या उभ्या आडव्या बेरजेत तफावत असल्याने भरणा रक्कम कमी वा जास्त असू शकते याबाबत सविस्तर खातरजमा करून नोंदी व बेरजा तपासून त्यानुसार अनुपालन अहवाल प्रशासकीय कार्यवाहीअंती सादर करावा.

**परिच्छेद क्र.२१ : सन २००६-०७ ते सन २०११-१२ या कालावधीत वॉर्ड - ब कार्यालयात जमा झालेला मालमत्ता कर, पाणीपट्टी कर रकमांचा जास्त भरणा करणे बाबत. (रक्कम रू. ७,१४,०७५/-)**

वॉर्ड - ब कार्यालयाच्या लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता कर, पाणीपट्टी करांच्या, रकमांच्या नोंदी रोखकिर्द मध्ये तपासल्या असता खालील विवरणात नमूद केल्याप्रमाणे जास्त रकमेचा भरणा वॉर्ड कार्यालयातर्फे झालेला आहे. वॉर्ड कार्यालयास लेखापरीक्षणा दरम्यान स्वतंत्रपणे जास्त भरणाबाबतचे सविस्तर विवरणाचे अर्धसमास देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | अर्धसमास पत्र क्र. | संदर्भ वर्ष (सन) | वसूली शिर्ष | जास्त भरणा रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३६ | २००८-०९ | मालमत्ता कर | ३२,४८०/- | |
| २ | ३७ | २००९-१० | मालमत्ता कर | ८,४६३/- | |
| ३ | ३८ | २०१०-११ | मालमत्ता कर | १,२४,४७९/- | |
| ४ | ३९ | २०११-१२ | मालमत्ता कर | २,३२,३११/- | |
| ५ | ३२ | २००८-०९ | पाणीपट्टी कर | ६,०५०/- | |
| ६ | ३३ | २००९-१० | पाणीपट्टी कर | १८,७००/- | |
| ७ | ३४ | २०१०-११ | पाणीपट्टी कर | २,३०,४३२/- | |
| ८ | ३५ | २०११-१२ | पाणीपट्टी कर | ६१,१६०/- | |
| | | | **एकूण** | **७,१४,०७५/-** | |

उपरोक्त प्रमाणे जास्त भरणा रकमेबाबत वॉर्ड कार्यालयाने लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. जास्त भरणा रक्कम संबंधिताने कोठून आणली ? याबाबत संबंधिता विरूध्द चौकशी प्रस्तावित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा.

**जप्त करावयाची रक्कम रू.७,१४,०७५/-**

**परिच्छेद क्र.२२ :सन २००६-०७ ते २०१२-१३ या आर्थिक वर्षातील वॉर्ड -ब कार्यालयाने विविध करापोटी स्वीकारलेले धनादेश न वटल्याबाबत.**

वॉर्ड - ब कार्यालयाने सन २००६-०७ ते २०१२-१३ या कालावधीतील धनादेशाद्वारे वसूल केलेल्या रकमेपैकी काही धनादेश वटलेले नाहीत. तसेच ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्याऐवजी दुस-याच नावाने धनादेश स्वीकारले आहेत. धनादेश न वटल्याने संबंधित संदर्भ वर्षात संबंधित व्यक्ती विरूध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट चे कलम १३८ नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच न वटलेल्या धनादेशाची रक्कम वसूल करण्यापूर्वी पुढील वर्षाच्या कराची रक्कम वसूल केलेली आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

मालमत्ता / पाणीपट्टी मागणी नोंद वहीत वसूल रकमेच्या नोंदी घेतांना रोख / धनादेश असा उल्लेख नाही. तसेच न वटलेल्या धनादेशाची नोंदही घेतलेली नाही. न वटलेल्या धनादेशाची वॉर्ड - ब कार्यालयाची वर्षनिहाय रक्कम पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | वर्ष | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | २००६-२००७ | ७९५०८/- |
| २ | २००७-२००८ | ६००९२/- |
| ३ | २००८-२००९ | ३८२५८/- |
| ४ | २००९-२०१० | १४५९२७/- |
| ५ | २०१०-२०११ | २९७५१८/- |
| ६ | २०११-२०१२ | ९९५९६५/- |
| ७ | २०१२-२०१३ | ९४२४२७/- |
| | एकूण | **२५,५९,६९५/-** |

उपरोक्त विवरणानुसार अर्धसमास पत्र क्र. ४० सोबत सविस्तर नोंदीचा तक्ता स्वतंत्रपणे दिलेला आहे. संबंधित व्यक्तींकडून न वटलेल्या धनादेशाची रक्कम दंडनिय व्याजासह वसूल करून तसा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. अहवाल अंतिम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

करिता विभागाने न वटलेल्या धनादेशाची रक्कम रू. **२५,५९,६९५**/- संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**वसूलीस पात्र रक्कम रू.२५,५९,६९५/-**

**परिच्छेद क्र.२३ : सन २००८-०९ व सन २००९-१० या वर्षातील मालमत्ता कराच्या पावती पुस्तकात रद्द केलेल्या पावत्यांच्या दोन्ही प्रती उपलब्ध नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान खालील मालमत्ता कराचे पावती पुस्तकात रद्द पावत्यांच्या प्रती उपलब्ध नाहीत. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| अ.क्र | वर्ष | पावती पुस्तक क्रमांक | पावती क्रमांक | पुस्तकात पावत्या उपलब्ध आहे / नाही. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००८-२००९ | २२११ | २२१०५५ | नाही | दोन्ही प्रती उपलब्ध नाही. |
| २ | २००९-२०१० | ०२ | २०० | एक | दुसरी प्रत नाही तसेच भांडार विभागाचे पावती रद्द केल्याचे प्रमाणपत्र नाही. |
| ३ | २००९-२०१० | १२ | ११३९ | नाही | दोन्ही प्रती उपलब्ध नाहीत. |

उपरोक्त पावत्यांबाबत खुलासा लेखापरीक्षण पथकास सादर करावा असे विभागास कळविण्यात आले होते. परंतू लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

विभागाने उपरोक्त पावत्यांच्या बाबत गंभीर दखल घेवून दोन्ही पावत्यांवरील रकमा वेगवेगळ्या आहेत की एकच आहेत याची खातरजमा करावी. उपरोक्त प्रकरणी महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंबंधी पावती पुस्तकांचे कस्टोडियन यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.२४ : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात कॅशबुक क्र.७, पान क्र.३१ वर एकूण बेरजेतून कोणताही संदर्भ न देता रू.१ लक्ष रक्कम वजा करून मनपा फंडात कमी भरणा करणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान सन २०१०-११ या आर्थिक वर्षात कॅशबुक क्र.७ मध्ये पान क्र.३१ वरील एकूण बेरीज रू.२,२४,९९३/- येते. त्यामधून रू.१,००,०००/- वजा करून रक्कम रू.१,२४,९९३/- दिनांक १२.११.२०१० रोजी भरणा केलेल्या रकमेत समाविष्ट केलेली आहे. रू.२,२४,९९३/- मधून रू.१,००,०००/- वजावटी बाबत संदर्भ दर्शविलेला नाही. तसेच कॅशबुक मधील पान क्र.३१ वर पावती पुस्तक क्र.४२७४ मधील पावती क्र.४२७३६७ रू.५०,०००/-, दिनांक १२.११.२०१०, पावती क्र. ४२७३६८ रू.३०,०००/- व पावती क्र.४२७३७०, रू.४१४००/- दिनांक १२.११.२०१० असे एकूण रू.१,२१,४००/- होते. तिन्ही पावत्या केंद्रीय सीमा शुल्क यांचे कार्यालयाचे नावे असून पावतीची रक्कम रोख स्वरूपात अदा केल्या आहेत. सदरील तिन्ही नोंदी रोखकिर्द मध्ये खोडलेल्या आहेत.

उपरोक्त कमी भरणा केलेली रक्कम रू.१,००,०००/- मनपा फंडात त्वरीत भरणा करण्यात यावी. तसेच कॅश बुक क्र.७ पान क्र.३१ वरील उपरोक्त ३ पावत्यांच्या रकमा खोडल्याबद्ल सविस्तर खुलासा सादर करावा असे कळविण्यात आले होते. परंतू अहवाल अंतिम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

विभागाने कमी भरणा केलेली रक्कम रू.१,००,०००/- मनपा फंडात भरणा करून इतर अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**वसूलीस पात्र रक्कम रू. १,००,०००/-**

**परिच्छेद क्र.२५ : पाणीपट्टी कराची मागणी मीटर रीडींग प्रमाणे खातेदारांकडून कमी वसूली होत असल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान पाणीपट्टी कराची मागणी मीटर रीडींग प्रमाणे होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

इंडीयन इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट मौलाना आझाद एज्युकेशन, एन-१२ सिडको औरंगाबाद यांना खाते क्र. ३०४३५ अन्वये ४छ Q चे व्यावसायिक नळ कनेक्शन दिलेले आहे. सदरील कनेक्शन कोणत्या वर्षापासून दिलेले आहे याचा उल्लेख मागणी नोंदवहीत नाही. तसेच सदरील नळ कनेक्शनला पाणीपट्टी मागणी मीटर रिडींग प्रमाणे असल्याबाबत उल्लेख आहे. परंतू मीटर क्रमांकाचा उल्लेख मागणी नोंदवहीत तसेच देयकात सुध्दा नाही. मागणी नोंदवहीत सन १९९४ ते दि. ३१.३.२००७ पर्यंत रू.९,६८,८७५/- मागणी नोंदवून त्यातून भरणा केलेली रक्कम रू.२,५१,४००/- वजा केलेले आहेत. उर्वरीत रू.७,१७,४७५/- वसूल केल्याच्या

नोंदी आहेत. परंतू उपरोक्त मागणी किती मीटर रीडींगची आहे याबाबत उल्लेख नाही. तद्नंतर सन २००७-०८ मध्ये पूर्ण वर्षात ३९१८ मीटर रीडींग दर्शविली आहे. परंतू मागील रीडींग किती, चालू रीडींग किती याबाबतचा खुलासा केलेला नाही.

तसेच दि.२५.२.२०१२ ते २३.१०.२०१२ या कालावधीतील मीटर रीडींग ४७३३ चे देयक रू.५५/- प्रमाणे रू.२,६०,३१५/- येते. प्रत्यक्षात रू.२,४५,४५१/- वसूल करून रू.१४,८६४/- कमी वसूल केलेले आहे.

संबंधितांकडून पाणीपट्टी वसूल करण्यात येत असलेल्या मीटरच्या फॅक्टरचा उल्लेख केलेला नसल्यामुळे वसूल रकमांबाबत खात्री करता आलेली नाही.

विभागाने संबंधितांकडून रू.१४,८६४/- वसूल करून मनपा फंडात भरणा करावा. भविष्यात मिटिर रिडींगच्या ग्राहकास देयक देतांना सर्व नोंदीचा उल्लेख देयकात करावा. इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**वसूलीस पात्र रक्कम रू. १४,८६४/-**

**परिच्छेद क्र.२६ : पाणीपट्टी रकमेचा कमी भरणा करणे बाबत.**

पाणीपट्टी मागणी नोंदवही M-२ पान क्र.११ वरील नळ खातेदार शेषराव माधवराव जाधव, प्लॉट क्र.२४ खाते क्र.८७७, साफल्यनगर यांचेकडूनदि.१.७.२०१३ रोजी पावती क्र. F-१०४/ २१२९० अन्वयेरू.४३००/- वसूल करून संबंधितांना मार्च २०१३ पर्यंतची पावती दिलेली आहे. प्रत्यक्षात मागणी नोंदवहीत संबंधितांकडे मार्च -२०१३ पर्यंत रू.७९००/- थकबाकी असतांना रू.४३००/- वसूल करून रू.३६००/- कमी भरणा झालेला आहे.

विभागाने संबंधितांकडून रू.३६००/- वसूल करून मनपा फंडात भरणा करावा तसेच संबंधितांना दिलेल्या पावतीवर दर्शविलेल्या कालावधीबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**वसूलीस पात्र रक्कम रू. ३६००/-**

**परिच्छेद क्र.२७ : पाणीपट्टी कराची मागणी मीटर रीडींग प्रमाणे खातेदारांकडून कमी वसूली होत असल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान चेअरमन मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्टचे हॉटेल ताज रेसीडेन्सी एन-१२, सिडको औरंगाबाद यांना ६" Q चे व्यावसायिक नळ कनेक्शन दिलेले आहे. संबंधितांना दिलेले नळ कनेक्शन वर्ष मागणी नोंदवहीत नोंदविलेले नाही. नळास लावलेले मीटरचा क्रमांक सुध्दा नोंदविला नाही.मीटर दिलेले असतांना Avarge Bill दिलेले आहे. Avarage Bill देतांना कमी बील दिलेले आहे. दिलेले बील व द्यावयास हवे असलेली सरासरी बील यात मोठी तफावत आढळते, त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच मीटर रीडींग ५५४३ नंतर पुनश्च मीटर रीडींग १०.५० दर्शविली जी की संशयास्पद वाटते. मीटर खराब झालेले असल्यास बदलणे गरजेचे वाटते. मीटर रीडींग पुन्हा मागील आकडे दर्शवित असेल तर मीटर नादुरूस्त असल्याची खातरजमा करणे आवश्यक आहे. दिनांक ५.१२.२००८ ते दिनांक ३१.१२.२०१२ पर्यंत देण्यात आलेले देयक १०.०८ फॅक्टर ऐवजी १०.०० फॅक्टर ने दिले. फॅक्टर बाबतचा उल्लेख मागणी नोंदवहीत नाही.

Avarge Bill व कमी फॅक्टर दर्शवून खालील प्रमाणे कमी रक्कम संबंधितांकडून वसूल केली. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | देयकाचा कालावधी | मीटर रीडींग | प्रत्यक्ष बील रक्कम | भरणा रक्कम | फरक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२.१२.२००५ ४.१२.२००६ | Avarge | ३२९५५२/- | ११०३०९/- | २१९२४३/- | |
| २ | ५.१२.२००६ ते ४.१२.२००७ | Avarge | ३२९५५२/- | ११०३०९/- | २१९२४३/- | |
| ३ | ५.१२.२००७ ते ४.१२.२००८ | Avarge | ३२९५५२/- | ११०३०९/- | २१९२४३/- | |
| ४ | ५.१२.२००८ ते १०.११.२००९ | ८८५.५० १०.०८ फॅक्टर ऐवजी १० फॅक्टरने आकारणी | ३४८१०८/- | ३४५३४५/- | २७६३/- | |
| ५ | ११.११.२००९ ते ३०.९.२०१० | ९६९.०० | ३८०९३३/- | ३७७९१०/- | ३०२३/- | |
| ६ | १.१०.२०१० ते २३.११.२०११ | ११६३ | ४५७१९८/- | ४५३५७०/- | ३६२८/- | |
| ७ | २३.११.२०११ ते २४.२.२०१२ | ३०७ ३०७ | १२०६८७/- | ११९७३०/- | ९५७/- | |
| ८ | २५.२.२०१२ ते २३.१०.२०१२ रू.५५ दराप्रमाणे | ५३४ ५३४ | २९६०४९/- | २७८३०९/- | १७७४०/- | |
| ९ | २३.१०.२०१२ ते ३१.१२.२०१२ | १११ १११ | ६१५३८/- | ६१०५०/- | ४८८/- | |
| | | | | | **६,८६,३२८/-** | |

विभागाने उपरोक्त नमूद प्रमाणे रू.६,८६,३२८/-संबंधिताकडून वसूल करून मनपा फंडात भरणा करावा. देयक देतांना झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**वसूलीस पात्र रक्कम रू. ६,८६,३२८/-**

**परिच्छेद क्र.२८ : पाणीपट्टी माफींच्या प्रकरणातील कार्यकारी अभियंता (ब/क) यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी बाबत.**

सन २०१० ते २०१३ दरम्यान कार्यकारी अभियंता (ब / क) यांनी दिलेले पाणीपट्टी माफीचे प्रकरणांत ज्या तारखेपासून पाणीपट्टी माफी दिली त्या तारखेपूर्वीची संबंधित नळ खाते धारकांकडील थकबाकी वसूल होणे आवश्यक होते. परंतू वॉर्ड कार्यालयातील अभिलेखे तपासली असता थकबाकी वसूली अत्यल्प झालेली आहे. अर्धसमास पत्र क्र. ४९ सोबत दिलेल्या तक्त्यानुसार नाममात्र प्रकरणे पडताळली असून त्यात थकीत रक्कम दर्शविलेली

आहे. जी वसूलीस पात्र आहे. त्याचप्रमाणे काही अभिलेखे उपलब्ध करून देण्यास विभागाने असमर्थता दर्शविलेली आहे.

तसेच सदर प्रकरणी पाणीपट्टी माफी देतांना करण्यात आलेला पंचनामा हा वर्तमानकाळातील नसून भूतकाळातील तारखा दर्शवून त्यावेळेपासून नळ बंद असा शेरा देवून तयार केलेला आहे. जी बाब आक्षेपार्ह आहे.

त्याचप्रमाणे यासारखी इतरही प्रकरणे यापूर्वीच जल अदालती मध्ये अंतीम केलेली आहेत. त्यांचे अभिलेखे लेखापरीक्षण पथकास प्राप्त झालेली नाहीत.

विभागास अर्धसमास पत्र क्र.४९ अन्वये नाममात्र तपासलेल्या प्रकरणांची माहिती दिलेली असून त्यानुसार थकीत रक्कम वसूल करून मनपा फंडात भरणा करावी. तसेच अशा प्रकारचे इतरही प्रकरणांचा आढावा घेण्यात यावा. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**परिच्छेद क्र.२९ : वॉर्ड -ब कार्यालया अंतर्गत असलेल्या नळ खातेधारकांच्या मागणी नोंद वहीतील मागणी रकमेच्या तफावती बाबत.**

उक्त संदर्भिय वर्षातील नळ खातेधारकाचे नाममात्र मागणी नोंदवहीतील नोंदी तपासल्या असता सन २००८-०९ मध्ये मागील नोंदवहीतील नोंदी लिहितांना तफावती आढळल्या आहेत.

तसेच काही नळधारकाचे नळ बंद असा शेरा टाकून मागणी नोंदविलेली नाही. नळ बंद बाबत मागणी नोंदवहीत आदेश क्रमांक दिलेला नाही.

त्याचप्रमाणे ब-याच नळधारकांचे काही कालावधी करीता नळ बंद दर्शवून पुनश्च त्याच खाते क्रमांकावर नळाचे पुर्नजोडणी दर्शविलेली आहे. जर एकदा नळ बंद झालेला असेल तर त्यास पुनश्च नळ कनेक्शन करण्याची मान्यता देतांना नविन खाते क्रमांक देणे अभिप्रेत आहे. परंतू तशी कार्यवाही झालेली नाही. संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत. अर्धसमास पत्र क्र. ५० सोबत तपासलेल्या नोंदीचा तक्ता देण्यात आलेला असून त्या नोंदी नाममात्र आहेत. विभागाने त्यांचेकडील पाणीपट्टी मागणी नोंदवहीची सविस्तर तपासणी करून, आवश्यक ठिकाणी दुरूस्त्या करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतू अहवाल अंतिम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

विभागाने उपरोक्त नुसार वॉर्ड - ब अंतर्गत येणारे नळ धारकांच्या खातेदारांची मागणी वहीतील नोंदी तपासून आवश्यक त्या ठिकाणी दुरूस्त्या करून थकित रकमांच्या नोंदी घेवून थकबाकी रकमा वसूल करून मनपा फंडात भरणा करावा व त्याबाबतचे सविस्तर अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३० : वॉर्ड - ब कार्यालया अंतर्गत असलेल्या व्यावसायिक नळ कनेक्शनच्या पाणीपट्टी मागणी बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड - ब कार्यालयात उपलब्ध असलेले व्यावसायिक नळ कनेक्शनचे मागणी रजिस्टर क्र.१४९ मध्ये सन २००७-०८ पर्यंत थकबाकी व सन २००८-०९ ची मागणी, मागणी रजिस्टर क्र.३४/१, सोबत तपासणी केली असता काही त्रुटी निदर्शनास आल्या आहेत. याबाबतचे विवरण अर्धसमास पत्र क्र. ५१ सोबत स्वतंत्रपणे नमूद केले आहे.

तसेच चालू वर्षाचे मागणी रजिस्टर क्र. १४९ मधील उर्वरीत नोंदी तपासण्यासाठी पूर्वीचे मागणी रजिस्टर क्र.३४/२ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेले नाही.

अर्धसमासात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करून तसेच उपलब्ध नसलेले मागणी रजिस्टर क्र.३४/२ वॉर्ड कार्यालयात शोधून त्यातील चालू मागणी रजिस्टरशी नोंदी पडताळून असलेल्या त्रुटींचा निपटारा करावा. विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी पाणीपट्टी मागणी रजिस्टर ३४/२ उपलब्ध ठेवावे. तसेच उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे लेखापरीक्षणातील त्रुटींचा निपटारा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३१ : मे.झेमन स्टिल रि-रोलिंग मिल्स, प्लॉट नं. F-२४/२, सन २००१-०२ ते २००९-१० पर्यंतचा थकित मालमत्ता कर एकूण रू.१,५१,५१२/- भरणा करून न घेता - त्यापुढील कालावधीच्या कराची वसूली करून घेणे बाबत.**

**(NRV - २५३३७ आदेश क्र.३३५०/ २०००-०१ दि. १३.०२.२००१ )**

लेखापरीक्षणा दरम्यान एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत प्लॉट नं. एफ - २४/ २, मे-झेमन स्टिल रि-रोलिंग मिल्स, यांचे मालमत्ता मागणी रजिस्टर क्र.३ पान क्र.१२४ व १२५ वरील नोंदी प्रमाणे सन २००१-०२ ते सन २००९-२०१० पर्यंत एकूण रक्कम रू. १,५१,५१२/- इतका मालमत्ता कर थकित असतांना तो वसूल न करता, त्या पुढील सन २०१०-११ या वर्षाचे मागणी रजि.क्र.३ पान क्र.१५२, १५३ वर सन २०१०-२०११ ते सन २०११-१२ पर्यंतचा मालमत्ता कर - नविन NRV प्रमाणे भरणा केलेला आहे.

विभागाने थकित मालमत्ता कराची रक्कम रू.१,५१,५१२/- संबंधितांकडून वसूल करून मनपा फंडात भरणा करावी. थकबाकीची रक्कम वसूल न करता पुढील आर्थिक वर्षाचा कर वसूल करणे या बाबीबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावा.

**वसूलीस पात्र रक्कम रू.१,५१,५१२/-**

**परिच्छेद क्र.३२ : मागणी नोंद वहीत करयोग्य मूल्य न नोंदविणे, कर योग्य मुल्यानुसार देयक अदायगी न करणे, मालमत्तेत नविन नांव समाविष्ट करणे इत्यादी अनियमिततेबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड कार्यालयाने संगणक विभागास पाठविलेल्या पत्र क्र. वॉर्ड ब/२०१३/५३१/ दिनांक २०.२.२०१३ तपासली असतांना सदरील मालमत्तेचा क्र. BOO३६२२३ असा आहे. मालमत्ता रजिस्टर मध्ये सैय्यद कादर सैय्यद शब्बीर असे नांव आहे. परंतू दुरूस्ती मध्ये शेख फेरोज शेख शफी व सैय्यद कादर सैयद शब्बीर असे नांव असणे बाबत समावेश आहे. पहिल्या नावामध्ये नविन एक नांव कोणतेही कार्यालयीन आदेश नसतांना समाविष्ट केलेले आहेत. त्याबाबत आदेश लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाहीत.

तसेच सदरील व्यावसायिक मालमत्तेस कर आकारणी संदर्भ क्र. ३१४०६/२००६-०७ अन्वये कर आकारणी केली परंतू करयोग्य मूल्य किती याचा उल्लेख मागणी रजिस्टरवर नाही. याच मालमत्तेस कार्यालयीन संदर्भ क्र. Ref.Spl/६५२०/३१४०६/२००६-०७ अन्वये

रू.२०८९/- करयोग्य मूल्य आकारलेले आहे. पूर्वीचे कर आकारणी असलेले करयोग्य मूल्यांची कागदपत्रे पहावयास मिळाली नाहीत.

त्याचप्रमाणे सदरील मालमत्तेस दिलेल्या बील क्र. १९५१०० मध्ये कर योग्य मूल्य रू.२०२१ /- दर्शविलेले आहे. उपलब्ध नोंदीमध्ये करयोग्य मूल्य २०८९/- असे असून रू.६८/- ने कमी कर योग्य मूल्य दर्शवून बील निर्गमित केलेले आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

प्रकरणांत विभागाने शहानिशा करून, महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन दर्शविणेबाबत कळविण्यात आले होते. अहवाल अंतिम होईपर्यंत अनुपालन दर्शविलेले नाही.

विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून मनपा फंडात भरणा करावे. तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३३ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम -१९४९ चे अनुसूची -ड मधील प्रकरण ८ चे कलम ४१ नुसार कार्यवाही केलेली नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, मालमत्ता कराच्या थकीत रकमांवर विलंबाकार आकारल्या जात आहे. विलंबाकार १०% आकारला जात असून वर्षाच्या शेवटच्या शिल्लक रकमेवर आकारलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची -ड मधील प्रकरण -ड चे कलम ४१ नुसार कार्यवाही केल्याचे आढळून आलेले नाही. याबाबत विभागाने लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

विभागाने मालमत्ता धारकांना आकारलेला विलंब आकार हा शासनाच्या विविध करावरसुध्दा आकारलेला आहे काय ? असल्यास शासन तिजोरीत विलंब आकाराची रक्कम जमा केली काय ? याबाबत सविस्तर अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३४ : मे.एम्पायर मॉल प्रा.लि.एम.आय.डी.सी.चिकलठाणा यांचेकडील मालमत्ता कराबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, एम.आय.डी.सी. भागातील मागणी नोंदवहीतील पान क्र.१८८ वर मे.एम्पायर मॉल प्रा.लि.यांच्या नावाचा उल्लेख आहे. सदरील मालमत्तेस कर आकारणी संदर्भ क्र. ९९९/२०१०-११, दिनांक २०.७.२०१० व कर आकारणी संदर्भ क्र. १६४१/२०१३-१४, दिनांक १.४.२०१२ अन्वये कर आकारणी केलेली आहे. संबंधित रजिस्टरवरील नोंदीनुसार करयोग्य मूल्य १,३२,२२,०८४/- दर्शविलेले आहे. तसेच मालमत्ता रजिस्टरमध्ये कर वसूली बाबतच्या नोंदी उपलब्ध झालेल्या नाहीत.

विभागाने मे.एम्पायर मॉल्स यांचेकडील थकीत कराच्या नोंदी नुसार कराच्या वसूलीची कार्यवाही करावी. कर वसूलीअंती मनपा फंडात भरणा करावा. कर वसूली केली किंवा नाही याबाबत संबंधित कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३५ : मालमत्ता मागणी रजिस्टर मधील नोंदी पुढील नविन मालमत्ता मागणी रजिस्टर मध्ये व संगणक नोंद न होणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता कर मागणी रजिस्टर तपासणी करीत असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. श्री.धमणे दिलीपराव, सुरेवाडी १५५/P (NRV- ९१८०) यांचे मालमत्ता मागणी रजि. क्र.१९/७ पृ.क्र.१९९६-९७ ची नोंद पुढील नविन मागणी रजिस्टर क्र. १९/७ पृ.क्र. १९९४-९५ घेतलेली नाही. तसेच त्यापुढील नविन मागणी रजिस्टर मध्येही मालमत्तांची नोंद घेतली नाही, संबंधितांकडे सन २००८-०९ पर्यंत एकूण रू.३४,२९९/- कर थकित आहे.

२. मे.शांताराम रिसेलर्स एम.आय.डी.सी. F-२४, NRV- ४५९२२, मालमत्ता मागणी रजि.क्र.२ पृ.क्र.९७-९८ (जूने) ची पुढील मालमत्ता मागणी रजिस्टर क्र. (सन २००५-०६) मध्ये नोंद घेतलेली नाही. तसेच सदर मालमत्तांची नोंद सन २००६ ते २०१३-१४ संगणकामध्ये ही घेतलेली नाही, संबंधितांकडे सन १९८९ ते २००५-०६ पर्यंत एकूण रू.४,१३,५८५/- इतकी रक्कम थकीत आहे. या बाबत मालमत्ताधारकास मागणी नोटीस / बिल तामील केलेले नाही.

मुद्या क्र. १ व २ ची एकूण थकीत मालमत्ता कर रू.४४७८८४/- इतका यांच्या नविन मागणी रजिस्टर मध्ये वेळोवेळी नोंदी न घेतल्याने मालमत्ता कर वसूल न होता थकित राहिला आहे. प्रकरणी वसूली बाबत महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम १९४९ नियम १२८ (१) प्रमाणे व वसूलीबाबत मागणी नोटीस नियम १२८ (२) अन्वये विभागाने वेळोवेळी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. विभागाने प्रकरण प्रत्यक्ष तपासून खातरजमा करून रक्कम वसूलीसह नोंदी नियमित घेवून तसा कारणासह खुलासा सादर करावा असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अहवाल अंतिम होईपर्यंत विभागाने अनुपालन दर्शविलेले नाही.

विभागाने थकित मालमत्ता कराची रक्कम रू.४,४७,८८४/- संबंधितांकडून वसूल करून मनपा फंडात वसूल रकमेचा भरणा करावा तसेच थकित मागणी पुढील आर्थिक वर्षात न नोंदविणे याबाबत संबंधिताविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**वसूलीस पात्र रक्कम रू.४,४७,८८४/-**

**परिच्छेद क्र.३६ : चूकीचा कर आकारणी संदर्भ नोंदविणे तसेच खरेदी खत दिनांकानंतर तब्बल ७ वर्षानंतर कर आकारणी करणे बाबत.**

१) लेखापरीक्षणा दरम्यान रोजाबाग भागातील मालमत्ता नोंदवही क्र.२३/२ पान क्र.१३ तपासली असता घर क्रमांक ८-२७-१०४/१ या मालमत्तेचा संगणकीय क्र. B००३६६२९ असा आहे. मालमत्ता धारकाचे नांव शे.जुबेर शे.सुभान असे असून कर आकारणी संदर्भ क्र.८३०/१०-११ व कर योग्य मूल्य रू.३६७/- आहे.

२. उपरोक्त कर आकारणी संदर्भ तपासला असता प्राप्त अभिलेख्यात कर आकारणी संदर्भ ८३०/२०१०-११ वर श्री.साहेबराव किसनराव घुगे, प्लॉट क्र.३, सुरेवाडी, हर्सूल यांचे नांव आहे. करयोग्य मूल्य रू.१३३९/- आहे. सदरील मालमत्तेचे खरेदीखत दि.८.१२.२००३ रोजी झालेले आहे.

वरील प्रमाणे दोन्ही बाबी संशयास्पद आहेत. मुद्या क्र.१ व २ वरील कर आकारणी संदर्भ एकच आहेत. मुद्या क्र.२ मधील मालमत्ताचे खरेदीखत दिनांक ८.१२.२००३ रोजी झालेले आहे. कर आकारणी २०१०-११ मध्ये झालेली आहे.

विभागाने लेखापरीक्षण अंतिम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम १५० (अ) प्रमाणे ६ वर्षाच्या आंत कर आकारणी करणेची तरतूद आहे. त्यानुसार कर आकारणी करून मालमत्ता करास पात्र झाल्यापासून मालमत्ता कर आकारला गेला नसल्याबाबत व इतर अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून मालमत्ता कराची आकारणी करून थकित रक्कम वसूल करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३७ : करयोग्य मूल्य कमी दर्शविल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान मालक प्रल्हाद दौलतराव वाघ, मोहल्ला मयुर पार्क मालमत्ता क्रमांक A-३-०/२ B०० २०/२४ करयोग्य मूल्य रू.२३४४ कर आकारणी संदर्भ ६८८-१७०२ दिनांक १.१०.२००० मालमत्ता रजिस्टर क्रमांक २६/२ पान क्रमांक २३३ वर नोंद दर्शविलेली आहे.

परंतू संबंधिताचे खरेदीखत क्रमांक ४६४४ दिनांक १४.९.२००९ पाहिले असता चटई क्षेत्रफळ ६०.९० चौ.मी. (६५५ चौ.स्क्वे फूट) असून त्यानुसार करयोग्य मूल्य खालील प्रमाणे दर्शविणे आवश्यक होते.

| | | |
|---|---|---|
| ६०.९० x ९.५० x १२ | = | ६९४३ |
| १०% बजावट | = | ६९४ |
| करयोग्य मूल्य | = | ६२४९ |

म्हणजेच करयोग्य मूल्य ६२४९ - २३४४ = ३९०५/- ने कमी दर्शविलेले आहे. असेच मालमत्ता क्रमांक A-३ - ०/, A-३-०/३, A-३-०/४, चे करयोग्य मूल्य दर्शविलेले आहे.

उपरोक्त मुद्याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. विभागाने सदरील प्रकरणी प्रत्यक्ष जागेवरील मोजमापाचे मुल्यांकन करून दुरूस्ती आदेश निर्गमित करावेत. तसेच फरकाची रक्कम वसूल करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३८ : कर आकारणी संदर्भ वेगवेगळा असतांना मालमत्ता नोंदवही ८ पान क्र.८० वरील नोंद रद्य करणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, आर.पी.शेवाळे, एन-८ ५/१ सेवानगर, मालमत्ता संगणकीय क्र. B००२५९८० असून कर आकारणी संदर्भ २०५३६, दिनांक १.४.२००६ अन्वये कर आकारणी मूल्य रू.१४७८५/- आहे. या नोंदी मालमत्ता नोंदवही ८/०२ वर असून त्यामध्ये करमूल्य निर्धारण अधिकारी यांचे विना जावक क्रमांकाची खास नोटीस क्र. Ref ८५७५/३२७३१/२००६-०७ अन्वये खास नोटीस करआकारणी संदर्भ क्र.३२७३१ बाबत आहे. परंतू वॉर्ड कार्यालयाने सदरील नोटीस कर आकारणी संदर्भ क्र.२०५३६ वर डकवून कर योग्य मूल्य रू.१४७८५/- चे ऐवजी रू.११३५८/- दर्शविली.

तसेच वॉर्ड कार्यालयाने पत्र क्र.मनपा/वॉर्ड-ब/२०१३/२३२, दिनांक २२.१.२०१३ अन्वये मालमत्तेची संगणकीय नोंद करतांना मालमत्ता नोंदवही पान क्र. ८/०२ व ८/८० वरील नोंदी एकच दर्शवून वॉर्ड अधिकारी यांच्या स्वाक्षरीने मालमत्ता नोंदवही पान ८/८० वरील नोंद रद्द केली आहे.

प्रकरणांत कर आकारणी संदर्भ वेगवेगळे असूनही सक्षम प्राधिकरणाच्या मान्यता विना मालमत्ता नोंदवही ८/०२ कायम ठेवून क्र.८/८० वरील नोंद रद्द बाबत शहानिशा करून अहवाल द्यावा. तसेच कर आकारणी संदर्भ क्र.३२७३१ मध्ये कर मूल्य निर्धारण अधिकारी यांनी दुरूस्तीची खास नोटीस विना जावक क्रमांकाची कर आकारणी संदर्भ क्र.२०५३६ मध्ये दर्शविल्याबाबत प्रत्यक्ष खातरजमा करावी.

उपरोक्त अनियमिततेबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. विभागाने दोन कर आकारणी संदर्भाबाबत प्रत्यक्ष तपासणी करावी सक्षम प्राधिकरणाचे मान्यता विना दोन कर आकारणी संदर्भातील एक नोंद रद्द केल्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी . वास्तविकतेबाबतची खात्री करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३९ : व्यावसायिक मालमत्तेस निवासेत्तर दर दर्शविणेबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड- ब कार्यालयाने संगणक विभागास पाठविलेल्या दुरूस्ती पत्र क्र.मनपा/ वॉर्डब/२०१३/५९३ दिनांक २०.२.२०१३ अन्वये देण्यात आलेले आहे. पत्रात शमीम बी शे.निजाम शॉप नं.७ चिश्तीया कॉलनी मालमत्ता क्र. B००३६६०७ यांचे मालमत्तेचे कर आकारणी संदर्भ क्र. ६२६७ दिनांक १.३.२००२ असून कर योग्य मूल्य रू.३७३७/- आहे. कर आकारणी संचिका, आदेश, नामांतर आदेश संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत.

उपरोक्त क्रमांकाच्या पत्रान्वये झालेल्या दुरूस्ती मध्ये मालमत्ता वापर व्यावसायीक असतांना निवासेत्तर दर्शविला आहे.

प्रकरणांत शहानिशा करून व्यावसायिक असल्याचे अभिलेख्यात दुरूस्ती करून अनुपालन दर्शविणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि विभागाने अहवाल अंतिम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही.

विभागाने संबंधित मालमत्तेच्या वापराबाबत प्रत्यक्ष शहानिशा करावी, वापरात बदलाबाबत अभिलेख्यात दुरूस्ती करतांना सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४० : मालमत्ता कराची फेर आकारणी केल्यानंतर संगणकात नोंद करतांना वाढीव कर योग्य मूल्य न नोंदविणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, राजेंद्र कोळंबे, एन-९ एम-२ १४४/२ या मालमत्तेचा संगणक क्र. B०००१३०३ असा असून मालमत्ता नोंदवही क्र. २०/३६० वर नोंद घेण्यात आलेली आहे. सदरील मालमत्तेचे कर योग्य मूल्य रू.१९६०/- कर आकारणी संदर्भ क्र. ९३६० दिनांक १.४.२००६ असा आहे. याच मालमत्तेस कर आकारणी मूल्य रू.४१२६/- दिनांक १.४.२०१२ कर आकारणी संदर्भ क्र. ९०४५ ने फेर मूल्यांकन केलेले आहे. परंतू वॉर्ड कार्यालयाने संगणक विभागात संगणकीय नोंदीबाबत दुरूस्तीसाठी पाठविलेले पत्र क्र.मनपा

/वॉर्ड-ब /२०१३/७३६ दिनांक १.३.२०१३ मध्ये वाढीव कर आकारणी मूल्य दर्शविले नाही. कर आकारणी बाबतच्या संचिका, आदेश पाहावयास मिळाले नाही. त्यामुळे वाढीव कर योग्य मूल्य कोणत्या तारखेपासून लागू आहे याची खात्री करता आली नाही.

प्रकरणांत शहानिशा करून, खातरजमा करून संबंधितांच्या फेर आकारणी नुसार कर योग्य मूल्याचे संगणकीय नोंद करून फरकाची रक्कम महानगरपालिका फंडात भरणा करावा. तसेच विभागाने उपरोक्त नुसार कार्यवाही करून संगणकात चूकीची नोंद केल्यामुळे महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.४१ : मालमत्ता कराची रक्कम कमी वसूल करणे बाबत.**

वॉर्ड - ब कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान श्रीमती पाटील विद्या मधुकर यांचे नांव मालमत्ता मागणी रजिस्टर क्र. (जुने) १९/१ पान क्र.२५१ P.No.३०, लेखापरीक्षण सोसायटी स.न.१७९, मा.स.क्र. BOOO८४२८ यांच्या नविन कर योग्य मूल्यान्वये सन २००१ ते सन २००८ पर्यंतची एकूण थकबाकी रक्कम रू.१६७३३/- चा भरणा करण्यात आलेला आहे. परंतू पुढील मालमत्ता मागणी रजिस्टर क्र.१९/१ पान क्र.२५८,२५९ वर सन २००८ ते सन २०१३ पर्यंतची एकूण थकबाकी रक्कम रू.१३०९० पैकी सन २०१२-१३ पर्यंत रक्कम रू.९७९३/- चा भरणा केलेला आहे. रक्कम रू.३२९७/- चा भरणा न करताच सन २०१२-१३ पर्यंतचा भरणा केलेला असे लिहीण्यात आलेले आहे.

प्रकरणांत रू.३२९७/- चा कमी भरणा का करून घेतला याचा खुलासा करावा. रू.३२९७ /- संबंधितांकडून वसूल करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४२ : मालमत्ता नोंदवहीत एकाच पानावर दोन कर आकारणी संदर्भ नोंदविलेले असून त्यांचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, एन.टी.आसवार एन-६, LIG-४८५ अविष्कार कॉलनी मालमत्ता संगणक क्र. BOO३६६३५ ची नोंद मालमत्ता मागणी नोंदवही पान क्र.३ /१७७ वर घेण्यात आलेली आहे. मालमत्तेचा वापर निवासेत्तर दर्शविला आहे. नोंदवहीत निवासी + व्यावसायीक अशी विभागणी केलेली आहे. कर आकारणी संदर्भ क्र. ३१४०३ आणि क्र.३८३० असे दोन संदर्भ क्रमांक नोंदविलेले आहेत. करयोग्य मूल्य रू.३११८/- ऐवजी रू.४२९४/- नोंदविलेले आहे.

प्रकरणी दोन कर आकारणी संदर्भाबाबत खुलासा तथा अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे योग्य कर आकारणीची खात्री झाली नाही. निवासी + व्यावसायीक विभागणी प्रत्यक्ष वापरातील क्षेत्र नमूद नाही.

विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत उपरोक्त प्रकरणी अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नसल्याने लेखापरीक्षण करता आले नाही. याबाबत संबंधितांनी पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवावेत तसेच संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.४३ : संगणकीकरण करतांना करयोग्य मूल्य कमी केल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, चंद्रशेखर वसंत अप्पा कोठाळे / शिवलींग वसंत अप्पा कोठाळे, प्लॉट क्र.४ व ५, जाधववाडी या मालमत्तेचा संगणकीय

क्र.B00३६६४३ असा आहे. मागणी नोंदवहीत कर आकारणी संदर्भ क्र.१४५२३९ /२००४-०५ असून करयोग्य मूल्य रू.९४८५/- निवासी + रू.६६००/- व्यावसायिक एकूण रू. १६०८५/- असे होते. या कर योग्य मूल्यात रू.९४८५/- निवासी + रू. १३८७९/- व्यावसायीक एकूण रू.२३३६४/- करण्यात आले. त्यानुसार सन २०१२-१३ मध्ये मालमत्ता कर वसूल केला. तद्नंतर वॉर्ड -ब कार्यालयाने संगणकीय नोंद घेतांना जा.क्र.२०१३/६७१ दिनांक २५.२.२०१३ अन्वये कर योग्य मूल्य रू.५५४८/- निवासी + रू.१३११४/- व्यावसायीक करण्याबाबत पत्र संगणक कक्ष प्रमुख यांना दिलेले आहे.

प्रकरणांत सदरील मालमत्तेस प्रथम दिनांक १.४.२००४ पासून केलेली कर आकारणी तसेच दि.१.४.२०१२ पासून केलेली कर आकारणी यांचे अभिलेखे लेखापरीक्षण विभागास प्राप्त झाले नाही. त्यामुळे केलेली कर आकारणीच्या योग्तेबाबत खात्री झाली नाही. संगणक कक्ष प्रमुख यांना मालमत्तेची नोंद पाठवितांना दिलेली माहिती चूकीची आहे. उपरोक्त दोन्ही रकमा करयोग्य मूल्याशी विसंगत आहे. मालमत्ता नोंदवहीत निवासी + व्यावसायीक क्षेत्राचा उल्लेख नाही.

विभागाने उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे खातरजमा करावी. तद्नंतरच योग्य ती दुरूस्ती करून संबंधितांकडून रक्कम भरणा करून घेवून इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.४४ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची -ड प्रकरण ८ मधील तरतूदींचे पालन न करणे बाबत.**

विषयांकित प्ररकणी वॉर्ड - ब कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, भिमराव त्रिंबक हिवराळे, एन-९, जे-२/११ या मालमत्तेचा संगणक क्र.B00११८५७ आहे. मालमत्ता मागणी नोंदवही क्र.२२/३०२ वर कर आकारणी संदर्भ क्र.९४९२ नोंदविलेला आहे.कर योग्य मूल्य रू.११७९४/- आहे. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपआयुक्त सिडको / १७०२, दिनांक ७.१.२००८ अन्वये कर योग्य मूल्य रू.४९३६/- फेर आकारणी अंती कायम आहे.

प्रकरणांत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची -ड मधील प्रकरण ८ मध्ये नमूद तरतूदींचे पालन झालेले नाही.

विभागाने तपासणी करून अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. सदरील प्रकरणी तसेच या प्रकारच्या इतरही प्रकरणांत अधिनियमातील तरतूदीनुसार पुर्नमुल्यांकन करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.४५ : संगणकीकरणात मालमत्तेचे कर योग्य मूल्य कमी केल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, श्री.प्रकाश डोंगरे, एन-८, सी २-२ किर्ती हौसींग सोसायटी येथील मालमत्तेचा संगणकीय क्र.B00३६६३६ असा आहे. वॉर्ड कार्यालयाने पत्र क्र.मनपा/वॉर्ड ब/२०१३/७२० दिनांक २८.२.२०१३ अन्वये सदरील मालमत्तेची निवासी + व्यावसायीक कर योग्य मूल्य विभागणी केली. रू.९१४८/-+ रू.६७८३/- एकूण रक्कम रू.१५९३१/- ची दुरूस्ती केली आहे. मालमत्ता मागणी नोंदवहीत कर आकारणी संदर्भ क्र.२०१८२ अन्वये रू.१८८३५/- नोंदविलेले आहे.

प्रकरणांत कर आकारणी संदर्भ क्र.२०१८२ नुसार असलेल्या करयोग्य मूल्य रू.१८८३५/- प्रमाणे मीश्र मालमत्तेची निवासी + व्यावसायीक अशी विभागणी केलेली नाही.

तसेच विभागणी करतांना प्रत्यक्ष जागेवरील वापरानुसार विभागणी केली काय ? याबाबत अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षण पथकाची खात्री झालेली नाही. रू.२९०४/- कर योग्य मूल्य कमी केले याबाबत खुलासा व्हावा असे कळविण्यात आले होते. तथापि विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही.

प्रकरणांत उपरोक्त नुसार अभिलेखे उपलब्ध झालेले नसल्यामुळे करयोग्य मूल्य कमी करण्याचे कारण समजलेले नाही. याबाबत अधिनियमातील तरतूदीनुसार पुर्नमुल्यांकन करून कमी केलेल्या मुल्यांबाबतचा मालमत्ता कर संबंधितांकडून वसूल करावा व तो महानगरपालिका फंडात भरणा करावा. तसेच करयोग्य मूल्य कमी केल्याबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.४६ : सिडको भागातील मालमत्तांना दि.१.४.२००६ पासून मालमत्ता कर आकारणी झालेली असतांना काही मालमत्तांना दि.१.४.२००६ नतर मालमत्ता कर आकारणी केल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, रत्ना सतिष अत्तरदे, प्लॉट नं.७ भूखंड क्र.६/०७ पुनर्मा हाईट्स, एन-९, एम-२ या मालमत्तेस संगणक क्र. B००२२७८३ देण्यात आलेला आहे. कर आकारणी संदर्भ वि.क्र.२२१२/११, दिनांक ३.११.२०११ अन्वये दि.१.४.२०११ पासून करयोग्य मूल्य रू.१७२८/- निश्चीत केलेले आहे. सदरील नोंदी मालमत्ता नोंदवही पान क्र.२८/१३६ वर घेण्यात आलेली आहे. विशेष कक्ष कर आकारणी विभाग यांनी वॉर्ड कार्यालय - ब यांच्या कार्यकक्षेतील कराच्या आकारणीच्या संचिकेत उपरोक्त संदर्भाची संचिका पाठविलेली नाही.

प्रकरणांत सदरील मालमत्ता सिडको भागातील असल्यामुळे मालमत्ता कर दिनांक १.४.२००६ पासून आकारणे अभिप्रेत आहे. दिनांक १.४.२०११ पासून कर आकारणी केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास प्राप्त झालेले नसल्यामुळे केलेली कर आकारणी योग्य असल्याची खात्री झालेली नाही.

विभागाने उपरोक्त प्रकरणी खातरजमा करून सदरील मालमत्तेस दिनांक १.४.२००६ पासून कर आकारणी करून थकित कराची वसूली करावी तसेच दिनांक १.४.२०११ नंतर मालमत्ता कर आकारणीचे प्रयोजन काय होते याचा खुलासा करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.४७ : कर आकारणी अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नसल्यामुळे केलेली कर आकारणी योग्यते बाबत तपासणी करता न येणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, गीता पंडीत आस्तवार, मंगेश गॅस एजन्सी, प्लॉट क्र.२, एन-८, सिडको या मालमत्तेचा संगणक क्र.B००३६६५७ आहे. मालमत्ता नोंदवही क्र. ९/६८ वर नोंदी घेतल्या आहेत. कर आकारणी संदर्भ ५६३० असून करयोग्य मूल्य रू.७५८०६/- दिनांक १.४.२००६ पासून आकारणी केलेली आहे. तद्नंतर कर आकारणी संदर्भ क्र.३३३ व करयोग्य मूल्य रू.३६८३७०/- आकारण्यात आले. वाढीव कर दिनांक १.११.२००९ पासून आहे. सदरील मालमत्तेस प्रथम आकारलेला कर तद्नंतर वाढीव करांबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध नाहीत.

प्रकरणांत करयोग्य मूल्य रू.७५८०६/- दिनांक १.४.२००६ पासून व रू.२,६८,३७०/- कर योग्य मूल्य दिनांक १.११.२००९ पासून आकारणी केले. वाढीव कर आकारणी मूल्य

वाढीबाबत संचिका, आदेश पहावयास मिळालेले नाहीत. विभागाने सदरील प्रकरणी अनुपालन सादर केलेले नाही. दिनांक १.४.२००६ रोजीचे करयोग्य मूल्य व दिनांक १.११.२००९ रोजीचे करयोग्य मूल्य यात तफावत आहे. करयोग्य मूल्यात झालेली वाढ दिनांक १.४.२००६ पासून का लागू केली नाही या बाबींच्या खुलाशासह फरकाची रक्कम संबंधितांकडून वसूल करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.४८ : कर आकारणी खास नोटीसवर जावक क्रमांक व स्वाक्षरी नसतांना मालमत्ता नोंदवहीत नोंद घेवून कर आकारणी करणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, राजेंद्र अन्नदाते, एन-५ एफ सेक्टर प्लॉट नं.३६ चा संगणक मालमत्ता क्र. B००२७१५५ असा आहे. मालमत्ता मागणी नोंदवहीत कर आकारणी संदर्भ क्र.१५७/२००६-०७ असा असून कर योग्य मूल्य रू.४६७४२/- आहे. सदरील मालमत्तेस कर मूल्य निर्धारण अधिकारी यांची खास नोटीस क्र. Spl - ४९२ - १५७ - ०६-०७ -०१ दिनांक १९.५.२००९ अन्वये करयोग्य मूल्य रू.१०३९३/- निवासी + रू.७०३१/- व्यावसायिक एकूण रू.१७४२४/- नमूद आहे. सदरील खास नोटीस विना जावक क्रमांक व विना स्वाक्षरीची प्रत मालमत्ता नोंदवहीत डकवून मालमत्ता कराची वसूली केलेली आहे.

प्रकरणांत विना स्वाक्षरी आणि विना जावक क्रमांक असलेली खास नोटीस विधी ग्राह्य नसतांनाही त्या आधारे मालमत्ता कराची वसूली केली. याबाबत विभागाकडून खुलासा मागविण्यात आला होता. लेखापरीक्षण अंतिम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. अशा प्रकारची अनेक प्रकरणे वॉर्ड - ब कार्यालयात लेखापरीक्षणा दरम्यान निदर्शनास आलेली आहेत. नोटीस विधीग्राह्य नसतांना मालमत्ता कराची आकारणी करणे नियमबाह्य आहे. तरी विभागाने सविस्तर माहिती घेवून खातरजमा करून योग्यतेबाबत खुलासा सादर करून अशा प्रकारच्या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ४९ : मालमत्ता नोंदवहीत निवासी व व्यावसायिक वापरानुसार कर योग्य मूल्य न दर्शविता कराची वसूली करणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, पद्माकर नरहरराव मांडे, एन-८ डी १-१५ नूतन यशवंत हौसिंग सोसायटी मधील मालमत्तेची नोंद संगणक क्र.B००३६६३८ अन्वये घेण्यात आलेली आहे. मालमत्ता मागणी नोंदवही पान क्र.१/२८० वर घेण्यात आलेल्या नोंदीमध्ये कर आकारणी संदर्भ ११०९६ दिनांक १.४.२००६ दर्शवून कर योग्य मूल्य दर्शविलेले नाही. वॉर्ड कार्यालयाने पत्र क्र.मनपा/वॉर्डब/१८३५/दिनांक ३.१२.२००८ नुसार फेर आकारणी केली. फेर आकारणी ची संचिका, आदेश पहावयास मिळालेले नाहीत. सदरील मालमत्तेची संगणकीकरण करतांना वॉर्ड कार्यालयाने पत्र क्र. २०१३/७१९, दिनांक २८.२.२०१३ अन्वये रू.७५०४/- निवासी + रू.१५८८/- व्यावसायिक कर योग्य मूल्य दर्शविलेले आहे.

प्रकरणांत सदरील मालमत्तेस प्रथमतः दि.१.४.२००६ पासून आकारलेला मालमत्ता कराचे अभिलेखे उपलब्ध करून द्यावेत. वॉर्ड कार्यालयाने दि.३.१२.२००८ रोजी केलेल्या फेर करआकारणीचे अभिलेखे उपलब्ध करून द्यावेत. तसेच निवासी + व्यावसायीक कर योग्य मूल्य विभागणी प्रत्यक्ष वापरानुसार केलेली आहे, याबाबतचे ही अभिलेखे खुलाशासह लेखापरीक्षण विभागास सादर करण्या बाबत कळविण्यात आले होते. विभागाने लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत अभिलेखे सादर केलेले नाहीत.

विभागाने उपरोक्त प्रकरणी तसेच अशा प्रकारचे इतरही प्रकरणांत प्रत्यक्ष वापरानुसार निवासी व व्यावसायिक करयोग्य मूल्याची पडताळणी करून योग्यता तपासावी त्यानुसार लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ५० : कृषी उत्पन्न बाजार समिती नविन मोंढा जाधववाडी येथील मालमत्ता मागणी रजिस्टर मधील मालमत्ता कर वेगवेगळे असतांना एकच मालमत्ताधारकाचे नांवे एकत्रित केले बाबत.**

लेखापरीक्षण दरम्यान मालमत्ता कर मागणी रजिस्टर तपासणी करीत असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. एस.एम.दरक ॲण्ड सन्स, सुभाष शिवनारायण दरक या नावाने वेगवेगळे गाळे असतांना गाळा क्र.७५-७६, ९५-९६ अशा चार गाळ्यांची नोंदणी एकच मालमत्ता मागणी पान क्र. १५२-१५३, रजिस्टर क्र.३ मध्ये करण्यात आली. याबाबतचा कार्यालयीन आदेश तपासणीस प्राप्त झाला नसल्याने सदरील नोंदणी कोणत्या आदेशाआधारे करण्यात आली याचा बोध होत नाही. व त्याबाबतची संचिकाही उपलब्ध झाली नाही.

२. विजयकुमार रतनलाल पाटणी, कृषी उत्पन्न बाजार समिती मोंढा, जाधववाडी गाळा क्र.८३-८४, ८७-८८ मालमत्ता मागणी रजिस्टर क्र.३ पान क्र.१६८-१६९ वर चार गाळे एकत्रित केल्याचे दिसून आले. गाळे एकत्रित केल्याचे आदेश क्रमांक नाही व कोणत्या मालकी हक्काचे कागद पत्राआधारे एकत्रिकरण करण्यात आले याबाबत संचिका उपलब्ध झालेली नाही. विजयकुमार रतनलाल पाटणी यांचे चार गाळ्यांची नोंद वेगवेगळ्या पानावर प्रथम नोंदविलेली होती. ती एकाच ठिकाणी नोंदविलेली आहे. कर आकारणी संदर्भ क्र.१०८२२१/२००४-२००५, दिनांक १.४.२००५ कर योग्य मूल्य रू.२१७९४/- अभिलेखे उपलब्ध नसल्यामुळे खात्री झाली नाही.

वरील प्रमाणे दोन्ही बाबी संशयास्पद दिसून आल्या. मुद्दा क्र.१ व २ बाबत शहानिशा व खातरजमा करून एकत्रित केल्याबाबतचे आदेशासह अनुपालन अहवाल सादर करणे बाबत कळविण्यात आले होते. विभागाने लेखापरीक्षण अंतिम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

विभागाने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून प्रकरणांतील अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. तसेच प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.५१ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम १५० (अ) नुसार कार्यवाही केलेली नसल्याबाबत.**

१. लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, नारायण हरीभाऊ चव्हाण स.नं. १८२/१ फ्लॅट क्र.३३, हर्सूल या मालमत्तेस संगणक क्र. BOO२८७५३ दिलेला आहे. सदरील मालमत्तेची नोंदवही MS /३५१ वर नोंद आहे. प्रथमतः मोकळ्या जागेचा कर आकारणी संदर्भ क्र. ६५७ /९-१० अन्वये रू.१२१२/- कर योग्य मूल्य आकारले आहे. तद्नंतर रू.३७५०/- कर योग्य मूल्य आकारणी संबंधित मालमत्तेस केलेली आहे. कर आकारणी संदर्भ व वर्ष मालमत्ता नोंदवहीत नोंदविलेले नाही. सदरील प्लॉटचे रेखांकन सन २००० रोजी मंजूर झालेले आहे. प्लॉटवर बांधकाम कोणत्या वर्षी झाले याचे कागदपत्रे नाहीत. प्रकरणांत प्लॉटचे मंजूर रेखांकन सन २००० पासून झालेले

आहे. त्या वर्षापासून मोकळ्या जागेचा कर वसूल झालेला नाही. प्लॉटवरील बांधकाम केव्हा झाले याची परवानगी नकाशा संचिकेत नाही. कर आकारणी संदर्भ व वर्ष मालमत्ता नोंदवहीत नोंदविलेले नाही.

२. किसनसिंग नंदनसिंग रोतेला, मोहन रेसीडेन्सी, फ्लॅट क्र.३, हर्सूल या मालमत्तेची नोंद मागणी नोंदवही क्र. A११/१६१ वर घेण्यात आली आहे. कर आकारणी संदर्भ क्र. १२९/०९-१० असून करयोग्य मूल्य रू.२७७६/- आहे. कर आकारणी दिनांक १.४.२००९ पासून केलेली आहे. कर आकारणी अभिलेख्यांत माहितीपत्रक विना स्वाक्षरीचे आहे. बिल्डरने मनपा तर्फे घेतलेल्या बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्र नाही. फ्लॅटचे खरेदीखत दिनांक १८.७.२००६ रोजी झालेले आहे. प्रकरणांत विभागाने कर आकारणी करतांना बिल्डरने बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्र कोणत्या वर्षी घेतले याची शहानिशा करणे गरजेचे होते. फ्लॅटचे खरेदी खताची तारीख व कर आकारणी तारीख भिन्न आहे.

विभागाकडून उपरोक्त दोन्ही मुद्यांबाबत सविस्तर खुलासा मागविला असता वॉर्ड - ब कार्यालयाने खुलासा सादर करणेबाबत असमर्थता दर्शविली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम १५० (अ) अन्वये कर निर्धारण झाले नसेल अशा प्रकरणांमध्ये आकारणी करण्याचा अधिकार नमूद केलेला आहे. जर कोणत्याही वर्षात कर निर्धारण केले गेले नसेल तर आयुक्तास ज्या दिनांकास ती व्यक्ती आकारणी करण्यास पात्र झाली असेल त्या दिनांकापासून ६ वर्षाच्या आंत कोणत्याही वेळी अशा व्यक्तींवर कराची आणि देय फीची आकारणी करणारी नोटीस बजावता येईल अशी तरतूद आहे. अधिनियमातील तरतूदीप्रमाणे संबंधित प्रकरणांत कर निर्धारण करून अनुपालन दर्शवावे. तसेच त्या पूर्वीच्या कालावधीसाठी कर निर्धारण केले नाही म्हणून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून करवसूली करण्यात यावी. वॉर्ड - ब कार्यालया अंतर्गत असणा-या अशा प्रकारच्या सर्व मालमत्तांचे पुर्नमुल्यांकन करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.५२ : मे. पेंब्रील इंडस्ट्रीज यांचे सन १९९७-१९९८ ते सन २००२ पर्यंत मालमत्ता कर मागणी रजिस्टर वरील रक्कम न भरता पुढील वर्षाचा भरणा करणे बाबत. (रक्कम रू. १७९७६/-)**

वॉर्ड-ब कार्यालयातील मागणी मालमत्ता रजिस्टर क्र.१ पान क्र.३२, कर योग्य मूल्य रू.८८१३/- मालमत्ता धारकाचे नांव पेंब्रिल इंडस्ट्रीज, P.No. ३१/P वर सन १९९७-९८ ते सन १९९९-२००२ पर्यंतची एकूण थकबाकी रक्कम रू. १३४३२ इतकी होती. त्यापैकी सन १९९७ -९८ ची रक्कम रू. ४४९४/- मा.कर पावती क्र. ४१६३, दिनांक १९.१२.१९९७ अन्वये भरणा करण्यात आला आणि सदरील पानावर (ह्या पुढील नोंद रजि.क्र.३ पान क्र.१५० वर) अशी नोंद करण्यात आली. परंतू रजि.क्र.३ पान क्र.३ वर (कांचन प्रॉडक्ट्स) यांची नोंद करण्यात आली.

मात्र यापुढील नोंद मालमत्ता मागणी रजि.क्र.१ पान क्र.२८ वर करयोग्य मूल्य रू.६८९९/- अन्वये वाढ करून सन २००१-०२ पर्यंतची थकबाकी Nill दर्शविण्यात आली आणि सन २००५-०६ पर्यंतचा भरणा पुर्ण करण्यात आला व मालमत्ता मागणी नविन रजि.क्र.१ पान क्र.५८-५९ व पान क्र.७०-७१ वर सन २००४ पर्यंतची रक्कम भरणा करण्यात आली.

संबंधितांकडून सन १९९८-९९ ते २००२ पर्यंतची थकित रक्कम रू.१७९७६/- ही अद्यापपर्यंत वसूल केलेली नसल्यामुळे सदरील रक्कम वसूलीस पात्र असल्यामुळे मनपा

फंडात भरणा करावी. तसेच कर योग्य मूल्य रू.६८,९९१/- वाढ कोणत्या वर्षापासून झाली, याबाबीच्या अभिलेख्यासह अनुपालन दर्शवावे.

**<u>वसूलीस पात्र रक्कम रू.१७,९७६/-</u>**

**परिच्छेद क्र.५३ : कर आकारणी संदर्भ १२२७/२००९-१० दिनांक २२.७.२००९ ची नोंद मागणी रजिस्टर १४/१५२ वर घेण्यात येवून कर योग्य मूल्य कमी केल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, भगवान नारायण भोंबे, एन-११ E - ११ /८, मयूरनगर या मालमत्तेची संगणक नोंद क्रमांक B00१०२३३ असा असून मागणी नोंदवहीत कर आकारणी संदर्भ क्र. १३३६४/ २००६-०७ आहे. कर आकारणी मूल्य निवासी रू.२५३६/- व निवासेत्तर मूल्य रू.३३३९/- दर्शविले आहे. जा.क्र.मनपा/उआसि/२००९/२२७/०९ दिनांक २२.७.२००९ अन्वये कर योग्य मूल्य निवासी रू.३११०/- असे आहे. सदरील क्रमांकाचे कर आकारणीचे अभिलेखे तपासले असता १२२७/२००९-१० यावर नरेश इंडस्ट्रीज B-१९ असे को-या कागदावर नमूद आहे इतर कागदपत्रे उपलब्ध नाहीत. फेर आकारणी करतांना माहिती पत्रकावर घरमालकाची स्वाक्षरी नाही.

प्रकरणांत एकच कर आकारणी संदर्भ दोन मालमत्तांना देणे संशयास्पद बाब आहे. प्रथमत: निवासी + निवासेत्तर कर योग्य मूल्य असतांना केवळ निवासी कर योग्य मूल्य दर्शविणे ही बाब नियमबाह्य आहे. विभागाने उपरोक्त प्रकरणी खुलासा केलेला नाही. निवासी + निवासेत्तर असे करयोग्य मूल्य असतांना केवळ निवासी करयोग्य मूल्य दर्शवून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने उपरोक्त विषयाची खातरजमा करून महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करून मनपा फंडात भरणा करावे. इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.५४ :मे. कॅन्डीज लॅबरॅटरीज च्या थकीत मालमत्ता कराबाबत. (रक्कम रू.४०,०००/-)**

मे. कॅन्डीज लॅबरॅटरीज, एम.आय.डी.सी. P.No. H- ५/१३, संगणक क्र. B000५७८४, च्या मालमत्ता मागणी (जुना) रजिस्टर क्र.२ पान क्र.१६७ वर सन १९९८ ते सन २००५-०६ ची एकूण थकबाकी रक्कम रू.१,४०,०३९/- पैकी (सन १९८८-२००२ पैकी ) रक्कम रू.४०,०००/- मालमत्ता पावती पुस्तक क्र. ११२९, पा.क्र.११२८०८ दिनांक २४.१०.२००५ अन्वये भरणा करण्यात आला.

परंतू मालमत्ता मागणी (नविन) रजि.क्र.३ पान क्र.२९०-२९१ वर सन १९८८ ते २००६ पर्यंतची थकबाकी रक्कम रू.१,००,०३९/- अशी नोंद न घेता रक्कम रू.६०,०३९/- नोंद घेण्यात आली. सन २००७ ते २०१० पर्यंतच्या मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला. मालमत्ता मागणी रजि. नविन ३ पान क्र. (३६०]३६१) वरील सन २०१३ पर्यंतच्या रकमेचा भरणाही करण्यात आला.

संबंधितांकडून सन १९८८ ते २००६ ची उर्वरीत थकबाकी रक्कम रू.४०,०००/- चा भरणा करून अनुपालन सादर करणे बाबत कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत विभागाने कार्यवाही केलेली नाही. रक्कम रू.४०,०००/- भरणा मनपा फंडात करावा. पुढील वर्षाच्या मागणी रजिस्टरला कमी रकमेची नोंद घेवून महानगरपालिकेचे झालेल्या

नुकसानीबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**वसूलीस पात्र रक्कम रू.४०,०००/-**

**परिच्छेद क्र.५५ : दोन प्लॉटच्या एकूण क्षेत्रास एकच कर आकारणी संदर्भ देवून कर आकारणी संचिकेत अपूर्ण अभिलेखे दाखल करणेबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान बत्रा चमन देवी जीवनदास N-५-F प्लॉट क्र.२७ व २८ या मालमत्तेस संगणक क्र. BOO27139 दिलेला आहे. कर आकारणी संदर्भ क्र.४४० / २००९-१० दिनांक १.४.२००६ पासून रू.६३६२/- निवासेत्तर व रू. ७७०१/- निवासी कर योग्य मूल्य आहे. सदरील दोन्ही प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ ४८६ चौ.मी.आहे. कर आकारणी कागदपत्रात नकाशा लावलेला नाही.

प्रकरणांत दोन्ही प्लॉटचे क्षेत्र बघता आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराची आकारणी साशंकता निर्माण करणारी असल्याचे दिसून येते. कर आकारणी करतांना आवश्यक कागदपत्रांत जागेचा नकाशा, बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

विभागाने लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. प्रत्यक्ष स्थळपाहणी करून आवश्यक असल्यास पुर्नमुल्यांकन करून मालमत्ता कराचे निर्धारण करावे. तसेच आवश्यक त्या कागदपत्रासह केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षण विभागास अनुपालनासह सादर करावा.

**परिच्छेद क्र.५६ : कृषी उत्पन्न बाजार समिती जाधववाडी येथील गाळे / दुकान या मालमत्तांचे संगणकीकरण न करणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान कृषी उत्पन्न बाजार समिती, जाधववाडी येथील गाळे धारकांचे मालमत्ता कर वसूलीचे रजि.क्र. १ K, रजि.क्र. २, रजि.क्र.३ या तीन मालमत्ता मागणी रजिस्टर मधील जवळपास एकूण (४३५) गाळे / मालमत्तांची मागणी रजिस्टरमध्ये संगणक क्रमांक नोंदविलेला नाही असे तपासणी मध्ये दिसून आले.

विभागाने उपरोक्त तिन्ही रजिस्टरचे अभिलेखे संगणकात नोंदविल्याबाबत खातरजमा करावी. नोंदविलेली नसल्यास त्या रजिस्टरच्या नोंदी घेवून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.५७ : सिडको कार्यालयाने मालमत्ता धारकास व्यावसायिक वापरासाठी दिलेल्या शॉपलेट प्लॉटचा वापर व्यावसायीक - निवासी असा करणे बाबत तसेच त्यानुसार मनपाने कर आकारणी करणे संदर्भाने.**

लेखापरीक्षणा दरम्यान वैभव रामदास पाटील व अमोल रामदास पाटील शॉपलेट क्र.५ व ६, एन-९ शिवाजीनगर यास मालमत्ता क्र. BOO३६६७० व क्र. BOO२१५१० असे आहेत. सदरील मालमत्तेची नोंद मालमत्ता रजिस्टर क्र.२७ पान क्र.३६१ व ३६३ वर घेतलेली आहे. कर आकारणी संदर्भ अनुक्रमे २४४ व २४३ सन २०१०-११ चे असून कर आकारणी १/४/२००६ पासून केलेली आहे. कर आकारतांना निवासी + व्यावसायीक आकारलेला आहे. सिडकोच्या कागदपत्रात शॉपलेटचा उपयोग केवळ व्यावसायिक करावा असे नमूद आहे.

प्रकरणांत सिडकोने शॉपलेटचा वापर केवळ व्यावसायिक वापरासाठी दिलेला असतांना सदरील मालमत्तेस निवासी + व्यावसायीक कर आकारणे कोणत्या आधारे केली याबाबतचा खुलासा मागविला असता विभागाने खुलासा सादर करण्यास असमर्थता दर्शविली आहे.

विभागाने उपरोक्त प्रकरणी निवासी वापराचे क्षेत्र तपासून घेणे. प्रत्यक्षात सिडकोने वाटप केलेले क्षेत्र व्यावसायिक वापरासाठी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम २६७(अ) (१) (ड) प्रमाणे अवैध बांधकाम असलेल्या इमारतींवर बसविणे योग्य असलेल्या मालमत्ता कराची दुप्पटी इतकी शास्ती लावण्याची तरतूद आहे. त्यानुसार उपरोक्त प्रकरणी मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम वसूल करून मनपा फंडात भरणा करावी. वॉर्ड - ब कार्यालया अंतर्गत असणा-या इतर सर्व प्रकरणांची तपासणी करून किती प्रकरणे आढळली? दुप्पट दराने किती आकारणी केली? किती रक्कम वसूल झाली ? यासह सविस्तर अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. ५८ : MIDC चिकलठाणा भागातील मालमत्ता कर वसूली रजिस्टर मध्ये विविध कंपन्यांचे एकत्रीकरण केले बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता मागणी रजिस्टर तपासणी करीत असतांना असे निदर्शनास आले की, एम.आय.डी.सी. भागातील कंपन्यांचे एकत्रीकरण करण्यात येवून त्यांचे करयोग्य मूल्य एकत्रीत युनायटेड स्पीरीट लिमीटेड या कंपनीत केले. याबाबत नोंद मागणी रजिस्टर क्र. १/५६ व ५७ वर घेण्यात आली आहे. एकत्रीकरण केलेल्या कंपन्या मागणी रजिस्टर वरील नोंदीवर उपरोक्त पान क्रमांकाचा समावेश आहे. वनस्पती दुग्धालय व महाराष्ट्र डीस्टलरीज या दोन्ही कंपन्यांच्या कर योग्य मूल्यात बदल झालेला आहे. अर्धसमास पत्र क्र.९३ सोबत संबंधित कंपन्यांकडे थकीत मालमत्ता कराचा विवरण तक्ता यापूर्वीच वॉर्ड-ब कार्यालयास पुरविण्यात आलेला आहे.

प्रकरणांत विविध कंपन्यांचे एकत्रीकरणाची संचिका, आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. विविध कंपन्या एकाच कंपनी मालकाने खरेदी केल्याचे खरेदीखत, एम.आय.डी.सी. कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र, मनपा मध्ये झालेल्या नामांतराचे अभिलेखे, उपलब्ध झालेले नाहीत. एकत्रीकरण करण्यापूर्वी संबंधितांकडे थकीत असलेली रक्कम रू.४१,४८,१९७/- वसूल होणे आवश्यक होते.

उपरोक्त बाबींबाबत शहानिशा करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अहवाल सादर केलेला नाही. तसेच रक्कमही वसूल केलेली नाही.

विभागाने विविध कंपनीचे एकत्रीकरण करण्यापूर्वी संबंधितांकडून थकित मालमत्ता कराची रक्कम वसूल न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. रू.४१,४८,१९७/- संबंधितांकडून वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करावी. तसेच महानगरपालिकेच्या झालेल्या नुकसानीबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**वसूलीस पात्र रक्कम रू.४१,४८,१९७/-**

**परिच्छेद क्र. ५९ : मालमत्ता धारकांकडे सन १९८३ ते २०१४ पर्यंत थकित रक्कम वसूली न करणे व संगणक मध्ये नोंद न केल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता मागणी रजिस्टर तपासणी करीत असतांना खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र. | मालमत्ता धारकाचे नांव व पत्ता | थकबाकी वर्ष | एकूण थकीत रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | जी.जी.टी.के.प्रा.लि. MIDC - E-13 | १९९१ ते २०१४ | ४०,६२,६८०/- | रजि.क्र.२/२४-२५ संगणकीकरण क्रमांक नाही. |
| २ | गेडोर टूल्स प्रा.लि. MIDC - E-21-6-30 | १९९२ ते २०१४ | ३४,६९,४३३/- | रजि.क्र.२/१६८,१६९ संगणकीकरण क्रमांक नाही. |
| ३ | गोविंद सिल्क मिल्स प्रा.लि. MIDC - F - 6 | १९८६ ते २०१४ | ७,१७,९५३/- | रजि.क्र.३/२०-२१ संगणक क्र.B0005622 |
| ४ | बालाजी स्टिल, रि-रोलींग मिल्स, MIDC - F-22 | १९९८ ते २०१४ | २६,४५,१५८/- | रजि.क्र.४/५८,५९, NRV - 233801 संगणक क्र. नाही. |
| ५ | डायमंड ॲल्युमिनियम प्रा . लि . MIDC - J-9 | १९९४ ते २०१४ | १०,४५,६३१/- | रजि.क्र.४/९६-९७ NRV - 108000 संगणक क्र. नाही. |

वरील तक्त्यानुसार संबंधित मालमत्ता कर वसूली बाबत विभागाने पाठपुरावा केलेला नसल्यामुळे उपरोक्त प्रमाणे थकीत रकमा संबंधितांकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची - ड चे प्रकरण (८) मधील तरतूदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

विभागाने मालमत्ता कराच्या वसूलीबाबत आवश्यक ती कार्यवाही करून थकीत रकमा महापालिका फंडात भरणा करावा. केलेल्या कार्यवाहीबाबत अनुपालन दर्शवावे.

**पच्छिेद क्र. ६० : संगणकी करणात मालमत्तांच्या मिश्र करयोग्य मूल्याची विभागणी करतांना वापराच्या क्षेत्राचा उल्लेख नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, वॉर्ड-ब कार्यालया अंतर्गत असलेल्या मीश्र मालमत्तांचे संगणकात नोंद घेतांना निवासी + व्यावसायिक वापरासंबंधी कर योग्य मूल्याची विभागणी केली आहे. विभागणी करतांना वापराचे क्षेत्रानुसार विभागणी केलेली असल्याची खात्री झालेली नाही. मीश्र मालमत्तांचे विभागणी केलेल्या काही मालमत्तांचे चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करून अर्धसमास पत्र क्र.९५ सोबत स्वतंत्र माहितीचा तक्ता पुरविण्यात आलेला आहे.

विभागाने तपासणी करून आवश्यक अभिलेख्यासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विषयांकित प्रकरणी अर्धसमासासोबत दिलेल्या तक्त्यातील प्रकरणे व त्याच पध्दतीचे वॉर्ड अंतर्गत असलेले इतरही प्रकरणे तपासून अभिलेख्यासह अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ६१ :संगणकी करणात मालमत्तांच्या नोंदी घेतांना मालमत्ता कराची थकीत रक्कम न दर्शविता पुढील नोंद घेतल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, मालमत्ता कराचे संगणकीकरण करतांना थकीत रकमा नोंदविलेल्या नाहीत. पुढील वर्षाच्या मालमत्ता कराची नोंद घेण्यात आलेली आहे. नाममात्र स्वरूपात अर्धसमास पत्र क्र. ९६ सोबत विहित तक्त्यात उदाहरणे दिलेली आहेत. थकबाकीची रक्कम संगणकीकरणात झालेली नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने फरकाची रक्कम रू.१,०५,०९१/- संबंधितांकडून वसूल करून तसेच याच प्रकारच्या इतर मालमत्तांची थकबाकी रक्कम वसूल झाल्याची खात्री करावी. थकबाकी वसूल झालेली नसल्यास वसूल करावी आणि तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**वसूलीस पात्र रक्कम रू.१,०५,०९१/-**

**परिच्छेद क्र.६२ :कृषी उत्पन्न बाजार समिती, नविन मोंढा जाधववाडी मधील गाळे / शॉप यांचे मालमत्ता कराबाबत.**

लेखापरीक्षणा अंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती, नविन मोंढा जाधववाडी मधील व्यावसायीक गाळे /शॉप धारकांना वेगवेगळा मालमत्ता कर आकारणी करणेत आल्याचे मालमत्ता मागणी रजिस्टर वरून तपासणी अंती दिसून आले. सर्व गाळे /शॉप यांना साधारणतः करयोग्य मूलय रू.१८१६६/- इतके निश्चित केलेले आहे. काही गाळे धारकांची करयोग्य मूल्य रक्कम कमी असल्याचे दिसून आले. करयोग्य मूल्य कमी असलेल्या गाळे /शॉप धारकांची यादी अर्धसमास पत्र क्र. ९७ सोबत यापूर्वीच वॉर्ड-ब कार्यालयास दिलेली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गाळ्यांना आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराचे मूल्यांकन अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे कर योग्य मूल्य योग्य असल्याची खात्री पटली नाही.

उक्त प्रकरणी विभागाने खुलासा सादर केलेला नाही. अर्धसमासासोबत दिलेल्या यादीप्रमाणे करयोग्य मूल्याबाबत पुर्नमुल्यांकन करावे. विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.६३ :सुजाता हौ.सोसायटी, सिडको येथील, प्लॉट क्र.३ वर प्लॉट क्र.२ च्या दुरूस्तीची नोंद करणे , कर योग्य मूल्य कमी करणे बाबत**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, बळवंत माणिकराव रगडे, प्लॉट क्र.३, सुजाता हौसींग सोसायटी याची नोंद संगणक क्र.४०११४ अन्वये करण्यात आलेली असून करयोग्य मूल्य रू.१३२३०/- आहे. कर आकारणी संदर्भ क्र.४८१४/ २००१-०२ दिनांक १.४.२००१ पासून आहे. मालमत्ता नोंदवही सन २००१ ते २०१२ पर्यंत M -३ -१७५ वर नोंदी असून या पानावर जा.क्र.मनपा/कनिवसं/४७८-२००६, दिनांक २१.१२.२००६ अन्वये कर योग्य मूल्य रू.२७६५/- करण्यात आले. दुरूस्ती दिनांक १.४.२००१ पासून केली. आदेशात प्लॉट क्र.२ दर्शविला आहे. सन २०११-१२ च्या मागणी नोंदवही क्र. M३ , पान क्र.१६९ वर बळवंत माणिकराव रगडे व श्रीमती जयवंताबाई माणिकराव रगडे अशी नोंद घेतलेली आहे. मालमत्ता मागणी नोंदवहीत सुधारीत कर विक/२०१२-१३ अशी नोंद आहे. क्रमांक व दिनांकाचा उल्लेख नाही. मागणी नोंदवहीत मागणी दिनांक १.४.२००१ पासून आहे.प्रथम निवासी वापर कर योग्य

मूल्य होते. नविन नोंदवहीत निवासी + व्यावसायीक वापर दर्शवून ७२२५ + २८०६२ कर योग्य मूल्य अनुक्रमे  नोंदविलेले आहे.

प्रकरणांत प्लॉट क्र.२ मध्ये कर योग्य मूल्य रू.१३२३०/-चे रू.२७६५/- केले आहे. परंतू त्याबाबतची दुरूस्ती प्लॉट क्र.३ वर नोंदविण्याचे प्रयोजनाबाबत खुलासा अपेक्षित आहे. मागणी नोंदवही MB-१७५ (जूने) वर मार्च २०१२ पर्यंत वसूलीची पावती निर्गमित केली. परंतू रू.६३४६/- संबंधितांकडे थकबाकी आहे. नविन रजिस्टर क्र. M३ / १६९ वर नोंद घेतांना पुन्हा २००९ ते २०१२ पर्यंतची रक्कम दर्शविल्याचे कारण समजू शकले नाही.

थकबाकी रकमा वसूल केलेल्या नाहीत. प्लॉट क्र.२ व ३ ची एकत्रित रक्कम दर्शवून मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. कारण मागील रजिस्टर वर प्लॉट क्र.२ ला खाडाखोड करून प्लॉट क्र.३ करण्यात आले. संबंधितांकडे मालमत्ता कराची थकबाकी असतांना थकबाकीची रक्कम वसूल न करता  सन २०१३-२०१४ पर्यंतच्या कराची वसूल करून पावती देण्यात आलेली आहे.

करीता उपरोक्त प्रकरणी प्लॉट क्र.२ व प्लॉट क्र.३ च्या कर योग्य मूल्याची खातरजमा करून थकबाकी तपासावी. तसेच निवासी + व्यावसायीक वापर कोणत्या वर्षापासून आहे याबाबतच्या अभिलेख्यासह दुरूस्ती सुधारित कराच्या कागदपत्रासह अनुपालन अहवाल सादर करणे बाबत कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. दोन विविध प्लॉटवरील मालमत्ता कराची आकारणी झालेली असल्याची खात्री करावी, नसल्यास पुर्नमुल्यांकन करून अनुपालन अहवाल अभिलेख्यासह, सादर करावा. प्लॉट क्र.२ वरील दुरूस्ती प्लॉट क्र.३ वर नोंदविल्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ६४ : थकित मालमत्ता कराची नविन मालमत्ता रजिस्टरवर नोंद न घेणे बाबत. (एकूण थकित कर रू.४,४५,२६९/-)**

लेखापरीक्षणा अंतर्गत मालमत्ता मागणी रजिस्टर क्र.१९ ची चाचणी स्वरूपात तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, जुनेमागणी रजिस्टर १९ च्या नोंदी नविन मागणी रजि.क्र.१९ मध्ये घेतांना मालमत्ता धारकांकडे सन २००२-०३ पासून थकित कर रू.४,४५,२६९/- ची नोंद घेतलेली नाही. याबाबत सविस्तर माहिती दर्शविणारा तक्ता अर्धसमास पत्र क्र.९९  सोबत यापूर्वीच वॉर्ड कार्यालयास देण्यात आलेला आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. विभागाने रक्कम रू.४,४५,२६९/- संबंधितांकडून वसूल करून नविन मागणी रजिस्टरमध्ये थकित मालमत्ता कराची नोंद न घेतल्याबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**वसूलीस पात्र रक्कम रू.४,४५,२६९/-**

**परिच्छेद क्र.६५ :मोकळ्या जागेचा कर व बांधकाम झाल्यानंतर मालमत्ता कर असे दोन्हीकर एकाच मालमत्तेसंबंधी वसूलीबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती नविन मोंढा,औरंगाबाद यांच्या मोकळ्या जागेचा कर मालमत्ता मागणी नोंदवही क्र. १ के / २८९ वर घेण्यात आलेली असून कर आकारणी संदर्भ क्र. ११८४/ ९७-९८ आहे.मोकळ्या

जागेचा कर दि.१.४.१९९७ पासून कर योग्य मूल्य रू.१,३०,७७,३१२/- नुसार वसूल करण्यात येत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे बांधकाम केलेल्या गाळ्यांना मालमत्ता कराची कर आकारणी झालेल्या मालमत्तांची नोंद मालमत्ता नोंदवही क्र.१ ते ५ मध्ये घेतलेली आहे.

प्रकरणांत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नांवे मोकळ्या जागेचा कर वसूल केल्या जात आहे. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीने बांधकाम केलेल्या गाळ्यांसाठी मालमत्ता कराची आकारणी केली जात आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीकडून वसूल करण्यात येत असलेल्या मोकळ्या जागेचा कर हा बांधकाम झालेल्या क्षेत्रापेक्षा स्वतंत्र वेगळ्या जागेचा आहे की, एकाच जागेबाबत मोकळ्या जागेचा कर तसेच मोकळ्या जागेवर बांधकाम केलेल्या गाळ्यांवर मालमत्ता कर वसूल केल्या जात आहे याची तपासणी करून आवश्यक त्या अभिलेख्यासह अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने अनुपालन सादर केलेले नाही. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या क्षेत्रफळापैकी मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ व बांधकामाचे क्षेत्रफळ याची खातरजमा करून कराची योग्य मागणी केल्या जात आहे, याबाबतची खात्री करावी. आवश्यक त्या अभिलेख्यासह अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.६६ :कर आकारणी संदर्भातील मालमत्ता धारकांच्या नावाचा ताळमेळ न लागणे, मालमत्ता नोंदवहीत नोंदविलेला संदर्भ व संचिकेतील संदर्भ वेगवेगळा असल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, अर्धसमास पत्र क्र. १०१ सोबतच्या विवरण तक्त्यात नमूद प्रकरणांची तपासणी अंती मालमत्ता मागणी नोंदवहीतील नोंदी मधील कर आकारणी संदर्भ व प्राप्त कर आकारणी संदर्भाच्या संचिकांतील अभिलेख्याचा ताळमेळ लागला नाही. आकारण्यात आलेला कर ज्या संदर्भ वर्षासाठी आहे त्या संदर्भ वर्षाचे संबंधित मालमत्ता बाबतचे कागदपत्रे पहावयास मिळाले नाही. त्यामुळे आकारण्यात आलेला कर योग्य असल्याची खात्री झाली नाही.

उपरोक्त बाबी संबंधीच्या योग्यतेबाबत अभिलेख्यासह सविस्तर खुलासा सादर करणेबाबत कळवून सुध्दा विभागाने खुलासा सादर करण्यास असमर्थता दर्शविली आहे.

विभागाने अर्धसमास पत्र क्र.१०१ सोबत दिलेल्या तक्त्यातील नोंदीच्या मालमत्ता कर आकारणी संदर्भानुसार करयोग्य मूल्य योग्य असल्याची खात्री करावी तसेच मालमत्ता मागणी रजिस्टरवर असलेला संदर्भ याचा ताळमेळ घ्यावा. आवश्यकतेनुसार पुर्नमुल्यांकन करून संबंधितांना मालमत्ता कराची कर आकारणी करावी . केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.६७ : वॉर्ड - ब अंतर्गत कार्यरत वर्ग-३ / ४ कर्मचा-यांचे सेवापट/ सेवापुस्तक चाचणी स्वरूपात तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या त्रुट्यांबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान विभागामध्ये एकूण २३८ कर्मचारी वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी कार्यरत असल्याबाबत विभागाने लेखापरीक्षण कामी यादी उपलब्ध करून दिली, यापैकी फक्त ५५ सेवापट / सेवापुस्तक उपलब्ध झाले. या मध्ये तपासणीअंती खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. श्रीमती सविता अ.सोनवणे , वरीष्ठ लिपीक यांचे सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता, दिनांक १.७.२००६ रोजीचे वार्षिक वेतन वाढ रू.३९०/- इतके ऐवजी रू.४००/- इतके निश्चित केल्याने रू.१०/- अतिप्रदान झालेले आहे.

२. श्री.रवि किरण राजाभाऊ कुलकर्णी एस.एफ.डब्ल्यू यांचे प्रथम नियुक्ती आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१०/२९६,दिनांक २२.२.२०१० जन्म दि.१०.०६.१९६९ म्हणजे नियुक्तीचे दिनांकास ४१ वर्षे वय.

३. श्री.वेकंट वामन बिरादार, कनिष्ठ लिपीक यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता ---- यांनी वेळोवेळी उपभोगलेल्या रजा नोंदी सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत.

४. श्री.रविंद्र सुमंतराव देशमाने, कनिष्ठ लिपीक सेवापुस्तक तपासले असता दिनांक ९.६.१९९४ पासून केलेली सुधारित वेतन निश्चित दरम्यान अतिप्रदान झालेले वेतन वसूल केल्याची नोंद सेवापुस्तकामध्ये घेतलेली नाही.

५. श्री.हरिचंद्र गणपत जमधडे - पाणी पुरवठा - लाईनमन यांचे मूळ सेवा पुस्तकांचे / संचिकाचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे आक्षेपित बाबी निदर्शनास आल्या.

अ) सदर कर्मचारी सिडको कार्यालय औरंगाबाद यांचेकडून मनपाकडे मजूर / हॉलमन म्हणून वर्ग झालेले आहेत. त्यांची प्रथम नियुक्तीचे सवापट उपलब्ध करून देण्यात आले नाही.

ब) सिडको कार्यालयाकडून मनपाकडे दिनांक १.२.१९८७ रोजी सामावून घेतलेले आहे. त्यामुळे दिनांक १.२.१९८७ पर्यंतचे पेन्शन कॉन्ट्रीब्युशन / रजावेतन वसूल केलेले दिसून आले नाही.

क) संबंधितांस दि.९.६.१९९४ पासून निवड श्रेणीचा लाभ प्रदान केलेला आहे. सदरची वेतननिश्चिती ही वेतननियम ११ (४) प्रमाणे सुधारित करण्यात येवून त्यापुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही विभागाने करावी.

६. श्री.बाबुलाल शंकर सुरे, पा.पु.मजूर,यांचे मूळ सेवा पुस्तकांचे / संचिकाचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे आक्षेपित बाबी निदर्शनास आल्या.

अ) सेवापटाचे प्रथम पृष्ठावरील नोंदी अपूर्ण आहेत. जसे -जात, ओळखचिन्ह, जमात, उंची इ.माहितीची नोंद घेतली नाही.

ब) संबंधित दिनांक १.७.२०१२ पासून रू.७५२०/- इतके मूळ वेतन घेत आहे. सहावा वेतन आयोग प्रमाणे सुधारित नियम १० परि.३/४ नुसार लगतचा वरीष्ठ वेतन बॅण्ड लागू केलेला नाही.

७. श्री.बाबुलाल रखमाजी पचलोरे, पा.पु.मजूर -

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत.

ब) संबंधितास दि.२४.९.२००९ पासून आश्वासित प्रगती योजना अंतर्गत लाभ प्रदान केलेला आहे. मात्र वेतननिश्चिती वेतननियम ११ (१) अ प्रमाणे केलेली नाही.

८. श्री.अनंत ज्ञानोबा गवई, पा.पु. मजूर -

संबंधित कर्मचारी हे दि.१.७.२०१२ पासून वेतन बॅण्डचे कमाल वेतनावर वेतन घेत आहेत. त्यांना सहावा वेतन आयोग नियम -१० चे परि.३/ ४ मधील तरतूदीप्रमाणे लगतचा वरीष्ठ वेतन बॅण्ड मंजूर केलेला नाही.

९. श्री.संजय गोकुळ जेजुरकर, पा.पु.मजूर -

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत.

ब) संबंधित कर्मचारी हे दि.१.७.२०१२ पासून वेतन बॅण्डचे कमाल वेतनावर वेतन घेत आहेत. त्यांना सहावा वेतन आयोग नियम -१० चे परि.३/ ४ मधील तरतूदीप्रमाणे लगतचा वरीष्ठ वेतन बॅण्ड मंजूर केलेला नाही.

१०. श्री. धरमसिंग नारायणसिंग कनसे, पा.पु.लाईनमन.

संबंधितास दि.९.६.१९९४ पासून निवडश्रेणीचा लाभ प्रदान केलेला आहे. त्यातील वेतननिश्चिती वेतननियम ११(४) प्रमाणे सुधारित करून पुढील अनुषंगिक कार्यवाही विभागाने करावी.

११. श्री.लक्ष्मण रामराव शेजवळ, पा.पु.मजूर -

अ) प्रथम नियुक्ती दि.५.१.२००४ असून संबंधितांचा परिविक्षाधीन कालावधी पुढील ११ महिन्यांत खुला करणे गरजेचे असतांना तो खुला न करता दि.३१.१.२००८ रोजी विलंबाने खुला केलेला आहे.

ब) वार्षिक वेतनवाढी प्रदान करतांना नियमित वेतनवाढी प्रदान आहेत. संबंधितास दि.३१.१.२००८ पासून वेतनवाढी अनुज्ञेय ठरतात.

क) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत.

१२. श्री.नागनाथ पुंडलिक सुर्यवंशी ,मजूर

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत.

ब) दि.२४.६.२००८ रोजी (T-S) वेतनवाढ रू.२३०/- इतके २३०+६१६० = ६३९०/- मात्र दि.२४.६.२००८ रोजी संबंधितास आश्वासित प्रगती योजनेचा लाभ प्रदान आहे.त्यामधील वेतननिश्चिती करतांना वेतनवाढ रू.२३०+६१६०=६३९०/- इतके निश्चित करणे आवश्यक होते. मात्र मूळ वेतन ६४९०/- इतके निश्चित केलेले आहे. विभागाने तपासून खातरजमा करावी.

१३. श्री.भिमराव बंडू बनकर, पापू ऑपरेटर

अ) संबंधित कर्मचारी हे दि.१७.२.१९८६ रोजी सिडको कार्यालयाकडून मनपाकडे वर्ग झालेले आहेत. त्यामुळे दि.१७.२.१९८६ पूर्वीचे सेवेबाबतचे सेवापट तपासणीस उपलब्ध झालेले नाही.

ब) दि.१७.२.१९८६ पर्यंतचे पेन्शन कॉन्ट्रीब्युशन व रजा वेतन वसूल केलेले दिसून आले नाही.

१४. श्री.कैलास बाबुराव मिसाळ, पापू मजूर -

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत.

ब) संबंधितांचा प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४ असून ११ महिन्याच्या कालावधी दिनांक २६.२.२००८ पासून परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रदान करणे नियमान्वये होते. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

क) संबंधिताने उपभोगलेल्या अर्जित रजा नोंदी सेवापटात घेण्यात आलेल्या नाहीत.

१५. श्री.काशिनाथ लालमन राठोड, पापू मजूर -

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी अपूर्ण असून त्या प्रमाणित नाहीत.

ब) संबंधितांचा प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४ असून ११ महिन्याच्या कालावधी दिनांक २६.२.२००८ पासून परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रदान करणे नियमान्वये होते. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

१६. श्री.मोहम्मद इरफान मोहम्मद हयात खान, पापू मजूर

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी अपूर्ण असून त्या प्रमाणित नाहीत.

ब) संबंधितांचा प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४ असून ११ महिन्याच्या कालावधी दिनांक २६.२.२००८ पासून परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रदान करणे नियमान्वये होते. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

१७. श्री. मोहसिन अली हसन अली, पापू मजूर

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी अपूर्ण असून त्या प्रमाणित नाहीत.

ब) संबंधितांचा प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४ असून ११ महिन्याच्या कालावधी दिनांक २६.२.२००८ पासून परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रदान करणे नियमान्वये होते. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

१८. श्री. राजेंद्र सखाहारी पुंड,

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी अपूर्ण असून त्या प्रमाणित नाहीत.

ब) संबंधितांचा प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४ असून ११ महिन्याच्या कालावधी दिनांक २६.२.२००८ पासून परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रदान करणे नियमान्वये होते. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

१९. श्री. हिम्मत कडूबा क्षिरसागर, पापू मजूर

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी अपूर्ण असून त्या प्रमाणित नाहीत.

ब) संबंधितांचा प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४ असून ११ महिन्याच्या

कालावधी दिनांक २६.२.२००८ पासून परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रदान करणे नियमान्वये होते. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

क) वेळोवेळी उपभोगलेल्या रजा नोंदी सेवापटात / रजा खात्यात नोंदविलेल्या नाहीत.

२०. श्री.सोनाजी किसन हरणे, पापू मजूर

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी अपूर्ण असून त्या प्रमाणित नाहीत.

ब) संबंधितांचा प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४ असून ११ महिन्याच्या कालावधी दिनांक २६.२.२००८ पासून परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रदान करणे नियमान्वये होते. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

२१. श्री.सय्यद मंजूर अली, स.मेहमूद अली, पापू मजूर

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी अपूर्ण असून त्या प्रमाणित नाहीत.

ब) संबंधितांचा प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४ असून ११ महिन्याच्या कालावधी दिनांक २६.२.२००८ पासून परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रदान करणे नियमान्वये होते. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

२२. श्री.विनायक मनोहर जगधणे, पापू मजूर

अ) सेवापटातील प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित नाही.

ब) संबंधितांचा प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४ असून ११ महिन्याच्या कालावधी दिनांक २६.२.२००८ पासून परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद आहे. त्यानुसार वेतनवाढी प्रदान करणे नियमान्वये होते. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

२३. श्री.राजू उत्तम मिसाळ, मजूर

अ) सेवापटातील प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित नाही.

ब) वेळोवेळी उपभोगलेल्या रजा / नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत.

२४. श्री.शंकर रामभाऊ गजहंस, मजूर

अ) सेवापटातील प्रथम पृष्ठावरील नोंद अपूर्ण असून प्रमाणित नाहीत.

ब) परिविक्षाधीन कालावधी खुला केल्याबाबत आदेश प्राप्त झालेले नाहीत.

२५. श्री.बाबुराव सोनाजी आढावे, मजूर

अ) सेवापटातील प्रथम पृष्ठावरील नोंद अपूर्ण असून प्रमाणित नाहीत.

ब) प्रथम नियुक्ती दिनांक १६.१.२००४ , ११ महिन्यात परिविक्षाधीन कालावधी खुला न करता दिनांक २६.२.२००८ रोजी खुला करण्यात आला. मात्र नियमित वेतनवाढी दिल्याचे दिसून आले.

२६. श्री.धनंजय के.मिरखेलकर, पंप ऑपरेटर

अ) संबंधिताच्या मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता दि.१.७.११ रोजीचे मूळ वेतन रू.११६००/- निश्चित करण्याऐवजी ११६२०/-अशी नोंद आहे. विभागाने दुरूस्तीसह अतिप्रदान रक्कम वसूली करावी.

२७. श्री.अंबादास विठ्ठल जाधव, मजूर

अ) संबंधिताच्या मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता दि.९.६.१९९४ पासून निवडश्रेणीचा लाभ प्रदान केलेला आहे. सदरची वेतननिश्चिती ही वेतननियम ११ (१) (अ) प्रमाणे केलेली आहे. जी की, चूकीची आहे. सदरची वेतननिश्चिती ही ११ (४) प्रमाणे सुधारित करण्यात येवून प्रकरणांत पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करावी.

२८. श्रीमती मालनबाई नामदेव कांबळे, सफाई मजूर -

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित नाहीत.

ब) दिनांक २३.१०.२००९ रोजी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ प्रदान केलेला आहे. सदरची वेतननिश्चती मध्ये वेतनवाढ २५० ऐवजी २४० इतकी निश्चित करावी.

क) दिनांक १.७.२०११ पासून संबंधित कमाल वेतनावर वेतन घेत असल्याने संबंधितास दिनांक पासून सहावा वेतन आयोग नियम -१० चे परि. ३/४ मधील तरतूदीनुसार लगतचा वरीष्ठ वेतन बॅण्ड लागू करण्याची कार्यवाही करावी.

२९. श्री.भाऊसाहेब तानाजी पठारे, सफाई मजूर

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित नाहीत.
ब) प्रथम नियुक्ती दिनांक ५.१.२००४. ११ महिने कालावधीनंतर परिविक्षाधीन कालावधी खुला करणेऐवजी दिनांक २६.२.२००८ पासून खुला केल्याची नोंद आहे. मात्र संबंधितास नियमित वेतनवाढी प्रदान केल्याचे दिसून आले.

३०. श्री.सुभाष लक्ष्मण म्हस्के, सफाई मजूर

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित नाहीत.

३१. श्री.कृष्णा अवचितराव टाकसाळे, जवान

अ) संबंधिताची जन्मदिनांक २३.११.१९५५ व प्रथम नियुक्ती दिनांक १.१२.१९८६ प्रथम नियुक्तीच्या दिवशी संबंधिताचे वय ३१ वर्षे ७ दिवस इतके उच्चतम आहे. उच्चतम वयास नियुक्ती अधिका-यांनी मान्यता / क्षमापित केलेले दिसून आले नाही.

ब) परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याबाबतची नोंद नाही. मात्र नियमित वार्षिक वेतनवाढी प्रदान केलेल्या आहेत.

३२. श्रीमती आशाबाई अशोक नाडे, सफाई मजूर

अ) आदेश क्रमांक वॉर्डब/१८०/२०११, दिनांक २५.१.२०११ पासून आश्वासित प्रगती योजनेचा लाभ प्रदान आहे. त्यामध्ये केलेली वेतननिश्चिती प्रमाणे दिनांक ४.१.२००९ रोजी वेतननियम ११ (१)(अ) प्रमाणे आहे. संबंधितास दिनांक १.७.२००९ रोजीचे वार्षिक वेतनवाढ प्रदान केलेली आहे. जी की देय ठरत नाही.

३३. श्री.भिमसेन बुधाजी बांडे, कनिष्ठ लिपीक

अ) कार्यालयीन आदेश क्र./मनपा/आस्था-१/२००३/९९, दि.११.१.२००३ अन्वये निलंबित केल्याचे आदेशाची नोंद सेवापुस्तकामध्ये नाही.

ब) कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आस्था-१/२००८/५१, दि.७.१२.२००८ अन्वये अपहारातील रक्कम रू.२,४४,१२४/- मासिक वेतनातून प्रतिमाह १/३ प्रमाणे वसूली बाबत मा.न्यायालयाचे खाते निहाय चौकशी निर्णयाचे अधिन राहून वॉर्ड ब येथे पदस्थापना आहे. याची नोंद सेवापटात नाही. १.६.२००६ पासून वार्षिक वेतनवाढी प्रदान केलेल्या दिसून आल्या नाहीत.

३४. श्री.दिपक प्रल्हाद वासनिक, सफाई मजूर

अ) संबंधिताच्या मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता दि.९.६.१९९४ पासून निवडश्रेणीचा लाभ प्रदान केलेला आहे. सदरची वेतननिश्चिती ही वेतननियम ११ (१) (अ) प्रमाणे केलेली आहे. जी की, चूकीची आहे. सदरची वेतननिश्चिती ही ११ (४) प्रमाणे सुधारित करण्यात येवून प्रकरणांत पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करावी.

३५. श्री.बाळकृष्ण एम.कुलकर्णी, सफाई मजूर

अ) संबंधिताच्या मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता दि.९.६.१९९४ पासून निवडश्रेणीचा लाभ प्रदान केलेला आहे. सदरची वेतननिश्चिती ही वेतननियम ११ (१) (अ) प्रमाणे केलेली आहे. जी की, चूकीची आहे. सदरची वेतननिश्चिती ही ११ (४) प्रमाणे सुधारित करण्यात येवून प्रकरणांत पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करावी.

३६. श्री.अथर उल हक, शमीमुल हक, शिपाई

अ) संबंधितास दि.१.७.२०१२ रोजीचे वार्षिक वेतनवाढ २८०/- ऐवजी २७०/- अशी निश्चित करून एकूण मूळ वेतन ७६७०/- अशी नोंद घेण्यात यावी.

३७. श्री.भिमसिंग रामसिंग परदेशी, पापू,मजूर

अ) सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी अपूर्ण घेतलेल्या आहेत.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त परिच्छेदाप्रमाणे मुद्येनिहाय सूचनांचे पालन करून आवश्यक कार्यवाही करावी. अतिप्रदान रकमांची वसूली करावी मनपा फंडात भरणा करावी केलेल्या कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.६८ : वॉर्ड - ब अंतर्गत विविध विभागाचे मालमत्ता कर मागणी रजिस्टर मध्ये करमूल्य योग्य कमी करणे ,आदेश क्रमांक नमूद नसणे इत्यादी अनियमिततेबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, मालमत्ता मागणी नोंदवहीत कर योग्य मूल्य कमी केले आहे. कर योग्य मूल्य कमी करतांना आदेश क्रमांक नोंदविलेला नाही. तसेच ज्या मालमत्तांबाबत कर आकारणी संदर्भ नोंदविलेला आहे, त्या क्रमांकाची कर आकारणीचे अभिलेखे व विशेष कक्षाकडून वॉर्ड - ब कार्यालयास प्राप्त अभिलेख्यांचा ताळमेळ

लागत नाही. कर योग्य मूल्य कमी केल्याच्या संचिका उपलब्ध झालेल्या नाहीत. फेर कर आकारणी करतांना मागील थकबाकी वसूल केलेली नाही.

प्रकरणांत कर आकारणी विभागाकडून प्राप्त अभिलेखे व मालमत्ता मागणी नोंदवहीतील कर आकारणी संदर्भ हे परस्परांशी जूळत नाही. मागील थकबाकी वसूल न करताच फेर आकारणी केलेली आहे. फेर आकारणीच्या संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नसल्याने केलेली कर आकारणी योग्य असल्याची खात्री झाली नाही. अर्धसमास पत्र क्र.१०४ सोबत नाममात्र तपासणी केलेल्या नोंदींचा तक्ता स्वतंत्रपणे वॉर्ड कार्यालयास देण्यात आलेला आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. अर्धसमासासोबत दिलेल्या तक्त्यातील जुने करयोग्य मूल्य व नविन करयोग्य मूल्य यानुसार येणा-या मालमत्ता कराच्या फरकाची रक्कम रू.४५,५६,५१९/- आहे. सदरील रक्कम संबंधितांकडून वसूल करून मनपा फंडात भरणा करावी. वॉर्ड कार्यालयाअंतर्गत असणा-या इतरही प्रकरणांचा शोध घेवून पुर्नमुल्यांकन करून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसानीबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**वसूलीस पात्र रक्कम रू.४५,५६,५१९२/-**

**परिच्छेद क्र.६९ : वॉर्ड कार्यालयास प्रदान केलेल्या अधिकारात वॉर्ड अधिका-यांनी मालमत्ता करांची फेर आकारणी करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम -१९४९ नियम अनुसूची -ड चे प्रकरण -८ मधील तरतूदीचे पालन न केल्यामुळे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसानीबाबत.**
**(रक्कम रू.४६,९५,९४९/-)**

लेखापरीक्षणा दरम्यान प्राप्त मालमत्ता कराच्या फेर आकारणी संदर्भातील संचिकांची तपासणी केली असता, त्यामध्ये प्रामुख्याने खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९ (१) अन्वये मा.आयुक्त यांनी जा.क्र./मनपा/मआ/कमुनिस/०५/२७३,दिनांक ३१.१२.२००५ अन्वये अधिनियमातील अधिसूचिचे प्रकरण -८ मधील तरतूदींचे अधिकार वॉर्ड अधिका-यांना प्रदान केलेले आहे. सदरील आदेशामध्ये अधिनियमातील तरतूदी अनुषंगाने प्रभाग अभियंता यांनी प्रकरणांची छाननी करून प्रस्तावित केल्यानुसार येणा-या मुल्यांकनास मान्यता देणे बाबत आदेश पारीत केलेले आहेत. परंतू लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, वॉर्ड अधिका-यांनी त्यांच्याच अधिकारात, मुल्यांकनास मान्यता दिलेली आहे.

प्रकरण -८ मधील नियम १६ प्रमाणे मुल्य निर्धारणा विरूध्द तक्रार ही विहित मुदतीत वॉर्ड कार्यालयास प्राप्त झालेली नाही. तसेच तक्रारी मध्ये प्रकरण-८ मधील नियम १६ (२) नुसार ज्या कारणावरून मुल्य निर्धारणा विरूध्द तक्रार केली आहे, ती कारणे थोडक्यात परंतू संपूर्णपणे नमूद केलेली नाही.

संचिकेतील असलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. १०५ सोबतच्या विवरण तक्त्यात शेरा या स्तंभामध्ये सविस्तर उल्लेख केलेला आहे. त्याचे संचिका निहाय खुलासा होणे अभिप्रत आहे. संक्षिप्त गोषवारा पुढील प्रमाणे दिलेला आहे.

| अ.क्र. | फेर आकारणीचे वर्ष | फेर आकारणी पूर्वीचा मालमत्ता कर | फेर आकारणी नंतरचा मालमत्ता कर | फरक रक्कम रू. | एकूण वर्ष | फेर आकारणी नंतर २०१३-१४ पर्यंतचे मालमत्ता कराचे झालेले नुकसान |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००७-२००८ | १,९३,००७/- | १६,७६५/- | १,७६,२४२/- | ०७ | १२,३३,६९४/- |
| २ | २००८-२००९ | ३,८२,९५९/- | १,२९,१२६/- | २,५३,८३३/- | ०६ | १५,२२,९९८/- |
| ३ | २००९-२०१० | १,२३,००४/- | ३२,१३१/- | ९०,८७३/- | ०५ | ४,५४,३६५/- |
| ४ | २०१०-२०११ | ४,१६,८८७/- | ४५,६४७/- | ३,७१,२४०/- | ०४ | १४,८४,८९२/- |
| | एकूण | **११,१५,८५७/-** | **२,२३,६६९/-** | **८,९२,१८८/-** | | **४६,९५,९४९/-** |

प्राप्त संचिकांची तपासणी चाचणी स्वरूपात केलेली असून वॉर्ड कार्यालयास अधिनियमांचे प्रकरण - ड मधील तरतूदी नुसार वॉर्ड कार्यालयाने केलेल्या मुल्यांकनासंबंधी कर आकारणी विभागामार्फत पुनश्च तपासणी करून / मोजमाप करून / खातरजमा करून विहित तक्त्यातील सर्व प्रकरणे व वॉर्ड कार्यालयास अधिकार प्रदान केलेल्या तारखेपासून विशेष कक्ष कर आकारणी विभाग स्थापनेच्या तारखेपर्यंत सर्व प्रकरणे तपासणी होणे गरजेचे वाटते, जेणेकरून महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये निश्चितच वाढ होईल.

उपरोक्त मुद्यांबाबत वॉर्ड अधिकारी यांना अर्धसमास पत्र क्र.१०५ अन्वये यापूर्वीच सविस्तर माहिती विवरण तक्त्यात दिलेली आहे. विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

उपरोक्त प्रकरणी प्रत्यक्ष तपासणी करून खातरजमा करावी, व तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**परिच्छेद क्र.७० : वॉर्ड - ब कार्यालयाने त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या मालमत्तांचे / पाणीपट्टी बाबतचे नामांतर प्रकरणातील अनियमिततेबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड- ब कार्यालयाने मंजूर केलेल्या नामांतराच्या उपलब्ध करून दिलेल्या संचिकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

अ) मालमत्ता नामांतर प्रकरण तपासणी करीत असता उक्त मालमत्ता नळ कनेक्शन नामांतर करणे करीता श्री.जगन्नाथ बाबुराव वैद्य, यांनी दिनांक १८.३.२०१० रोजी अर्ज दिलेला आहे की, सौ.अर्चना उघडे यांचे नावाची मालमत्ता / नळ कनेक्शन अर्जदाराच्या नावाने नामांतर करणेत यावे. याकरीता दिनांक ०१.०६.२०१० रोजी नोटीस दिलेली आहे. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड-ब/नामांतर/१०/१४१५, दिनांक ३.६.२०१० अन्वये नामांतर झालेले आहे. नामांतर संचिका व मालमत्ता मागणी रजिस्टर प्रत्यक्ष तपासले असता मालमत्ता रजिस्टरवर श्री.ओंकार पाटील या नावाची नोंद असून त्याच नावाने मालमत्ता कर भरणा केलेला आहे. तसेच पाणीपट्टी मागणी रजिस्टरवर श्री.के.आर.वाघ या नावाने नोंद असून त्याच नावाने पाणीपट्टी कर भरणा केलेला आहे. सौ.अर्चना उघडे, यांचे नावाची नोंद नसतांना नामांतर आदेश पारीत आहे. ही बाब नियमबाह्य आहे.

ब) श्रीमती राधाबाई शालीग्राम पाटील यांनी दिनांक २१.८.२००९ रोजी अर्ज केलेला आहे की, श्रीमती रामप्यारीबाई रामेश्वर वैष्णव यांचे नावाचे उक्त मालमत्ता अर्जदाराच्या

नावाने नामांतर करण्यात यावे. याकरिता दि.७.९.२००९ रोजी नोटीस जारी केलेली आहे. अर्जासोबत सिडको कार्यालयाचे नामांतर अभिलेखे संचिकेत संलग्न आहे. (Tenement Transfer order) No CIDCo / ADM/ AEO/AUR/२००६/२२७३ दिनांक ५.९.२००६ संलग्न आहे. संबंधिताचे मालमत्ता मागणी रजि. क्र.६ पान क्र.३७ असेसमेंट क्र.४४७५ ची प्रत्यक्ष पाहणी केली असता मागणी रजिस्टरवर सौ.रामप्यारी वैष्णव ऐवजी श्री.महाविर देशपांडे या नावाची नोंद असून त्याच नावाने मालमत्ता कर भरणा झालेला आहे.

क) एन-११ B २२/३ हे घर गोपालराव मल्हारराव भोसेकर या नावाने मागणी नोंदवही क्र. ४/१७८ वर आहे. नामांतर आदेश क्र. मनपा/ वॉर्ड - ब/नामांतर २०११/१६९ दिनांक २५/१/२०११ अन्वये झालेले नामांतर मालती मधुकर येंदे यांच्या नावाऐवजी अप्पासाहेब दादासाहेब तांगड नावाने केलेले आहे. प्रत्यक्षात मालती मधुकर येंदे यांचे नांव महानगरपालिकेच्या मालमत्ता कराचे अभिलेख्यात नसतांना उपरोक्त केलेले नामांतर अयोग्य आहे. तसेच परस्पर नामांतर करून मनपाचे आर्थिक नुकसान झालेले असून केलेल्या नियमबाह्य कामाबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

तसेच एन-११ के ३२/१६ हे घर एस.काळे या नावाने असून मागणी नोंदवही २४/१९२ वर नोंद आहे. नामांतर आदेश क्र. मनपा/वॉर्ड-ब/२०१०/१०३९ दिनांक ३१.३.२०१० अन्वये आर.सी. काळे ऐवजी विश्वनाथ रंगनाथ राजगुरू या नांवे नामांतर झालेले आहे. या प्रकरणांत मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच संचिकेत विश्वनाथ रंगनाथ राजगुरू यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रावर त्यांची स्वाक्षरी नाही. प्रतिज्ञापत्र नोटरी केलेले नाही. या बाबी तपासणे वॉर्ड कार्यालयाची जबाबदारी आहे. कागदपत्रांची सविस्तर तपासणी न करताच नामांतर केले असल्याची बाब स्पष्ट होते.

ड) श्री. रमेश गणेश रामदासी प्लॉट क्र.२३, एन-८ सिडको सेवानगर यांनी त्यांच्या मालकीचा प्लॉट श्री.प्रदीप दिगंबर लाड यांना विक्री केला आहे. परंतू नामांतर संचिका तपासली असता त्यामध्ये बे-बाकी प्रमाणपत्र, शपथपत्र, दिसून आले नाही. डिमांड रजिस्टर १०/३५४ वर डिमांड दर्शविलेली नाही. करमूल्य दर्शविलेले नाही.

इ) श्रीमती सुरेखा राजकुमार जाधव मालमत्ता क्रमांक BN -६ E - १९/६ संभाजी कॉलनी BOO २७२७८ यांचे नावे असून संबंधिताने सदरील मालमत्ता श्रीमती कुशावती अच्युतराव दुधाटे यांना विक्री केली आहे. संबंधिताने नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. कार्यालयीन आदेश जा.क्र.नामांतर/३८४, दिनांक २५.२.२००९ रोजी नामांतर करण्यात आले आहे. याबाबतची नोंद रजिस्टरला दर्शविण्यात आलेली नाही. नामांतरासाठी आवश्यक शपथपत्र, बे - बाकीपत्र संचिकेत नाही. तसेच उक्त घर क्रमांकावर नळखाते क्रमांक ४२९४३ यास १/२" निवासी नळ असून श्रीमती मंगला डी पवार डीमांड रजि. ६/५ / ३०० वर कोणतेही कागदपत्र नसतांना नामांतर करण्यात आले आहे.

ई) श्री.राजकुमार बाळकृष्ण जाधव BN- E - १९/७ संभाजी कॉलनी B००२७२७९ यांचे नांवे असून संबंधिताने सदरील मालमत्ता श्री.अच्युत दत्तात्रय दुधाटे यांना विक्री केली आहे. संबंधिताने नामांतर करणेसाठी अर्ज सादर केला आहे. कार्यालयीन आदेश जा.क्र./नामांतर/३८५/ दिनांक २५.२.२००९ अन्वये नामांतर करण्यात आले. याबाबतची नोंद रजिस्टरला दर्शविलेली नाही. नामांतरसाठी आवश्यक शपथपत्र, बे-बाकीपत्र

संचिकेत नाही. तसेच उक्त घर क्रमांकावर नळखाते क्रमांक ४२९४१ व्यास १/२" निवासी नळ कनेक्शन आहे त्यावर श्री. पवार देविदास एस यांचे नांवे रक्कम रू.३२०८९/- एवढी रक्कम थकबाकी आहे.

उ) लेखापरीक्षणा दरम्यान खालील नामांतर संचिका तपासल्या असता पुढील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | मनपा रजि.नुसार मालमत्ताधारक | मा.नामांतर केलेले नांव | खरेदी खत करून देणा-याचे नांव | नामांतर आदेश क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | N-9,M-2, shop 16 | हेमा चंद्रभान खुरमुरे | वैशाली अनिल भोसले | चंद्रभान यादवराव खुरमुरे | १६/१९९९/१७.११.०९ |
| २ | N-9,M-2, shop 17 | बाबासाहेब भिकाजी ढाकणे | सिमा सुनिल भोसले | चंद्रभान यादवराव खुरमुरे | १७/१९९९/१७.११.०९ |
| ३ | N-9,M-2, shop 18 | सुनिता राजेंद्र खुरमुरे | सिमा सुनिल भोसले | चंद्रभान यादवराव खुरमुरे | १८/१९९९/१७.११.०९ |

सदरील मालमत्ता मागणी रजिस्टर पान क्र.१६,१७,१८ वर मालमत्ता धारकाचे कर भरणा नोंद तपासली असता दुकान मालक उक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत. सिडको हस्तांतर पत्र व दुय्यम निबंधक दस्त गोषवारा भाग-१ नुसार श्री.चंद्रभान यादवराव खुरमुरे यांचे नांव आहे. अ.क्र.१,२,३ या दुकानाचे नामांतर चंद्रभान यादवराव खुरमुरे यांनीच करून दिले आहे. ही बाब शंकास्पद वाटते. मालमत्ता मागणी नोंदवही मध्ये असलेल्या मालमत्ताधारका व्यतिरिक्त इतर व्यक्तीच्या नांवे परस्पर नामांतर करणे ही बाब नियमबाह्य आहे.

ऊ) म्हाडा घर क्रमांक एन-९ आर-२७-४३ मोहल्ला प्रतापगडनगर मालक अशोक लड्डा BOO४०८५१ मा.र.क्रमांक २१ पान क्रमांक २४३ असून सदरील मालमत्ता नामांतर करण्यासाठी दिनांक १०.५.२०१० रोजी अर्ज केला आहे. अर्जदार श्रीमती सुजाता शरद सोनवणे यांचे नांवे मालमत्ता नामांतर /१३१५, दिनांक २०.९.२००९ रोजी नामांतर केले आहे. नामांतर करण्यासाठी आवश्यक खरेदीखत, बे-बाकी प्रमाणपत्र, म्हाडा हस्तांतर, आदेश संचिकेत दिसून आलेले नाही. तसेच मिळकत विकणा-याचे नांव जयप्रकाश नंदलाल लड्डा व मालमत्ता मागणी रजिस्टरवर अशोक लड्डा असे वेगवेगळे दर्शविण्यात आले आहे.

म्हाडा घर क्रमांक एन-९ आर-२७-४४ मोहल्ला प्रतापगडनगर मालक दिपक गजानन गुजराती BOO४०८५० मालमत्ता रजिस्टर क्र.२१ पानक्रमांक २४५ असून मालमत्ता नामांतर करण्यासाठी दिनांक १०.५.२०१० रोजी अर्ज केला आहे. अर्जदार सौ.कल्पना नितीन मोरे यांचे नांवे नामांतर १३१६, दिनांक निरंक दर्शवून नामांतर केले आहे. नामांतर करण्यासाठी आवश्यक खरेदी खत, बे-बाकी प्रमाणपत्र, आदेश संचिकेत दिसून आलेला नाही.

म्हाडा घरक्रमांक एन-९, आर-२६-७२ मोहल्ला रायगडनगर मालक शिरे BOO२६८५१ मालमत्ता रजिस्टर क्र.७, पान क्र. १४४/१४५ असून मालमत्ता नामांतर करण्यासाठी दिनांक २०.३.२०१० रोजी अर्ज केला आहे. अर्जदार सुरेखा दिवाणसिंग चव्हाण यांचे नावें नामांतर /१०१३ दिनांक २९.३.२००९ रोजी म्हणजेच अगोदरच झाले आहे. नामांतरासाठी आवश्यक खरेदीखत, बे-बाकी प्रमाणपत्र म्हाडा हस्तांतर आदेश

संचिकेत दिसून आलेला नाही. संचिकेत मालमत्ता विकणा-याचे नांव व्ही.एन.भोसले म्हाडा हस्तांतर पत्र क्रमांक ६९५६ दिनांक ९.११.२००५ अन्वये आहे व महानगरपालिका मालमत्ता रजिस्टरवर श्री.शिरे यांचे नांव आहे. मालमत्ता मागणी नोंदवही मध्ये असलेल्या मालमत्ता धारका व्यतिरिक्त इतर व्यक्तीच्या नांवे परस्पर नामांतर करणे ही बाब नियमबाह्य आहे.

ए) श्री. अनिल कुमार खन्ना,मालमत्ता क्रमांक N-५ J-२ यांचे मालकीची मालमत्ता विक्री केलेली आहे. नविन मालक विनोद नरहरी प्रसाद कपूर व सौ.मधुबाला विरेंद्र कपूर यांनी मालमत्ता खरेदी केली आहे. नामांतर व कर विभाजनासाठी संचिकेमध्ये संबंधितांचा अर्ज, बेबाकी प्रमाणपत्र, शपथपत्र व नामांतर फीचा भरणा केलेला नाही. रजिस्टर क्र.७, पान क्रमांक २२७ वर नामांतर जा.क्र.मनपा/वॉर्ड-ब/नामांतर/१७१०, दिनांक २९.९.२००९ अन्वये नामांतर करून विभाजन करण्यात आलेले आहे.

ऐ) सौ.कविता संजय काबरा, मोहल्ला सह्याद्रीनगर N-५ ६८०, सिडको यांनी सादरील मालमत्ता खरेदी केली असून नामांतराबाबत संचिकेत विनंती अर्ज, शपथपत्र, बे-बाकी प्रमाणपत्र नाही. औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) यांनी त्यांचे अभिलेख्यात खालील प्रमाणे नामांतर केलेले आहे.

| अ.क्र. | प्रथम मालक | नंतरचे मालक | जावक क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | यादव मनोहर कुलकर्णी | वसुंधरा चिंतामणी फडके | जा.क्र./निरंक<br>२०.२.१९९९ |
| २ | वसुंधरा चिंतामणी फडके | कविता संजय काबरा | जा.क्र./३९५७/म्हाडा<br>३०.६.२००३ |

महानगरपालिकेने नामांतर जा.क्र./४६/०७, दिनांक ११.१.२००७ अन्वये कविता संजय काबरा यांचे नांवे करण्यात आले आहे. खरेदी खत क्रमांक २५५४ दिनांक १२.८.२००३ दस्त गोषवारा भाग-१ पाहिला असता खरेदी करून देणारा श्री.बाबुराव बुधाजी झाडे यांचे नाव आहे.

विभागाने मालकी हक्काचे कागदपत्र, मालमत्ता कर व पाणीपट्टीची थकित रक्कम संबंधितांकडून वसूल केलेली आहे, या बाबींची तपासणी केलेली आहे काय ? असल्यास मालकी हक्काच्या कागदपत्रासह मालमत्ता कर व पाणीपट्टी थकीत नसल्याबाबतचे बे-बाकी प्रमाणपत्रासह स्वतंत्रपणे खुलासा करावा. नामांतर करतांना मालकी हक्काच्या कागदपत्रानुसार नामांतर केलेले नसल्याने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करावे. तसेच उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.७१: मोकळ्या जागांच्या कर आकारणी बाबत.**

वॉर्ड - ब कार्यालयाच्या लेखापरीक्षणा दरम्यान मोकळ्या जागेच्या कर आकारणी प्रकरणे अत्यल्प पाहावयास मिळाली. वॉर्ड - ब कार्यालयास मोकळ्या जागेच्या कर आकारणीचे अभिलेखे मागितली असता लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत अभिलेखे उपलब्ध करून दिलेली नाहीत. वॉर्ड - कार्यालयास कर आकारणीचे अधिकार प्रदान केलेल्या कालावधीमध्ये वॉर्ड कार्यालयाने किती मोकळ्या जागांना कर आकारला याची माहिती प्राप्त झालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम -१९४९ चे कलम १३२ प्रमाणे मोकळ्या जागेस मालमत्ता कर आकारण्याची तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे अनुसूची - ड चे प्रकरण (८) चे कलम (४) अन्वये निबंधकाकडून माहिती मागविण्याची तरतूद असून त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आलेले नाही.

महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने नविन बांधकाम केलेल्या मालमत्तांच्या सर्वेक्षणा अन्वये कर आकारल्या जातो. पंतू या सर्वेक्षणात मोकळ्या जागेचे सर्वेक्षण केलेले दिसून आलेले नाही. नागरीक ज्यावेळी मनपाकडे बांधकाम परवानगीसाठी अर्ज करतात त्यावेळीच त्यांना मोकळ्या जागेचा कर भरणा करावा असे नगररचना विभागा कडून सांगितले जाते. तद्नंतरच मोकळ्या जागेचा कर आकारणी करण्यासाठी नागरीक कर आकारणी विभागाशी संपर्क साधतात. वॉर्ड - ब कार्यालया अंतर्गत मोकळ्या जागेची कर आकारणी झालेली नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच यापुढेही होत आहे.

वॉर्ड - ब कार्यालयाच्या अधिकार क्षेत्राबाबतचे येणा-या मोकळ्या जागेस कर आकारणी करावी, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

# वॉर्ड -ई कार्यालय
# सन २००६-०७ ते सन २०११-१२
# चालू लेखापरीक्षण अहवाल

**<u>प्रस्तावना :</u>**

महानगरपालिके अंतर्गतच्या वॉर्ड - ई कार्यालयाचे सन २००६-०७ ते सन २०११-१२ पर्यंतचे जमा बाजूचे चाचणी स्वरूपाचे नियमित लेखापरीक्षण उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानुसार करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने मालमत्ता वसूली पावती पुस्तके व पाणीपुरवठा पावती पुस्तकांमध्ये वसूल केलेली रक्कम इरसाल रजिस्टरसोबत वेळोवेळी संबंधित विभागामार्फत भरणा केल्याबाबत तपासणी करण्यात आली असून डिमांड रजिस्टरची सुध्दा तपासणी करण्यात आली आहे. तपासणी दरम्यान जमा बाजूचे एकूण **२३** परिच्छेद समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

**<u>वॉर्ड अधिकारी यांच्या कार्यकाळाबाबत :</u>**

सन २००६- २००७ ते सन २०११-१२ या कालाधीत वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता म्हणून कार्यरत अधिका-यांची नांवे आस्थापना -१ विभागाकडून प्राप्त झालेली आहेत ती खालीलप्रमाणे -

**वॉर्ड अधिकारी -ई**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री.एस.आर.जरारे | ०१.०३.२००७ ते ३०.११.२००८ |
| २ | श्री.अंकुश लाड | ०१.१२.२००८ ते १९.०८.२००९ |
| ३ | श्री.मनोहर सुरे | २०.०८.२००९ ते १५.१०.२००९ |
| ४ | श्री.सी.एम.अभंग (अ.का.) | ०४.०५.२००९ ते ०३.०६.२००९ |
| ५ | श्री.अंकुश लाड | १६.१०.२००९ ते ०३.०१.२०१० |
| ६ | श्री.टी.जी.जाधव | ०५.०६.२०१० ते २०.१२.२०१० |
| ७ | श्री.डी.डी.सुर्यवंशी | २१.१२.२०१० ते २९.०४.२०११ |
| ८ | कु.शुभांगी आंधळे | ३०.०४.२०११ ते ०३.०६.२०११ |
| ९ | श्री.एन.एल.चव्हाण | ०४.०६.२०११ ते ०३.०४.२०१२ |
| १० | श्री.भालचंद्र पैठणे | ०४.०४.२०१२ ते आजपावेतो |

**<u>लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-याची नांवे :</u>**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक श्री.मो.रा.थत्ते यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे -

१. श्री.नासेर लईख, वरीष्ठ लिपीक, (पथक प्रमुख)
२. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक
३. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक
४. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक
५. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक
६. श्रीमती पंचशिला खरात, कनिष्ठ लिपीक

प्रभाग - ई कार्यालयाकडील प्रलंबित लेखा परीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे -

सन २००८-२००९ परि.क्र.१,२,३,४

**परिच्छेद क्र.१:** सन २००६-०७ ते सन २०१०-२०१२ च्या मागणी रजिस्टरची वार्षिक ताळेबंद देणे बाबत.

सन २००६-२००७ ते सन २०११-२०१२ या कालावधीमध्ये मागणी रजिस्टरचा वार्षिक ताळेबंद वॉर्ड- ई कार्यालयाकडून मागविण्यात आला असून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

| **मालमत्ता कर** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क** | **वर्ष** | **थकित रक्कम** | **त्यापैकी वसूल रक्कम** | **टक्केवारी** |
| १ | २००६-०७ | ३६४७७४१७/- | ६०७८००२/- | १६.६६% |
| २ | २००७-०८ | ३६८२७२१०/- | १०६३०९२४/- | २८.८६% |
| ३ | २००८-०९ | ५६८३९१००/- | २१२५४८७७/- | ३७.३९% |
| ४ | २००९-१० | ५०२७३४६६/- | २००९८००७/- | ३९.९७% |
| ५ | २०१०-११ | ३४९६८०८२/- | २०४००५०२/- | ०५.८३% |
| ६ | २०११-१२ | ३२२०९५९५/- | २७६१४८२३/- | ८५.७३% |
| | सरासरी टक्केवारी | | सरासरी टक्केवारी | **३५.७४%** |

| **मालमत्ता कर** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क** | **वर्ष** | **चालू मागणी रक्कम** | **त्यापैकी वसूल रक्कम** | **टक्केवारी** |
| १ | २००६-०७ | १०३६६६९३/- | ३९३८८९८ | ३७.९९% |
| २ | २००७-०८ | ११३९६६९३/- | ७०१८७९० | ६१.५८% |
| ३ | २००८-०९ | २३३३९४८९/- | ११५१२३९७ | ४९.३२% |
| ४ | २००९-१० | २६४४९४०२/- | १५१७३०४६ | ५७.३६% |
| ५ | २०१०-११ | २६८७२१५८/- | १७९१४००७ | ६६.६६% |
| ६ | २०११-१२ | ३५६०३६२६/- | २४२६८९५३ | ६८.१६% |
| | | | सरासरी टक्केवारी | **५६.८४%** |

| **पाणीपट्टी कर** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क** | **वर्ष** | **थकबाकी रक्कम** | **त्यापैकी वसूल रक्कम** | **टक्केवारी** |
| १ | २००६-०७ | ४२६००००/- | १०१३०६७५/- | २३.७८% |
| २ | २००७-०८ | ५१६७६६१५/- | ११३९१८६२/- | २२.०४% |
| ३ | २००८-०९ | ३७००००००/- | १०७५२३९१/- | २९.०६% |
| ४ | २००९-१० | ६७१३०१७९/- | १२९०९०१२/- | १९.२२% |
| ५ | २०१०-११ | ६७०१९७७२/- | ९४२५५०५/- | १४.०६% |
| ६ | २०११-१२ | ७४६७३७५४/- | १४९१६१३९/- | १९.९७% |
| | | | सरासरी टक्केवारी | **२१.३५%** |

| पाणीपट्टी कर | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क** | **वर्ष** | **चालू मागणी रक्कम** | **त्यापैकी वसूल रक्कम** | **टक्केवारी** |
| १ | २००६-०७ | २२५००००००/- | ७२५९०७६/- | ३२.२६% |
| २ | २००७-०८ | २४५५५९१०/- | ९४१४५९७/- | ३८.३३% |
| ३ | २००८-०९ | २८००००००/- | ८९०७९७३/- | ३१.८१% |
| ४ | २००९-१० | २५९८४०३२/- | १३१८५४२७/- | ५०.७४% |
| ५ | २०१०-११ | २८५८२४३५/- | ११५२०३४८/- | ४०.३०% |
| ६ | २०११-१२ | ३१४४०६८०/- | १३६९६७०२/- | ४३.५६% |
| | | | सरासरी टक्केवारी | **३९.५%** |

वॉर्ड -ई प्रभागाने चालू मागणी, थकबाकी इ.चा दिलेला तक्ता सोबत जोडला आहे. वॉर्ड -ई कार्यालयातील मागणी रजिस्टरचा वार्षिक ताळेबंद (प्रत्येक मागणी रजिस्टरनुसार ) मागील शिल्लक + चालू येणे = एकूण येणे मधून वसूल वजा जाता वर्षाअखेरची शिल्लक, तसेच डिमांड वसूल रक्कम, किर्द वसूलीबरोबर जुळणे आवश्यक आहे व त्यास सक्षम प्राधिकृत अधिकारी यांनी ताळेबंद तपासणी करून प्रमाणित केला असावा. याप्रमाणे आवश्यक असतांना विभागाने अंदाजित रक्कम दाखवून लेखापरीक्षण विभागास चूकीचा ताळेबंद दिला आहे. ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असून प्रशासनाची दिशाभूल करणारी आहे.

मालमत्ता व पाणीपट्टी कर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा आर्थिक स्त्रोत असून वेळीच वसूल होणे आवश्यक असतांना मालमत्ता कराची **थकित रकमेची एकूण वसूली** मागणीच्या तुलनेत **सरासरी ३५.७४% एवढीच** आहे व **चालू मागणीच्या तुलनेत ५६.८४ एवढी आहे.** तद्वतच पाणीपट्टी कराची **थकबाकी रकमेची मागणीच्या तुलनेत वसूली सरासरी २१.३५% व चालू मागणीच्या तुलनेत वसूली सरासरी ३९.०५% एवढी आहे.** यावरून स्पष्ट होते की, **एकंदरीत वसूली अत्यंत कमी** असून विभागाने वसूली करणे करीता विशेष असे प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत, त्यामुळे थकित रकमेचे प्रमाण वाढून वसूली कमी होत आहे. परिणामी मोठ्या प्रमाणात **महानगरपालिकेची आर्थिक हानी होत आहे** व नागरी सुविधा पुरविण्याकरीता करावयाच्या विकासकामावर विपरीत परिणाम होत आहे.

विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम ७६ प्रमाणे पूर्तता करून १००% वसूलीसाठी विशेष प्रयत्न करून, थकित करांची पूर्ण वसूली करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२:** मालमत्ता कराच्या मूल्य निर्धारणानुसार मागणी रजिस्टरमध्ये नोंदी अद्ययावत करणे बाबत.

प्रभाग -ई कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या विविध मालमत्तांचे मागणी रजिस्टर तपासले असता असे निदर्शनास आले की, कर निर्धारण व संकलन विभागाने वेळोवेळी निर्धारण केल्याप्रमाणे प्रभाग कार्यालयातील मालमत्तांचे मूल्य निर्धारणाची नोंद संबंधित मालमत्ता मागणी नोंदवहीत नोंदविलेली नाही. उपलब्ध करून दिलेल्या अभिलेखा वरून उदाहरणादाखल खालील प्रमाणे वर्षनिहाय तपशिल देण्यात येत आहे.

**सन २००७-२००८**

| अ. क्र. | मालमत्ता धारकाचे नांव | मोहल्ला | वर्ष | करमूल्य योग्य NRV | एकूण मालमत्ता कर |
|---|---|---|---|---|---|
| १ | आदील खान अझहर नवाब व इतर | अखिलनगर गारखेडा | १.४.२००७ पासून | ४३,३४०/- | ३४,४५५/- |
| २ | सौ.शशिकला गजानन सुरासे (गजानन ॲटो सर्व्हीस) | प्लॉट क्र.९ अलंकार हॉ.सो.गारेखडा | १.४.२००७ पासून | २२,३३५/- | १७,७५७/- |
| ३ | गोविंद श्रीहरी पाटील | १२०, शिवाजीनगर | १.४.२००६ पासून | १,४०,८८६/- | १,७२,००५/- |
| ४ | श्री.पी.एस.धुत | एन-२, सिडको स्टार-ए | १.४.२००६ पासून | १७,११४/- | १३,६०५/- |
| ५ | श्री.जे.जी.रंधवा | हॉटेल जेन्टलमन प्लॉट नं- ७६, एन-२, सिडको | १.४.२००६ पासून | १,०४,१९९/- | ८२,८३९/- |
| ६ | श्री.टाकळकर | एन-२, सिडको | १.४.२००६ पासून | १०,५४१/- | ८,३७९/- |
| ७ | श्री.पी.व्ही.कसबेकर व इतर | प्लॉट नं.२६५ एन-४, सिडको | १.४.२००६ पासून | २७७६/- ९९७९/- | ९,२२८/- |
| ८ | श्री.एल.एन.जैस्वाल व पी.एन.चौधरी | प्लॉट नं.१, एन-४, सिडको | १.४.२००६ पासून | ५९०८/- १०१८४/- | १०,८४४/- |
| | | | **एकुण** | **३,६७,२६२/-** | **३,४९,११२/-** |

**सन २००८-२००९**

| अ. क्र. | मालमत्ता धारकाचे नांव | मोहल्ला | वर्ष | करमूल्य योग्य NRV | एकूण मालमत्ता कर |
|---|---|---|---|---|---|
| १ | सौ.लता यशवंत जाधव | प्लॉट नं.७, एन-४ सिडको | १.४.२००६ पासून | १५,६३१/- | १०,२३२/- |
| २ | श्री.रामचंद्र बाबुराव नवपुते | बी-८०, ठाकरेनगर एन-२, सिडको | १.४.२००६ पासून | ११,५६७/- | ८,१२४/- |
| ३ | डॉ.विवेक जगन्नाथ शिंदे | प्लॉट नं.६२, ठाकरेनगर एन-२, सिडको | १.४.२००६ पासून | ५९,७२५/- | ४४,५१७/- |
| | | | **एकुण** | **८६,९२३/-** | **६२,८७३/-** |

**सन २००९-२०१०**

| अ. क्र. | मालमत्ता धारकाचे नांव | मोहल्ला | वर्ष | करमूल्य योग्य NRV | एकूण मालमत्ता कर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.ज.जी.चव्हाण | एफ-१०७, बी एन-४, सिडको | १.४.२००६ पासून | १२,३५१/- | २१,९१३/- |
| २ | भारतीय समाजसेवा केंद्र | विवेक हॉ.सो. | १.४.२००६ पासून | ४१,७७५/- | ३३,२११/- |
| ३ | प्रकाश लक्ष्मण ताकांड | एन-२, सिडको | १.४.२००६ पासून | १२,४३१/- २,०४१/- | १०,८३२/- |
| ४ | श्री.एम.डी.जैस्वाल विवेकानंद कोचिंग क्लासेस | मुकुंद हौ.सो. | १.४.२००६ पासून | १४,६५०/- | ११,६५२/- |
| | | | **एकुण** | **८३,२४८/-** | **७७,६०८/-** |

वरील तपशिला वरून स्पष्ट होते की, कर निर्धारण व संकलन विभागाने प्रभागास पाठविलेल्या समरी रजिस्टर वरून मागणी नोंदवहीत नोंदी न घेतल्या मुळे मालमत्ताधारकांना मागणीची नोटीस पाठविली जात नाही व म.न.पा. **रु.४,८९,५९३/= एवढ्या उत्पन्ना पासून वंचित राहीली आहे.** या बाबत जबाबदारी निश्चित करून वसूली करून विभागाने अनुपालन दर्शवावे. **तसेच अशा सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन नोंदी परिपूर्ण करून व अनुषंगिक वसूली करून लेखापरिक्षणास अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३:** सन २००७-०८ ते सन २०११-१२ या वर्षात वॉर्ड - ई कार्यालयात वापरलेले मालमत्ता पावती पुस्तक, पाणीपट्टी वसूली पावती पुस्तक, जनरल पावती पुस्तक व अकृषिकर पावती पुस्तकातील वसूलीबाबत.

नियमित लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूंच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यांत आली असता खालील पावती पुस्तकांची वर्षनिहाय पडताळणी रोखकिर्द सोबत करण्यात आली.

| अ.क्र. | सन | मालमत्ता पुस्तक | पाणीपुरवठा | जनरल | अ.कृषीकर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००७-०८ | ५५ | ९७ | १० | -- |
| २ | २००८-०९ | ८२ | ८७ | १० | -- |
| ३ | २००९-१० | ८८ | ९६ | १६ | -- |
| ४ | २०१०-११ | ९१ | ८४ | १७ | ०५ |
| ५ | २०११-१२ | ११२ | ९५ | १५ | ०८ |
| | | **४२८** | **४५९** | **६८** | **१३** |

उक्त पावती पुस्तकांद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेवून महापालिका फंडात रक्कम जमा केल्याबाबतची तपासणी करण्यात आली. वसूली संबंधीच्या आक्षेपाची नोंद स्वतंत्रपणे घेण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्र.४:** आर्थिक वर्ष सन २००६-०७ ते सन २०११-१२ या कालावधीत वॉर्ड- ई अंतर्गत काम करणा-या कर्मचा-यांचा जॉबचार्ट मिळणे बाबत.

वॉर्ड - ई अंतर्गत सन २००६-०७ ते सन २०११-१२ या कालावधीत कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या कामकाजाच्या जॉबचार्ट लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्याबाबत विभागाने असमर्थता दर्शविलेली आहे. त्या अभावी कर्मचा-यांचे कामकाजावर परिणामकारक नियंत्रण कसे ठेवले जाते व जबाबदारी कशी निश्चित केली जाते हे स्पष्ट होवू शकले नाही. कर्मचा-यांचा कामकाजाच्या जॉबचार्ट निश्चित करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.५:** रोख नोंदवही व चालान सक्षम प्राधिका-याने प्रमाणित न केल्याबाबत.

सन २००६-०७ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे वॉर्ड- ई विभागाच्या लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, विभागा अंतर्गत विविध कर वसुलीच्या नोंदी रोख नोंदवही मध्ये घेण्यात आल्या आहेत. मात्र नोंदवहीवर सक्षम प्राधिका-याने साक्षांकन करून प्रमाणित केलेले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम ७९ नुसार विभागाने पूर्तता करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६:** पाणीपट्टी / मालमत्ताधारकांकडून वसूल केलेल्या कराचा मनपा फंडात कमी भरणा करणे बाबत.

महाराष्ट्र नगरपरिषद संहिता १९७१ चे नियम ११ प्रमाणे वसूल केलेली रक्कम महानगरपालिका फंडात त्वरित भरणा करणे आवश्यक आहे. प्रभाग-ई या कार्यालयाचे लेखापरीक्षणादरम्यान मालमत्ता, पाणीपट्टी करापोटी व जनरल पावती पुस्तकांआधारे वसूल करण्यात आलेल्या रकमांपैकी इरसाल रजिस्टरमध्ये नोंदी घेतांना बेरजेत तफावत, पावतीची रक्कम वसूल करून इरसाल रजिस्टरला कमी भरणा करणे, आक्षेपाअंती कमी भरणा केलेली रक्कम वसूल होणे, इत्यादी कारणांमुळे कमी भरणा झालेला आहे. असा कमी झालेला भरणा तात्काळ महानगरपालिका फंडात जमा करणे क्रमप्राप्त होते, तसे केलेले नसल्याने लेखा संहितेतील उपरोक्त कलमांचा भंग झालेला आहे. जबाबदारी निश्चित करून लेखापरिक्षणास अनुपालन दर्शवावे.

१. पाणी पुरवठा पावती पुस्तक क्रमांक ३५६३ पावती क्रमांक ३५६२२१, दिनांक ३१.३.२००९ अन्वये रक्कम रू.३६०० श्री.नईमखान कडु खान पठाण, विमाननगर,चिकलठाणा यांच्याकडून रोख रक्कम वसूल केली. मात्र प्रत्यक्षात इरसाल (कॅश बुक) रजिस्टर क्रमांक १० पान क्रमांक २६ वर दिनांक ३१.३.२००९ अन्वये रक्कम रू.१८०० इतक्या रकमेचा भरणा करण्यात आल्याची नोंद आहे. याबाबत संबंधितांना अर्धसमासाद्वारे कळविले असता आक्षेपाअंती रक्कम रूपये १८०० चा कमी भरणा पावती क्र. F१-१०४/१३०२७, दिनांक ७.५.२०१२ रोजी मनपा फंडात करण्यात आला आहे. **सदर रक्कम रू.१८००/- म.न.पा.निधिच्या बाहेर ठेवून तीन वर्षापर्यंत त्याचा वापर करण्यात आला आहे,** याची जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

२. पाणी पुरवठा कर पावती पुस्तक क्रमांक ३३९५ पावती क्रमांक ३३९४७५ दिनांक १३.३.२००९ अन्वये रक्कम रू.३७५०/- ची श्रीमती विमा तीनधवन रा.एन-३, प्लॉट क्र.३५९/ए-८ यांच्याकडून रोख वसूल केली. मात्र इरसाल (कॅश बुक) रजिस्टर क्रमांक ९ पान क्र. ६, दिनांक १३.३.२००९ रोजी एकूण रक्कम रू.३१५०/- इतक्या रकमेचा भरणा करण्यात आल्याची नोंद आहे. म्हणजेच रक्कम रू.६००/- च्या कमी भरणा रकमेबाबत अर्धसमासाद्वारे विभागास कळविण्यात आले असतांना विभागाने आक्षेपाअंती रक्कम रू.६००/- चा भरणा पावती क्र.F-१०४ /१३०१३, दिनांक ७.५.२०१२ रोजी मनपा फंडात करण्यात आला. **सदर रक्कम रू.६००/- म.न.पा.निधिच्या बाहेर ठेवून उपरोक्त कालावधी करीता त्याचा वापर करण्यात आला आहे,** याची जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

३. मागणी रजिस्टर क्रमांक ४ पान क्रमांक १७९ वर नोंद घेतांना मागील थकबाकी सह सन २००६ ते २०१२ नुसार रक्कम रूपये १०,८००/- एवढी वसूल करावयास पाहिजे असतांना रक्कम रू.९०००/- वसूली करण्यात आली आहे. म्हणजेच रक्कम रू.१८००/- चा कमी भरणा केला आहे. **रक्कम रू.१८००/- संबंधितांकडून वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करणे आवश्यक आहे.**

४. श्री.राहुल शामनारायण कुमावत, प्लॉट नं.२, ४-१५-४७४/२ स्वप्ननगरी मालमत्ता कर वसूली पा.पु.क्र.११३५ पा.क्र.११३४६० मध्ये रक्कम रू.१७०१९/- वसूल केली प्रत्यक्ष कॅश रजिस्टर मध्ये भरणा रूपये १६४४६/- कॅश रजिस्टर क्र.५ पा.क्र.१४ वर जमा केली म्हणजेच रक्कम रूपये ५७३/- चा कमी भरणा केल्याचे दिसून येते. रक्कम **रू.५७३/- संबंधितांकडून वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करणे आवश्यक आहे.**

५. मालमत्ता बुक क्रमांक १३२६ पावती क्रमांक १३२५०३ अन्वये मालमत्ता कर वसूल करतांना व एकूण रक्कम ७८०० वसूल करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात एकूण बेरीज ७५०० एवढीच रक्कम जमा करण्यात आली. **म्हणजेच रक्कम रू.३००/- चा कमी भरणा केला आहे.**

उपरोक्त मुद्या क्र.१ व २ बाबत संबंधित विभागाने आक्षेपाअंती रकमेचा भरणा केलेला असल्यामुळे तात्पुरता अपहार केल्याचे सिध्द होते. तसेच बेरजेत तफावत असलेल्या रकमा ज्या लेखापरीक्षणा दरम्यान निदर्शनास आल्या अशी **रक्कम रू.२६७३/-महानगरपालिका फंडात भरणा केलेली नाही म्हणजेच उपरोक्त रकमेचा अपहार केल्याचे दिसून येते. संबंधितांनी लेखा संहितेतील तरतूदींचा भंग केलेला असल्यामुळे अपहृत रक्कम वसूल करावी व जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.**

**परिच्छेद क्र.७:** धनादेश पावती पुस्तके उपलब्ध करून देणे बाबत.

प्रभाग - ई या विभागाचे सन २००६-०७ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड कार्यालयास भांडार विभागाने १०० धनादेश पावती पुस्तके वितरीत केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. प्राप्त माहितीनुसार एकूण १०० धनादेश पावती पुस्तके वितरीत करण्यात आलेले असतांना संबंधित विभागाने लेखापरीक्षण पथकास केवळ ४३ धनादेश पावती पुस्तके उपलब्ध करून दिलेली आहे. उर्वरीत ५७ पावती पुस्तके उपलब्ध करून दिलेली नाहीत.

प्रभाग - ई कार्यालयात धनादेश पावती पुस्तके ही धनादेशाकरीताच वापरली गेलेली नसून त्या पावती आधारे रोख रकमा सुध्दा वसूल केल्याचे लेखापरीक्षणा दरम्यान निदर्शनास आलेले आहे. भांडार विभागाने पुरवठा केलेल्या १०० धनादेश पावती पुस्तकांपैकी ४३ पावती पुस्तकांचा हिशेब प्राप्त होणे व उर्वरीत ५७ पावती पुस्तके उपलब्ध न होणे ही बाब गंभीर आहे. तसेच ५७ धनादेश पावती पुस्तकांमधून रक्कम वसूल झाली किंवा कसे या बाबत लेखापरिक्षणात खात्री करता आलेली नाही. प्रशासकीय स्तरावर याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेविरूध्द स्वतंत्रपणे खाते चौकशी प्रस्तावित होणे आवश्यक वाटते.

**परिच्छेद क्र.८:** धनादेश पावती पुस्तक क्र.१९१ मधील अ.क्र.१ ते ४ च्या मूळ प्रती व स्थळ प्रत पुस्तकातून गहाळ असल्याबाबत.

प्रभाग-ई या विभागाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ चे लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, धनादेश पावती पुस्तकातील अ.क्र.१,२,३ व ४ या पावत्यांच्या मूळ प्रती व स्थळ प्रती पुस्तकात उपलब्ध नव्हत्या. त्याचप्रमाणे पुस्तकाच्या शेवटच्या पावतीवर उपरोक्त पावत्या पुस्तकात उपलब्ध नाहीत याबाबत प्रमाणपत्र देखील दिलेले नव्हते.

अशा प्रकारे जर ०४ पावत्या धनादेश पुस्तकात उपलब्ध नाहीत तर ही बाब संशयास्पद असून वॉर्ड - ई कार्यालयात धनादेश पावती पुस्तकातील पावत्या या धनादेशासोबत रोख रकमा सुध्दा वसूल करण्यासाठी वापरण्यात आलेल्या असल्यामुळे त्या पावत्यांआधारे किती रक्कम वसूल केली गेली असेल याचा बोध होत नाही. याबाबत ज्या कर्मचा-याच्या नांवे  पावती पुस्तक वितरीत करण्यात आलेले आहे त्यांचेवर जबाबदारी निश्चित  करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९**:  धनादेश पावती पुस्तकात मूळ प्रत व स्थळ प्रत उपलब्ध नसल्याबाबत.

धनादेश पावती पुस्तक क्र. **११४,** पावती क्र.**११४००**, धनादेश पावती पुस्तक क्र.**१८३** पावती क्र.**१८२०२ ते १८२०५ व १८३००** तसेच धनादेश पावती पुस्तक क्र.**१०८** पावती क्र.  **१ ते ८** मधील पावत्यांच्या मूळ प्रत व स्थळ प्रत लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेल्या नाहीत. लेखापरीक्षणा दरम्यान असेही निदर्शनास आले की, धनादेश पावती पुस्तकांमधील पावती अन्वये रोख रक्कम वसूल केलेली आहे.

**याबाबत ज्या कर्मचा-यांच्या नांवे धनादेश पावती पुस्तक वितरीत केलेले आहे. त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून उपरोक्त पावत्यांन्वये वसूल केलेल्या रकमेची शहानिशा करून महापालिका फंडात रक्कम जमा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.**

**परिच्छेद क्र.१०:** धनादेश क्रमांक चुकीचे असल्याबाबत.(रक्कम रू.१३९४/-)

मालमत्ताधारक अरविंद तेजराव काकुळते F-No-११, B विंग उद्योग स्नेह अपार्टमेंट, यांनी रक्कम रूपये १३९४/- धनादेश क्रमांक ५७०९७७ दिनांक ३१.३.२००९ अन्वये धनादेश पावती क्रमांक १०७४८ अन्वये धनादेश दिला आहे.

परंतु डिमांड रजिस्टर क्रमांक २१९/१२१ वर पाहिले असता सन २००८-०९ पैकी रक्कम रूपये ६९७/- मा.पा.पु. क्रमांक ६०६/६०५०१ दिनांक ३१.३.२००९ धनादेश क्रमांक ०७७५०१ द्वारे भरणा केला आहे. म्हणजे उक्त कालावधीत धनादेश पावती द्वारे वेगळा धनादेश व डीमांड रजिस्टरवर वेगळा धनादेश दर्शवून वेगवेगळी रक्कम वसूल केल्याचे दिसते.

याबाबत विभागाने खातरजमा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११:** मालमत्ता धारकाकडील नळ कनेक्शन बंद असतांना संबंधितांकडून धनादेश पावती आधारे रक्कम वसूल करून मनपा फंडात भरणा न करणे बाबत.

वॉर्ड -ई कार्यालय येथे सन २००६-०७ ते सन २०११-१२ या कालावधीचे लेखापरीक्षण कार्यरत असून पाणीपट्टी धारक श्री.व्ही.एम.विश्वरूपे, खाते क्रमांक ३४७४१ मोहल्ला N-२,M१ २२/६ रक्कम रूपये ३६००/- धनादेश पावती बुक क्रमांक १२/११६७ अन्वये २१.८.२००७ उक्त रक्कम वसूल केलेली आहे.

परंतु संबंधिताचे डीमांड रजिस्टर क्रमांक N-२ M१ २२/६ पान क्रमांक १५८ पाहिले असता संबंधिताचा नळ बंद दर्शविलेला आहे. म्हणजे नळ बंद असतांना उक्त रक्कम धनादेश पावतीद्वारे रोख वसूल केली असल्याचे दिसून येते.

धनादेश पावतीद्वारे वसूल केलेली रक्कम ही धनादेशाच्या आधारे वसूल करणे क्रमप्राप्त होते. परंतू संबंधितांनी मालमत्ताधारकाकडून **रू.३६००/- रोख वसूल करून महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ चे नियम क्र. (३) चा भंग केलेला आहे. त्याचप्रमाणे वसूल केलेली रक्कम महानगरपालिका फंडात भरलेली नसल्याने अपहार केल्याचे सिध्द होते.** संबंधित कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती वसूल रक्कम मनपा फंडात भरणा करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२:** धनादेश पावतीद्वारे वसूल केलेली रोख रक्कम रूपये १,०५,३५५/- च्या अपहाराबाबत.

प्रभाग - ई या विभागाचे लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, धनादेश पावती द्वारे रोख रक्कम वसूल करून महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम क्र. (३) चा भंग केलेला आहे.

खालील पावत्यांच्या आधारे संबंधित नागरीकांकडून धनादेश पावतीद्वारे रोख रकमेची वसूली करून मालमत्ता कर / पाणीपट्टी या कराची पावती न फाडता, त्याचप्रमाणे रक्कम **रूपये १,०५,३५५/- महानगरपालिका फंडात भरणा न केल्यामुळे अपहार झाल्याचे सिध्द होते.**

| **अ.क्र.** | **नांव व पत्ता** | **धनादेश पावती पुस्तक क्रमांक / पान क्रमांक व दिनांक** | **रोख रक्कम रूपये** |
|---|---|---|---|
| १ | सय्यद युसुफोदद्दीन, विठ्ठलनगर | १५१७४/१५२<br>५.१.१० | १०००/- |
| २ | बी.बी.दौड , N-२ P-२-५/१ | १३४७५/१३५<br>१५.१.१० | ८०४४/- |
| ३ | हिरामन पंडीत खडसे N-२ Q ७१६ | १३४८५/१३५<br>१६.७.१० | ४६४३/- |
| ४ | विजय के कुलकर्णी, n-२-p-३-५/१ | १८१५४/१८२<br>१७.८.१० | ५६६४/- |
| ५ | रविंद्र आर दिक्षित कु.भार्गवी दिक्षित, विद्यागिरी अपार्ट. F.no.७, ८ | १५५११/१५६<br>२२.१२.०९ | ५५३८/- |
| ६ | कुलकर्णी रामचंद्र केशव मयुर टेरेस F A २८ | १५५२७/१५६<br>३.३.१० | २४०१/- |
| ७ | दत्तात्रय चौधरी, जयभवानी हौ.सो. | १५५२८/१५६<br>८.३.१० | १५६६१/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | प्रवीण प्रभाकर केदारे, गजानन कॉलनी | १५५३०/१५६ १४.३.१० | ५२४७/- |
| ९ | अरविंद शेषराव वानखडे A- शालीमार F-१५ | १५५३२/१५६ --- | ४८५६/- |
| १० | रामदास एकनाथ बेडे / बाबुलाल किनारीवाल, गजानन कॉलनी ४-१५-१६१ | १५५३४/१५६ --- | १८३०/- |
| ११ | रमाकांत नारायण बडगिरे गजानन कॉलनी ४-१५-८३ | १५५४०/१५६ २६.३.२०१० | ३६००/- |
| १२ | एस.के.पसारकर कल्याणी अपार्टमेंट | १५५४७/१५६ ५.४.२०१० | २१७८/- |
| १३ | शिवाप्पा काशिनाथ पासरकर डेक्कन प्राईड | १५५४८/१५६ ५.४.२०१० | ३४२०/- |
| १४ | ए.दास.बोरोले, सृष्टी अपार्टमेंट | १५५५६/१५६ २४.१.२०११ | ९४७०/- |
| १५ | पी.एस.तिवटणे भुषणनगर ,गारखेडा | १५५६७/१५६ ११.३.२०११ | २५५२/- |
| १६ | व्यंकटेश अलगीकर नाथप्रांगण F.No.१ | १५५८४/१५६ १७.३.२०१० | २२००/- |
| १७ | जोसेफ डिसोझा शॉप नं.११ | १५५९७/१५६ ३०.३.२०११ | ७६०४/- |
| १८ | प्रभावती नागोराव दुधेकर ६/५७७,म्हाडा कॉलनी | १९०१७/१९१ १४.१.२००८ | ५०००/- |
| १९ | मनोज उत्तमराव साळुंके विशालनगर, ४/१८/३४/३ | १५.३.२००८ | ५०२४/- |
| २० | सईदबिन सालम, विशालनगर, ४/१८/३४/पी | १९०८९/१९१ १७.३.२००८ | ३०००/- |
| २१ | नंदा प्रल्हादराव पवार विद्यानगर प्लॉट नं.५० | १९०९४/१९१ १९.३.२००८ | १८९१/- |
| २२ | आर.एस.वसुंधरण विद्यानगर प्लॉट नं.६ | १९०९५/१९१ २९.३.२००८ | ९३२/- |
| २३ | व्हि.एम.विश्वरूपे एन-२, एम-१,२२/६ | ११६७/१२ २१.८.२००७ | ३६००/- |
| | | | **१,०५,३५५/-** |

नागरीकांकडून वसूल झालेली रक्कम महानगरपालिका फंडात जमा केलेली नसल्याने उपरोक्त प्रकरणी धनादेश पावतीला रद्द करून रोख रक्कम वसूल करणे ही बाब नियमबाह्य असून गंभीर स्वरूपाची आहे. रक्कमेचा अपहार करण्याचे हेतूने असे केलेले दिसून येते.या गंभीर प्रकारा बाबत संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करून महानगरपालिकेचे झालेले नुकसान वसूल करून महापालिका फंडात भरणा करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३:** धनादेश पावतीद्वारे वसूल केलेली रक्कम रूपये २,१४,१८४/- महानगरपालिका फंडात भरणा न करणे बाबत.

प्रभाग - ई या विभागाचे लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, धनादेश पावती द्वारे रक्कम वसूल करून खालील पावत्यांच्या आधारे संबंधित नागरीकांकडून **मालमत्ता कर /पाणीपट्टी या कराची पावती न फाडता, त्याचप्रमाणे रक्कम रूपये २,१४,१८४/- महानगरपालिका फंडात भरणा न केल्याचे निदर्शनास आले.**

सदर धनादेश देखील महानगरपालिका निधीत जमा केल्याचे लेखापरीक्षणातून आढळून आलेले नाही, तसेच हे धनादेश रेखांकित करून महानगरपालिकेच्या नावे दिलेले होते किंवा धारकाने वटवावयाचे (bearer) होते हे देखील धनादेश प्रत्यक्ष पडताळणी करीता उपलब्ध न झाल्याने प्रमाणित करता येवू शकत नाही.

याबाबत सखोल चौकशी करून याही रकमेचा अपहार झालेला आहे किंवा काय याची खातरजमा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

| अ.क्र. | नांव व पत्ता | धनादेश पावती पुस्तक क्रमांक/पान क्रमांक व दिनांक | धनादेश क्रमांक व दिनांक | धनादेश रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.जनार्धन घोलप,५९, गजानन कॉलनी, औरंगाबाद | १९०११/१९१<br>१०.१.२००८ | ०५३२०७<br>१०.१.२००८ | ३६००/- |
| २ | श्रीमती स्वाती पी.विजयकर घ.क्र.७८,म्हाडा कॉलनी | १९०१६/१९१<br>१४.१.२००८ | ००५४१२<br>१४.१.२००८ | ५०००/- |
| ३ | श्री.शेवाळे चंद्रशेखर बाळकृष्ण एन-२, घ.क्र.१५६ | १९०१९/१९१<br>१७.१.२००८ | ४३१५८२००७<br>१७.१.२००८ | ४५००/- |
| ४ | श्री.बी.व्ही.ढाकणे,९०, एन-२, | १९०२०/१९१<br>१७.१.२००८ | ४३१५७०००४१<br>१७.१.२००८ | १०००/- |
| ५ | कु.विजयापत्र केशव प्लॉट क्र.३७, संदेशनगर | १९०८०/१९१<br>१४.३.२००८ | ५९३१४७<br>१४.३.२००८ | २४९३/- |
| ६ | श्री.रमेश अनंत दर्प,ऊर्मिला रमेश दर्प,सुखकर्ता संकुल, गारखेडा. | ९६६९/९७<br>७.७.२००९ | ७७२१३५<br>८.७.२००९ | ११४२४/- |
| ७ | श्रीमती सुषमा विजय देशपांडे, इसाकनगर प्लॉट नं.६१ | ९६८१/९७<br>३०.११.२००९ | ३५४७८०<br>३०.१.२००९ | १५४८७/- |
| ८ | अनुराधा प्रशांत पारगांवरकर, प्रशांत पारगांवरक, P.No.४३, ४४ सह्याद्री हिल रोड | ९६८८/९७<br>१३.०२..२०१० | ५९५७२५/२६<br>१३.२.२०१० | ८०५२/- |
| ९ | श्री.अरविंद रामचंद्र जगताप के.सी.कॉम्प्लेक्स ,शॉप नं.१, एन-२ सिडको. | १८४११/१८५<br>०२.९.२०१० | ४५६६२२<br>०२.९.२०१० | १०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | श्रीमती रमाबाई लक्ष्मीकांत दिवाकर घ.क्र.४-१८-२६९ , जयदुर्गा सो.विजय न. | १०६१२/१०७<br>३०.३.२००९ | ३६५१०६<br>३०.३.२००९ | १०७९६/- |
| ११ | श्री.ए.ए.बल्लाळ,एमरॉल्ड सिटी | १५५२०/१५६ | १९२४३८ | ६६०७/- |
| १२ | श्री.विनायक धर्मापुरीकर, ३९४, एन-३ सिडको | १५५२३/१५६<br>१६.२.२०१० | ४३१७११<br>१.४.२०१० | ५४७९/- |
| १३ | श्री.शिवाजी कुलकर्णी , एस.एम.कुलकर्णी घ.क्र.४-२०-५०५ /५०३, सह्याद्री हिल्स | १५५२५/१५६<br>२१.२.२०१० | ८६५९६७/६८<br>२१.२.२०१० | १८७०९/- |
| १४ | शे.बिल्कीस बरकत मयूर टेरेस | १५५२९/१५६<br>१०.३.२०१० | १००४७७<br>३०.३.२०१० | १२५६३/- |
| १५ | श्री.अविनाश एस.औढेकर आदर्श नगर एफ-३ | १५५३३/१५६<br>१८.३.२०१० | ००२२३<br>१८.३.२०१० | ६०२१/- |
| १६ | श्री.रमेश प्रधान घ.क्र.८, सक्सेस विहार | १५५५२/१५६<br>२४.५.२०१० | ८४३८४९ | ३४०७/- |
| १७ | अरूण श्रीनिवास गोसावी अनुजा गोसावी, P.No.c-३१ सिडको | १५५५४/१५६<br>३.६.२०१० | १०४९८९ | १९०५०/- |
| १८ | भास्कर शंकर राहणकर यशनक्षत्र अपार्टमेंट | १५५५५/१५६<br>१७.६.२०१० | ३२८३८ | ६९६७/- |
| १९ | एम.एस.मिटकर, आदर्शकॉलनी | १५५५८/१५६<br>१०.२.२०११ | ५९२८९० | १०,०००/- |
| २० | शिवप्पा पसारकर नाथप्रांगण | १५५६१/१५६<br>८.३.२०११ | ०२६१४४ | ५०७७/- |
| २१ | वाय.एम.नाईक बी.जी.कोठावले F.No.२, सुहास हौ.सो. | १५५७५/१५६<br>१४.३.२०११ | ३१०२७५ | २९२५/- |
| २२ | रमाकांत धोत्रे गजानन कॉलनी P.no.१४ | १५५७९/१५६<br>१४.३.२०१० | ६७६३५०/५१ | २४९०/- |
| २३ | अनिसा बेगम शे.हकीम गजानन कॉलनी ११७ | १३५९३/१५६<br>२५.३.२०१० | ९०९२१९ | ११८९४/- |
| २४ | सतीश मुंढे | १५५९५/१५६<br>२९.३.२०११ | २९१७५६ | १६४९३/- |
| २५ | परमजित कौर दिशा संकुल शॉप नं.७ | १५५९६/१५६<br>३०.३.२०११ | ६९७६१ | ५७०२/- |
| २६ | संजय जोशी, साई कॉर्नर गारखेडा | १५५९९/१५६<br>३०.३.२०११ | २७८९४३ | ३२२४/- |
| २७ | उत्तम चवळी, इंद्रप्रस्थ हौ.सो. गारखेडा | १५६००/१५६<br>३१.३.२०११ | ०१५५४९/४७ | ५२२४/- |
| | | | **एकूण** | **२,१४,१८४/-** |

उपरोक्त बाबत सखोल चौकशी करून रकमेचा अपहार झालेला आहे किंवा कसे याची खातरजमा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

<u>**परिच्छेद क्र.१४:**</u> पाणीपट्टी रक्कम मागणी रजिस्टरवर कमी दर्शविल्या बाबत
(रक्कम रू.१०,६४०/-)

प्रभाग - ई या विभागाचे लेखापरीक्षणा दरम्यान पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्रमांक एम.आय.जी-२ (MIG -२) ६८ पान क्रमांक ५०/१९२ वर श्री.एस.जी.लालसरे क्र्मांक ८३, नळखाते क्र.७३९५२ (१/२निवासी ) तपासणीअंती असे निदर्शनास आले की, संबंधिताकडे सन २००२-०३ ते सन २०११-१२ पर्यंत रू.२३,८४०/- थकबाकी असून त्यापैकी १३,२००/- वसूल झ ालेली आहे. **रक्कम रूपये १०,६४०/- संबंधित पाणीपट्टी धारकाकडे शिल्लक असतांना त्यांचेकडील थकबाकी डिमांड रजिस्टरवर निरंक दर्शविण्यात आलेली आहे.**

विभागाने उपरोक्त नोंदीची खातरजमा करून संबंधिताकडे थकीत असलेली रक्कम वसूल करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५:** मालमत्ता /पाणीपट्टी डिमांड रजिस्टरच्या अनियमिततेबाबत.

प्रभाग कार्यालय -ई विभागातील मालमत्ता / पाणीपट्टी डिमांड रजिस्टरची चाचणी स्वरूपात पाहणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. डिमांड रजिस्टर पाहिले असता ब-याच डिमांड रजिस्टरचे समोरील व मागील पाने काढलेले आहे.

२. डिमांड रजिस्टरला पेजींग बरोबर नाही व रजिस्टर प्रमाणित केलेले नाही.

३. मागील थकबाकी पाहण्यासाठी मागील आर्थिक वर्षाचे डिमांड रजिस्टर उपलब्ध झालेले नाही.

४. डिमांड रजिस्टर मध्ये मागील थकबाकी काही ठिकाणी बरोबर आढलेली नाही.

५. मालमत्ता / पाणी पुरवठा डिमांड रजिस्टरला वर्षनिहाय मागणी दर्शविलेली नाही.

विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम (७६) मधील तरतूदींचे पालन करून सविस्तर अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१६: प**ाणीपट्टी व्यावसायिक मागणी रजिस्टरमधील रकमेनुसार रक्कम
रू.६५००/- चा कमी भरणा झाल्याबाबत.

प्रभाग - ई या विभागाचे लेखापरीक्षणा दरम्यान व्यावसायिक पाणीपट्टी मागणी रजिस्टर (नविन) पान क्र.९२,९३ वर मालक श्री.राजेंद्रसिंग संतोकसिंग परदेशी (जिजाई हॉस्पीटल) चैतन्यनगर , P.No. १२, नळ खाते क्र. ६७३२२, व्यास १/२ ^Qछ( व्यावसायिक नळ कनेक्शन) नविन व जुन्या रजिस्टर वरून संबंधित नळधारकाकडे सन २००५-०६ ते सन २०१२-१३ पर्यंत एकूण थकबाकी रक्कम रू.५८,०००/- असल्याचे मागणी रजिस्टर वरून दिसून येते. संबंधितांकडून उपरोक्त कालावधीचे रक्कम रू. ५१,५००/- चा भरणा महानगरपालिका फंडात करण्यात आलेला आहे. संबंधित व्यावसायिक पाणीपट्टी धारकाकडे

**रक्कम रू.५८,०००/- थकित असतांना २०१२-१३ पर्यंत रक्कम रू.५१,५००/- वसूल करून रू.६५००/- चा कमी भरणा झालेला आहे. संबंधिताकडून थकीत रक्कम रू.६५००/- चा भरणा** करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१७:** व्यावसायिक नळ कनेक्शन धारकाकडून ९१,९८५/- रक्कम वसूल न करता नळ कनेक्शन बंद करणे बाबत.

प्रभाग - ई या विभागाच्या लेखापरीक्षणा दरम्यान व्यावसायिक पाणीपट्टी मागणी रजिस्टर (जुने) पान क्रमांक १३२, १३३ व (नविन) रजिस्टर पान क्रमांक १४०, १४१ वर नळधारक श्रीमती संकुबाई बा.जाधव (राजहंस बिअर बार) मुकुंदवाडी (बस स्टॉप) जालना रोड, नळखाते क्र. २५२५९ व्यास $^{१}/_{२}$" यांची तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) पाणीपट्टी व्यावसायिक मागणी रजिस्टर (जुने) पान क्रमांक १३२, १३३ वर संबंधित नळ धारकाकडे मार्च २००५ पर्यंत एकूण थकबाकी रक्कम रू.४६४८५/- व सन २००५-०६ ते सन २००८-०९ पर्यंत एकूण थकबाकी रक्कम रू.२६०००/- अशी एकत्रित रक्कम रू. ७२४८५/- इतकी होती.

२) व्यावसायिक नविन पाणीपट्टी मागणी रजिस्टर पान क्रमांक १४०,१४१ वर संबंधित नळ धारकाकडे मार्च २००९ पर्यंतची थकबाकी रक्कम रू.७२४८५/- व सन २००९-१० ते सन २०११- १२ पर्यंतची एकूण थकबाकी रक्कम रू.१९५००/- **अशी एकत्रित रक्कम रू.९१९८५/- इतकी होती.**

३) व्यावसायिक पाणीपट्टी मागणी रजिस्टर नविन चे पान क्रमांक १४१ वर जा.क्र. मनपा/प्र.अधि-ई/२०१०/२१८/२०१० कार्यालय महानगरपालिका,औरंगाबाद दिनांक ८.२.२०१० या पत्रकानुसार दिनांक ३१.३.२००५ पासून सदर कायम स्वरूपी खंडीत करण्यात येत आहे. अशी नोंद करून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी मागणी रजिस्टरवर प्रमाणित केलेले आहे.

प्रकरणांत संबंधित व्यावसायिकाचे नळ कनेक्शन बंद करण्यापूर्वी त्याच्याकडे असलेली थकबाकी वसूल होणे गरजेचे होते. त्याचप्रमाणे नळ कनेक्शन बंद करतांना सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतल्याविना नळ कनेक्शन बंद करण्यात आले आहे. **या बाबी नियमबाह्य असून यामधून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.** महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानी संबंधी तसेच प्रकरणातील अनियमिततांबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१८:** पाणीपट्टी मागणी रजिस्टर मध्ये श्री. गुंडेराव दादाजी ढबाळे यांच्याकडे रूपये २२५४०/- थकीत असतांना त्यांच्या नावाची नोंद मागणी रजिस्टर मध्ये नसल्याबाबत.

वॉर्ड - ई कार्यालयाचे सन २००६-०७ ते सन २०११-१२ या कालावधीचे लेखापरीक्षणा दरम्यान पाणीपट्टी मागणी रजिस्टरची तपासणी मध्ये श्री.गुंडेराव दादाजी ढबाळे N-२-A घर क्र. १/४/४ खाते क्र. ५७७४९ जुने रजिस्टर पान क्र.२०९ वर सदरील नोंद नविन रजिस्टर D-५५ घेण्यात आली असे दिसून आले. संबंधिताकडे सन २०१२ पर्यंत रक्कम रू.२२५४०/- थकीत आहे. सदरील थकीत रक्कम संबंधिताकडून वसूल न करता रजिस्टर क्र. D-५५ वर रजिस्टर क्र. M/१ पान ५७ वर नोंद असे लिहिण्यात आले. मात्र संबंधित रजिस्टरच्या नोंदीप्रमाणे तपासणी केली असता त्या पान क्र.५७ वर एच.एच.अग्रवाल खाते क्र.३४६४६ ची नोंद आहे. म्हणजेच श्री.गुंडेराव दादाजी ढबाले यांच्या नावाचा उल्लेख नाही.

प्रकरणांत मागणी रजिस्टर तयार करतांना मागील मागणी रजिस्टरवरील थकबाकी पुढील मागणी रजिस्टर मध्ये caryforward होणे क्रमप्राप्त आहे. परंतू प्रकरणांत तसे झ ालेले नसल्यामुळे सन २०१२ पर्यंत संबंधिताकडे **थकीत असलेली रक्कम रू.२२,५४०/- वसूल होवू शकली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.** त्याचप्रमाणे संबंधित नळधारकाकडे यापुढीलही पाणीपट्टी थकीत आहे.

करिता, विभागाने खातरजमा करून थकीत रक्कम वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१९:** कॅश रजिस्टरच्या अनियमिततेबाबत.

प्रभाग - ई या विभागाचे सन २००६-०७ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान कॅश रजिस्टर च्या तपासणीमध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कॅश रजिस्टरला पान क्रमांक दिलेले नाहीत.
२. कॅश रजिस्टर लिहितांना झालेल्या खाडाखोडीस प्रमाणित केलेले नाही.
३. कॅश रजिस्टरची पाने व्यवस्थितरित्या डकविलेले नाही.
४. कॅश रजिस्टर सक्षम प्राधिकाराने प्रमाणित केलेले नाही.

करिता मुद्या क्र.१ ते ४ बाबत पूर्तता करून, महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम (७९) मधील तरतूदींचे पालन करून सविस्तर अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२०:**आर्थिक वर्ष २००७-०८ ते सन २०११-१२ या वर्षातील मालमत्ता कर व पाणीपट्टी कराची रक्कम धनादेशाने वसूल केली मात्र धनादेश न वटल्याने थकीत रकमेबाबत. (रक्कम रूपये ७,००,४०८/-)

वॉर्ड - ई या विभागाचे सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीचे लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड कार्यालयामध्ये धनादेशाद्वारे/ रोख रकमांद्वारे मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसूल करण्यात आलेला आहे. त्यापैकी प्राप्त झालेल्या धनादेशापैकी न वटलेल्या धनादेशाची सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीतील रक्कम रू.७,००,४०८/- इतकी रक्कम थकीत आहे. विभागाने न वटलेल्या धनादेशाची रक्कम वसूल न करता त्यापुढील कालावधीसाठी असलेल्या कराच्या रकमा वसूल केलेल्या आहेत. जेव्हा की, मागील थकबाकी संबंधितांकडून वसूल होणे आवश्यक आहे. विभागाने विहित मुदतीत निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट १८८१ चे नियम १३८ नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

प्रकरणांत मालमत्ता व पाणीपट्टी कराची वसूली करतांना धनादेशाद्वारे झालेल्या वसूली संदर्भाने विभागाने प्रथमतः संबंधित मालमत्ताधारकास धनादेश पावती देवून धनादेश वटल्यानंतरच कराची पावती देणे क्रमप्राप्त होते. विभागाने तशी कार्यवाही न केल्यामुळे सरसकट धनादेशाच्या आधारे मालमत्ता कराच्या व पाणीपट्टीच्या पावत्या वितरीत केलेल्या आहेत. **न वटलेल्या धनादेशाची रक्कम रूपये ७,००,४०८/- ही संबंधितांकडून वसूल न झाल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.** याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून महानगरपालिकेच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा. **(सोबत विवरण)**

**परिच्छेद क्र.२१:** अभय योजने अंतर्गत नियमित केलेल्या नळ कनेक्शनच्या नोंदवहीबाबत.

प्रभाग - ई या विभागाचे सन २००६-०७ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान सन २००९-१० या आर्थिक वर्षात अभय योजना अंतर्गत पाणीपट्टी पावती पुस्तक क्र. ३९११, ३९१२, ३९१३, ३९१४, ३९१५, ३९५१, ३९५३, ३९५४, ३९५६, ३९५७,३९५८, ३९५९,३९६० या पुस्तकाद्वारे पाणीपट्टी कर वसूल करण्यात आला. अभय योजनेतील नळधारकांची माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध नव्हती. अभय योजना लागू केल्यानंतर ज्या नागरीकांनी नळ कनेक्शन नियमित करून घेतले अशा नागरीकांकडील नळ कनेक्शनबाबतची माहिती एका स्वतंत्र नोंदवहीत (मागणी रजिस्टरमध्ये) नोंद करणे आवश्यक होते. परंतू तसे विभागाकडून अभिलेखे ठेवण्यात आलेले नाहीत.

अभय योजनेतून सन २००९-२०१० मध्ये वसूल झालेली रक्कम ही केवळ एकदाच वसूल झालेली आहे. परंतू संबंधित नागरीकांकडे नळ कनेक्शन कार्यरत असल्यामुळे पुढील वसूली झाल्याचे लेखापरीक्षणात आढळून आलेले नाही.

करिता, विभागाने खातरजमा करून अभय योजनेत नियमित केलेल्या नळ कनेक्शनची स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यांच्याकडे अद्यापपावेतो थकीत असलेली रक्कम वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२२:**सन २००९-१० व सन २०१०-११ या वर्षामध्ये मालमत्ता कराची मागील थकीत रक्कम वसूल न करता मालमत्ता कर कमी करणे बाबत.

प्रभाग - ई या विभागाचे सन २००६-०७ ते सन २०११-१२ या वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, वॉर्ड-ई अंतर्गत येणारे मालमत्ताधारक यांना मालमत्ता कर कमी करण्यासाठी एकूण ३८ मालमत्ताधारकांना वेळोवेळी सुनावणीसाठी बोलावण्यात आले आहे. त्याबाबतचा तक्ता अहवालासोबत संलग्न करण्यात येत आहे.

तथापि सुनावणीपूर्वी संबंधीत मालमत्ताधारकाची थकित असलेली रक्कम रू.१८,४४,३१०/- ची वसूली न करता सुनावणी घेण्यात आल्याचे दिसून येते. सुनावणी वर्षाचे कर योग्य मुल्य रू.७,६६,६२१/- असतांना सुनावणी अंती रक्कम रू. ३,६४,०८७/- कमी करण्यात आले. त्यामुळे चालू वषाच्या करयोग्य मूल्यांत रक्कम रू.४,०२,५३४/- एवढी कमी करण्यात आल्यामुळे मनपाच्या उत्पन्नात घट झाल्याची दिसून येते.

उक्त मालमत्ता कर कमी करतांना कोणते निकष व कशाच्या आधारे करण्यात आले याबाबतच्या वेळोवेळी काढण्यात आलेल्या आदेशाच्या प्रती लेखापरीक्षण विभागास उपलब्ध झालेल्या नाहीत.

**मालमत्ता करयोग्य मूल्य कमी करतांना सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. म्हणजेच विभागाने मुंबई प्रांतिक महाागरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४०६ (ई) चा भंग केल्याचे दिसून येते. प्रकरणांत सविस्तर चौकशी करून महानगरपालिकेच्या उत्पन्नात झालेल्या घटी बाबत योग्य ती शहानिशा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.**

**परिच्छेद क्र.२३:** आर्थिक वर्ष २०११-१२ मधील मालमत्ता बुक क्रमांक १३३२ मधील पावती क्रमांक १३३१८६ ची स्थळप्रत, मूळप्रत नसल्याबाबत.

वॉर्ड कार्यालय - ई चे लेखापरीक्षणा दरम्यान वॉर्ड कार्यालय -ई मधील मालमत्ता पावती पुस्तक क्रमांक १३३२ ची तपासणी करीत असतांना पावती क्रमांक १३३१८६ ची

स्थळप्रत, मूळप्रत पुस्तकात दिसून आलेली नाही. याबाबत विभागास विचारणा केली असतांना त्यांनी खुलासा केलेला नाही. लेखापरीक्षणा दरम्यान करनिर्धारक व संकलक यांनी वृत्तपत्रात जा.क्र.मनपा/कनिवसं/१६५/२०१२, दिनांक २५.४.२०१२ अन्वये च्ज्या नागरीकाकडे सदरची पावती असेल त्या नागरीकाने जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यानंतर ७ दिवसाच्या आंत कार्यालयात पावती दाखल करावीछ असे जाहीर प्रगटन प्रसिध्द करून नागरीकांना आवाहन केले. सात दिवसाच्या कालावधीनंतर सदरची पावती रद्द समजण्यात येईल असे आवाहन सदरच्या जाहिर प्रगटनात केलेले होते.

प्रकरणांत गहाळ झालेली पावती महानगरपालिका कार्यालयात उपलब्ध झाली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. सबब या पावत्यांचे आधारे किती रक्क्म वसूल करण्यात आलेली होती याची पडताळणी करता आलेली नाही.

पावती पुस्तकातील दोन्ही पावत्या गहाळ होणे ही बाब संशयास्पद असून यासाठी स्वतंत्रपणे चौकशी करून चौकशीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा.

# स्थानिक संस्था कर
# १ जुलै २०११ ते ऑगस्ट २०१२
# लेखापरीक्षण अहवाल

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत जकाती ऐवजी उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून दिनांक १ जुलै २०११ पासून स्थानिक संस्था कर (एलबीटी) लागू करण्यात आली असून मा.महापौर यांचे आदेश क्र./मनपा/महापौर/१७९३/२०१२, दिनांक ५.७.२०१२ अन्वये स्थानिक संस्था कर विभागाचे माहे १ जुलै २०११ ते ऑगस्ट २०१२ पर्यंतचे जमा बाजुचे व खर्च बाजुचे चाचणी स्वरूपाचे नियमित लेखापरीक्षण उपलब्ध करून दिलेले अभिलेखानुसार दिनांक ११.७.२०१२ पासून दिनांक ०४.११.२०१२ पर्यंत कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेप/२०१२/२०७, अन्वये स्थानिक संस्था कर विभागातील लेखापरीक्षण करण्यात आले.

त्या अनुषंगाने स्थानिक संस्था कर विभागातील साहित्य खरेदी संचिका, नोंदणीकृत व्यापारी उद्योजकांचे वार्षिक विवरणाच्या संचिका, जाहिरात खर्चाच्या संचिका, न वटलेले धनादेश, बँक स्क्रोल तपासणी, जनरल पावती पुस्तकाची तपासणी कॅश रजिस्टर प्रमाणे तपासणी करण्यात आली व संगणक खर्चाच्या संचिका तपासणी करण्यात आल्या तसेच जमा व खर्चाचे एकूण १२ परिच्छेदांचा लेखापरीक्षणा दरम्यान समावेश करण्यात आला असून त्यांचा संपूर्ण तपशील खालील प्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

महानगरपालिका,औरंगाबाद येथे स्थानिक संस्था कर विभागात लेखा परीक्षण कालावधीत खालील प्रमाणे अधिकारी कार्यरत होते.

| अधिका-यांचे नांव | पदनाम | कार्यकाळ |
|---|---|---|
| श्री.अजय चारठाणकर | उपआयुक्त (म) | दि.१.७.२०११ ते २९.८.२०१२ |
| श्री.अय्युब खान नुर खान | प्र.उपआयुक्त (म) | दि.३०.८.२०१२ पासून |
| श्री.संजय पवार (लेखाधिकारी) | स्थानिक संस्था कर अधिकारी, अतिरिक्त कार्यभार | ि.१.७.२०११ ते १५.११.२०११ |
| श्री.महावीर पाटणी | स्थानिक संस्था कर अधिकारी | दि.१.७.२०११ पासून |
| कु.शुभांगी आंधळे | स्थानिक संस्था कर अधिकारी | दि.६.८.२०११ पासून |

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक श्री.मो.रा.थत्ते यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे .

१. श्री.नासेर लईख, (प्र.का.अधिक्षक / पथक प्रमुख)
२. श्री.चंद्रशेखर मराठे, (कनिष्ठ लिपीक)
३. श्री.ईश्वरचंद्र कामेकर (कनिष्ठ लिपीक)

स्थानिक संस्था कर विभाग दिनांक १ जुलै २०११ पासून अस्तित्वात आला असल्याने यापूर्वीचे लेखापरीक्षण प्रलंबित परिच्छेदांची संख्या निरंक समजण्यात यावी.

१ जुलै २०११ पासून ते ऑगस्ट २०१२ पर्यंतचे लेखापरीक्षणा दरम्यान लेखापरीक्षण विभागातील जनरल पावती पुस्तके तपासण्यात आली या पुस्तकाद्वारे एकूण रक्कम रूपये १०,३६,०१५/- वसूल करण्यात आले. त्यांचा तपशील पुढील प्रमाणे -

| **अ.क्र.** | **जनरल पावती पुस्तक क्र.** | **एकूण पुस्तके** | **भांडार विभागातून स्थानिक संस्था कर विभागातील पुस्तक प्राप्त केलेल्या कर्मचा-याचे नांव** |
|---|---|---|---|
| १ | ४६२१ ते ४६३० | १० | श्री.व्हि.के.काळे |
| २ | ४६९४ ते ४७०३ | १० | श्री.व्हि.के.काळे |
| ३ | ४७०९ ते ४७२३ | १५ | श्री.व्हि.के.काळे |
| ४ | ४७२४ ते ४७३८ | १५ | श्री.व्हि.के.काळे |
| ५ | ४७४३ ते ४७५७ | १५ | श्री.व्हि.के.काळे |
| ६ | ४८९३ ते ४९०२ | १० | श्री.सदाशिव बाबर |
| ७ | ४९६४ ते ४९७३ | १० | श्री.सदाशिव बाबर |
| ८ | ५००१ ते ५००५ | ०५ | श्री.उदय मानवतकर |
| ९ | ५०४४ ते ५०५३ | १० | श्री.मंगेश कुलकर्णी |
| | **एकूण** | **१००** | |

**<u>परिच्छेद क्र.१</u> : स्थानिक संस्था कर विभागास लेखा परीक्षण पथकास लेखापरीक्षणा दरम्यान अभिलेखे उपलब्ध करून न देणे बाबत.**

१) स्थानिक संस्था कर नोंदणीसाठी ५ विभागास वर्गीकरण केलेल्या नोंदणी धारकांची वॉर्ड निहाय यादी मिळणे बाबत.

१) व्हॅट नोंदणीकृत असलेले नोंदणीधारक.
२) व्हॅट नोंदणीकृत नसलेले नोंदणीधारक.
३) अनिवासी नोंदणी केलेले नोंदणीधारक.
४) तात्पुरते नोंदणी केलेले नोंदणीधारक.
५) बांधकाम परवानगीसाठी नोंदणी केलेले नोंदणीधारक.

वरील प्रमाणे वर्गीकरण केलेल्या नोंदणीधारकांची वॉर्ड निहाय यादी लेखापरीक्षण कामी सत्वर उपलब्ध करून द्यावी असे विभागास पत्र दिले असता विभागाने सदरील यादी उपलब्ध करून दिली असा खुलासा सादर केला. परंतू मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० (२) (ग) अन्वये विभागाने केलेल्या वर्गीकरणानुसार यादी उपलब्ध करून दिलेली नाही.

उपरोक्त प्रमाणे अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नसल्यामुळे एल.बी.टी.ची नोंद केलेल्या संख्येशी ताळमेळ साधता आला नाही. तसेच एल.बी.टी. विभागाने केलेली नोंदणी परिपूर्ण असल्याबाबत अनिश्चितता आहे.

२) स्थानिक संस्था कराचा परतावा देण्यात आलेल्या संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्याबाबत.

स्थानिक संस्था कर विभागाने स्थानिक संस्था कर नियम -२०१० अंतर्गतच्या तरतुदी नुसार शहरामध्ये आयात केलेल्या आणि ज्याच्या आयातीवर स्थानिक संस्था कर भरण्यात आलेला असेल असा माल शहराबाहेर निर्यात किंवा विक्री केल्यास स्थानिक संस्था कराचा परतावा नियम क्र.३२ अन्वये अनुज्ञेय आहे. त्या विषयीच्या संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणे करीता मागणी केली असता, विभागामार्फत अद्यापि असा परतावा देण्यात आला नाही असे कळविले व त्यामुळे लेखापरीक्षणा दरम्यान सदरील संचिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

परंतु व्यापा-यांनी सादर केलेल्या सहामाही विवरण पत्रांपैकी काही विवरण पत्रांमध्ये असा परतावा व्यापा-याने परस्पर वळता करूनच स्थानिक संस्था कराचा भरणा केलेला असल्याचे दिसून आले आहे. संचिका उपलब्ध करून दिलेल्या नसल्याने असा परतावा योग्य प्रमाणात झाला किंवा कसे याबाबत लेखा परीक्षणात खात्री करता आलेली नाही. विभागाने अशा सर्व प्रकरणांचे पुर्नविलोकन करून परतावा योग्य प्रमाणातच दिला गेला असले बाबत खात्री करावी व अनुपालन सादर करावे.

**३)** स्थानिक संस्था करामध्ये सुट देण्यात आलेल्या संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्याबाबत.

स्थानिक संस्था कर नियम -२०१० मधील नियम क्र.२८ नुसार विविक्षित प्रकरणांमध्ये सूट अनुज्ञेय आहे. या तरतूदीनुसार स्थानिक संस्था करामध्ये सुट दिलेल्या संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात याव्यात असे विभागास पत्र दिले असता विभागाने शेड्युल्ड - बी मध्ये करात सुट दिलेल्या साहित्याची यादी उपलब्ध करून दिलेली आहे. परंतु विभागामार्फत संचिका अद्यापपर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. वास्तविक नियम क्र.२८ मध्ये शासकीय कार्यालये, शहराबाहेर प्रक्रीया करावयाचा माल, भारत बाहेर निर्यात करण्यासाठी वापरलेला माल इ.संबंधी तरतूदी आहेत. अशा संचिका उपलब्ध करून देणे ऐवजी विभागाने **अनुसूचि- ब** ची प्रत उपलब्ध करून दिली या वरून स्थानिक संस्था कर विभागात कार्यरत अधिका-यांच्या नियमा विषयीच्या धारणा स्पष्ट नसल्याचे दिसून येते.

स्थानिक संस्था करामध्ये दिलेली सुट बाबत संचिका लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून न देणे ही बाब संशयास्पद वाटते. विभागाने सुट दिलेल्या सर्व प्रकरणांचे पुर्नविलोकन करून सुट दिली असल्यास ती योग्य प्रमाणात दिलेली असल्याची खात्री करावी व अनुपालन अहवाल सादर करावा.

**४)** स्थानिक संस्था कर विभागा अंतर्गत थकबाकीदार व्यावसायिकांच्या संचिकांबाबत.

स्थानिक संस्था कर विभागा अंतर्गत थकबाकीदार व्यावसायिकांची संचिका तपासणीस उपलब्ध करून दिली असता, सदरील संचिका स्थानिक संस्था कर नियम -२०१० कलम ३३ अन्वये निर्धारण अद्यापपर्यंत झालेले नसल्याने सोबत दिलेल्या यादीतील संचिकांची तपासणी करण्यात आलेली नाही. सदरील संचिका निकाली झाल्यानंतर लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून द्याव्यात असे पत्र विभागास दिले असता याबाबत खुलासा अप्राप्त आहे.

स्थानिक संस्था कर विभागा अंतर्गत व्यापा-यांकडील थकबाकी वसूल होणे आवश्यक आहे. परंतू लेखापरीक्षण पथकास थकबाकीदार व्यापा-यांचे एल.बी.टी.बाबत निर्धारण झालेले नाही असे विभागाने कळविले याचा अर्थ एल.बी.टी. विभाग कार्यक्षम असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे एल.बी.टी. कराच्या वसूलीवर परिणाम झालेला आहे. विभागात सादर झालेल्या विवरण पत्रांचे कर निर्धारण करून व्यापा-यांकडील थकबाकी वसूल करावी व अनुपालन अहवाल सादर करावा.

५) स्थानिक संस्था कर नोंदणीकृत असलेल्या व्यापा-यांची विभागाने केलेल्या वर्गीकरणानुसार (स्थानिक संस्था कर भरणा केलेले व भरणा न केलेले) बाबतची माहिती मिळणे बाबत.

स्थानिक संस्था कर विभागाने वर्गीकरण केले प्रमाणे स्थानिक संस्था कर एकूण नोंदणीकृत व्यापारी व त्यापैकी किती व्यापा-यांनी स्थानिक संस्था कर भरणा केला आहे व किती व्यापा-यांनी भरणा केलेला नाही या विषयी माहिती लेखापरीक्षणास सत्वर उपलब्ध करून द्यावी असे पत्र दिले असता विभागाने दि.६/८/२०१२ पर्यंत माहिती पुरविण्यात येईल असे नमूद केले आहे. परंतू सदरील माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध करून देण्यात आली नाही.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण संख्या | रक्कम भरणा केलेले स्था.सं.करधारक | रक्कम भरणा न केलेले स्था.सं.करधारक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

यावरून एल.बी.टी.विभागाचे कामकाज गांभीर्य पूर्वक होत नसल्याचे दिसून आले. कारण या ठिकाणी देण्यात आलेली दैनंदिन कामेसुध्दा झालेली नाहीत. विभागाने अभिलेखे ठेवलेले नाहीत. करिता लेखापरीक्षणाचे मुद्यांवर कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

६) स्थानिक संस्था कर भरणा करीत असलेल्या वाईन शॉप, देशीदारू, दुकानांची माहिती मिळणे बाबत.

स्थानिक संस्था कर (L.B.T.) भरणा करीत असलेल्या वाईनशॉप, देशीदारू दुकान धारकांची अद्यापपर्यंत भरणा केलेली रक्कम व नोंदणी केलेल्या वाईनशॉप, देशीदारू दुकानाची माहिती लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात आली नाही व रक्कम भरणा बाबत विभागाने सन २०११-१२ पर्यंत एकूण रक्कम रूपये ५,१७,६६,७२५/- इतक्या रकमेचा भरणा झालेला आहे असू नमूद केले.

विभागाने अपूर्ण माहिती सादर केलेली आहे. वाईन शॉप व देशी दारू यांचे एल.बी.टी. लागू झाल्यापासूनचे उत्पन्न रू.५,१७,६६,७२५/- इतके दर्शविलेले आहे. याबाबत वसूल केलेल्या कराची पडताळणी करण्यास अभिलेखे उपलब्ध नसल्यामुळे लेखापरीक्षण पथकास या मालापासून झालेले उत्पन्न योग्य प्रमाणात झाले असले बाबत खात्री करता आलेली नाही.

७) आर्थिक वर्ष १ जुलै २०११ ते १२ व १३ मध्ये औरंगाबाद महानगरपालिका हद्यीत असलेल्या बँकाची स्थानिक संस्था कर नोंदणी केल्याबाबत माहिती मिळणे बाबत.

स्थानिक संस्था कर नोंदणी केलेल्या बँका व त्यांनी स्थानिक संस्था कर भरणा केलेली रक्कम याबाबतची माहिती सहामाही वार्षिक विवरणासह सत्वर उपलब्ध करून द्यावी, असे विभागास पत्र दिले असता विभागाने याबाबतची माहिती अद्यापपावेतो उपलब्ध करून दिली नाही. अनेक बँका सोने विक्री करण्यास्तव त्याची शहरात आयात करतात तसेच बँका आवश्यक असलेले साहित्य जसे फर्निचर, संगणक,स्टेशनरी ई.ची देखील आयात केली जात, त्यावर देय असलेला स्थानिक संस्था कर भरला जातो किंवा नाही याची बँकाच्या नोंदणी अभावी कशाचे आधारे खात्री विभागामार्फत केली जाते हे स्पष्ट होवू शकले नाही. शहरात कार्यरत सर्व बँका नोंदणीकृत होतील या करीता विभागाने त्वरीत कार्यवाही करावी व परिपूर्ण तपशिलासह अनुपालन सादर करावे.

८) स्थानिक संस्था करापोटी राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची माहिती मिळणे बाबत.

स्थानिक संस्था कर विभागास १ जुलै -२०११ पासून ते आजपावेतो राज्य शासनाकडून किती अनुदान प्राप्त झाले व कोणकोणत्या कामासाठी प्राप्त झाले या बाबतची शासन निर्णयाची प्रत लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही आणि स्थानिक संस्था करापोटी राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची माहिती मिळणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी जा.क्र.मनपा/मुलेप/२०१२/२६५, दिनांक ९.८.२०१२ व स्मरणपत्र क्र.१ जा.क्र.मनपा/मुलेप/२०१२/२९०, दिनांक ३०.८.२०१२ रोजी सदरील माहिती उपलब्ध करून देण्यासाठी पत्र दिले असता अद्यापपर्यंत माहिती व शासन निर्णय प्रती उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे शासनाकडून अनुज्ञेय असलेले अनुदान पूर्णपणे मिळाले असलेबाबत खात्री करता आलेली नाही.

विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे / माहिती उपलब्ध करून न देणे ही बाब अयोग्य असून संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करावा.

९) स्थानिक संस्था कर विभागाला सन २०११-१२ व सन २०१२-१३ या वर्षामध्ये संगणक विभागातून देण्यात आलेल्या संगणक व इतर साहित्याच्या साठा रजिस्टर विवरण रजिस्टर व स्टोअर लेजर रजिस्टर उपलब्ध करून देण्याबाबत.

स्थानिक संस्था कर विभागाला संगणक विभागातून देण्यात आलेले संगणक साहित्य व इतर साहित्याची नोंद केलेले रजिस्टर क्र.१०९,११० व १११ (भांडार जमा रोजकिर्द,भांडार रोजकिर्द,भांडार खातेवही) लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे प्राप्त झालेल्या सर्व साहित्याची नोंद केलेली असल्याचे व सदर साहित्य विभागातच वापरले जात असल्याची खात्री करता आलेली नाही. विभागाने आवश्यक सर्व नोंदवह्या पूर्ण करून अनुपालन सादर करावे.

१०) आर्थिक वर्ष १ जुलै २०११ ते ३० जून २०१२ पर्यंत स्थानिक संस्था कर नोंदणी केलेल्या हॉटेल, दवाखाने व बिल्डर (बांधकाम व्यावसायिक) यांची सहामाही, वार्षिक विवरणासह संचिका व माहिती मिळणे बाबत.

स्थानिक संस्था विभागात नोंदणी झालेल्या हॉटेल, दवाखाने व बिल्डर (बांधकाम व्यावसायिक) यांची सहामाही विवरण, वार्षिक विवरणासह संचिका व एकूण नोंदणी बाबतची माहिती व त्यांनी भरलेला कर या विषयी माहिती लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे अशा प्रकारचे व्यावसायिक स्थानिक संस्था कर योग्य प्रमाणात भरत असले बाबत खात्री करता आलेली नाही. या संदर्भात विभागाने खात्री करावी व सदर व्यावसायीकांकडून योग्य प्रमाणात कर भरण्यात येत असल्याचे प्रमाणित करून अनुपालन सादर करावे.

११) आर्थिक वर्ष २०११-२०१२ मधील रहदारी फी संकलनाची संचिका व रक्कम वसूली बाबतचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणे बाबत.

स्थानिक संस्था कर विभागाचे रहदारी फी संकलनाची संचिका व रक्कम वसूली बाबतचे लेखे लेखापरीक्षणास आवश्यक असल्याने सत्वर उपलब्ध करून द्यावे असे पत्र विभागास दिले असता विभागाने सदर प्रकरण या विभागाशी संबंधित नाही असे कळविले.

परंतु आस्थापना अधिकारी -१ तथा रहदारी फी वसूली प्रमुख यांच्या मार्फत सदरील संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध झाली आणि रहदारी फी वसूली मार्फत जुलै २०१२ पर्यंत रक्कम रूपये १४,४३,२०,८४६/- इतकी रक्कम विभागास प्राप्त झाली.

या संदर्भात अभिप्राय देण्यात येतो की, रहदारी शुल्क वसूली ही बाब स्थानिक संस्था कर विभागाशी संबंधित नसल्याचे विभागाचे स्पष्टीकरण आहे, परंतू स्थानिक संस्था कर वसूली विभागाची कामगिरी (achievement) दर्शवितांना (एकूण वसूली) मात्र रहदारी शुल्काची रक्कम त्यात गृहित धरली जाते व आकडेवारी वाढवून दर्शविली जाते, याबाबत विभागाने खुलासा करावा.

१२) स्थानिक संस्था कर भरणा करण्यासाठी नियुक्त केलेल्या बँकेच्या कराराच्या संचिका उपलब्ध करून देणे बाबत.

स्थानिक संस्था कर विभागाचे (LBT) कर भरणा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या बँकाशी झालेल्या कराराच्या संचिका लेखापरीक्षण कामी सत्वर उपलब्ध करून देण्यात याव्यात असे विभागास पत्र दिले असता विभागाने सदर प्रकरण या विभागाशी संबंधित नाही लेखा विभागाशी संबंधित आहे असे कळविले. परंतु सदर प्रकरण बाबत मुख्य लेखाधिकारी यांना जा.क्र./मनपा/मुलेप/२६५/२०१२, दिनांक ९.८.२०१२ रोजी पत्र दिले असता अद्यापपर्यंत सदरील कराराच्या संचिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

स्थानिक संस्था कर व्यापा-यांनी दरमहा दहा तारखेपर्यंत महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या बँकामध्ये कर जमा करण्याबाबत व्यापा-यांकडून कार्यवाही केली जात आहे. बँकेने त्यांच्याकडे जमा होणा-या रकमा किती दिवस वापरावयाच्या तसेच जमा करण्यात येणा-या प्रत्येक चलनावर बँक चलनानुसार सेवा आकार परस्पर कपात करते किंवा कसे इ. बाबी लेखापरीक्षण विभागास तपासणी कामासाठी आवश्यक होत्या. करारा अभावी बँका महानगरपालिकेची रक्कम (जी दर आठवड्यात काही कोटी रूपये असते) किती दिवस वापरतात ही बाब स्पष्ट होवू शकली नाही. वास्तविक महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, १९७१ चा नियम क्र.११ नुसार महानगरपालिकेशी संबंधित रक्कम योग्य लेखाशिर्षा खाली म.न.पा.निधी मध्ये त्वरीत जमा होणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही होत नसल्याचे आढळून आले आहे. याबाबत संबंधित विभागांनी तपशिलासह खुलासा करून अनुपालन सादर करावे.

१३) स्थानिक संस्था कर विभागाने विशेष तपासणी अंतर्गत स्थानिक संस्था कराचे निर्धारणा बाबतची माहिती मिळणे बाबत.

स्थानिक संस्था कर विभागामार्फत विशेष मोहिमे अंतर्गत शहरातील नोंदणीकृत व्यापारी प्रतिष्ठानांची ५ भागात वर्गीकरण करून स्थानिक संस्था कर नियम-२०१० अंतर्गतच्या तरतूदीनुसार स्थानिक संस्था कराचे निर्धारण करण्याबाबत ठरविण्यात आलेले आहे.

या मोहिमे अंतर्गत विभागाने तपासणी करून किती रकमेची वसूली केलेली आहे याची प्रकरण निहाय संपूर्ण माहिती लेखापरीक्षण कामी सत्वर उपलब्ध करून देण्यात यावी, असे पत्र दिले असता विशेष मोहिमे अंतर्गत शहरातील नोंदणीकृत व्यापारी प्रतिष्ठानांची पाच भागात वर्गीकरण करून तपासणी करून शहरात येणा-या मालाचे स्थानिक संस्था कर नियम-२०१० अंतर्गतच्या ३३ अन्वये स्थानिक संस्था कराचे निर्धारण केलेल्या संचिका उपलब्ध करून

देण्यात आल्या परंतु सदरील संचिका ह्या अपुर्ण असल्याने संचिकांची तपासणी करता आली नाही आणि किती रक्कम वसूल झाली याची माहिती विभागाने उपलब्ध करून दिलेली नाही. सबब अशी विशेष मोहीम हाती घेण्यात येवून स्थानिक संस्था कराचे उत्पन्न वाढविण्याकरीता खरोखरच प्रयत्न केले होते काय ? की केवळ कागदावरच अशी मोहीम आखण्यात आली या बाबत पडताळणी करता आलेली नाही. उपलब्ध मनुष्यबळाचा वापर योग्यरित्या करून कराचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न विभागाने करावा व तपशिलासह अनुपालन सादर करावे.

१४) स्थानिक संस्था कर विभागाने नोंदणीकृत व्यापा-यांकडून सहामाही विवरण प्राप्त झाले नंतर वसूल रकमेची माहिती मिळणे बाबत.

स्थानिक संस्था कर या विभागामार्फत नोंदणीकृत व्यापा-यांनी स्थानिक संस्था कर नियम -२०१० अंतर्गतच्या नियम २९ मधील तरतुदीनुसार सहामाही विवरण सादर केलेले आहे. विभागाने किती रकमेची वसूली केलेली आहे याची संपूर्ण माहिती लेखापरीक्षण कामी सत्वर उपलब्ध करून देण्यात यावी असे विभागास पत्र दिले असता विभागाने माहिती लेखापरीक्षण विभागास सादर केलेली नाही. व्यापा-यांनी सादर केलेल्या विवरण पत्रांची तपासणी करून कर निर्धारण केलेच जात नसल्याने व्यापा-यांनी भरलेला कर, आलेल्या मालाचे प्रमाणात योग्य आहे किंवा नाही याची खात्री विभागामार्फत कशी केली जाते हे स्पष्ट होवू शकले नाही. त्यामुळे महानगरपालिकेस स्थानिक संस्था करापोटी योग्य प्रमाणात उत्पन्न मिळत असल्याची व त्यात कोणतेही नुकसान होत नसल्याची खात्री करता आलेली नाही. याबाबत विभागाने त्वरीत विवरणपत्रांची तपासणी करून झालेले उत्पन्न योग्य असल्याचे प्रमाणित करून अनुपालन सादर करावे. तद्वतच नोंदणीकरण/अनोंदणीकृत व्यापा-यांनी विवरण पत्रेच सादर केलेली नाहीत, त्यांची स्वतंत्र माहिती तयार करून त्यांचेवर नियम क्र. ३३ (३) ते (८) नुसार कार्यवाही करून तपशिलासह अनुपालन सादर करावे.

१५) स्थानिक संस्था कराच्या सुधारित दराबाबत.

स्थानिक संस्था करामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाकडे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे जा.क्र.मनपा/स्थासंक/२०१२/१४७,दिनांक १५.२.२०१२ अन्वये पाठविण्यात आला होता. शासनाने अधिसूचना असाधारण क्र.३४, दिनांक १८.२.२०१२ रोजी निर्गमित करून स्थानिक संस्था कराच्या सुधारित दराची अंमलबजावणी दिनांक १.४.२०१२ पासून करण्याचे निर्देशित केले आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने शासनाकडे खालील वस्तूंचे दर सुधारित करण्यासाठी पाठविलेला प्रस्ताव आणि शासनाने मंजूर केलेल्या सुधारित दराबाबतचा तक्ता पुढील प्रमाणे

| **अ.क्र.** | **वस्तुचे नांव** | **टेरिफ ॲटम क्र.** | **स्था.सं.कराचे प्रचलित दर** | **शासनाने मंजूर केलेले सुधारित दर** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | साखर | १७०१-११ | १% | ०.२५% | |
| **२** | शेंगदाणे | १२०२ | २% | ०.२५% | |
| **३** | साबुदाणा | ११०८-१९-१० | २% | ०.२५% | |
| **४** | सर्व प्रकारचे खाद्यतेल | १५०७-९०-१० | १% | ०.२५% | |
| **५** | गहू | ११०१ | ०.२५% | ०.२५% | |
| **६** | ज्वारी | १००८-२० | ०.२५% | ०.२५% | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | मका | १००५ | २% | ०.२५% | |
| ८ | सर्व प्रकारचे कडधान्य | १००८-९० | २% | ०.२५% | |
| ९ | तांदूळ | १००६ | १% व २% | ०.२५% | |
| १० | बाजरी | १००८-२०-१९ | २% | ०.२५% | |
| ११ | पीठ | ११०१ | ०.२५% | ०.२५% | |
| १२ | भूईमुगाच्या शेंगा | १२०२ | २% | ०.२५% | |
| १३ | सोयाबीन | १२०१ | २% | ०.२५% | |
| १४ | धने | ९०९-२० | २% | ०.२५% | |
| १५ | तुप | ४०५-९०-२० | १% | ०.२५% | |
| १६ | शेती उपयोगी बियाणे | १२०१-१२०२-२०-९० | २% | अधिसूचनेत उल्लेख नाही. | |
| १७ | किटकनाशक | ३८०८-१०-३८०८ | २% | अधिसूचनेत उल्लेख नाही. | |
| १८ | खते | ३१०१-१०-३१०५ | ०.५०% | अधिसूचनेत उल्लेख नाही. | |
| १९ | मिरची | ९०४-२०-१० | १% | ०.२५% | |
| २० | हळद | ९१०-३० | ०.२५% | अधिसूचनेत उल्लेख नाही. | |
| २१ | हळद पावडर | ९१०-३० | १% | १% | |
| २२ | खोबरे | १२०३ | १% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| २३ | लसूण | ७०३-२० | ०.२५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| २४ | ऑईल इंजन | ८५०१-१०-१९ | २.५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| २५ | ऑईल इंजनचे सुटे भाग | | २.५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| २६ | इलेक्ट्रीक स्टॅाटर | | २.५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| २७ | केबल | | २.५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| २८ | इलेक्ट्रीक स्पेअर | | २.५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| २९ | जी.आय.पाईप | ७३०४ | २% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| ३० | पीव्हीसी पाईप | | २.७५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| ३१ | ड्रीप एरीकेशन | ३९१७ | २.७५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| ३२ | ठिंबक सिंचन | ३९१७ | २.७५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| ३३ | मळणी यंत्र | | २.५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| ३४ | औषध फवारणी यंत्र | | २.५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| ३५ | सरकी | | २% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| ३६ | अन्नधान्य (गहू,ज्वारी,बाजरी ) | | ०.२५% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| ३७ | पेपर | ४८०२-१०-१० | २% | १% | |
| ३८ | इतर | ४८०२-२०-९० | २% | १% | |
| ३९ | लिथो आणि ऑफसेट पेपर | ४८०२-५४-२० | २% | १% | |
| ४० | इतर | ४८०२-५४-९० | २% | १% | |
| ४१ | लिथो आणि ऑफसेट पेपर | ४८०२-५५-१० | २% | १% | |
| ४२ | इतर | ४८०२-५५-९० | २% | १% | |
| ४३ | लिथो आणि ऑफसेट पेपर | ४८०२-५६-१० | २% | १% | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४४ | इतर | ४८०२-५६-९० | २% | १% | |
| ४५ | लिथो आणि ऑफसेट पेपर | ४८०२-५७-१० | २% | १% | |
| ४६ | इतर | ४८०२-५७-९० | २% | अधिसूचनेत उल्लेख नाही | |
| ४७ | लिथो आणि ऑफसेट पेपर | ४८०२-५८-१० | २% | १% | |
| ४८ | इतर | ४८०२-६२-९० | २% | १% | |
| ४९ | इन कमर्शील सिझरल ऑफ width ३६ cm & above | ४८०३-००-१० | २% | १% | |
| ५० | Weighing १५०g/m२ or less | ४८०५-२४-९० | २% | १% | |
| ५१ | Weighing १५०g/m२ or less | ४८०५-९१ | २% | १% | |
| ५२ | अंडी | ४०७ ०० ते ९० | ०% | १% | |
| ५३ | Electrical energy | २७१६-००-०० | Nill | २% | |

उपरोक्त तक्त्यानुसार एकूण ५३ वस्तूंचे दर सुधारित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. शासनाने केवळ ३३ वस्तूंच्या दरात सुधारणा करून सुधारित दर १.४.२०१२ पासून लागू केले आहेत. उर्वरीत २० वस्तुंच्या दरांमधील प्रस्तावित सुधारणे बाबत उपरोक्त अधिसूचनेमध्ये शासनाने काहीही भाष्य केलेले नाही. तरीही प्रस्तावित केलेल्या कमी दराने प्रस्तावाच्या दिनांकापासून वरील सर्व ५३ वस्तूंवर स्था.सं.कराची विभागाने वसूली केलेली आहे, पर्यायाने पालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. **प्रकरणांत मा.आयुक्त यांनी स्थानिक संस्था कर विभागास ठिपणी पृ.क्र. NS ७ परि.क्र.१८ वर दिलेल्या सूचनांनुसार जुलै -२०११ पासून प्रस्ताव मान्य होईपर्यंतच्या कालावधी पर्यंत पूर्वीच्याच दराने स्थानिक संस्था कराची वसूली करण्याबाबत आदेशित केलेले होते.** स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षण पथकाने उपरोक्त वस्तूंच्या कराची वसूलीबाबत माहिती मागविली असतांना विभागाने सादर केलेला खुलासा मुद्याला अनुसरून नाही.

**या संदर्भाने विभागाने शासनाने सुधारित दर लागू केलेल्या तारखेपूर्वीच कमी दराने वसूली केल्याचे दिसून येते. तसेच ज्या २० वस्तूंवरील दर कमी करण्यास शासनाने अद्यापही मान्यता दिलेली नाही त्याही वस्तूंवर प्रस्तावित कमी दराने वसूली केली जात आहे.**

**याबाबत झालेल्या नुकसानी संबंधी स्वतंत्रपणे विभागीय चौकशी करणे आवश्यक वाटते. सुधारित दर व प्रचलित दर यामधील फरकाच्या रकमेबाबत झालेल्या नुकसानी संदर्भाने जबाबदारी निश्चित करून, रक्कम संबंधितांकडून वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करण्यात यावी तसेच प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.**

१६) स्थानिक संस्था कर नोंदणीकृत प्लायवुडचे दुकानासंबंधीच्या कराबाबत.

स्थानिक संस्था कर विभागातील नोंदणीकृत प्लायवुड दुकाना संदर्भातील प्रकरणाच्या बाबतीत असे दिसून आले की, नोंदणी केलेल्या व्यावसायिकांनी सहामाही तसेच वार्षिक

विवरण सादर केलेले नाही. तसेच खालील दुकाना संदर्भात चौकशी केली असता त्या ठिकाणी नविन व्यवसाय असल्याबाबत कळविलेले आहे.

| अ.क्र. | पूर्वीचा व्यवसाय | पत्ता | नोंदणीकृत क्रमांक | नविन व्यवसाय |
|---|---|---|---|---|
| १ | पुजा प्लायवुड | एन-९ के,-३ हडको | १२०६११५७२६ | मोबाईल शॉपी |
| २ | श्री.प्लायवुड | शॉप क्र.२ मोतीवाला कॉम्प्लेक्स जालना रोड | १२०६११६०४३ | समर्थ ट्रेडर्स |
| ३ | यशोदा प्लायवुड | मोंढा नाका जालना रोड | १३१११३०७२२ | दुकान बंद |

उपरोक्त ठिकाणी नविन व्यवसाय सुरू असल्याबाबत माहिती मिळाली. प्रकरणांत पूर्वीच्या व नविन व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कराचे रिटर्न्स दाखल केलेले नाहीत त्याचप्रमाणे व्यावसायिकाने आपल्या व्यवसायाचा पत्ता बदलल्याबाबत स्थानिक संस्था कर विभागाकडे कळविल्याचे निदर्शनास आलेले नाही. याबाबतची माहिती लेखापरीक्षण पथकाने मागितली असता लेखापरीक्षणा दरम्यान माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

प्रकरणांत व्यापा-याने आपल्या व्यवसायाचा पत्ता बदलला असल्यास त्याची माहिती स्थानिक संस्था कर विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. विभागाने स्थानिक संस्था कर नोंदणी केलेल्या व्यापा-यांची माहिती वेळोवेळी अद्ययावत करून लेखापरीक्षण पथकास पुरविणे बंधनकारक आहे. पुढील लेखापरीक्षणापूर्वी माहिती तयार ठेवून लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा.

१७)अ) फटाका दुकान स्थानिक संस्था कराबाबत.

सन २०११ च्या दिवाळी सणानिमित्ताने औरंगाबाद शहरात आयात झालेल्या फटाका मालावरील स्थानिक संस्था कर वसूलीमये अनियमितता दिसून येते. अग्निशमन विभागाने ३९५ दुकानदारांना फटाका दुकानासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. यापैकी २८० दुकानदारांनीच स्थानिक संस्था कर विभागाकडे नोंदणी केल्याची माहिती प्राप्त झालेली आहे. नोंदणी झालेल्या दुकानदारांनी किती कराचा भरणा केला याची माहिती लेखापरीक्षण पथकास प्राप्त झालेली नाही. विभागाने दिलेली माहिती अपूर्ण आहे.

स्थानिक संस्था कर विभागात होत असलेली नोंदणी ही वैयक्तिक दुकानदाराची आहे. विभागाने केलेल्या खुलाशामध्ये फटाका दुकानाची नोंदणी असोसिएशनच्या माध्यमातून करण्यात आली असे कळविले आहे. ही बाब योग्य नसून वैयक्तिक नोंदणी आधारेच व्यावसायधारक एल.बी.टी. कराचे विवरणपत्रे दाखल करण्यास जबाबदार आहेत असोसिएशन नाही. विभागाने अशा प्रकारचे खुलासे करून आपली जबाबदारी टाळल्याचे सिध्द होते. यामुळे १९५ दुकानदारांनी स्थानिक संस्था कर विभागाकडे नोंदणी न केल्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. महानगरपालिकेच्या झालेल्या नुकसानी संबंधी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

ब) महानगरपालिका हद्दीतील दिवाळी फटाका दुकानाच्या स्थानिक संस्था कर वसूली बाबत.

स्थानिक संस्था कर विभागा मार्फत दिवाळी सणामध्ये महानगरपालिका हद्दीत विविध भागामध्ये फटाका दुकान लावण्यात येतात. अशा फटाका दुकानाचे स्थानिक संस्था कर

वसूली बाबत विभागाचे चलन व बँकेचे स्क्रोल प्रमाणे एकत्रित तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

स्थानिक संस्था कर विभागाने फटाका दुकानाचे दिनांक १८.१०.२०११ चे DCB बँकेचे भरणा केलेले एकूण ५० चलन व दिनांक २४.१०.२०११ चे DCB बँकेचे भरणा केलेले एकूण १८ चलन उपलब्ध करून दिले त्याची दिनांक १८.१०.२०११ ची एकूण रक्कम रू. १,२१,६००/- व दिनांक २५.१०.२०११ ची एकूण रक्कम रू.२४,४८७/- इतकी होते. परंतू DCB बँकेचे स्क्रोल नुसार तपासणी केली असता सदरील रकमेचा भरणा झालेला आहे किंवा कसे याचा बोध होत नाही.

विभागाने मूळ मुद्यांनुसार अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर केलेला नाही. लेखापरीक्षण विभागाने तपासणी केल्यानंतर एकूण रक्कम व स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेली रक्कम यात तफावत दिसून येत आहे.

लेखा परीक्षण पथकाने तपासणी केली असता महानगरपालिका हद्यीतील एकूण २८० फटाका दुकानाची नोंदणी स्थानिक संस्था कर विभागाकडे करण्यात आली आहे. तथापि DCB बँकेच्या चलनावरून केवळ ६८ फटाका व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कराची रक्कम भरणा केलेली दिसून आली. त्यामुळे २१२ फटाका व्यावसायिकांनी महानगरपालिकेचे स्थानिक संस्था कर नोंदणी करूनही भरणा केलेला नाही.

याबाबत स्थानिक संस्था कर विभागातील नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

१८) औरंगाबाद शहरातील आयात होणा-या सोने व चांदी वरील स्थानिक संस्था कराबाबत.

स्थानिक संस्था कर विभागात सहामाही व वार्षिक विवरणे सादर करण्याबाबत नियम क्र.२९(२)(ख) नुसार तरतूद करण्यात आलेली आहे. दाखल केलेली विवरण पत्रे व संबंधित व्यापा-यांनी वेळोवेळी भरणा केलेली चालान याचा ताळमेळ घेतला नसल्याचे दिसून आले. लेखापरीक्षणा दरम्यान उपरोक्त मुद्यांबाबत माहिती मागितली असता विभागाने माहिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे.

विभागाने माहिती उपलब्ध न करून दिल्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही. तसेच स्थानिक संस्था कर विभागातील अधिकारी व कर्मचारी अकार्यक्षम असल्याबाबतची बाब याद्वारे स्पष्ट होते. पुढील लेखापरीक्षणा वेळी अभिलेखे विभागाने उपलब्ध करून द्यावेत व अनुपालन अहवाल सादर करावा.

१९) स्थानिक संस्था कर विभागात नोंदणीकृत व्यापारी / उद्योजकांची वार्षिक विवरण दाखल केल्याची व LBT कर भरल्याची माहिती मिळणे बाबत.

स्थानिक संस्था कर विभागात सहामाही व वार्षिक विवरणे सादर करण्याबाबत नियम क्र.२९(२)(ख) नुसार तरतूद करण्यात आलेली आहे. दाखल केलेली विवरण पत्रे व संबंधित व्यापा-यांनी वेळोवेळी भरणा केलेली चालान याचा ताळमेळ घेतला नसल्याचे दिसून आले.

लेखापरीक्षणा दरम्यान उपरोक्त मुद्यांबाबत माहिती मागितली असता विभागाने माहिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे.

विभागाने मॉल्स, इंडस्ट्रीज,प्लायवुड डिलर्स, स्टील व्यापारी, भांडे व्यापारी, होजियरी, मशिनरी आणि मशिनरी पार्टस, कॉम्प्युटर डिलर्स, ऑप्टीकल्स, हार्डवेअर, इलेक्ट्रीकल आणि इलेक्ट्रॉनिक्स, कपडा व्यापारी, सर्जिकल्स, सॅनेटरी टाईल्स, मार्बल, टु व्हीलर ॲण्ड फोर व्हीलर ट्रेडर्स, सिमेंट डिलर्स, इत्यादींची माहिती उपलब्ध न करून दिल्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही. तसेच स्थानिक संस्था कर विभागातील अधिकारी व कर्मचारी अकार्यक्षम असल्याबाबतची बाब याद्वारे स्पष्ट होते. पुढील लेखापरीक्षणावेळी अभिलेखे विभागाने उपलब्ध करून द्यावेत व अनुपालन अहवाल सादर करावा.

२०) स्थानिक संस्था कर नियम -२०१० चे नियम ४७ नुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत.

स्थानिक संस्था कर विभागाच्या लेखापरीक्षणा दरम्यान ज्या नोंदणी धारकांनी नियम - २९ नुसार सहामाही व वार्षिक विवरणपत्रे सादर केलेत परंतू सादर केलेले विवरणपत्रे निरंक असल्यामुळे स्थानिक संस्था कर विभागाने संबंधितांना नियम ४७ नुसार नोटीस दिल्याचे लेखापरीक्षणा दरम्यान कळविले आहे. संबंधित नोंदणीधारकास नोटीसी मध्ये दिलेल्या तारीख व वेळेत दस्तऐवज व लेखे सादर करणे बंधनकारक आहे. तद्नंतर नोटीसीतील सूचनेप्रमाणे जर नोंदणीधारकाने पूर्तता केली नसेल तर त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून दिलेला नाही.

उपरोक्त बाबत विभागाने संबंधित नोंदणीधारकांविरूध्द केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपलब्ध करून ठेवावा व तसे लेखापरीक्षण विभागास अवगत करून अनुपालन अहवाल सादर करावा.

२१) मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ नियम - १५२ (ई) नुसार नियुक्त अधिकारी व त्यांना दिलेले अधिकार कामाचे विवरण बाबत.

स्थानिक संस्था कर विभागात नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कामाच्या बाबत प्राप्त विवरणानुसार यांचेकडून कामे होणे आवश्यक आहे. परंतू त्यांना दिलेल्या जॉबचार्टनुसार कामे केलेली आहेत किंवा नाही याची माहिती प्राप्त होवू शकली नाही.

स्थानिक संस्था विभागातील कामकाज नियमितरित्या होत नसल्याबाबतची बाब लेखापरीक्षण पथकास निदर्शनास आलेली आहे. दिलेल्या जॉबचार्टनुसार कामे होतात किंवा नाही याची खात्री करून घेतल्याचे विभाग प्रमुखांकडून दिसून आलेले नाही. लेखापरीक्षणास अभिलेखे / माहिती उपलब्ध करून न देणे ही बाब अयोग्य असून संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करावा.

२२) आर्थिक वर्ष १ जुलै २०११ ते ३० जून २०१२ पर्यंत नविन बांधकामधारकांची स्थानिक संस्था कर नोंदणी करण्याबाबत.

स्थानिक संस्था कर विभागा अंतर्गत महानगरपालिका हद्यीमध्ये होणा-या नविन बांधकामधारकाने बांधकाम परवाना घेतांना स्थानिक संस्था कर नोंदणी करणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेच्या नगररचना विभागातून बांधकाम परवाना दिला जातो. त्या विभागातून

प्राप्त यादी व स्थानिक संस्था विभागाने नोंदणी केलेल्या नविन बांधकामधारकांच्या नोंदी या तपासल्या असता तुलनात्मक दृष्ट्या झालेली नोंदणी अत्यल्प आहे. विभागाने त्यांचेकडील कर्मचा-यांकडून नविन बांधकामधारकांची नोंदणी केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडू शकते.

लेखापरीक्षण विभागाने उपरोक्त प्रमाणे दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करावा.

२३) जिल्हा पुरवठा अधिकारी (शहर विभाग) ने स्थानिक संस्था कर नोंदणी केल्याबाबतची माहिती मिळणे बाबत.

स्थानिक संस्था कर विभागा अंतर्गत जिल्हा पुरवठा अधिकारी (शहर विभाग) यांचे द्वारे शहरामये स्वस्त धान्य दुकानामार्फत विविध वस्तू वितरित केले जातात.

तरी, जिल्हा पुरवठा अधिकारी (शहर विभाग) यांनी स्थानिक संस्था कर नोंदणी केल्याबाबतची व रक्कम भरणा केल्याबाबतची माहिती लेखापरीक्षण विभागास विभागाने सादर केलेली नाही. सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

**लेखापरीक्षणास अभिलेखे / माहिती उपलब्ध करून न देणे ही बाब अयोग्य असून संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करावा.**

परिच्छेद क्र.२ :- आर्थिक वर्ष १ जुलै २०११ ते ३० जून २०१२ पर्यंत स्थानिक संस्था कराचा व बँक जमा रकमांचा रोख किर्द मध्ये जमा केल्याचा ताळेबंद मिळणे बाबत.

स्थानिक संस्था विभागात स्थानिक संस्था कर हा चलनाद्वारे प्रत्यक्ष व्यापारी / करधारक स्वत: भरतात. असा भरणा केलेली स्थानिक संस्था कराची माहिती स्थानिक संस्था कर कार्यालयात प्रत्यक्षपणे प्राप्त होते.

तरी स्थानिक संस्था विभागात प्राप्त चलनानुसार रक्कम व सर्वसाधारण रोखकिर्द मध्ये (लेखा विभागात) जमा केल्याबाबतचा नोंदीसह ताळेबंद लेखापरीक्षण विभागास अद्याप सादर केलेला नाही. व्यापारी यांनी भरणा केलेला कर हा बँकेत जमा होवून तेवढीच रक्कम लेखा विभागातील रोखकिर्द मध्ये जमा झाल्याबाबत अद्यापही Reconciliation झालेले नाही. त्यामुळे बँकांकडील जमा रक्कम पूर्णपणे महानगरपालिका फंडात भरणा होते किंवा नाही याबाबत खात्री करता आली नाही.

त्याचप्रमाणे स्थानिक संस्था कराची दैनंदिन वसूलीच्या रकमेबाबत दिलेले चालान व बँकेची प्रत याच्याशी संबंधित बँकेने दिलेला बँक स्क्रोल यांचा दैनंदिन ताळमेळ घेण्यात आलेला नाही.

स्थानिक संस्था कर विभागाचे कामकाज ऑनलाईन झाल्यास महानगरपालिकेचे खाते असलेल्या एकाच बँकेत कराचा भरणा होवू शकेल आणि भरणा केलेली रक्कम ही महानगरपालिकेस वापरता येईल. सध्या सहा बँकेत जमा होणारी रक्कम ही पूर्णत: महानगरपालिकेस वापरता येत नसल्यामुळे महानगरपालिकेस आर्थिक अडचणीस सामोरे जावे लागत आहे.

करिता विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत योग्य ती कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**<u>परिच्छेद क्र.३</u>** :- स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापा-यांचे आर्थिक वर्ष २०११-१२ व २०१२-२०१३ वर्षातील ज्या व्यापा-यांचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम - २०१० मधील नियम -३३ नुसार स्थानिक संस्था कराचे निर्धारण केलेल्या संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणे बाबत.

स्थानिक संस्था कर विभागा अंतर्गत व्यापा-याने स्थानिक संस्था कर नियम -२०१० चे नियम -२९ (२) (ख) अन्वये सहामाही व वार्षिक विवरण सादर केलेले असून अशा नोंदणीकृत व्यापा-याचे स्थानिक संस्था कर नियम -२०१० चे नियम -३३ नुसार विभागाने स्थानिक संस्था कराचे निर्धारण केलेल्या काही संचिका विभागाने उपलब्ध करून देण्यात आले आहे.

परंतु स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापा-याने स्थानिक संस्था कर नियम -२०१० चे नियम २९ (२) (ख) अन्वये सहामाही व वार्षिक विवरण सादर केलेले असून अशा नोंदणीकृत व्यापा-याचे स्थानिक संस्था कर नियम २०१० चे नियम ३३ नुसार विभागाने स्थानिक संस्था कराचे निर्धारण केलेल्या संचिका विभागाने अद्यापपर्यंत निर्धारण झालेले नसल्याने लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेल्या नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम -२०१० चे कलम २९ (२) (ख) अन्वये सहामाही व वार्षिक विवरण पत्र सादर करणे व्यापा-यास बंधनकारक आहे. त्यानुसार व्यापा-याने विवरण पत्र सादर केलेले असतांना सुध्दा नियम -३३ नुसार स्थानिक संस्था कर विभागातील अधिकारी व कर्मचा-यांनी संस्था कराचे निर्धारण न केल्यामुळे व्यापा-यांनी सादर केलेल्या विवरणानुसार आयात मालावर भरणा केलेला कर योग्य आहे किंवा नाही याबाबतची खात्री पटत नाही.

तरी यासंबंधी जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही अंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

**<u>परिच्छेद क्र.४ :-</u>** औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात विक्री, देणगी किंवा फलोभाग गहाण ई. वरील संलेखावर बसवावयाच्या मुद्रांक शुल्कासोबत १% रक्कम औरंगाबाद महानगरपालिकेस वितरण करण्याबाबत.

स्थानिक संस्था कर विभागाचे शासन निर्णय क्रमांक स्थासंक २०११/प्र.क्र.३३/११/ नवि-३४ च्या अधिसूचनेद्वारे शासनाने औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ०१ जुलै २०११ पासून जकाती बंद करून स्थानिक संस्था कर लागू केला आहे. त्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय क्रमांक स्थासंक २०११/प्र.क्र.३३/११/नवि-३४ अन्वये उक्त विषयांकित मुद्रांक शुल्कात १% दराने अधिभार आकारून वाढ करण्यात आलेली आहे.

तरी मुद्रांक शुल्काची एकूण जमा झालेली रक्कम व त्याच्या १% प्रमाणात प्राप्त झालेली रक्कम व शासनाकडून येणे बाकी रकमेचा तपशील सविस्तर टिपणी लेखा परीक्षण विभागास सत्वर उपलब्ध करून द्यावी, असे विभागास पत्र दिले असता विभागाने सन २०११-१२ या वर्षात माहे जुलै २०११ ते मार्च २०१२ अखेर रू.८.९४ कोटी मुद्रांक शुल्कापोटी

महानगरपालिकेस प्राप्त झाले. आणि शासनाकडून येणे बाकी रकमेचा तपशील हा लेखा विभागाशी संबंधित आहे असे विभागाने नमूद केले आहे.

शासकीय मुद्रांक शुल्काबाबत जर स्थानिक संस्था कर विभाग यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे व वेळोवेळी माहेवार विवरणात स्थानिक संस्था कराच्या वसूली सोबत १% मुद्रांक शुल्क कराची माहिती प्रतिमाह सादर केली जाते. परंतु लेखापरीक्षण विभागाने माहिती मागविली असता माहिती देण्यास संबंधित विभाग टाळाटाळ करतो किंवा लेखा विभागाकडे माहिती मिळेल असे नमुद करतो म्हणे स्थानिक संस्था विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे कर्तव्यात कसूर केली ही बाब सिध्द होते. करिता संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे.

**परिच्छेद क्र.५ :-** महानगरपालिका हद्यीतील आठवडी बाजारामधील स्थानिक संस्था कर वसूली बाबत.

स्थानिक संस्था कर विभागा अंतर्गत महानगरपालिका हद्यीत आठवडी बाजार असून तेथे विविध दुकान लागत असतात असे किती दुकानाला स्थानिक संस्था कर लावण्यात आला आहे. याबाबतचे लेखे व किती रक्कम वसूल करण्यात आली याची सविस्तर माहिती लेखापरीक्षण विभागास सादर करावी असे पत्र विभागास दिले असता विभागाने दिलेला खुलासा हा असमाधानकारक नियम (२)(ग)नुसार तात्पुरता धंदा सुरू करण्यापूर्वी १५ दिवसांत अर्ज सादर करणे व नियम ३ च्या उपनियम (२) खाली तात्पुरता धंदा सुरू करण्यापूर्वी १५ दिवसांत अर्ज सादर करणे व नियम ३ च्या उपनियम (२) खाली तात्पुरता व्यवसाय करण्यात किंवा धंदा करण्यात पात्र असलेल्या उलाढालीच्या नियमास अधिन राहून नोंदणी करणे क्रमप्राप्त होते. परंतु तशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून आलेले नाही.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. यासाठी जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**परिच्छेद क्र.६:-** एम.सी.एन.चॅनलवरील प्रदर्शित जाहीरातीवरील रू.५०,०००/- खर्च अदा केल्याबाबत.

स्थानिक संस्था कर विभागाने एम.सी.एन.चॅनलवरील प्रसारित जाहिरातीवर दिनांक २१.७.२०११ ते २०.९.२०११ या कालावधीत प्रदर्शित केलेल्या जाहिरातीवर रक्कम रू.५०,०००/- खर्च केल्याचे दिसून आलेले आहे. जाहिरात प्रदर्शनावर करण्यात आलेला खर्च हा कोणत्या मानांकनानुसार केलेला आहे याचा संचिका तपासण्यावर बोध होत नाही. जाहिरातीचे देयक अदाई करण्यापूर्वी संबंधित अधिका-याने प्रकाशित झालेल्या जाहिरातीबाबत प्रमाणित केलेले नाही. वास्तविक पाहता जाहिरात प्रकाशित करतांना संबंधित जाहिरात दिवसभरात किती वेळा प्रकाशित झाली आणि किती काळ प्रकाशित झाली याबाबत प्रमाणित होणे अभिप्रेत होते. तसे विभागाकडून जाहिरातीचे देयक अदाई करण्यापूर्वी तपासणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

उपरोक्त खर्च हा नियम बाह्य झालेला असून तो अमान्य करण्यात येत आहे. झालेला खर्च वसूल करून, महापालिका फंडात भरणा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७ :-** स्थानिक संस्था कर विभागात लागू करण्यात आलेल्या संगणक प्रणाली बाबतची माहिती लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून न देणेबाबत.

स्थानिक संस्था कर विभागामध्ये मे.फाऊन्टेन हेड इन्फोझोलुशन प्रा.लि. या एजन्सी मार्फत स्थानिक संस्था कर विभागातील डाटा संगणकात अपलोड करण्यात येत आहे. लेखापरीक्षण पथकाने याबाबत माहिती मागविली असता संबंधित कर्मचा-यांनी असे सांगितले की, संगणकावरील माहिती आम्ही देवू शकत नाही. ही माहिती एजन्सीच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयातील सर्व्हर वर उपलब्ध आहे आणि तेथील अधिकारीच आपल्याला माहिती देवू शकतील. संबंधित एजन्सी तर्फे चालू असलेले काम हे एजन्सीसोबत कुठल्याही प्रकारचा करारनामा न करताच करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे स्पष्ट अभिप्राय आहेत.

१. महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागातील माहिती एखाद्या एजन्सीला करारनामा न करताच उपलब्ध करून देणे ही बाब गोपनियतेचा भंग करणारी आहे.

२. संबंधित एजन्सी तर्फे होत असलेले काम हे तेथील अधिकारी व कर्मचारी यांना ज्ञात नसणे ही बाब अत्यंत गंभीर आहे.

३. लेखापरीक्षण पथकास संगणकावरील माहिती न देणे आणि खाजगी एजन्सीकडे माहिती उपलब्ध असणे ही बाब परस्परविरोधी असून त्याचा संबंधित एजन्सीमार्फत गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त अभिप्रायानुसार संबंधित विभागाने प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.८:-** स्थानिक संस्था कर विभागाकडे व्यापारी / उद्योजक यांच्या नोंदणीसाठी DATA FEEDING च्या कामाच्या संचिकेबाबत. (रक्कम रू.१९९००८/-)

स्थानिक संस्था कर विभागातील व्यापारी व उद्योजक यांनी महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या अर्जाची फिडींग करण्याचे काम मे.भक्तीज कॉम्प्युटर शॉप यांना रू१२/- per entry प्रमाणे देणे बाबत मान्यता दिलेली आहे. स्थानिक संस्था कर विभागाने व्यापा-यांची नोंदणी करतांना विक्रीकर कार्यालयाकडून माहिती प्राप्त करून घेतली होती त्यातील संख्या १५,०००/- एवढी आहे. Data entry चे काम १६,५८४ entries बाबत केलेले असल्याचे लेखापरीक्षणात मे.भक्ती कॉम्प्युटर यांना अदा केलेल्या रक्कम रू.१,९९,००८/- वरून दिसून येते. मे.भक्ती कॉम्प्युटर्स यांना देण्यात आलेले काम हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या नियमातील तरतूदीच्या अधिन राहून दिलेले नाही.

लेखापरीक्षण विभागाचे असे आक्षेप आहेत की, जर विक्रीकर विभागाकडून १५००० व्यापा-यांची यादी प्राप्त आहे तर पुनश्च Data Feeding च्या कामाची आवश्यकता काय ? १५००० Entries च्या Data Feeding साठी रू.१२/- प्रमाणे १,८०,०००/- हा निष्फळ ठरतो. उपरोक्त खर्चाबाबत संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**<u>परिच्छेद क्र.९:-</u>** स्थानिक संस्था कर विभागात संगणक साहित्य खरेदी बाबत रक्कम रू.६७,१५०/-

स्थानिक संस्था कर विभागाने खरेदी केलेल्या संगणक साहित्य खरेदीत अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

१) स्थानिक संस्था कर विभागाने लेखा शाखेची सहमती न घेताच निविदा दरपत्रका द्वारे खरेदी केली.

२) मुख्य भांडार विभागातून संगणक साहित्याचा पुरवठा होवू शकत असतांना स्थानिक संस्था कर विभागाने परस्पर खरेदी करणे ही बाब आक्षेपार्ह आहे.

३) संगणक साहित्य खरेदी केल्यानंतर त्याची नोंद रजिस्टर क्र.१०९ मध्ये घेण्यात आली. परंतु संगणक साहित्य कोणास वाटप केले याबाबतचा उल्लेख उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे रजिस्टर क्र.११० व १११ तयार करून पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपलब्ध करून देण्यात यावेत.

४) संगणक साहित्याची खरेदी करतांना रकमेस मंजूरी देणा-या सक्षम प्राधिकार्याच्या मंजूरीविना खर्च अदा करण्यात आलेला आहे. त्यामुळे झालेला खर्च हा नियमबाह्य आहे.

उपरोक्त १ ते ४ मुद्यांनुसार स्थानिक संस्था कर विभागाने संगणक साहित्य खरेदी करतांना झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**<u>परिच्छेद क्र.१०:-</u>** स्थानिक संस्था कर विभागात इ.पी.बी.एक्स प्रणाली खरेदी करणे बाबत.

स्थानिक संस्था कर विभागाने खरेदी केलेल्या इ.पी.बी.एक्स प्रणाली खरेदीत अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

१) स्थानिक संस्था कर विभागाने लेखा शाखेची सहमती न घेताच निविदा दरपत्रकाद्वारे खरेदी केली.

२) इ.पी.बी.एक्स प्रणाली खरेदी केल्यानंतर त्याची नोंद रजिस्टर क्र.१०९ मध्ये घेण्यात आली नाही.

३) इ.पी.बी.एक्स प्रणालीची खरेदी करतांना रकमेस मंजूरी देणा-या सक्षम प्राधिकार्याच्या मंजूरीविना खर्च अदा करण्यात आलेला आहे. त्यामुळे झालेला खर्च हा नियमबाह्य आहे.
४) सद्यस्थितीत इ.पी.बी.एक्स प्रणाली बंद असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे झालेला खर्च निष्फळ ठरतो.
५) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचित (ड) प्रकरण (५) कलम २ (१) चे परंतूकामधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

उपरोक्त १ ते ५ मुद्यांनुसार स्थानिक संस्था कर विभागाने इ.पी.बी.एक्स प्रणाली खरेदी करतांना झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११:-** स्थानिक संस्था कराची नोंदणी प्रभावीपणे होण्यासाठी रेडिओ मिर्ची ९८.३ एफएम वरील जाहिरात खर्च ८१,३०२/- व रेड एफएम ९३.५ वरील जाहिरात खर्च रू.१,६३,७९५/- बाबत.

स्थानिक संस्था कर विभागाने रेडिओ मिर्ची ९८.३ एफएम चॅनलवरील प्रसारित जाहिरातीवर दिनांक १६.७.२०११ ते ३०.७.२०११ या कालावधीत प्रसारित केलेल्या जाहिरातीवर रक्कम रू.८१,३०२/- खर्च केल्याचे दिसून आलेले आहे. तसेच रेड एफएम ९३.५ वरील जाहिरात खर्च रू.१,६३,७९५/- झाल्याचे अपु-या कागदपत्रावरून निदर्शनास आले. जाहिरात प्रसारणावर करण्यात आलेला खर्च हा कोणत्या मानांकनानुसार केलेला आहे याचा संचिका तपासण्यावर बोध होत नाही. जाहिरातीचे देयक अदाई करण्यापूर्वी संबंधित अधिका-याने प्रसारित झालेल्या जाहिरातीबाबत प्रमाणित केलेले नाही. वास्तविक पाहता जाहिरात प्रसारित करतांना संबंधित जाहिरात दिवसभरात किती वेळा प्रसारित झाली आणि किती काळ प्रसारित झाली याबाबत प्रमाणित होणे अभिप्रेत होते. तसे विभागाकडून जाहिरातीचे देयक अदाई करण्यापूर्वी तपासणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

उपरोक्त खर्च हा नियमबाह्य झालेला असून तो अमान्य करण्यात येत आहे. झालेला खर्च वसूल करून, महापालिका फंडात भरणा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२:-** स्थानिक संस्था कर विभागातील खर्च प्रमाणकावर आहरण व संवितरण अधिकारी म्हणून स्वाक्षरी करणेचे अधिकार प्रदान केल्याचे आदेश उपलब्ध करून देणे बाबत.

स्थानिक संस्था कर लेखापरीक्षणा दरम्यान प्राप्त उपलब्ध अभिलेख्यांमध्ये व संचिकामध्ये उपायुक्त (म) तर काही संचिकातील प्रमाणकावर स्थानिक संस्था कर अधिकारी यांच्या स्वाक्ष-या आहेत. स्थानिक संस्था करातील उपरोक्त दोन विविध प्रमाणकावरील स्वाक्ष-यामुळे नेमके संबंधित विभागासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कोणत्या अधिका-यास नियुक्ती दिलेली आहे याचा बोध होत नाही.

स्थानिक संस्था कर विभागास प्राप्त असलेल्या वित्तिय अधिकार कक्षेबाबत असलेल्या आदेशाची प्रत उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही.

| | | |
|---|---|---|
| १ | L.B.T. Data Entry घेणे बाबत दरपत्रक मागविणे बाबत. | (रक्कम रू.१,९९,००८/-) |
| २ | रेडिओ मिर्ची ९८.३ एफ.एम.जाहिरात देणेबाबत. | (रक्कम रू.५०,०००/-) |
| ३ | स्थानिक संस्था कर अधिकारी यांच्यासाठी टेबल खरेदी करणे बाबत. | (रक्कम रू.२७,०००/-) |
| ४ | स्थानिक संस्था कर विभागात संगणक साहित्य खरेदी बाबत. | (रक्कम रू.२८,१५०/-)<br>(रक्कम रू.३९,०००/-) |
| ५ | आशिष म्युझिक व्हिजन देयक (L.B.T.) | (रक्कम रू.२६,७७६/-) |
| ६ | स्थानिक संस्था कर अधिकारी यांचे कक्षात पी.व्ही.सी. / प्लास्टीक लॅमीनेटेड मॅट बसविणे बाबत. | (रक्कम रू.२८,३५०/-) |
| ७ | संगणक कक्षात व अभिलेख कक्षात पी.व्ही.सी.मॅट बसविणे बाबत. | (रक्कम रू.२६,५००/-) |
| ८ | अंतर्गत टेलिफोन व्यवस्था करणे बाबत. | (रक्कम रू.४९,८४६/-) |
| ९ | स्थानिक संस्था कर अधिकारी -२ यांचे दालन व अलमारी, टेबल दुरूस्ती बाबत. | (रक्कम रू.१५००/-) |
| १० | एम.सी.एन.दिवाळी अंकाचे प्रायोजक स्वीकारणे बाबत. | (रक्कम रू.५१,०००/-) |
| ११ | रेड एफ.एम.जाहिरात प्रसारण करणे बाबत. | (रक्कम रू.१,८२,०१२/-) |
| १२ | एम.सी.एन.चॅनेल वर जाहिरात देणे बाबत. | (रक्कम रू.१,४६,४४८/-)<br>(रक्कम रू.६१,९४५/-)<br>(रक्कम रू.१,०५,८६७/-) |
| १३ | स्थानिक संस्था कर विभागातील (उपायुक्त(म), यांचे दालनातील खुर्ची खरेदी बाबत. | (रक्कम रू.५,८५०/-) |
| | **एकूण रूपये** | **१०,२९,९५२/-** |

उपरोक्त १३ संचिकांमध्ये झालेला खर्च रक्कम रू.१०,२९,२५२/- हा नियमबाह्य असून तो अमान्य करण्यात येत आहे. वरील खर्च वसूल करून महापालिका फंडात जमा करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

# *भांडार विभाग*
## सन २००३-०४ ते सन २०११-१२
## लेखापरीक्षण अहवाल

**<u>प्रस्तावना :</u>**

महानगरपालिके अंतर्गतच्या भांडार विभागाचे सन २००३-०४ ते सन २०११-१२ पर्यंतचे चाचणी स्वरूपाचे नियमित लेखापरीक्षण उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानुसार करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने महानगरपालिकेअंतर्गत विविध विभागातील कर्मचारी /अधिकारी / स.पदाधिकारी यांना मध्यवर्ती भांडार विभागामार्फत विविध साहित्याचा पुरवठा करण्यात येतो. जसे -फर्निचर खरेदी, छपाई साहित्य खरेदी, गणवेश खरेदी संचिका, व इतर अनुषंगिक बाबींच्या संचिका तपासण्यात आल्या असून रजि.क्र.१०९,स्टॉक रजि., रजि.क्र.११०, वितरण रजि.,रजि.क्र.१११, ताळमेळ रजि.सदरील रजिस्टर मध्ये साहित्याच्या नोंदी अपूर्ण असल्याकारणाने ताळमेळ करता आले नाही. त्यादरम्यान खर्च बाजूचे लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण **४८** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**<u>भांडार अधिक्षक यांच्या कार्यकाळाबाबत :</u>**

सन २००३- २००४ ते सन २०११-१२ या कालाधीत भांडार अधिक्षक म्हणून कार्यरत अधिका-यांची नांवे आस्थापना -१ विभागाकडून प्राप्त झालेली आहेत ती खालीलप्रमाणे -

**भांडार अधिक्षक**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री.एम.एम.पाटणी | ११.११.१९९९ ते ऑगस्ट -२००५ |
| २ | श्री.अंकुश लाड | सप्टेंबर -२००५ ते ११.११.२००८ |
| ३ | श्री.सी.एम.अभंग | ०१.१२.२००८ ते ०३.१०.२००९ |
| ४ | श्री.मनोहर सुरे | नोव्हेंबर-२००९ ते ३०.०६.२०११ |
| ५ | श्री.एस.टी.पहाडिया | ०२.०८.२०११ ते ३१.१०.२०१२ |

**<u>लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-याची नांवे :</u>**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक श्री.मो.रा.थत्ते यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे -

१. श्री.संजय जक्कल, कार्यालयीन अधिक्षक
२. श्री.अनंत सोनटक्के, पथक प्रमुख
३. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक
४. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक
५. श्री. नासेर लईख, वरीष्ठ लिपीक
६. श्री. ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक

भांडार विभागाकडील प्रलंबित लेखा परीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे - सन २००२-२००३ ते सन २००३-२००४ मुद्दा क्र.अ,ब,व क.

**परिच्छेद क्र.१ : लेखापरीक्षणास्तव आवश्यक ते सर्व लेखे /अभिलेखे उपलब्ध करुन देणे बाबत.**

भांडार विभागाचे सर्व लेखे / अभिलेखे तात्काळ लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करुन द्यावे, जसे की, खर्चाच्या संचिका, प्रोव्हीजन रजिस्टर, साठा नोंदणी नमूना क्र.१०९,११० व १११ रजिस्टर, डेडस्टॉक रजिस्टर इत्यादी लेखापरीक्षणा कामी उपलब्ध करुन देण्याबाबत भांडार विभागास कळविले असता खालील लेखे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | वर्ष | नमुना रजिस्टर क्र.१०९ | नमुना रजिस्टर क्र.११० | नमुना रजिस्टर क्र.१११ | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००३-०४ | ९.४.२००३ ते ३१.३.२००४ | (एकूण ४ रजिस्टर ) १.४.२००३ ते ३१.३.२००४ | B - छपाई साहित्य<br>C- स्वच्छता साहित्य<br>D- गणवेश, फर्निचर | A- लिखाण साहित्य रजिस्टर उपलब्ध नाही. |
| २ | २००४-०५ | २०.४.२००४ ते ३१.३.२००५ | ०१.०४.२००४ ते ६.८.२००४ | A- लिखाण साहित्य<br>C- स्वच्छता साहित्य<br>D- गणवेश, फर्निचर | १) रजिस्टर क्र.११०,दि.७.८.२००४ ते ३१.३.२००५ पर्यंतचे रजिस्टर उपलब्ध नाही.<br>२) रजिस्टर क्र.१११ मधील B- छपाई साहित्य रजिस्टर उपलब्ध नाही. |
| ३ | २००५-०६ | एकूण रजि.२ दि.५.४.२००५ ते ३१.३.२००६ | २४.०३.२००६ ते ०६.०६.२००६ | --- | १) रजिस्टर क्र.११०, दि.१.४.२००५ ते २३.३.२००६पर्यंतचे रजिस्टर उपलब्ध नाही.<br>२) रजिस्टर क्र.१११ मधील A, B,C व D उपलब्ध नाही. |
| ४ | २००६-०७ | दि.१५.४.२००६ ते ३०.३.२००७ | एकूण रजि.७ ०१.०४.२००६ ते ३१.०३.२००७ | --- | रजिस्टर क्र.१११ मधील A, B,C व D उपलब्ध नाही. |
| ५ | २००७-०८ | -- | एकूण रजि.७ ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ | --- | १) रजिस्टर क्र.१०९ उपलब्ध करुन दिलेले नाही.<br>२) रजिस्टर क्र.१११ मधील A, B,C व D उपलब्ध नाही. |
| ६ | २००८-०९ | दि.३.५.२००८ ते २९.८.२००८ | एकूण रजि.५ ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ | -- | १) रजिस्टर क्र.१०९ दि.३०.८.२००८ ते ३१.३.२००९ पर्यंतचे रजिस्टर उपलब्ध करुन दिलेले.<br>२) रजिस्टर क्र.१११ मधील A, B,C व D उपलब्ध नाही. |
| ७ | २००९-१० | एकूण रजि.२ दि.१३.४.२००९ ते ३१.३.२०१० | एकूण रजि.४ ०१.०४.२००९ ते ३१.०३.२०१० | C- स्वच्छता साहित्य | रजिस्टर क्र.१११ मधील A, B,व D उपलब्ध नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | २०१०-११ | दि.१९.४.२०१० ते ३१.३.२०११ | एकूण रजि.३ ०३.०४.२०१० ते १७.०२.२०११ | | १) रजिस्टरक्र.११०, दि.१८.२.२०११ ते ३१.३.२०११ पर्यंतचे रजिस्टर उपलब्ध करून दिलेले नाही.<br>२) रजिस्टर क्र.१११ मधील A, B,C व D उपलब्ध नाही. |
| ९ | २०११-१२ | -- | एकूण रजि.२ ०१.०४.२०११ ते १६.०१.२०१२ | | १)रजिस्टर क्र.१०९ उपलब्ध करून दिलेले नाही.<br>२) रजिस्टरक्र.११०, दि.१७.१.२०१२ ते ३१.३.२०१२ पर्यंतचे रजिस्टर उपलब्ध करून दिलेले नाही.<br>३) रजिस्टर क्र.१११ मधील A, B,C व D उपलब्ध नाही. |

उपरोक्त तक्त्यानुसार शेरा या कॉलम मध्ये त्या-त्या आर्थिक वर्षाचे भांडार विभागाने उपलब्ध करून न दिलेले अभिलेख्यांचा उल्लेख केलेला आहे. वास्तविक पाहता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम क्र. १४२ प्रमाणे नमुना क्र. १०९, ११० व १११ मध्ये अभिलेखे ठेवणे आवश्यक आहे.

विभागाने अपूर्ण अभिलेखे लेखापरीक्षण पथकास सादर केल्यामुळे पूर्णत: लेखापरीक्षण करता आले नाही. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम १४२ चा भंग झालेला असल्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून आवश्यक ते अभिलेखे तयार ठेवून लेखापरीक्षण विभागास प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२ (१) :भांडार विभागात खरेदी केलेल्या साहित्याची वर्षनिहाय मंजूर दर संचिका उपलब्ध करून देणे बाबत.**

**(२) आर्थिक वर्ष २००३-०४ ते २०११-१२ या कालावधीतील भांडार विभागातील खर्च बाजूचा माहेवार खर्चाचा तपशिल (लेखा विभागातील प्रोव्हीजन नुसार) उपलब्ध करून देण्याबाबत.**

**(३) आर्थिक वर्ष २००३-०४ ते सन २०११-१२ या कालावधीत विनावापर पडून असलेल्या साहित्याची यादी उपलब्ध करून देण्याबाबत.**

**(४) महानगरपालिकेच्या कार्यरत अधिकारी व पदाधिकारी यांना भांडारातून साहित्य किती प्रमाणात देण्यात यावे या संबंधी निकष असले बाबतचे आदेश उपलब्ध करून देण्याबाबत.**

**(५) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम क्र.९ नुसार नमूना क्र.१ मध्ये ठेवलेली नोंदवही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत.**

**(६) आर्थिक वर्ष २००३-०४ ते सन २०११-२०१२ या कालावधीत खरेदी केलेल्या साहित्याचा तपशिल वर्षनिहाय उपलब्ध करून देणेबाबत.**

**(७) औरंगाबाद महानगरपालिका भांडार विभागात विविध साहित्याचा पुरवठा करणा-या पुरवठाधारकांची माहिती मिळणे बाबत.**

**(८) वर्षनिहाय नविन टोनर खरेदी व रिफेलिंग संचिका उपलब्ध करून देणे बाबत.**

**(९) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम १४४ नुसार नमूना क्र.११४ मध्ये ठेवलेली नोंदवही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत.**

**(१०) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम १५६ नुसार स्थावर व जंगम मालमत्ता यांची वार्षिक पडताळणी अहवालाबाबत.**

**(११) भांडार विभागातील साहित्य खरेदी बाबत.**

उपरोक्त परिच्छेद क्र.२ मधील मद्या क्र. १ ते ११ अन्वये संबंधित विभागाने अभिलेखे लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून न दिल्यामुळे साशंकता निर्माण होते. तरी विभागाने जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३: भांडार विभागात अग्निशमन साहित्य बसविल्याबाबत व विमा काढल्याबाबतची माहिती मिळणे बाबत.**

भांडार विभागात अग्निशमन साहित्य बसविलेले आहेत त्याबाबतची व भांडार विभागाचा विमा काढलेला असेल त्याबाबतची माहिती अथवा संचिका अथवा लेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून द्यावी असे सूचित केले असता विभागाने लेखापरीक्षणा दरम्यान माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

विभागाने संबंधितांविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करून पुढील लेखापरीक्षणापूर्वी माहिती उपलब्ध करून द्यावी व अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४: दैनंदिनी (एक्झुकेटीव्ह डायरी) छपाई २००३/०४ बाबत.**

आर्थिक वर्ष २००३-०४ दैनंदिनी (एक्झुकेटीव्ह डायरी) छपाई साठी मे. फरहा इंटरप्रायजेस यांना वाटाघाटी करून रू.१०५/- प्रमाणे जा.क्र.मनपा/भांडार/४८९, दिनांक २.१२.२००३ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. सन २००३-०४ दैनंदिनी छपाई खालील बिलाद्वारे करण्यात आले आहे.

| बिल नं. व दिनांक | पुरवठा दराचे नांव | साहित्याचे नांव | परिमाण | बिलाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १३३<br>९.१.२००४ | FRAA Interprises | दैनंदिनी छपाई | ६०० नग | ६३,०००/- |

भांडार विभागातील भांडार लेख्याची तपासणी केली असता खालील उणिवा आढळून आल्या.

१) सन २००३-०४ या वर्षाकरीता महानगरपालिकेमार्फत ६०० नग दैनंदिनी छपाई करण्याबाबत प्रस्तावित केले आहे. परंतु सदरची दैनंदिनीची संख्या कशी निश्चित केली याबाबत संचिकेत नमूद केलेले नाही.

२) दैनंदिनी छपाई (सन २००३-०४) खरेदी करतांना लेखाशिर्ष छपाई साहित्य खर्च नमूद केलेला नाही. यासाठी किती तरतूद शिल्लक आहे. याचा बोध होत नाही.

३) दैनंदिनी छपाई २००३-०४ साठी करारनामा संचिकेत दिसून आला नाही.

४) पुरवठादारास रक्कम प्रदान केलेल्या रकमेतून आयकर वसूली बाबत देयकाच्या स्थळप्रतीवर उल्लेख नाही. त्यामुळे रक्कम प्रदान करतांना आयकर वसूल झाला किंवा नाही याची खात्री देता येत नाही.

५) संचिकेत माल प्राप्त झाल्याबाबत D.C. नाही.

६) पुरवठादाराने अटी शर्ती प्रमाणे १५ दिवसांत साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात ३४ दिवस उशिरा साहित्य पुरविले आहे. अटी व शर्तीनुसार रू. १००/- प्रतिदिन प्रमाणे ३४ x१००=३४००/- रु.दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

दैनंदिनी छपाई करतांना झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन तसेच पुरवठाधारकाने साहित्याचा उशिरा पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार दंडाची रक्कम संबंधित एजन्सीकडून वसूल करुन महानगरपालिका फंडात भरणा करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५ : सन २००३-०४ या वर्षामध्ये विविध छपाई साहित्य इ. खरेदी बाबत अनियमितता.(संचिका क्र.४)**

भांडार विभागाचे सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील छपाई साहित्य खरेदी बाबत संचिका तपासली असता विविध विभागांनी भांडार विभागाकडे छापील साहित्य मागणीबाबत पत्र दिलेले आहेत. छपाई निविदा अंतिम झालेली नाही. मागील वर्षाच्या दराने छपाई करणेबाबत प्रस्तावित केले आहे. इत:पर खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

१. पु.आ.क्र / मनपा/भांडार/१०७/०३, दि.३०.५.२००३ द्वारे मालपुरवठा केल्याबाबतचे बिल क्र ७९, दि. २६.६.२००३ (रु१४०४०/-) मात्र माल प्राप्त झाल्याबाबत (D.C.) डिलेव्हरी चलन संचिकेमध्ये दिसून आले नाही.

२. पुरवठा आदेश क्र /मनपा/भांडार/३६५/०३, दि१२.९.२००३ रक्कम रु ३१५०/- असा आदेश संचिकेत आहे . मात्र मालपुरवठा केल्याबाबत बिल व डिलेव्हरी चलन संचिकेत दिसत नाही.

३. पु.आ.क्र /मनपा/भांडार/४०१/०३,दि.१५.१०.२००३ (रु८४७८) लिखान साहित्याचा पुरवठा आदेश संचिकेत आहे. मात्र बिल व माल प्राप्त झाल्याबाबतचे डिलेव्हरी चलन संचिकेत दिसून येत नाही.

४. पु.आ.क्र /मनपा/भांडार/४०२/०३,दि.१५.१०.२००३ (रु १५६०/-) स्वच्छता साहित्य पुरवठा आदेश संचिकेत आहे. मात्र माल प्राप्त झाल्याबाबतचे डिलेव्हरी चलन संचिकेत दिसून येत नाही.

५. पु.आ.क्र /मनपा/भांडार/४३१/०३,दि.२४.१०.२००३ छपाई साहित्य पुरवठा करणेबाबतचा आदेश संचिकेत आहे. मात्र साहित्य प्राप्त बाबत डिलेव्हरी चलन संचिकेत नाही.

६. छपाई साहित्य पुरवठा केल्याबाबत बिल क्र ७४७ ,दि.१५.१२.०३ द्वारे संबंधित एजन्सीस रु ११००/- इतकी रक्कम अदा केल्याचे दि.१७.१२.२००३ रोजीचे व्हाउचर संचिकेत आहे. मात्र पुरवठा आदेश व सदर साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे डिलेव्हरी चलन संचिकेमध्ये दिसून येत - नाही.

७. पु.आ.क्र /मनपा/भांडार/६४२/०४,दि.१६.२.२००४ रु२७३०/- छपाई साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे बिल डिलेव्हरी चलन संचिकेत दिसून येत नाही .

८. पु.आ.क्र /मनपा/भांडार/७१३/०४,दि.३१.३.२००४ नुसार छपाई साहित्याचे बिल व साहित्य प्राप्त बाबतचे डिलेव्हरी चलन संचिकेत दिसून येत नाही .

९. पु.आ.क्र/मनपा/भांडार/७१२/०४,दि.३१.०३.२००४ अन्वये छपाई साहित्याचे बिल क्र ९०४/ ०५ दि. २.१२.२००५ रु. ६८४७ /- रक्कम अदा केलेली आहे . मात्र साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे डिलेव्हरी चलन संचिकेत दिसून येत नाही . तसेच दि . ३१.३.२००४ रोजीचा पुरवठा आदेश व दि. २.१२.२००५ रोजी साहित्य पुरवठा केल्याचे बिल म्हणजे जवळपास २१ महिने विलंबाने पुरवठा झाल्याचे दिसते. नियम अटी नुसार दंडनिय कार्यवाही झालेली आहे काय या बाबत खुलासा करावा.

१०. पु.आ.क्र /मनपा/भांडार/४६/०४,दि.१४.५.२००४ अन्वये छपाई साहित्याचे बिल क्र८३७ /०५ दि. २०.२.२००५ (रु. ४५३७०/-) बिलाची रक्कम प्रदान करतांना C.C. व्हाउचर प्रमाणे रु. ३५२५६/- रक्कम अदा केल्याचे दिसते .मात्र पुरवठा आदेश दि १४.५.२००४ चे व साहित्य पुरवठा दि २०.२.२००५ रोजी म्हणजे विलंबाने झालेले आहे. तसेच डिलेव्हरी चलन याबाबत अटी /शर्तीनुसार दंडनिय काय कार्यवाही केली याबाबत खुलासा करावा.

११. पु.आ.क्र/मनपा/भांडार/८३/०४,दि.१.६.२००४ अन्वये छपाई साहित्याचे बिल क्र८१२ /०४ दि. २६.८.२००४ (रु . ३१३७३/-) अदा केलेले दिसते. मात्र सदर साहित्य प्राप्त झाल्याबाबत डिलेव्हरी चलन संचिकेत दिसून येत नाही .

१२. पु.आ.क्र /मनपा/भांडार/१२३/०४,दि.२४.६.२००४ अन्वये छपाई साहित्य पुरवठा केल्याचे बिल क्र८०२ /०४ (रु . ९९७८ /-) इतकी रक्कम अदा केलेली आहे. मात्र सदर साहित्य प्रत्यक्षात प्राप्त झाले बाबत डिलेव्हरी चलन संचिकेत दिसून येत नाही.

वरील सर्व साहित्य खरेदी करीता निविदा मागविण्यात आल्या आहेत व तुलनात्मक दृष्टया कमी दर M/s Libarty Printers यांचे आहे . असे संचिका क्र ४ सन २००३-०४ पृ.क्र. ३ व परि. क्र(१४) मध्ये नमूद केलेले आहे. परंतु संचिके मध्ये तसे निविदा मागविलेल्या दिसत नाही .

उपरोक्त अनियमिततेबाबत विभागाने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानी संबंधी रकमा वसूल करुन महानगरपालिका फंडात भरणा करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६: सन २००३-०४ या वर्षासाठी ड्रेनेज बांबु खरेदी बाबत. (रक्कम रु. ७५,१६८/- ) संचिका क्र.८**

सन २००३-०४ या वर्षात ड्रेनेज बांबू खरेदीसाठी दरपत्रके निविदा ०३ प्राप्त झाल्या. सदरील निविदा दैनिक सकाळ या वृत्तपत्रात दिनांक ७.३.२००३ रोजी प्रसिध्द झाली. ०३ निविदापैकी मे.नॅशनल बांबू मर्चन्ट्स यांचे दर सर्वात कमी आहेत. सन २००३-०४ या वर्षीच्या अर्थसंकल्पात ड्रेनेज बांबू खरेदीसाठी रुपये ३ लक्ष तरतूद करण्यात आली होती. एजन्सी सोबत वाटाघाटी अंती कार्यादेश देण्यात आलेले आहेत. संचिका सविस्तर तपासणीअंती खालील बाबी निदर्शनास आल्या.

१) निविदा मान्य असल्याबाबत रु. २० च्या बॉन्डपेपरवर करारनामा करुन घेणे आवश्यक असतांना करारनामा संचिकेत दिसून येत नाही.

२) बांबु पुरवठा आदेश १) क्र/मनपा/भांडार/३६८/०३ दि.१२/९/०३ बांबु पुरवठा बिल क्र.१५ दि.३०/९/०३ १)क्र./मनपा/भांडार/१५३/०३ दि.३०/६/०३, २)क्र./मनपा/भांडार/२२०/०३ दि.१५/७/०३ अन्वये बांबुपुरवठा बिल क्र.०९ दि.३०/७/०३ नुसार बांबु विविध झोन कार्यालयास प्राप्त झाले. D.C. डिलेव्हरी चलन संचिकेत दिसत नाही.

त्यानुसार ३७१२ रनिंग फुट बांबु प्रती रनिंग फुट रु. ६७५/- प्रमाणे तीन महिन्याकरिता एकूण रक्कम रु. ७५,१६८/- अदा केल्याचे संचिकेत नमूद केलेले आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत विभागाने खातरजमा व शहानिशा करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७: लोखंडी हातगाडी खरेदी बाबत.(आर्थिक वर्ष ०३-०४ )**
**(विलंब शुल्क रक्कम रुपये १७,४१०/-)**

सन २००३-०४ या आर्थिक वर्षासाठी लोखंडी हातगाडी खरेदीसाठी निविदा मागविली असता एकूण ०८ निविदा विक्री झाल्या त्यापैकी ०५ निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची मे.नॅशनल फॅब्रीकेट्स ऑफ ट्रेडर्स यांस मा.आयुक्त यांनी दिनांक २७.०६.२००३ नुसार मंजूरी देण्यात आली. तसेच लोखंडी हातगाडीवर घंटा बसविण्याकरीता स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी दिली असता दोन निविदा प्राप्त झाल्या असून मे.नॅशनल फॅब्रीकेट्स ऑफ ट्रेडर्स यांचे दर कमी प्राप्त झाले असून त्यासही मा.आयुक्त यांनी दिनांक २७.१०.२००३ अन्वये मंजूरी देण्यात आली. संचिकेची तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या विलंब शुल्काबाबतचा विवरण तक्ता खालील प्रमाणे -

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याचे नांव | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | विलंब दंड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.नॅशनल फेब्रीकेटर्स | १६६ २५.६.२००३ | ३० | लोखंडी हातगाडी | १,९०,३००/- | ५८ | ७७०८/- |
| २ | मे.नॅशनल फेब्रीकेटर्स | १६६ २५.६.२००३ | ६० | लोखंडी हातगाडी | १,९०,३००/- | ४२ | ५७०६/- |
| ३ | मे.नॅशनल फेब्रीकेटर्स | ५८१ १.११.२००३ | १५ | घंटा | ८८,८००/- | ०९ | ३९९६/- |
| | | | | | | एकूण | **१७४१०/-** |

तथापि विभागाने आपल्या स्तरावर संचिकेची तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही करुन दंडाची रक्कम वसूल करुन महानगरपालिका फंडात जमा करुन तसा अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८: आरोग्य विभाग साहित्य मागणी.**

भांडार विभागाचे लेखापरीक्षण करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. परिच्छेद क्र. १० अन्वये मा.वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी पत्र क्र. जा.क्र./मनपा/निरंक/१२.१२.२००३ अन्वये खालील छपाई साहित्याची मागणी केली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स्टॉक बुक औषधी | ४०० पानी | १० नग |
| २. | स्टॉक बुक औषधी | २०० पानी | २० नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | स्टॉक बुक औषधी | १०० पानी | २० नग |
| ४. | औषधी पुरवठा आदेश | १०० पानी | २५ पॅड |

उपनिर्दिष्ट छपाई साहित्याचे दर मान्य नसलेले बाजारातून दरपत्रके मागविणे योग्य राहील असे संचिकेत नमूद असतांना संचिकेत याबाबत दरपत्रके नाही.

२. छपाई साहित्य खरेदी करण्याबाबत वरिष्ठांची मंजूरी नाही. पुरवठा आदेश नाही, माल प्राप्त झाला आहे किंवा नाही त्याचे देयक किती अदा करण्यात आले याबाबत संचिकेत उल्लेख नाही.

३. आरोग्य विभाग यांचे पत्र क्रमांक जा.क्र./मनपा/आरोग्य/पपोमो/२४१२/०३, दिनांक २३.१२.२००३ अन्वये दिनांक ४.१.२००४ व दिनांक २२.२.२००४ या दोन दिवशी पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविली जाणार आहे त्यासाठी ५७० मार्कर पेन्स पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेसाठी पुरवावे असे असतांना पुन्हा जा.क्र./मनपा/पपोमो/१७८/२००४, दिनांक ७.२.२००४ अन्वये ५४० मार्कर पेन्स मागविले आहे.

४. परीच्छेद क्रमांक ५ अन्वये एकूण २१४० चे साहित्य खरेदी करण्यात आले. परंतू संचिकेत देयक D.C. नाही.

५. भांडार विभागातील साठा रजिस्टर (क्रमांक १०९)

६. मार्कर पेन्स खरेदी खर्च हा शासनाच्या प्राप्त निधी अथवा भांडार विभागामार्फत करण्यात आला आहे काय ?

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९: पुरवठा आदेशात दिलेल्या मुदतीत छपाई साहित्याचा पुरवठा केला नसल्याने दंडात्मक कार्यवाही न करता साहित्याचे देयक अदायगी करणे बाबत. (दंड रक्कम रूपये ३२,१५०/-)**

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षासाठी छपाई साहित्य खरेदीसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण १३ निविदा विक्री झाल्या त्यापैकी १० निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दर मे.यश प्रिन्टर्स, मे.विशाल इन्टरप्राईजेस, मे.लिबर्टी प्रिन्टर्स, मे.न्यू रत्नमाला प्रिन्टर्स ऑफ, मे.जयभारती एक्स.बुक ऑफ, मे.श्रीगणेश मुद्रणालय, मे.अजिंक्य प्रिन्टर्स, मे.उमीया आर्टस् , मे.श्रीगणेश प्रिन्टींग प्रेस, असे एकूण १० निविदाधारकांपैकी ०९ निविदाधारकांचे कमी दर प्राप्त झाले. वाटाघाटीअंती वस्तूनिहाय एकूण ०६ निविदाधारकांना मा.आयुक्त यांनी दिनांक १३.०७.२००४ नुसार मंजूरी देण्यात आली. त्याप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आले. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी आढळून आल्या.

१. मे.जयभारती एक्सा. बुक्स ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग कंपनी यांना भांडार विभागातर्फे छपाई साहित्य पुरवठा करण्यासाठी पुरवठा आदेश क्र.३२०, दिनांक ३०.९.२००४ अन्वये देण्यात आले होते. पुरवठा आदेशात साहित्याच्या १५ दिवसांत पुरवठा करावा असे स्पष्ट नमूद असतांना साहित्याचा पुरवठा १५ दिवसाची मुदत संपल्यानंतर २८ दिवस उशिराने दिनांक ११.११.२००४ रोजी करण्यात आल्याचे स्टॉक रजिस्टर क्र.१०९, पान क्र.६३ वर असलेल्या साहित्याच्या नोंदीनुसार दिसून येते. निविदेतील अटी व शर्तीनुसार पुरवठा आदेशातील साहित्य विहित

मुदतीत पुरवठा न केल्यामुळे रक्कम रू.१,०६,२९५/- यावर ०.५% दराने प्रति आठवडा असे चार आठवड्याची रक्कम रू.५३१ x४ = २१२४/- असा दंड संबंधित एजन्सीच्या देयकातून वसूल केलेला दिसून येत नाही. त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

२. मे.श्री.गणेश प्रिन्टर्स यांना भांडार विभागातर्फे साहित्य पुरवठा करणेसाठी आदेश क्र.२६५ दिनांक २.९.२००४ देण्यात आले होते. पुरवठा कालावधी ३ दिवसाचा असतांना रू.१०४७५/- चा पुरवठा ९५ दिवस उशिराने केला. साहित्याचा पुरवठा विहित मुदतीत न केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार साहित्याच्या रकमेवर ०.५% दराने प्रति आठवडा रूपये ५२/- दंड आकारलेला दिसून येत नाही. ९५ दिवसाचे १३ आठवड्याचा दंड ५२x१३=६७६/- रूपये होतो. संचिकेत स्टॉक बुक रजिस्टर क्र.१०९, पान क्र.६४ नुसार साहित्याचा पुरवठा दिनांक ११.११.२००४ रोजी झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

३. मे.श्री.गणेश मुद्रणालय यांना छपाई साहित्य पुरवठा करणेबाबत पुरवठा आदेश क्र.२६४, दिनांक २.९.२००४ अन्वये देण्यात आलेले होते. संबंधित एजन्सीस छपाई साहित्य पुरवठा करण्यासंबंधी ३ दिवसाचा कालावधी देण्यात आला होता.संचिकेत उपलब्ध नोंदीनुसार छपाई साहित्य दिनांक ११.११.२००४ रोजी प्राप्त झाल्याचे स्टॉक बुक क्र.१०९ पान क्र. ६४ वरून दिसून येते. म्हणजेच ९५ दिवस उशिराने रक्कम रू.३६५०/- चा पुरवठा केलेला आहे.
निविदेतील अटी व शर्तीनुसार साहित्याचा विहित मुदतीत पुरवठा न केल्यास ०.५% दराने दंड आकारण्यात येईल असे नमूद असतांना संबंधितांकडून रक्कम रू.२३७/- दंड वसूल न केल्याचे संचिकेतील अभिलेख्यांवरुन दिसून येते. त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

४. मे.जयभारती एक्सा. बुक्स ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग कंपनी यांना छपाई साहित्य पुरवठा करण्यासंबंधी आदेश क्र. ६६०, दिनांक २२.३.२००५ अन्वये देण्यात आलेले आहेत. छपाई साहित्य पुरवठा करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी नमूद केलेला आहे. प्रत्यक्षात छपाई साहित्य दिनांक २७.७.२००५ रोजी पुरवठा झाल्याचे स्टॉक रजिस्टर क्र.१०९ पान क्र.२७ वरील नोंदीनुसार दिसून येते. दिनांक २७.७.२००५ रोजी झालेला पुरवठा ११२ दिवस उशिराने म्हणजेच १६ आठवडे उशिरा झालेला आहे. रक्कम रूपये ९९२४०/- च्या साहित्यावर उशिराने पुरवठा केला म्हणून ०.५% दराने ४९६x१६=७९३९/- दंड निविदेतील अटी व शर्तीनुसारसंबंधित एजन्सीकडून देयक अदाईगी पूर्वी वसूल करणे क्रमप्राप्त होते. परंतु प्राप्त अभिलेखे तपासले असता दंड वसूल केल्याची नोंद दिसून आलेली नाही. त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

५. मे.श्री.गणेश मुद्रणालय यांना छपाई साहित्य पुरवठा करणेबाबत पुरवठा आदेश क्र.३२४, दिनांक ३०.९.२००४ अन्वये आदेश दिले होते. आदेशात १५ दिवसाचा कालावधी नमूद होता. प्रत्यक्ष पुरवठा २९८ दिवस उशिराने दिनांक ९.८.२००५ रोजी झालेला असल्याबाबत स्टॉक बुक क्र. १०९ पान क्र.३६ वरील नोंदीनुसार दिसून येते. १६७००/- रकमेच्या छपाई साहित्यावर उशिराने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार रूपये ८३/- प्रति आठवडा प्रमाणे ०.५% दराने दंड आकारणे अभिप्रेत होते. परंतु अभिलेखे तपासले असता ४२ आठवडे उशिराने पुरवठा केल्यामुळे ३४८६/- रूपये दंड होतो . परंतु कमाल दंड मर्यादा खरेदी

किंमतीच्या १०% आहे. त्यानुसार १६७०/- रुपये दंड वसूलीबाबत कार्यवाही होणे गरजेचे आहे.त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

६. मे.न्यु रत्नमाला प्रिन्टर्स ॲण्ड सप्लायर्स यांना छपाई साहित्याचा पुरवठा करण्यासाठी भांडार विभागाने पुरवठा आदेश क्र.२६, दिनांक ५.५.२००५ अन्वये आदेशित केलेले होते. सदरील आदेशात सात दिवसाच्या आंत पुरवठा करावा असे नमूद केलेले होते. परंतु संबंधित एजन्सीने ८९ दिवस उशिरा दिनांक ९.८.२००५ रोजी साहित्याचा पुरवठा केल्याचे स्टॉक बुक क्र.१०९, पान क्र.३६ वरील नोंदीवरुन स्पष्ट होते. रुपये ३७,८१८/- किंमतीचे साहित्य पुरवठा संबंधित एजन्सीने उशिरा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार निविदेतील ०.५% दराने १२ आठवड्याचा विलंब /दंड रुपये २,२६८/- संबंधित एजन्सीच्या देयकातून कपात केल्याचे दिसून आलेले नाही. त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

७. मे.विशाल एन्टरप्राईजेस यांना पुरवठा आदेश क्र.६६१, दिनांक २२.३.२००५ अन्वये छपाई साहित्य पुरवठा करणेबाबत १५ दिवसाचा कालावधी देण्यात आलेला होता. संबंधित एजन्सीने साहित्याचा पुरवठा दिनांक ६.९.२००५ रोजी केल्याचे स्टॉक बुक नोंदवही क्र. १०९, पान क्र.४४ वरील नोंदीवरुन स्पष्ट होते. एजन्सीने १५३ दिवस उशिराने रक्कम रु.२२२९०/- रकमेचा साहित्य पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार निविदेतील ०.५% दराने २१ आठवड्याचा विलंब /दंड रुपये २३३१/- होतो. परंतु कमाल दंडाची मर्यादा १०% प्रमाणे रु.२२२९/- येते. संबंधित एजन्सीच्या देयकातून कपात केल्याचे दिसून आलेले नाही. त्याचप्रमाणे मूळ देयक संचिकेत नसून झेरॉक्स प्रतीवर देयक अदाईगी झालेली आहे. त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

८. मे.लिबर्टी प्रिन्टर्स यांना पुरवठा आदेश क्र.३२३, दिनांक ३०.९.२००४ अन्वये छपाई साहित्य पुरवठा करणेबाबत १५ दिवसाचा कालावधी देण्यात आलेला होता. संबंधित एजन्सीने साहित्याचा पुरवठा दिनांक २६.९.२००५ रोजी केल्याचे स्टॉक बुक नोंदवही क्र. १०९, पान क्र.४८ वरील नोंदीवरुन स्पष्ट होते. एजन्सीने ३४६ दिवस उशिराने रक्कम रु.१४०१७४/- रकमेचा साहित्य पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार निविदेतील ०.५% दराने ४९ आठवड्याचा विलंब /दंड रुपये ३४,३००/- होतो. परंतु कमाल दंडाची मर्यादा ५% प्रमाणे रु.७००८/- येते. संबंधित एजन्सीच्या देयकातून कपात केल्याचे दिसून आलेले नाही. त्याचप्रमाणे मूळ देयक संचिकेत नसून झेरॉक्स प्रतीवर देयक अदाईगी झालेली आहे. त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

९. मे.न्यु रत्नमाला प्रिन्टर्स ॲण्ड सप्लायर्स यांना छपाई साहित्याचा पुरवठा करण्यासाठी भांडार विभागाने पुरवठा आदेश क्र.३२२, दिनांक ३०.९.२००४ अन्वये आदेशित केलेले होते. सदरील आदेशात १५ दिवसाच्या आंत पुरवठा करावा असे नमूद केलेले होते. परंतु संबंधित एजन्सीने ४३७ दिवस उशिरा दिनांक १३.१२.२००५ रोजी साहित्याचा पुरवठा केल्याचे स्टॉक बुक क्र.१०९, पान क्र.७४ वरील नोंदीवरुन स्पष्ट होते. रुपये ३२,२७९/- किंमतीचे साहित्य पुरवठा संबंधित एजन्सीने उशिरा केल्यामुळ ६२ आठवड्याचा विलंब /दंड रुपये ९९८२/-

होतो. परंतु कमाल दंडाची मर्यादा १०% प्रमाणे रू.३२२७/- येते.संबंधितएजन्सीच्या देयकातून कपात केल्याचे दिसून आलेले नाही.त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

१०. मे.न्यु रत्नमाला प्रिन्टर्स ॲण्ड सप्लायर्स यांना छपाई साहित्याचा पुरवठा करण्यासाठी भांडार विभागाने पुरवठा आदेश क्र.४९८, दिनांक १८.१२.२००४ अन्वये आदेशित केलेले होते. सदरील आदेशात ०७ दिवसाच्या आंत पुरवठा करावा असे नमूद केलेले होते. परंतु संबंधित एजन्सीने ३५३दिवस उशिरा दिनांक १३.१२.२००५ रोजी साहित्याचा पुरवठा केल्याचे स्टॉक बुक क्र.१०९, पान क्र.७४ वरील नोंदीवरुन स्पष्ट होते. रुपये ४७७२७/- किंमतीचे साहित्य पुरवठा संबंधित एजन्सीने उशिरा केल्यामुळ ५० आठवड्याचा विलंब /दंड रुपये ११९००/- होतो. परंतु कमाल दंडाची मर्यादा १०% प्रमाणे रू.४७७२/- येते. संबंधित एजन्सीच्या देयकातून कपात केल्याचे दिसून आलेले नाही.त्याचप्रमाणे संचिकेत छपाई साहित्य संबंधित एजन्सीकडून पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

११. मे.विशाल एन्टरप्राईजेस यांनी रक्कम रुपये ४१८६५/- छपाई साहित्याचा पुरवठा बिल क्र.३४८ दिनांक ६.१०.२००५ , D.C. क्रमांक ५३९ दिनांक १७.८.२००५ अन्वये भांडार विभागास केल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात संबंधित एजन्सीस पुरवठा आदेश दिल्याचे अभिलेखे उपलब्ध झ् ाालेले नाहीत. असे असतांना सुध्दा एजन्सीने कोणत्या आधारे साहित्य पुरवठा केला याचा बोध होत नाही. खरेदी केलेल्या साहित्यात उपरोक्त प्रमाणे अनियमितता दिसून आलेली आहे.

करिता,उपरोक्त १ ते ११ मुद्यांबाबत सविस्तर शहानिशा करुन, खातरजमा करुन संबंधित एजन्सीकडून दंड वसूल करुन महानगरपालिका फंडात भरणा करण्यात यावा असे कळविण्यात येवून सुध्दा लेखापरीक्षण कालावधीत विभागाने पूर्तता केलेली नाही.

महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीसंबंधी संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन दंडनिय रक्कम महानगरपालिका फंडात भरणा करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा.

**परिच्छेद क्र.१०: भांडार विभागाच्या लेखापरीक्षणादरम्यान आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करणे बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान प्राप्त अभिलेखे तपासले असता खालील त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. सन २००४-०५ या वर्षाच्या स्त्री कर्मचारी गणवेश खरेदी संचिका तपासली असता मे.अमरदिप उद्योग यांना पुरवठा आदेश क्र.४२९, दिनांक ९.१२.२००४ अन्वये रक्कम रू. ४,४९,७८८/- चे साहित्य पुरवठा करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. परंतु खर्चाची प्रमाणके डिलेवरी चालान संचिकेत उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांना दिलेले पुरवठा आदेश क्र. ४२८, दिनांक ९.१२.२००४ रक्कम रू.१,२३,००५/- रकमेचे साहित्य निर्गमित करण्याचे पुरवठा आदेश आहेत. परंतु खर्चाचे प्रमाणके व डिलेवरी चालान संचिकेत उपलब्ध नाही. खर्चास मान्यता घेतलेली आहे .

२. सन २००४-०५ या वर्षीच्या स्वच्छता साहित्याची संचिका क्र.१५१, तपासली असता संचिकेत स्वच्छता साहित्य खरेदी केल्याचे प्रमाणके ,पुरवठा आदेश करारनामा डिलेवरी चालान इत्यादी कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

३. मे.वॉचलॅण्ड औरंगाबाद यांचेकडे टेपरेकॉर्डचा पुरवठा करणे बाबत पुरवठा आदेश क्र. ४४९, दिनांक १८.१२.२००४ अन्वये निर्गमित करण्यात आले होते. संचिकेत डीलेवरी चालान उपलब्ध नाही त्यामुळे पुरवठा झाला किंवा नाही याबाबत साशंकता निर्माण होते.

४. छपाई संबंधीची किरकोळ संचिका तपासली असता संचिकेत विशाल इन्टरप्राईजेस यांचे रुपये २४,२८२/- चे देयक क्रमांक ६०, दिनांक १६.६.२००५ उपलब्ध आहे. तसेच लिबर्टी प्रिन्टर्स यांचे रुपये १४०६९/- चे देयक क्र. ६१, दिनांक १६.६.२००५ यांना रक्कम अदाई बाबत सादरीकरण केलेले असून संचिकेत प्रमाणक व डी.सी. उपलब्ध नाही त्यामुळे पुरवठा झाला किंवा नाही याची साशंकता निर्माण होते.

५. प्रकल्प विभागासाठी फर्निचर साहित्याचा पुरवठा करण्याबाबत पुरवठा आदेश क्र. ६८६, दिनांक ३१.३.२००५ असा असून रुपये १८,१७०/- चे साहित्य खरेदीबाबत प्रस्ताव आहे. परंतु संचिकेत प्रमाणके व डी.सी. नाही.

६. त्याचप्रमाणे रक्कम रुपये ७४,०२५/- रकमेचा फर्निचर साहित्याचा पुरवठा करण्यासाठी पुरवठा आदेश ५६८, दिनांक १७.२.२००५ संचिकेत उपलब्ध आहे. परंतु व्हाऊचर व डी.सी. उपलब्ध नाही. देयक अदायगीची मान्यता दिनांक १७.३.२००५रोजी झालेली आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत विभागाने खातरजमा व शहानिशा करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११: स्टॉक बुक नोंदवहीचा क्रमांक नोंदवून रक्कम रु.४२,४४०/- चे देयक अदायगी करणे बाबत.**

सन २००४-०५ या वर्षात छपाई साहित्य खरेदी करतांना मे.विशाल इंटरप्राईजेस यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. संबंधित एजन्सीने पुरवठा आदेशाप्रमाणे रक्कम रु.४२,४४०/- चा पुरवठा केल्याबाबत साशंकता निर्माण होते. देयकावर स्टॉक बुक क्रमांक दर्शविलेला आहे पण पान क्रमांक दर्शविलेले नाही. या व्यतिरिक्त पुढील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

मे.विशाल इंटरप्राईजेस यांना पुरवठा आदेश क्र.३२५, दिनांक ३०.९.२००४ अन्वये साहित्य पुरवठा करणेबाबत आदेशित करण्यात आले होते. साहित्य पुरवठा करण्यासाठी १५ दिवसाचा कालावधी देण्यात आलेला होता. संबंधित एजन्सीने देयक क्र.३३९, दिनांक २७.७.२००५ अन्वये रक्कम रुपये ४२,४४०/- च्या मालाचा पुरवठा केल्याचे निदर्शनास आले आहे. प्रत्यक्षात देयकावरील माल आल्याबाबतच्या प्रमाणपत्रात केवळ स्टॉक रजिस्टर क्र.१०९ असा उल्लेख केलेला आहे. परंतु पान क्रमाकाचा उल्लेख नाही. याचा अर्थ साहित्य भांडार विभागात आले किंवा कसे याबाबत साक्षंकता निर्माण होते. तसेच साहित्य पुरवठा केल्याबाबत डिलेवरी चालानची प्रत सुध्दा उपलब्ध नाही.

संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन रक्कम रुपये ४२,४४०/- मनपा फंडात भरणा करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२: सन २००५-०६ या वर्षातील किटकनाशक खरेदी बाबतच्या संचिकेत साहित्य विलंबाने पुरवठा केल्यामुळे संबंधित एजन्सीवर दंडात्मक कार्यवाही करुन दंड वसूली टाळणे बाबत. (रक्कम रुपये ४०,०१८/-)**

सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील किटक नाशक खरेदीबाबतची संचिका तपासली असता पुरवठाधारकाने साहित्याचा उशिरा पुरवठा केल्यामुळे त्यांचेवर निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे दंडात्मक कार्यवाही केलेली आढळून आलेली नाही.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याचे नांव | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | विलंब दंड | कमाल दंड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | १९७ १२.९.२००५ | १५ | काळे फिनेल | १,८८,५७५/- | ८७ | ११,३१६/- | ९,४२९/- |
| २ | ओके ट्रेडर्स | १९९ १२.९.२००५ | १५ | कार्बोलिक पावडर | १,६२,७५०/- | ८७ | ९,७६५/- | ८,१३८/- |
| ३ | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | १९७ १२.९.२००५ | १५ | काळे फिनेल | १,९१,४२५/- | १५० | २०,०९७/- | ९,५७१/- |
| ४ | ओके ट्रेडर्स | १९९ १२.९.२००५ | १५ | कार्बोलिक पावडर | १,०८,५००/- | १५६ | ११,९३५/- | ५४२५/- |
| ५ | इन्शा ट्रेडींग कंपनी | १९८ १२.९.२००५ | १५ | नोव्हान | १,०६,५००/- | ३० | २,१३०/- | -- |
| ६ | इन्शा ट्रेडींग कंपनी | १९८ १२.९.२००५ | १५ | नोव्हान | १,०६,५००/- | १७८ | १३,३००/- | ५३२५/- |

उपरोक्त प्रमाणे एजन्सीनिहाय विलंब दंड दर्शविणारी रक्कम नमूद करण्यात आलेली असून विभागाने संबंधित एजन्सीकडून विलंब दंडाची रक्कम वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३: सन २००५-०६ या वर्षातील महानगरपालिका वार्षिक दैनंदिनीचा उशिराने पुरवठा केल्याबाबत दंड आकारणी न करणेबाबत. (रक्कम रुपये ४१००/-)**

सन २००५-०६ या वर्षाची दैनंदिनी छपाई करणेसाठी मे.लिबर्टी प्रिन्टर्स, औरंगाबाद यांना कार्यालयीन आदेश क्र. मनपा/भांडार /२००५/२९७ दिनांक १५.१२.२००५ अन्वये पुरवठा करणेबाबत कळविले आहे. यात १० दिवसांचा कालावधी नमूद आहे. प्रत्यक्षात पुरवठा आदेशाचा कालावधी समाप्तीनंतर ४१ दिवसांनी उशिरा केलेला आहे. निविदेतील अटी शर्ती प्रमाणे प्रतीदिन रु.१००/- प्रमाणे रु.४१००/- दंड वसूल होणे क्रमप्राप्त होते. परंतु विभागाने दंड वसूल केलेला नसल्याचे दिसून येते.

तथापि विभागाने आपल्या स्तरावर संचिकेची तपासणी करुन, तसेच विलंब दंड संबंधित एजन्सीकडून दंड वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४: मा.आयुक्त दालन/ निवासस्थान साहित्य मागणी बाबत.**

आर्थिक वर्ष २००५-०६ मध्ये मा.आयुक्त , शासकीय निवासस्थानी आदेशित केल्यानुसार विविध साहित्याचा पुरवठा करण्याबाबत दरपत्रके मागवून कमी दर असलेल्या एजन्सीधारकांना पुरवठा करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. त्यास उपायुक्त (प्रशासन) यांची मंजूरी घेण्यात आली आहे. संचिका तपासणी करतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. मे.रंगोली यांचेकडून स्वचछता साहित्य खरेदी रक्कम रू.२५३५/-
२. मे.सजावट हॅन्डलुम यांच्याकडून साहित्य खरेदी रक्कम रू.३३३०/-
३. टेबलावरील काच खरेदी रक्कम रू.१४५५/-
४. पडदे धुलाई रक्कम रू. ५६०/-
५. मा.महापौर, मा.सर्वसाधारण सभागृह,स्थायी समिती सभागृह व मा.सभागृह नेता दालनातील पडदे धुलाई रक्कम रू.१०४०/-
६. मे.नरिमन सेल्स कॉर्पोरेशन यांच्याकडून एल.जी. मेक रेफ्रिजरेटर पुरवठा करणे रक्कम रू.१६५००/-
७. मे.सजावट हॅन्डलुम यांच्याकडून साहित्य खरेदी रक्कम रू.३८१४२/-
८. मे.Nirajan Pest Control करण्यासाठी रक्कम रू.५६००/-
९. Panasonic Coordress phone पुरविणे बाबत रक्कम रू.३७००/-
१०. मे.सजावट हॅन्डलुम यांच्याकडून साहित्य खरेदी रक्कम रू.४५९९५/-

वरील एजन्सीधारकांनी संचिकेवरुन देयके पास झालेली असून संचिकेत देयके व पुरवठा आदेश नाही.

२. संचिकेतील पृष्ठ क्र.४ परिच्छेद क्र.१९ वरील रेफ्रिजरेटर खरेदी केलेले असून जुने रेफ्रिजरेटर आरोग्य केंद्रास देण्यात आलेले आहे किंवा नाही याची नोंद दिसून आलेली नाही.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा विभागाने सादर केलेला नाही. करिता विभागाने खातरजमा करून झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५: स्वच्छता साहित्य खरेदी सन २००५-२००६ बाबत.**

सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात स्वच्छता साहित्य खरेदीकरीता निविदा जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्दीस दिलेली आहे. एकूण ०८ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी ०४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाधारकापैकी वस्तुनिहाय कमी दर दिलेल्या एजन्सीना मालाचा पुरवठा करण्यासाठी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. खरेदी करतांना मागील वर्षाचा शिल्लक साठा विचारात न घेता नियोजन करण्यात आले. खरेदीत झालेल्या अनियमिततेबाबत सविस्तरपणे खालील प्रमाणे निवेदन करण्यात येत आहे.

१. स्वच्छता साहित्य खरेदी (सन २००५-०६) करतांना कोणत्या लेखाशिर्षकानुसार करण्यात आली व रक्कम किती शिल्लक आहे याचा उल्लेख संचिकेत नाही.

२. स्वच्छता साहित्य खरेदी करतांना खालील एजन्सी धारकांना पुरवठा आदेश देण्यात आले.

| | आदेश क्रमांक |
|---|---|
| १.मे.इन्शा ट्रेडिंग कंपनी | १५७/५.८.०५ (७ दिवस) |
| २.मे.न्यू भारत स्टोअर्स | १५८/५.८.०५ (३ दिवस) |
| ३.रोशन सेल्स कॉर्पोरेशन | १५८/५.८.०५ (३ दिवस) |

परंतू न्यु भारत स्टोअर्स यांना पुरवठा आदेश अन्वये रक्कम रू.२३७०/- चा पुरवठा करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले. परंतू माल प्राप्त झाल्याबाबत अथवा रक्कम अदा केल्याबाबत संचिकेत उल्लेख नाही.

३. खरेदी करण्यापूर्वी खरेदी पध्दतीचा नियमाप्रमाणे पूर्वीचा शिल्लक साठा आवश्यक लागणारे साहित्य व एकूण प्रस्तावित खरेदी व नियोजन न करता खरेदी प्रस्तावित करण्यात आल्याचे दिसून येते.

४. स्वच्छता साहित्य खरेदी करतांना दराला मा.आयुक्त यांची मंजूरी घेतांना लांब दांडीचे खराटे ५००० चा उल्लेख आहे. साधे खराटे २००० खरेदी बाबत दर अथवा खरेदी बाबत मंजूरी घेतल्याचे संचिकेत आढळून आले नाही.

५. रक्कम रू.२,३३,०००/-ची खरेदी करतांना परिच्छेद क्र.९५ जा.क्र./ मनपा/ मआ / स्विस / डी.पी./१२६९/०५ दिनांक ५.७.२००५नुसार उपायुक्त (प्रशासन) यांना रू.२.५० मर्यादेपर्यंत आर्थिक खर्चास मंजूरी अन्वये खरेदी केली आहे.

६. स्वच्छता साहित्य खरेदी २००५-०६ मध्ये रक्कम रू.२,३३,०००/- ची खरेदी करतांना पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात आले आहे. त्यानुसार मे.इन्शा ट्रेडिंग कंपनी यांना रक्कम रू.१६४७५०/- चा आदेश मनपा/भांडार/०८, दिनांक १६.१.२००६ अन्वये देण्यात येवून त्यांनी मालाचा पुरवठा केला आहे. परंतू मनपा/भांडार/०९, दिनांक १६.१.२००६ अन्वये रक्कम रू.६८२५०/- चा आदेश देवूनही संबंधिताने मालाचा पुरवठा केलेला नाही. (लांब दांडीचे खराटे बांधणी करणे ३०००X२२.७५)

७. मे.न्यू भारत स्टोअर्स यांनी अनामत रक्कम रू.१५,०००/- संबंधिताला अदा केल्याचे दिसून येते. या दोन्ही मुद्यांबाबत संचिकेत नोंद घेणे आवश्यक असतांना नोंद दिसून आलेली नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१६: संगणक साहित्य पुरवठा करणे बाबत.**

सन २००५-०६ या वर्षामध्ये संगणक साहित्याचा पुरवठा करण्यासाठी निविदा मागविल्या असता एकूण ०९ विक्री झाल्या. त्यापैकी ०६ निविदा प्राप्त झाल्या. पैकी ०५ निविदाधारकांचे वस्तुनिहाय कमी दर प्राप्त झाले आहेत. रक्कम रूपये ३.५० लक्ष रकमेची खरेदी असून संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संगणक साहित्य पुरवठा करण्यासाठी निविदेतील अटी व शर्तीनुसार मान्य निविदाधारकास २०/- रू.मुद्रांकावर करारनामा करून द्यावा असे असतांना करारनामा केल्याचे दिसून येत नाही.

२. संगणक साहित्य पुरवठाधारकाने साहित्याचा विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधिताविरूध्द दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही. अशा विलंबाने प्राप्त झालेल्या साहित्याचा विवरण तक्ता खालीलप्रमाणे.

३. संगणक साहित्य पुरवठा करतांना साहित्य प्राप्त झाल्याबाबत डिलेवरी चलन संचिकेत दिसून येत नाही.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | किमान विलंब दंड |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.विजय जनरल स्टोअर्स | २२० २८.९.२००५ | ०७ | ३३,३०५/- | ९२ | २१७१/- |
| २ | ओके ट्रेडर्स | २२१ २८.९.२००९ | ०७ | ६६,५००/- | ९२ | ४३१६/- |
| ३ | मे.न्यु भारत स्टोअर्स | २२५ २८.९.२००५ | ०७ | ७४,१५०/- | ९२ | ४८२३/- |
| ४ | मे.विजय जनरल स्टोअर्स | ४९ २२.२.२००६ | ०७ | २६,६००/- | ३१ | ५३२/- |
| ५ | मे.न्यु भारत स्टोअर्स | ४७ २२.७.२००६ | ०७ | १,२३,६००/- | ३१ | २४७२/- |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. १७:आर्थिक वर्ष २००५-०६ महानगरपालिका कर्मचारी गणवेश कापड खरेदी.**

सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात महानगरपालिका कर्मचारी गणवेश कापड खरेदीसाठी जाहिर निविदा प्रसिध्दीस दिली असता एकूण १० निविदा विक्री झाल्या. त्यापैकी सात निविदा प्राप्त झाल्या. पैकी ०४ निविदा उघडण्यात आल्या. त्यातील सर्वात कमी दर मे.अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांचे असून संबंधित एजन्सीला कार्यादेश निर्गमित करण्यात आले. निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता केलेली नाही. संचिका तपासणीअंती खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१. जा.क्र.मनपा/भांडार/३१०, दिनांक २३.१२.२००५ अन्वये मे.अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांना पुरवठा करण्याबाबत एकूण रक्कम रुपये ७१७१३७/- गणवेश खरेदी करण्यासाठी आदेशित करण्यात आले त्यानुसार संबंधिताने रक्कम रुपये ७१७१३७/- चा पुरवठा बिल क्रमांक ९२, दिनांक ३१.३.२००६ रोजी पुरवठा केला आहे. पुरवठा २१ दिवसांत करणे आवश्यक असतांना संबंधिताने ७६ दिवस उशिरा पुरवठा केला आहे.

२. मे.अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांनी उशिरा पुरवठा केल्यामुळे ११ आठवडे उशिरा केल्यामुळे ७१७१३७ x०.५%=३५८५/- ३५८५x११=३९४३५/- दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

३. मे.अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांना पुरवठा आदेश देण्यापूर्वी करारनामा करणे आवश्यक असतांना करारनामा संचिकेत नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१८: आर्थिक वर्ष २००५-०६ लिखाण साहित्य खरेदी (विलंब शुल्क)**

सन २००५-०६या आर्थिक वर्षात लिखाण साहित्य खरेदीसाठी जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता एकूण १४ निविदा विक्री झाल्या त्यापैकी ०८ निविदा प्राप्त झाल्या. ०७ निविदा उघडण्यात आल्या असता सर्वात कमी दर प्राप्त एजन्सीला पुरवठा आदेश देण्यात आले. निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे विलंबाने साहित्याचा पुरवठा केल्याबाबत दंडनिय कार्यवाही झालेली नाही. याबाबत सविस्तर एजन्सीनिहाय तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | किमान विलंब दंड |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | न्यु भारत स्टोअर्स | २४२ १७.८.२००५ | ०७ | २१,१९१/- | ८० | १,१६६/- |
| २ | ओके ट्रेडर्स | २३८ १७.८.२००५ | ०७ | ३,११,१५१/- | ८० | १७,११६/- |
| ३ | ओके ट्रेडर्स | ४० २२.२.२००६ | ०७ | ८७,५७५/- | ३० | १,७५२/- |
| ४ | विजय जनरल स्टोअर्स | २३९ २२.२.२००६ | ०७ | २,१३,१८०/- | ८० | ११,७२६/- |
| ५ | विजय जनरल स्टोअर्स | ३९ २२.२.२००६ | ०७ | ६४,३५०/- | ३० | १,२८८/- |
| ६ | आर.एल.दौलताबादकर ॲन्ड कंपनी | २४० १७.८.२००५ | ०७ | ३२,१९०/- | २६१ | ३,२१९/- |
| ७ | न्यु रत्नमाला प्रिंटर्स | २४१ १७.८.२००५ | ०७ | ३९,२९१/- | २१७ | ३,९२९/- |
| ८ | न्यु रत्नमाला प्रिंटर्स | २४१ १७.८.२००५ | ०७ | ५२,१८५/- | २१९ | ५,२१८/- |

तरी विभागाने आपल्या स्तरावर संचिकेची तपासणी करुन रक्कम वसूलीबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व तसा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**परिच्छेद क्र.१९: स्वच्छता साहित्य खरेदी सन २००६-२००७ बाबत.**

सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात स्वच्छता साहित्य खरेदीकरीता स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्दीस देण्यात आली होती. निविदेस ०७ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. ०८ निविदा विक्री झाल्या होत्या. त्यापैकी ०४ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सर्वात कमी दराच्या निविदा धारकास कार्यादेश देण्यात आले. परंतू शासकीय नियमाचे पालन निविदा काढतांना झालेले नाही. त्याचप्रमाणे खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेमध्ये स्वच्छता साहित्य खरेदी सन २००६-०७ करीता दैनिक वर्तमान पत्रामध्ये निविदा विक्री करीता दिनांक १७.६.२००६ ते दिनांक २६.६.२००६ या ७ दिवसाचा कालावधी देण्यात आलेला आहे. परंतू वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दीसाठी शासन निर्णय २ जानेवारी १९९२ मधील परि.क्र.८.३ नुसार जाहिर निविदाचा कालावधी कमीत कमी ३ आठवडे देण्यात यावा तसे दिसत नाही.(दैनिक वर्तमान पत्राचे कात्रण संचिकेत संलग्न केलेले नाही.)

२. निविदा अटी /शर्ती मधील अट क्र.(३) प्रमाणे अनामत रकमेपोटी रोखी / बँक कॉल डिपॉझीट केल्याचे संचिकेमध्ये नोंद दिसत नाही.

३. मे.न्यू भारत स्टोअर्स पुरवठा आदेश क्र. ९५, दिनांक ३०.३.२००७ रोजी सेंटेड फिनेल पुरवठा करणेसाठी आदेश आहेत. देयक क्र.८२८ दिनांक ३१.३.०७ अन्वये रक्कम रू.२९१०/- अदा करण्यात आल्याचे संचिकेत पृ.क्र.एनएस-३० परि.(१०९) प्रमाणे दिसते. परंतू सदरचे देयकाची नोंद रजि.क्र.१०९ मध्ये नोंद दिसून येत नाही. डिलेवरी चलन दिसून येत नाही.

४. इन्शा ट्रेडिंग, न्यू भारत स्टोअर्स, रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांनी पुरवठा केल्याचे डिलेवरी चलन संचिकेत दिसून आलेले नाही. त्यामुळे सदरील साहित्य पुरवठा झाल्याची खात्री करता येत नाही.

५. स्वच्छता साहित्य खरेदी बाबत संबंधित पुरवठाधारकाने विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी /शर्ती प्रमाणे दंडात्मक कार्यवाही केलेली आढळून येत नाही. अशा विलंबाने प्राप्त झालेल्या साहित्याचा विवरण तक्ता पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | किमान विलंब दंड | कमाल दंड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इन्शा ट्रेडिंग कंपनी | १५० ७.१०.२००६ | १५ | १३९,५५८/- | ६६ | ६२८२/- | -- |
| २ | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | १४९ ७.१०.२००६ | १५ | ४५९१०/- | ६६ | २०७०/- | -- |
| ३ | न्यू भारत स्टोअर्स | १५१ ७.१०.२००६ | १५ | ६१८९५/- | १५९ | -- | ६१८९/- |
| ४ | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | ९६ ३०.३.२००७ | १५ | १,०१,५४२/- | ३७ | २५४०/- | -- |
| ५ | इन्शा ट्रेडिंग कंपनी | ९४ ३०.३.२००७ | १५ | २८,२५०/- | ८० | १५५१/- | -- |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२०: आर्थिक वर्ष २००६-०७ मधील किटकनाशक साहित्य खरेदी संचिका एकूण खर्च रक्कम रू. ८,३८,७५०/-**

सन २००६-२००७ या वर्षामधील किटकनाशक साहित्य खरेदीसाठी वार्षिक दर करार करण्यासाठी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्दीस देण्यात आली होती. ०५ निविदा प्राप्त झाल्याचे संचिकेतील नोंदीवरुन दिसून येते. कमी दराच्या निविदा धारकासोबत वार्षिक दर करार करण्यात आला. संचिकेत खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

१. किटकनाशक साहित्य खरेदीसाठी वार्षिक दर करार करणेसाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात आली असतांना वर्तमान पत्राची प्रत संचिकेत असणे आवश्यक असतांना संचिकेत प्रत दिसून आली नाही.

२.	किटकनाशक साहित्य ४ निविदा प्राप्त झाल्या आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | दर | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|
| १ | काळेफिनेल (R.w.C.S.) | १६.७५ | इन्शा ट्रेडिंग कंपनी |
| २ | काळेफिनेल (R.w.C.S.) | १६.७५ | रोशन सेल्स कॉर्पोरेशन |
| ३ | नोव्हान | ३२०/- प्र.लि. | इन्शा ट्रेडिंग कंपनी |
| ४ | डीसइन्फेक्टर कार्बोलिक पावडर (R.w.C.1.) | १६.५० प्र.लि. | ओके ट्रेडर्स |

उपरोक्त प्रमाणे कमी दर धारकास पुरवठा बाबत आदेश देण्यात आले. परंतु संचिकेमध्ये करारनामा नाही.

३.	पुरवठाधारकास मालाचा पुरवठा करतांना अनामत रक्कम रू.२०,०००/- भरणाबाबत पावती किंवा उपायुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे नांवे डी.डी. घेणे आवश्यक असतांा अथवा डी.डी. क्रमांक नाही व त्याबाबत पावती क्रमांक संचिकेत नोंद नाही.

४.	मालाचा पुरवठा करतांना निविदा अटी शर्तीनुसार माल देतांना डिलेवरी चलनसह असणे आवश्यक आहे नसता साहित्य स्विकारण्यात येणार नाही असा नियम असतांा साहित्य कॅश मेमो द्वारे स्विकारण्यात आले आहे.

५.	जा.क्र.मनपा/भांडार/२२४, दिनांक २७.१२.२००६ अन्वये काळे फिनेल (R.w.C.S.) १०,००० पुरवठा करण्याबाबत मे. इन्शा ट्रेडिंग कंपनी यांना रक्कम रु. १,६७,५००/- चा पुरवठा आदेश देण्यात आला असून त्यांना १५ दिवसांत पुरवठा करण्याबाबत आदेश देण्यात आले असता बिल नं.१२३ आहे. स्टॉक रजिस्टर १०९/७दिनांक २१.५.२००७रोजी माल प्राप्त झाला आहे. परंतु संबंधिताने १३०दिवस उशिरा म्हणजे १८ आठवडे उशिरा पुरवठा केल्याचे दिसून येते.

| बिल क्रमांक | मालाचे नांव | पुरवठाधारकाचे नांव | परिणाम | बिलाची रक्कम | स्टॉक रजिस्टर/ दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १२३ / २१.५.०७ | काळे फिनेल (R.w.C.5.) | इन्शा ट्रेडिंग कंपनी | १०,००० Lit | १६७५०० | १०९/७ / २१.५.२००७ |

१६७५००x१/२% = ८३७.५

८३८x१८ आठवडे = १५०८४

दंड वसूल करणे आवश्यक होते. परंतू दंड वसूल केल्याचे दिसून येत नाही.

६.	जा.क्र.मनपा/भांडार/२२५, दिनांक २७.१२.२००६ अन्वये काळे फिनेल (R.w.c.5)१०,००० Lit पुरवठा करण्याबाबत मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांना रक्कम रू.१,६७,५००/- चा पुरवठा आदेश देण्यात आला असून त्यांना १५ दिवसांत पुरवठा करण्यात यावा असे असतांा संबंधिताने ३०.३.२००७ रोजी पुरवठा केला आहे. म्हणजे ७५ दिवस उशिरा मालाचा पुरवठा केला आहे.

| बिल क्रमांक | मालाचे नांव | पुरवठाधारकाचे नांव | परिणाम | बिलाची रक्कम | स्टॉक रजिस्टर व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ३३५<br>२६.३.२००७ | काळे फिनेल<br>(R.w.C. 5.) | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | १०,००० Lit | १६७५०० | १०९/१२४<br>३०.३.२००७ |

पुरवठा धारकाने मालाचा पुरवठा ७८ दिवस उशिरा केला आहे. त्यामुळे

१६७५००x१/ २% = ८३७.५

८३८x११ आठवडे =९२१८

दंड वसूल करणे आवश्यक होते. परंतू दंड वसूल केल्याचे दिसून येत नाही.

७.

| बिल क्रमांक | मालाचे नांव | पुरवठाधारकाचे नांव | परिणाम | बिलाची रक्कम | स्टॉक रजिस्टर व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ११<br>२६.३.२००७ | कार्बोलिक पावडर<br>(R.w.C.1.) | ओके ट्रेडर्स | ३०,००० kg<br>१४ per kg | ४,२०,००० | १०९/१२३<br>३०.३.२००७ |

४,२०,०००x१/२% = २१००

२१०० x११ आठवडे = २३१००

दंड वसूल करणे आवश्यक होते. परंतू दंड वसूल केल्याचे दिसून येत नाही.

८.

| बिल क्रमांक | मालाचे नांव | पुरवठाधारकाचे नांव | परिणाम | बिलाची रक्कम | स्टॉक रजिस्टर व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| -- | नोव्हान | इन्शा ट्रेडींग कंपनी | ८०० kg<br>३२० per Lit | २,५६,००० | -- |

परिच्छेद क्रमांक ५७ अन्वये नोव्हान खरेदी आरोग्य अधिकारी यांनी स्थगित ठेवली आहे. असे संचिकेत नमूद करण्यात आले. तरी खरेदीबाबत संचिकेत उल्लेख नाही.

९. निविदा अटी शर्ती नियम ०६ नुसार प्रयोग शाळेत लागणारी फिस संबंधित एजन्सीने रोखीने अदा करावी असे असतांना ANA/ABORATORIES यांनी दिलेले बिल क्रमांक १४४ ,दिनांक ८.२.२००७ रक्कम रु.५६१ बिल क्रमांक १३२, दिनांक ३.११.२००६ रक्कम रु.३३६६/- असे एकत्रित रक्कम रु.३९२७/- प्रयोग शाळा फी महानगरपालिकेने अदा केली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२१: भांडार विभागामार्फत सन २००७-०८ या वर्षाकरीता स्त्री कर्मचारी गणवेश खरेदी करणे बाबत.**

आर्थिक वर्ष २००७-०८ या वर्षाकरीता स्त्री कर्मचारी शिपाई, मजूर, आरोग्य विभागातील ए.एन.एस., पी.एन.एन. यांच्या गणवेश खरेदी करीता वर्तमान पत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. त्यानुसार तीन निविदा दरपत्रके प्राप्त झाली. दिनांक १३.११.२००७ रोजी मा.मुख्य लेखाधिकारी यांच्या दालनात निविदा दरपत्रके उघडण्यात आली असता संचिकेतील पान क्र.एनएस-९ व १० परिच्छेद क्रमांक ३४ नुसार मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या कमी आहे त्यास संचिकेतील परिच्छेद क्र. ३८ नुसार मा.आयुक्त यांनी मंजूरी देण्यात आली. त्याप्रमाणे तपासणी दरम्यान खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेतील आर्थिक वर्ष २००७-०८ या वर्षातील चतुर्थश्रेणी कर्मचारी स्त्री कर्मचारी, शिपाई, मजूर, आरोग्य विभागातील ए.एन.एस., पी.एन.एन. ची संख्या किती याची यादी संचिकेत उपलब्ध झालेली नाही.

२. शासन निर्णय २ जानेवारी ९२ मधील परिच्छेद ८.३ नुसार जाहिर निविदेचा कालावधी कमीत कमी तीन (३) आठवड्याचा देण्यात यावा. परंतू गणवेश खरेदी वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दी दिनांक ३१.१०.२००७ ते ७.११.२००७ पर्यंत एकूण सात दिवस जाहिरात प्रसिध्द करण्यात आली ही बाब आक्षेपार्ह आहे.

३. संचिकेत मान्य निविदा धारकाचे रू.१०० चे मुद्रांकावर करारनामा केल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

४. संचिकेत निविदाधारक मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन निविदेस मंजूरी प्रदान असतांना मे.स्मार्ट वेअर यांच्या निविदेस मंजूरी नसतांना पुरवठा आदेश देण्यात आले.

५. संचिकेत स्त्री कर्मचारी गणवेश पुरवठा करण्यासाठी जा.क्र.मनपा/भांडार/२००७/३०५, दिनांक २७.१२.२००७ नुसार मे.स्मार्ट वेअर यास पुरवठा आदेश देण्यात आले. त्यास साहित्य पुरवठा करण्यासाठी ३० दिवस कालावधी देण्यात आला होता. परंतु संबंधित एजन्सीने पुरवठा कालावधी संपल्यानंतर ३४ दिवस उशिरा दिनांक २९.२.२००८ रोजी पुरवठा केल्याचे स्टॉक बुक क्र. १०९ पान क्रमांक १०५ नोंदीवरून स्पष्ट होते. रक्कम रू.१,३४,६१०/- किंमतीचे साहित्य पुरवठा संबंधित एजन्सीने उशिरा केल्यामुळे पाच (५) आठवड्याचा विलंब रुपये ६७३०/- होते. परंतु विलंब रक्कम रू.६७३०/- त्याच्या देयकातून कपात केलेले नाही.

६. संचिकेतील स्त्री कर्मचारी गणवेश पुरवठा करण्यासाठी जा.क्र.मनपा/भांडार/३०४, दिनांक २७.१२.२००७ मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन यास पुरवठा आदेश देण्यात आले. त्यास साहित्याचा पुरवठा करण्यासाठी ६ वारी साडी १५ दिवस व ९ वारी साडी आणि निळे व पांढरे ब्लाऊज पिस पुरवठा साठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात आला. परंतु संबंधित एजन्सीने ६ वारीसाठी पुरवठा कालावधी संपल्यानंतर ५० दिवस उशिरा दिनांक २९.२.२००८ रोजी पुरवठा केल्याचे स्टॉक बुक क्र.१०९ पान क्रमांक १०४ नोंदीवरुन स्पष्ट होते. रक्कम रु. १,६२,५००/- किंमतीचे साहित्य पुरवठा संबंधित एजन्सीने उशिरा केल्यामुळे सात आठवड्याचा विलंब रुपये ११,३७५/- होते.परंतु कमाल दंडाची मर्यादा ५% प्रमाणे रू.८१२५/- येते.
संबंधित एजन्सीने ९ वारी निळे व पांढरे ब्लाऊज पिस पुरवठा कालावधी संपल्यानंतर ३४ दिवस उशिरा दिनांक २९.२.२००८ रोजी पुरवठा केल्याचे स्टॉक बुक क्र. १०९ पान क्रमांक १०४

नोंदीवरुन स्पष्ट होते. रक्कम रु.५,३२,५६०/- किंमतीचे साहित्य पुरवठा संबंधित एजन्सीने उशिरा केल्यामुळे पाच (५) आठवड्याचा विलंब रुपये २६६३०/-होते. म्हणजेच एकत्रित रक्कम रु. ८१२५ + २६६३० = ३४७५५ /- संबंधित निविदाधारकाच्या देयकातून कपात केल्याचे दिसून येत नाही.

७. मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन व मे.स्मार्ट वेअर यांनी पुरवठा केल्याबाबतचे डिलेवरी चालान संचिकेत उपलब्ध झालेले नाही.

मुद्या क्र.१ ते ७ बाबत विभागाने खातरजमा करुन विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२२: स्वच्छता साहित्य खरेदी सन २००७-२००८ बाबत.**

सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात स्वच्छता साहित्य खरेदीसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ०५ निविदा विक्री झाल्या त्यापैकी ०३ निविदा प्राप्त झालेल्या असून तिन्ही एजन्सीने कमी दराचे वस्तूबाबत दर नमूद केलेले आहेत. तिन्ही एजन्सींना वस्तूंचा पुरवठा करणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| बिल क्र. व दिनांक | पुरवठादाराचे नांव | साहित्याचे नांव | परिणाम | बिलाची रक्कम | पुरवठा कालावधी | पुरवठा आदेश क्रमांक | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०६३<br>२२.२.०८<br>T.I. | न्यु भारत स्टोअर्स | स्वच्छता साहित्य | --- | २०२८७०/- | २१ दिवस | २८३<br>१८.१२.२००७ | १०९<br>१०.३.०८ |

न्यु भारत स्टोअर्स यांना २१ दिवसांत पुरवठा करण्यासंबंधी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले असता संबंधितांनी ८ आठवडे उशिरा पुरवठा केला आहे. परंतु निविदा अटी व शर्ती नियम १३ अन्वये १% प्रति आठवड्याप्रमाणे २०२९x८ आठवडे = १६२३२ एवढा दंड वसूल करणे आवश्यक असतांना रक्कम रु.९११२५/- वर ३% दंडाप्रमाणे २७३४/- रक्कम दंड आकारणी करण्यात आली आहे व त्यास परिच्छेद क्रमांक २६ , २७ अन्वये मा.आयुक्त यांची मंजूरी घेतली आहे.

३) स्वच्छता साहित्य खरेदीबाबत पुरवठा आदेश देण्यात आले आहे. परंतू संचिकेत करारनामा दिसून आला नाही.

४)

| बिल क्र. व दिनांक | पुरवठादाराचे नांव | साहित्याचे नांव | बिलाची रक्कम | पुरवठा कालावधी | पुरवठा आदेश क्रमांक | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| २३,२४,२५<br>५.२.०८ | यश ट्रेडिंग | स्वच्छता साहित्य | ८५२९९१/- | २१ दिवस | २८५<br>१८.१२.२००७ | १०९/१०६<br>०१.३.०८ |

यश ट्रेडिंग कंपनी यांना मालाचा पुरवठा करण्यास पुरवठा आदेश देण्यात आला असता संबंधिताने ५१ दिवस उशिरा म्हणजे ७ आठवडे उशिरा मालाचा पुरवठा केला आहे. निविदा अटी व शर्ती

अ.क्र.१३ अन्वये ८५३०X७ आठवडे = ५९७१०/- दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

५)

| पुरवठादाराचे नांव | मालाचे नांव | मालाची संख्या | दर | अदा एकूण रक्कम | आदेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| यश ट्रेडिंग | टिकाव दांड्यासह No-१२ | १५० | १६०.२० | ४००५०/- | २८५<br>१८.१२.२००७ |

बिल क्रमांक २३, दिनांक ५.२.२००८ यश ट्रेडिंग कंपनी अ.क्र.५ वरील टिकाव दांड्यांसह नग १५० प्रति नग रक्कम रु.१६०.२० प्रमाणे एकूण रक्कम २४०३०/- एवढी असतांना संबंधितास रक्कम रु.४००५०/- चे देयक अदा करण्यात आले म्हणजे रक्कम रु.१६०२०/- जास्तीचे अदा करण्यात आले आहे.

६)

| बिल क्र. व दिनांक | पुरवठादाराचे नांव | साहित्याचे नांव | बिलाची रक्कम | पुरवठा कालावधी | पुरवठा आदेश क्रमांक | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ००५<br>४.३.०८ | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | स्वच्छता साहित्य | २२६०९७/- | २१ दिवस | २८४<br>१८.१२.२००७ | १०९/१०७<br>०१.३.०८ |

रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांना पुरवठा आदेश दिले असता संबंधिताने ५१ दिवस म्हणजे ७ आठवडे उशिरा पुरवठा केला आहे.

२२६१X७ आठवडे = १५८२७/- इतका दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

७) स्वच्छता साहित्य पुरवठा करतांना माल प्राप्त झाल्याबाबत संचिकेमध्ये D.C. दिसून आलेली नाही.

८) अनामत रक्कम प्राप्त झाल्याबाबत अथवा पुरवठाधारकास परत केल्याबाबत संचिकेत उल्लेख नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२३: आर्थिक वर्ष २००७-०८ लिखाण साहित्य खरेदी बाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये भांडार विभागाचे उक्त वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००७-०८ या आर्थिक वर्षात लिखाण साहित्य खरेदी संचिका पाहणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) लेखन साहित्य खरेदी संचिका पाहणी केली असता संचिकेमध्ये करारनामा दिसून आला नाही.

२) मे.विजय जनरल स्टोअर्स यांना सन २००७-०८ लेखन साहित्य खरेदी करण्यासाठी आदेश क्रमांक २३८ /२४.१०.२००७ अन्वये रक्कम रु.५०६८३८/- आदेश देण्यात आले आहे. परंतू

संबंधिताला १५ दिवसांत पुरवठा करण्यास आदेशित केले असता संबंधिताने ८८ दिवस उशिरा पुरवठा केला आहे.

३) निविदा अटी शर्ती क्रमांक १३ अन्वये पुरवठा कालावधीमध्ये साहित्याचा पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या साहित्याच्या किंमतीवर १% प्रति आठवडा दंड आकारला असता ५०६८३८ x १% =५०६८/-, ५०६८ x १२ आठवडे = ६०८१६/- एवढा दंड वसूल करणे आवश्यक असतांना वसूल केल्याचे दिसून येत नाही.

४) मे.विजय ट्रेडर्स यांची निविदा अनामत रक्कम भरणा केल्याबाबत अथवा रक्कम परत केल्याबाबत संचिकेत उल्लेख नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२४: संगणक साहित्य खरेदी संचिकेबाबत.**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात संगणक साहित्य खरेदीसाठी वार्षिक दर करार करण्याकरीता निविदा मागविल्या असता ०६ निविदा प्राप्त झाल्या. एकूण मान्य करण्यात आलेल्या ०५ निविदाधारक मे.विजय जनरल स्टोअर्स, मे.ओ.के.ट्रेडर्स, मे.न्यू भारत स्टोअर्स, मे. अभय ट्रेडर्स, मे.दिप ट्रेडर्स यांची सर्वात कमी दरांची निविदा प्राप्त झालेली असून त्यास मा.आयुक्त यांची मंजूरी संचिकेतील पृष्ठ क्रमांक एनएस-५, परिच्छेद क्र.१५ नुसार देण्यात आली. त्याप्रमाणे पुरवठा आदेश पारीत करण्यात आले. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संगणक साहित्य खरेदीसाठी सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक दर करार करणेसाठी कोणकोणत्या वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात आली त्यांच्या प्रती संचिकेत दिसून आल्या नाही.

२. संगणक साहित्य खरेदी बाबत मान्य निविदाधारकाकडून घ्यावयाचे करारपत्र रू.१००/- च्या मुद्रांकावर करुन घेतल्याचे संचिकेत दिसून येत नाही.

३. संगणक साहित्य खरेदी बाबत निविदा दरपत्रक अटी व शर्तीनुसार अनामत रक्कम रू.१५,०००/- रोख भरल्याची पावती किंवा उप-आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेचे कॉल डिपॉझीट प्राप्त झाले किंवा परत दिल्याबाबत संचिकेत उल्लेख दिसून आलेला नाही.

४. न्यु भारत स्टोअर्स, दिप ट्रेडर्स यांना पुरवठा आदेश क्र.२२४, दिनांक २४.१०.२००७ नुसार दिले असता संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस/८ वरील परिच्छेद क्र.२५ नुसार पुरवठा झाल्याचे दिसते परंतू संचिकेत संबंधित एजन्सीधारकाचे देयक व डिलेवरी चालन दिसून आलेले नाही.

५. विजय जनरल स्टोअर्स, ओ.के. ट्रेडर्स, अभय ट्रेडर्स यांनी साहित्य पुरवठा केल्याचे डिलेवरी चालन संचिकेत दिसून आले नाही.

६. संगणक साहित्य खरेदी बाबत संबंधित पुरवठाधारकाने साहित्याचा उशिरा पुरवठा केल्यामुळे त्यांचेवर निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे दंडात्मक कार्यवाही केलेली आढळून आलेली नाही. सोबत एजन्सीनिहाय तक्ता जोडण्यात येत आहे.

७. संगणक साहित्य खरेदी निविदेतील साहित्याचा तपशिल अ.क्र.१९ ब्लॅक सीडी आर क्ल्यु ७०० एम.बी. ८० मिनिट विथ केस यांची खरेदी ५० नगाची असतांना मे.ओके ट्रेडर्स व विजय जनरल स्टोअर्स यांच्याकडून प्रत्येकी १०० चा पुरवठा आदेश देवून दोघांकडून २०० चा पुरवठा केल्याचे दिसून येते. म्हणजेच १५० चा जास्तीचा पुरवठा आदेश देवून महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

८. संगणक साहित्य खरेदी निविदा दरपत्रकातील अटी व शर्ती मधील अ.क्र.२ लेझर टोनर इ.बाबत अधिकृत विक्रेता उप-विक्रेता असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिसून आलेले नाही.

९. मे.ओके ट्रेडर्स, मे.विजय जनरल स्टोअर्स, मे.दिप ट्रेडर्स, मे.न्यु भारत स्टोअर्स व मे.अभय ट्रेडर्स यांनी पुरवठा केलेल्या संगणक साहित्य खरेदी निविदेतील ठरलेल्या कंपनी पुरवठा केलेला आहे किंवा नाही याबाबत संचिकेत भांडार लिपीक व भांडार लेखापाल यांनी उल्लेख केल्याचे दिसून येत नाही.

१०. विजय जनरल स्टोअर्स यांस चार साहित्याचा पुरवठा करण्यासाठी आदेशित केले असता संबंधित एजन्सीधारकाच्या देयकानुसार चार साहित्याचा पुरवठा करण्याऐवजी आठ साहित्याचा पुरवठा केल्याचे दिसून येते.

**सन २००७-२००८ या वर्षात संगणक साहित्य खरेदी मध्ये एजन्सीने विलंबाने पुरवठा केल्याबाबत आकारण्यात येणा-या दंडाबाबतचा तक्ता**

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी दिवस | विलंब दंड |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.ओ.के.ट्रेडर्स | २३३<br>२४.१०.२००७ | ७ | ७४,३४०/- | १०३ | १०,४०२/- |
| २ | मे.विजय जनरल स्टोअर्स | २३०<br>२४.१०.२००७ | १० | १,०१,३१५/- | १०५ | १५,१९५/- |
| ३ | अभय ट्रेडर्स | २३६<br>१८.१०.२००७ | ७ | ५२,५००/- | १५८ | १२,०७५/- |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२५: आर्थिक वर्ष २००८-०९ मधील किटकनाशक साहित्य खरेदी .**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात लागणारे किटकनाशक साहित्य खरेदीसाठी वार्षिक दर करार करण्यासाठी निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देवून निविदा विक्री ठेवण्यात आल्या असता एकुण ०६ निविदा विक्री झाल्या. ०३ निविदा प्राप्त झाल्या. काळे फिनेल या साहित्याकरीता मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन व कॉर्बोलिक पावडरकरीता मे.ओ.के.ट्रेडर्स यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या इतरांपेक्षा कमी प्राप्त झाले आहेत. दोन्ही निविदाधारकास वाटाघाटीसाठी बोलावले असता ५% कमी दराने पुरवठा करण्यास तयार आहे त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक १२.८.२००८ नुसार मंजूरी देण्यात आली. त्याप्रमाणे दोन्ही

निविदाधारकांकडून करारनामा करुन पुरवठा आदेश देण्यात आले. संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) सन २००८-०९ या वर्षात कीटकनाशक खरेदी करतांना पुरवठाधारकाने साहित्याचा विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधिताविरुध्द दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही. अशा विलंबाने प्राप्त झालेल्या साहित्याचा विवरण तक्ता पुढीलप्रमाणे.

२) पुरवठाधारकाने मालाचा पुरवठा करतांना D.C. देणे आवश्यक असतांना D.C.दिल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याचे नांव | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | किमान विलंब दंड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | OK ट्रेडर्स | १०९ १८.९.२००८ | २१ | कार्बोलिक पावडर | ४,७६,०००/- | १२४ | २३,८००/- |
| २ | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | १०८ १८.९.२००८ | २१ | काळे फिनेल R.w.C. | ३,३६०००/- | १२४ | १६,८००/- |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२६: स्त्री कर्मचारी गणवेश साडी, शर्ट सलवार खरेदी संचिका बाबत.**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात स्त्री कर्मचारी गणवेश साडी व शर्ट सलवार खरेदी बाबत ०५ निविदा विक्री करण्यात आल्या असता ०३ निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी मे. क्रीष इन्टरनॅशनल या एजन्सीचे दर मान्य करण्यात आले. संबंधित एजन्सीला पुरवठा आदेश क्र. १९४, दिनांक ०३.०१.२००९ रोजी देण्यात आले. साहित्याचा पुरवठा ३० दिवसांत करणे बाबत पुरवठा आदेशात नमूद केलेले आहे. तसेच मे. एम आर व्ही इंटरप्राईजेस यांना कार्यालयीन पुरवठा आदेश क्रमांक २४०, दिनांक २४.२.२००९ अन्वये साहित्याचा पुरवठा १० दिवसांत करण्याबाबत कळविले आहे. एकूण खरेदी ४,७३,०९३/- ची खरेदी बाबत दोन्ही एजन्सीला पुरवठा आदेश दिलेले आहेत. संचिकेतील इतर बाबी तपासल्या असता खालील आक्षेपित मुद्ये निदर्शनास आले.

१. साडी व ओढणी कापड पुरवठा करण्यासाठी क्रिश इंटरनॅशनल यास पुरवठा आदेश देण्यात आले असता पुरवठा करण्यासाठी निविदाधारकाने डिलेवरी चलन दाखल केलेले असून त्यास नंबर आणि दिनांक टाकण्यात आलेले नसल्याने संबंधिताने केव्हा पुरवठा केला याचा बोध होत नाही.

२. स्त्री गणवेश साडी व ओढणी खरेदी करण्यासाठी क्रिश इंटरनॅशनल यांस पुरवठा आदेश क्र.१९४/०९ दिनांक ३.१.२००९ रोजी देवून सदरील साहित्याचा पुरवठा ३० दिवसांत करावा असे असतांना संबंधित एजन्सीने साहित्याचा पुरवठा दिनांक ३१.३.२००९ रोजी केल्याचे स्टॉक बुक १०९ पान क्र.५६ वरील नोंदीवरुन स्पष्ट होते. संबंधित निविदाधारकाने ५७ दिवस उशिराने रक्कम रु.३४६,४२१/- रकमेचा साहित्य पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार आठ आठवड्याचा विलंब दंड रुपये २७,७१२/- होतो. परंतू कमाल दंडाची मर्यादा ५% प्रमाणे रुपये १७,३२१/- येते. संबंधित एजन्सीच्या देयकातून कपात केल्याचे दिसून येत नाही.

३. शर्ट सलवार व ब्लाऊज पिस कापड पुरविण्यासाठी मे.एम.आर.व्ही.इंटरप्रायजेस पुरवठा आदेश क्र.२४०/०९ दिनांक २४.२.२००९ देवून साहित्याचा पुरवठा १० दिवसांत करावा असे असतांना संबंधित एजन्सी धारकाने दिनांक ३१.३.२००९ रोजी केल्याचे स्टॉक बुक क्र.१०९ पान क्र.५५ वरील नोंदवीवरुन स्पष्ट होते. संबंधित निविदाधारकाने २७ दिवस उशिराने रक्कम रु.१२६,६७२/- रकमेचा पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार ४ आठवड्याचा विलंबदंड रुपये ५०६७/- होतो. परंतू संबंधित निविदाधारकाच्या देयकातून कपात झाल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे संचिकेत संबंधित निविदाधारकाकडून पुरवठा केल्याचे डिलेवरी चलन उपलब्ध नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२७: आर्थिक वर्ष २००८-०९ सफाई कर्मचा-यांसाठी स्वच्छता साहित्य खरेदी. (रक्कम रु.५,०९,८५०/-)**

सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाकरीता सफाई कर्मचा-यांसाठी लागणारे स्वच्छता साहित्य खरेदीसाठी वार्षिक दर करार करण्यासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून निविदा विक्री केली असता एकूण ०९ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी ०५ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी न्यू भारत स्टोअर्स यांचे तुलनात्मक दृष्ट्या कमी दर असल्याने मा.आयुक्त यांनी दिनांक १४.७.२००८ व मा.स्थायी समिती सभापती यांची मान्यता दिनांक १९.९.२००८ रोजी देवून पुरवठा आदेश देण्यात आले. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र | डी.सी.क्रमांक व दिनांक | एजन्सीचे नांव | मालाचे नांव | परिणाम | दर | एकूण रक्कम | आदेश क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २२९४<br>२७.५.२००९ | न्यू भारत स्टोअर्स | गमबुट | २०० | ३१३ | ६२,६००/- | १२४<br>१६.१०.२००८ |
| २ | २२६२<br>१०.६.२००९ | न्यू भारत स्टोअर्स | गमबुट | २०० | ३१३ | ६२,६००/- | १२४<br>१६.१०.२००८ |
| ३ | २२९५<br>१४.८.२००९ | न्यू भारत स्टोअर्स | गमबुट | २०० | ३१३ | ६२,६००/- | १२४<br>१६.१०.२००८ |
| ४ | २२९४<br>२७.५.२००९ | न्यू भारत स्टोअर्स | मास्क | १५००० | १.४९ | २२,३५०/- | १२४<br>१६.१०.२००८ |
| ५ | २२९५<br>१४.८.२००९ | न्यू भारत स्टोअर्स | हातमौजे | १५०० | १२ | १८,०००/- | १२४<br>१६.१०.२००८ |

१) मे. भारत स्टोअर्स अंगुरीबाग यांना जा.क्र.मनपा/भांडार/१२४/ दिनांक १६.१०.२००८ अन्वये सफाई कर्मचा-यांसाठी स्वच्छता साहित्य खरेदी करण्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आला आहे. गमबुट खरेदी एकूण १५०० नग असतांना खरेदी मात्र ६०० नग करण्यात आली आहे.

२) पुरवठा आदेश १२४ दिनांक १६.१०.२००८ अन्वये गमबुट ६०० नग खरेदी करतांना संबंधित पुरवठाधारक यांनी मालाचा पुरवठा उशिरा केला आहे. निविदा अटी शर्ती १३ अन्वये प्रति आठवडा १% प्रमाणे दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

अ) २०० नग x३१३ = ६२६००
६२६०० x १% = ६२६
६२६ x २९ आठवडे = १८१५४/-

ब) २०० नग x३१३ = ६२६००
६२६०० x १% = ६२६
६२६ x ३१ आठवडे = १९४०६/-

क) २०० नग x३१३ = ६२६००
६२६०० x १% = ६२६
६२६ x ४१ आठवडे = २५६६६/-

३) जा.क्र.मनपा/भांडार/१२४, दिनांक १६.१०.२००८ अन्वये मास्कचा पुरवठा आदेश देण्यात आले असता संबंधिताने उशिरा पुरवठा केला आहे. परंतू निविदा अटी व शर्ती अ.क्र.१३ अन्वये १% प्रति आठवडा उशिरा पुरवठा केल्याबाबत दंड आकारणी आवश्यक असतांना दंड आकारणी केलेली नाही.

२२३५०x १% = २२४/-
२२४ x २९ आठवडे = ६४९६/-

४) जा.क्र.मनपा/भांडार/१२४, दिनांक १६.१०.२००८ अन्वये हातमौजे पुरवठा आदेश देण्यात आला असता संबंधिताने उशिरा पुरवठा केला आहे.

१८००० x १% = १८०/-
१८० x ४१ आठवडे = ७३८०/-

५) करारनामा करतांना दोन साक्षीदाराच्या सह्या असणे आवश्यक असतांना साक्षीदाराच्या सह्या नाही.

६) संचिकेमध्ये D.C. आहे. परंतू प्राप्त मालाचे विवरण लिहिलेले नाही. सदरील D.C. संशयास्पद वाटतात.

७) D.C. वर C.S.T. B.S.T क्रमांक नाही.

**सन २००८-२००९ या वर्षात न्यु भारत स्टोअर्स एजन्सीकडून स्वच्छता साहित्य खरेदी मध्ये विलंबाने पुरवठा केल्याबाबत आकारण्यात येणा-या दंडाबाबतचा तक्ता**

| अ. क्र. | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याचे नांव | परिमाण | दर | एकूण रक्कम | विलंब कालावधी दिवस | एकूण आठवडे | विलंब दंड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ | गमबुट | २०० | ३१३ | ६२,६००/- | २०७ | २९ | १८१५४/- |
| २ | १५ | गमबुट | २०० | ३१३ | ६२,६००/- | २२१ | ३१ | १९४०६/- |
| ३ | १५ | गमबुट | २०० | ३१३ | ६२,६००/- | २८६ | ४१ | २५६६६/- |
| ४ | १५ | मास्क | १५००० | १-४९ | २२,३५०/- | २०७ | २९ | ६४९६/- |
| ५ | १५ | हातमौजे | १५०० | १२ | १८०००/- | २८६ | ४१ | ७३८०/- |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२८: आर्थिक वर्ष २००८-०९ मधील नोव्हान खरेदी बाबत.**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात मलेरिया विभागाकरीता नोव्हान या जंतूनाशकीय साहित्याचा पुरवठा करण्याकरीता निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्दी करुन ०३ निविदा विक्री करण्यात आल्या. ०३ निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मक दृष्ट्या मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन व ओ.के.ट्रेडर्स या दोन निविदाधारकांचे दर समान असल्याने दोघांना काम विभागून देण्यात आले. त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक १८.८.२००८ नुसार मंजूरी देवून दोन्ही निविदाधारकांकडून करारनामा करुन पुरवठा आदेश पारीत करण्यात आले. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. जा.क्र./मनपा/भांडार/७५, दिनांक ३०.७.२००८ अन्वये नोव्हान खरेदी बाबत निविदा सूचना काढली असता दिनांक ३१.७.२००८ ते ०२.०८.२००८ असा तीन दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे.

२. करारनामा करण्यात आला आहे. परंतू करारनामा करतांना दोन साक्षीदाराच्या स्वाक्षरी असणे आवश्यक असतांना स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

३. पुरवठाधारकाने साहित्याचा विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधिताविरुध्द दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही. अशा विलंबाने प्राप्त झालेल्या साहित्याचा विवरण तक्ता या सोबत जोडण्यात येत आहे.

४. पुरवठाधारकाने साहित्याचा पुरवठा करतांना D.C. देणे आवश्यक असतांना D.C. दिलेले नाही.

५. निविदा अटी व शर्ती अ.क्र.११ सदरील साहित्य हे शहरातील नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत बाब असल्याने साहित्य पुरवठा बाबत विलंब होता कामा नये असे असतांना विलंबाने पुरवठा केला आहे.

६. निविदा अटी व शर्ती अ.क्र.१ नुसार शासनाचा किटकनाशक विक्री बाबतचा अद्यावत परवाना तसेच उत्पादकाचे अन्न व औषधी प्रशासनाचा अद्यावत परवाना अधिकृत विक्रेता

असल्याबाबतचे प्रमाणपत्र असावे असे असतांना मे.ओके ट्रेडर्स, मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन या पुरवठाधारकाकडे परवाना असल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२९: आर्थिक वर्ष २००८-०९ मधील लेखन साहित्य खरेदी बाबत.**

भांडार विभागाचे सन २००८-०९ या वर्षातील लेखन साहित्य खरेदी बाबत एकूण ९ निविदा विक्री करण्यात आल्या असता एकूण ०६ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी एकूण ०४ निविदा उघडण्यात आल्या. ज्या वस्तूचे दर कमी दर्शविलेले आहेत अशा वस्तूंचा पुरवठा करण्याबाबत संबंधित चारही एजन्सीस पुरवठा करणेबाबत आदेशित केले . एकूण रक्कम रु.६,३७,३५१/- रकमेची खरेदी बाबत प्रस्तावित आहे. संबंधित एजन्सीने विहित मुदतीत वस्तूचा पुरवठा केलेला नाही. सदरील संचिका सविस्तर तपासली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१) मे.ओके ट्रेडर्स यांना लेखन साहित्य खरेदी करण्यासाठी जा.क्र.मनपा/भांडार/१३१, दिनांक १६.१०.२००८ अन्वये रक्कम रुपये २,८२,८५०/- चा पुरवठा आदेश देण्यात आला असून साहित्य पुरवठा केल्याबाबत लेखा विभागाचे देयक अथवा माल प्राप्त झाल्याबाबत बिल संचिकेत आढळून आले नाही.

२) सन २००८-०९ या आर्थिक वर्षात लेखन साहित्य खरेदी करतांना पुरवठाधारकाने साहित्याचा विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधिताविरुध्द दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही. अशा विलंबाने प्राप्त झालेल्या साहित्याचा विवरण पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | बिल क्र. व दिनांक | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | विलंब दंड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४० २.१२.२००८ | विजय जनरल स्टोअर्स | १२९ १६.१०..२००८ | १५ | १००८०/- | ३१ | ४०४ |
| २ | | ओ.के.ट्रेडर्स् | १३१ १६.१०..२००८ | १५ | २,८२,८५०/- २,३८,८५०/- (paid) | -- | -- |
| ३ | १२७९,१२८१, १२८२ २१.३.२००९ | न्यु भारत स्टोअर्स | १३२ १६.१०..२००८ | १५ | २,३९,२६५/- २,२६,६६५/- (paid) | १४० | ४५३४० |
| ४ | १६६, १६७ | अभय ट्रेडर्स | १३९ १६.१०..२००८ | १५ | २२,४८६/- | १५० | ४७२५ |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३०: संगणक साहित्य खरेदी संचिकेबाबत.**

सन २००८-०९ या वर्षात संगणक साहित्य खरेदीबाबत जाहिरात देवून निविदा मागविली असता ०७ निविदा विक्री झाल्या. त्यातून ०३ निविदा प्राप्त झाल्या. एकूण तिन्ही एजन्सीने वस्तूनिहाय दिलेल्या कमी दरानुसार निविदा स्विकारण्यात आल्या. निविदा स्विकारतांना नियमाचे पालन केलेले नाही. एकूण रूपये ८,७७,९२५/- रकमेची निविदा मागविण्यात आलेली आहे. भांडार विभागाने खरेदी केलेल्या अनियमिततेबाबत खालील बाबी निदर्शनास आल्या.

१) संगणक साहित्य खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिराती प्रसिध्दीसाठी शासन निर्णय २ जानेवारी ९२ मधील परिच्छेद क्र.८.३ नुसार जाहिर निविदेचा कालावधी कमीत कमी तीन आठवड्याचा देण्यात यावा असे असतांना प्रसिध्दी कालावधी अकरा दिवसांचा देण्यात आला.

२) अनामत रक्कम रू.२०,०००/- रोख भरल्याची पावती किंवा उप-आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेचे कॉल डिपॉझिट जमा केल्याबाबतची नोंद नाही.

३) भांडार विभागात साहित्याचे नमुने जमा केल्याची पोच पावती न्यु भारत स्टोअर्स व मे.ओ.के. ट्रेडर्स् दरपत्रकातील अटी व शर्ती नुसार दिसून आलेली नाही.

४) न्यु विजय जनरल स्टोअर्स सन २००८-०९ या वर्षातील शासनाच्या संस्थेच्या (दुकान) अद्यावत नोंदणी दाखल्याची प्रत संचिकेत नाही.

५) मे.ओके ट्रेडर्स यांची शासनाच्या संस्थेच्या (दुकान) अद्यावत नोंदणी दाखल्याची प्रतीवर संगणक साहित्य स्वरुपाबाबतची नोंद दिसून आलेली नाही.

६) मे.ओके ट्रेडर्स् यांची दाखल्याच्या प्रतीवर संगणक साहित्य खरेदीबाबत नोंद नसतांना पुरवठा आदेश देवून त्यांच्याकडून साहित्याचा पुरवठा करण्यात आलेले आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

७) मे.विजय जनरल स्टोअर्स मे.ओके ट्रेडर्स, मे.न्यु भारत स्टोअर्स यांना संगणक साहित्य पुरवठा केल्याबाबत साहित्य डिलेवरी चालनसह असणे आवश्यक असतांना संचिकेत दिसून आलेले नाही.

८) संगणक साहित्य खरेदी करतांना पुरवठाधारकाचे साहित्याचा विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधिताविरूध्द दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही. अशा विलंबाने प्राप्त झालेल्या साहित्याचा विवरण तक्ता या सोबत जोडण्यात येत आहे.

९) मे.ओके ट्रेडर्स यास पुरवठा आदेश क्र.१२२, दिनांक १६.१०.२००८ नुसार झेरॉक्स पेपर मॅपलिथो ए/३ (A३) साईज ७० जी.एस.एस.२९७/४२० एम.एम.फुल साईज मिल पॅकींग ५०० कागदाची रिम Net wt ४.५ kg साहित्याची संख्या १०० पुरवठा करण्यास आदेशित केले असता सदरील साहित्य पुरवठा झाल्याचे संचिकेत दिसून येत नाही.

१०) मे.विजय जनरल स्टोअर्स, मे.ओके ट्रेडर्स्, मे.न्यु भारत स्टोअर्स यांस पुरवठा आदेश दिल्यानंतर प्राप्त साहित्य मान्य नमुन्याच्या कंपनीनुसार आहे किंवा नाही याची तपासणी बाबत संचिकेत उल्लेख दिसून आलेला नाही.

११) संगणक साहित्य खरेदीबाबत स्टॉक रजिस्टर क्र.१०९,११०, १११ लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | विलंब दंड |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विजय जनरल स्टोअर्स | १२१ १६.१०..२००८ | १५ | १,६६,४२५/- | ६६ | १४,९७६/- |
| २ | ओके ट्रेडर्स | १२२ १६.१०..२००८ | १५ | ७२,७५०/- | १५१ | १५,२८८/- |
| ३ | मे.न्यु भारत स्टोअर्स | १२३ १६.१०..२००८ | १५ | १,०६,०००/- | १५१ | २२,२६०/- |
| ४ | मे.न्यु भारत स्टोअर्स | १२३ १६.१०..२००८ | १५ | १,००,७००/- | १५१ | २१,१४७ |
| ५ | मे.न्यु भारत स्टोअर्स | १२३ १६.१०..२००८ | १५ | ८७,५००/- | १४६ | १८,३७५/- |
| ६ | मे.न्यु भारत स्टोअर्स | १२३ १६.१०..२००८ | १५ | १,११,६५०/- | १५१ | २३,४५७/- |
| ७ | मे.न्यु भारत स्टोअर्स | १२३ १६.१०..२००८ | १५ | १,००,०००/- | १५१ | २१,०००/- |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३१: छपाई साहित्य खरेदी बाबत.**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरीता लागणारे छपाई साहित्य खरेदीसाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून निविदा विक्री केली असता एकूण ०६ निविदा विक्री झाल्या. ०३ निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मक दृष्ट्या एकूण ७७ आयटमसाठी मे.लिबर्टी प्रिन्टर्स, मे.जयभारती एक्स. बुक ऑफ, मे.अभय ट्रेडर्स यांचे दर कमी प्राप्त झाले असून मा.आयुक्त यांनी दिनांक १५.७.२००८ रोजी व मा.स्थायी समिति सभापती यांनी १९.९.२००८ रोजीच्या सभेत मान्यता प्राप्त तिन्ही निविदाधारकास मंजूरी देण्यात येवून पुरवठा आदेश देण्यात आले. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) छपाई साहित्य खरेदीसाठी वार्षिक करार करण्यासाठी दिलेल्या वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात आली होती. त्याची कात्रण संचिकेत दिसून आलेली नाही.

२) संचिकेतील पृष्ठ क्र.८ परिच्छेद क्र.१९ नुसार मा.स्थायी समितीचा दिनांक १९.९.२००८ रोजीचा कारणापुरता उतारा संचिकेत जोडलेला असून त्यावर छपाई साहित्याबाबतच्या दरास व त्यासाठी लागणा-या खर्चास मंजूरी प्रदान झालेली नाही.

३) छपाई साहित्य खरेदी निविदेतील अटी व शर्तीनुसार मान्य निविदाधारकास ५०/- रु. मुद्रांकावर करारनामा करुन घ्यावा असे असतांना करारनामा केल्याचे दिसून येत नाही.

४) संचिकेतील मे.लिबर्टी प्रिन्टर्स देयक क्रमांक ६८ दिनांक १८.१२.२००८ रक्कम रु.१,१५,०००/- व देयक क्र.७५ दिनांक २.२.२००९ रक्कम रु.९७५५५/- चे बिल व व्हाऊचर संचिकेत उपलब्ध झालेले नाही.

५) मे.जयभारती एक्स बुक मॅन्यु कंपनी यास पुरवठा आदेश क्र.१५३ दिनांक ११.११.२००८ रोजी एकूण छपाई बाबत चार साहित्याचा पुरवठा करण्यासाठी आदेशित केले असता डिलेवरी चालन क्र.२२७ वर एकूण साहित्य तीन नोंदविण्यात आले व बिल क्र.२१४ वर छपाई सहित एकूण चारची नोंद दर्शविण्यात आली म्हणजेच डिलेव्हरी चालान नुसार गुंठेवारी फॉर्म छपाई करून आल्याचे दिसून येत नाही.

६) मे.अभय ट्रेडर्स बिल क्र.७६,७७,७८,७९ नुसार दिलेले बिल हे जास्तीचे दर्शविण्यात आले असल्याने व्हाऊचरची रक्कम रु.१,८८,८३१/- ही संबधितास अदा करावयास पाहिजे होती. परंतू संबंधितास रक्कम रु.१,९१,३८७/- अदा केल्याचे दिसून येते. म्हणजेच रक्कम रु.२५५६/- जास्तीचे अदा केलेले असून ही बाब आक्षेपार्ह आहे.

७) मे.लिबर्टी प्रिन्टर्स यांचे दिनांक १६.६.२००९ रोजीच्या देयकातील (व्हाऊचर) अ.क्र.६ मधील कम्प्लीशन फॉर्म (छोटे) २५०X५.९०=२९००/- दर्शविण्यात आले. मात्र २५०X५.९०= ४७५/- एवढी रक्कम अदा करावयास पाहिजे असतांना संबंधिताला रक्कम रु.१४२५/- जास्तीचे अदा करण्यात आले आहे.

८) मे.लिबर्टी प्रिन्टर्स यांचे दिनांक १६.६.२००९ रोजीच्या देयकातील (व्हाऊचर ) अ.क्र.१६ सिमेंट कम्प्लीशन रिपोर्ट २५०X९.८० =२४५० देयकात रक्कम अदा करण्यात आली आहे. परंतू बिल क्र.९१,९२,दिनांक ५.६.२००९ मध्ये याबाबतची नोंद आढळून आलेली नाही.

९) मे.अभय ट्रेडर्स यांना दिनांक ३१.७.२००९ च्या छपाई साहित्याचे देयक अदा करतांना रक्कम .१,१७,८५७/- एवढे देयक अदा करावयास पाहिजे होते.परंतु संबंधितास रक्कम रु.१,२९,४०७/- एवढी रक्कम अदा करण्यात आली. म्हणजेच संबंधिताला रक्कम रु.११५५०/- जास्तीचे अदा करण्यात आले आहे. तसेच मे.अभय ट्रेडर्स यांनी सादर केलेल्या बिल क्र.८३ वर दिनांक स्वाक्षरी माल प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी बिलावर दिसून आलेली नाही.

१०) मे.लिबर्टी प्रिन्टर्स व मे.अभय ट्रेडर्स यांनी रक्कम रु.२०,०००/- ही संपूर्ण माल /साहित्य पुरवठा केल्यानंतर देणे असतांना माल पुरवठा केल्याचा अगोदरच अदा करण्यात आलेली आहे.

११) छपाई साहित्य खरेदी करतांना पुरवठा धारकाने साहित्याचा विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधिताविरुध्द दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही. अशा विलंबाने प्राप्त झालेल्या साहित्याचा विवरण तक्ता पुढीलप्रमाणे. तसेच मे.लिबर्टी प्रिन्टर्स व मे.अभय ट्रेडर्स यांनी साहित्य पुरवठा केल्याची D.C. उपलब्ध नाही.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | विलंब दंड |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.लिबर्टी प्रिन्टर्स | १५२/०८ ११.११.२००८ | ३० | १,१५,०००/- | -- | -- |
| २ | मे.लिबर्टी प्रिन्टर्स | १५१/०८ ११.११.२००८ | ३० | ९७,५५५/- | -- | -- |
| ३ | मे.लिबर्टी प्रिन्टर्स | २१०/०९ २८.१.२००९ | ३० | ८७,४००/- | ९९ | १२,२३६/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | मे.लिबर्टी प्रिन्टर्स | २११/०९<br>२८.१.२००९ | १५ | २१,६००/- | ४४ | १,२९६/- |
| ५ | मे.अभय ट्रेडर्स | १५४/०८<br>११.११.२००८ | ३० | १,११,३८७/- | ९२ | २४,८८२/- |
| ६ | मे.लिबर्टी प्रिन्टर्स | १५०/०८<br>११.११.२००८ | ३० | १,४३,०००/- | १०४ | २१,४५०/- |
| ७ | मे.लिबर्टी प्रिन्टर्स | २१०/०९<br>२८.१.२००९ | ३० | ८७,४००/- | ९१ | ११,३६२/- |
| ८ | जयभारती एक्साईज बुक कंपनी | १५३/०८<br>११.११.२००८ | ३० | ४६,७०३/- | १७५ | ११,६७५/- |
| ९ | मे.लिबर्टी प्रिन्टर्स | १५०/०८<br>११.११.२००८ | ३० | १,०३,८३८/- | १८७ | २६,९८८/- |
| १० | मे.अभय ट्रेडर्स | १५४/०८<br>११.११.२००८ | ३० | १,२९,४०७/- | २३३ | ४२,७०२/- |
| ११ | मे.लिबर्टी प्रिन्टर्स | ३६/०९<br>१८.६.२००९ | १५ | ५७,२००/- | ६३ | ५,१४८/- |
| १२ | मे.अभय ट्रेडर्स | १५४/०८<br>११.११.२००८ | ३० | ४३,२३५/- | ३४८ | २१,१६८/- |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३२: आर्थिक वर्ष २००८-२००९ सुटकेस खरेदी बाबत.**

औरंगाबाद महानगरपालिकेतील सर्व स.नगरसेवक यांना सन २००८-०९ या वर्षात ॲरिस्टो क्रॅट कंपनीच्या ग्लोबस UPS P-55 या मॉडेलचे दर रू.५२९०/- प्रति नग यात २०% सुट वजा जाता ४२३२/- प्रति नग प्रमाणे १०४ सुटकेस खरेदीसाठी रू.४,४०,१२८/- खर्चास BPMC १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) मान्यता देण्यात आली असून मे.सागर लगेज यांना पुरवठा करण्याबाबत जा.क्र.मनपा/भांडार/१२/२००८ दिनांक ६.५.२००८ अन्वये आदेश देण्यात आले आहे. संचिका पाहिली असता खालील त्रुटी आढळून आल्या.

१. मे.सागर लगेज यांना साहित्याचा पुरवठा करण्याबाबत ७ दिवसांत करावा असे असतांना ३० दिवस उशिराने पुरवठा केला आहे.

२. निविदा अटी शर्ती ३ अन्वये मालाच्या किंमतीवर १/२% प्रति आठवडा प्रमाणे ४ आठवडयाचा रक्कम रू. ८८०२/- एवढा दंड वसूल करावयास पाहिजे होता. दंड वसूल केलेला नाही.

३. निविदा अटी शर्ती १० प्रमाणे देयकातून २.३% आयकर TDS रक्कम रू.१०१२३/- रू. वजावट करणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

४. संचिकेत D.C. नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ३३: आर्थिक वर्ष २००९-२०१० मधील किटकनाशक साहित्य खरेदी बाबत.**

सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी लागणारे किटकनाशक पावडर खरेदी करण्यासाठी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दी करण्यात आल्या. काळे फिनेल खरेदीकरीता एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी कमी दर असलेल्या मे.ईन्शा ट्रेडिंग कंपनी यांना पुरवठा आदेश क्र.९२, दिनांक २१.८.२००९ अन्वये १२००० लिटर, रक्कम रू.३,३०,६००/- चे काळे फिनेल खरेदी करण्यात आले आहे. तसेच कार्बोलिक पावडर खरेदीकरीता एकूण ०२ निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी कमी दराची निविदा मे.ओ.के.ट्रेडर्स कंपनी यांना पुरवठा आदेश क्र.९१, दिनांक २१.८.२००९ अन्वये २०००० Kg. कार्बोलिक पावडर रक्कम रू.४,७५,०००/- ची खरेदी करण्यात आली. सदर खरेदीस मध्वर्ती भांडार खरेदी समिती यांनी ५% कमी दर करून दिनांक २०.८.२००९ मंजूरी अन्वये घेण्यात आले. दरम्यान संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र. | बील क्रमांक | एजन्सीचे नांव | मालाचे नांव | परिणाम | दर | एकूण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०<br>९.१०.२००९ | ईन्शा ट्रेडिंग कंपनी | काळे फिनेल | १२,०००kg<br>३५ Lit can | २७.५५ | ३,३०,६०० | -- |
| २ | ७०<br>२.९.२००९ | O.k. ट्रेडर्स | कार्बोलिक पावडर | २०,००० kg | २३.७५ | ४,७५,००० | -- |

१) काळे फिनेल व कार्बोलिक पावडर चे नमुना तपासणीसाठी प्रयोगशाळा ANA LABORATIORES यांना पाठविण्यात आले असता प्रयोगशाळा फिस एकत्रित रक्कम रू. ३९७१/- मनपा फंडातून देयक क्रमांक ९-९-२१ दिनांक १.०९.२००९ अन्वये अदा करण्यात आले. परंतु सदरील रक्कम ही एजन्सीधारकाने द्यावयास पाहिजे असता संबंधिताच्या देयकातून रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

२) मे. ईशा ट्रेडिंग कंपनी यांचे कडून काळे फिनेल १७१(नग) x ३५ Lit can each = ५९८५ Lit, दिनांक ११.९.२००९ रोजी प्राप्त झाले. तद्नंतर १३९ नग x ३५ Lit can each ४८६५ Lit दिनांक १९.९.२००९ रोजी प्राप्त झाले असे एकूण १०८५० Lit महानगरपालिकेच्या भांडारात प्राप्त झाले. परंतू प्रत्यक्षात १२००० Lit पाहिजे असता संबंधिताकडून ११५० Lit कमी काळे फिनेल प्राप्त झाले आहे. म्हणजेच ११५० Lit x २७.५५ Per Lit = ३१६८३ एवढ्या रकमेचे काळे फिनेल महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही. मात्र देयक अदा करतांना १२००० लिटर चे देण्यात आले.

३) मे.ओके ट्रेडर्स यांचेकडून परिच्छेद क्र.२७ अन्वये २०,००० kg कार्बोलिक पावडर २५ kg per बॅग प्रमाणे एकूण ८०० बॅग पुरवठा केला आहे. परंतू वॉर्ड अ -५० बॅग, वॉर्ड फ - ५० बॅग, वॉर्ड - ब यांचे मागणी नुसार १०० बॅग देण्यात आले आहेत. तर उर्वरीत ६०० बॅग बाबत संचिकेत उल्लेख नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३४: आर्थिक वर्ष २००९-२०१० मधील अभिलेख्र कक्ष फवारणी बाबत.**
**(रक्कम रुपये (१५,८९०/-))**

सन २००९-१० या आर्थिक वर्षात दरवर्षी प्रमाणे अभिलेख कक्षात रासायनिक फवारणी करण्याकरीता वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दी देवून, निविदा विक्री केली असता एकूण ०६ निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे.अजंठा पेस्ट कंट्रोल यांची प्राप्त झाल्याने त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक ८.२.२०१० रोजी मंजूरी देवून पुरवठा आदेश पारीत करण्यात आले. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) अजंठा पेस्ट कंट्रोल यांना जा.क्र.मनपा/भांडार/२२८, दिनांक १०.२.२०१० रोजी आदेश देण्यात आले असून ७ दिवसांत काम करणे आवश्यक असतांना संबंधिताने दिनांक २४.७.२०१० रोजी काम पूर्ण केले आहे. म्हणजेच १५७ दिवस उशिरा काम केले आहे.

२) निविदा अटी शर्ती नुसार अ.क्र.११ मान्य दराचा कालावधी मार्च २०१० अखेर पर्यंत असतांना काम उशिरा करण्यात आले आहे.

३) निविदा अटी शर्ती अ.क्र.१५ अन्वये विहित मुदतीत मान्य निविदाधारकास काम करावे लागेल तसे न झाल्यास उशिरा केलेल्या कामाच्या एकुण किंमतीवर १% प्रती आठवडा प्रमाणे १५७/७ = २२ आठवडे साठी ३४९८/- एवढा दंड वसूल करणे आवश्यक होते. परंतू दंड वसूल झालेला नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३५: आर्थिक वर्ष २००९-१० मधील लेखन साहित्य खरेदी बाबत.**

सन २००९-१० या वर्षात लेखन साहित्य खरेदीसाठी ११ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी ०४ निविदा प्राप्त झाल्या. एकूण रक्कम रु.१४,१८,३६५/- खरेदीचा प्रस्ताव आहे. अर्थसंकल्पिय तरतूद ३० लक्ष आहे. भांडार विभागाने केंद्रीय खरेदी समितीने शिफारस केल्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. संचिकेत इतर बाबी तपासल्या असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| अ. क्र. | बिल क्रमांक | एजन्सीचे नांव | साहित्याचे नांव | परिणाम | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०७२<br>३०.३.२०१० | मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन | टोनर रिफीलींग रिमोल्डींग | १०० | ६०० | ६०,०००/- |
| २ | ०८८<br>१२.१०.२०१० | मे.ओ.के. ट्रेडर्स | टोनर रिफीलींग रिमोल्डींग | ७५ | ६०० | ४५,०००/- |

१. लेखन साहित्य खरेदी करतांना केंद्रीय खरेदी समितीच्या दिनांक २७.८.२००९ रोजीच्या बैठकीत लेखन , ड्रॉईंग, संगणक साहित्यात स्थायी समितीने सूचविलेल्या दरात एकूण १२% कमी दराने छपाई व स्वच्छता साहित्यात स्थायी समितीने सूचविलेल्या दरात एकूण १०% कमी दराने खरेदी करण्याबाबत समिती शिफारस करीत आहे. असे असतांना या नुसार खरेदी झालेली नाही.

२. जा.क्र.मनपा/भांडार/१६, दिनांक १७.३.२०१० नुसार मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांना टोनर रिफीलींग रिमोल्डींग करून देणे बाबत आदेश निर्गमित केले असता एकूण संख्या १०० दर रु.६०० प्रमाणे ६०,०००/- आदेश देण्यात आले असता त्यांनी बिल क्रमांक ०७२, दिनांक ३०.३.२०१० रोजी रक्कम रु.६०,०००/- चे देयक दाखल केले असता त्यांना voucher No., दिनांक ३०.३.२०१० नुसार केंद्रीय खरेदी समितीच्या सूचविलेल्या दरात एकूण १२% कमी दराने देयक अदा करणे आवश्यक असतांना संबंधिताने तसे न करता रक्कम रु.६०,०००/- अदा करण्यात आले म्हणजे संबंधिताने जास्तीची रक्कम रु.७२००/- अदा केले आहे.

३) जा.क्र.मनपा/भांडार/१४१, दिनांक ७.१०.२०१० नुसार मे.ओके ट्रेडर्स यांना टोनर रिफीलींग रिमोल्डींग करून देणे बाबत आदेश निर्गमित केले असता एकूण संख्या ७५ दर रु.६००/- प्रमाणे ४५,०००/- आदेश देण्यात आले असता त्यांनी बिल क्रमांक ०८८ दिनांक १२.१०.२०१० रोजी रक्कम रु.४५,०००/- देयक दाखल केले असता त्यांना Voucher No. निरंक दिनांक १२.१०.२०१० नुसार केंद्रीय खरेदी समितीच्या सूचविलेल्या दरात एकूण १२% कमी दराने देयक अदा करणे आवश्यक असतांना संबंधिताने तसे न करता रक्कम रु. ४५,०००/- अदा करण्यात आले. म्हणजे संबंधिताला जास्तीची रक्कम रु.५४००/- अदा केले आहे.

मुद्या क्र.२ व ३ नुसार जास्तीची रक्कम दिल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३६: आर्थिक वर्ष २००९-१० मधील महानगरपालिका शालेय विद्यार्थी गणवेश खरेदी (१,३८,०९,४८८.७०)**

सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिके अंतर्गत विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्याकरीता विविध वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दी करण्यात आल्या असता ०३ निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी कमी दराची निविदा मे.मफतलाल फेब्रीक्स कंपनी, मुंबई यांची निविदा प्राप्त झाली असून वाटाघाटीस बोलावले असता २% कमी दराने पुरवठा करण्यास तयार असून त्यास मा.आयुक्त यांची मंजूरी दिनांक तसेच मा.स्थायी समिती सभापती यांचा ठराव क्र.९०, दिनांक १८.८.२००९ अन्वये प्रदान करण्यात आली. निविदाधारकास जा.क्र./मनपा/भांडार/९४, दि.२१.८.२००९ अन्वये पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले. दरम्यान संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) निविदा अटी शर्ती अ.क्र.११ शासन नियमाप्रमाणे पुरवठा धारक मोफतलाल फेब्रीक प्रा.लि. यांचे देयक रक्कम रु.१३८०९४८८.७० रकमेवर २.३% प्रमाणे आयकर टी.डी.एस. रक्कम रु.३१७६१८/- वजावट होणे आवश्यक असतांना वजावट करण्यात आलेली नाही.

२) शालेय गणवेश खरेदी करतांना मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ (२) अन्वये रक्कम रु.१३,०००/- चे बॉन्ड लावणे आवश्यक असतांना बॉण्ड संचिकेत लावलेले नाही व करारनामा केल्याबाबत संचिकेत नाही.

३) साठा रजिस्टर क्रमांक १०९ मध्ये घेतलेल्या नोंदी या अपूर्ण आहेत. रजि.क्र.१०९ मधील पान क्र.२२,२३ वरील वस्तु वितरीत केल्याचे स्टोअर्स लेजरचे पान क्रमांक नमूद केलेले नाही. त्यामुळे साहित्य वितरण झाल्याबाबत ताळमेळ घेता आला नाही. स्टोअर्स लेजर रजिस्टर क्रमांक ११० व रजिस्टर क्र.१११ वस्तूच्या नोंदी बाबतचे रजिस्टर लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

४) शालेय विद्यार्थी गणवेश खरेदी करतांना शिक्षण विभागाकडून वर्गनिहाय हजेरी पत्रकाप्रमाणे विद्यार्थी संख्या आवश्यक असतांना त्याप्रमाणे विद्यार्थी संख्या घेतलेली दिसून येत नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३७: आर्थिक वर्ष २००९-१० मधील स्त्री पुरुष गणवेश खरेदी.**

स्त्री , पुरुष गणवेश खरेदी संचिका तपासणी केली. गणवेश खरेदीसाठी ४ निविदा प्राप्त झाल्या आहे. मे.क्रिश इन्टरनॅशनल, मे.रोषन सेल्स कॉर्पोरेशन यांना कमी दर असल्याने दोघांना पुरवठा आदेश देण्यात आले. खरेदी संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मे.रोषन सेल्स कॉर्पोरेशन यांना पुरवठा आदेश क्रमांक जा.क्र.मनपा/भांडार/२३३, दिनांक २२.२.२०१० अन्वये रक्कम रु.६३७०४८ पुरवठा आदेश देण्यात आला. अ.क्र.५ वरील साहित्याचा पुरवठा करतांना जास्तीची रक्कम अदा करण्यात आली आहे.त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे-

| **अ.क्र.** | **बिल क्र.** | **साहित्याचे नांव** | **संख्या** | **दर** | **दिलेली रक्कम** | **द्यावयाची रक्कम** | **फरक रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ०७५<br>१५.४.१० | गोल्डन ब्राऊन साडी | ६६८ | ४५० | ३०९६०० | ३००६०० | ९०००/- |

जास्तीची अदा रक्कम रु.९०००/- वसूल करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास द्यावा.

२. १०९ साठा रजिस्टर, ११० स्टोअर लेजर १११ ताळमेळ रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

विभागाने संबंधित एजन्सीस जास्तीची अदा केलेल्या रकमेमुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन नुकसानीची रक्कम वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा

**परिच्छेद क्र३८: आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये श्रृंखला नवनिर्माण संस्था संगणक पुरविणे बाबत.**

स्वीकृत स.न.से. श्री.संजय केणेकर यांनी श्रृंखला नवनिर्माण संस्था यांना स्वेच्छा निधीमधून -२ संगणक पुरविणे बाबत रू.५०,०००/- देण्यासाठी पत्र दिले आहे. पुरवठा आदेश जा.क्र. /मनपा / भांडार /१२३९, दिनांक २५.२.२०१० अन्वये मे.भक्ती कॉम्प्युटर यांना पुरवठा करण्याबाबत आदेश देण्यात आले असून १५ दिवसांत पुरवठा करावा असे नमूद करण्यात आले आहे.

याबाबतची संचिका तपासणी करतांना आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. जा.क्र.मनपा/भांडार/१२३९, दिनांक २५.२.२०१० अन्वये मे.भक्ती कॉम्प्युटर यांनी पुरवठा केला असून संगणक संच संख्या १ दर ३४२५८ रक्कम रू. दराप्रमाणे पुरवठा केला आहे. मात्र पुरवठा आदेश १५ दिवसांत करणे आवश्यक असतांना D.C. नंबर १४०, दिनांक ८.११.२०१० रोजी पुरवठा केला आहे. म्हणजे २४० दिवस उशिरा पुरवठा केला आहे.

२. उशिरा पुरवठा केल्यामुळे प्रति आठवडा ०.५% प्रमाणे ३४ आठवडेसाठी रू.१७१ प्रति आठवडे प्रमाणे ५८१४/- दंड रक्कम वसूल करणे आवश्यक असतांना वसूल केलेली नाही.

३. मे.भक्ती कॉम्प्युटर यांना रक्कम रू.३४२५८/- अदा करतांना जकात रक्कम रू.१३१८/- देण्यात आली आहे. मात्र जकात भरणा केल्याबाबतची पावती संबंधिताने संचिकेत जोडणे आवश्यक असतांना जकात पावती संचिकेत नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३९: आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये फाईल कव्हर छपाई बाबत.**

फाईल कव्हर छपाई बाबत - मे.लिबर्टी प्रिन्टर्स यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. संचिका तपासतांना खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या.

१. पुरवठा आदेश जा.क्र.मनपा/भांडार/दिनांक २१.१०.२०१० अन्वये मे.लिबर्टी प्रिन्टर्स यांना, मा.उपायुक्त यांचे मान्यतेनुसार दिनांक २१.१०.२०१० रोजी देण्यात आले असून एकूण १०,००० हजार फाईल कव्हर प्र.हजार रू. २९.९० दराने रक्कम रुपये २९,९००/- आदेश देण्यात आले. परंतू फाईल कव्हर छपाई करतांना इतरही साहित्य जसे - सबमिशन पॅड, अकृषिक चलन, अकृषिक पावती बुक एकूण १६,९७० /- किंमतीचे साहित्य खरेदी केलेले आहे.

२. मे.लिबर्टी प्रिन्टर्स यांना पुरवठा आदेश क्र. मनपा/भांडार /१४८ दिनांक २१.१०.२०१० अन्वये रू.४६,८७०/- चे फाईल कव्हर व इतर साहित्य खरेदीसाठी आदेश देण्यात आले होते. सदर साहित्याचा पुरवठा ७ दिवसांत करावा असे असतांना संबंधिताने टॅक्स इन्व्हाईस क्र.५५९, दिनांक २४.१.२०११ रोजी पुरवठा केल्याचे दिसून येते. म्हणजेच संबंधिताने ८६ दिवस विलंबाने पुरवठा केलेला आहे. निविदा अटी / शर्ती प्रमाणे प्रती आठवडा ०.५% प्रमाणे रक्कम रू.४६,८७०/- १२ आठवडे प्रमाणे रू.२८०८/- इतका विलंब शुल्क न आकारल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. साठा रजिस्टर क्र.१०९ वर साहित्य प्राप्त झाल्याबाबतची नोंद घेतल्याचे दिसून येत नाही.

४. जा.क्र.मनपा/भांडार/२०५/१० दिनांक २९.१.२०१० रोजी मा.उपायुक्त यांची मान्यता दिनांक २८.१.२०१० अन्वये २०,०००/- फाईल कव्हर पुरवठा करणे बाबत मे.लिबर्टी प्रिन्टर्स यांना रू.५९,८००/- आदेश देण्यात आलेले असून, साहित्य पुरवठा करतांना टॅक्स इन्व्हाईस क्र.६४१ दिनांक १५.६.२०१० रोजी पुरवठा केल्याचे दिसून येते. म्हणजेच संबंधिताने १२८ दिवस विलंबाने पुरवठा केलेला आहे. निविदा अटी / शर्ती प्रमाणे ०.५% प्रती आठवडा विलंब प्रमाणे ५९,८००/- = २९९X१८=५३८२/- रुपये विलंब शुल्क वसूल न केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेंद क्र.४०: जिम्नॅशियम हॉल फर्निचर खरेदी बाबत.**

सिडको एन-११ एस.बी.ओ.शाळेमागील जिम्नॅशियम हॉलसाठी फर्निचर खरेदी करीता निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या मे.अभय ट्रेडर्स यांचे दर इतरापेक्षा कमी असल्याने त्यांस मंजूरी देण्यात आली व जा.क्र.मनपा/भांडार/२०१०, दिनांक ३०.१.२०१० नुसार पुरवठा आदेश देण्यात आले. त्यानुसार संचिका तपासणीअंती खालील त्रुटी आढळून आल्या.

१. संचिकेमध्ये जिम्नॅशियम हॉलसाठी फर्निचर खरेदी करीता वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दीसाठी शासन निर्णय २ जानेवारी १९९२ मधील परि.क्र.८.३ अन्वये जाहिर निविदेचा कालावधी कमीत कमी तीन आठवडे देणे आवश्यक आहे. तथापि तपासणीअंती असे दिसून आले आहे की, दैनिक वर्तमान पत्रामध्ये निविदा विक्रीकरीता दिनांक २३.१२.२००९ ते दिनांक २९.१२.२००९ असा एकाच आठवड्याचा कालावधी देण्यात आला आहे. ही बाब योग्य नाही.

२. जिम्नॅशियम हॉलसाठी फर्निचर खरेदी करीता निविदा दरपत्रकाच्या अटी व शर्तीनुसार अनामत रक्कम रू.२०,०००/- रोख भरल्याची पावती किंवा मुख्य लेखाधिकारी यांचे नावे स्थानिक शाखेवर देय असलेला धनाकर्ष जमा करुन त्याची पावती सोबत जोडणे आवश्यक होते. मात्र तसे संचिकेत दिसून येत नाही.

३. संचिकेतील निविदा दर पत्रकातील अटी व शर्तीनुसार विक्रीकर व्हॅट कर अद्यावत भरल्याच्या पत्राची सांक्षांकित केलेली छायांकित प्रत संस्थेची अद्यावत नोंदणी दाखल्याची (शॉप ॲक्ट) सांक्षांकित छायांकित प्रत, व्यवसायकर अद्यावत भरल्याची पत्रांची साक्षांकित केलेली छायांकित प्रत, निविदाधारक ज्या उत्पादकाचा अधिकृत विक्रेता आहे त्या उत्पादकाच्या लेटर पॅडवर या निविदेसाठी प्राधिकृत केल्याबाबतचे पत्र जोडणे आवश्यक असतांना पूर्तता केलेली आहे किंवा नाही त्याबाबत खुलासा व्हावा.

४. सिडको एन-११ एस.बी.ओ.शाळेमागील मनपाचे क्रिडा संकुल येथे जिम्नॅशियम हॉलसाठी फर्निचर खरेदी रक्कम रू.१०,९६,७००/- इतक्या खर्चास मा.स्थायी समिती सभापती यांची मंजूरी घेतलेली नाही.

५. संचिकेतील पृष्ठ क्र.११ व १२, परिच्छेद क्र.१०२, १०३ नुसार हॉलसाठी फर्निचर रबर मॅट बसविण्यासाठी एकूण तरतूद ५,००,०००/- ठेवण्यात आली होती. परंतू उपअभियंता बांधकाम

उद्यान यांच्या अभिप्रायानुसार एकूण खर्च रक्कम रु. १०,१२,८७०/- एवढा केला आहे. म्हणजेच वाढीव खर्च रु.५,१२,८७०/- एवढा झालेला आहे. सदर अतिरिक्त खर्चास मा.आयुक्तांची मंजूरी घेणे आवश्यक असतांना मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही.

६. जिम्नॅशियम हॉलसाठी फर्निचर साहित्य खरेदी विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधितविरुध्द दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही. अशा विलंबाने प्राप्त झालेल्या साहित्याचा विवरण तक्ता पुढील प्रमाणे -

७. जिम्नॅशियम हॉल फर्निचर पुरवठा करतांना अटी व शर्तीनुसार प्राप्त झाल्याबाबत डिलेव्हरी चालन संचिकेत दिसून आला नाही.

८. साठा रजिस्टर क्रमांक १०९ मधील पान क्र.४२, ७४ वरील वस्तु वितरीत केल्याचे स्टोअर्स लेजरचे पान क्रमांक नमूद केलेले नाही. त्यामुळे साहित्य वितरण झाल्याबाबत ताळमेळ घेता आला नाही. स्टोअर्स लेजर रजिस्टर क्रमांक ११० व रजिस्टर क्र.१११ वस्तुच्या नोंदीबाबतचे रजिस्टर लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्र. व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | विलंब दंड | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.अभय ट्रेडर्स | २१२<br>३०.१.२०१३ | १५ | ९,८२,४८३/- | ३८ | २४५६०/- | १०९/४२<br>२३.३.२०१० |
| २ | मे.अभय ट्रेडर्स | २१२<br>३०.१.२०१३ | १५ | १,१४,२१७/- | ४७ | ३९९७/- | १०९/७४<br>३१.३.२०१० |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४१: जिम्नॅशियन हॉल साहित्याचा पुरवठा करणे बाबत.**

सिडको एन-११ एस.बी. ओ.शाळेमागील जिम्नॅशियम हॉलसाठी जिम्नॅशियम साहित्य खरेदीबाबत अर्थसंकल्प सन २००९-२०१० अंतर्गत तरतूद करण्यात आली. जिम्नॅशियम हॉलसाठी साहित्य खरेदी करीता निविदा मागविण्यात आल्या. एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. मे. अभय ट्रेडर्स यांचे दर इतरांपेक्षा कमी असल्याने त्यास मंजूरी देण्यात आली व जा.क्र.मनपा/भांडार/२०१०/२१३, दिनांक ३०.१.२०१० नुसार पुरवठा आदेश देण्यात आले. त्यानुसार संचिका तपासणी केली असता खालील त्रुटी आढळून आल्या.

१. संचिकेमध्ये जिम्नॅशियम हॉलसाठी साहित्य खरेदी करीता वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दीसाठी शासन निर्णय २ जानेवारी १९९२ मधील परि.क्र.८.३ अन्वये जाहिर निविदेचा कालावधी कमीत कमी तीन आठवडे देणे आवश्यक आहे. तथापि तपासणीअंती असे दिसून आले आहे की, दैनिक वर्तमान पत्रामध्ये निविदा विक्रीकरीता दिनांक २३.१२.२००९ ते दिनांक २९.१२.२००९ असा एकाच आठवड्याचा कालावधी देण्यात आला आहे. ही बाब योग्य नाही.

२. जिम्नॅशियम हॉल साहित्य खरेदी करीता निविदा दरपत्रक अटी व शर्तीनुसार अनामत रक्कम रुपये २०,०००/- रोख भरल्याची पावती किंवा मुख्य लेखाधिकारी यांचे नांवे स्थानिक शाखेवर देय असलेला धनाकर्ष जमा करुन त्यांची पावती सोबत जोडलेली नाही व संचिकेत परिच्छेद क्र.८४ ,८५ नुसार परत दिल्याबाबत नोंद आहे. ही बाब योग्य नाही.

३. संचिकेतील निविदा दर पत्रकातील अटी व शर्ती नुसार विक्रीकर व्हॅट कर अद्यावत भरल्याच्या पत्राची सांक्षांकित केलेली छायांकित प्रत, संस्थेची अद्यावत नोंदणी दाखल्याची (शॉप ॲक्ट) साक्षांकित छायांकित प्रत व्यवसाय कर अद्यावत भरल्याची पत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत, निविदा धारक हा ज्या उत्पादकाचा अधिकृत विक्रेता आहे. त्या उत्पादकाच्या लेटर पॅडवर या निविदेसाठी प्राधिकृत केल्याबाबतचे पत्र जोडणे आवश्यक होते. परंतू तपासणीअंती कागदपत्रे दिसून आले नाही.

४. संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-८ वरील परिच्छेद क्र.२९ मध्ये मनपा क्रिडा अधिकारी यांचा संयुक्तिक अभिप्राय घेवूनच या प्रस्तावाप्रमाणे पुढील कार्यवाही करणे योग्य राहील असे लिहिलेले असतांना अभिप्राय घेतल्याचे दिसून येत नाही.

५. सिडको एन-११ एस.बी.ओ.शाळेमागील मनपाचे क्रिडा संकुल येथे जिम्नॅशियम साहित्य खरेदी रक्कम रु.९,९१,९०८/- इतक्या खर्चास मा.स्थायी समिती सभापती यांची मंजूरी घेतलेली नाही.

६. मे.अभय ट्रेडर्स यांनी साहित्य पुरवठा केल्याचे डिलेव्हरी चालन संचिकेत दिसून आलेले नाही.

७. संचिकेतील मे.अभय ट्रेडर्स यास पुरवठा आदेश देण्यात आले, त्यास साहित्य पुरवठा करण्यासाठी १५ दिवस कालावधी देण्यात आला होता. संबंधित एजन्सीने पुरवठा कालावधी संपल्यानंतर ३८ दिवस उशिरा दिनांक २३.३.२०१० रोजी पुरवठा केल्याचे स्टॉक बुक क्र.१०९ पान क्र.४३ नोंदीवरुन स्पष्ट होते. रक्कम रु.९,६२,१५०/- किंमतीचे साहित्य पुरवठा संबंधित एजन्सीचे केल्यामुळे पाच (५) आठवड्याचा विलंब रुपये २४०५५/- होते. म्हणजेच विलंब रक्कम रु.२४०५५/- त्यांच्या देयकातून कपात न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

८. साठा रजिस्टर क्रमांक १०९ मधील पान क्र.४३ वरील वस्तु वितरीत केल्याचे स्टोअर्स लेजरचे पान क्रमांक नमूद केलेले नाही. त्यामुळे साहित्य वितरण झाल्याबाबत ताळमेळ घेता आला नाही. स्टोअर्स लेजर रजिस्टर क्रमांक ११० व रजिस्टर क्र.१११ वस्तुच्या नोंदीबाबतचे रजिस्टर लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४२: आर्थिक वर्ष २०१०-११ मधील स्वच्छता साहित्य खरेदी बाबत.**

आर्थिक वर्ष २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य खरेदी करण्यासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात आली. त्यानुषंगाने एकूण ०४ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी कमी दर असलेले निविदाधारक मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांना पुरवठा आदेश क्र.१८६, दिनांक २२.११.२०१०, रक्कम रु. ३२,०००/-, मे.इन्शा ट्रेडिंग कंपनी पुरवठा आदेश क्र.१८५, दिनांक २२.११.२०१० रक्कम

रू.१३,४२,७४५/- , मे.न्यू भारत स्टोअर्स पुरवठा आदेश क्र. १८७ दिनांक २२.११.२०१० रक्कम रू.८,९००/- प्रमाणे तीन निविदाधारकांना मा.आयुक्त यांची मंजूरी दिनांक ११.१.२०१० तसेच मा.स्थायी समिती सभापती यांनी ठराव क्र.६४ नुसार प्रस्तावित केलेल्या ठरावास मंजूरी प्रदान करुन पुरवठा आदेश देण्यात आले. दरम्यान संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. स्वच्छता साहित्य खरेदी करतांना करारनामा केलेला संचिकेत दिसून आला नाही.

२. माल प्राप्त झाल्याबाबत D.C. संचिकेत नाही.

३. मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांना जा.क्र.मनपा/भांडार/१८६, दिनांक २२.११.२०१० रोजी रक्कम रू.३,२००/- चे साहित्य पुरवठा करण्याबाबत आदेशित करण्यात आले असून संबंधिताने दिनांक ३१.३.२०११ रोजी मालाचा पुरवठा केला आहे. म्हणजेच संबंधिताने ९८ दिवस उशिरा पुरवठा केला आहे. निविदा अटी व शर्ती नियम ११ प्रमाणे एकूण रकमेवर प्रति आठवडा ०.५% प्रमाणे १६० प्रति आठवडे प्रमाणे १४ आठवडे उशिरा पुरवठा केल्यामुळे रक्कम रू.२,२४०/- दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

४. मे.न्यू भारत स्टोअर्स यांना जा.क्र.मनपा/भांडार/१८७, दिनांक २२.११.२०१० रोजी रक्कम रू.८,९००/- चे साहित्य पुरवठा करण्याबाबत आदेशित करण्यात आले असता संबंधिताने दिनांक ३१.३.२०११ रोजी मालाचा पुरवठा केला आहे. म्हणजेच ९८ दिवस उशिरा पुरवठा केल्यामुळे रक्कम रू.४५ प्रति आठवडे प्रमाणे १४ आठवडे उशिरा पुरवठा केल्यामुळे रक्कम रू.६३०/- दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

५. मे.इन्शा ट्रेडिंग कंपनी यांना जा.क्र.मनपा/भांडार/१८५, दिनांक २२.११.२०१० रोजी रक्कम रू.१३,४२,७४५/- साहित्य पुरवठा करण्यास्तव आदेश दिले आहेत. मालाचा पुरवठा दिनांक ३१.३.२०११ रोजी केला असून संबंधिताने ९८ दिवस विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदा अटी व शर्ती नियम ११ प्रमाणे ०.५% प्रति आठवडा प्रमाणे १४ आठवडे विलंबाने पुरवठा केल्यामुळे प्रति आठवडा ६,७१४/- प्रमाणे ९३,९९६/- रू.दंड वसूल करणे आवश्यक असतांना वसूल केलेला नाही.

६. आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये स्वच्छता साहित्य खरेदी करण्यात आली. परंतू साहित्याचा पुरवठा हा आर्थिक वर्ष संपल्यानंतर करण्यात आला आहे.

७. करारनामा करतांना रक्कम रू.५००/- चे बॉण्ड लावणे आवश्यक आहे.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४३: सन २०१०-२०११ मधील पाणीपट्टी वसूली देयक छपाई बाबत.**

सन २०१०-२०११ या वर्षाकरीता महानगरपालिका सर्व वॉर्ड कार्यालयासाठी पाणीपट्टी वसूलीसाठी मागील वर्षाप्रमाणे विहित नमुन्यातील देयकाची छपाई दोन प्रतीत त्वरीत करून देण्याकरीता सदर साहित्याचे दरपत्रक मागविण्यात आले असता ०३ दरपत्रके प्राप्त झाली. सर्वात कमी दराची मे. न्यू भारत स्टोअर्स यांचे दर प्राप्त झाले. वाटाघाटीअंती ६% दर कमी करून मा.उपायुक्त (म), यांची मंजूरी दिनांक १६.९.२०१० रोजी देवून त्यास पुरवठा आदेश देण्यात आले. संचिका तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. पाणीपट्टी वसूलीचे देयक छपाई बाबत करनिर्धारक व संकलक मनपा यांनी जा.क्र.मनपा/कनिवसं/१८०/२०१०, दिनांक १५.५.२०१० अन्वये पत्र देवून पाणीपट्टी वसूली विहित नमुन्यातील वॉर्ड कार्यालयाचे मागणी नुसार वितरीत करावी.

२. पुरवठा आदेश क्र.१२८ दिनांक २८.९.२०१० न्यू भारत स्टोअर्स औरंगाबाद यांना २५,०००/- नगचा पुरवठा आदेश दिला. परिच्छेद क्र.२५ नुसार देयक ४४,६५०/- अदा केले. परिच्छेद क्र.२७ ते ३३ नुसार आणखी २५,०००/- देयक छपाई करण्यात आली. याबाबत संचिकेमध्ये कोणत्याही वॉर्ड अधिकारी यांनी मागणी केल्याचे दिसून आले नाही व छपाईसाठी पुरवठा आदेश दिले नाही. रक्कम रू.४४६५०/- बील क्र.१५२० प्रमाणे देयक अदा केले.

३. परिच्छेद क्र.४० ते ४८ नुसार आणखी २५,०००/- देयके छपाई करण्यात आली. संचिके मध्ये वॉर्ड अधिकारी यांनी मागणी न करता पाणीपट्टी देयकाची छपाई केली या छपाईसाठी कोणताही पुरवठा आदेश न देता बील क्र. १५३५ दिनांक ८.११.२०१० प्रमाणे रक्कम रूपये ४४,६५०/- न्यू भारत स्टोअर यांना अदा केल्याचे दिसून येते. पाणीपट्टी वसूली देयकाची छपाई एकूण ७५००० करण्यात आली. छपाई बील कोणत्याही वॉर्ड मध्ये दिल्याचा उल्लेख नाही व वितरण रजिस्टर उपलब्ध करुन दिले नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून, प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४४: प्रशासकीय विभागास फोटो कॅमेरा व फोटो प्रिन्टर देणेबाबत.**

प्रशासकीय विभागास फोटो कॅमेरा व फोटो प्रिन्टर देणे बाबत रक्कम रू.५०,०००/- अग्रीम भांडार लेखापाल यांचे नावाने व्हाउचर क्र.१३२८१ चेक क्र.१०१३८८ दिनांक ९.२.२०११ रोजी घेण्यात आला आहे. त्यास मा.आयुक्त यांची दिनांक ४.२.२०११ रोजी मंजूरी दिली आहे. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. प्रशासकीय विभागाला फोटो कॅमेरा देण्यासाठी रक्कम रू.५०,०००/- अग्रीम भांडार लेखापाल यांचे नावे आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये दिनांक ९.२.२०११ रोजी घेण्यात आले. फोटो कॅमेरा सोनी (sony cybershot camera) model No.DSC. S३००० एकूण ८ नग रक्कम रू.३५९२०/- बील क्रमांक ७००५ दिनांक १५.९.२०११ रोजी खरेदी करण्यात आले म्हणजेच सात महिने रक्कम रू.५०,०००/- भांडार लेखापाल यांच्या जवळ होती.

२. फोटो कॅमेरा प्रशासकीय विभागास वितरीत केल्याचे वितरण रजिस्टर लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून द्यावी असे सूचित केले असता विभागाने लेखापरीक्षणा दरम्यान माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

विभागाने संबंधितांविरूध्द प्रशासकीय कार्यवाही करून पुढील लेखापरीक्षणापूर्वी माहिती उपलब्ध करुन द्यावी व अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४५: आर्थिक वर्ष २०१०-११ महानगरपालिका शालेय विद्यार्थी रेक्झीन व कॅनवॉस शुज खरेदी.**

सन २०१०-११ या वर्षाकरीता महानगरपालिका शालेय विद्यार्थी रेक्झीन व कॅनवॉस शुज खरेदीकरीता वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी करण्यात आली असता ०३ निविदा प्राप्त झाल्या मे.क्रिष इन्टरनॅशनल यांचे दर कमी असल्याने मा.आयुक्त व मा.स्थायी समिती सभापती, यांनी मंजूरी

दिल्यानंतर करारनामा करून संबंधित निविदाधारकास पुरवठा आदेश देण्यात आले. संचिका तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

महानगरपालिका शालेय विद्यार्थी शुज खरेदी करतांना पृष्ठ क्रमांक ६ परिच्छेद क्रमांक ३० अन्वये सॅम्पल तपासणीसाठी मे.विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजी लॅब माटुंगा मुंबई येथे कार्यालयीन पत्र क्रमांक ५९ दिनांक २३.७.२०१० अन्वये नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले. त्यास प्रयोग शाळा तपासणी शुल्कचे देयक क्र.५०० नुसार रक्कम रू.३४१०५/- उपआयुक्त (महसूल) यांचे मंजूरीनुसार पृष्ठ क्रमांक ७ परिच्छेद क्रमांक ३६ वर नमूद करण्यात आले आहे. मात्र पृष्ठ क्रमांक ७ परिच्छेद क्रमांक ३८ अन्वये प्रयोग शाळेचे पत्र क्रमांक ३६१८ दिनांक ०६.०८.२०१० नुसार त्यांचेकडील शुज तपासणी यंत्र बंद पडल्यामुळे तपासणी करुन देता येणार नाही असे कळवून साहित्याचे नमुने परत पाठविले आहे . परंतू त्यांना नमुने तपासणीसाठी अदा केलेली रक्कम रू.३४१०५/- महानगरपालिकेस प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले असून विभागाने अनुपालन अहवाल सादर केलेला नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून, त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत संबंधितांकडून रक्कम वसूल करून महानगरपालिका फंडात जमा करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४६: लेखन ड्रॉईंग व संगणक साहित्य पुरवठा खरेदी करणे बाबत.**

आर्थिक वर्ष २०१०-११ या वर्षाकरीता लेखन, ड्रॉईंग व संगणक साहित्य पुरवठा करण्याकरीता वर्तमान पत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आल्यानुसार एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या, दिनांक ८.१०.२०१० रोजी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.उपआयुक्त (म) व आस्थापना अधिकारी -१ यांचे समक्ष उघडण्यात आल्या साहित्य खरेदीतील एकूण ९५ आयटमपैकी मे.विजय जनरल स्टोअर्स -२८ मे.न्यू भारत स्टोअर्स २६, मे.स्टलिंग कॉम्प्युटर्स ॲन्ड एज्युकेशन ॲण्ड सेल्स ॲण्ड सर्व्हिस -०७ मे.अभय ट्रेडर्स ६, मे.ओ.के.ट्रेडर्स -४५ त्यानुसार सध्या आवश्यक असलेले -७९ आयटम खरेदी करण्यासाठी एकूण १९,४२,५४०/- एवढा खर्च आलेला आहे. एकूण ९५ आयटमचे प्राप्त दरास आणि प्रस्तावित खर्चास केंद्रीय खरेदी समितीने शिफारस केली आहे. संचिकेतील परिच्छेद क्रमांक २१ ,२२, २३ नुसार मा.स्थायी समितीने ठराव क्र.६५ नुसार व मा.आयुक्त यांनी मंजूरी देण्यात आली. त्याप्रमाणे तपासणी दरम्यान खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेमध्ये लेखन, ड्रॉईंग व संगणक साहित्य खरेदी करीता वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दीसाठी शासन निर्णय २ जानेवारी १९९२ मधील परि.क्र.८३ अन्वये जाहिर निविदेचा कालावधी कमीत कमी तीन आठवडे देणे आवश्यक आहे. तथापि तपासणीअंती असे दिसून आले की, दैनिक वर्तमान पत्रामध्ये निविदा विक्रीकरीता दिनांक २९.९.२०१० ते दिनांक ५.१०.२०१० असा एकाच आठवड्याचा कालावधी देण्यात आला आहे. ही बाब योग्य नाही.

२. लेखन, ड्रॉईंग व संगणक साहित्य खरेदी निविदा दरपत्रक अटी व शर्तीनुसार अनामत रक्कम रूपये ३०,०००/- चा मुख्य लेखाधिकारी यांचे नांवे धनाकर्ष जमा केल्याबाबतची पावती सोबत जोडलेली नसतांना संचिकेतील परिच्छेद क्र.६५ ,७५, ७८,८१ नुसार अनामत रक्कम परत दिल्याबाबत नोंद आहे. ही बाब योग्य नाही.

३. लेखन साहित्य, ड्रॉईंग, संगणक साहित्य खरेदी करतांना मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ कलम ३४(२) अन्वये रक्कम रू.११००/- चे मुद्रांक लावणे आवश्यक असतांना संचिकेत मुद्रांक लावलेले नाही.

४. संचिकेतील ओ.के.ट्रेडर्स यांचे देयक क्र.९१ अ.क्र.१३ मध्ये खरेदी साहित्य उपलब्ध करुन दिले नसतांना व देयकामध्ये अ.क्र.१३ चे आपल्या स्तरावर रक्कम रु.२२००/- जास्तीचे अदा करण्यात आले आहे.

५. लेखन, ड्राईंग व संगणक साहित्य पुरवठा करतांना अटी व शर्तीनुसार प्राप्त झाल्याबाबत डिलेवरी चालन संचिकेत दिसून आला नाही.

६. लेखन, ड्रॉईंग व संगणक साहित्य खरेदी विलंबाने पुरवठा केल्यामुळे निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधिताविरुध्द दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. अशा विलंबाने प्राप्त झालेल्या साहित्याचा विवरण तक्ता पुढील प्रमाणे. तरी विभागाने दंडात्मक कारवाई करुन वसूलीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

७. साठा रजिस्टर क्रमांक १०९ मधील पान क्र. ६१,६८,६९,६६,७७,७६,०३,२२ वरील वस्तु वितरीत केल्याचे स्टोअर्स लेजरचे पान क्रमांक नमुद केलेले नाही. त्यामुळे साहित्य वितरण झाल्याबाबत ताळमेळ घेता आला नाही. स्टोअर्स लेजर रजिस्टर क्रमांक ११० व रजिस्टर क्र.१११ वस्तुच्या नोंदीबाबतचे रजिस्टर लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्र. व दिनांक | पुरवठा कालावधी (दिवस) | साहित्याची रक्कम | विलंब कालावधी (दिवस) | विलंब दंड | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मे.ओके ट्रेडर्स | २१० १.१२.२०१० | ३० | ३९,५००/- | ८३ | २३७६/- | १०९/६८,६९ २२.३.२०११ |
| २ | मे.ओके ट्रेडर्स | १९३ २२.११.२०१० | ३० | ४,७५,६००/- | ९० | ३०,९१४/- | १०९/६८,६९ २२.३.२०११ |
| ३ | मे. विजय जनरल स्टोअर्स | १९१ २२.११.२०१० | ३० | ४,४०,७००/- | ९० | २८,६५२/- | १०९/६८,६९ २२.३.२०११ |
| ४ | मे.न्यु भारत स्टोअर्स | १८९ २२.११.२०१० | ३० | ५,२६,०८५/- | ९९ | ३६,८२०/- | १०९/७६ ३१.३.२०११ |
| ५ | मे.स्टरलिंग कॉम्प्युटर ॲण्ड एज्युकेशनसाठी सेल्स & सर्व्हिस | १९२ २२.११.२०१० | ३० | ३,७७,५५५/- | ९९ | २६,४३२/- | १०९/७७ ३१.३.२०११ |
| ६ | मे.अभय ट्रेडर्स | १९० २२.११.२०१० | ३० | ६,९००/- | १३५ | ६६५/- | ०३/१०९ ६.५.२०११ |

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४७: आर्थिक वर्ष २०१०-११ मधील जंतुनाशक पावडर खरेदी बाबत.**

भांडार विभागाने जा.क्र.मनपा/भांडार/५६, दिनांक २१.०७.२०१० रोजी निविदा सूचना प्रसिध्द करुन कार्बोलिक पावडर व काळे फिनेल खरेदीस्तव द्विपाकीट पध्दतीने अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांच्याकडून निविदा मागविण्यात आल्या. दिनांक २२.७.२०१० ते २६.७.२०१० या कालावधीत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी कार्बोलिक पावडर खरेदीसाठी O.K. ट्रेडर्स यांना व काळे

फिनेल खरेदीसाठी इन्शा ट्रेडिंग कंपनी, रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांना आदेश देण्यात आले. त्यासाठी एकूण खर्च रक्कम रु.९.०० लाख आहे. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. जा.क्र.मनपा/भांडार/११९, दिनांक २४.९.२०१० रोजी काळे फिनेल ५००० Lit खरेदी करण्यासाठी मे.इन्शा ट्रेडिंग कंपनी यांना आदेश देवून रक्कम रु.३७.८० प्रतिलिटर प्रमाणे एकूण रक्कम रु.१,८९,०००/- चे काळे फिनेल खरेदी केले असता संबंधिताने १५ दिवसांत पुरवठा करणे आवश्यक असता संबंधिताने ११५ दिवस उशिरा मालाचा पुरवठा केला आहे. अटी शर्ती अ.क्र.१३ अन्वये दंड रक्कम म्हणून ०.५% प्रमाणे प्रति आठवडा एकूण रकमेवर ९४५/- प्रति आठवड्याप्रमाणे १६ आठवड्यासाठी रक्कम रु.१५,१२०/- दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

२. जा.क्र.मनपा/भांडार/१२१, दिनांक २४.९.२०१० रोजी काळे फिनेल ५००० Lit खरेदी करण्यासाठी मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांना आदेश देवून रक्कम रु.३७.८० प्रति लिटर प्रमाणे एकूण रक्कम रु.१,८९,०००/- चे फिनेल खरेदी केले असता संबंधिताने १५ दिवसांत पुरवठा करणे आवश्यक असतांना संबंधिताने ११९ दिवस उशिरा मालाचा पुरवठा केला आहे. अटी शर्ती अ.क्र.१३ अन्वये दंड रक्कम म्हणून ०.५% प्रमाणे प्रति आठवडा एकूण रकमेवर ९४५/- प्रति आठवड्याप्रमाणे १७ आठवड्यासाठी रक्कम रु.१६,०६५/- दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

३. जा.क्र.मनपा/भांडार/१२०, दिनांक २४.९.२०१० रोजी कॉर्बोलिक पावडर २०,०००/- कि.ग्रॅ. खरेदी करण्यासाठी मे.ओके ट्रेडर्स यांना आदेश देवून रक्कम रु.२२.२२ प्रति कि.ग्रॅ. प्रमाणे एकूण रक्कम रु.४,४४,४००/- चे कॉर्बोलिक पावडर खरेदी केले असता १५ दिवसांत पुरवठा करणे आवश्यक असतांना संबंधिताने १५ दिवस उशिरा मालाचा पुरवठा केला आहे. अटी शर्ती अ.क्र.१३ अन्वये दंड रक्कम ०.५% प्रमाणे प्रति आठवडा एकूण रकमेवर २,२२२/- प्रति आठवड्याप्रमाणे २ आठवड्यासाठी रक्कम रु.४,४४४/- दंड वसूल करणे आवश्यक असतांना दंड वसूल केलेला नाही.

४. पुरवठाधारकाने मालाचा पुरवठा करतांना पोच घेणे आवश्यक असतांना पोच घेतलेली दिसत नाही.

५. रजिस्टर नमुना ११० (वितरण रजिस्टर) मध्ये पुरवठा मालाची नोंद अपूर्ण असल्यामुळे वितरण रजिस्टर तपासता आले नाही.

विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन, त्याचप्रमाणे विलंबाने पुरवठा झालेल्या साहित्याबाबत संबंधित एजन्सीकडून विलंब शुल्क वसूल करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

परिच्छेद क्र.४८: **सन २००६-२००७ ते सन २०११-१२ या सहकार एजन्सीज जकात अभिकर्ता यांचे वसूली कार्यकाळातील सी पुस्तक, रहदारी पुस्तक, करारपत्रक पुस्तक व इतर साहित्य पुरविण्या बाबतच्या खर्चाची माहिती पुस्तके उपलब्ध करून देणे बाबत.**

भांडार विभागाचे सन २००३-०४ ते सन २०११-१२ या कालावधीच्या लेखापरीक्षणा अंतर्गत सन २००६-०७ ते सन २०११-१२ या कार्यकाळात जकात वसूलीचा ठेका सहकार एजन्सीज जकात अभिकर्ता यांना देण्यात आला होता.

त्या अनुषंगाने सी पुस्तक, रहदारी पुस्तक, करारपत्रक पुस्तक, अनामत पुस्तक व इतर छपाई साहित्य पुरविण्यात आलेले आहे. संचिकेतील करारनाम्याच्या अट क्र.६ नुसार छपाई साहित्याचा संपूर्ण

खर्च सहाकार एजन्सीने करणे आवश्यक होते मात्र सदरचा खर्च हा मनपा अंतर्गत भांडार विभागामार्फत केल्याचे संचिकेच्या तपासणीअंती दिसून आले असून त्याचा संपूर्ण तपशिल खालील प्रमाणे आहे.

## सन २००५-२००६

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश / दिनांक | साहित्याचे नांव | बील क्र. | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | लिबर्टी प्रिन्टर्स | १६३<br>१८.८.२००५ | करारपत्रक | ८९७<br>२५.१०.२००५ | १२,९५०/- | १०९/५७<br>२६.१०.२००५ |
| २ | राका प्रिन्टर्स | | जिन्सवार | १०८<br>०९.०१.२००६ | ३२६०० | |
| ३ | श्री गणेश प्रिन्टींग प्रेस | | जकात पावती पुस्तक,<br>रहदारी पावती पुस्तक,<br>अनामत पावती पुस्तक, भाडे वसूली पुस्तक,<br>गेट पास स्लिप | ३८<br>१२.५.२००६ | ३०२५२<br>३९०२०<br>४८४८<br>२०१६<br>१४४० | |
| ४ | श्री गणेश प्रिन्टींग प्रेस | | जकात पावती,<br>मार्गस्थ दाखला,<br>अनामत पावती,<br>सेन्ट्रल गोडाऊन भाडे वसूली | ४१<br>०३.७.२००६ | २५२१०<br>१९५१०<br>१२१२<br>१४४ | |
| ५ | विशाल इन्टरप्राईजेस | | जकात सी बुक,<br>जकात मार्गस्थ दाखला,<br>अनामत पावती. | ४०६<br>२८.९.२००६ | ८०६७२<br>६२४३२<br>१२१२० | १०९/६८<br>१८.११.०६ |
| ६ | श्री गणेश प्रिन्टींग प्रेस | | जकात पावती पुस्तक,<br>मार्गस्थ दाखला,<br>अनामत पावती ,<br>सेन्ट्रल गोडाऊन भाडे पावती<br>करारपत्रक पुस्तके,<br>फॉर्म नं.३७,<br>गेटपास स्लीप. | ४३<br>२३.३.२००७ | २०१६८<br>१९५१०<br>१२१२<br>१४४<br>१२९५०<br>१०२००<br>२०६० | |
| | | | | एकूण रक्कम | ३,९०,६७०/- | |

## सन २००६-२००७

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश / दिनांक | साहित्याचे नांव | बील क्र. | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | जयभारती बुक मॅन्यु कं. | १४६<br>७.१०.२००६ | जकात पावती पुस्तक,<br>गेट पास बुक<br>दैनंदिन जकात वसूली पुस्तक | २७<br>३.११.२००६ | ८४३३०<br>१७००<br>१३०० | |
| २ | अभय ट्रेडर्स | १४८<br>७.१०.२००६ | अनामत पावती पुस्तक,<br>अनामत रजिस्टर<br>नाका तपासणी रजिस्टर<br>नाका तपासणी रजिस्टर | ७२<br>४.१.२००७ | ३९६८<br>१२७०<br>१२५०<br>१५६७ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | लिबर्टी प्रिन्टर्स | १४७<br>७.१०.२००६ | रहदारी बुक<br>फॉर्म -३७<br>करारपत्रक | १००८<br>२८.२.२००७ | ५७६००<br>३३९०<br>७४७० | |
| ४ | अभय ट्रेडर्स | १००<br>३०.३.२००७ | अनामत पावती पुस्तक,<br>जकात कर सूची ओ<br>जकात स्थाई आदेश<br>जकात नियम पुस्तिका (म)<br>जकात नियम पुस्तिका (इ) | १००<br>३० | १३२३०<br>१३४०<br>२४९०<br>११९४<br>११९६ | देयक उपलब्ध नाही<br>बिल नाही. |
| ५ | लिबर्टी प्रिन्टर्स | ८५<br>२६.३.२००७ | करारपत्रक पुस्तके<br>मार्गस्थ दाखला | | १२४५०<br>२३०४० | |
| ६ | जयभारती मॅन्थु कंपनी | ८९<br>२६.३.२००७ | जकात पावती पुस्तक | ५८<br>१८.८.२००७ | १,४०,५५० | १०९/१५६<br>२४.९.२००७ |
| ७ | अभय ट्रेडर्स | १४८<br>७.१०.२००६ | जकात रिचेकींग रजिस्टर<br>गेटपास स्लिप<br>फॉर्म - A<br>कॅश रजिस्टर<br>जकात दर सूची<br>जकातस्थायी आदेश पुस्तिका<br>जकात नियम पुस्तिका (म)<br>जकात नियम पुस्तिका (इ) | | १५६६<br>३४८६<br>५६६<br>१२६५<br>६७०<br>८३०<br>५९७<br>५९८ | |
| | | | | **एकूण रक्कम** | ३,६८,९१३/- | |

## सन २००७-२००८

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश / दिनांक | साहित्याचे नांव | बील क्र. | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | लिबर्टी प्रिन्टर्स | ३४१<br>२५.१.२००८ | रहदारी पास<br>अनामत पुस्तक | ५५७<br>३०.३.२००८ | **६९०५०**<br>**१५०००** | **१०९/१२२**<br>**३०.३.२००८**<br>**५५२८०० चे आदेश देण्यातआले परंतू पुरवठा केलेला नाही.** |
| २ | जयभारती मॅन्यु कं. | ३३८<br>२५.१.२००८ | गेटपास बुक<br>जकात दरसूची (ओ)<br>जकात नियम पुस्तिका (म)<br>जकात नियम पुस्तिका (इ) | १३९<br>२३.४.२००८ | ९६२०<br>४०७५<br>३०००<br>३००० | |
| ३ | लिबर्टी प्रिन्टर्स | ५३१<br>१५.९.२००८ | मार्गस्थ दाखला | ५३१ | २५८७० | |
| | | | | एकूण रक्कम | १,२९,६१५/- | |

## २००८-२००९

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश / दिनांक | साहित्याचे नांव | बील क्र. | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | अभय ट्रेडर्स | १६५<br>२६.११.२००८ | मार्गस्थ दाखला<br>करारपत्रक पुस्तक | ७५<br>२०.२.२००९ | ४१८००<br>५४८० | |
| २ | लिबर्टी प्रिन्टर्स | १६६<br>२६.११.२००८ | अनामत बुक | ७८<br>२०.२.२००९ | १६९०० | |
| ३ | लिबर्टी प्रिन्टर्स | -- | अनामत बुक | ५४१<br>३.११.२००८ | १६९०० | |
| ४ | अभय ट्रेडर्स | -- | करारपत्रके<br>मार्गस्थ दाखला | ८६<br>२०.७.२००९ | २९४८९<br>२६५४३ | |
| ५ | लिबर्टी प्रिन्टर्स | -- | अनामत पुस्तक | ९८<br>२४.७.२००९ | १९००० | १०९/२२<br>२७.८.२००९ |
| | | | | **एकूण रक्कम** | **१,५६,११२/-** | |

## २००९-२०१०

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश / दिनांक | साहित्याचे नांव | बील क्र. | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | फरा इन्टरप्राईजेस | | रहदारी पावती पुस्तक | २१५<br>२३.११.२००९ | ३२,५०० | १०९/२५<br>१७.१२.२००९ |
| २ | फरा इन्टरप्राईजेस | -- | अनामत पावती पुस्तक | २१५<br>२३.११.२००९ | २९,९०० | १०९/२५<br>१७.१२.२००९ |
| ३ | सुषमा इन्टरप्राईजेस | -- | करारपत्रक | १८३<br>४.१२.२००९ | २२,८१६ | १०९/२७<br>५.१.२०१० |
| ४ | फरा इन्टरप्राईजेस | २०२<br>२९.१.२०१० | मार्गस्थ दाखला रहदारी | २२५<br>१६.४.२०१० | ९,७५० | १०९/०४<br>२९.४.२०१० |
| ५ | फरा इन्टरप्राईजेस | २०२<br>२९.१.२०१० | अनामत पावती पुस्तक | २२५<br>१६.४.२०१० | १४,९५० | |
| ६ | सुषमा इन्टरप्राईजेस | २०१<br>२९.१.२०१० | जकात पावती पुस्तक | १८५<br>२५.२.२०१० | १२,५७० | १०९/०५<br>३१.५.२०१० |
| ७ | लिबर्टी प्रिन्टर्स | १५४<br>२०.७.२०१० | रहदारी पुस्तक | ६४८<br>१३.८.२०१० | ४७,०६० | १०९/२२<br>१४.९.२०१० |
| ८ | लिबर्टी प्रिन्टर्स | १५४<br>२०.७.२०१० | अनामत पावती पुस्तक | अनामत पावती पुस्तक | ४०,५६० | १०९/२२<br>१४.९.२०१० |
| ९ | सुषमा प्रिन्टर्स | ५५<br>२०.७.२०१० | जकात पावती पुस्तक | जकात पावती पुस्तक | ३६,८२१ | १०९/२४<br>२३.९.२०१० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | सुषमा प्रिन्टर्स | ५५<br>२०.७.२०१० | करारपत्रक | करारपत्रक | १५,७५० | १०९/२४<br>२३.९.२०१० |
| ११ | लिबर्टी प्रिन्टस | १७४<br>१६.११.२०१० | रहदारी बुक | रहदारी बुक | १,१९,००० | १०९/०६<br>१३.५.२०११ |
| १२ | लिबर्टी प्रिन्टस | १७४<br>१६.११.२०१० | अनामत पावती पुस्तक | अनामत पावती पुस्तक | १,३५,२०० | १०९/०६<br>१३.५.२०११ |
| १३ | सुषमा प्रिन्टर्स | १७५<br>१६.११.२०१० | करार पत्रक | करार पत्रक | ३१५०० | १०९/६९<br>१३.५.२०११ |
| | | | | एकूण | ५,४८,३७७ | |

वरील तक्त्यावरुन जकात वसूलीचा ठेका सहकार एजन्सीज जकात अभिकर्ता यांना सी पुस्तक, रहदारी पुस्तक, करारपत्रक पुस्तक, अनामत पुस्तक व इतर साहित्य पुरविण्यात आले होते. सन २००५-०६ ते सन २००९-१० पर्यंत छपाई साहित्य एकूण रक्कम रू. **१५,९३,६८७**/- इतका खर्च संचिकेतील करारनाम्याच्या अट क्र.६ नुसार सहकार एजन्सीने करणे आवश्यक होते. तो खर्च सहकार एजन्सीने केला किंवा महानगरपालिकेने केला याबाबतचा संपूर्ण वसूल केलेल्या रकमेचा तपशिल / लेखे उपलब्ध करून देण्यासाठी भांडार अधिक्षक, मुख्य लेखाधिकारी , मा.उपायुक्त (महसूल), स्थानिक संस्था कर अधिकारी (जकात विभाग) यांना जा.क्र.मनपा/मुलेप/८२/२०१३ दिनांक ४.४.२०१३ रोजी पत्र काढण्यात आले. त्यादरम्यान विभागाने अद्यापपर्यंत सहकार एजन्सीज जकात अभिकर्ता यांच्याकडून सदरील रक्कम वसूल झाल्याबाबतचे लेखे / तपशिल उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. तसेच सन २०१०-११ या आर्थिक वर्षातील सहकार एजन्सीज जकात अभिकर्ता यांना सी पुस्तक, रहदारी पुस्तक, करारपत्रक, अनामत पुस्तक व इतर साहित्य किती पुरविण्यात आले याची संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात रू.**१५,९३,६८७**/- मे. सहकार एजन्सीज यांचे कडून वसूल झालेले आहेत किंवा नाहीत याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

तेंव्हा सदर रक्कम वसूल केलेली असल्यास त्याच्या परिपूर्ण तपशिलासह अनुपालन करण्यात यावे, रक्कम वसूल झालेली नसल्यास ती वसूल करुन महानगरपालिका निधीत जमा करावी व रक्कम वसूल न करणेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

## *सांस्कृतिक विभाग/ महिला व बाल कल्याण समिती*

## सन २००५-०६ ते सन २०१२-१३

## लेखापरीक्षण अहवाल

**प्रस्तावना :**

लेखापरीक्षण विभागाच्या लेखापरीक्षण कार्यक्रमानुसार सांस्कृतिक विभाग/ महिला व बालकल्याण समिती व पर्यटन विभागाचे सन २००५-०६ ते सन २०१२-१३पर्यंतचे चाचणी स्वरूपाचे नियमित लेखापरीक्षण करण्याबाबत कार्यालयीन आदेश क्र. मनपा/मुलेप/१४२/२०१३, दिनांक ११.०६.२०१३ नुसार विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानुसार करण्यात आलेले आहे.

सांस्कृतिक विभाग / महिला व बाल कल्याण समिती व पर्यटन विभागाच्या खर्चाच्या संचिका व इतर अनुषंगिक बाबींच्या संचिका तपासण्यात आल्या असून विहीत नमुन्यात रजि.क्र.१०९, ११०, १११ ताळमेळ रजिस्टर, सदरील रजिस्टर मध्ये साहित्याच्या नोंदी अपूर्ण असल्याकारणाने ताळमेळ करता आले नाही.

त्यादरम्यान सांस्कृतिक विभाग / महिला व बाल कल्याण समिती व पर्यटन विभागाचे जमा / खर्च बाजूचे लेखापरीक्षणा अंतर्गत **एकूण ३०** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**सांस्कृतिक अधिकारी यांच्या कार्यकाळाबाबत :**

सन २००५- २००६ ते सन २०१२-१३ या कालाधीत सांस्कृतिक अधिकारी / महिला व बालकल्याण अधिकारी म्हणून कार्यरत अधिका-यांची नांवे आस्थापना -१ विभागाकडून प्राप्त झालेली आहेत ती खालीलप्रमाणे -

**सांस्कृतिक अधिकारी**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | डॉ.ज्ञानदा कुलकर्णी | सन २००५-०६ ते सन २०१२-१३ |

**महिला व बालकल्याण अधिकारी**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | डॉ.ज्ञानदा कुलकर्णी | १.१.२००५ ते ३१.१२.२०१० अतिरिक्त कार्यभार |
| २ | डॉ.मेघा जोगदंड | १.१.२०११ ते २९.४.२०१२ |
| ३ | कु.शुभांगी आंधळे | ३०.४.२०१२ ते २०.७.२०१२ |
| ४ | डॉ.मेघा जोगदंड | २१.७.२०१२ ते १.८.२०१२ |
| ५ | डॉ.प्रेमलता कराड | २.८.२०१२ ते आजपावेतो. |

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-याची नांवे :**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक श्री.मो.रा.थत्ते यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे -

. १. श्री. नासेर लईख, वरीष्ठ लिपीक
२. श्री. ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक
३. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक

सांस्कृतिक / महिला व बाल कल्याण समिती विभागाकडील प्रलंबित लेखा परीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे सन २००४-०५ : १ परिच्छेद , सन २००६-०७ व सन २००७-०८ , एकूण १० परिच्छेद.

**परिच्छेद क्र.०१ : लेखापरीक्षणास्तव आवश्यक ते लेखे /अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

अर्धसमास पत्र क्र.२ ,३ ,८ व मा.उ.आ.(प्र) यांना दिलेल्या दिनांक १७.०८.२०१३ रोजीच्या पत्रान्वये सांस्कृतिक विभागाअंतर्गत भगवान महावीर बॅटमिंटन हॉल आणि इतर हॉल बाबतच्या संचिका व वसूल केलेल्या रकमेची जनरल पावती पुस्तके व कॅश रजिस्टर उपलब्ध करून देणे बाबत वारंवार कळविण्यात आले आहे. भांडार विभागामार्फत आपल्या विभागास दिनांक २३.६.२००३, जनरल पा.पु.४३१-ते ४३५=०५, सौ.अलका राजवैद्य दिनांक २८.१२.२००५ १५१७ ते १५१९=०३ दिपक पारधे असे एकूण ०८ जनरल पावती पुस्तके कॅश रजिस्टर व मुख्य कार्यालयात जमा केल्याबाबतची चलन पुस्तकांची लेखापरीक्षणा दरम्यान तपासणीसाठी वेळोवेळी मागणी करण्यात आली आहे. परंतू विभागामार्फत जनरल पावती पुस्तके, कॅश रजिस्टर, चलन पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली नसल्याने ही पुस्तके गहाळ झाली किंवा मुद्यामहून गहाळ करण्यात आली अशी शंका बळावते. तसेच या पुस्तकाद्वारे वसूल झालेली रक्कम भरणा करण्यात आली किंवा कसे याचा बोध होत नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. तसेच लेखापरीक्षणाच्या कालावधीपर्यंत उपरोक्त अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेले नाही. संबंधित विभागास भांडार विभागाने सामान्य पावती पुस्तके वितरीत केलेली आहेत. त्याआधारे विभागाने केलेली वसूली मनपा फंडात भरणा केली किंवा नाही याची खात्री करता आलेली नाही. त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०२ :श्रवणयंत्रे वाटप करण्याबाबत.(एकूण खर्च १,९५,४१५/-)**

सन २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये मूक बधीर लाभार्थींना श्रवणयंत्र अनुदान तत्वावर वाटप करणेचे उपक्रमात शहरातील साधारणपणे ५० ते १०० लाभार्थी गृहीत धरून श्रवणयंत्र खरेदीचा प्रस्तावित संचिका पृष्ठ क्र. (१) व (२) वर आहे. पृष्ठ क्र.एनएस-३ वर मा.आयुक्त यांची मान्यता आहे. याबाबत जाहिर निविदा मागविण्यात आलेली आहे. दिनांक २७.०२.२००६ रोजी जाहिरात देवून निविदा मागविली असता दोन (०२) निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी कमी दर असलेले निविदाधारक इन्शा ट्रेडिंग कंपनी यांचे प्राप्त दरापेक्षा ५% कमी दर मा.आयुक्त यांची मान्यता आहे. त्यानुसार पुरवठा आदेश क्र.८४ दिनांक १३.७.२००६ रोजी एकूण ८५ श्रवणयंत्र पुरविणेबाबत देण्यात आले. त्यापोटी इन्शा ट्रेडिंग कंपनीचे देयक क्र.१७९, दिनांक २८.७.२००६ अन्वये रू.१,९५,४१५/- चे देय ऑगस्ट २००६ रोजी अदा झालेले आहे.

खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाब निदर्शनास येते.

१. महिला व बालकल्याण विभागामार्फत श्रवणयंत्र खरेदी करतांना प्रथम लाभार्थ्यांची यादी तयार करून नंतर खरेदी करावयास पाहिजे असतांना तसे न करता खरेदी करण्यात आले. त्यामुळे नेमकी किती श्रवणयंत्राची आवश्यकता होती, ते न ठरवताच खरेदी केलेली आहे. नियोजनाचा अभाव दिसून येतो.

२. महिला व बालकल्याण समिती श्रवणयंत्रे खरेदी निविदा फॉर्म मधील नियम व अटी क्र.४ अन्वये उत्पादक / विक्रेता/ उपविक्रेता प्रमाणपत्र मे.ईन्शा ट्रेडिंग कंपनी यांनी सादर केलेले नसतांना त्यास पुरवठा आदेश देण्यात आले ही बाब आक्षेपार्ह आहे.
३. श्रवणयंत्र खरेदी निविदा अटी / शर्ती मध्ये श्रवणयंत्र खरेदी नंतर त्याचा उपयोगाबाबत गॅरेन्टी / वॉरेन्टी कार्ड बाबत कालावधी दर्शविणेत आलेला नाही.
४. प्रस्तावित योजना ही मनपा शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थी यांचेकरीता राबविण्यात आली. सन २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये श्रवणयंत्र खरेदी एकूण ८५ नग रुपये १,९५,४१५/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. सदरील श्रवणयंत्र हे दिनांक १३.८.२००६ ते २४.९.२००८ पर्यंत वाटप केल्याबाबत वाटप रजिस्टर मध्ये नोंद दिसून येते. श्रवणयंत्र खरेदी केल्यानंतर त्याच वर्षात लाभार्थींना वाटप करण्याऐवजी २००८ पर्यंत केलेले असल्याने श्रवणयंत्र सुस्थितीत असल्या बाबत विभागाने तपासणी केलेली नाही. वाटप करतांना श्रवणयंत्रे वॉरंटी / गॅरेंटी कालावधी मध्ये होती की नाही हे ही उपलब्ध अभिलेख्या वरुन स्पष्ट होवू शकले नाही. दिनांक २४.९.२००८ मध्ये श्रवणयंत्र वाटप केल्याबाबतची वाटप रजिस्टर पृष्ठ क्र.११,१२ वरील नोंद तपासली असता ३९ श्रवणयंत्र भारतीय प्राथमिक शाळा यांना वाटप केल्याची नोंद असून सोबत लाभार्थ्यांची यादी असे दर्शविले आहे. मात्र सदरची यादी तपासणीकरीता प्राप्त झाली नाही.
५. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात खरेदी केलेली श्रवणयंत्रे प्रत्यक्षात सप्टेंबर २००८ पर्यंत वाटप करण्यात आल्याच्या नोंदी वाटप नोंदवहीत दिसून आल्या आहेत. म्हणजेच तात्काळ गरज नसतांना खरेदी करुन मनपा निधी अनावश्यकरित्या गुंतवून ठेवला होता ही बाब स्पष्ट होते.

विभागाने मुद्या क्र.१ ते ५ बाबतचा खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०३ :महिला समुपदेशन केंद्र यांना अनुदान देणे बाबत.**

सन २००५-०६ या वर्षामध्ये महिला व बालकल्याण विभाग सेतु सामाजिक साहित्यीक एवम् सांस्कृतिक चेतना यांना सेतु समुपदेशन केंद्र चालविणे करीता आदेश क्र.मनपा/मबाकस/८१/२००६, दिनांक १२.०७.२००६ अन्वये जुलै -२००६ ते मार्च २००७ या कालावधीसाठी संबंधितास समुपदेशन केंद्र चालविणेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे संदर्भ क्र.(२) च्या शासन निर्णय प्र.क्र./म.अ.आ/समुकेंद्र/०३, मधील नमूद अटी /शर्तीच्या आधारे करारनामा करण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय प्रत लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. करारनामा अ.क्र.अट क्र. (१) मध्ये नमूद प्रमाणे या केंद्राद्वारे महिलांना त्यांचे कौटुंबिक कायदे विषयक व सामाजिक समस्या सोडविण्यासाठी मदत तसेच कायदे विषय मार्गदर्शन करणे योग्य त्या प्रकरणांमध्ये समुदेशन करुन हुंडाबळी /विभक्त कुटुंबाच्या समस्या /घरगूती/ अत्याचार/घरातून बाहेर काढण्याची धमकी देणे /मारहाण करणे, रात्री अपरात्री घरातून बाहेर काढणे, घटस्फोटासाठी दबाव आणणे, घटस्फोट मालमत्ता हक्क, लैंगिक छळवणूक या बाबत समस्यांचे समाधान करणे इत्यादी करीता करारनामा अट क्र. (३) मध्ये नमूद केल्यानुसार संस्थेमध्ये कामकाज करणेस अनुभवी कर्मचारी (दोन एमएस डब्ल्यू , एक कायदा शाखेचा पदवीधर )शासन निर्णयाप्रमाणे असणे आवश्यक आहे. त्यांना प्रति महा रु. १००० प्रमाणे तीन कर्मचा-यांना वार्षिक रु. ३६,०००/- व रु.५००/- प्रमाणे रु.६०००/- असे एकूण रु.४२,०००/- प्रतिवर्ष असे अनुदान देय केलेले आहे. प्रकरणी खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. करारनामा अट क्र. (६) मध्ये नमूद प्रमाणे समुपदेशन मदत केंद्र, त्याचा कार्यअहवाल दर तीन महिन्यांनी भरण्या करीता आयोग कार्यालय, व आयुक्त, मनपा यांना कळविणे आवश्यक होते. तीन महिन्यांमध्ये किती महिलांनी तक्रार दाखल केली व किती तक्रारीचे निवारण करण्यात आले व प्रलंबित तक्रार किती बाकी आहे या अहवालामध्ये उल्लेख नाही. करारनामा अट क्र. (७) मध्ये नमूद केल्या प्रमाणे महिला बालकल्याण सभापती - समुपदेशन केंद्रास केव्हाही भेट देवून त्यांनी मागितलेली माहिती / कागदपत्र इ. तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात अशा किती भेटी दिल्या व त्याचा निष्कर्ष काय होता हे लेखापरीक्षण पथकास तपासणी करीता उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात ही योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता महानगरपालिकेने कोणतेही नियंत्रण न ठेवता अनुदान वाटप केलेले असल्याचे स्पष्ट होत असल्याने केलेला खर्च निष्फळ ठरतो.

२. संबंधित संस्थेस सन २००४-०५ या वर्षात मान्यता देण्यात आलेली होती असे जा.क्र.मनपा/मबाकस/८१/२००६, दिनांक १२.७.२००६ चे पत्रामध्ये नमूद आहे, परंतू त्या कालावधीचे नियुक्त कर्मचा-यांचे लेखे अवलोकनासाठी प्राप्त झाले नाही. त्यामुळे त्याची खात्री करता आली नाही. सदर योजना सन २००४-०५ या आर्थिक वर्षात मंजूर होती. तर त्या मंजूरी आधारे सन २००५-०६ व पुढे सन २०१२-१३ पर्यंत केलेला खर्च अनाधिकृत ठरतो. कारण प्रत्येक आर्थिक वर्षात सदर योजने करीता मान्यता घेतल्याचे उपलब्ध संचिकेत आढळून आलेले नाही.

३. करारनामा अट क्र.(३) नुसार कर्मचारी नियुक्तीबाबत.

| अ.क्र. | नांव | शैक्षणिक पात्रता | उत्तीर्ण वर्ष | अर्ज दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती गंगावणे प्रतिभा कचरु | MSW | २३.२.२००७ | २.१०.२००७ |
| २ | श्री. कृष्णा अंबादास थोरहत्ते | MSW | १२.०७.२००७ | २.१०.२००७ |
| ३ | श्री.सय्यद कलीमोद्दीन | LLB | ०५.०३.२००४. | २.१०.२००७ |

वरील MSW नियुक्त कर्मचारी हे सन २००७ या वर्षात MSW शाखेत पास झालेले आहेत. त्यांची नियुक्ती संबंधित कर्मचा-यास अनुभव नसून ते अपात्र कर्मचारी सन २००६-०७ या वर्षाकरीता नियुक्त दर्शवून महिला व बालकल्याण विभागामार्फत त्यांची तपासणी न करताच दिनांक ७.७.२००६ ते १.१०.२००७ पर्यंत एकूण १६ महिने इतका खर्च केलेला आहे. तसेच या तिन्ही पदाकरीता संस्थेने दिनांक २.१०.२००७ रोजी नोकरी करीता अर्ज भरुन सादर केलेले आहे. प्रत्यक्षात नियुक्ती दिनांकाचा बोध होत नाही. करारनामा अट क्र.(७) मध्ये नमूद केल्याप्रमाणे महिला व बालकल्याण समिती सभापती / उपसभापती/विभागप्रमुख/कक्ष प्रमुख/ सदस्य यांनी संबंधित सेतु केंद्रास किती वेळा भेट देवून त्याची तपासणी केल्याबाबत संचिकेमध्ये कोणतीही नोंद नाही.

४. समुपदेश केंद्राचे काम समाधानकारक आहे किंवा नाही याबाबत त्यांचे देयक अदा करतांना संबंधित अधिकारी यांनी प्रमाणित न करताच देयक अदाई केले आहेत.

५. महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचे पत्र दिनांक २०.८.२००९ अन्वये समुपदेशन मदत केंद्रास वाढीव खर्चास फक्त मुंबई -पुणे, ठाणे, नागपुर करीता शिफारस आहे. याबाबत टिप्पणी

पृ.क्र.एनएस-१६ वरील परि.६० ते ६३ मध्ये प्रस्तावित प्रमाणे महिला व बालकल्याण समिती यांची वाढीव खर्चासाठी मान्यता घेण्यात आलेली नाही. औरंगाबाद शहर वर्ग-ड मध्ये असल्याने वाढीव खर्च करणे मान्य करणे योग्य नाही.

६. करारनामा अट क्र.(६) मध्ये नमूदप्रमाणे संबंधित संस्थेने दर तीन महिन्याने अहवाल महानगरपालिकेस सादर करणे बंधनकारक असतांनाही माहे एप्रिल २००९ ते ५.१०.२००९ पर्यंत अहवाल केला नसल्याचे परि.क्र. ६६ व ६७ मध्ये नोंद आहे.

७. महिला व बालकल्याण समिती यांचे पत्र क्र.मनपा/ मबाकस /११ / २०११,दिनांक ८.२.२०११ अन्वये कक्ष प्रमुख यांनी संबंधित संस्थेस दिनांक १४.१२.२०१० रोजी प्रत्यक्ष दु.३.३० वाजता भेट दिली असता संस्थेत २ MSW व १ वकील असा स्टाफ आवश्यक आहे, परंतू १ MSW काही वैयक्तिक कारणामुळे संस्था सोडून गेला आहे असे कक्ष प्रमुख यांना निदर्शनास आले, याबाबत संस्थेने महिला व बालकल्याण समिती यांना तात्काळ कळविणे आवश्यक होते, तसे कळविले नसून एप्रिल -२००९ ते डिसेंबर -२०१० पर्यंतचे ३ कर्मचा-यांसह अनुदान या संस्थेस प्रदान करणेत आल्याचे पत्रात नमूद आहे. तसेच संबंधित संस्थेचे पत्र दिनांक निरंक अन्वये कळविले आहे की, १ MSW कर्मचारी सहा (६) महिन्यापासून संस्थेचे काम सोडून गेला होता. परंतू त्या पुन्हा याच पदावर दिनांक १.४.२०११ रोजी रुजू झाला आहे. संस्थेने नमूद केल्याप्रमाणे १ MSW कर्मचारी यांना ६ (सहा) महिन्याचे अनुदान प्रदान करणेत आलेले जास्तीचे अनुदानीत रक्कम रू.१२०००/- मनपा फंडात जमा करून तसा अनुपालन अहवाल सादर करावा.

विभागाने मुद्या क्र.१ ते ७ बाबतचा सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. तसेच समुपदेशन केंद्राचे काम समाधानकारक आहे किंवा नाही याबाबत देयक अदा करतांना तपासणी न करताच देयक अदा केल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०४ :महिला व बालकल्याण समितीच्या वतीने घ्यावयाच्या डी.एम.एल.टी प्रशिक्षणाबाबत.(रक्कम रू.१४,५०,४००/-)**

महिला बाल कल्याण समिती अंतर्गत खाजगी किंवा शासकीय प्रयोग शाळेत प्रयोग शाळा सेवक / सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून काम मिळू शकेल. महिलांसाठी / विद्यार्थीनींना डी.एम.एल.टी. (D.M.L.T.) हे व्यावसायिक प्रशिक्षण देणे करीता निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. मा.मुख्य लेखाधिकारी यांचे समक्ष दिनांक १०.८.२००५ रोजी उघडण्यात आल्या असता चार निविदांपैकी वाटाघाटी अंती त्रिमूर्ती शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांची डी.एम.एल.टी. साठी रू.६,८००/- व पी.जी. डी.एम.एल.टी. तीन सत्राच्या अभ्यासक्रम प्रति प्रशिक्षणार्थी रू.१५,०००/- या दरास मा.आयुक्त यांनी दिनांक १७.१०.२००५ रोजीच्या मंजूरी अन्वये संबंधित प्रशिक्षण संस्थेस कार्यआदेश जा.क्र.मनपा / मबाकस/सांस्कृ/२००५/७८, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये आदेश देवून करारनामा करण्यात आला.

| अ.क्र. | विषय | प्रशिक्षणार्थींची संख्या | प्रति विद्यार्थी शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | D.M.L.T. | ८९ | ६८००/- प्रति वर्ष (दोन वर्ष) | १२,१०,४००/- |
| २ | P.G. D.M.L.T. | १६ | ५०००/- प्रति सत्र (तीन सत्र) | २,४०,०००/- |
| | | | **एकूण** | **१४,५०,४००/-** |

१. संचिकेतील त्रिमुर्ती शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या निविदा फॉर्म मध्ये D.M.L.T. प्रशिक्षणाचा कालावधी /किती वर्षाचा कोर्स बाबत उल्लेख केलेला नाही व D.M.L.T. प्रशिक्षणासाठी Public Health & Hygiene, New Delhi - २९ यांची मान्यता नसतांना प्रशिक्षणासाठी निविदा मंजूर करण्यात आली.

२. डी.एम.एल.टी. प्रशिक्षणाची निविदा त्रिमुर्ती शिक्षण प्रशासक मंडळ, औरंगाबाद यांची मान्य केलेली असून संबंधित संस्था ही शासन मान्य नोंदणीकृत नसून त्यांनी परस्पर त्रयस्थ इन्स्टिटयूट ऑफ पॅरामेडीकल सायन्स (INSTITUTE OF PARAMEDICAL SCIENCE) न्यू दिल्ली मार्फत इन्स्टिटयूट ऑफ पॅरामेडीकल सायन्स ,नांदेड यांना मान्यता असल्याचे नमूद आहे. त्यानंतर इन्स्टिटयूट ऑफ पॅरामेडीकल, नांदेड यांचेकडून तात्पुरती मान्यता त्रिमुर्ती शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद यांना असल्याचे पत्र संलग्न आहे. म्हणजेच संबंधित संस्था ही प्रत्यक्ष शासन मान्य नोंदणीकृत नसतांना ही D.M.L.T. प्रशिक्षणा करीता शहरातील विद्यार्थ्यांना प्रवेश देवून त्यावर मनपाचा एकूण रू.१४,५०,३००/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. मात्र सदरील खर्चास सक्षम प्राधिकारी (स्थायी समिती / सर्वसाधारण सभा) यांची मंजूरी घेण्यात आलेली नाही.

३. संचिकेतील जाहिर निविदेमध्ये निविदाधारकाची प्रशिक्षण संस्था शासन मान्य नोंदणीकृत असली पाहिजे तसा पुरावा असावा व मागील दोन वर्षाचे ऑडीट झाल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. पुराव्यामध्ये D.M.L.T. प्रशिक्षणास लागणारे साहित्याबाबत उल्लेख केलेला नाही.

४. संचिकेतील PG D.M.L.T. प्रशिक्षणास १६ विद्यार्थीनी तीन सत्रासाठी प्रति विद्यार्थीनी १५००० प्रमाणे मान्यता देण्यात आली. मात्र प्रथम व द्वितीय सत्राच्या परिक्षेच्या निकालात एकच विद्यार्थीनी पास झाल्याचे संचिकेतील पृष्ठ क्र. ४१७ ते ४२० पत्रान्वये दिसून येते व तृतिय सत्राच्या परिक्षेचा निकाल संचिकेतील पृष्ठ क्र. ४२१ व ४२२ पानावर मार्क किंवा पास/ नापास याची नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच सदरील प्रशिक्षण संपल्यानंतर नापास झालेल्या विद्यार्थ्यांना ६ महिन्याकरीता इन्टरशिप पोस्टींगसाठी पाठविण्यात आल्याचे निदर्शनास येते. ही बाब आक्षेपार्ह आहे.

५. डी.एम.एल.टी. कोर्सच्या प्रशिक्षणासाठी एकूण ८९ विद्यार्थीनींनी प्रशिक्षण घेतलेले असल्याचे उपलब्ध अभिलेख्यावरून दिसते. परिक्षेत सतत गैरहजर असलेल्या एकूण ३७ मुलींना इन्टरशिप करीता सहा महिन्याच्या प्रशिक्षणास पाठविण्यात आले ही बाब अनावश्यकच आहे व सहा

महिन्याच्या इन्टरशिप करीता एकूण ५२ मुलींना सदर प्रशिक्षण दिल्याबाबतचे प्रमाणपत्राची यादी दिसून आलेली नाही.

६. संचिकेतील करारनाम्यातील अट क्र.११ अन्वये महिला व बालकल्याण समिती तसेच महानगरपालिकेचे अधिकारी वेळोवेळी भेट देतील असे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात असे असतांना महानगरपालिकेच्या कोणत्या अधिका-यांनी संस्थेस किती वेळा भेट दिली व त्याचे निष्कर्ष काय होते याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे सदर प्रशिक्षण प्रभावीपणे राबविल्याचे दिसून येत नाही. उत्तीर्ण विद्यार्थीनींचे प्रमाण, सतत अनुपस्थिीचे प्रमाण या बाबी पाहता केलेला खर्च निष्फळ ठरला आहे.

७. डी.एम.एल.टी. व पी.जी. डी.एम.एल.टी. च्या परिक्षेकरीता एकूण ८९ व १६ विद्यार्थ्यांनी दिलेली बोर्डाची परिक्षा फी भरल्याबाबतची पावती किंवा त्यांचे अभिलेखे लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध झालेले नाही.

विभागाने मुद्दा क्र.१ ते ७ बाबतचा खुलासा सादर केलेला नाही. तसेच त्रिमुर्ती शिक्षण प्रसारक मंडळ,औरंगाबाद ही संस्था शासन मान्य नोंदणीकृत नसतांनाही डी.एम.एल.टी. प्रशिक्षणाकरीता शहरातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाकरीता प्रवेश देवून त्यावर मनपाचा एकूण खर्च रू.१४,५०,३००/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०५ : भारत माता मंदीर माहिती पुस्तिका तयार करणे बाबत.**

सन २००६-०७ या वर्षात पर्यटन विभागामार्फत भारत माता मंदीर माहिती पुस्तिका तयार करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात आली असता एकूण पाच दरपत्रके प्राप्त झाली. तुलनात्मक दृष्ट्या दरामध्ये मल्टी प्रिन्ट यांचे दर रू. २४.८० /- प्रति फोल्डर असे कमी दर प्राप्त झाले. मात्र मुख्य लेखाधिकारी यांनी वाटाघाटी करून दर रू. २४/- प्रति फोल्डर दराने मान्य करण्यात आले त्या नुसार त्यास मा.उपायुक्त (प्र) , यांची मंजूरी दिनांक २२.६.२००७ नुसार पुरवठा आदेश देण्यात आले.

१. मे.मल्टी प्रिन्टस यास पुरवठा आदेश जा.क्र. मनपा/सांस्कृ/१२२/२००७, दिनांक ३.७.२००७ नुसार देण्यात आले. मात्र एकूण ५००० प्रति किती कालावधीत छापून देण्यात यावा याचा उल्लेख आदेशात केलेला नाही.

२. मे.मल्टी प्रिन्ट्स यांनी दिनांक D.C.No ५३, दिनांक २४.९.२००७ रोजी माहिती पुस्तिका उपलब्ध करून दिली. त्याची नोंद स्टॉक रजिस्टर क्रमांक १०९ पान क्र. २२ वर सदरील देयकाची नोंद घेण्यात आली. परंतू सदरील माहिती पुस्तिका वाटप केल्याबाबतचे रजिस्टर क्रमांक ११० लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे सदरील माहिती पुस्तिका वाटप झालेल्या आहे किंवा नाही याबाबत बोध होत नाही.

३. मे.मल्टी प्रिन्टस यांच्या डिलेव्हरी चालान व देयकावर C.S.T. व B.S.T. नंबर नाही.

विभागाने मुद्दा क्र.१ ते ३ बाबतचा खुलासा सादर केलेला नाही. तसेच मल्टी प्रिन्ट्स यांचेकडून ५००० प्रती छापून घेण्यात आलेल्या आहे. परंतू लेखापरीक्षणा दरम्यान वाटप झाल्याबाबतचे रजिस्टर क्र.११० उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे सदरील पुस्तके प्रत्यक्ष प्राप्त होवून वाटप झालेले आहे किंवा नाही याचा बोध होत नाही, व ज्या कारणाकरीता खर्च करण्यात आला त्याची फलनिष्पत्ती

लेखापरीक्षणात पडताळता आलेली नसल्याने विभागाने कार्यवाही अंती, अभिलेखासह अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.०६ :ए.एम.सी.कॉल सेंटरबाबत.**

पर्यटन विभागामार्फत ए.एम.सी. कॉल सेंटर मार्फत शहरातील नागरीकांना बांधकाम परवाने, शहरातील रस्ते, साफसफाई, दिवाबत्ती, जलनि:सारण व्यवस्था, आरोग्य सेवा, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, विविध स्वरूपांचे ना हरकत प्रमाणपत्र, पर्यटन सुविधा अशी माहिती निश्चित स्वरूपात एखाद्या कॉल सेंटर द्वारे देण्यासाठी निविदा न मागविता दि.१.५.२००६ ते दि.३०.४.२००७ या कालावधीसाठी मे.सारंग इन्टरप्राईजेस, उल्कानगरी औरंगाबाद यांना देण्यात आले आणि दि.९.१.२००८ ते दि.८.१.२००९ या कालावधीसाठी निविदा मागवून मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि. यांना देण्यात आले.

संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

अ) मे.सारंग इन्टरप्राईजेस उल्कानगरी औरंगाबाद यांनी त्यांच्या मार्फत संबंधित विविध स्वरूपाची माहिती देण्याबाबत तयारी दर्शविली होती संचिकेतील टिपणी पृष्ठ क्र.एनएस-३ वरील मा.आयुक्त यांनी सदर प्रकरण स्थायी समिती ठराव क्र. ३२२, दिनांक ३१.३.२००६ सभेत मंजूरी घेवून कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/उआ(प्र)/१०२(B)/२००६, दिनांक २५.४.२००६ नुसार दिनांक १.५.२००६ ते दिनांक ३०.४.२००७ या कालावधीसाठी आदेश देण्यात आले. सदरील कालावधीत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधेपोटी महापालिकेने एकूण रक्कम रु.५,९५,०००/- इतका खर्च केलेला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| अ.क्र. | संस्थेचे नांव | कार्यालयीन आदेश क्र. व दिनांक | देयक क्रमांक /दिनांक /कालावधी | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | मे.सारंग इन्टरप्राईजेस | १०२ (बी) २९.४.२००६ | ०२ ४.९.२००६ मे , जून, जुलै | १,४८,७५०/- |
| २ | मे.सारंग इन्टरप्राईजेस | १०२ (बी) २९.४.२००६ | ०४ २१.२.२००७ ऑग, सप्टें,ऑक्टो. | १,४८,७५० |
| ३ | मे.सारंग इन्टरप्राईजेस | १०२ (बी) २९.४.२००६ | ०५ २१.२.२००७ नोव्हें, डिसें,, जाने. | १,४८,७५० |
| ४ | मे.सारंग इन्टरप्राईजेस | १०२ (बी) २९.४.२००६ | ०६ ०३.१२.२००७ फेब्रु, मार्च, एप्रिल | १,४८,७५० |
| | | | **एकूण रक्कम रूपये** | **५,९५,०००/-** |

१. शासन निर्णय २ जानेवारी १९९२ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५(२) (१) नुसार निविदा काढणे आवश्यक असतांना निविदा न काढताच मे.सारंग इन्टरप्राईजेस,उल्कानगरी औरंगाबाद यांच्या मार्फत कॉल सेन्टर चालविण्याबाबतचे कार्यालयीन आदेश दिनांक १.५.२००६ ते दिनांक ३०.४.२००७ या कालावधीसाठी देण्यात आले. केलेला

खर्च कोणत्याही स्पर्धेविना काम देण्यात येवून केला असल्याने महानगरपालिकेला स्पर्धात्मक दराचा फायदा घेता आलेला नाही.

२. मे.सारंग इन्टरप्राईजेस यांनी अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेच्या विविध विभागांना पुरविण्यात येणा-या सेवा सुविधांची माहितीचे लेखे उपलब्ध न करुन देणे, तसेच पर्यटन स्थळे ऐतिहासिक वास्तु विविध प्रकारचे संग्रहालये , मनपाचे उद्यान, प्राणी संग्रहालय इत्यादी बाबतची माहिती कोणास देण्यात आली. तसेच महानगरपालिकेचे एक खिडकी योजनेद्वारा किती परवाने व त्यासाठीचे किती कागदपत्रे आणि मूलभूत सेवा सुविधा बाबत नागरीकांच्या किती तक्रारी नोंदविण्यात व कोणकोणत्या विभागाकडे पाठविण्यात आल्या याचीही नोंद घेण्यात आलेली नाही आणि संस्थेने सदरील कार्यालय योग्य ठिकाणी सुरु करावे असे असतांना सदरील कार्यालय कोणकोणत्या ठिकाणी सुरु करण्यात आले याबाबतचे उक्त सर्व लेखे लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करुन न दिल्याने खात्री करता आली नाही. यावरुन असे सिध्द होते की, संबंधित संस्थेस अदा करण्यात आलेले देयकाचा खर्च लेखापरीक्षणास अमान्य आहे.

३. मे.सारंग इन्टरप्राईजेस यांनी कॉल सेंटर मार्फत पुरविण्यात येणा-या सेवा सुविधांची जाहिरात महापालिकेने कोणत्या ठिकाणी केली व जाहिरातीवर किती खर्च केला याबाबतचे लेखे उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

(ब) पर्यटन विभागामार्फत ए.एम.सी. कॉलसेन्टर दिनांक ९.१.२००८ ते दिनांक ८.१.२००९ या कालावधीसाठी वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दी करण्यात आल्या असता एकूण चार निविदा विक्री झाल्या व चार निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी तुलनात्मक दृष्ट्या मे.देवसिध्द असिम निर्मिती यांचे दर रुपये २०,०००/- प्रतिमाह व सेवा शुल्क मनपाने भरावे असे दर संस्थेकडून कमी प्राप्त झाल्याने सदरील खर्च हा रू.२००७-०८ या आर्थिक वर्षातील इतर प्रशासकीय खर्च या शिर्षातून खर्च करुन त्यास मा.आयुक्त यांची संचिकेतील परिच्छेद क्र.५२ नुसार मंजूरी देवून करारनामा करुन कार्यालयीन आदेश देण्यात आले. सदरील कालावधीत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधेपोटी महापालिकेने एकूण रक्कम रु.२,६९,६६४/- इतका खर्च केलेला असून त्याचा तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | संस्थेचे नांव | कार्यालयीन आदेश क्र. व दिनांक | देयक क्रमांक /दिनांक /कालावधी | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि. | २३९<br>३.१.२००८ | ९ फेब्रु ते ८ मार्च | ४४,९४४/- |
| २ | मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि. | २३९<br>३.१.२००८ | ९ मार्च ते ८ जून | ६७,४१६/- |
| ३ | मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि. | २३९<br>३.१.२००८ | ९ जून ते ८ जुलै | २२,४७२/- |
| ४ | मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि. | २३९<br>३.१.२००८ | ९ जुलै ते ९ जाने २००९ | १,३४,८३२/- |

१. मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि. ही संस्था नोंदणीकृत असल्याचा पुरावा आणि को-या निविदा विक्री किंमत रक्कम रु.१२९५/- व मा.उपायुक्त (प्र) , महानगरपालिका औरंगाबाद

यांचे नांवे लेखा विभागात रक्कम रु.१०,०००/- अनामत रक्कम रोखीने भरल्याची पावती किंवा परत दिल्याची नोंद संचिकेत नाही.

२. मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि. यांना अटी व शर्ती नुसार महापालिकेच्या विविध विभागांना पुरविण्यात येणा-या सेवा सुविधांची माहितीचे लेखे उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. तसेच पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तु, विविध प्रकारचे संग्रहालय, मनपाचे उद्यान, प्राणी संग्रहालय इत्यादी माहिती कोणास देण्यात आली. त्याबाबतचे लेखे ही उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

३. मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि. यांची मनपाच्या एक खिडकी योजने द्वारा किती परवाने व त्यासाठीचे किती कागदपत्रे आणि मुलभूत सेवा सुविधांबाबत नागरीकांच्या किती तक्रारी नोंदविण्यात आल्या व कोणकोणत्या विभागाकडे पाठविण्यात आल्या याची नोंद घेण्यात आलेली नाही.

४. मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि.यांना उक्त स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थेने त्यांचे कार्यालय त्यांना योग्य वाटेल अशा ठिकाणी सुरु करावे असे असतांना संस्थेने सदरील कार्यालय कोणत्या ठिकाणी सुरु केले त्याबाबतची कागदपत्रे संचिकेत नाही.

५. मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि.यांना दिनांक ९.१.२००८ ते दिनांक ८.१.२००९ या कालावधीसाठी महानगरपालिकेतर्फे सिमकार्ड उपलब्ध करुन दिले होते. परंतू संस्थेचा कालावधी संपल्यानंतर सदरील कार्ड संस्थेने महापालिकेत जमा केले किंवा कसे याबाबत खुलासा व्हावा.

६. मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि.यांना कार्यालयीन आदेशातील अट क्र.११ अन्वये नागरीकांना घरपोच सुविधा पुरविण्यासाठी प्रथमम: रुपये २५/- शुल्क आकारावे. तसेच पुढील पाठपुराव्यासाठी आवश्यक असल्यास रु.१५/- शुल्क आकारावे असे स्पष्ट निर्देश असतांना संस्थेतर्फे किती रक्कम आकारण्यात आली आणि किती नागरीकांना घरपोच सुविधा देण्यात आल्या याबाबत खुलासा करावा.

७. मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि.यांना कार्यालयीन आदेश अट क्र.९ नुसार संस्थेकडून बाहेर केल्या गेलेल्या कॉल्सची यादी संचिकेत दिसून आली नाही.

मे.देवसिध्द असिम निर्मिती प्रा.लि.यांना दिनांक ९.१.२००८ ते दिनांक ८.१.२००९ या कालावधीसाठी निविदा प्रसिध्दी करुन रक्कम रुपये २,६९,६६४/-चे देयक अदा करण्यात आले. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा महानगरपालिकेस आर्थिक फायदा झालेला आहे. मात्र मे.सारंग इन्टरप्राईजेस यांची दिनांक १.५.२००६ ते ३०.४.२००७ या कालावधीसाठी निविदा न काढता रक्कम रुपये ५,९५,०००/- चे देयक अदा करण्यात आले. त्यामुळे महानगरपालिकेचे निविदा न काढल्याने रक्कम रुपये ३,२५,३३६/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने (अ) मधील मुद्या क्र.१ ते ३ व (ब) मधील मुद्या क्र. १ ते ७ बाबत खुलासा सादर केलेला नाही. तसेच (ब) मधील मुद्या क्र. ७ मधील रक्कम रु.३,२५,३३६/- चे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

करिता, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन सदरील रक्कम मनपा फंडात भरणा करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०७ :औरंगाबाद पर्यटन नकाशाचे ४X४ च्या आकाराची होर्डीग्ज तयार करणे व विविध विभागात फिक्स करणे बाबत.**

सन २००६-०७ व सन २००७-२००८ या वर्षात पर्यटन विभागामार्फत पर्यटन नकाशा प्रकाशित करण्यासाठी दरपत्रक मागविण्यात आली. दरम्यान एकूण ०४ दरपत्रक प्राप्त झाले. त्यापैकी मे.गुरुकृपा फोटो स्टुडिओ यांचे दर ९०६९/- प्रति नग ४X४स्क्वे. फूट प्रमाणे दर प्राप्त झाले मुख्य लेखाधिकारी यांच्या वाटाघाटी अंती ९०००/- प्रती नग दराप्रमाणे मान्यता देण्यात आली असून त्यास मा.उपायुक्त (प्र), यांची मंजूरी दिनांक १५.१.२००७ देण्यात येवून पुरवठा आदेश जा.क्र.मनपा/सांस्कृतिक -पर्यटन/०७ , दिनांक २०.१.२००७ आदेश देण्यात आले. संचिका तपासणी दरम्यान खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक | देयक क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | मे.गुरुकृपा फोटो स्टुडिओ | ०७/२००७<br>२०.१.२००७ | ३३२<br>१४.३.२००७ | १,८०,०००/- |
| २ | मे.गुरुकृपा फोटो स्टुडिओ | ६३/२००७<br>०२.०६.२००७ | ३४३<br>२५.६.२००७ | ८१,०००/- |

१) दरपत्रके मागवतांना नकाशा करीता वापरावयाची सामुग्री, फ्रेमचा दर्जा इ.स्पष्टपणे नमूद कलेले नाही. त्यामुळे दराची योग्यता कशाच्या आधारे तपासून ते योगय असल्याची खात्री केली याचा संचिकेवरुन बोध होत नाही.

२) पर्यटन नकाशा तयार करण्यासाठी सदरील खर्च कोणत्या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात आले, याचा संचिकेवरुन बोध होत नाही. या कामाकरीता संबंधित आर्थिक वर्षात या कामाकरीता कोणत्या लेखाशिर्षांतर्गत किती तरतूद करण्यात आली होती व प्रत्यक्ष खर्च कोणत्या लेखाशिर्षात नोंदविण्यात आला याचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध करुन द्यावा.

३) पर्यटन नकाशा होर्डिंग्ज एकूण २० व ९ नगांचा पुरवठा आदेश दिल्यानंतर सदरील नग प्राप्त झाल्याबाबत डिलेव्हरी चालन संचिकेत दिसून आलेले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात किती नकाशे प्राप्त झाले याची खातरजमा करता येत नाही.

४) पर्यटन नकाशा होर्डिंग्ज एकूण २० नग प्राप्त झाल्यानंतर सदरील नकाशे कोणकोणत्या विभागास लावण्यात आले या बाबतची नोंद दिसून आलेली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष नकाशे प्राप्त होवून त्याचा वापर कोठे करण्यात आला आहे हे लेखापरीक्षणात तपासता आले नाही.

विभागाने मुद्या क्र.१ ते ४ बाबतचा खुलासा सादर केलेला नाही. करिता, प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०८ :महिला व बाल कल्याण समिती अतर्गत विविध प्रशिक्षणा बाबत.**
**(एकूण खर्च रू.८,१३,८००/-)**

सन २००६-०७ व सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या तरतूदीमधून सांस्कृतिक विभागाअंतर्गत वेळोवेळी विविध प्रशिक्षण / उपक्रम राबविण्यात आले. त्यासाठी महिला व बालकल्याण समितीची मान्यता घेण्यात येवून त्यानुसार एकूण ०७ प्रशिक्षणाकरीता विविध संस्थांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. (यादी सोबत संलग्न).

सदरील संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. प्रशिक्षण व्यावसायिक दर्जाचे असावे असे नमूद आहे.
२. प्रशिक्षण करारनाम्यातील अटीनुसार उच्च दर्जाचे दिले जाईल याची दक्षता घ्यावी.
३. प्रशिक्षणासाठी गठीत केलेल्या समितीने प्रशिक्षणाबाबत सादर केलेल्या अहवालानंतरच देयक अदा करण्यात येईल. देयक दोन प्रतीत सादर करावे.
४. गठीत केलेल्या समितीचा व त्यातील सदस्यांचा कोठेही नामोल्लेख दिसून येत नाही.
५. समितीचा अहवाल न घेताच संस्थांना देयक अदा केल्याचे दिसून येते.

विभागाने मुद्या क्र. १ ते ५ बाबत खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे केलेला खर्च योग्य प्रकारे झाला असल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही. प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०९ :बॅकलिडमध्ये टुरिस्ट मॅप तयार करणे बाबत.**

सन २००७-०८ या वर्षात पर्यटन विभागामार्फत बॅकलिड टुरिस्ट मॅप तयार करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात आली असता मे.स्टुडिओ दर्पन, मे.आकांक्षा स्टुडिओ,मे.गुरुकृपा फोटो स्टुडिओ असे एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली. तुलनात्मक दृष्ट्या दरामध्ये मे.गुरुकृपा फोटो स्टुडिओ यांचे दर ६० sg.Fit ७५० प्रमाणे व सर्व्हिस ट्रॅव्हल्स १२.२४ नुसार दर प्राप्त झाले. मात्र मुख्य लेखाधिकारी यांनी वाटाघाटी करुन २% कमी दरास मान्यता देण्यात आली. त्यास मा.उपायुक्त (प्र), यांची मंजूरी दिनांक १३.४.२००७ रोजी देण्यात येवून त्याला पुरवठा आदेश देण्यात आले.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | बिल क्रमांक व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | गुरुकृपा फोटो स्टुडिओ | ४९<br>१६.४.२००७ | ३३५<br>२०.४.२००७ | १,४८,४७६/- |
| २ | गुरुकृपा फोटो स्टुडिओ | | ३३७<br>२७.३.२००७ | ९८,९९६/- |
| ३ | गुरुकृपा फोटो स्टुडिओ | २९०<br>२५.३.२००८ | ३०५<br>२९.३.२००८ | १,९७,९९१/- |
| | | | **एकूण रक्कम** | **४,४५,४६३/-** |

१. बॅक लिड मॅप तयार करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (१) नुसार निविदा वर्तमान पत्रात प्रसिध्दी करुन मागविणे बंधनकारक असतांना जाहिरात न देता खरेदी केल्याचे दिसून येते.

२. औरंगाबाद शहराचा बॅक लिड टुरिस्ट मॅप तयार करण्यासाठी मे.गुरुकृपा फोटो स्टुडिओ यांना रक्कम रु.४,४५,४६३/- इतका खर्च करण्यात आला. सदरील खर्च कोणत्या वर्षाच्या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात आला,हे स्पष्ट होवू शकले नाही.

३. शहराचा बॅक लिड टुरिस्ट मॅप तयार करण्यासाठी पुरवठा आदेश नसतांना मे.गुरुकृपा फोटो स्टुडिओ यांचे देयक क्र.३३७ दिनांक २७.३.२००७ रक्कम रु.९८,९९६/- चे देयक अदा करण्यात आले.

४. मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार रेल्वेस्टेशन येथे २ टुरिस्ट बॅक लिड मॅप लावणे बाबत रेल्वे विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र व बॅक लिड मॅप लावण्यात आल्याचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आलेले नाही. प्रत्यक्षात मॅप लावले काय ? याचा बोध होत नाही.

५. मे.गुरुकृपा फोटो स्टुडिओ यांचे देयक क्र.३०५ दिनांक २९.३.२००८ बॅकलिड टुरिस्ट मॅप जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य बसस्थानक, सुभेदारी विश्रामगृह, सिध्दार्थ उद्यान या ठिकाणी लावण्याबाबत विभागाने ना हरकत प्रमाणपत्र व त्या विभागाची मॅप बसविण्यासाठी मंजूरी घेतल्याची दिसून येत नाही. त्यामुळे प्रत्यक्षात त्या त्या स्थळी हे मॅप लावले काय ? याचा बोध होत नाही.

मुद्या क्र.१ ते ५ बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. तसेच बॅकलिड मॅप तयार करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ (२) (१) नुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणे आवश्यक असतांना दरपत्रके मागविण्यात आलेली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

करिता, प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१० :छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय पोस्ट कार्ड छायाचित्र एकूण खर्च रु. १, ८७,८५०/-**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय यांचे प्रसिध्दीसाठी व संग्रहालयाची आर्थिक आवक वाढविणेसाठी पोस्टकार्ड छायाचित्र / भेटकार्ड तयार करणेसाठी सांस्कृतिक अधिकारी यांनी शिफारस करुन लेखाधिकारी व मा.उपायुक्त (प्र) यांची दिनांक २०.४.२००६ रोजी मान्यता घेतली. त्या अनुषंगाने पर्यटन विकास व प्रसिध्दीसाठी मनपा निर्माण पर्यटन स्थळाचे पोस्टकार्ड तयार करणेचे दरपत्रक मागविण्यात आले असता ४ (चार) दरपत्रके प्राप्त झाली पैकी मे.फोटो डिझाईन यांचे दरपत्रक तुलनात्मक कमी (रु.५.८० per copy matt lamination ५००० प्रती) लेखाधिकारी व मा.उपायुक्त (प्र) यांनी वाटाघाटी करुन निविदादरामध्ये २०% दर कमी करुन तशी मा.आयुक्त यांची दिनांक २७.७.२००६ मान्यता आहे. यानुसार एकूण ३०,००० कार्ड छपाईचे आदेश क्र.मनपा /पर्यटन /१८१ / २००६ दिनांक २३.११.२००६ रोजी पारित झाले. बील क्र. ४४४ दिनांक २१.१२.२००६ रु.१,४७,६००/- देयक पारीत.

तसेच वरील कार्ड हे मनपाचे पर्यटन स्थळी एकूण ३० ठिकाणी विक्रीसाठी ठेवल्यास प्रत्येक भेटकार्डची किंमत रू.५/- व एकूण १५ संचांची किंमत रू.६०/- अशी ठेवण्यात येईल अशी सांस्कृतिक अधिकारी यांना सादर करुन मा.आयुक्त यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीचे ठराव दिनांक १८.१.२००६ रोजी मान्य.मात्र सदरचे कार्ड सुरक्षित ठेवणेसाठी कव्हर छपाई करीता दरपत्रके मागवून ३ दरपत्रक प्राप्त. पैकी मे.गुरूकृपा फोटो स्टुडिओ यांचे दर कमी रू.१२.५० प्रति नग (१६ फोटोचा अल्बम ) वाटाघाटी करुन रू.११.५० प्रती अल्बम दर निश्चित एकूण ३५०० अल्बम प्रती पुरविणेचे पत्र क्र.मनपा/पर्यटन/६४/२००७ दिनांक ३.५.२००७ दिले. त्यानुसार बील क्र.३३६ दिनांक ३.५.२००७ रू.४०२५०/- देयक अदा.

वरील बाबत खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास येतात.

१. पर्यटन प्रसिध्दी भेट कार्ड योजने अंतर्गत छायाचित्र एकूण ३०,००० प्रती छापण्यात आल्या. त्यांचा एक संच हा १६ फोटोचा अल्बम प्रमाणे एकूण १८७५ अल्बम खरेदी करणे गरजेचे होते.
मात्र विभागाने एकूण ३५०० अल्बम खरेदी केले. म्हणजेच १६२५ इतके अल्बम जास्तीचे खरेदी केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे रू.१८६८७=५०चे नुकसान झालेले आहे.

२. सांस्कृतिक /पर्यटन विभागामार्फत एकूण रक्कम रू.१,८७,८५०/- इतका खर्च केलेला आहे. या सरासरीमध्ये पर्यटन स्थळाचे प्रतीमहा /प्रती वर्षाकरीता किती आर्थिक वाढ झाली याचाही स्पष्ट खुलासा करावा.

३. पुरवठा आदेश क्र. १८१, दिनांक २३.११.२००६ अन्वये एकूण ५ ठिकाणाचा फोटो ग्रिटींग कार्ड तयार करणेचे आदेश देण्यात आले असता देयक क्र.४४४ दिनांक २१.१२.२००६ च्या देयकामध्ये रक्कम रू. १२,३००/- च्या २०% कमी रक्कम रू. २४६०/- वजा जाता एकूण रक्कम रू. ९८४०/- इतक्या खर्चाच्या डॉ. मौलाना अब्दुल कलाम आझाद यांचे फोटो ग्रिटींग कार्ड तयार करून दिले. त्याचे आदेश नसतांना संबंधित एजन्सीने तयार करून दिले म्हणजेच मंजूरी नसतांना सदरील कार्ड तयार करण्यात आले.

४. सदरील भेट कार्ड मनपाच्या सिध्दार्थ उद्यान, प्राणी संग्रहालय, शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, भारतमाता मंदीर व मनपा मुख्य कार्यालय या ठिकाणी विक्रीस्तव उपलब्ध करून एकूण पंधरा भेट कार्डाच्या संचांची विक्री किंमत रू. ६०/- व एका कार्डाची विक्रीची किंमत रू.५/- अशी प्रस्तावित करण्यात आली होती. त्याप्रमाणे पंधरा भेटकार्ड संच व एका कार्डाची विक्री झालेली असेल तर सदरील रक्कम मनपा फंडात जमा झाली काय याचा बोध होत नाही. याबाबत विभागाने सविस्तर तपशिल सादर करावा.

५. पर्यटन स्थळाचे भेटकार्ड विक्रीस्तव कोणकोणत्या ठिकाणी किती भेटकार्ड देण्यात आले व किती भेटकार्ड शिल्लक आहे त्याचा तपशिल उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

मुद्या क्र.१ ते ५ बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. करिता, प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११ : बाल आनंद महोत्सव -२००७ बाबत**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक २२.११.२००७ रोजी डाय सेन्टर औरंगपुरा येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत शिक्षणाधिकारी यांनी मनपाच्या इ. ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी बाल आनंद महोत्सव घेण्याची तयारी दर्शविली. बाल आनंद महोत्सव सिध्दार्थ उद्यान येथे दिनांक ७ डिसेंबर २००७ रोजी घेण्याचे योजिले आहे. यामध्ये मनपाच्या इ. ५ वी ते ७ वी च्या

विद्यार्थ्यांसाठी दोन सत्रात कार्यक्रम चालतील. प्रथम सत्रामध्ये चित्रकला, हस्तकला यांचे मार्गदर्शन व स्पर्धा तसेच मनोरंजनात्मक खेळ व दुस-या सत्रामध्ये उद्यानामधील प्राणी संग्रहालयास भेट, जादुचे प्रयोग व इतर कार्यक्रमास अग्रिम रक्कम रू.५०,०००/- व अग्रिम रक्कम रू.२०,०००/- संचिकेतील पृष्ठ क्र.५ व ७ परिच्छेद क्र.२४ व ३६ नुसार मा.मुख्य लेखाधिकारी व मा.उप-आयुक्त (प्र) यांची मंजूरी अदा करण्यात आली.

संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेतील पृष्ठ क्र.७ परिच्छेद क्र.३४ व ३५ अन्वये विद्यार्थ्यांना प्रवासाकरीता ए.एम.टी बसेस वापराव्यात व त्याचा खर्च धनादेशाद्वारे अदा करावा असे मुख्य लेखाधिकारी यांनी नमूद केले. त्यानुसार प्रमाणक क्र.१२१८२, दिनांक १४.१.२००८ अन्वये धनादेश क्र. ३५२६१ द्वारे रू.४१,६००/- मे.अकोला प्रवासी मालवाहतूक सहकारी संस्था यांना अदा करण्यात आले आहे. मात्र संबंधित संस्थेस नियमाप्रमाणे कार्यादेश देण्यात आल्याचे संचिकेत दिसून येत नाही. तसेच २६ बसेस चालविल्याबाबत संबंधित संस्थेकडून किती विद्यार्थ्यांनी प्रवाशाचा वापर केला याबाबतची देयक सादर न करताच रक्कम अदा करण्यात आली.

२. संचिकेतील सी -२१ ते सी-२७ च्या प्रमाणपत्रावरुन एकूण ५४६ विद्यार्थी सहभागी झाले होते. खर्च पृष्ठ क्र. सी-२१ ते सी-२७ अन्वये प्रमाणपत्राप्रमाणे संबंधित त्या त्या मुख्यध्यापकांना एकूण रोख रुपये ५४६०/- इतकी रक्कम अदा केली. त्यानुसार संचिका पृष्ठ क्र.३, परिच्छेद क्र.१४ नुसार मुलांना येण्या-जाण्यासाठी प्रति विद्यार्थी १० प्रमाणे खर्चास मान्यता आहे. एकूण विद्यार्थी ५४६X१०=५४६० इतका खर्च अपेक्षित असतांना मे.अकोला प्रवासी मालवाहतूक सहकारी संस्था यांना प्रवासापोटी रक्कम रू.४१,६००/- अदा केली आहे. याबाबत खुलासा व्हावा.

३. संचिकेतील पृष्ठ क्र.७ ,परिच्छेद क्र.३४ व ३५ अन्वये जेवणाचे कोटेशन मागवून देयक अदा करावे असे मुख्य लेखाधिकारी यांनी नमूद केले. परंतू मे.साईनाथ सप्लायर्स व केटरर्स प्रमाणक क्र.१३७३८, दिनांक १५.२.२००८, देयक क्र.५४, दिनांक २४.१२.२००७ अन्वये रू.५६,५५२/- अदा करण्यात आले. मात्र शासन निर्णय २ जानेवारी १९९२ नुसार दरपत्रके न मागविता पुरवठा आदेश देवून देयक अदा करण्यात आले.

४. बाल आनंद महोस्तव बाबत संचिकेतील सी-३७ वरील औरंगाबाद केटर्स यांना सद्‌भावना रॅली अल्पोपहार बाबत रू. १०,८००/- अदा केले. परंतू बाल आनंद महोत्सव व दिनांक २२.११.२००७ रोजीच्या बैठकीत सद्‌भावना रॅलीबाबत मान्यता नसतांना सदरील देयक अदा करण्यात आले. तरी अदा केलेली रक्कम वसूल करुन मनपा फंडात जमा करावे.

५. संचिकेतील मे.नॅशनल ट्रेडिंग कंपनी देयक क्र.३५८, दिनांक १६.१२.२००७ अन्वये रू.२१,७५०/- इतक्या रकमेचे ड्रॉईंग कलर व इतर साहित्य खरेदी करण्यात आले. परंतू सदरील साहित्य प्राप्त झाल्याबाबत डिलेव्हरी चालान संचिकेत नाही आणि सदरील साहित्य सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना वाटप झाल्याबाबतचे रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

६. बाल आनंद महोत्सव सिध्दार्थ उद्यान येथे दिनांक १६.१२.२००७ रोजीच्या कार्यक्रमासाठी संचिकेतील परि.क्र.२४ नुसार अग्रिम रक्कम रू.५०,०००/- व परि.क्र.३५ अन्वये अग्रिम रक्कम रू.२०,०००/- घेण्यात आले. मात्र त्याचे समायोजन संचिकेतील पृष्ठ क्र.१२, परि.क्र.५१ अन्वये

दिनांक १७.१२.२००८ रोजी करण्यात आले. म्हणजे सदरील अग्रिम रकमेचे समायोजन हे १ वर्षाच्या विलंबाने करण्यात आले. ही बाब आक्षेपार्ह आहे.

करिता मुद्दा क्र. १ ते ६ बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२ :सन २००७ मध्ये औरंगाबाद महानगरपालिका रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध उपक्रमाबाबत.**

८ डिसेंबर हा महापालिका वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. दिनांक २२.११.२००७ रोजी वर्धापन दिन कार्यक्रमा संदर्भात बैठक डाय सेन्टर सिटी मार्व्हल बिल्डींग औरंगपुरा येथे संपन्न झाली. त्यानिमित्त सन २००७ हे वर्ष औरंगाबाद महानगरपालिकेचे रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत असून त्यानिमित्त विविध क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाअंतर्गत 'जाणता राजा' व 'झांसी' की राणी या नाटकाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरील कार्यक्रमाच्या खर्चास संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-१० वर मा.आयुक्त यंनी मंजूरी प्रदान केलेली आहे. विविध क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता रक्कम रु.२,३६,४००/- अग्रिम रक्कम देण्यात आली व इतर खर्च रक्कम रु.४,५५,७८०/- देण्यात आली.

सदरील खर्चाबाबत संचिकेची तपासणी केली असता खालील खर्चाच्या तक्त्यावरुन आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | संस्थेचे नांव | देयक क्रमांक व दिनांक | रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०३२८<br>१०.१२.२००७<br><br>९०५६<br>१७.१२.२००८ | Ady for vardhapan Din pay to Dnyanda Kulkarni<br>(समायोजन केलेले आहे.)<br>(२,५८,५३१-२,३६,४००) | -----<br><br>----- | २,३६,४००/-<br><br>२२,१३१/- | अग्रिम रक्कम |
| २ | १७६२९<br>३१.३.२००८ | मे.मल्टी प्रिन्टर्स | ९८/१२.१२.२००७<br>१००/१३.१२.०७ | २२,०००<br>३,९०० | |
| ३ | १७६२६<br>३१.३.२००८ | नित्यसेवा | १३०३<br>१०.१२.२००७ | ४७,५०० | |
| ४ | १७६१८<br>३१.३.२००८ | गुरूकृपा फोटो स्टुडिओ | १४५/९.१२.०७<br>१४६/१०.१२.०७ | ८४,१८०<br>१,५१,५२४ | |
| ५ | १७४२०<br>३१.३.२००८ | Dyno sound | १०७/१५.१२.०७ | ६००० | |
| ६ | १७६२८<br>३१.३.२००८ | Navras Event management | ४२/१०.१२.२०१२ | २८०९० | |
| ७ | ८८२३<br>१०.१२.२००८ | आर.व्ही. पाटील | ४६६/२९.६.०८ | ३०४० | |
| ८ | ८९८८<br>१६.१२.२००८ | New International sports | ५०<br>२७९ | १५६५<br>१४०० | |
| ९ | ८९९१<br>१६.१२.२००८ | Ivary Traders | ५६/२७.१.२००८ | ९४५० | |

१) संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-१४ वर प्रमाणक क्र.१०३२८ दिनांक १०.१२.२००७ रोजी रक्कम रू.२,३६,४००/- हे अग्रिम रक्कम देण्यात आली. सदरील रकमेचे समायोजन हे सदरील कार्यक्रम समाप्तीनंतर ७ दिवसांत करण्यात यावे. अशी अट असतांना प्रमाणक क्र.९०५६ दिनांक १७.१२.२००८ रेजी सदरील रकमेचे समायोजन केलेले आहे, म्हणजेच सदरील रक्कम ही एक वर्ष विलंबाने समायोजन केलेली आहे ही बाब योग्य नाही.

२) प्रमाणक क्र. १७६२९ दिनांक ३१.३.२००८ मे.मल्टी प्रिन्टर्स यांचेकडून बससर्व्हिस टिकिट रक्कम रू.१०/- ची ४० पुस्तके व रक्कम रू.२०/- ची २० पुस्तके छापण्यात आली. यांचे देयक क्रमांक १०० दिनांक १३.१२.२००७ रक्कम रू.३९००/- अदा करण्यात आले आहे. मात्र सदरची बाब ही प्रस्तावित विषयाशी संबंधित / संयुक्तिक नसल्याने केलेला खर्च रक्कम रू.३९०० विनाकारण झालेला आहे. तथापि सदरील रक्कम वसूल करून मनपा फंडात जमा करून खर्चाबाबत विभागाने स्पष्ट खुलासा करावा.

३) प्रमाणक क्रमांक १७६१८ दिनांक ३१.३.२००८ मे.गुरूकृपा फोटो स्टुडिओ देयक क्र.१४५ दिनांक ९.१२.२००७ रक्कम रू.८४,१८० व देयक क्र.१४६ दिनांक १०.१२.२००७ रक्कम रू. १,५१,५२४/- ची एकूण रक्कम रू.२,३५,७०४/- अन्वये फोटोज, डिझाईनिंग आर्टीस्ट, डेकोरेशन, पेस्टींग फ्रेमसह हॅग करून तयार करण्यात आले. मात्र शासन निर्णय २ जानेवारी १९९२ व त्यातील सुधारित तरतूद दिनांक १७ जुलै १९९३ नुसार निविदा वर्तमान पत्रात प्रसिध्द करून मागविणे बंधनकारक असतांना जाहिरात न देता खरेदी केल्याचे दिसून येते.

४) प्रमाणक क्र.९०५६ दिनांक १७.१२.२००८ मधील अ.क्र.३० मधील प्रा.शाळा एकनाथ नगर, समुह नाट्य स्पर्धा (द्वीतीय क्रमांक) रोख रक्कम २०००/- अ.क्र.५२ सय्यद शादाब स.खालेद सिल्लेखाना मनपा शाळा पर्यटन स्पर्घा रक्कम रू.५००/- अ.क्र.५९, हाश्मी आसमा जलिला अ. सिल्लेखाना, मनपा शाळा पर्यटन स्पर्घा रक्कम रू.५००, अ.क्र.७५ वरील श्री.संतोष भगवान पवार पोस्टर स्पर्धा (तृतिय क्रमांक) रोख रक्कम रू.२०००/- अशी एकत्रित रक्कम रू.५०००/- अदा केलेले आहे. मात्र सदर रक्कम / बक्षीस प्राप्त झाल्याबाबत संबंधित विद्यार्थी /लाभार्थी यांची स्वाक्षरी नाही. म्हणजेच सदरची रक्कम संबंधितांना वितरीत झालेली नाही.

५) विभागाचे पत्र जा.क्र./मनपा/सांस्कृ/४६९/२०१०, दिनांक १५.११.२०१० अन्वये 'झांशी की राणी ' या नृत्य नाटिकेचे आयोजन केलेले होते. यासाठी महानगरपालिकेतर्फे रू.५,०००/- चे मानधन देण्यात आले होते. तथापि कार्यक्रम झालेल्या वित्तिय वर्षात आपल्या संस्थेने आयकर भरणा केल्याबाबतची विवरण पत्राची छायांकित प्रती संचिकेत दिसून आलेल्या नाही. याबाबत विभागामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली, हे विभागाने स्पष्ट केले नाही.

मुद्या क्र. १ ते ५ बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३ : कर्णबधिरांना श्रवणयंत्र वाटपाबाबत. (एकूण खर्च रू.६,८०,०००-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेतील शाळेतील कर्णबधिर विद्यार्थ्यांना श्रवणयंत्र खरेदी करून वाटप करणे बाबत संचिका पृ.क्र. एनएस-२ मध्ये प्रस्तावित आहे. याबाबत निविदा मागणी करीता मा.आयुक्त यांची मान्यता आहे. दिनांक ५.९.२००७ रोजी जाहिर निविदा मागविण्यात आली. तीन निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी कमी दराची निविदा इन्शा ट्रेडिंग कंपनी यांनी निविदा मंजूर करणेत आली, संबंधिताचे देयक क्र.०६७ दिनांक २८.३.२००८ रक्कम रू.६,८०,०००/- चे देयक करणे बाबत संचिका पृ.क्र. एनएस-३ मध्ये नमूद आहे. वरील बाबत खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिका पृष्ठ क्र.एनएस-४ मधील परिच्छेद क्र.४ मध्ये मा.आयुक्तांशी दिनांक २३.४.२००६ रोजी चर्चा केली. त्यानुसार प्राप्त शाळेंच्या अर्जाबरोबरच महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा Survey दिनांक २० जून ते १ जुलै २००६ या कालावधीत करणेत यावा. डॉ.च्या टिम्सना मनपा शाळेमध्ये पाठवून श्रवणयंत्राची गरज असणा-या विद्यार्थ्यांची यादी निश्चित करावी असे सूचित केलेले असतांनाही मनपा शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी केलेली व त्यांना श्रवणयंत्र वाटप केलेले संचिकेवरून निदर्शनास येत नाही.

२. श्रवणयंत्र साठी मनपा शाळेतून व मनपा हद्यीतील लाभार्थींची मागणी नसल्याबाबत संचिका पृ.क्र. एनएस-१७ मध्ये परि. ३३ व ३४ मध्ये नमूद आहे. अनावश्यक खरेदी केलेली आहे.

३. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम क्रमांक १४२(२) अन्वये वाटपाबाबत कार्यवाही होणे आवश्यक होते. मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षात कर्णबधिर श्रवणयंत्र एकूण १६० खरेदी केलेले आहेत. परंतू वाटप रजिस्टर क्रमांक ११० अन्वये पान क्र.५९,६० अन्वये एकूण ७१ कर्णबधिरांना श्रवणयंत्र वाटप केल्याचे दिसून येते. उर्वरीत ८९ श्रवणयंत्रे वाटप न झाल्यामुळे सन २००७-०८ पासून ते आजपर्यंत रक्कम रू.३,७८,२५०/- अनावश्यक गुंतून पडत आहे.

४. खरेदी केलेले एकूण १६० श्रवणयंत्र व त्यासाठी झालेला खर्च रक्कम रू.६,८०,०००/- हा आवश्यकता नसतांना केल्याने झालेला खर्च लेखापरीक्षणात तात्पुरता अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा व्हावा.

वरील मुद्या क्र. १ ते ४ बाबत खुलासा सादर केलेला नाही. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम क्र.१४२ (२) अन्वये श्रवणयंत्रे वाटप होणे आवश्यक असतांना सन २००७-०८ पासून ते आजपर्यंत एकूण ८९ श्रवणयंत्रे वाटप न झाल्यामुळे रक्कम रू.३,७८,२५०/- चा खर्च गुंतून पडत असल्यामुळे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४ : महिला व बालकल्याण समिती योजने अंतर्गत बचतगटांना पिठाची गिरणी यंत्रवाटपाबाबत. (एकूण ९८ नग) (एकूण खर्च रू.१५,१९,०००/-)**

सन २००७-०८ या वर्षामध्ये महिला व बालकल्याण समिती अंतर्गत बीपीएल/नॉन बीपीएल ५ वर्षापासून नियमित सुरु असणारे महिला बचत गटांना स्वयंरोजगाराकरीता एकूण ९८ पिठाच्या गिरण्या वाटप करणेचा उपक्रम राबविलेला आहे. यामध्ये बीपीएल -१०% लाभार्थी सहभाग व नॉन बीपीएल

२०% लाभार्थी सहभाग रक्कम भरुन घेवून त्यांचे बचतगटाबाबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन (जसे घालून दिलेल्या अटी /शर्ती एकूण १८ ) तद्नंतरच पिठाची गिरणी यंत्र वाटप करणेत येईल असे संचिका पृष्ठ क्र.एनएस-५ ते एनएस-७ मध्ये नमूद केलेले आहे.

वरील प्रमाणे प्रकरणास मा.आयुक्त यांची मान्यता पृष्ठ क्र.एनएस-७ मध्ये आहे त्यानुसार जा.क्र.मबाकस/४८/०७, दिनांक ९.४.२००७ अन्वये जाहिर निविदा मागविणेत आल्या. त्या द्वारे एकूण ४ निविदा विक्री झाल्या व एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. त्या पैकी कमी दराची निविदा सोलापूर मशनरी स्टोअर्स यांचे अमरदिप आटामेकर कंपनीची रू.१५५००/- प्रती नग किंमतीची निविदा सर्वसाधारण सभा ठराव क्र.६७७, दिनांक ११.१.२००७ व स्थायी समितीचे ठराव क्र.५४ , दिनांक २६.६.२००७ नुसार मान्य करणेत येवून पुरवठा आदेश क्र.४२ दिनांक ३०.६.२००६ रोजी देणेत आले. याप्रमाणे डिलेव्हरी चलन क्र.३६, दिनांक २७.७.२००७ अन्वये पिठाच्या गिरण्या प्राप्त झाल्या. त्यानुसार देयक क्र.२०६१ अन्वये प्रमाणक क्र.५१८१ दिनांक ३.९.२००७ रोजी ८०% च्या रक्कम रू.१२,१५,२००/- रक्कम अदा करण्यात आली. तसेच उर्वरीत २०% रक्कम रू.३,०३,८००/- देयक क्र.१७००५, दिनांक ३१.३.२००८ रोजी अदा करण्यात आली. संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सोलापूर मशिनरी यांनी यंत्र पुरवठा केल्यानंतर देयकाबरोबर पिठाची गिरणीचे गॅरेन्टी कार्ड दिलेले नसल्याने यंत्राचा हमी कालावधी किती होता. याबाबत बोध होत नाही.

२. संचिकेतील निविदेतील अटी व शर्तीनुसार गॅरेन्टी कालावधीत गिरणी यंत्रणा नुकसान झाल्यास ते दुरुस्त करण्याची जबाबदारी पुरवठाधारकावर राहील असे असतांना पुरवठाधारकाचे किती यंत्रणा दुरुस्ती केल्या याबाबत रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

३. पिठाच्या गिरणी यंत्राचा निविदेतील अटी व शर्ती नुसार ज्या ठिकाणी व्यवसाय केला जाणार आहे त्या ठिकाणी सदरील गिरणीयंत्र योग्य पध्दतीने फिक्स करुन देण्याची जबाबदारी पुरवठाधारकावर असतांना किती बचत गटांना पुरवठाधारकाने पिठाची गिरणी फिक्स करुन दिल्या बाबत तपशिल अभिलेखात उपलब्ध झाला नाही. त्यामुळे प्रत्यक्षात पिठाच्या गिरण्या स्थापित केल्या किंवा नाही याची सत्यता पडताळता आली नाही.

४. संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-२५ वर सन २००७-०८ मध्ये परिच्छेद ३७ नुसार एकूण ९८ पिठाची गिरणी खरेदी करण्यात आली होती. त्या अन्वये दिनांक २३.९.२०१० च्या सादरीकरणामध्ये एकूण उर्वरीत १५ पिठाच्या गिरण्या चार वर्षानतर वाटप करण्यासाठी महिला व बालकल्याण समितीपुढे प्रस्ताव ठेवण्यासाठी मा.आयुक्त यांची दिनांक २४.९.२०१० अन्वये मान्यता देण्यात आली असे असतांना दिनांक ९.५.२००८ ते दिनांक ७.७.२०१२ या कालावधीत सदरील पिठाच्या गिरण्या वाटप रजिस्टर क्र.११० नुसार वितरीत केल्याचे दिसून येते. मात्र महिला व बालकल्याण समितीपुढे प्रस्ताव न ठेवता सदरील पिठाची गिरण्या चार वर्षानंतर वाटप करणे योग्य नाही. ही बाब प्रशासनाची दिशाभूल करणारी आहे याबाबत खुलासा व्हावा.

५. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम क्रमांक १४२,(२) अन्वये वाटपाबाबत कार्यवाही होणे आवश्यक होते. मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षात पिठाच्या गिरण्या एकूण ९८ खरेदी केलेल्या आहेत. परंतू वाटप रजिस्टर क्रमांक ११० अन्वये एकूण ८५ पिठाच्या गिरण्या वाटप केल्याचे दिसून येते. उर्वरीत १३ पिठाच्या गिरण्या वाटप न झाल्यामुळे सन २००७-०८ पासून ते आजपर्यंत रक्कम रू.२,०१,५००/- अनावश्यकरित्या गुंतून पडत आहे. त्यामुळे महिला

बचत गटासाठी रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पिठाची गिरणी खरेदी केलेल्या रोजगाराचे साधन झालेले दिसून येत नाही.

वरील मुद्या क्र. १ ते ५ बाबत खुलासा सादर केलेला नाही. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम क्र.१४२ (२) अन्वये पिठाची गिरणी वाटप होणे आवश्यक असतांना सन २००७-०८ पासून ते आजपर्यंत एकूण १३ पिठाच्या गिरण्या वाटप न झाल्यामुळे रक्कम रु.२,०१,५००/- चा खर्च गुंतून पडत असल्यामुळे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५ :महिला व बाल कल्याण समिती मार्फत महिलांसाठी पिको व फॉल शिवणयंत्र खरेदी करणे बाबत.(रक्कम रु.३०,०४,०४०/-)**

महिला व बाल-कल्याण समिती सभा विषय क्र.०४ दिनांक १८.१०.२००७ अन्वये महिलांना स्वंयरोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे या करीता आय.एस.आय.मार्क पिको फॉल शिवणयंत्र देणेबाबत प्रस्ताव मंजूर करुन वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रकाशित करुन अंतिम दिनांकापर्यंत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. सदरील चार निविदाधारकांपैकी तीन निविदाधारकांची आवश्यक ती कागदपत्रे सादर केली नसल्याने एकच निविदा राहीली. त्यामुळे यासाठी पुन्हा फेरनिविदा मागविण्यास मा.आयुक्त यांनी दिनांक २१.१०.२००८ ला मान्यता दिली. त्यान्वये वृत्तपत्रात फेरनिविदा प्रसिध्दी करण्यात आली असता शेवटच्या दिनांकापर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची मे. के.सी. सुर्यवंशी यांची निविदा प्राप्त झाली व त्यास मा.आयुक्त यांची मंजूरी घेवून संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-२४ परिच्छेद क्र.७२ नुसार १० अर्थसंकल्पिय तरतूदीमधून खर्च करण्यास मंजूरी प्राप्त झाली. त्यान्वये के.सी.सुर्यवंशी यांस कार्यादेश जा.क्र.मनपा/मबाकस/६३/२००९, दिनांक २५.२.२००९ नुसार आदेश देवून करारनामा करण्यात आला.

संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. महिला व बालकल्याण समिती अंतर्गत सन २००८-०९ व सन २००९-१० या आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या आदेशानुसार एकूण ५२० शिवणयंत्र पुरवठा केलेले असून वाटप रजिस्टर क्रमांक ११० परि.क्र. (१ ते ४४) ची पडताळणी केली असता एकूण ५१२ शिवणयंत्र वाटप केल्याचे दिसून आले. म्हणजेच एकूण ८ शिवणयंत्रे बाकी असावयास पाहिजे असतांना एकही शिल्लक शिवणयंत्र नाही.

   करिता शिल्लक असलेल्या शिवणयंत्राबाबत विभागाने खुलासा करावा. तसेच रजिस्टर क्रमांक ११० हे प्रमाणित केलेले नाही.

२. सदरील शिवणयंत्रे पुरवठा केल्यानंतर शिवणयंत्राचा दोष निवारण कालावधी सहा महिने इतका होता यात किती शिवणयंत्राचा दोष निवारण करण्यात आले याचे रजिस्टर / लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

शिवणयंत्रे एकूण ५२० खरेदी केलेले आहे. वाटप रजिस्टर क्र.११० ची पडताळणी केली असता एकूण ५१२ वाटप झाल्याचे दिसून येते. परंतू रजिस्टरच्या तपासणीअंती ५२० ही शिवणयंत्रे वाटप केल्याचे दिसून येते. म्हणजेच ०८ शिवणयंत्रे अद्यापही वाटप झालेले नाही. त्याची रक्कम रु.५७७७X८= ४६,२१६/- इतकी रक्कम वसूल करुन मनपा फंडात भरणा करुन तसा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१६ : बालवाडी साहित्य पुरवठा करणे बाबत.**

औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील बालवाडी विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी आकर्षित व्हावे यासाठी खेळण्यातून शिक्षण या अनुषंगाने बालवाडीतील बालकांना खेळणी वाटप करण्याकरीता मा.सौ.पार्वतीबाई विजय वाघमारे, सभापती महिला व बालकल्याण समिती यांचेकडून पत्र जा.क्र.मनपा/मबाकस/८४/०७, दिनांक २१.७.२००७ अन्वये पत्रदेवून प्रस्ताव प्रशासनामार्फत तयार करून मा.आयुक्त यांची दिनांक २०.१२.२००७ रोजी मंजूरी देण्यात आली. संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस/-४,परिच्छेद क्र.१० नुसार मा.आयुक्त यांनी अल्प मुदतीची निविदाची मंजूरीनुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात आली असता एकूण ०४ निविदा दरपत्रके प्राप्त झाली. तुलनात्मक दृष्ट्या कमी दर असलेल्या मे. इन्शा ट्रेडिंग कंपनी, मे.यश ट्रेडिंग कंपनी औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था, निविदेस वाटाघाटीअंती प्राप्त दरापेक्षा ८% कमी दराने पुरवठाधारक पुरवठा करण्यास तयार असून त्यास मा.आयुक्त यांची दिनांक १६.७.२००८ अन्वये मंजूरी देवून जा.क्र.मनपा /मबाकस/३७१ /२००८ दिनांक २१.७.२००८ तिन्ही निविदाधारकांना कार्यादेश देण्यात येवून करारनामा करण्यात आला.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | एजन्सीचे नांव | देयक क्रमांक व दिनांक | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६०६६<br>२५.९.२००८ | इन्शा ट्रेडिंग कंपनी | ५५४<br>१४.८.२००८ | ३,८७,१८२/- | |
| २ | ६०६८<br>२५.९.२००८ | मे.यश ट्रेडिंग कंपनी | ०७३<br>१६.८.२००८ | १,६८,३६०/- | |
| ३ | ६३६३<br>६.१०.२००८ | औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था लि. जनता बाजार | ५९४८<br>२२.८.२००८ | ४,४०,६८०/- | |
| ४ | | औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था लि. जनता बाजार | ६२८९<br>२१.३.२००९ | ४,४५,४८४/- | |
| ५ | | मे.यश ट्रेडिंग कंपनी | १६४<br>२५.३.२००९ | १,३५,७९२/- | |
| ६ | | मे.इन्शा ट्रेडिंग कंपनी | ०७<br>२४.३.२००९ | ४,१४,९३९/- | |

१. मे.इन्शा ट्रेडिंग कंपनी यांचे दुकान नोंदणी परवाना हा सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचा नोंदणी न केलेला नोंदणीचा दाखला जोडण्यात आला आहे.

२. वरील तक्त्यातील अ.क्र.१,२,३ अन्वये साहित्य खरेदी करण्यात आले. त्याबाबत साठा रजिस्टर क्रमांक १०९ मधील पान क्र.१० वर वरील वस्तु वितरीत केल्याचे स्टोअर लेजरचे पान क्रमांक नमूद केलेले नाही व स्टोअर्स लेजर, रजिस्टर क्रमांक ११० वरील वस्तू वितरीत केल्याबाबतचे रजिस्टरही उपलब्ध झालेले नाही.

३. संचिकेतील पुरवठा आदेश क्र.६९/A,B.C/२००९ दिनांक २.३.२००९ अन्वये वरील तक्त्यातील अ.क्र.४,५,६ अन्वये साहित्य खरेदी करण्यात आले. त्याबाबतचे साठा रजिस्टर क्र.१०९ ,स्टोअर लेजर रजिस्टर क्रमांक ११० व रजिस्टर १११ वस्तूच्या नोंदणीबाबतचे रजिस्टर लेखपरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाही. यामुळे सदरील साहित्य वाटप झाल्याबाबत बोध होत नाही.

४. संचिकेतील देयक क्र.६२८९, दिनांक २१.३.२००९ रक्कम रू.४,४५,४८४/- व देयक क्र.१६४, दिनांक २५.३.२००९, १,३५,७९२/- आणि देयक क्रमांक ०७ दिनांक २४.३.२००९ रककम रू.४,१४,९३९/- ही तिन्ही देयके अदा करण्यात आली आहे त्याबाबतचे प्रमाणक क्रमांक व दिनांक लेखापरीक्षण पथकास तपासणी करीता उपलब्ध करून देण्यात आले नाहीत.

विभागाने मुद्या क्र. १ ते ४ बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. करिता संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१७ :स्वच्छतेतून उत्तम आरोग्याकडे या विषयावरील ध्वनिचित्रफित व डाक्युमेन्ट्री तयार करणे बाबत.**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने महापौर बंगला येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात सार्वजनिक जीवनातील स्वच्छतेचे महत्व पटवण्यासाठी स्वच्छतेतून आरोग्याकडे या विषयावर एक चित्रफित दाखविण्यात आलेली होती. सदरील चित्रफित ही अत्यंत उद्‌बोधक व स्वच्छतेचे महत्व प्रभावीरित्या दाखवणारी आहे. संचिकेतील पत्र जा.क्र./मनपा/पर्यटन कक्ष/२००८-०९/३७९, दिनांक २.८.२००८ नुसार औरंगाबाद मनपास २५ ते ३० मिनिटे कालावधीची डॉक्युमेन्ट्री तयार करावयाची आहे. सदरील कामासाठी शहरातील विविध बाबींचे चित्रीकरण करून २५ ते ३० मिनिटे कालावधीची डबींग एडीटींग व निवेदन यासह डॉक्युमेन्ट्री तयार करण्यासाठी व सिडी कॉपीज एच.डी.डी.करण्यासाठी दरपत्रके /कोटेशन मागविण्यात आले असता एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली. त्या दृष्टीने सर्वात कमी दराची निविदा मे.गुरूकृपा फोटो स्टुडिओ यांचे शुटींग व डॉक्युमेन्ट्री / व्हीडीओ कॅप्चरिंग /एडीटींग/डबींग साठी रु.१,३०,००० व सिडी कॉपीज एच डी.डी. साठी प्रति कॉपीज रु.३००/- आणि देयकाप्रमाणे सर्व्हीस टॅक्स आकारण्यात येईल. त्यास संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-४ परिच्छेद क्र.१३ अन्वये मा.उप-आयुकत (प्र) व मुख्य लेखाधिकारी यांच्या मंजूरीनुसार मे.गुरुकृपा फोटो स्टुडिओ यास ३८५(A)/ २००८-०९, दिनांक ५.८.२००८ नुसार आदेश देण्यात आले.

संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मे.गुरूकृपा फोटो स्टुडिओ यांनी शहरातील विविध भागातील शुटींग व डॉक्युमेन्ट्री /व्हीडीओ कॅप्चरींग /एडीटींग/डबींग/ ऑडिओ म्युझिक इत्यादी काम शहरातील विविध भागाची शुटींग करणेचे परि.क्र. एनएस-२ मध्ये प्रस्तावित आहे. मात्र प्रस्तावित केल्याप्रमाणे सदरील काम हे प्रत्यक्षात झालेले नाही.

२. शहरातील विविध भागाची शुटींग करून त्याच्या सिडी तयार करण्यासाठी एकूण रक्कम रू.२,१०,६५१/- इतका खर्च करण्यात आला. परंतू सदरील खर्च करण्यासाठी निविदा न मागविता कोटेशन मागवून खर्च करण्यात आले. म्हणजेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९,प्रकरण ५ (२) (१) नुसार निविदा वर्तमान पत्रात प्रसिध्दी करून मागविणे बंधनकारक असतांना निविदा न मागविता कोटेशन मागवून खरेदी करण्यात आले.

३. शहरातील विविध भागाची शुटींग करून त्याच्या सि.डी. करण्यासाठी रक्कम रू.२,१०,६५१/- इतका खर्च करण्यात आला. सदरील खर्च कोणत्या वर्षाच्या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात आला हे उपलब्ध अभिलेख्यावरून स्पष्ट झाले नाही.

४. मे.गुरूकृपा फोटो स्टुडिओ यांनी स्वच्छतेतून उत्तम आरोग्याकडे या कार्यक्रमाच्या एकूण ५०० कॉपी विभागास दिल्या बाबत डिलेव्हरी चालान नाही, त्यामुळे प्रत्यक्षात तेवढ्या प्रती मिळाल्या किंवा नाही याची खात्री करता आली नाही.

५. स्वच्छतेतून आरोग्याकडे याच्या चित्रफिती एकूण ५०० सिडीज घेण्यात आल्याचे नमूद केले असून सदरील सिडी कोणकोणत्या विभागास किंवा कोणाकोणास देण्यात येवून सदरील चित्रफित दाखविण्यात आल्या याबाबतचे रजिस्टर किंवा लेखे उपलब्ध करून देण्यात आले नाही.

विभागाने मुद्या क्र. १ ते ५ बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. करिता संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१८ :संगीत प्रशिक्षण कार्यशाळा : महानगरपालिका शाळा**

पत्र दिनांक ४.१.२००८ नुसार नाद फौंडेशन या संस्थेचे महानगरपालिका शाळातील विद्यार्थ्यांमध्ये संगीताची आवड निर्माण व्हावी व त्यातून कलाकार निर्मिती व्हावी या दृष्टीने सात दिवसीय संगीत कार्यशाळेचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला. तसेच जे विद्यार्थी पारंगत होवू इच्छितात. त्या विद्यार्थ्यांना संस्था पुढील मार्गदर्शन संस्थेच्या गुरूकुलात मोफत करेल असेही आश्वासित केले. त्यास अनुसरून महिला व बालकल्याण समितीने ठराव क्र.५ दिनांक २२.१०.२००८ अन्वये इयत्ता ४ थी ते ७ वी मधील विद्यार्थ्यांकरीता सात (७) दिवसाचे संगीत कार्यशाळेचे आयोजन करण्यास व त्यावर अंदाजे रु.३.०० लक्ष सन २००८-०९ चे अर्थसंकल्पिय तरतूदीमधून खर्च करण्यास मंजूरी दिली.

त्यानुसार संस्थेस जा.क्र./मनपा/मबाकस/५७४/२००८, दि.१८.१२.२००८ नुसार आदेश देण्यात आले व करारनामा करण्यात आला.

या प्रकरणी खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

१. नाद फौंडेशन या संस्थेचे धर्मदाय आयुक्त यांचे नोंदणी प्रमाणपत्र व ऑडीट रिपोर्ट आणि त्या संबंधित सर्व कागदपत्रे लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

२. कार्यादेश दिनांक १८.२.२००८ मध्ये विद्यार्थ्यांचे वर्ग नमूद केले नाहीत. वास्तविक मंजूर ठरावानुसार फक्त ४ थी ते ७ वी मधील विद्यार्थ्यांकरीताच सात दिवसाचे एकाच शाळेचे आयोजन करणे अभिप्रेत होते. याबाबत खुलासा आवश्यक आहे.

३. संचिकेतील सी-९ वरील दिनांक २२.१०.२००८ रोजी संपन्न झालेल्या महिला व बालकल्याण समिती सभेचे इतिवृत्तात औरंगाबाद महानगरपालिका शाळेतील इ.४ थी ते ई.७ वी च्या विद्यार्थ्यांमध्ये संगीत विषयाची गोडी लागावी व विद्यार्थ्यांमधील कलेला प्रोत्साहन मिळावे यासाठी विषय क्र.५ अन्वये ठराव सर्वानुमते मंजूर केलेला होता. प्रत्यक्षात नाद फौंडेशन यास प्रति विद्यार्थी रु.३०/- प्रमाणे एकूण विद्यार्थी ९५१६ नुसार रु. २,८५,४८०/- रु. अदा करण्यात आले. त्यात १ ली पासूनच्या विद्यार्थ्यांचा समावेश केलेला आहे , जो ठरावातील निर्देशांचे विपरित आहे. महानगरपालिकेच्या शाळांमधील ४ थी ते ७ वी या वर्गातील विद्यार्थी संख्या

५३६१ एवढी होती. त्यानुसार केवळ रक्कम रू. १,६०,८४०/- प्रदान होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात १ ली , ३ री या वर्गातील विद्यार्थी संख्या ४१५५ चा समावेश करून रू.१,२४,६५०/- चा अनधिकृतपणे जास्तीचा खर्च करण्यात आलेला आहे. जो लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही. करिता सदरील रक्कम रू.१,२४,६५०/- हे वसूल करून मनपा फंडात जमा करावे.

४. संचिकेतील पृष्ठ क्र. सी-३१७ व ३२१ वर केंद्रीय प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर यांच्या प्रमाणपत्रावर दिनांक १२.१२.२००८ पासून ते २३.१२.२००८ पर्यंत व मनपा प्रा.शाळा गारखेडा यांच्या अहवालावर दिनांक ११.१२.२००८ पासून ते दिनांक २२.१२.२००८ या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहेत. मात्र नाद फौंडेशन यांना कार्यादेश जा.क्र.मनपा/मबाकस/५७४/२००८, दिनांक १८.१२.२००८ रोजी आदेश देण्यात आले आहे. या संदर्भात उपरोक्त संस्थेचे पत्र दिनांक १९.१२.२००८ नुसार कार्यशाळेचे आयोजन १९.१२.२००८ ते दिनांक ३१.१२.२००८ या कालावधीतच होणे अपेक्षित होते. म्हणजेच नमूद दोन्हीही शाळेतील विद्यार्थ्यांना कार्यादेशापूर्वीच प्रशिक्षण दिल्याचे मुख्याध्यापकांच्या प्रमाणपत्रावरुन दिसून आले आहे. याबाबत संयुक्तिक खुलासा होणे आवश्यक आहे.

५. कार्यादेशामध्ये परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार मनपाच्या शाळेतील एकूण पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांची निवड गुरूकूलातील मोफत प्रशिक्षणासाठी करण्यात यावी व प्रशिक्षण कार्यशाळेचा दर्जा गुणवत्ता पूर्ण राहील याची दक्षता घ्यावी असे प्रकर्षाने नमूद केलेले आहे. त्यानुषंगाने मनपाचे शाळेतील एकूण ९५१६ विद्यार्थ्यांपैकी एकाही पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांची निवड गुरूकुलातील मोफत प्रशिक्षणासाठी करण्यात आली असल्याचे संचिकेवरून दिसून आलेले नाही. त्यामुळे ज्या उद्येशाने रू.२,८५,४८०/- एवढा खर्च केला तो निष्फळ ठरला आहे, याबाबत विभागाने आपले अभिप्राय देणे आवश्यक आहे.

करिता वरील मुद्या क्र.१,२,४,५ आणि मुद्या क्र.३ बाबत रक्कम रू. १,२४,६५०/- वसूल करून तसा लेखी खुलासा तीन दिवसांत लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अद्यापपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. आणि रक्कम रू.१,२४,६५०/- अद्यापपर्यंत वसूल केलेले नसल्याने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१९ : महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत चारचाकी वाहन प्रशिक्षणा बाबत. (एकूण खर्च रू.८,१३,८००/-)**

सन २००८-०९ या वर्षाच्या लेखापरीक्षणा दरम्यान महिला व बाल कल्याण समिती सभापती अंतर्गत चार चाकी वाहन प्रशिक्षण हे मनपा हद्यी अंतर्गत रहिवाशी गरीब महिला, मागासवर्गीय आर्थिक दुर्बल घटक यांना देणे करीता प्रत्येक एका वॉर्डामधून तीन लाभार्थीची निवड करणेत येवून या करीता निवड झालेल्या लाभार्थींना प्रशिक्षण शुल्काचे १०% रक्कम भरणे अपेक्षित होते. प्रशिक्षणाकरीता अंदाजित खर्च सहा ते सात लक्ष अपेक्षित असल्याचे दर्शविले आहे. सदरील प्रशिक्षण हे प्रथमत: B.P.L. लाभधारकांना लाभ देण्याकरीता नियोजित केले होते. त्यानुसार संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-३ परिच्छेद क्र.७ अन्वये मा.आयुक्त यांनी प्रस्तावास मंजूरी दिली आहे. सदरील खर्च सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करावयाचा होता. त्यानुसार निविदा वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात आली असता. हिंदुस्थान मोटार ड्रायव्हींग स्कुल, ए.एस.मोटार ड्रायव्हींग स्कुल, ओंकार मोटार ड्रायव्हींग स्कुल, आकाश मोटार ड्रायव्हींग स्कुल यांच्या निविदेत त्यांनी रू.२९००/- दिलेला दर असून मा.उपआयुक्त (प्र)

यांच्याशी चर्चाअंती प्राप्त दरांमध्ये रू.२६००/- मध्ये प्रशिक्षण देण्यास संमती दर्शविली. त्यास मा.आयुक्त यांची दिनांक १२.११.२००८ नुसार मंजूरी प्राप्त झाली असून त्यानुसार चारही एजन्सीला जा.क्र.मनपा/मबाकस /३६ /२००८-०९, दिनांक ४.२.२००९ नुसार कार्यादेश देण्यात आले आणि चारही एजन्सीधारकाकडून करारनामा करण्यात आला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ए.एस.मोटार ड्रायव्हींग स्कुल | <u>३६</u><br>४.२.२००९ | ३१.३.२००९ | २,०२,८००/- |
| २ | ओंकार मोटार ड्रायव्हींग स्कुल | <u>३६</u><br>४.२.२००९ | ३०.३.२००९ | २,१५,८००/- |
| ३ | आकाश मोटार ड्रायव्हींग स्कुल | <u>३६</u><br>४.२.२००९ | ३०.३.२००९ | २,००,२००/- |
| ४ | हिंदुस्थान मोटार ड्रायव्हींग स्कुल | <u>३६</u><br>४.२.२००९ | ३१.३.२००९ | १,९५,०००/- |

१. ओंकार मोटार ड्रायव्हींग स्कुल, यांच्या चारचाकी वाहनचालक प्रशिक्षणामध्ये १) श्रीमती अनिता आर.राजपुत, वय ३२, रा.शिवराई ता.वैजापूर जि.औरंगाबाद लायसन नं.MH २०-२००९ ०००८६९५, दिनांक २१.३.२००९ २) श्रीमती रंजना विजय तुळशी वय,४४, रा.वेरूळ ता.खुल्ताबाद जि.औरंगाबाद.

सदरचे दोन्ही प्रशिक्षणार्थी हे मनपाच्या हद्यीबाहेरील असतांना प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला असल्याने दोन्ही प्रशिक्षणार्थीची घेण्यात आलेली रक्कम रू.५,२००/- हे वसूल करून मनपा फंडात जमा करावे.

२. आकाश मोटार ड्रायव्हींग स्कुल यांना ७७ प्रशिक्षणार्थींची रक्कम रू.२,००,२००/- देयक अदा केले. मात्र संचिकेतील C- २१३ ते C-२२७ अन्वये एकूण १७४ प्रशिक्षणार्थीना लायसन वाटप करण्यात आले. म्हणजेच आकाश मोटार ड्रायव्हींग स्कुल यांना ७४ प्रशिक्षणर्थींची रक्कम रू.१,९२,४००/- अदा करावयास पाहिजे असतांना ७७ प्रशिक्षणार्थींची रक्कम रू.२,००,२००/- अदा करण्यात आली. म्हणजेच जास्तीचे ३ प्रशिक्षणार्थ्यांची रककम रू.७८००/- संबंधितांकडून वसूल करून मनपा फंडात जमा करावे.

३. आकाश मोटार ड्रायव्हींग स्कुल यांच्या चारचाकी वाहनचालक प्रशिक्षणार्थी १) सुनिता एकनाथ खाजेकर, वय ३४ घ.नं.३४७७ सातारा लायसन नं. MH-२० २००९ ०००८६७६ दिनांक ८.३.२००९ अन्वये सदरील प्रशिक्षणार्थी हे मनपाच्या हद्यीबाहेरील असल्यास लाभ घेतल्याचे दिसून येते. मात्र हद्यीबाहेरील असल्याने संबंधित प्रशिक्षणार्थीची रक्कम रू.२६००/- वसूल करून मनपा फंडात जमा करावी.

विभागाने मुद्या क्र. १ ते ३ बाबत खुलासा सादर केलेला नाही. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२० :महिला व बालकल्याण समिती अंतर्गत अपंगासाठी तीन चाकी सायकल पुरविणे बाबत.**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या वतीने महानगरपालिका हद्यीतील विद्यार्थ्यांसाठी स्थानिक अपंग शाळेतील विद्यार्थ्यांसाठी व मनपा शाळेतील अपंग विद्यार्थ्यांना स्थानिक नागरीकातील १८ वर्षाखालील मुले / मुली व १८ वर्षावरील महिलांना, आर्थिक दुर्बळ घटकातील अपंग लाभार्थ्यांना तीन चाकी सायकल वाटप करण्याचे प्रस्तावित केल्यानंतर संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-३ परिच्छेद क्र.९ अन्वये मा.आयुक्त यांच्या मंजूरीअन्वये फेरनिविदा वृत्तपत्रातून प्रसिध्दी देवून निविदा खरेदीच्या अखेरच्या तारखेपर्यंत एकूण सात निविदा विक्री झाल्या व अखेरच्या तारखेपर्यंत एकूण सात निविदा दाखल झाल्या. निविदा उघडण्यात आल्या असता प्राप्त दराच्या रू.४२२५/- प्रति नग मे.जनता बाजार को.ऑप डिपार्टमेंटल स्टोअर्स यांचे दर प्राप्त झाले. तांत्रिक अहवालातील अ.क्र. ९ च्या त्रुटीच्या पूर्तता करण्याच्या अटीवर मा.आयुक्त यांची दिनांक १०.२.२००९ च्या मंजूरीअन्वये करारनामा करुन जा.क्र.मनपा/मबाकस/७०/२००८-०९, दिनांक २६.०२.२००९ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१ . महिला व बालकल्याण समिती विषय क्र.१९, दिनांक २९.५.२००७ अंतर्गत मनपा हद्यीतील विद्यार्थ्यांसाठी स्थानिक अपंग शाळेतील व मनपा अपंग शाळेतील विद्यार्थ्यांची आणि १८ वर्षावरील महिलांची यादी न मागविता तीन चाकी सायकली खरेदी करण्यात आल्या. त्यामुळे प्रत्यक्ष आवश्यकते नुसारच खरेदी केली असल्याबाबत लेखा परीक्षणात खात्री करता आलेली नाही.

२. संचिकेतील पृष्ठ क्र.१९, परिच्छेद क्र.६१,६२ अन्वये प्रेरणा ट्रस्ट औरंगाबाद -६९, पद्मविभुषण स्व.गोविंदभाई -२८ चैतन्यय कानिफनाथ अस्थिव्यंग विद्यालय -५१ असे एकत्रित एकूण १४८ तीन चाकी सायकली वाटप करण्यात आल्या. मात्र सदरील तिन्ही संस्थाची कोणत्या लाभार्थींना सायकली वाटप करण्यात आली यांची यादी किंवा त्यांची लेखे लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून देण्यात आलेले नाही, त्यामुळे सत्यता पडताळता आलेली नाही.

३. अपंगासाठी तीनचाकी सायकली पुरवठा करण्यासाठी कार्यादेश क्र.मनपा/मबाकस/७०/२००८-०९, दिनांक २६.२.२००९ च्या आदेशान्वये आय.एस.आय.मार्कच्या एकूण २०० नग तीन चाकी सायकलचा पुरवठा तीस दिवसाच्या आंत करावा. मात्र डिलेव्हरी चलन दिनांक २९.५.२००९ अन्वये सदरील एजन्सीधारकाने संबंधित पुरवठा ६३ दिवसांनी केलेला असल्याने संबंधित एजन्सीधारकावर दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

४. अपंगाच्या तीन चाकी सायकल पुरवठा करणेचे आदेश दि.२६.२.२००९ रोजी पारित करण्यात आलेले असून त्यानुसार संबंधित पुरवठा धारकांचे (डिलेव्हरी चलन) प्रमाणे दिनांक २९.५.२००९ रोजी एकूण २०० तिनचाकी सायकलीचा पुरवठा केलेला आहे. संचिकेतील पृ.क्र.एनएस-३० वर नमूद केल्यानुसार शिल्लक एकूण ३५ तीनचाकी सायकलीच्या दुरूस्तीबाबत विभागाने दरपत्रके मागविले असता, एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली. त्यापैकी सर्वात कमी दराची मे.आदित्य इन्टरप्रायजेस यांना मान्यता देवून कार्यादेश क्र.३६, दिनांक ३.२.२०१२ अन्वये एकूण ३५ नग तीनचाकी सायकलची किरकोळ दुरूस्ती/ संपूर्ण पेव्हर आयलींग प्रित्यर्थ रू.२७,९३५/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. मात्र सन २००८-०८ या

आर्थिक वर्षात तीन चाकी सायकल २०० नग आवश्यकता नसतांना खरेदी केल्याने त्याच वेळेस गरजू / गरीब लाभार्थींना वाटप करता आल्या नाही. त्यामुळे जास्तीचा खर्च रु.१,४७,८७५/- व दुरुस्तीचा खर्च रु.२७,९३५/- असा एकूण रु.१,७५,८१०/- इतक्या खर्चास संबंधित विभाग जबाबदार असून झालेला खर्च लेखापरीक्षण विभागास अमान्य आहे.

५. महिला बालकल्याण समिती, विषय क्र.१९, दिनांक २९.५.२००७ इतिवृत्तातील योजनेच्या निकष मधील अ.क्र.६ अन्वये मनपा शाळेतील व अपंग शाळेतील विद्यार्थी वगळता इतर लाभार्थ्यांना १०% रक्कम भरणे बंधनकारक असतांना असे इतर लाभार्थ्यांनी १०% रक्कम भरल्याबाबतची यादी / लेखे लेखपरीक्षणा दरम्यान उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

६. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम क्रमांक १४२ (२) अन्वये वाटपाबाबत कार्यवाही होणे आवश्यक होते. मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षात तीन चाकी सायकली एकूण २०० खरेदी केलेल्या आहे. परंतू वाटप रजिस्टर क्रमांक ११० लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष वाटप केव्हा झाले त्याची पडताळणी करता आलेली नाही.

मुद्या क्र.१ ते ६ बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. इतर अनियमिततेबाबत संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२१ :पिको फॉल शिवणंत्र खरेदी बाबत. (रक्कम रु.२९,७४,४००/-)**

दिनांक २६.८.२००९ रोजी संपन्न झालेल्या महिला व बालकल्याण समिती सभेत विषय क्र.१० अन्वये महिलांना स्वयं रोजगाराचे साधन प्राप्त व्हावे या दृष्टीने महिला व बालकल्याण समितीच्या वतीने महिलांना अनुदान तत्वावर पिको फॉल शिवणयंत्र खरेदीकरीता मा.आयुक्त यांची मान्यतेनुसार परिच्छेद क्र. १३९, दिनांक २७.६.२०११ अन्वये शासन दर करारानुसार प्रति वॉर्ड ५ नग शिवणयंत्र या प्रमाणे एकूण ५२ एड्स बाधित महिलांना असे ९९X५ = ५२० + ५२ = ५७२ नग शिवणयंत्र शासन दराप्रमाणे ५२००X५७२=२९,७४,४००/- इतका खर्च महिला बालकल्याण समिती या लेखाशिर्षातून करणे. पिको फॉल शिवणयंत्र शासनाच्या दर करारानुसार करण्यासाठी संचिकेतील पृष्ठ क्र. ६४ परिच्छेद क्र.२४६ अन्वये मा.आयुक्त यांच्या दिनांक २२.३.२०१२ च्या आदेशान्वये श्री.नाथ जनरल स्टोअर्स,अहमदनगर यांना कार्यादेश देण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. फुट ऑपरेटेड झिगझॅग पिको फॉल शिलाई मशिन स्टॅण्ड टेबल ट्रायरसहित ची खरेदी करतांना मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ (२) अन्वये रक्कम रु.२०००/- चे बॉन्ड लावणे आवश्यक असतांना बॉण्ड संचिकेत लावलेला नाही व करारनामा केल्याबाबत संचिकेत नाही.

२. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नियम क्रमांक १४२(२) अन्वये वाटपाबाबत कार्यवाही होणे आवश्यक होते. मात्र सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात पिको फॉल शिवणयंत्र एकूण ५७२ खरेदी केलेल्या आहे. परंतू स्टॉक रजिस्टर क्र.१०९, वाटप रजिस्टर क्रमांक ११० आणि रजिस्टर क्रमांक १११ लेखापरीक्षणा दरम्यान तपासणी केली असता रजिस्टर मध्ये अपूर्ण नोंद असल्याने किती शिलाई मशिन वाटप करण्यात आल्या व किती शिल्लक आहे याचा बोध होत नाही.

३. सदर योजना अनुदान तत्वावर देणे असल्यामुळे निवड झालेल्या लाभार्थीने (BPL) १०% सहभाग रक्कम व NBPL साठी १५% सहभाग रक्कम मनपा फंडात भरणे आवश्यक असेल. मात्र रक्कम भरणा केल्याबाबतचे लेखे लेखापरीक्षणास अपूर्ण स्वरूपात उपलब्ध करून दिल्याने सहभाग रक्कम मनपा फंडात भरणा झाली किंवा नाही याची खात्री करता आली नाही.

मुद्या क्र.१ ते ३ बाबत विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. करिता इतर अनियमिततेबाबत संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२२ : मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन, कचरामुक्त दिन म्हणून साजरा करणे बाबत. दिनांक १५ ,१६ व १७**

सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये सांस्कृतिक विभागामार्फत स्वच्छता व साफसफाई जनजागरण अभियानासाठी एकूण खर्च रू. १,२५,०००/- करीता मा.मुख्य लेखाधिकारी यांनी व मा.आयुक्त यांनी दिनांक ११.९.२००९ रोजी मंजूरी देण्यात आल्याचे संचिकेत नोंद आहे. यामध्ये स्वच्छतेसाठी जनजागरणासाठी एक लाख पॉम्पलेट छपाई रू.५०,०००/- इतका खर्च व सहा झोन मध्ये प्रत्येकी चार पथनाट्याद्वारे जनजागृती प्रमाणे एकूण २४ पथनाट्य करीता एकूण रू.५०,०००/- इतका खर्च व किरकोळ खर्च जसे व्हिडीओ शुटींग, होर्डींग साठी एकूण रू.२५,०००/- इतका खर्च हा पर्यटन कक्ष विभाग अर्थशिर्षातून करावा अशी सांस्कृतिक शाखेमार्फत शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच पथनाटयाकरीता अग्रिम रू.५०,०००/- मा.उपायुक्त (प्र) यांची संचिका परि.क्र.(१७) मध्ये मंजूरी घेतलेली आहे.

मात्र वरील प्रकरणी खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिका परि.क्र.१७ व १८ मध्ये मा.उपायुक्त (प्र) यांचे मंजूरीने रू.५०,०००/- चे अग्रिमचे समायोजन ६ महिन्याच्या आंत करावयास पाहिजे असतांना केल्याचे दिसून येत नाही. मात्र सदरील अग्रिम समायोजनाबाबत लेखा विभागास वारंवार लेखी पत्र देवून विचारणा केली असता अद्यापपावेतो समायोजनाबाबत कोणतेही लेखी पत्र लेखा विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही.

२. नाट्यसेवा औरंगाबाद यांना कार्यक्रम करणेचे मान्यता / आदेश नाही, प्रती कार्यक्रमास किती मानधन अदा करावे लागेल याचा उल्लेख्या नाही. एकूण ६ वॉर्डामध्ये २४ कार्यक्रम घेणार असे नमूद असतांना प्रत्यक्षात ३१ कार्यक्रम घेतल्याची नोंद आहे.

३. नाट्यसेवा, औरंगाबाद या संस्थेला कार्यालयीन आदेश देण्यात आलेले नाही व पथनाट्य कोणकोणत्या जागी व्हावे याबाबत संचिकेत उल्लेख नाही.

४. स्वच्छता व साफसफाई अभियानाबाबत मनपा वॉर्डात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाअंतर्गत वॉर्ड अधिकारी व स्वच्छता निरिक्षक यांना कार्यक्रमाची माहिती देण्यात आली नाही आणि झालेल्या कार्यक्रमाची वॉर्ड अधिकारी यांच्याकडून लेखी पत्र घेण्यात आलेले नसतांना देयक अदा करण्यात आले.

मुद्दा क्र.१ ते ४ बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. इतर अनियमिततेबाबत संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२३ :बाल आनंद महोत्सव बाबत.**

बालक दिनानिमित्ताने महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बाल आनंद महोत्सव दिनांक १४ नोव्हेंबर २००९ रोजी सिध्दार्थ गार्डन येथे आयोजित करण्यात आले. या महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, मनोरंजनाचे खेळ, बाळ जत्रा, चित्रकला हस्तकला आदी आयोजनासाठी कार्यक्रमासाठी सदर खर्च सांस्कृतिक कार्यक्रम एकत्रित या लेखाशिर्षकातून प्रस्तावित केला आहे. त्यानुसार सदरील कार्यक्रमावर एकूण खर्च रक्कम रू.१,४३,३६८/- करण्यात आले.

सदरील खर्चाबाबत संचिकेची तपासणी केली असता खालील खर्चाच्या तक्त्यावरुन आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | संस्थेचे नांव / एजन्सीचे नांव | देयक क्रमांक व दिनांक | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३१४६ १८.१.२०१० | आरती संजीव सोनार | ४५२ १५.११.२००९ | १०६६५/- | |
| २ | १३१४१ १८.१.२०१० | Navras Event Management | ८१ १४.११.२००९ | २१,४५०/- | |
| ३ | १३१४५ १८.१.२०१० | श्रीराम केटरर्स | ९१ १६.११.२०११ | १९,५९१/- | |
| ४ | १३१४३ १८.१.२०१० | मळगंगा मंडप डेकोरेटर्स | ७२ १८.११.२००९ | ९,२८०/- | |
| ५ | १३१४४ १८.१.२०१० | गीत - फुलोरा | १४.११.२००९ | ८,५००/- | |
| ६ | १३१४२ १८.१.२०१० | Adhunik Enterprice | १०२५ १४.११.२००९ | १८,६५०/- | |
| ७ | १३१३७ १८.१.२०१० | Pay to Mrs.Kulkarni D.B. | -- | ३८,३२५/- | |
| ८ | १३१३९ १८.१.२०१० | A & M Designer | ११२ १४.११.२००९ | ४,७७८/- | |
| ९ | १३१३८ १८.१.२०१० | साईकृपा इन्टरप्राईजेस | ३१८ १४.११.२००९ | ५०९६/- | |
| १० | -- | संत एकनाथ रंगमंदीर कॅन्टीन | ४३० १४.११.२००९ | ३४२८/- | |
| | -- | A& M Designer | १३६४ १४.११.२००९ | ३६०५/- | |

१. दिनांक १४.११.२००९ रोजी आयोजित बाल आनंद मेळावा कार्यक्रमासाठी संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-४ परिच्छेद क्र.१० नुसार मा.आयुक्त व मुख्य लेखाधिकारी यांनी दिनांक

१३.११.२००९ रोजी रक्कम रू.१०,००० चे अग्रिमास मंजूरी देण्यात आली. सदरील अग्रिम रक्कम कार्यक्रमास प्राप्त झाली असल्यास त्याचे समायोजन विभागाने केव्हा करण्यात आले याबाबत खुलासा व्हावा.

२. प्रमाणक क्र.१३१३७, दिनांक १८.१.२०१० अन्वये मुलांना येण्या-जाण्यासाठी संचिकेतील पृष्ठ क्र. एनएस-२ वर अ.क्र. III मध्ये प्रति विद्यार्थी रू.१५/- (खाडाखोड करण्यात आली) दर ठरविलेले होते. त्यानुसार प्रमाणकातील मनपाच्या एकूण ९ शाळेतील विद्यार्थी १५६४ कार्यक्रमासाठी उपस्थित झाले असता त्यांचा एकुण खर्च प्रति विद्यार्थी २० प्रमाणे रक्कम रू.३१२८०/- अदा करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात येण्या-जाण्यासाठी प्रति विद्यार्थ्यांची रू.१५/- प्रमाणे एकूण विद्यार्थी १५६४X१५= २३,४६०/- खर्च इतकी रक्कम अदा करणे ऐवजी रू.३१,२८०/- इतका खर्चाचे देयक अदा केलेले आहे. म्हणजेच रू.७८२०/- इतका जास्तीचा झालेला खर्च वसूल करुन मनपा फंडात जमा करून तसा खुलासा सादर करावा.

३. संचिकेतील देयक क्र.४३० दिनांक १४.११.२००९ रू.३४२८/- व देयक क्र.१३६४ दिनांक १४.११.२००९ रू.३६०५/- ही दोन्ही देयक अदा करण्यात आले आहे किंवा नाही याबाबत खुलासा व्हावा.

४. प्रमाणक क्र.१३१४२ दिनांक १८.१.२०१० आधुनिक इन्टरप्राईजेस देयक क्र.१०२५ दिनांक १४.११.२००९ रू.१८६५०/- नुसार ड्राईंग कीट, ड्रॉईंग पेपर, पेन्सिल, रबर, रंगपेटी,शॉर्पनर प्राप्त झाल्याबाबत डिलेव्हरी चालन किंवा संबंधित विद्यार्थी दिल्याबाबतची नोंद संचिकेत दिसून आलेली नाही.

विभागाने मुद्या क्र.१ ते ४ बाबत खुलासा सादर केलेला नाही. तसेच मुद्या क्र.२ मधील जास्तीची रक्कम रू.७८२०/- अद्यापही वसूल केलेली नसल्याने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२४ :तथागत महानाट्य सादर करणे बाबत (एकूण खर्च रू. १९,६९,४०८/-)**

सन २००९-२०१० या वर्षामध्ये महानगरपालिका वर्धापन दिनानिमित्त तथागत महानाट्य कार्यक्रमाचे आयोजन करणेस्तव दिनांक ११.१.२०१० रोजी मा.महापौर, यांचे दालनात झालेल्या बैठकीनुसार दिनांक १४,२५ व २६ जानेवारी २०१० असे तीन दिवस तथागत गौतम बौध्द यांचे जिवनावर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले. प्रकरणी दिनांक २०.१२.२००७ रोजीच्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.४८ नुसार मान्यता व दिनांक १२.०१.२०१० रोजी मा.आयुक्त यांची रू.२० लक्ष खर्चास मान्यता आहे. यानुसार श्री.शैलेंद्र बागडे यांना ३ दिवसाच्या कार्यक्रमासाठी १३ लक्ष मानधन देणेस्तव मान्य केले, सदरील मानधन देणेकरीता मा.उपायुक्त (प्र) यांचेशी चर्चानुसार ५०% मानधन पहिल्या प्रयोगाचे दिवशी व उर्वरीत ५०% मानधन अंतिम प्रयोगाचे दिवशी अदा करावे असे ठरले.

आयोजित कार्यक्रमाचा लाभ नागरीकांना चांगल्या प्रकारे मिळणेच्या हेतूने व नियंत्रणाचे दृष्टीने प्रवेश मूल्य रू.१०/-,२०/-,३०/- असे ठेवणेत आले असून सदरील प्रवेशिका मराठवाडा सांस्कृतिक मंडळावर व मनपा वॉर्ड कार्यालयांमध्ये दिनांक २१.१.२०१० पासून उपलब्ध होतील अशी प्रेस नोट प्रसिध्दीस दिलेली आहे.

या करीता संचिका पृ.क्र.सी-३/५६ वर डिलेवरी चालन क्र.९९ दिनांक २१.१.२०१० अन्वये तिकीट मुल्य रू.१०/-, २०/-, ३०/-, छपाई करून प्राप्त  झालेले आहे. त्यावर रू.८९४०/- छपाई खर्च करण्यात आला आहे.  तिकीट दर प्रमाणे तपशिल खालील प्रमाणे -

दिनांक २४.०१.२०१० चे - ५०००
दिनांक २५.०१.२०१० चे - ५०००  **१३,००० X १०= १,३०,०००/-**
दिनांक २६.०१.२०१० चे - ३०००

दिनांक २४.०१.२०१० चे - ४०००
दिनांक २५.०१.२०१० चे - ४०००  **१०,००० X २०= २,००,०००/-**
दिनांक २६.०१.२०१० चे - २०००

दिनांक २४.०१.२०१० चे - ३०००
दिनांक २५.०१.२०१० चे - ३०००  **७,००० X ३०= २,१०,०००/-**
दिनांक २६.०१.२०१० चे - १०००  **एकूण रक्कम रू.५,४०,०००/-**

वरील प्रमाणे तिकीटांची छपाई करण्यात आली.

संचिका पृ.क्र.सीएस-४८ नुसार पत्र क्र.मनपा/सांस्कृत /२७, दिनांक २२.०१.२०१० अन्वये वॉर्ड अधिकारी (अ ते ई ) महानाट्य तथागत चे तिकिट विक्री दिनांक २४.०१.२०१० ते दिनांक २६.०१.२०१० असे तीन दिवसाकरीता तिकीट पुस्तके विक्री करीता खालील प्रमाणे वितरीत करणे येवून त्यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

वॉर्ड - अ ते ई यांना रू.१०/-, रू.२०/- व रू.३०/- चे एकूण १९८ तिकीट पुस्तकांचे रक्कम रू.३,२४,०००/- तसेच पत्र क्र.मनपा/सांस्कृतिक /२०१० /३६ , दिनांक २३.१.२०१० अन्वये मा.उपायुक्त (प्र) यांचे स्वाक्षरीने श्री.वसंत सिताराम पंडीत, रा.भिमनगर भावसिंगपुरा यांना तिकीट विक्री करीता तिकिटाच्या विक्रीच्या रकमेवर २५% रक्कम अदा करणेत येईल असे नमूद केलेले  आहे.

उक्त प्रमाणे प्रकरणाची तपासणी अंती खालील प्रमाणे आक्षेपित मुद्दे निदर्शनास येतात.

१. दिनांक २१.१.२०१० ते दिनांक २६.१.२०१० या कालावधीत तथागत भगवान बुध्द यांचे जिवनावर आधारित महानाट्याचे सादरीकरणाकरीता करारनामा करणेत आलेला नाही.

२. रू.१०/-, २०/-,३०/- च्या एकूण किती आल्या सांस्कृतिक मराठवाडा मंडळ, वॉर्ड कार्यालय, व श्री.वसंत सिताराम पंडीत यांना किती प्रवेशिका विक्रीकरीता दिल्या किती विक्री झाल्या ? किती शिल्लक आहेत ? याचा ताळमेळ दिसून आलेला नाही.

वरील ठिकाणी दैनंदिन विक्री झालेल्या प्रवेशिका पोटी एकूण किती रक्कम प्राप्त झली व प्राप्त रक्कम त्याच दिवशी मनपा फंडात भरणा केल्या बाबतचा तपशिल / नोंद संचिकेमध्ये किंवा तसे स्वतंत्र लेखे तपासणीसाठी उपलब्ध करून दिलेले नाहीत. तसेच विक्री न झालेले तिकिट लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करून दिलेले नाहीत.

३. संचिका पृ.क्र. एनएस-०५ मधील परि.क्र.(७) चे A, B, C, नुसार उक्त खर्चासाठी इतर माध्यमातून निधी उभारता येईल, जसे - Bank Sponsership, Tea stall, Parking charges, etc असे नोंदविलेले आहे. परंतू प्रत्यक्षात या माध्यमातून किती निधी प्राप्त झाला याचा सविस्तर अहवाल लेखापरीक्षणा करीता उपलब्ध झाला नाही.

वरील तपशिला अभावी कार्यक्रमावर केलेला खर्च रु.१९,६९,४०८/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

विभागाने मुद्या क्र.१ ते ३ बाबत खुलासा सादर केलेला नाही. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. :महाराष्ट्र गड दर्शन हा उपक्रम महानगरपालिका शाळांमध्ये राबविणेबाबत.(एकूण खर्च रु.२,३३,५२०/-)**

या अंतर्गत सन २००९-१० या वर्षामध्ये विभागामार्फत महाराष्ट्र गड दर्शन उपक्रम अशिष म्युझिक व्हिजन यांच्यातर्फे माहितीपट दाखविणेबाबत संचिका परि. क्र. (१) मध्ये मा.आयुक्त यांची मान्यता आहे. प्रस्तावित उपक्रमाचा लाभ होणेकरीता मनपाचे शाळेतील साधारण २०,०००/- विद्यार्थी लाभ घेतील यामुळे विद्यार्थ्यांना इतिहस या विषयाकरीता अभ्यासात उपयोग होवून इतिहासाची गोडी निर्माण होईल अशी विभागाची धारणा आहे. याप्रमाणे संबंधितास तसा कार्यादेशात करारनामा करुन घेण्यात आला.

१. मनपाच्या शाळेत महाराष्ट्र गड दर्शन हा माहितीपट विद्यार्थ्यांना दाखविणे करीता शासन निर्णय २ जानेवारी १९९४ मधील तरतूदीनुसार निविदा न मागविता संबंधित एजन्सी यांना कार्यादेश देवून अशिष म्युझिक व्हिजन यांना देयक क्र. निरंक दिनांक २७.१०.२००९ अन्वये एकूण विद्यार्थी = १९४६०X१२ २,३३,५२०/- प्रमाणे दिनांक ११.११.२००९ रोजी अदा करण्यात आलेले आहे.

२. महाराष्ट्र गड दर्शन हा व्हिडीओ पट महापालिका शाळेमध्ये दाखविल्याबाबत विविध शाळेचा अहवाल संचिका पृष्ठ क्र.३० , ३२ मध्ये मनपाचे विविध शाळेतील उपस्थित विद्यार्थी संख्या यांची एकूण बेरीज १८७५२ अशी येते. त्यानुसार १८७५२X१२=२,२५,०२४/- ऐवजी १९४६०X१२=२,३३,५२०/- म्हणजेच रु.८४९६/- चे जास्तीची रक्कम अदा झालेली वसूल करुन मनपा फंडात भरणा करावी.

विभागाने मुद्या क्र.१ ते २ बाबत खुलासा सादर केलेला नाही. तसेच मुद्या क्र.२ मधील जास्तीची रक्कम रु.८४९६/- अद्यापही वसूल केलेली नसल्याने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२५ :MS.CIT प्रशिक्षणाबाबत.(एकूण खर्च रु.७,४२,५००/-)**

सन २००९-१० व सन २०१०-११ या वर्षाचे खर्चामध्ये MS.CIT प्रशिक्षणाकरीता महिला व बाल कल्याण समिती विषय क्र.०५ दिनांक २६.८.२००९ रोजी ठराव मान्य झाल्याने सदर योजना राबविणे बाबत प्रस्ताव कार्यवाहीअंतर्गत आहे.

संचिका पृ.क्र.एनएस/०९ मध्ये परि.क्र.३८ ते ४२ प्रमाणे MS.CIT प्रशिक्षणार्थीसाठी MKCL ने परवानगी असलेले संस्था मार्फत निविदा मागविलेल्या आहे. परि.४५ नुसार MSCIT प्रशिक्षणाकरीता एकूण -१६ निविदा प्राप्त झाल्या व तयाचा तपशिल खालील प्रमाणे असे नमूद आहे. सर्व निविदाधारकाने रू.२५००/- प्रति विद्यार्थ्यांप्रमाणे निविदा दर सादर आहेत. सर्व निविदाधारकांनी कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे असे कक्ष प्रमुख महिला व बालकल्याण यांनी नमूद केलेले आहे. त्यानुसार लेखाविभागामध्ये निविदा उघडण्यात आल्या त्या कागदपत्र स्कूटनी/ निविदाधारक यादी - मधील अ.क्र.११ मध्ये स्टर्लिंग इन्फोटेक यांची संस्था नोंदणीकृत असल्याचे वृत्त नाही, अनुभव प्रमाणपत्र नाही, दोन वर्षाचे आयकर भरल्याचे कागदपत्र नाही, दोन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट नाही, पॅनकार्ड नाही, त्यामुळे त्यांचे निविदा invalid रद्य/ अपात्र करणेत आली. त्यामध्ये निविदा उघडणारे / तपासणी करणारे अधिकारी, १) लेखाधिकारी २) कक्ष प्रमुख महिला व बालकल्याण समिती,३) मुख्य लेखाधिकारी यांनी दिनांक २.१.२०१० रोजी स्वाक्षरी केलेली आहे असे असतांनाही सदरील करारनामा करून घेतलेला आहे. त्यांना प्रशिक्षणाचे कार्यादेश दिल्याची प्रत संचिकेत उपलब्ध नाही. संबंधितास माहे ऑक्टो -२०१० रोजी एकूण -२२ प्रशिक्षणार्थी चे

प्रथम देयक २२ x १३०० = २८६००/-

दुसरे देयक - २२ x १२०० =२६,४००/-

एकूण रू. ५५,०००/- अदा करणेत आल्याचे संचिकेवरून दिसते.

संबंधिताची निविदा रद्य ठरविलेली असतांनाही त्यांचे मार्फत काम करून घेणे ही बाब नियमबाह्य / गंभीर स्वरूपाची असून तितका सदरचा खर्च लेखापरीक्षणास अमान्य आहे .

उपरोक्त बाबत विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. करिता इतर अनियमिततेबाबत संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२६ :शिक्षण व आरोग्य विषयावर जनजागरणसाठी लघुपट/ माहितीपटा बाबत / (रक्कम रू.६,००,०००/-)**

मनपा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक व आरोग्यासंबंधी जनजागृती करणेस्तव सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत रू.४.१९ लक्ष व आर.सी.एच. मधून रू.२.०० लक्ष असे एकूण ६.१९ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला. माहितीपट तयार करण्यासाठी वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दी करण्यात आल्या असता एकूण दोनच निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मक दृष्ट्या श्री.दत्त बहुउद्येशिय ग्रामीण विकास संस्था यांचे दर कमी प्राप्त झाल्याने त्यास मा.आयुक्त यांची दिनांक ८.६.२०१० अन्वये मंजूरी देण्यात येवून रू.१००/- च्या बॉन्ड पेपरवर करारनामा करून कार्यादेश क्र.३३६/२०१०, दिनांक ९.६.२०१० देण्यात आले.

संबंधित श्री. दत्त बहुउद्येशिय ग्रामीण विकास संस्था यांनी शिक्षण व आरोग्य या विषयावरील लघुपटाचे कामाचे देयक रक्कम रू.६,००,०००/- अदा करण्यात आले. संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. शिक्षण व आरोग्य या विषयावरील माहितीपट व लघुपट यांच्या निविदेतील नियम व अटीनुसार संस्था नोंदणी अधिनियम १९६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणीकृतचे कागदपत्रे संचिकेत नाही.

२. निविदेतील अटी नुसार दिग्दर्शकास माहितीपट तयार करण्याचा अनुभवाच्या आवश्यकतेबाबत CD/DVD जोडणे आवश्यक असतांना जोडण्यात आलेले नाही. तसेच संस्थेने ज्यांना जबाबदारी सोपविलेली असेल त्या बाबतचे अधिकारपत्र लेटरहेड वर सादर केलेले नाही. संस्थेचा किमान एक वर्षाचे ऑडिट अहवाल सादर केल्याचे संचिकेवरुन दिसून येत नाही.

३. शिक्षण व आरोग्य या विषयावर २५० DSR/३९०/४५०/७D या पैकीच्या कॅमेरावर शुटींग करुन १६ एम.एम. वर दाखविण्या योग्य सी.डी/ डी.व्ही.डी . तयार करुन देयकाची नोंद रजिस्टर क्रमांक १०९ घेण्यात आलेली नाही.

४. लघुपटाचा एकूण कालावधी ४० मिनिटांचा असल्यांबाबत कोठेच नोंद दिसून आलेली नाही.

५. लघुपटाच्या एकूण पाच प्रति प्राप्त झाल्याबाबत नोंद कोणत्या रजिस्टरवर घेण्यात आली.

६. शिक्षण व आरोग्य या विषयावरील लघुपट / माहितीपट तयार करुन मनपाच्या परवानगीने कुठे कुठे प्रदर्शित करण्यात आल्याबाबतची लेखे / अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

७. शिक्षण व आरोग्य या विषयावरील लघुपट / माहितीपट तयार करण्यासाठी करारनाम्यातील अट क्र. ११ अन्वये आदेश प्राप्त दिनांकापासून एक महिन्याच्या आंत चित्रीकरण न केल्यामुळे प्रतिदिन रु.१००/- प्रमाणे ६ दिवसाचे दंड रक्कम रु. ६००/- वसूल केलेले नाही.

विभागाने मुद्या क्र. १ ते ७ बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. तसेच ६ दिवसाची दंड रक्कम रु.६००/- अद्यापही वसूल केलेली नसल्यामुळे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२७ :महाराष्ट्र गड किल्ले दर्शन भाग-२ हा व्हिडीओ पट महानगरपालिका शाळांमध्ये दाखविण्याबाबत.**

या अंतर्गत सन २०१०-११ या वर्षामध्ये विभागामार्फत महाराष्ट्र गड किल्ले दर्शन भाग-२ उपक्रम आशिष म्युझिक व्हीजन यांच्यातर्फे माहितीपट दाखविणे बाबत संचिका पृष्ठ क्र. ५ परिच्छेद क्र.२६ अन्वये सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय तरतूद मधून खर्च करावे आणि संचिकेतील पृष्ठ क्र.७ परिच्छेद क्र.३६ व ३७ अन्वये मा. मुख्य लेखाधिकारी आणि मा.आयुक्त यांच्या मंजूरीन्वये निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाधारकामध्ये सर्वात कमी दराची निविदा मे.आशिष म्युझिक व्हिजन यांची प्राप्त झाली. वाटाघाटाअंती रु.१६ प्रति विद्यार्थी या दरात काम करण्यास तयार असून त्यास मा.आयुक्त यांची दिनांक २३.५.२०११ अन्वये मंजूरी देण्यात येवून करारनामा करुन कार्यादेश जा.क्र.मनपा/ मबाकस /१२१/२०११, दिनांक १४.७.२०११ अन्वये देण्यात आले.

संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. महाराष्ट्रातील विविध गडाची माहिती दर्शविणारा माहितीपट दाखविणे निविदा प्रपत्रातील नियम व अटीतील अट क्र.६ अन्वये गडाबद्यल माहितीदर्शक पुस्तिका सर्व विद्यार्थ्यांना पुरविण्यात आल्याबाबतचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

२. संचिकेतील निविदेतील अट क्र.७ अन्वये निविदे समवेत रू.५०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा देय धनाकर्ष मुख्य लेखाधिकारी महानगरपालिका , औरंगाबद यांचे नांवे सादर केलेला असून तो अद्यापपर्यंत संचिकेतच जोडलेला आहे. मात्र सदरील धनाकर्ष क्र. ९०८७४० दिनांक ७.५.२०११ हे मनपाच्या मुख्य कार्यालयाच्या लेखा विभागात जमा करणे आवश्यक असतांना जमा न केल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.

३. आशिष म्युझिक १० व्हीजन यास जा.क्र.मनपा/मबाकस/१२१/२०११ दिनांक १४.७.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. निविदेतील नियम व अअभ क्र. १० अन्वये दंडाची रक्कम रू.१००/- निश्चित करण्यात आलेली असतांना कार्यादेशात कार्यकाळ टाकणे आवश्यकच होते. मात्र कार्यकाळ दर्शविण्यात आलेला नसल्याने सदरील कार्यक्रम हे किती तारखेपासून किती तारखेपर्यंत राबविण्यात आला याचा बोध होत नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. संचिकेतील अटी व शर्ती नुसार सदरील कार्यक्रम दाखविल्यानंतर एकूण ४६ शाळेच्या मुख्याध्यापकाने प्रमाणपत्र सादर केलेले असून एकूण २२ शाळेच्या मुख्याधपकांनी / शिक्षकांनी दिनांक व वेळ न दर्शविता प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळा मिटमिटा | - | ५०० |
| २. मनपा प्राथमिक शाळा हर्सूल जेल | - | १५८ |
| ३. यशोधरा कॉलनी मनपा शाळा | - | ३०५ |
| ४. मनपा प्रा.शाळा खोकडपुरा | - | ६३ |
| ५. मनपा शाळा पोलिस हेडक्वॉर्टर | - | ६५ |
| ६. मनपा प्राथमिक /माध्यमिक शाळा बनेवाडी | - | ८५० |
| ७. मनपा प्राथमिक शाळा हर्सूल वसाहत | - | ३००८ |
| ८. मनपा के.प्रा.शा.सिडको एन-९ | - | १८७ |
| ९. मनपा प्राथमिक शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर उर्दु | - | ३५ |
| १०.मनपा प्रा.शा.उर्दु समतानगर | - | ६५ |
| ११.मनपा प्राथमिक शाळा सिल्कमिल कॉलनी | - | १४० |
| १२.मनपा प्राथमिक शाळा मंजुरपुरा | - | १२७ |
| १३.मनपा मा.वि.उर्दु शहाबाजार | - | ४२४ |
| १४.मनपा प्रा.शा.किराडपुरा न.३ मराठी/ उर्दु | - | ३०० |
| १५.मनपा प्रा.शा.रोजाबाग उर्दु | - | १६९ |
| १६.मनपा प्रा.शा.चेलीपुरा नं.५ | - | १५० |
| १७.मनपा प्रा.शा.पैठणगेट उर्दु | - | ५९६ |
| १८.मनपा प्रा.शा.गणेश कॉलनी उर्दु | - | ९९ |
| १९. मनपा प्रा.शा. कैसर कॉलनी | - | १२४ |
| २०.मनपा प्रा.शा.रेंगटीपुरा | - | १७८ |
| २१.मनपा प्रा.शा.मुजफ्फरनगर | - | ११२ |
| २२.मनपा प्रा.उर्दु शाळा समतानगर | - | ६७ |

सदरील वरील एकूण २२ मनपा प्रा.शाळेतील एकूण विद्यार्थी ५०१४ दर्शवून रक्कम रू.८०,२२४/- अदा करण्यात आले. मुख्याध्यापकांनी दिलेले प्रमाणपत्र हे अपूर्ण असल्याने ते ग्राह्य धरणे अयोग्य आहे. रक्कम रू.८०,२२४/- इतका खर्च लेखापरीक्षणास अमान्य आहे.

तसेच उक्त अ.क्र.२२ मध्ये मनपा प्राथमिक शाळा उर्दू समतानगर एकूण विद्यार्थी संख्या ६७ व अ.क्र.१० मधील मनपा प्रा.शा. शाळा उर्दु समतानगर विद्यार्थी संख्या एकूण ६५ असे दोन वेळा दर्शवून संबंधित संस्थास जास्तीची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

विभागाने मुद्या क्र.१ ते ४ बाबत खुलासा सादर केलेला नाही. तसेच मुख्याध्यापकांनी दिलेले प्रमाणपत्र हे अपूर्ण असल्याने ते ग्राह्य धरणे अयोग्य असल्याने रक्कम रू.८०,२२४/- इतका खर्च लेखापरीक्षणास अमान्य असल्याने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरूध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२८ : महाराष्ट्र महोत्सव या कार्यक्रमावर केलेल्या खर्चाबाबत.**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त १ मे २०१० च्या पूर्वसंध्येला दिनांक ३० मे २०१० रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे असे मा.विभागीय आयुक्त यांनी सूचविले व त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार लोकरंग सांस्कृतिक मंच ठाणे यांचा महाराष्ट्र महोत्सव कार्यक्रम घेण्याचे निश्चित झाले. या कार्यक्रमाकरीता कलावंतांचे मानधन त्यांच्या संचातील ४० कलावंतांचा भोजनाचा खर्च उद्घाटन कार्यक्रमपत्रिका व इतर किरकोळ खर्च एकूण १,०४,२४१/-एवढा करण्यात आला. या प्रस्तावास मा.आयुक्त, महानगरपालिका , औरंगाबाद यांनी अनुमती दर्शवून परिच्छेद ८ नुसार ७५,०००/- परि.१७ नुसार १०,२४१/- व परि.२६ नुसार १९,०००/- अशी एकूण रक्कम रू. १,०४,२४१/- खर्चास मान्यता दिलेली आहे.

वरील संचिकेच्या तपासणीअंती खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१) या कार्यक्रमाकरीता एकूण झालेल्या खर्चाचा तपशिल.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | कार्यालयीन पुरवठा आदेश क्र. व दिनांक | देयक क्र व दिनांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | रेवन फोटो स्टुडिओ, व्हिडीओ शुटींग | २१६/१० २३.४.२०१० | ७०१ ३.५.२०१० | १०,०००/- |
| २ | १)लोकरंग सांस्कृतिक मंच दल<br>२)नाट्यसेवा औरंगाबाद | | --<br>१५८६/१० ३.५.२०१० | ४९८५०/-<br>६७५०/- |
| ३ | नवरस इव्हेन्ट मॅनेजमेन्ट | | १६६/१० ३.५.२०१० | १८६४१/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | रॉयल कॉम्प्युटर & झेरॉक्स | | ११९४/१०<br>२५.५.२०१० | १९,०००/- |
| | | | **एकूण खर्च** | **१०४२४१/-** |

२) संचिकेतील पृष्ठ क्र.१५ अन्वये रक्कम रू.६५,०००/- अग्रिमाचे प्रमाणक, दिनांक ३०.४.२०१० नुसार जमा केल्याची पोच दिसून येते. मात्र संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-३ परि.क्र.११ अन्वये सदरील अग्रीम रक्कम प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे. परंतू तपासणीअंती प्रमाणकाची मूळ प्रत संचिकेमध्ये दिसून आली नाही. याबाबत खुलासा व्हावा.

३) पृष्ठ क्र.एनएस-३ परि.क्र.११ नुसार सदर कार्यक्रमाकरीता अग्रीम प्राप्त झाले नाही असे नमूद करण्यात आले आहे. मात्र सांस्कृतिक अधिकारी यांनी या कार्यक्रमाकरीता स्वत: रक्कम रू.५६,६००/- खर्च केलेला आहे ही बाब अनाकलनीय आहे . एवढी रक्कम अधिकारी स्वत: खर्च करु शकतो काय ? याबाबत लेखापरीक्षणात शंका उपस्थित होते.

४) कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाच्या मुद्या क्र.४ अन्वये महाराष्ट्र महोत्सव कार्यक्रमाकरीता रॉयल कॉम्प्युटर ॲन्ड झेरॉक्स फाजीलपुरा औरंगाबाद यांच्याकडून १००० नग कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाच्या निमंत्रण पत्रिक जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत १०००X१९= १९,०००/- च्या छपाई करण्यात आल्या आहे व त्याचे संपूर्ण देयक मनपाने अदा केले आहे सदरचा कार्यक्रम हा जिल्हाधिकारी कार्यालय व मनपा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे असे पृष्ठ क्र.एनएस-५ परि.क्र.१९ मध्ये स्पष्ट केलेले असून त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तरी संबंधित विभागाकडून अर्धा खर्च वसूल करून मनपा फंडात जमा करावा.

५) महाराष्ट्र महोत्सव या कार्यक्रमाकरीता रक्कम रू.१०४२४१/- एवढा खर्च करण्यात आला असून यांस मा.आयुक्त यांनी अनुमती दर्शविली आहे. या कार्यक्रमाकरीता कलावंतांचे मानधन त्यांच्या संचातील ४० कलावंतांचा भोजनाचा खर्च उद्‌घाटन कार्यक्रम पत्रिका व इतर किरकोळ खर्च एकूण १,०४,२४१/- झालेला आहे. मात्र हा खर्च जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिका यांच्या विद्यमाने करण्याचे ठरविण्यात आले असे पृष्ठ क्र. एनएस-५ व परि.क्र.१९ अन्वये दिसून येते. प्रत्यक्षात पूर्ण खर्च महानगरपालिका,औरंगाबाद यांनीच केल्याचे दिसून आले आहे. कार्यक्रम संयुक्तपणे राबवावयाचा असल्याने दोन्ही कार्यालयांनी खर्च करणे अपेक्षित होते, जेणेकरुन पूर्ण बोजा मनपाच्या तिजोरीवर पडला नसता. ही बाब आक्षेपार्ह आहे.

विभागाने मुद्या क्र.१ ते ५ बाबत खुलासा सादर केलेला नाही. इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२९ :विद्यार्थ्यांच्या आत्महत्यां विरोधात जनजागृती करणा-या कार्यक्रमाबाबत. (रक्कम रू.१,००,०००/-)**

दिनांक २० मे २०१० रोजी मिडीया केअर या संस्थेच्या माध्यमातून सरस्वती भवन महाविद्यालयाच्या प्रांगणात एका मनोरंजनापर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. मात्र केवळ मनोरंजन एवढाच याचा हेतू न ठेवता सध्या ज्वलंत असलेल्या विद्यार्थी आत्महत्या या विषयावर यामध्ये लक्ष केंद्रीत करण्यात येणार

आहे. तसेच गितांचे सादरीकरण झी टीव्हीवर झळकणारे कलाकार लिटील चॅम्प या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. त्या दृष्टीने सदरील कार्यक्रमासाठी महानगरपालिकेतील मुख्याध्यापक व प्रत्येक शाळेतील १३ ते १५ शिक्षक व शाळेतील २० विद्यार्थी यांना सवलतीच्या दरात तिकिटाची रक्कम रू.५००/- ऐवजी रू.४००/- मध्ये तर रू. १२५/- चे रू.१००/- मध्ये देवून तिनशे प्रवेशिका साठी रक्कम रू.१,००,०००/- खर्च करण्यात आला व मा.आयुक्त यांनी दिनांक १९.५.२०१० रोजी मंजूरी दिलेली आहे. दरम्यान संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरचा कार्यक्रम दर्शविण्याचा केवळ मनोरंजन एवढाच हेतू न ठेवता सध्या ज्वलंत असलेल्या विद्यार्थी आत्महत्या या विषयावर लक्ष केंद्रीत करण्यात येणार होते. तसेच यामध्ये मराठीतील गीत संगिताच्या साथीने मराठवाड्यातील विख्यात लोककलावंत श्री.निरंजन भाकरे आणि त्यांचे सहकारी लोककलेच्या माध्यमातून विद्यार्थी पालक आणि शिक्षक यांचेशी सुसंवाद साधणार व विद्यार्थी केवळ विद्यार्थी नसून त्यांच्या सर्वांगीण विकासात केवळ शाळेतील गुण उपयुक्त नसतात तर आयुष्यात येणा-या समस्यांशी लढत विजयी होणे महत्वाचे असते. सदर कार्यक्रमातून विद्यार्थी पालक व शिक्षक यांना सुसवांद साधण्याबाबत मनपाने या एका चांगल्या उपक्रमास रक्कम रू.१,००,०००/- ची मदत केली आहे. मात्र संचिकेत पृष्ठ क्र.२ परि.क्र.८ अन्वये दिनांक २२ मे २०१० रोजी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांना सुट्या असल्याचे विभागानेच स्पष्ट नमूद केलेले आहे. तरी हा कार्यक्रम सुटीच्या दिवशी घेतलेला असून कार्यक्रमाचा लाभ शाळेतील विद्यार्थी , पालक व शिक्षक यांना झालेला नाही. त्यामुळे कार्यक्रमाचा उद्येश पूर्ण झालेला नाही. याबाबत अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

२. मिडीया केअर, ठाणे या संस्थेकडून दिनांक २०.४.२०१० रोजी आयोजित कार्यक्रमाच्या सांस्कृतिक विभागाकडे रक्कम रू.५००/- च्या व २२५/- च्या व रक्कम १२५/- च्या १०० अशा एकूण ३२५ प्रवेशिका प्राप्त झाल्याबाबत पृष्ठ क्र. सी-३ वर पत्र संलग्न असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

**तिकिटे सोपविल्याचा तपशिल**

| तिकिट मूल्य | क्रमांकापासून | पर्यंत | एकूण तिकिटे | एकत्रित संख्या |
|---|---|---|---|---|
| ५००/- | **A - ५७६** | ८०० | २२५ | |
| १२५/- | **C - ५७६** | ६७५ | १०० | ३२५ |

एकूण ३२५ तिकिटांकरीता प्रमाणक २४०३, दिनांक १५.६.२०१० अन्वये संबंधितास रक्कम रू.१,००,०००/- अदा करण्यात आली. मात्र या कार्यक्रमाकरीता उक्त प्रवेशिका प्रत्यक्ष वाटप करण्यात आल्याबाबत विद्यार्थी , पालक व शिक्षक इत्यादीचे नांव स्वाक्षरीसह प्रमाणित यादी संचिकेत दिसून आली नाही. त्यामुळे ही तिकिटे वाटप केली किंवा कसे याबाबत साशंकता आहे व हा खर्च लेखापरीक्षण विभागास अमान्य आहे.

विभागाने मुद्या क्र.१ ते २ बाबत खुलासा सादर केलेला नाही. इतर अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३० : महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना अंतर्गत रात्र निवारा गृह सुरू करणे बाबत.**

मा.प्रधान सचिव यांच्या निर्देशानुसार रस्त्यावरील बालकांची फक्त रात्र निवा-याची सोय न करता त्यांचे पुर्नवसन औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील रस्त्यावरील बालकांना शोधून त्यांना बाल विकास प्रकल्प कार्यालय येथे आणून हे कार्यालय ज्या ठिकाणी त्या बालकांची रवानगी करेल त्या ठिकाणी जाऊन त्या संस्थेत नोंदणी करणे, नोंदणीनंतर ती संस्था या बालकांची इत्यंभूत माहिती ज्युडिसियल कमिटी यांना देवून, ० ते ६ वयोगटातील रस्त्यावरील बालकांना अनाथाश्रमामध्ये पाठवेल. तर ज्या ६ ते १८ वयापर्यंतच्या बालकांना बालकाश्रम किंवा सुधारगृह इ. ठिकाणी पाठविण्यात येईल या सर्व बालकांचा खर्च राहणे, खाणे-पिणे, शिक्षण, कपडे संस्था करेल. त्यांच्याकडे केंद्रशासनाचे अनुदान असते पण तरीही महापालिकेचे महिला व बालकल्याण समिती द्वारे गुणात्मक पुर्नवसनासाठी काही सहभाग नोंदविणे आवश्यक असल्याने ही योजना अंमलात आणण्यासाठी औरंगाबाद व त्या अनुषंगाने रिट पिटीशन क्र.१९६/२००१ नुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने एक लक्ष लोकसंख्येमागे एक रात्र निवारागृह उभे करण्याचे आदेशित केले असल्याने एक रात्र निवारागृह १०० बेघर व्यक्तीची व्यवस्था होवू शकते असे गृहित धरण्यात आले. नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई -३२ दिनांक ३१.५.२०११ च्या पत्रकान्वये औरंगाबद महानगरपालिकेत एकूण ११ रात्र निवारागृह सुरु करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यासाठी वृत्तपत्रात जाहिर निवेदन देवून स्थानिक स्वयंसेवी संस्थेकडून रात्र निवारागृह चालविण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आला. मा.आयुक्त यांनी दिनांक ३१.१०.२०११ च्या मंजूरीअन्वये करारनामा करून जा.क्र.मनपा /मबाकस/२०१/ २०११ दिनांक ३१.१०.२०११ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. सदर संस्थांना प्रति निवारागृह रु.३१,५००/- चे प्रदान करण्याचे मान्य करण्यात आले होते.

| अ.क्र. | स्वयंसेवी संस्थेचे नांव | रात्रनिवारा चालविण्याचे ठिकाण | रात्रनिवारागृह सुरु झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | साहित्य संस्कार प्रबोधिनी | मंजूरपुरा मनपा हॉल | ०६.०२.२०१२ |
| २ | साहित्य संस्कार प्रबोधिनी | सिडको एन-६ स्मशानभूमी समोर | ०१.०७.२०१२ |
| ३ | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था | गांधीनगर मॉडेल मिडल स्कूल इमारत | ३१.१०.२०११ |
| ४ | मराठवाडा ग्रामीण विकास संस्था | रेल्वेस्टेशन संत गाडगे बाबा हॉल | ३१.१०.२०११ |
| ५ | तिरुमला शिक्षण प्रसारक मंडळ | मिटमिटा व्यायाम शाळा इमारत | ३१.१२.२०११ |
| ६ | बोधी बहुउद्येशिय सेवाभावी संस्था | रमानगर | ०१.०४.२०१२ |
| ७ | संत गाडगे महाराज शिक्षण सांस्कृतिक क्रिडा मंडळ | कोहिनूर कॉलनी | ३१.१२.२०११ |
| ८ | इमॅन्युअल मिनिस्ट्रीज स्वयंसेवी संस्था | चिकलठाणा जुने वॉर्ड कार्यालय | ३१.१०.२०११ |
| ९ | जीवन जागृती वैद्यकीय व सामाजिक संस्था | मोतीकारंजा जुनी मनपा शाळा | ३१.१०.२०११ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | जीवन जागृती वैद्यकीय व सामाजिक संस्था | हर्सूल, हर्सूल वसाहत शाळेसमोरील इमारत | ३१.१०.२०११ |
| ११ | इमॅन्युअल मिनिस्ट्रीज स्वयंसेवी संस्था | मिसारवाडी (श्री. अंबिलढगे यांची इमारत गल्ली नं.१) | ०१.०९.२०११ |

याबाबत खालील मुद्यांवर खुलासा करण्यात यावा.

१. महिला बाल कल्याण समितीच्या वतीने रस्त्यावर एकटे राहणा-या ० ते १८ या वयोगटातील बालकांचा सर्वेक्षण करण्याचा कार्यक्रम सेवाभावी संस्थेला देण्यात आलेले होते. सर्व्हेत किती बालकांचे पुर्नवसन जिल्हा बाल कल्याण समिती मार्फत बालसुधारगृहात करण्यात आलेले आहे. सर्व्हेत किती बालकांचे बाल सुधारगृहात प्रवेश झाल्यानंतर सदर बालकांच्या शिक्षणासाठी येणा-या आवश्यक बाबींचा खर्च महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती मार्फत करण्यात आला आहे.?

२. महिला व बाल कल्याण समिती तर्फे सुरु करण्यात आलेले एकूण ११ रात्र निवारागृहामध्ये स्त्री पुरुषांची राहण्याची व्यवस्था वेगळी असून लाभार्थींना गादी, चादर, बेडशीट, उशी, टेलिव्हीजन, लॉकर्स, ऑफिससाठी टेबल, खुर्ची व कपाट इत्यादी साहित्य खरेदी केलेल्या असून त्या बाबतच्या संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. सदर खरेदी कोणत्या विभागाने केली, त्या संदर्भातील साठा नोंद वह्या तपासणी करीता उपलब्ध करून दिलेल्या नाहीत.

३. महिला व बालकल्याण समिती तर्फे सुरु करण्यात आलेल्या एकूण ११ रात्र निवारागृहावर महानगरपालिकेच्या वतीने नियुक्त अधिकारी भेट देवून कामाचा आढावा घ्यावा असे ठरले असतांना मनपाने कोणकोणत्या अधिका-याची नियुक्ती केली होती व त्यांनी सदरील एकूण ११ रात्रनिवारागृहावर भेट देवून कामाचा आढावा घेतला याबाबतची लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

४. महिला व बाल कल्याण अंतर्गत करारनामातील नियम व अटी शर्ती अन्वये रात्र निवारागृहातील विजेचे मासिक बील भरणे आवश्यक होते. मात्र सदरील एकूण ११ रात्र निवारागृहाचे दिनांक १.९.२०११ ते जानेवारी २०१३ पर्यंची मासिक विज बिले भरणा केल्याबाबतची बिले लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून दिलेली नाही. तरी संस्थेने मासिक विज बिलाचा भरणा केलेला असल्यास सांस्कृतिक विभागाने तसा भरणा केल्याबाबतचे लेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत.

विभागाने मुद्या क्र १ ते ४ बाबतचा सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. करिता अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

# *उद्यान विभाग*
## सन २००५-०६ ते सन २०१२-१३
## लेखापरीक्षण अहवाल

**प्रस्तावना :**

लेखापरीक्षण विभागाच्या लेखापरीक्षण कार्यक्रमानुसार उद्यान विभागाचे सन २००५-०६ ते सन २०१२-१३ पर्यंतचे चाचणी स्वरूपाचे नियमित लेखापरीक्षण करण्याबाबत कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेप/२०१३/१४१, दिनांक ११.६.२०१३ नुसार विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानुसार चाचणी लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने महानगरपालिकेअंतर्गत विविध उद्यानाचे संगोपन, संरक्षण व विकास इत्यादीबाबतच्या संचिका, व इतर अनुषंगिक बाबींच्या संचिका तपासण्यात आल्या असून विहित नमुन्यात रजि.क्र.१०९, रजि. क्र.११०, रजि.क्र.१११, ताळमेळ रजि. सदरील रजिस्टर मध्ये साहित्याच्या नोंदी अपूर्ण असल्याकारणाने ताळमेळ करता आले नाही.

उद्यान विभागाचे लेखापरीक्षण करीत असतांना महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात उद्यान विभागासाठी उपलब्ध असलेली अर्थसंकल्पिय तरतूद ही केवळ उद्यान विभागाचीच नसून या तरतूदीमध्ये उद्यान विभागाचे स्थापत्य कामे ही तांत्रिक विभागामार्फत केली जातात. त्यामुळे उद्यान विभागाचे केवळ विभागाने उद्यान विकसित केलेल्या कामाचे लेखापरीक्षण करण्यात आले. ज्यामध्ये उद्यानाचे संगोपन ,संरक्षण आणि विकास या बाबींचा समावेश आहे. तांत्रिक विभागातर्फे स्थापत्य कामाचे लेखापरीक्षण स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे.

त्यादरम्यान उद्यान विभागाचे जमा व खर्च बाजूचे लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण **१५५** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**उद्यान अधिक्षक यांच्या कार्यकाळाबाबत :**

सन २००५- २००६ ते सन २०१२-१३ या कालावधीत उद्यान अधिक्षक म्हणून कार्यरत अधिका-यांची नांवे आस्थापना -१ विभागाकडून प्राप्त झालेली आहेत ती खालीलप्रमाणे -

**उद्यान अधिक्षक**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| | श्री. जे.एम. भडके | दि. ०१.०३.१९८४ ते दि.३१.८.२०१० |
| | श्री. के.आर.कुलकर्णी | दि. १.९.२०१० (अति.कार्यभार ) |
| | श्री. विजय बापुसाहेब पाटील | दि ९.६.२०११ ते आजपावेतो. |

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-याची नांवे :**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक श्री.मो.रा.थत्ते यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे .

१. श्री. अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक
२. श्री. चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक
३. श्रीमती पंचशिला खरात, कनिष्ठ लिपीक

उद्यान विभागाकडील प्रलंबित लेखा परीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे सन २००५-०६ परि.क्र.३,४,५,

## जमा बाजू :

**परिच्छेद क्र.०१ :उद्यान विभागातील सामान्य पावती पुस्तक क्रमांक ११८३ मधील रक्कम भरणा केल्याबाबतचे कॅश रजिस्टर उपलब्ध करून देण्याबाबत.**

उद्यान विभागात जनरल पावती पुस्तक क्रमांक ११८३ पावती क्रमांक ११८२०१-११८२७२ पर्यंत पावतीद्धारे रक्कम वसूल केली आहे. त्याद्धारे रक्कम रू.२४२१२/- रकमेची वसूली केली आहे. परंतू भरणा केल्याबाबतचे कॅश रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही. पुस्तक क्र.११८३ मधील खालील पावत्यांचे मनपा फंडात भरणा झाले किंवा नाही याबाबत साशंकता निर्माण होते.

**झाड तोडण्याकरीता अनामत रक्कम बुक क्र.११८३**

| अ.क्र. | रक्कम भरणा-याचे नांव | बुक क्रमांक | पावती क्रमांक | दिनांक | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | संजय बाबुराव बु-हाडे | ११८३ | ११८२०१ | २०.०८.९७ | ५००/- |
| २ | श्री.अनिस खान | ११८३ | ११८२०२ | २६.११.९७ | ५००/- |
| ३ | श्री.नासेर खान | ११८३ | ११८२०३ | २६.११.९७ | ५००/- |
| ४ | श्री.अफ्रोस खान | ११८३ | ११८२०४ | २६.११.९७ | ५००/- |
| ५ | श्री.सरवर खान | ११८३ | ११८२०५ | २६.११.९७ | ५००/- |
| ६ | श्री.राधाकिसन परेकर | ११८३ | ११८२०६ | २६.११.९७ | ५००/- |
| ७ | श्री.अशोक गणपत तेलभाते | ११८३ | ११८२०७ | २६.११.९७ | ५००/- |
| ८ | श्री.आर.टी.देव | ११८३ | ११८२०८ | १२.१२.९७ | ८००/- |
| ९ | श्री.दिपक देशपांडे | ११८३ | ११८२०९ | ०१.०१.९८ | ५०००/- |
| १० | श्री.जमीर अहेमद कादरी | ११८३ | ११८२१० | २२.०४.९८ | ४००/- |
| ११ | श्री.भगतसिंग अशोक दरक | ११८३ | ११८२११ | ०५.१०.९८ | १६००/- |
| १२ | श्रीमती प्रयागबाई व्ही.ठोंबरे | ११८३ | ११८२१३ | २९.१०.९८ | १२००/- |
| १३ | श्रीमती इंदिरा रोज मेरी दास | ११८३ | ११८२१४ | २५.०२.९९ | ८००/- |
| १४ | श्री.अ.रहेमान मोहीयोद्दीन | ११८३ | ११८२१५ | ०४.०३.९९ | २००/- |
| १५ | श्रीमती प्रमिला प्रभाकर जोशी | ११८३ | ११८२१६ | ०६.०३.९९ | ४००/- |
| १६ | श्री.वाय.एम.सातपुते | ११८३ | ११८२१७ | ०९.०३.९९ | ८००/- |
| १७ | श्री.एम.एम.सातपुते | ११८३ | ११८२१८ | ११.०३.९९ | ८००/- |
| १८ | श्री.लक्ष्मण आनंदा सोनवणे | ११८३ | ११८२१९ | १५.०३.९९ | ४००/- |
| १९ | श्री.शकिल अहमद | ११८३ | ११८२२० | १५.६.२००१ | ४००/- |
| २० | लुपिन लिमिटेड | ११८३ | ११८२२१ | १८.२.२००२ | ५०/- |
| २१ | सौ.पद्मा तापडिया | ११८३ | ११८२२२ | १८.२.२००२ | २५/- |
| २२ | सहा.संचालक उपवने व उद्याने | ११८३ | ११८२२३ | १८.२.२००२ | ५०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | महाराष्ट्र डिसलरीज चिकलठाणा | ११८३ | ११८२२४ | १८.२.२००२ | ५०/- |
| २४ | भगवानदास काल्डा | ११८३ | ११८२२५ | १८.२.२००२ | २५/- |
| २५ | बबन रुपा राठोड | ११८३ | ११८२२६ | २०.२.२००२ | १०/- |
| २६ | श्रीमती माधुरी कुलकर्णी | ११८३ | ११८२२७ | २०.२.२००२ | १८/- |
| २७ | श्रीमती माधुरी कुलकर्णी | ११८३ | ११८२२८ | २०.२.२००२ | १४/- |
| २८ | श्री.मधुकुमार टी शहा | ११८३ | ११८२२९ | २०.२.२००२ | १५/- |
| २९ | श्री.सुनिल सरग | ११८३ | ११८२३० | २०.२.२००२ | १७/- |
| ३० | श्री. भाऊसाहेब जाधव | ११८३ | ११८२३१ | २०.२.२००२ | २४/- |
| ३१ | श्री.संजय रोज नर्सरी | ११८३ | ११८२३२ | २०.२.२००२ | २०/- |
| ३२ | श्री.संजय रोज नर्सरी | ११८३ | ११८२३३ | २०.२.२००२ | २०/- |
| ३३ | श्री.संजय रोज नर्सरी | ११८३ | ११८२३४ | २०.२.२००२ | २०/- |
| ३४ | सौ.पद्मा तापडिया | ११८३ | ११८२३५ | २०.२.२००२ | २२/- |
| ३५ | श्रीमती शारदा वडवले | ११८३ | ११८२३६ | २०.२.२००२ | ३१/- |
| ३६ | श्रीमती संजिवनी कुलकर्णी | ११८३ | ११८२३७ | २०.२.२००२ | २१/- |
| ३७ | श्री.अनुप कुलकर्णी | ११८३ | ११८२३८ | २०.२.२००२ | १०/- |
| ३८ | श्री.तेजल पडवळे | ११८३ | ११८२३९ | २०.२.२००२ | ०२/- |
| ३९ | श्रीमती मंजुषा सुहास कुलकर्णी | ११८३ | ११८२४० | २०.२.२००२ | १२/- |
| ४० | लुपीन लिमिटेड चिकलठाणा | ११८३ | ११८२४१ | २०.२.२००२ | १४/- |
| ४१ | लुपीन लिमिटेड चिकलठाणा | ११८३ | ११८२४२ | २०.२.२००२ | १४/- |
| ४२ | सहा.संचालक उपवने व उद्याने | ११८३ | ११८२४३ | २०.२.२००२ | २८/- |
| ४३ | श्री.प्रदीप तेलगोटे | ११८३ | ११८२४४ | २०.२.२००२ | ३३/- |
| ४४ | श्री.जाधव संतोष | ११८३ | ११८२४५ | २०.२.२००२ | १२/- |
| ४५ | महाराष्ट्र डिसलरीज | ११८३ | ११८२४६ | २०.२.२००२ | ४५/- |
| ४६ | श्री.आर.एल.कुमार | ११८३ | ११८२४७ | २०.२.२००२ | ३०/- |
| ४७ | शावलेश कंपनी लि. | ११८३ | ११८२४८ | २०.२.२००२ | ४८/- |
| ४८ | श्री.नामदेव सांगळे | ११८३ | ११८२४९ | २०.२.२००२ | ६३/- |
| ४९ | साकला नर्सरी | ११८३ | ११८२५० | २१.२.२००२ | ५४/- |
| ५० | श्री.भगवान बनसोडे | ११८३ | ११८२५१ | २१.२.२००२ | १५/- |
| ५१ | श्री.नाना वाघ | ११८३ | ११८२५२ | २१.२.२००२ | २३/- |
| ५२ | श्री.निमचंद विठोरे | ११८३ | ११८२५३ | २१.२.२००२ | १५०/- |
| ५३ | श्री.सुगरचंद विठोरे | ११८३ | ११८२५४ | २१.२.२००२ | १४/- |
| ५४ | श्री.विवेक लभाने | ११८३ | ११८२५५ | २१.२.२००२ | ०२/- |
| ५५ | श्री.अरविंद पाटील | ११८३ | ११८२५६ | २१.२.२००२ | ०२/- |
| ५६ | श्री.राज नगराळे | ११८३ | ११८२५७ | २१.२.२००२ | ०२/- |
| ५७ | श्री.प्रितम छाजेड | ११८३ | ११८२५८ | २१.२.२००२ | २०/- |
| ५८ | श्री.वृषभ छाजेड | ११८३ | ११८२५९ | २१.२.२००२ | २०/- |
| ५९ | श्री.तेजल पडवळे | ११८३ | ११८२६० | २१.२.२००२ | ०५/- |
| ६० | श्री.भाऊसाहेब जाधव | ११८३ | ११८२६१ | २१.२.२००२ | ०२/- |
| ६१ | श्रीमती सायली भडके | ११८३ | ११८२६२ | २१.२.२००२ | ०२/- |
| ६२ | श्री.भाऊसाहेब जाधव | ११८३ | ११८२६३ | २१.२.२००२ | ०२/- |
| ६३ | सौ.अलका भडके | ११८३ | ११८२६४ | दिनांक नाही | ०५/- |
| ६४ | श्री.शे.वली शे.रहेमान | ११८३ | ११८२६५ | ४.४.२००२ | २०००/- |
| ६५ | श्री.मकदुम अली खॉन | ११८३ | ११८२६६ | ६.७.२००२ | ५५१/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६६ | श्री.अन्ना आबाजी पाटील | ११८३ | ११८२६७ | १८.७.२००२ | १९००/- |
| ६७ | श्री.मो.शरिफजी मो.इब्राहीम | ११८३ | ११८२६८ | ७.६.२००३ | ४००/- |
| ६८ | श्री.रामचंद्र नारायण जोशी | ११८३ | ११८२६९ | ५.१२.२००३ | ५००/- |
| ६९ | श्री.मा.द.राठोड | ११८३ | ११८२७० | ५.१२.२००३ | ५००/- |
| ७० | श्री.मधुकर हरिभाऊ मुळे | ११८३ | ११८२७१ | ६.१२.२००३ | ५००/- |
| ७१ | श्री.कृष्णा मिश्रा | ११८३ | ११८२७२ | १३.८.२००४ | ५००/- |
| | | | | एकूण | **२४,२१२/-** |

विभागाने उपरोक्त मुद्यावर खुलासा सादर केलेला नाही . तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम (११) चे पालन केलेले नाही. त्यामुळे संबंधितांविरूध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ०२ :सिध्दार्थ उद्यान येथील मिनी ट्रेन व संगीत कारंजे फीचा भरणा लेखापरीक्षण आक्षेपाअंती केल्याबाबत. (रक्कम रू.२२४/-)**

सिध्दार्थ उद्यानातील आकर्षणात मिनी ट्रेन व संगित कारंजेचा समावेश आहे. नागरीकांचे मनोरंजनासाठी उपरोक्त दोन्ही सुविधांसाठी नागरीकांकडून विशिष्ट शूल्क आकारणी करून सेवा सुविधा पुरविल्या जातात. मिनी ट्रेन साठी सन २००७-०८ या आर्थिक वर्षात रक्कम रू.२/- प्रती फेरी शूल्क आकारणी केल्या जात होती. संगीत कारंजेसाठी रू. ५/- व रू. ३/- शूल्क आकारले जात असे.

सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे मिनी ट्रेन भरणाबाबत लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, दिनांक ३०.९.२००७ रोजी भरणा नोंदवहीत मिनी ट्रेन तिकीट पुस्तक क्र.२८३६ उपलब्ध झालेले नाही. सिध्दार्थ उद्यानातील तिकीट पुस्तकांचे स्टॉक बुक तपासले असता दिनांक २५.५.२००७ रोजी मिनी ट्रेन तिकीट पुस्तक क्र.२६०१ ते २९०० (३०० पुस्तके ) प्राप्त झाल्याची नोंद आहे. उपरोक्त प्राप्त पुस्तकात पुस्तक क्र.२८३६ चा समावेश आहे. प्रती तिकीट मूल्य रक्कम रू.२/- प्रमाणे १०० तिकीटांचे रक्कम रू.२००/- चा मनपा फंडात भरणा होणे क्रमप्राप्त आहे.

तसेच सन २००८-०९ या वर्षात संगीत कारंजे फी चे पुस्तक क्र.६४९ मधील ८२ तिकीटांचे पैसे जमा आहेत. ८ तिकिटांचे रू.३/- प्रमाणे २४/- रूपयांचा कमी भरणा झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

विभागाने मनपा फंडात कमी भरलेली रक्कम लेखापरीक्षणाच्या आक्षेपाअंती दिनांक २६ सप्टेंबर २०१३ रोजी पावती क्र.५७४९१४ अन्वये भरणा केलेली आहे.

सदरील भरणा केलेली रक्कम ही आक्षेपाअंती भरणा केलेली असून महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम (११) चे पालन केलेले नाही. त्यामुळे संबंधितांविरूध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ०३ : सिध्दार्थ उद्यान प्रवेश फी रक्कम रू.१२००/- चा सन २०१२-१३ या वर्षात लेखापरीक्षणाअंती भरणा केल्याबाबत.**

सिध्दार्थ उद्यान प्रवेश फी दिनांक १६.८.२०११ पासून मोठ्या व्यक्तीस रू.१०/- व लहान व्यक्तीस रू.५/- आकारली जाते. सिध्दार्थ उद्यान प्रवेश फी आकारणीसाठी संगणक बसविण्यात आलेले आहे. नागरीकांना प्रवेश फी संगणकीय तिकीट दिले जाते.

सन २०१२-१३ या वर्षात दिनांक २९.४.२०१२ रोजी प्रवेश फी रिपोर्ट प्रमाणे मोठे व्यक्ती ४८८५ चा उल्लेख आहे. भरणा रजिस्टर मध्ये नोंद घेतांना ४७८८ मोठे व्यक्ती दर्शविण्यात आले. म्हणजेच भरणा करतांना ९७ मोठ्या व्यक्तीच्या तिकीटाचे पैसे रू.९७०/- चा भरणा केलेला नाही.

तसेच दिनांक ०२.०५.२०१२ रोजी प्रवेश फी रिपोर्ट प्रमाणे मोठे व्यक्ती ३१८५ चा उल्लेख आहे. परंतू भरणा रजिस्टर मध्ये केवळ ३१६२ व्यक्तीच्याच प्रवेश फीचा भरणा दर्शविला. २३ व्यक्तींचा रू.२३०/- भरणा मनपा फंडात केलेला नाही.

विभागाने मनपा फंडात कमी भरलेली रक्कम लेखापरीक्षणाच्या आक्षेपाअंती दिनांक २६ सप्टेंबर २०१३ रोजी पावती क्र.५७४९१३ अन्वये भरणा केलेली आहे.

सदरील भरणा केलेली रक्कम ही आक्षेपाअंती भरणा केलेली असून महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम (११) चे पालन केलेले नाही. त्यामुळे संबंधितांविरूध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ०४ :सिध्दार्थ उद्यान येथे मे.डिझनी फन फेअर सिटी, नाशिक यांना खेळणी बसविणे, देखभाल दुरूस्ती करणे, संचलन करणे करीता जागा भाड्याने देणे करीता मा.सर्वसाधारण सभेने पारीत केलेल्या ठरावाप्रमाणे व करारनाम्यातील अटी शर्ती प्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याबाबत.**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६२३, दिनांक १.३.२०१२ अन्वये मे.डिझनी फन फेअर सीटी, नाशिक या एजन्सीस सिध्दार्थ उद्यानात नागरीक व लहान मुलांच्या मनोरंजनाकरीता ३५०० चौ.फूट जागा खेळणी बसविणे, देखभाल दुरूस्ती करणे, संचलन करणे इत्यादी कामाकरीता रू.१२,०००/- प्रती माह भाडे तत्वावर १० वर्षाकरीता जागा उपलब्ध करून दिलेली आहे. एजन्सी सोबत झालेल्या करारनाम्यातील अट क्र.६ प्रमाणे दरवर्षी १०% दरवाढ करण्यात येईल असे ठरलेले आहे. संबंधित एजन्सीस कार्यालयीन आदेश क्र.मनपा/उद्यान/७७/२०१२, दिनांक २४.४.२०१२ अन्वये कार्यादेश निर्गमित केलेले आहेत. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. करारनाम्यातील अट क्र.६ प्रमाणे पुढील वर्षी १०% दरवाढ करून भाडे आकारणी तसेच भाडे वसूली केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.
२. संबंधीत एजन्सीने भरणा केलेल्या रक्कम रू.२५,०००/-, २% अनामत रकमेची पावती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नाही.

विभागाने संबंधित एजन्सीस आक्षेपाअंती दरमहा भाड्यामध्ये १०% नैसर्गिक वाढ करून तीन महिन्याची रक्कम रू.३६००/- मनपा फंडात पावती क्र.४१६३७६ अन्वये भरणा केलेली आहे.

संबंधित एजन्सीने महानगरपालिकेकडे भरणा केलेली रक्कम रू.२५,०००/- रकमेची पावती तयार न करता सदरील रकमेचा धनाकर्ष मुख्य रोखपालाकडे जमा करण्यात आला. याबाबत उद्यान विभागाने पावती न फाडता धनाकर्ष जमा करणे ही बाब अयोग्य आहे.

भविष्यात संबंधित एजन्सीस त्यांनी भरलेली अनामत रक्कम परत करतांना त्यांचेकडे अनामत रकमेची पावती नसल्यामुळे एजन्सीस अडचणी येवू शकतात. तसेच महानगरपालिकेचे प्रतिमा डागाळली जावू शकते.

उद्यान विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे संबंधित एजन्सीसोबत केलेल्या करारनाम्याच्या अटी/शर्तीचे पालन झालेले नाही. लेखापरीक्षणात सदरील मुद्याबाबत विचारणा केल्यानंतर महापालिका फंडात रक्कम जमा झालेली आहे. तसेच रू.२५,०००/- अनामत रक्कम पावती न फाडता मनपा फंडात जमा केली या बाबींबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ०५ :सामान्य पावती पुस्तक क्र.११८३,४१६४ मधील पावत्यांची रक्कम रू.५०००/- मनपा फंडात भरणा न करणे बाबत.**

उद्यान विभागाने विविध कामासाठी दिलेल्या सामान्य पावत्यांच्या रकमा महानगरपालिका फंडात जमा करणे आवश्यक आहे. तथापि खालील तक्त्यानुसार रक्कम रू.५,०००/- मनपा फंडात भरणा केलेली नाही.

| अ.क्र. | पुस्तक क्रमांक | पावती क्रमांक व दिनांक | तपशिल | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ११८३ | ११८२८२<br>५.७.२००८ | कौतिक देवराव मोरे<br>स्मृतीवन येथे वृक्ष लावणे | ५००/- |
| २ | ११८३ | ११८२८७<br>२४.१२.२००८ | मिलींद दिवाकर अभ्यंकर<br>स्मृतीवन येथे वृक्ष लावणे | ५००/- |
| ३ | ११८३ | ११८२८८<br>२४.१२.२००८ | शुभदा दिवाकर अभ्यंकर<br>स्मृतीवन येथे वृक्ष लावणे | ५००/- |
| ४ | ११८३ | ११८२९५<br>२०.०१.२०१० | जिल्हा वक्फ अधिकारी औबाद<br>झाड तोडण्याकरीता | १०००/- |
| ५ | ११८३ | ११८२९६<br>२०.०१.२०१० | प्रभाकर मुकुंदराव इंगोले<br>स्मृतीवन येथे वृक्ष लावणे | ५००/- |
| ६ | ४१६४ | ४१६३४२<br>११.५.२०१२ | मो.अमीन शे.नईम<br>वृक्ष तोड बाबत. | १०००/- |
| ७ | ४१६४ | ४१६३४३<br>११.५.२०१२ | अ.रहमान मो.हुसेन<br>वृक्ष तोड बाबत. | १०००/- |
| | | | **एकूण** | **५०००/-** |

महानगरपालिका फंडात भरणा न केलेली रक्कम संबंधित कर्मचा-यांकडून वसूल करून मनपा फंडात भरणा करण्याबाबत उद्यान विभागास कळविलेले आहे. विभागाने रक्कम भरणा केली किंवा नाही याबाबत खुलासा सादर केलेला नाही. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम (११) चे पालन केलेले नाही. त्यामुळे संबंधितांविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०६ :अनामत नोंदवही उपलब्ध करून देणेबाबत.**

उद्यान विभागाने सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या कालावधीत स्विकारलेले अनामत रकमेची अनामत नोंदवही तात्काळ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून द्यावी असे विभागास कळविले होते.

विभागाने सादर केलेल्या खुलाशात अनामत रकमेची स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. यापुढे स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येईल असे कळविले आहे.

उद्यान विभागाने नागरीकांकडून अनामत रकमा या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम ,१९७५ अन्वये स्विकारलेल्या आहेत. त्यामुळे ज्या नागरीकांनी सदरील अधिनियमातील तरतूदींचे पालन केलेले असेल अशा नागरीकांना त्यांच्या अनामत रकमा परत करणे क्रमप्राप्त आहे. अथवा नागरीकांनी अधिनियमातील तरतूदींचे पालन न केल्यास अधिनियमातील नियम (१३) प्रमाणे सदरील रकमा जप्तीची तरतूद ठेवलेली आहे. परंतू उपरोक्त बाबींचे गांभिर्य उद्यान विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना नसल्याचे दिसून येते.

महानगरपालिकेत जमा होणा-या अनामत रकमा ह्या महानगरपालिकेचे दायित्व आहेत. या दायित्वाची जाणीव सर्व संबंधितांनी ठेवणे आवश्यक आहे. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**<u>खर्च बाजू :</u>**

**परिच्छेद क्र.०७ :उद्यान विभागात भांडार विभागातून प्राप्त झालेली सर्वसाधारण पावती पुस्तके व भरणा रजिस्टर इत्यादी अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेल्या अभिलेख्यांपैकी मुख्य भांडार विभागातून उद्यान विभागास वितरीत करण्यात आलेली सर्व पावती पुस्तके, तिकीट पुस्तके, मोजमाप पुस्तके इ. अनुषंगिक जमा बाजू करीता वापरण्यात येणारे दस्तऐवज उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे.

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, मुख्य भांडार विभागाने उद्यान विभागास वितरीत केलेली सर्वसाधारण पावती पुस्तके लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाहीत. करीता वरील वापरलेली सर्वसाधारण पावती पुस्तके व भरणा नोंदवही लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन द्यावी.

**परिच्छेद क्र.०८ :आर्थिक वर्ष २००५-०६ ते सन २०१२-१३ या कालावधीतील उद्यान विभागाची जावक बारनिशी लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्याबाबत.**

सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या वर्षातील उद्यान विभागाची जावक बारनिशी लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले होते. लेखापरीक्षणा दरम्यान जावक बारनिशी उपलब्ध करुन दिलेली नाही.

विभागाने सादर केलेल्या खुलाशात जावक बारनिशी उपलब्ध करुन दिल्याचे कळविले आहे. जे की, अयोग्य आहे.

विभागाने अभिलेखे उपलब्ध न करुन देताही अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत खुलासा सादर करणे ही बाब दिशाभूल करणारी आहे.

करिता, संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०९ :आर्थिक वर्ष २००५-०६ ते सन २०१२-१३ या कालावधीत सामाजिक वनीकरण विभाग (वनविभाग) यांच्याकडून प्राप्त रोपे व त्यासंबंधी लेखे उपलब्ध करून देण्याबाबत.**

सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या कालावधीत उद्यान विभागास झाडे लावण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाकडून एकूण प्राप्त रोपे व त्या संबंधित विभागाने ठेवलेल्या नोंदीचे लेखे लेखापरीक्षण कामी सत्वर उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते.

परंतू लेखापरीक्षण अंतिम होईपर्यंत विभागाने अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत. तसेच याबाबत कोणताही खुलासा सादर केलेला नाही.

करिता, संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१० :आर्थिक वर्ष २००५-०६ ते सन २०१२-१३ या कालावधीत खरेदी केलेल्या ट्री गार्ड व त्या संबंधीचे लेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

२००५-०६ ते सन २०१२-१३ या कालावधीत खरेदी केलेले ट्री गार्ड व संबंधिचे रजिस्टर क्रमांक १०९ ,११०,१११ लेखापरीक्षण कामी सत्वर उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले होते.

विभागाने उपलब्ध करून दिलेले अभिलेखे अपूर्ण असून विहित नमुन्यात अभिलेखे ठेवलेले नाहीत. त्याचप्रमाणे उपरोक्त कालावधीत खरेदी केलेल्या सर्वच ट्रीगार्डची नोंद असलेले अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाहीत.

लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब शंकास्पद असून, संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११ :उद्यान विभागात सन २००५-०६ ते सन २०१२-१३ दरम्यान खरेदी केलेल्या विविध मशिनरी व उपकरणांबाबत वर्षनिहाय घसारा नोंदवही उपलब्ध नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे आढळून आले की, सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या वर्षात उद्यान विभागाने खरेदी केलेल्या मशिनरी / उपकरणे यांचे बाबत वर्षनिहाय घसारा नोंदवही ठेवलेली नाही. तसेच लेखापरीक्षणा दरम्यान सुध्दा उपलब्ध करून दिलेली नाही.

उपरोक्त परिच्छेदाबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब शंकास्पद असून, संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२ :आर्थिक वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ या कालावधीत खरेदी केलेल्या खत / औषधीचे रजिस्टर क्रमांक १०९,११०,१११ व संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्याबाबत.**

उद्यान विभागाने झाडासाठी लागणारे खत/ औषधी संचिका व त्यासंबंधी रजिस्टर क्रमांक १०९,११०,१११ लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून द्यावेत असे सूचित केले असता लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत विभागाने माहिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे. तसेच विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

करिता, संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३ :आर्थिक वर्ष २००५-०६, सन २०१२-१३ या कालावधीतील स्मृतीवन उद्यान येथे वृक्ष लागवडीसाठी देणगी दिलेल्या सभासदांची संख्या व त्या बाबतचे वर्षनिहाय लेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

स्मृतिवन उद्यान येथे वृक्ष लागवडीसाठी देणगी दिलेल्या सभासदांची संख्या व त्या बाबतचे वर्षनिहाय लेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून द्यावे असे कळविण्यात आले होते.

प्रकरणांत विभागाने माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच खुलासाही सादर केलेला नाही. करिता संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४ : आर्थिक वर्ष २००५-०६, सन २०१२-१३ या कालावधीतील सिध्दार्थ उद्यानातील उत्पादनाचे लेखे उपलब्ध करुन देणे बाबत.**

उद्यान विभागात उत्पादीत होणा-या उत्पादनाचे वर्षनिहाय लेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन द्यावे असे कळविण्यात आले होते.

प्रकरणांत विभागाने माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच खुलासाही सादर केलेला नाही. करिता संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५ :उद्यान विभागाचे जड संग्रह नोंदवही सादर करणे बाबत.**

जड संग्रह नोंदवही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन दिलेली नाही. लेखापरीक्षणास सर्व अभिलेखे उपलब्ध करुन देणेबाबत लेखापरीक्षण विभागाने लेखापरीक्षण सुरु होण्यापूर्वीच कळविलेले आहे. तरी सुध्दा अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब गंभीर आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात यावे. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१६ :महानगरपालिकेच्या मालकीचे एकूण उद्यान व खाजगी तत्वावर दिलेल्या उद्यानाबाबतची माहिती मिळणे बाबत.**

महानगरपालिकेच्या एकूण उद्यान व खाजगी तत्वावर दिलेल्या उद्यानाबाबतची माहिती लेखापरीक्षण कामी आवश्यक असल्याने सत्वर उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते.

विभागाने सादर केलेल्या खुलाशात महानगरपालिकेच्या मालकीच्या व खाजगी तत्वावर दिलेल्या उद्यानाची माहिती पुस्तिका उपलब्ध करुन दिल्याचे कळविले आहे.

विभागाने अभिलेखे उपलब्ध न करुन देताही अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत खुलासा सादर करणे ही बाब दिशाभूल करणारी आहे.

करिता, संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१७ :आर्थिक वर्ष २००५-०६, सन २०१२-२०१३ या कालावधीत भांडार विभागातून प्राप्त स्वच्छता साहित्य व इतर अनुषंगिक साहित्याचे रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन देणे बाबत.**

भांडार विभागाकडून प्राप्त स्वच्छता साहित्य व कार्यालयास लागणारे इतर अनुषंगिक साहित्याबाबतचे रजिस्टर क्रमांक १०९ ,११०,१११ लेखापरीक्षण कामी सत्वर उपलब्ध करुन द्यावे असे

कळविले असता विभागाने केवळ अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळवून खुलासा सादर केला आहे. मात्र अभिलेखे लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

करिता, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१८ :महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८, ९, १०, ११, १३ व १५ बाबत कार्यवाही न करणे बाबत.**

उद्यान विभागातून महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरणाचे कामे पार पाडली जातात. औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील वृक्षांबाबत संरक्षण व संवर्धन करण्यासाठी तसेच धोकादायक वृक्ष, बांधकामात येणारी वृक्ष तोडण्यासाठी परवानगी दिली जाते. अशी परवानगी देतांना एक वृक्ष तोडल्यानंतर त्याच ठिकाणी १० वृक्ष नविन लावणे बाबत आदेशित केले जाते आणि एक वृक्ष तोडण्यासाठी रु.१०००/- अनामत रक्कम वसूल केली जाते.

उपरोक्त अधिनियमातील तरतूदींचे पालन होणे आवश्यक आहे. परंतू उद्यान विभागातील उपलब्ध संचिका तपासल्या असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. अधिनियमातील कलम ११ नुसार झाडांचे जतन करण्याची जबाबदारी जमिन मालकास किंवा भोगवटा धारकास दिल्यानंतर त्यांचे चांगले जतन होत आहे हे पाहण्यास सबंधित भोगवटाधारक व जमिन मालक जबाबदार राहील व अशा झाडांच्या स्थितीविषयीचा तीन वर्षाच्या कालावधीसाठीचा अहवाल ६ महिन्यातून एकदा वृक्ष अधिका-याला देईल असे नमूद आहे. प्रत्यक्षात अशा प्रकारचे ६ महिन्याचे अहवाल संचिकेत आढळून आलेले नाही.

२. अधिनियमातील कलम ११(२) अन्वये वृक्ष अधिका-यास कलम ८,९ किंवा १० अन्वये देण्यात आलेल्या आदेशाची योग्य रित्या पालन होईल हे सुनिश्चित करण्यासाठी तो याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशी रक्कम ठेव म्हणून ठेवल्यास जमिन मालकास किंवा भोगवटा धारकास भाग पाडता येईल. ठेव म्हणून ठेवावयाची रक्कम ही विहित करण्यात येईल अशा रकमेहून ठेव अधिक असणार नाही. अशी तरतूद असतांना उद्यान विभागाने अनामत रक्कम किती स्विकारावी याबाबत कोणतेही आदेश किंवा नियम लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध झालेले नाही.

३. अधिनियमातील कलम ११ प्रमाणे स्विकारलेल्या ठेवींची नोंदवही लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध झालेली नाही.

४. अधिनियमातील कलम १३ प्रमाणे वृक्षारोपनाच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर केल्यास ठेव सरकार जमा करणे आणि खर्च वसूल करणे अशी तरतूद आहे. परंतू लेखापरीक्षणाच्या वेळी ठेव जप्तीबाबतचे अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

५. अधिनियमातील तरतूदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, औरंगाबाद यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५९५/१२, दिनांक ४.१०.२०१२ अन्वये इमारतीच्या बांधकामात बाधीत होणारी पाच वृक्षे तोडण्याची परवानगी दिलेली आहे. परंतू संबंधितांकडून रु.५,०००/- चा भरणा केला असल्याबाबत खात्री झालेली नाही. विभागाने संबंधित प्रकरणाची

तपासणी करुन अनुपालन अहवाल सादर करावा त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या इतरही सर्व प्रकरणांत तपासणी करुन अहवाल सादर करावा.

६. सार्वजनिक रस्त्यावरील झाडे तोडून, उचलून घेवून जाण्याबाबत विविध व्यक्तींना पत्र देवून कार्यवाही झालेली आहे असे निदर्शनास आले. सार्वजनिक रस्त्यावरील झाडे तोडतांना संबंधित व्यक्तिने महानगरपालिकेकडे किती रकमा भरणा केल्या याचा बोध होत नाही. तसेच तोडलेल्या झाडाबाबतचे योग्य मूल्य महानगरपालिकेस प्राप्त झाले किंवा कसे याबाबत झाडाच्या लाकडांचे दर आकारलेले आहेत काय याबाबतही अभिलेखे उपलब्ध झालेली नाहीत.

७. अधिनियमातील कलम १५ व १६ प्रमाणे नागरी स्थानिक प्राधिकरण हे वृक्ष प्राधिकरण निधी नावाचा एक स्वतंत्र निधी निर्माण करील व त्यामध्ये वृक्ष प्राधिकरणास मिळणा-या सर्व रकमा जमा करण्यात येतील. त्यामध्ये कलमातील क,ख,ग,घ, ड मधील सर्व बाबींचा समावेश असेल असे आहे. उद्यान विभागाने अशा प्रकारचा स्वतंत्र निधी उभारला आहे काय तसेच वृक्ष प्राधिकरणाच्या वित्तीय वर्षातील अंदाजित प्राप्तीचे व खर्चाचे वार्षिक अंदाज तयार करुन त्यास नागरी स्थानिक प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण कालावधीत वृक्ष प्राधिकरणाचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाहीत व लेखापरीक्षणास उपलब्धही झालेले नाहीत. या अभावी वृक्ष प्राधिकरणाचे एकूणच कामावर व जमा खर्चावर प्रभावी नियंत्रण कसे ठेवण्यात येते, ते स्पष्ट होवू शकले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. परिच्छेदातील अनियमिततेबाबत संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

## परिच्छेद क्र.१९ वॉर्ड क्रमांक ९८ कांचननगर येथील खुल्या जागेत लहान मुलांची खेळणी बसविणे बाबत.

वॉर्ड क्रमांक ९८ स.नगरसेविका यांनी दिनांक ९.९.२००५ रोजी लेखी पत्र देवून त्यांच्या स्वेच्छा निधीतून रक्कम रु.२५,०००/- देवून कांचननगर, नक्षत्रवाडी येथील खुल्या जागेमध्ये लहान मुलांना खेळणी बसवून देण्याबाबत सांगितले आहे. त्यासाठी रु.२४,८८०/- एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. जा.क्र.मनपा /लेखा /नी / १६/०५, दिनांक १९.११.२००५ अन्वये ३ निविदा प्राप्त झाल्या असून शेख अफसर शेख छोटेमियॉ यांनी अंदाजपत्रकीय दराने निविदा घेतल्याने व त्यांचे कमी दर असल्याने त्यांना काम देण्यात आले. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. खेळणीचे १०९ ,११०,१११ रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

२. निविदा नियम ५४ अन्वये १% विमा रक्कम रु.२४९/- वसूल करणे आवश्यक असतांना वसूल केलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलाशा मध्ये खेळणीची नोंद १०९,११०,१११ मध्ये घेण्याचे राहिलेले आहे. तरी यापुढे अशा नोंदी उद्यान विभागाच्या स्टॉक रजिस्टर मध्ये घेण्यात येवून उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच मुद्या क्र.२ बाबत देयकातील कपाती लेखा विभागामार्फत करण्यात येतात असे कळविले आहे.

विभागाने केलेला खुलासा हा असमाधानकारक आहे.

प्रकरणांत बसविण्यात आलेली खेळणीची नोंद रजिस्टर क्र.१०९,११०,१११ या मध्ये घेवून पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपलब्ध करुन देण्यात यावी . औरंगाबाद महानगरपालिका ही शासकीय कपाती करण्यासाठी एजन्सी असून शासनाचे विविध रकमा वेळच्या वेळी कपाती करुन शासनास पाठविणे बंधनकारक आहे.

करिता सदरील रकमा संबंधितांकडून वसूल करुन शासनाकडे पाठवून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२० : स्वेच्छा निधीतून वॉर्ड क्रमांक २२ मध्ये रिकाम्या जागेवर वृक्षारोपन करणे बाबत.**

वॉर्ड क्रमांक २२ , स.नगरसेविका यांनी पत्र देवून स्वेच्छा निधीमधून वॉर्डातील खुल्या जागेमध्ये वृक्षारोपनासाठी साफसफाई करुन खड्डे खोदणे, माती टाकणे व खत टाकून वृक्षारोपन करावे या कामासाठी रु.२३,९९७/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नी/३६/०५, दिनांक १.२.२००५ अन्वये ए-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता ४ निविदा प्राप्त झाल्या असून ०.२०% कमी दराने श्री. शेख अफसर शेख छोटे मियॉ यांची असून, जा.क्र./मनपा/उद्यान/९२/२००५ दिनांक १.२.२००५ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे. संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

संबंधिताला रक्कम रु.२२,५९१/- अदा करण्यात आले. परंतू निविदा नियम ५४ अन्वये १% विमा रक्कम रु.२२६/- वसूल करणे आवश्यक असतांना वसूल केलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलाशा मध्ये देयकातील कपाती लेखा विभागामार्फत करण्यात येतात असे कळविले आहे.

विभागाने केलेला खुलासा हा असमाधानकारक आहे.

औरंगाबाद महानगरपालिका ही शासकीय कपाती करण्यासाठी एजन्सी असून शासनाचे विविध रकमा वेळच्या वेळी कपाती करुन शासनास पाठविणे बंधनकारक आहे.

करिता सदरील रकमा संबंधितांकडून वसूल करुन शासनाकडे पाठवून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२१ :शोभिवंत रोपे व शेडिंगनेट खरेदी बाबत.(अं.प.रक्कम रु. २४,९७५)**

उद्यान विभागाने शोभिवंत रोपे व शेडिंगनेट खरेदी करण्यासाठी लेखाशिर्षक वृक्षप्राधिकरण तरतूद २०.०० लक्ष या शिर्षकाअंतर्गत अं.प.रक्कम रु.२४,९७५/- दरपत्रक मागविण्यात आले असून दोन निविदा दरपत्रक प्राप्त झाले असून साकला रोज गार्डन यांचे दर कमी असल्याने जा.क्र.मनपा / उद्यान/६४२/०६, दिनांक ३१.०१.२००६ अन्वये संबंधितास कार्यादेश देण्यात आला. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. साकला रोज गार्डन यांच्याकडून उद्यानासाठी लागणारे रक्कम रु.२४,९७५/- ची रोपे खरेदी करण्यात आले. परंतू रोपे प्राप्त झाल्याबद्यल संचिकेत D.C. नाही.

२. खरेदी केलेल्या रोपाची नोंद रजिस्टर क्रमांक १०९ मध्ये घेणे आवश्यक असतांना रजिस्टर क्रमांक १०९, ११० व १११ लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाही.

विभागाने सादर केलेल्या खुलाशात कळविले आहे की, सदरील कामाचे स्टॉक रजिस्टर सध्या उपलब्ध नाही. उपलब्ध झाल्यावर सादर करण्यात येईल.

उद्यान विभागाचे लेखापरीक्षण जवळपास साडेतीन महिने पर्यंत चालले या कालावधीत उद्यान विभागाने स्टॉक रजिस्टर १०९,११०,१११ उपलब्ध करून दिलेले नाही त्यामुळे खरेदीबाबत साशंकता निर्माण होते. पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध करून द्यावेत तसेच संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२२ :वॉर्ड क्रमांक ७३ येथे स्वेच्छा निधीतून ट्री गार्ड पुरविणे.**
**(अंदाजपत्रकीय रक्कम रू.२४,९४०/-)**

वॉर्ड क्रमांक ७३ येथे स.नगरसेवक यांनी दिनांक १०.११.२००५ रोजी लेखी पत्र देवून रक्कम रू.२५,०००/- लोखंडी ट्रीगार्ड स्वेच्छा निधीतून तयार करण्याबाबत कळविण्यात आले असून त्यासाठी रक्कम रू.२४९४०/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामासाठी ३ कोटेशन प्राप्त झाले असून सर्वात कमी दराचे कोटेशन रविंद्र प्रभाकर गायकवाड यांचे असून त्यांनी अंदाजपत्रकीय दराने काम देण्यात आले असून जा.क्र./उद्यान/७९३, दिनांक २५.३.२००६ अन्वये कार्यादेश देण्यात आले आहे. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. ट्रीगार्ड प्राप्त झाले बाबत संचिके मध्ये D.C. नाही.

२. साठा रजिस्टर, वितरण रजिस्टर, ताळमेळ रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले नाही.

उद्यान विभागाचे लेखापरीक्षण जवळपास साडेतीन महिने पर्यंत चालले या कालावधीत उद्यान विभागाने स्टॉक रजिस्टर १०९,११०,१११ उपलब्ध करून दिलेले नाही त्यामुळे खरेदीबाबत साशंकता निर्माण होते. पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध करून द्यावेत तसेच संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२३ :शहरातील स्मशानभूमी व कब्रस्तान मध्ये वृक्षारोपनासाठी खड्डे खोदणे व माती टाकण्याच्या कामासाठी विलंब दंड आकारणी व कंत्राटी कामाचा विमा रकमेचे भरणाबाबत.**

सन २००५-०६ या वर्षात शहरातील स्मशानभूमी व कब्रस्तानमध्ये वृक्षारोपनासाठी खड्डे खोदणे व माती टाकणे या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता १६ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी ४निविदा प्राप्त झाल्या. चार निविदाधारकामध्ये सर्वात कमी दराची निविदा पुरुषोत्तम कोळेकर यांची अंदाजपत्रकीय दराची प्राप्त झाली. संबंधित एजन्सीने रू.२०/- च्या मुद्रांकपेपरवर करारनामा करून दिला. एजन्सीला सदरील रू.४८,८१२/- रकमेचे कामाचे कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/१४२९/२००५, दि.२९.९.२००५ अन्वये निर्गमित केले. सदरील कामाची मुदत एक महिना असल्यामुळे दिनांक २५.१०.२००५ रोजी काम २०% झाले असून उर्वरीत काम मुदतीत करावे नसता झालेल्या विलंबा बाबत

प्रतिदिन दंड आकारला जाईल असे पत्र निर्गमित केलेले आहे. पत्रावर उद्यान अधिक्षकांची स्वाक्षरी नाही. तसेच प्रतिदिन दंडाची रक्कम दिलेली नाही. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. विलंब दंड प्रतिदिन न दर्शविता देयकात नाममात्र रू.१०/- प्रतिदिन एक महिन्याचा दंड रू.३००/- कपात केला जो अति नगन्य आहे.

२. कंत्राटी कामावरील कामाचा विमा शासकीय नियमाप्रमाणे काढणे गरजेचे आहे किंवा देयकात १% कपात करणे गरजेचे आहे तशी कपात झालेली नाही.

३. एजन्सीला दिलेल्या कामावर उद्यान विभागाच्या एकाही अधिका-याने देखरेख केली असल्याबाबत प्रमाणपत्रे संचिकेत उपलब्ध नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही. कंत्राटी कामाचे विमापत्र संबंधित कंत्राटदाराकडून घेवून संचिकेत उपलब्ध करणे आवश्यक होते किंवा त्यांच्या देयकातून कामाच्या १% कपात केलेली नाही. तसेच खुलाशात सुध्दा त्याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे शासनाचे रू.४८८/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. कंत्राटदाराने मुदतीत काम केलेले नसल्यामुळे त्या कामाच्या तुलनेत आकारण्यात आलेला दंड नगण्य आहे.

करिता संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून शासनाची रक्कम वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२४ :सन २००५-०६ या आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या लाकडी ट्री गार्डच्या खरेदी मधील अनियमिततेबाबत.**

सन २००५-०६ या वर्षातील लाकडी ट्री गार्ड खरेदी करतांना ७०० ट्री गार्ड खरेदी करण्यासाठी रू.४९,०००/- रकमेचे अंदाजपत्रका नुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या. सहा निविदा विक्री झाल्या असता त्यापैकी ३ निविदा प्राप्त झाल्या त्यामध्ये सय्यद सुजात हाश्मी यांची १०% जास्त दराने निविदा प्राप्त झाली. संबंधित गुत्तेदारास वाटाघाटीसाठी बोलावून १०% ऐवजी ५% दराने पुरवठा करण्यास एजन्सी तयार आहेत असे ठरले. त्यानुसार एजन्सीने रू.२०/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करून दिला. दिनांक २०.७.२००५ रोजी एजन्सीला कार्यादेश देण्यात आले. पुरवठा झालेले ट्री गार्ड बाबत देयक अदायगी करण्यात आली. तद्नंतर दिनांक ५.९.२००५ रोजी उद्यान अधिक्षक यांनी टिपणी सादर करून स. नगरसेवकांच्या मागणी नुसार पुनश्च १४०० ट्री गार्ड खरेदीचा प्रस्ताव सादर केला. सदरील १४०० जास्तीचे ट्रीगार्ड खरेदीसाठी मंजूर दरातच नविन ट्री गार्ड खरेदीची मान्यता शहर अभियंता यांनी दिलेली आहे. पुरवठा झालेल्या ट्री गार्डच्या स्टॉक रजिस्टरबाबत विभागाकडे मागणी केली असता लेखापरीक्षणास ट्रीगार्ड स्टॉक रजिस्टर उपलब्ध झालेले नाहीत. संचिकेमध्ये लेखापरीक्षणाच्या दृष्टीने खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. ट्रीगार्ड खरेदी करतांना एकत्रितपणे ७०० ऐवजी २१०० संख्या निश्चित करून प्रस्ताव उद्यान विभागाने सादर केला असता तर ट्रीगार्डचे माफक दर प्राप्त झाले असते. विभागाने एकत्रित खरेदी का केली नाही याचा खुलासा व्हावा.

२. ट्रीगार्ड प्राप्त झाल्यानंतर त्याची नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये घेवून संबंधितांना वितरण केल्याचे नोंदीचे रजिस्टर लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे ट्रीगार्डच्या खरेदीबाबत साशंकता निर्माण होते.

३. मूळ अंदाजापेक्षा लगेचच दुस-याच महिन्यात ट्रीगार्डची मागणी होते. पावसाळा लक्षात घेता विभागाने वेळीच नियोजन करणे आवश्यक होते. तसे झालेले नसल्यामुळे उद्यान विभागाच्या कार्यक्षमता व नियोजनाबाबत शंका निर्माण होते.

विभागाने सादर केलेल्या खुलाशामध्ये मुद्या क्र.१ च्या अनुषंगाने विभागाचे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. कारण आर्थिक नुकसान झाले नाही असे विभागाचे म्हणणे आहे. निविदा ७०० ट्रीगार्डची मागविली व त्याच दरानुसार २१०० ट्रीगार्ड खरेदी केले. उद्यान विभागाच्या खुलाशामध्ये त्यांनी स.नगरसेवक यांची मागणी वाढल्यामुळे वाढीव ट्रीगार्ड खेरदी करावे लागले असे म्हणणे आहे. परंतू वर्षाच्या सुरूवातीस जर खरेदीचे नियोजन करून ट्रीगार्डची खरेदी केली असती तर निश्चितच महानगरपालिकेस ट्रीगार्ड खरेदीसाठी माफक दर प्राप्त झाले असते. अर्थातच महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले नसते. यावरून उद्यान विभाग अकार्यक्षम असल्याबाबत दिसून येते.

करिता संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२५ :प्रभाग क्र.५० सुराणानगर येथे अंतर्गत रस्त्यावर व चौकात वृक्षारोपन करून २ वर्ष संवर्धन करणे बाबतच्या कामासाठी झालेल्या अनियमिततेबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान सन २००५-०६ या वर्षामध्ये सुराणानगर प्रभाग क्र.५० येथे अंतर्गत रस्त्यावर व चौकात वृक्षारोपन करून २ वर्ष संवर्धन करणे बाबत वृक्ष प्राधीकरण या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून रू. २.२५ लक्ष रकमेचे अंदाजपत्रकास शहर अभियंता यांनी दिनांक १७.१२.२००५ रोजी मान्यता दिली होती. सदरील कामाची निविदा मागविण्यात आल्या असता ८ निविदा विक्री झाल्या व ४ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सर्वात कमी दराची निविदा संतोष रूपचंद चव्हाण यांची १% कमी दराची होती. तुलनात्मक तक्ता दर मान्यतेसाठी उद्यान अधिक्षक यांनी संचिका प्रस्तावित केली असता शहर अभियंता यांनी दरास मान्यता देतांना २% कमीने निविदा मान्य केली. उद्यान विभागाने संबंधितांसोबत रीतसर करारनामा रू.२०/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर केलेला आहे. शहर अभियंता यांचे स्वाक्षरीने जा.क्र.मनपा/उद्यान/७८८/०६, दिनांक २२.३.२००६ रोजी संबंधित गुत्तेदारास कार्यादेश निर्गमित केलेले आहे. संबंधित गुत्तेदाराचे रू.२,२४,६०६/- रकमेचे देयक तीन टप्प्यात वितरीत करण्यात आले. देयकाची नोंद मोजमाप पुस्तिका क्र.१०६५ मध्ये घेण्यात आलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. शहर अभियंता यांनी संचिकेतील एनएस-३ वरील परिच्छेद (१०) प्रमाणे निविदा २.०% कमी दराने मान्य केली. परंतू विभागाने दिनांक २२.३.२००६ रोजी कार्यादेश देतांना निविदा १% कमी दराने कार्यादेश निर्गमित केले व त्यानुसारच देयक अदा केलेले आहे. संबंधित गुत्तेदारास एकूण रू.२,२४,६०६/- चे देयक अदा करण्यात आलेले असून २% जादा अदा केलेली रक्कम रू.४,४९२/- देयकातून कपात केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच संचिकेतील वरिष्ठांची मान्यता व कार्यादेश यातील तफावतीमुळे उपरोक्त नुकसान झालेले आहे.

२. कार्यादेशात नमूद प्रमाणे मनपा कार्यालयाचे का.अ./शा.अ.यांचेकडून कामाची पाहणी करून आखणी देवून काम त्वरीत सुरु करावे असे स्पष्टपणे नमूद आहे. प्रत्यक्षात तसे झालेले संचिकेवरुन दिसत नाही. त्यामुळे उद्यान विभागातील supervicer चे काम करणारे कर्मचा-या करवी विभाग कोणती कामे घेतात याची साशंकता निर्माण होते.

३. निविदेतील ट्रीगार्ड पुरविणे, रोपे पुरविणे इत्यादीबाबत स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाही. डीलेवरी चालान नाही. त्यामुळे खरेदीबद्दल साशंकता निर्माण होते. दोन्ही वस्तूंवरील झालेला खर्च रु. ८०,६५०/- अवास्तव वाटतो.

४. निविदा नियम ५४, शासननिर्णय क्र./विमास/१०९८/प्र.क्र./२८/९८ शासन हमी, मंत्रालय मुंबई दिनांक १९.८.९८ अन्वये १% विमा रक्कम रु.२,२४६/- कपात करणे आवश्यक असतांना विमा रक्कम कपात केलेली नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत विभागाकडून खुलासा मागविला असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

प्रकरणांत मुद्या क्र.१ नुसार उद्यान विभागाने कंत्राटदारास रु. ४,४९२/- जादा अदा करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केलेले आहे.

मुद्या क्र.३ बाबत स्टॉक रजिस्टर उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे झालेला खर्चाबाबत साशंकता निर्माण होते.

मुद्या क्र.४ बाबत शासकीय विम्याची रक्कम रु.२,२४६/- वसूल करून शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे.

करिता, उपरोक्त प्रमाणे संबंधितांकडून रकमेची वसूली करून तसेच पुढील लेखापरीक्षणापूर्वी स्टॉक रजिस्टर तयार ठेवण्याबाबत संबंधितांना सूचना देणे योग्य. तसेच अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२६ एन-६, एम-२ उद्यान येथे खाजगी ठेकेदारा मार्फत बारा महिने उद्यानाचे संगोपन . करणे बाबत. (अं.प.रक्कम रु.५८,५५५/-)**

आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये बारा महिने संगोपन, विकास व देखभाल कामाची निविदा सूचना जा.क्र./७५२, दिनांक ०३.०३.२००६ रोजी वर्तमान पत्रातून प्रसिध्दीस देवून निविदा मागविल्या असता ६ निविदा विक्री झाल्या असून त्यापैकी ५ निविदा प्राप्त झाल्या. मे.पीयुष नर्सरीज यांचे दर २१.५५% कमी दराने दर प्राप्त झाले असून यांचे दर सर्वात कमी असल्याने जा.क्र.उद्यान/८२१, दिनांक ३१.३.२००६ अन्वये आदेश देण्यात आले आहे. संचिकेची पाहणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. मे.पीयुष नर्सरीज यांचे दर २१.५५% कमी दराने असतांना त्यांच्याकडून निविदा नियम ५४ नुसार ५% अतिरिक्त अनामत रक्कम स्वीकारणे आवश्यक होते.

२. कामाच्या अटी व शर्ती १६ अन्वये उद्यानाच्या संवर्धन, संगोपन व देखभालीच्या कालावधीतील प्रत्येक बिलातून १०% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून राखीव ठेवण्यात येईल. असे असतांना फक्त पहिल्या सहामाही बिलातून सुरक्षा ठेव रक्कम ठेवण्यात आली आहे.

३. लेखा विभागाने सदरील कामासाठी लेखाशिर्षकात याबाबत तरतूद ठेवलेली नाही. मुख्यलेखा अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

४. संचिकेमध्ये कर्मचारी / अधिकारी यांनी कोठेही दिनांक आवक / जावक क्रमांक दर्शविलेला नाही.

५. कामाच्या अटी /शर्ती १८ नुसार रक्कम रू.१००/- च्या मुद्रांक शुल्कावर उद्यानाच्या देखभालीचा करार करणे आवश्यक असतांना रक्कम रू.२०/- च्या मुद्रांकावर करण्यात आला आहे.

६. कामाच्या अटी शर्ती १, १७,२२,२७,३८ बाबत संचिकेत पूर्तता केलेली नाही.

उद्यान विभागाकडून उपरोक्त मुद्यांबाबत खुलासा प्राप्त झालेला नाही. विभागाने उपरोक्त प्रमाणे केलेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२७ :एन-७, एफ सेक्टर उद्यान बारा महिने संगोपन, संरक्षण विकास व देखभाली करीता मे.पीयुष नर्सरीज यांना देणे बाबत.(अं.प.रक्कम रू. ८२,१७२/-)**

सन २००६-०७ या वर्षासाठी सिडको येथील एन-७, एफ सेक्टर उद्यान बारा महिने संगोपन संरक्षण विकास व देखभाली करीता निविदा प्रसिध्द करण्यात आली असता ७ निविदा विक्री झाल्या व ५ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी मे.पीयुष नर्सरी यांची २१.५५% कमी दराची निविदा मा.आयुक्त यांनी स्वीकारली. एजन्सीने करारनामा करून दिल्यानंतर जा.क्र.मनपा/उद्यान/८२२/२००६, दिनांक ३१.३.२००६ रोजी कार्यादेश देण्यात आले. एजन्सीला रक्कम रू.६१२१९/- चे देयक दोन टप्प्यात वितरीत करण्यात आले.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. देयक अदायगी करण्यापूर्वी निविदेतील अट क्र. १४,१६,२०,२३,५९, ६० ची पूर्तता झाल्याबाबत संचिकेत पुरावे उपलब्ध नाहीत.

२. दुसरे व अंतीम देयक अदायगी करतांना १०% सुरक्षा ठेव देयकातून कपात केली नाही. त्यामुळे निविदेतील अट क्र.१८ ची पूर्तता झालेली नाही.

३. सिडको हस्तांतरण लक्षात घेता सिडको भागातील विकास कामांसाठी अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक होते. तसे न झाल्यामुळे संबंधित कामाचा खर्च इतर लेखाशिर्षातून भागवावा लागला तो नियमबाह्य आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही. विभागाचे म्हणणे असे आहे की, निविदेतील अटी / शर्तीप्रमाणे कामे झालेली असून केवळ लेखी अहवाल संचिकेत जोडलेला नाही. ७५% संगोपनाची कामे असल्यामुळे सुरक्षा ठेवची कपात केलेली नाही. सिडको हस्तांतरणाचे काम हे उद्यान विभागाला नविन असल्यामुळे याची अंदाजपत्रकात तरतूद ठेवण्यात आलेली नव्हती. देयक देतेवेळेस इतर लेखाशिर्षातून देण्यात आले. यापुढे याकरीता लेखाशिर्षात तरतूद करण्यात येत आहे .

प्रकरणांत निविदेतील अटी / शर्तीप्रमाणे कामे होतात किंवा नाही याबाबत नियंत्रण ठेवणारे अधिकारी यांनी कर्तव्ये पार पाडलेले नाही . सिडको हस्तांतरण बाबत सिडको भागातील उद्यानांचे देखभाल व संगोपन यांचे नियोजन करणे आवश्यक असतांना संबंधितांनी त्याप्रमाणे नियोजन करून

अर्थसंकल्पिय तरतूदीबाबत कार्यवाही केलेली नाही याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२८ :एन-२ उद्यान ५९० एल.आय.जी.येथील उद्यानाचे वार्षिक संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे बाबत. (अं.प.रक्कम रू. ५८,७७६/-)**

सन २००६-०७ या वर्षामध्ये वार्षिक देखभाल व संगोपनासाठी एन-२ उद्यान ५९० एल.आय.जी. येथील उद्यानासाठी निविदा मागविण्यात आल्या असता ५ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था यांची असून ४.९०% कमी दराची निविदा प्राप्त झाली. निविदा मंजूरी देतांना मा.आयुक्त यांनी १०% कमी दराने निविदा दर मान्य केले. एजन्सीने रू. २०/- च्या मुद्रांकावर करारनामा करून दिलेला आहे. एजन्सीला जा.क्र.मनपा/उद्यान/२३६/०६, दिनांक ३१.३.२००६ रोजी कार्यादेश दिलेले आहेत. एजन्सीला रू.५८,७७६/- रकमेचे देयक अदा करण्यात आले आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतीम करतांना शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस/१०८८/२५१२/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी १९९२ मध्ये दिलेल्या सूचनांचे पालन केलेले नाही.

२. देयक अदायगी करण्यापूर्वी निविदेतील अटी व शर्ती नुसार पूर्तता केली असल्याबाबत पुरावे संचिकेत उपलब्ध नाहीत.

३. उद्यान विभागाने निर्गमित केलेल्या पत्र क्र.३९३/२००७, दिनांक १५.२.२००७ व पत्र क्र.१४०४/०७, दिनांक २१.२.२००७ अन्वये दिलेल्या पत्रानुसार एजन्सीने काम पूर्ण केले किंवा नाही याचा अहवाल संचिकेत नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत उद्यान विभागाने खुलासा सादर केलेला नाही. शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ मधील तरतूदीनुसार निविदा अंतिम करतांना कमीत कमी ३ निविदा असणे आवश्यक आहे. प्रकरणांत एकच निविदा प्राप्त झाल्यानंतर अंतिम केलेली आहे. तसेच निविदेतील अटी /शर्तीची पूर्तता देयक अदायगीपूर्वी केलेली नाही. देयक अदायगी करतांना मा.आयुक्त यांनी १०% कमी दर मान्य केले त्यानुसार कपात केलेली नाही. त्यामुळे मनपाचे रू.५,८७८/- रकमेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

करिता, उपरोक्त अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२९ : सातारा, शिवाजीनगर ११ वी योजना उद्यान वार्षिक देखभालीसाठी दिलेल्या निविदेतील अटी शर्तीची पूर्तता न होणे बाबत.**

सन २००५-०६ मध्ये सिडको परिसरातील उद्यानांचे खाजगी ठेकेदारामार्फत सन २००६-०७ करीता बारा महिने संगोपन, विकास व देखभाल करणेकरीता कामाची निविदा दि. ३.३.२००६ रोजी स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्द झाली. सातारा शिवाजीनगर येथील अकरावी योजना बी, सी व ई सेक्टर उद्यानाचे कामासाठी दिनांक २०.३.२००६ पर्यंत ५ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीचा

दिनांक २४.३.२००६ पर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. तीन निविदेतील सर्वात कमी दराची (२६% कमी) निविदा मे.प्रतिभा नर्सरीज यांची प्राप्त झाली. सदरील निविदा मा.आयुक्तांच्या मान्यतेने स्वीकारण्यात आली.एजन्सीने रू.२०/-च्या मुद्रांकावर करारनामा करून दिला. उद्यान विभागाने जा.क्र.मनपा /८३३ / २००६, दिनांक ३१.३.२००६ अन्वये मे.प्रतिभा नर्सरीज यांना कार्यादेश निर्गमित केले. कार्यादेश निर्गमित करीत असतांना निविदेतील अट क्र.१ ते ८५ च्या अधिन व पूर्ततानुसार कार्यादेश दिले. तसेच उद्यान अधिक्षक किंवा उद्यान विभागाचे कृषी पर्यवेक्षक / सहाय्यक यांचे सूचनेनुसार कामास सुरूवात करावी असे आदेशित केले. एजन्सीने वर्षभर केलेल्या कामाचे देयके रू.१,२९,४८०/- दोन टप्प्यात अदा करण्यात आले.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. देयक अदायगी करण्यापूर्वी निविदेतील अट क्र. १४,१६,२०,२३,५९ व ६० ची पूर्तता झाल्याबाबत पुरावे संचिकेत उपलब्ध नाहीत.

२. उद्यान विभागाने जा.क्र.मनपा/उद्यान/१३९३/२००७, दि.१५.२.२००७ व पत्र क्र.मनपा /उद्यान / १४०४ /०७, दिनांक २१.२.२००७ अन्वये दिलेल्या पत्रानुसार संबंधित एजन्सीने कामे पूर्ण केली किंवा नाही याचा अहवाल संचिकेत नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही. कामाच्या अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३० :एन-६ येथील उद्यानाचे बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.२७,७०४/-)**

सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सिडको येथील एन-६ उद्यान बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाली करीता स्थानिक वृत्तपत्रातून निविदा प्रसिध्द करण्यात आली असता एकच निविदा विक्री झाली. निविदा स्विकृतीच्या वेळी एकच निविदा प्राप्त झाली. सदरील निविदा मे.अनंत नर्सरीज यांनी सादर केली होती. निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ४५.८०% जास्त दराची असून मा.आयुक्तांनी निविदा स्विकारतांना अंदाजपत्रकीय दराने निविदा स्विकारली. संबंधित एजन्सीला जा.क्र.मनपा/उद्यान/८३१/०६, दिनांक ३१.३.२००६ अन्वये कार्यादेश दिलेले आहे. संचिकेतील एन-३ वरील टिपणी नुसार संबंधित ठेकेदारास दिलेले काम रद्य करणे योग्य तसेच उपलब्ध ठेकेदारामार्फत काम करून घेणे योग्य असे अभिप्राय उद्यान अधिक्षक यांनी देवून शहर अभियंता यांनी सदरील टिपणीस मान्यता देवून संचिका मा.आयुक्तांच्या मंजूरीस्तव पाठविली. सदरील टिपणीस आयुक्तांची मान्यता नाही.

उपरोक्त प्रकरणी लेखापरीक्षणात खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतिम करतांना शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्ण क्र.भासस /१०८८ /२५१२ / उद्यान-६, दिनांक २ जानेवारी १९९२ मध्ये दिलेल्या सूचनांचे उद्यान विभागाने पालन केलेले नाही.

२. संबंधित एजन्सीने निविदेसोबत जमा केलेला धनाकर्ष क्र.५७७०३३, दिनांक २३.३.२००६ रक्कम रू.२७००/- इसारा रक्कम महानगरपालिका फंडात जमा केलेली नाही. ज्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. संबंधित एजन्सीला कार्यादेश देतांना निविदेतील अटी शर्तीच्या अधिन राहून कार्यादेश निर्गमित केलेले आहे. परंतू एजन्सीने निविदा अटी शर्तीतील अट क्र.३८ चे पालन केलेले नाही, त्यावर महानगरपालिका प्रशासनाने निविदेतील अट क्र.३८ प्रमाणे कार्यवाही केल्याचा बोध संचिकेत होत नाही.

४. संचिकेतील पान क्र. एनएस-३ वरील टिपणी नुसार सदरील ठेकेदारास दिलेले काम रद्य करावे व उपलब्ध ठेकेदाराकरवी काम करुन घ्यावे यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली नाही.

५. एन-६ येथील उद्यानाचे सन २००६-०७ मध्ये संगोपन, देखभाल झाली किंवा नाही , उद्यानाचे झालेले नुकसान इत्यादी बाबी संबंधी संचिकेत पुरावे नाहीत.

उपरोक्त मुद्यांबाबत सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही. विभागाने सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्यावेळी एकच निविदा प्राप्त झाली असतांनाही तीच अंतिम केली. निविदा अंतिम करतांना शासन निर्णय दिनाक २ जानेवारी १९९२ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही. तसेच संचिकेत एजन्सीने निविदेसोबत जमा केलेला धनाकर्ष क्र.५७७०३३, दिनांक २३.३.२००६ रुपये २७००/- हा मनपा फंडात जमा केलेला नाही. तात्काळ सदरील धनाकर्ष संबंधित बँकेतून तारखेत मुदतवाढ घेवून मनपा फंडात जमा करावा. एजन्सीने काम न केल्यामुळे संबंधित ठेकेदाराविरुध्द निविदेतील अट क्र.३८ नुसार कार्यवाही केलेली नाही. सदरील उद्यानाचे २००६-०७ मध्ये संगोपन, देखभाल, कोणी केले याबाबत संचिकेवरुन बोध होत नाही.

करिता उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३१ : एन-४ -H सेक्टर येथील उद्यानाचे बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे बाबत.**

सन २००५-०६ व सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात एन-४-H सेक्टर येथील उद्यान बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण विकास व देखभाल कामाची निविदा सूचना जा.क्र./७५२, दिनांक ०३.०३.२००६ रोजी स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दीस देवून निविदा मागविण्यात आल्या असता तीन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस १ निविदा प्राप्त झाली. लोकसेवा बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औरंगाबाद यांचे दर १०% कमी असून यांना जा.क्र./उद्यान/मनपा / ८३७, दिनांक ३१.३.२००६ अन्वये १ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७ कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आले आहे.

संचिका तपासणी करतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. शासन निर्णय २ जानेवारी ९२ मधील परिच्छेद क्र.८.३ नुसार निविदा स्वीकारतांना विधीग्राह्य ३ निविदा प्राप्त न झाल्यास दोन वेळा मुदतवाढ देण्यात यावी. दराचा लिफाफा उघडण्यात येवू नये व त्यास पुन्हा मुदतवाढ देण्यात यावी असे असतांना १ निविदा दर प्राप्त झाले असतांना निविदा अंतीम केली आहे.

२. ठेकेदार लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा संस्था यांचे प्रथम सहा महिन्याचे देयक अदा करतांना १०% अनामत रक्कम रू.३८३८/- वजावट करण्यात आले. परंतू दुसरे व अंतिम देयक अदा करतांना अनामत रक्कम वजावट केलेली नाही.

३. जा.क्र.मनपा/१४०४, दिनांक २९.२.२००७, जा.क्र.मनपा/१३९३, दिनांक १५.२.२००७ रोजी ठेकेदार यांना उद्यान अधिक्षक यांनी समाधानकारक काम नसल्यास देयकातून रक्कम कपात करण्यात येईल असे पत्रे दिलेले आहे. याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबत संचिकेत उल्लेख नाही.

४. कामाच्या अटी व शर्ती १४,१६,२०,२३,५९,६० बाबत पूर्तता केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही. विभागाने सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या वेळी एकच निविदा प्राप्त झाली असतांनाही तीच अंतिम केली. निविदा अंतिम करतांना शासन निर्णय दिनाक २ जानेवारी १९९२ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही. निविदेतील अटी/शर्तीचे पालन न करताच देयक अदा केलेले आहे. तसेच देयकातून पहिल्याच व दरम्यानच्या देयकात १०% अनामत रक्कम कपात केली. इतर देयकातून वजावट केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

करिता उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३२ :स.नगरसेविका स्वेच्छा निधीतून समतानगर येथील (खुल्या जागेत) उद्यानामध्ये विविध खेळणी बसविणे बाबत.(अ.प.२५,०००/-)**

स .नगरसेविका यांनी दिनांक ३.१०.२००५ रोजी पत्र दिले आहे की, स्वेच्छानिधीमधून समतानगर येथील खुल्या जागेत उद्यानामध्ये लहान मुलांसाठी रू.२५०००/- पर्यंत विविध प्रकारचे खेळण्या बसविण्यात याव्यात. त्याचसाठी २४८८०/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. जा.क्र.मनपा/लेखा/नि/१८/०६ दिनांक ३.१.२००६ अन्वये A-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ निविदा विक्री झाल्या. तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.स.सुजात हाश्मी ०.३५% कमी दराने यांची आहे. त्यानुसार जा.क्र.मनपा/उद्यान/७००, दिनांक २३.२.२००६ अन्वये कार्यादेश देण्यात आले आहे.

संचिका तपासणीअंती खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. खेळणी बाबत रजिस्टर क्रमांक १०९,११०,१११ उपलब्ध झालेले नाही.

२. १% विमा रक्कम रू.२४८ कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेले नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही. तसेच कंत्राटी कामाच्या विम्याची रक्कम रू.२४८/- देयकातून कपात न केल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. सदरील रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. खुल्या जागेत बसविलेल्या खेळणीबाबत १०९,११०,१११ क्रमांकाचे रजिस्टर लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेले नसल्यामुळे संबंधित ठिकाणी खेळणी बसविल्याची खात्री करता आली नाही.

करिता पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३३ :टाऊन सेंटर सी -४ येथील उद्यानाचे बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे बाबत. (अ.प.रक्कम रू.८४,२०९/-)**

सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सिडको परिसरातील टाऊन सेंटर सी -४ येथील उद्यान बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करिता स्थानिक वृत्तपत्रातून निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा अंतिम दिनांक २०.३.२००६ पर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. सदरील निविदा श्री.एस.आर.दंबीवाल यांनी सादर केली होती. निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी ११% दराची होती. मा.आयुक्तांनी निविदा स्विकारतांना ११% कमी दराने निविदा स्वीकारली. संबंधित एजन्सीला जा.क्र.मनपा/उद्यान/८३०/०६, दिनांक ३१.३.२००६ अन्वये कार्यादेश दिलेले आहे. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संबंधित एजन्सीस कार्यादेश देतांना निविदेतील अटी शर्तीच्या अधिन राहून कार्यादेश निर्गमित केलेले आहे. मात्र मनपा प्रशासनाने निविदेतील अट क्र.३८ प्रमाणे कार्यवाही केल्याचा संचिकेत बोध होत नाही.

२. संबंधित गुत्तेदाराने काम न केल्यामुळे इसारा रक्कम पावती क्र. १६६११० रू.८४०० जप्त करणे क्रमप्राप्त आहे. परंतु विभागाने इसारा रक्कम जप्तीबाबत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

३. टाऊन सेंटर सी -४ सन २००६-०७ मध्ये उद्यानाचे संगोपन, देखभाल झाली की नाही उद्यानाचे झालेले नुकसान इत्यादी बाबी संबंधी संचिकेत पुरावे नाहीत.

४. निविदा अंतीम करतांना शासन निर्णय दि.२ जानेवारी १९९२ मधील तरतूदीचा भंग झालेला आहे.

उपरोक्त मुद्यांबाबत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्यावेळी दोन निविदा प्राप्त झाल्या. निविदा अंतिम करतांना शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही. तसेच संचिकेत एजन्सीने निविदेसोबत जमा केलेली रक्कम रूपये ८४००/- एजन्सीने काम न केल्यामुळे जप्त करून मनपा फंडात भरणा केलेली नाही. तरी तात्काळ एजन्सीची अनामत रक्कम जप्त करून मनपा फंडात भरणा करावी.

करिता उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३४ :टाऊन सेंटर जी सेक्टर येथील उद्यानाचे बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे बाबत. (अ.प.रक्कम रू.३०,८३३/-)**

सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सिडको परिसरातील टाऊन सेंटर जी सेक्टर येथील उद्यान बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करिता स्थानिक वृत्तपत्रातून निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा अंतिम दिनांक २०.३.२००६ पर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. सदरील निविदा श्री.एस.आर.दंबीवाल यांनी सादर केली होती. निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी १०% कमी दराची होती. मा.आयुक्तांनी निविदा स्विकारतांना १०% कमी दराने निविदा

स्वीकारली. संबंधित एजन्सीला जा.क्र.मनपा/उद्यान/८२९/०६, दिनांक ३१.३.२००६ अन्वये कार्यादेश दिलेले आहे. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संबंधित एजन्सीस कार्यादेश देतांना निविदेतील अटी शर्तीच्या अधिन राहून कार्यादेश निर्गमित केलेले आहे. मात्र मनपा प्रशासनाने निविदेतील अट क्र.३८ प्रमाणे कार्यवाही केल्याचा संचिकेत बोध होत नाही.

२. संबंधित गुत्तेदाराने काम न केल्यामुळे इसारा रक्कम पावती क्र. १६६११२ रू.३००० जप्त करणे क्रमप्राप्त आहे. परंतु विभागाने इसारा रक्कम जप्तीबाबत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

३. टाऊन सेंटर सी -४ सन २००६-०७ मध्ये उद्यानाचे संगोपन, देखभाल झाली की नाही उद्यानाचे झालेले नुकसान इत्यादी बाबी संबंधी संचिकेत पुरावे नाहीत.

४. निविदा अंतीम करतांना शासन निर्णय २ जानेवारी १९९२ मधील तरतूदीचा भंग झालेला आहे.

उपरोक्त मुद्यांबाबत सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून दिशाभूल करणारा आहे. विभागाने सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्यावेळी दोन निविदा प्राप्त झाल्या. निविदा अंतिम करतांना शासन निर्णय दिनाक २ जानेवारी १९९२ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही. तसेच संचिकेत एजन्सीने निविदेसोबत जमा केलेली रक्कम रुपये ३०००/- एजन्सीने काम न केल्यामुळे जप्त करून मनपा फंडात भरणा केलेली नाही. तरी तात्काळ एजन्सीची अनामत रक्कम जप्त करून मनपा फंडात भरणा करावी.

करिता उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३५ : एन-२, ए- सेक्टर उद्यानाचे बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.७४,७८६/-)**

सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सिडको परिसरातील एन-२, ए-सेक्टर येथील उद्यान बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण विकास व देखभाल करीता स्थानिक वृत्तपत्रातून निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा अंतिम दिनांक २०.३.२००६ पर्यंत एकूण सहा निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या. निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ११% कमी दराची निविदा श्री.एस.आर.दंबीवाल यांची निविदा स्वीकारण्यात आली. मा.आयुक्तांनी निविदा स्विकारतांना ११% कमी दराने निविदा स्विकारली. संबंधित एजन्सीला जा.क्र.मनपा/उद्यान/८२८/०६, दिनांक ३१.३.२००६ अन्वये कार्यादेश दिलेले आहे. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संबंधित एजन्सीला कार्यादेश देतांना निविदेतील अटी शर्तीच्या अधिन राहून कार्यादेश निर्गमित केलेले आहे. मनपा प्रशासनाने निविदेतील अट क्र. ३८ प्रमाणे कार्यवाही केल्याचा संचिकेत बोध होत नाही.

२. संबंधित गुत्तेदाराने काम न केल्यामुळे इसारा रक्कम पा.क्र.१६६१११ रू.७४००/- जप्त करणे क्रमप्राप्त आहे. परंतू विभागाने इसारा रक्कम जप्ती बाबत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

३. एन-२, ए-सेक्टर सन २००६-०७ मध्ये उद्यानाचे संगोपन ,देखभाल झाली की नाही उद्यानाचे झालेले नुकसान इ. बाबी संबंधी संचिकेत पुरावे नाहीत.

४. निविदा अंतीम करतांना शासन निर्णय दि.२ जानेवारी १९९२ मधील तरतूदींचा भंग झालेला आहे.

उपरोक्त मुद्यांबाबत सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून दिशाभूल करणारा आहे. विभागाने सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्यावेळी दोन निविदा प्राप्त झाल्या. निविदा अंतिम करतांना शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही. तसेच संचिकेत एजन्सीने निविदेसोबत जमा केलेली रक्कम रूपये ७४००/- एजन्सीने काम न केल्यामुळे जप्त करून मनपा फंडात भरणा केलेली नाही. तरी तात्काळ एजन्सीची अनामत रक्कम जप्त करून मनपा फंडात भरणा करावी.

करिता उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३६ :सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सिडको भागातील कॅनॉट प्लेस उद्यानाच्या देखभाल संगोपन विकास करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.**

सन २००६-०७ या वर्षात स्थानिक वृत्तपत्रातून जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात येवून निविदा विक्री व स्विकृतीच्या तारखेपर्यंत ७ निविदा विक्री झाल्या. पैकी ३ निविदा प्राप्त झाल्या असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची (३ पैकी कमी दराची) निविदा मे.आनंत नर्सरीज यांची होती. उद्यान अधिक्षक यांच्या टिपणीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने काम करण्यास ठेकेदाराने लेखी संमती दिली असे अभिप्राय संचिकेतील परिच्छेद (४) प्रमाणे नमूद आहेत. मा.आयुक्त यांनी ५% कमी दर मान्य करून निविदा स्वीकारली. एजन्सीने रू.२०/- च्या मुद्रांकावर करारनामा लिहून दिला. त्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/८३८/२००६, दिनांक ३१.३.२००६ अन्वये कार्यादेश निर्गमित केलेले आहेत. संबंधित एजन्सीमार्फत उद्यानाचे काम होत नसल्याचे अभिप्राय उद्यान अधिक्षक यांनी परिच्छेद क्र.(११) वर नोंदवून दिलेले काम रद्य करून उपलब्ध ठेकेदार लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार संस्था यांचे मार्फत काम करून घेण्यास प्रस्ताव सादर केला. त्यास शहर अभियंता व मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. तद्नंतर लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार संस्थेने कामाबाबत करारनामा करून दिला, त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.मनपा/उद्यान/२८६/२००८ दिनांक २२.१०.२००८ रोजी कार्योत्तर कार्यादेश देण्यात आले. संबंधित एजन्सीला ७ महिन्याचे देयक अदा केलेले आहे. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतीम झाल्यानंतर कार्यादेश दिलेल्या एजन्सीने काम केले नाही तर त्याचे विरूध्द निविदा अटी व शर्ती मधील अट क्र.३८ प्रमाणे कार्यवाही केली असल्याचे दिसून आलेले नाही.

२. लेखा विभागाने दिनांक ६.३.२००९ रोजी देयक पारीत करते वेळी मूळ ठेकेदाराने काम न केल्याने त्यांचेवर कार्यवाही झालेली नाही. तसेच त्यांची अनामत रक्कम जप्त करण्याबाबत अभिप्राय देवूनही अनामत जप्तीची कार्यवाही केल्याचे संचिकेत दिसून आलेले नाही.

३. लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा संस्थेला दिलेले कार्योत्तर कार्यादेश क्र.मनपा /उद्यान / २८६/०८, दिनांक २२.१०.२००८ मध्ये कोणत्या कालावधीसाठी कामे दिली याचा उल्लेख नाही. त्यामुळे कार्यादेशाबाबत साशंकता निर्माण होते.

४. देयके अंतीम पारीत करतांना निविदा अटी शर्ती १४, १६,२०,२३,५९,६० मधील बार्बींची पूर्तता केली नसल्याचे दिसून येते.

५. संचिकेतील अंदाजपत्रकीय बाबी प्रत्यक्ष जागेवर असल्याबाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. प्रकरणांत सदरील कामे प्रथमत: मे.अनंत नर्सरीज यांना कार्यादेश देण्यात आले. परंतू संबंधित एजन्सीने काम न केल्यामुळे सदरील काम लोकसेवा सुशिक्षित सेवा सहकारी संस्था यांना सदरील उद्यानाचे काम देण्यात आले. प्रकरणांत लेखा विभागाने दिनांक ६.३.२००९ रोजी संचिकेत अभिप्राय नोंदवूनही काम न केलेल्या कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्तीची कार्यवाही केलेली नाही. तात्काळ अनामत रक्कम जप्तीची कार्यवाही करण्यात यावी.

करिता, उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३७ :औरंगाबाद महानगरपालिका येथील उद्याने बारा महिने संगोपन , देखभाल व उद्यान विकास / विकसित करणे बाबत खालील प्रकरणांची माहिती उपलब्ध करून देणे बाबत.**

सन २००६-०७ या वर्षाची खालील नमूद केलेल्या उद्यानाची माहिती लेखापरीक्षण कामी देण्यात यावी.

१. प्र.क्र.९८ अंतर्गत शंकर नगर ईटखेडा येथील उद्यान विकसित करणे.
(अं.प.रक्कम रू.१,००,५८४/-)

२. प्र.क्र.९८ अंतर्गत अभिनंदन सोसायटी येथील उद्यान विकसित करणे.
(अं.प.रक्कम रू.२,५१,५७२/-)

३. प्रभाग क्र.९८ अंतर्गत नाथपुरम येथील उद्यान विकसित करणे, संगोपन व देखभाल
(अं.प.रक्कम रू.३,१६,३६६/-)

विभागाने लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत उपरोक्त उद्यानांची माहिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे. करिता, प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३८ : सन २००६-०७ या आर्थिक वर्षात लाकडी ट्री गार्ड खरेदी करणेबाबत. (अं.प.रक्कम रू.९६,०००/-) (खर्च रू.९५,९६५/-)**

सन २००६-०७ या आर्थिक वर्षात उद्यान विभागा अंतर्गत लाकडी ट्री गार्ड खरेदी करणेसाठी निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/९/०६, दिनांक १९.६.२००६ अन्वये form -D नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी ९.०९% दराची निविदा श्री.संतोष चव्हाण यांची होती. जा.क्र.मनपा/उद्यान/११८४, दिनांक ९.१०.२००६ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले असून यासाठी ९६,०००/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. ४% VAT रक्कम ३८३९/- वजावट झालेली नाही.

२. D.C. व बिल सादर केलेले दिसून आलेले नाही.

३. १% विमा रक्कम ९६०/- कपात केलेली नाही.

४. रजिस्टर नमुना क्रमांक १०९,११०,१११, विभागाने लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.१ अन्वये रक्कम रू.३८३९/- व मुद्दा क्र. ३ अन्वये रक्कम रू.९६०/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.३९ : सन २००६-०७ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.१९ रायगडनगर येथील उद्यान विकसित करणे बाबत.(३ वर्ष मशागत दुरूस्तीसह) (अं.प.रक्कम रू.४,९९,९००/-) (खर्च रक्कम रू.६,८५,९१२/-)**

सन २००६-०७ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.१९ रायगडनगर येथील उद्यान विकसित करणे करीता कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/मु.लेखा/नि/८४/०७, दिनांक ५.१.२००७ अन्वये बी -१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण चार निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेर्पंत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची ३.३३% निविदा श्री.एम.एस.कन्स्ट्रक्शन्सला कार्यालयीन आदेश जा.क्र.उद्यान / १४७०/०७ दिनांक २१.३.२००७ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर विना निविदा कार्योत्तर कार्यादेश भवानी कन्स्ट्रक्शन यांना जा.क्र.मनपा/उद्यान/६१६/११, दिनांक १५.१.२०११ अन्वये देण्यात आले.(दिनांक १.५.२०१० ते १५.१.२०११ पर्यंत) त्यानंतर मा.आयुक्तांच्या मान्यतेनुसार दिनांक १५.१.२०११ पासून पुढील ०९ महिन्यापर्यंत कार्यालयीन आदेश मनपा /उद्यान /३३५/११ दिनांक १९.१०.२०११ अन्वये कार्योत्तर कार्यादेश देण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. भवानी कन्स्ट्रक्शन्स यांना दिनांक १.५.२०१० ते १५.१.२०११ व १५.१.२०११ ते पुढील ९ महिने पर्यंत कार्योत्तर कार्यादेश विना निविदा दिलेले आहेत. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही. सदरील कालावधीतील संबंधित एजन्सीला अदा केलेली रक्कम रू.१,९६,०१०/- आक्षेपार्ह आहे.

२. दिनांक २१.३.२००७ पासून ३ वर्ष सदरील उद्यानाचे संगोपन, संवर्धन विकासासाठी झालेल्या खर्चातील ॲटम दिनांक १.५.२०१० ते १५.१०.२०११ पर्यंत काम दिलेल्या एजन्सीच्या परिशिष्ट -ब मध्ये कमी झालेले आहेत त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | तपशिल | दि.२१.३.०७ ते २१.३.१० कालावधीतील संख्या | १.५.१० ते १५.१०.११ कालावधीतील संख्या | तफावत | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरवळ | १५०० | १००० | ५०० | १५५ | ७७५०० |
| २ | शोभिवंत झाडे | २५ | -- | २५ | १९० | ४७५० |
| | | | | | एकूण | ८२२५०/- |

रक्कम रू.८२२५०/- झालेला खर्च हा सदरील उद्यानात उपरोक्त ॲटम कमी झाल्यामुळे निष्फळ ठरतो.

३. मे.बीडवेल कन्स्ट्रक्शन्स यांनी भरलेल्या निविदेतील अट क्र.३ प्रमाणे काम दोन महिन्याच्या आत पूर्ण करावे नसता दररोज रू.१००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल असे नमूद आहे. यानुसार संबंधित एजन्सीने विहित मुदतीत काम पूर्ण केल्याचा पुरावा संचिकेत नाही. तसेच दुसरे व दरम्यानचे देयक दिनांक ६.२.२००८ रोजी रेकॉर्ड झालेले आहे. त्यानुसार दिनांक २१.३.२००७ पासून ६.२.२००८ पर्यंतच्या कालावधीचा दंड वसूल होणे गरजेचे आहे.

४. विना निविदा काम दिलेल्या एजन्सीचा कालावधी दिनांक १५.१०.२०११ रोजी संपुष्टात आल्यानंतर सदरील उद्यानाची देखभाल कोण करते याचा बोध होत नाही.

५. रायगडनगर येथील उद्यानाचे काम २% कमी दराने दिलेले होते. विना निविदा काम देतांना अंदाजपत्रकीय दराने दिलेले आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.२ अन्वये रक्कम रू.८२,२५०/-, मुद्दा क्र.३ अन्वये दंडाची रक्कम परिगणीत करून व मुद्दा क्र.५ अन्वये रू.३९२०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४० :सिध्दार्थ उद्यान येथे लहान मुलांची खेळणी बसविणे.**
**(अं.प.रक्कम रू.१५,००,०००/-)(अदा रक्कम रू.१३,४०,५००/-)**

सन २००६-०७ मध्ये सिध्दार्थ उद्यान येथील लहान मुलांची खेळणी बसविणेसाठी १५,००,०००/- खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून यासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/०९/२००६ दिनांक १९.६.२००६ अन्वये form - D नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण -३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या असून Sky Interprises यांचे दर ९.९% जास्त दराने असल्याने संबंधितास वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले असता अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार आहे. त्या अन्वये मंजूरी देण्यात आली असून जा.क्र.मनपा /उद्यान /१२१९ / २००६, दिनांक १७.११.२००६ अन्वये कार्यादेश देण्यात आला असून कामाची मुदत दोन महिने देण्यात आली आहे. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहे.

१. खेळणी प्राप्त झाल्याबाबत रजिस्टर क्रमांक १०९,११०,१११ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

२. संपूर्ण खेळणी प्राप्त झाल्याबाबत Delivery challan नाही. फक्त रक्कम रु.५,१०,०००/- चे D.C. संचिकेत असून त्याचा क्रमांक ४००, दिनांक १७.१.२००७ आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. खेळणी प्राप्त झाल्याचे स्टॉक रजिस्टर १०९,११० व १११ उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे खेळणीचा पुरवठा झाला किंवा नाही याबाबत स्पष्टता होत नाही. करिता संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र. ४१ :सिडको भागातील उद्यानांच्या संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे बाबत.**

लेखापरीक्षणासाठी सिडको भागातील उद्यानांच्या संचिका उपलब्ध झालेल्या नाहीत. सन २००६-०७ व सन २००७-०८ या वर्षातील खालील संचिका त्वरीत उपलब्ध करुन द्याव्यात.

१) १२ वी योजना शिवाजीनगर उद्यान सन २००६-२००७
२) एन-११ स्मशानभूमी उद्यान सन २००६-२००७
३) अयोध्यानगर उद्यान सन २००६-२००७
४) एन-२ ए सेक्टर उद्यान सन २००७-२००८.

उपरोक्त संचिका लेखापरीक्षण अंतिम होईपर्यंत उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. पुढील लेखापरीक्षणाच्या वेळी संचिका उपलब्ध ठेवाव्यात. संचिका लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करुन न दिल्याबद्यल संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४२ : सन २००७-०८ या वर्षात वॉर्ड क्र.२५, अस्मीता पार्क येथील खुल्या जागेमध्ये खत व माती टाकणे या कामी झालेल्या अनियमिततेबाबत.**

सन २००७-०८ या वर्षात नगरसेवक स्वेच्छा निधी या लेखाशिर्षातून वॉर्ड क्र.२५ येथे अस्मीता पार्कच्या खुल्या जागेमध्ये खत व माती टाकणे करीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील कामासाठी ३ निविदा विक्री झाल्या व ३ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराची निविदा मे.पियुष नर्सरी यांची होती. संबंधित एजन्सीने कामाबाबत रु.२०/- च्या मुद्रांकावर करारनामा करुन दिल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६२१/०८, दिनांक १३.३.२००८ अन्वये कार्यादेश देण्यात आले. संचिकेमध्ये संबंधितांना काम पूर्ण झाल्यानंतर देयक अदा केल्याची नोंद आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. सदरील कामाबाबत कामावरील पर्यवेक्षण करणा-या कर्मचा-यांचे अभिप्राय / अहवाल संचिकेत नाहीत.

२. कंत्राटी कामाचा १% वीमा रक्कम देयकातून कपात झालेली नाही किंवा शासनाने नेमून दिलेल्या एजन्सीचे विमापत्र संचिकेत उपलब्ध नाही.

३. स.नगरसेविका यांनी दिलेल्या दिनांक १६.८.२००७ च्या पत्रास दप्तरी आवक नोंदवही मध्ये नोंद न घेताच अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही. सदरील एजन्सीचे कामाबाबत पर्यवेक्षण करणा-या कर्मचा-यांचे अभिप्राय / अहवाल संचिकेत नाही. त्यामुळे काम योग्यरित्या झाले किंवा नाही याची खात्री पटत नाही. कंत्राटी कामाचा विमा रक्कम देयकातून कपात केलेली नाही. सदरील रक्कम कपात करुन संबंधित शासकीय कार्यालयात जमा करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४३ :सन २००७-०८ मध्ये १००० लाकडी ट्री गार्ड विना निविदा खरेदी करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.८५,०००/-)**

सन २००७-०८ या वर्षात लाकडी ट्री गार्ड खरेदी करण्यासाठी सन २००६-०७ या वर्षातील दराप्रमाणे उपलब्ध ठेकेदार श्री.भगवान गडपे यांचेकडून खरेदीसाठी प्रस्ताव सादर आहे. निविदा काढून अंतीम करण्यासाठी वेळ लागणार आहे. निविदा काढण्याकरीता स्वतंत्र संचिका सादर केल्याबाबत, उद्यान अधिक्षकांनी अभिप्राय दिलेले आहेत. संबंधित गुत्तेदाराने दिनांक ५.६.२००७ रोजी ५००, दि.२५.६.२००७ रोजी ३०० व दिनांक ४.७.२००७ रोजी २०० असे १००० लाकडी ट्री गार्ड पुरवठा केल्याचे चालान संचिकेत उपलब्ध आहेत. सन २००७ -२००८ च्या निविदेमध्ये प्राप्त दराप्रमाणे पुरवठा करण्यास गुत्तेदार तयार असल्याची टिपणी परिच्छेद क्र.(११) मध्ये विनिर्दीष्ट आहे. एजन्सीला रू.७३,९२०/- रकमेचे देयक अदा केलेले आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा न मागविता उपलब्ध ठेकेदारामार्फत खरेदी करणे ही बाब नियमबाह्य आहे. तसेच दिनांक ०२ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचा भंग करणारी बाब आहे.

२. एजन्सीचे दर अंतीम करतांना मागील वर्षाचे दराने रू.८५/- प्रती ट्री गार्ड प्रमाणे अंदाजपत्रक तयार केले. याच वर्षातील निविदेद्धारे दर मागविण्याचे अंदाजपत्रक तयार करतांना रू.७५/- प्रती ट्री गार्ड अंदाजपत्रक तयार केलेले आहेत. अंदाजपत्रक तयार करतांना कोणत्या मानांकनाचा वापर केला याचा बोध होत नाही.

३. कार्यादेश निर्गमित करतांना दिलेला संदर्भ हा चूकीचा व दिशाभूल करणारा आहे. कारण उपलब्ध गुत्तेदाराने निविदेमध्ये सहभाग घेतलेला नव्हता.

४. कंत्राटदाराचे देयकातून १% विमा रक्कम कपात केलेली नाही किंवा विमा प्रमाणपत्र संचिकेत नाही.

५. उद्यान विभागाने प्राप्त लाकडी ट्री गार्ड चे साठा, वितरण व शिलकीबाबतच्या नोंदीची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उद्यान विभागाने १००० लाकडी ट्री गार्ड विना निविदा खरेदी केलेले आहे. खरेदी केलेल्या वस्तुंचे दर संदर्भ वर्षातील इतर निविदाधारकाच्या प्राप्त दरानुसार देयक अदायगी केलेली आहे. देयकातून १% कंत्राटी कामाची विमा रक्कम रुपये ८५०/- कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. संबंधितांकडून रक्कम वसूल करण्यात यावी. खरेदी केलेल्या ट्रीगार्डचे साठा नोंदवही, वितरण, व शिलकीबाबतच्या नोंदीचे रजिस्टर लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेले नाही. पुढील लेखापरीक्षणापूर्वी रजिस्टर उपलब्ध करून द्यावे.

उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४४ : सन २००७-०८ या वर्षाकरीता लाकडी ट्री गार्ड खरेदी प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम ४,५०,०००/-)**

सन २००७-०८ या वर्षात लाकडी ट्री गार्ड खरेदी करण्यासाठी ई - टेंडरींग मार्फत निविदा मागविण्यात आल्या असता ३ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदामध्ये कमी दराची निविदा संतोष चव्हाण यांची आहे. संबंधित कंत्राटदाराने रू.२०/- च्या मुद्रांकावर करारनामा करून दिलेला आहे. तद्नंतर कार्यालयाने जा.क्र.मनपा/उद्यान/२०४/०७ दिनांक १६.८.२००७ रोजी पुरवठा आदेश निर्गमित केले. एजन्सीने लाकडी ट्री गार्ड खालील तारखांना पुरवठा केलेत.

| चलन क्रमांक | दिनांक | तपशील | संख्या |
|---|---|---|---|
| १ | १७.८.२००७ | लाकडी ट्री गार्ड | ४००/- |
| २ | २१.८.२००७ | लाकडी ट्री गार्ड | ७००/- |
| ३ | २७.८.२००७ | लाकडी ट्री गार्ड | ६००/- |
| ४ | ३०.८.२००७ | लाकडी ट्री गार्ड | ६००/- |
| ५ | ०३.०९.२००७ | लाकडी ट्री गार्ड | ३००/- |
| ६ | ११.०९.२००७ | लाकडी ट्री गार्ड | ४००/- |
| ७ | निरंक | लाकडी ट्री गार्ड | ३००/- |
| ८ | निरंक | लाकडी ट्री गार्ड | ४००/- |
| ९ | निरंक | लाकडी ट्री गार्ड | ३००/- |
| १० | निरंक | लाकडी ट्री गार्ड | ५००/- |
| | | | **४५००/-** |

उपरोक्त पुरवठा प्रमाणे एजन्सीला दोन टप्प्यात देयक अदा करण्यात आले. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतीम करतांना शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ चे पालन झालेले नाही.

२. लाकडी ट्री गार्ड पुरवठा आदेशातील अटी व शर्ती नुसार विहीत मुदतीत पुरवठा झालेला नाही. विलंबाने पुरवठा केलेल्या ट्री गार्डवर विलंब दंड आकारला नाही.

३. कार्यादेशातील अटी व शर्ती मध्ये पुरवठा करण्यास विलंब झाल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल असे संबंधितांना कळविले. परंतू सदरील अट टाकतांना specific Fine किती असणार याबाबी स्पष्ट असणे आवश्यक आहे.

४. संचिकेत लाकडी ट्री गार्ड पुरवठ्याबाबत प्राप्त चालान क्र.७,८,९,१० यावर दिनांक निरंक आहे. तसेच ट्री गार्ड उद्यान विभागाने स्वीकारल्याची पोच नाही. त्यामुळे ट्री गार्ड प्राप्त झाले की नाही याबाबत साशंकता निर्माण होते. १५०० ट्री गार्डच्या खरेदीसाठी झालेला खर्च रू.१,१०,८८०/-

निष्फळ ठरतो. ट्री गार्ड प्राप्त झाल्याबाबत साठा नोंद, वितरण व शिल्लक याची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही.

उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. निविदा अंतिम करतांना २ निविदा स्विकृतीवरच अंतिम केलेल्या आहेत. शासन निर्णय २ जानेवारी १९९२ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही. ट्रीगार्डचा विलंबाने पुरवठा झालेला असून विलंब दंड आकारलेला नाही. देयक अदायगीच्या वेळी चालान क्र.७,८,९,१० बाबत रुपये १,१०,८८०/- खर्च झालेला असून इतक्या रकमेचे १५०० ट्रीगार्ड प्राप्त झाल्याची नोंद रजिस्टर क्र.१०९,११०,१११ लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे झालेला खर्च निष्फळ ठरतो.

करिता, उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४५ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात उद्यान विभागामध्ये झाडांना पाणी देणे व आवश्यकतेनुसार झाडांची / ट्री गार्डची वाहतूक करणेच्या कामात झालेली अनियमितता व आर्थिक नुकसानीबाबत .(अं.प.रक्कम १,९२,०००/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात उद्यान विभागामध्ये झाडांना पाणी देणे व आवश्यकतेनुसार झाडांची / ट्री गार्डची वाहतूक करणे इत्यादीकरीता टँकर /ट्रॅक्टर ट्रॉली (२) रु.१६,०००/- प्रती माह प्रती टँकर किरायाने लावले होते. यासाठी उपलब्ध ठेकेदार यांना कार्यादेश क्र.मनपा/उद्यान/२९१/२००७ दिनांक ८.१०.२००७ अन्वये देण्यात आले. कार्योत्तर कार्यादेश ६ महिने मुदतीचे असून अं.प.रक्कम रु.१,९२,०००/- चे होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. उद्यान विभागाने विना निविदा रक्कम रु.१,९२,०००/- चे कामाचे कार्यादेश निर्गमित केले. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदीचा भंग झालेला आहे.

२. सहा महिने करीता किरायाने लावलेले टँकरने कोठे व किती ट्रीप केल्या यासाठी लेखापरीक्षण कामी लॉगबुक उपलब्ध झालेले नाही.

३. संचिकेतील कार्यादेश व संचिकेत ट्रॅक्टर क्र. MHZ-२२४६ व MH-२० C-१९२७ ट्रॅक्टरचे ट्रीप बाबत जोडलेले तक्ते तपासले असता खालील प्रमाणे टॅक्टरचे ट्रीप मध्ये तफावत असल्यामुळे देयकातून ट्रीप नुसार देयक कपात करणे आवश्यक होते.

| अ.क्र. | ट्रॅक्टर क्र. | सहा महिन्याची सरासरी | प्रत्यक्ष ट्रीप | तफावत ट्रीप |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | MHZ -२२४६ | ९०० | ६६३ | २३७ |
| २ | MH-२०-C-१९२७ | ९०० | ६९७ | २०३ |
| | | | **एकूण** | **४४०** |

एकूण ४४० ट्रीप कमी झाल्यामुळे प्रती ट्रीप रु.१०६.६६X४४०=४६९३०/- देयकातून कपात होणे आवश्यक होते. परंतू देयकातून केवळ रु.९६००/- ५% नाममात्र कपात केलेली आहे.

रू.४६९३०/- मधून रू.९६००/- वजा जाता रू.३७,३३०/- कपात न झाल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४६ : प्रभाग क्र.९८ अंतर्गत नाथपुरम येथील उद्यान विकसित करणे, संगोपन करणे व देखभाल करणे. (अं.प.रक्कम रू. ३,१६,३६६/-)**

प्रभाग क्र.९८ नक्षत्रवाडी नाथपुरम कांचनवाडी येथील उद्यानात लॉन लावणे, बॉर्डर लावणे, फुलझाडे लावणे व बारा महिने संगोपन व देखभाल करणे या कामासाठी अं.प.रक्कम रू.३,१६,३६६/- एवढ्याचे तयार करण्यात आले.

आर्थिक वर्ष २००७-०८ मध्ये अंदाजपत्रक तयार करण्यात आले. परंतू या वित्तीय वर्षासाठी ठेवण्यात आलेली तरतूद संपलेली आहे. या वर्षात काम करण्यात आलेले नाही. तद्नंतर दिनांक ७.५.२००८ रोजी याच कामाची (फेर निविदा) काढण्यात आली असता २ निविदा विक्री झाल्या असून २ निविदा प्राप्त झाल्या आहे. निविदाधारक काझी गोव्हर मोहीयोद्दीन यांचे दर १०% कमी दराने असल्याने संबंधित काम यांना जा.क्र.मनपा/उद्यान/५०१/०९, दिनांक ०२.०३.२००९ अन्वये कार्यादेश (एक वर्ष कालावधीसाठी सन २००९-१०) निर्गमित करण्यात आला आहे. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २.१.१९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदीचा भंग झालेला आहे.

२. सन २००८-०९ मध्ये निविदा मागविण्यात आल्या. परंतू महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती ठीक नसल्याचे कारण संचिकेत नोंदवून उद्यान विभागाने आर्थिक स्थिती बाबत लेखा शाखेचे अभिप्राय न घेता आपल्या स्तरावर निर्णय घेणे ही बाब उचित नाही.

३. सन २००७-०८ व सन २००८-०९ या वर्षात सदरील उद्यानाची देखभाल कोणी केली याचा सविस्तर खुलासा व्हावा.

४. निविदा अंतिम करतांना सन २००८-०९ मधील दरानुसार निविदा शहर अभियंता यांचे स्तरावर अंतीम केली ही बाब आक्षेपार्ह आहे.

५. देयक अदायगी करतांना १०% सुरक्षा ठेव कपात केलेली नाही.

६. अंदाजपत्रक तयार करतांना लॉन लागवडीसाठी दर प्रती चौ.मी.रू.१३०/- असतांना रू.२५/- जादा दराने अंदाजपत्रक तयार केले ज्यामुळे रू.२८,१२५/- रकमेचे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला असून मुद्दा क्र.१ व ६ बाबत सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. निविदा अंतिम करतांना शासन निर्णय २ जानेवारी १९९२ चे पालन करणे आवश्यक आहे. तसेच पी.डब्ल्यू.डी. उद्यान व उपवने विभाग यांचे दरानुसार अंदाजपत्रक तयार केलेले असून प्रकरणांत रू.२५/- जादा दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे असे असतांनाही विभागाने तयार केलेले अंदाजपत्रक बरोबर आहे असे विभागाचे म्हणणे आहे जे की, संयुक्तिक नाही. महानगरपालिकेचे झालेले रू.२८,१२५/- चे आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४७ :प्रभाग क्र.९८ अंतर्गत अभिनंदन सोसायटी येथील उद्यान विकसित करणे.**

प्रभाग क्र.९८, नक्षत्रवाडी अभिनंदन सोसायटी येथील उद्यानामध्ये सन २००७-०८ या वर्षात हिरवळ लागवड करणे, बॉर्डर लावणे, फुलझाडे लावणे, उद्यानाची बारा महिने मशागत व संगोपन करणे या कामाचे अंदाजपत्रक रु.२,५१,५७२/- एवढे आहे. सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण १ निविदा विक्री झाली. निविदा स्वीकृतीच्या अंतीम तारखेस एकूण १ निविदा प्राप्त झाली. ठेकेदार भगवान रामभाऊ गडपे यांची ५.५०% कमी दराची एकच निविदा असल्याने जा.क्र./मनपा/उद्यान/६१२, दिनांक १०.३.२००८ अन्वये बारा महिने व जा.क्र.मनपा/उद्यान/५२०, दिनांक १२.३.२००९ अन्वये ४ महिने मुदतवाढ देवून रक्कम रु.२,३७,९८४/- एवढा खर्च करण्यात आला.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. शासन निर्णय २ जानेवारी १९९२ मधील परिच्छेद क्र.८.३ नुसार विधीग्राह्य ३ निविदा प्राप्त न झाल्यास दोन वेळा मुदतवाढ देण्यात यावी. ३ निविदा नसल्यास दराचा लिफाफा उघडण्यात येवू नये व त्यास पुन्हा मुदतवाढ देण्यांत यावी असे असतांना १ निविदा प्राप्त असतांना कार्यादेश देण्यात आले आहे.

२. ठेकेदाराला देयक अदा करतांना तिन्ही देयकातून सुरक्षा ठेव रक्कम वजावट होणे आवश्यक असतांना पहिले देयकातून २५% सुरक्षा ठेव रककम रु.३६,६१९/- वजा करण्यात आले आहे. दिनांक १०.९.२००८ रोजी संबंधितास मुदती अगोदर रक्कम परत देण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

३. उद्यान बारा महिने संगोपन व देखभाल देतांना उद्यानाची सन २००६-०७ या वर्षाची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

४. निविदा नियम ५४ नुसार १% विमा रक्कम रु.२०९७/- वजावट झालेली नाही.

५. परिशिष्ट ब मधील अ.क्र.७ वॉच ॲण्ड वॉर्ड (बारा महिने) १ युनिट ४३,८००/- हा दर कोणत्या आधारे लावण्यात आला या बाबतची माहिती द्यावी.

मुद्या क्र.१ व ४ बाबत विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. निविदा अंतिम करतांना एकच निविदा प्राप्त झाल्यानंतर निविदा अंतिम करणे योग्य नाही. दिनांक २ जानेवारी १९९२ मधील तरतूदीनुसार कमीत कमी तीन निविदा विधीग्राह्य प्राप्त होणे आवश्यक आहे. निविदा नियम ५४ नुसार कंत्राटी कामाचा विमा रक्कम रु. २०९७/- संबंधितांकडून वसूल करून शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे.

करिता, उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४८ : प्रभाग क्र.९८ अंतर्गत शकरनगर ,ईटखेडा यथील उद्यान विकसित करणे. (अं.प.रक्कम रु.१००५८४/-)**

सन २००७-०८ या वर्षात प्र.क्र.९८ अंतर्गत शंकरनगर ईटखेडा येथील उद्यानामध्ये लॉन लावणे, बॉर्डर लावणे,शोभिवंत झाडे लावणे, उद्यानाची बारा महिने संगोपन व देखभाल करणे या कामाचे

रू.१००५८४/- एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण १ निविदा विक्री झाली असून स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १ निविदा प्राप्त झाली आहे. ठेकेदार भगवान रामभाऊ गडपे यांची ४.९९% कमी दराची निविदा असल्याने जा.क्र.मनपा /उद्यान / ६११/२००८ , दिनांक १०.३.२००८ अन्वये व मनपा/ उद्यान / ५१९ , दिनांक १२.३.२००९ कार्यादेश (१२ महिने मुदतवाढ ) देण्यात आला.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. शासन निर्णय २ जानेवारी १९९२ मधील परिच्छेद क्र.८.३ नुसार विधीग्राह्य ३ निविदा प्राप्त न झाल्यास दोन वेळा मुदतवाढ देण्यात यावी. ३ निविदा नसल्यास दराचा लिफाफा उघडण्यात येवू नये व त्यास पुन्हा मुदतवाढ देण्यात यावी असे असतांना १ निविदा प्राप्त असतांना कार्यादेश देण्यात आला आहे.

२. सुरक्षा अनामत रक्कम ही प्रत्येक देयकातून १०% कपात करणे आवश्यक असतांना प्रथम देयकातून ५% रक्कम ३०७८/- वजावट करण्यात आली. दिनांक १०.९.२००८ रोजी मुदती अगोदर रक्कम अदा करण्यात आली आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

३. शंकरनगर, ईटखेडा येथील उद्यान बारा महिने संगोपन व देखभाल देतांना उद्यानाची सन २००६-२००७ या वर्षाची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

विभागाने सादर केलेल्या खुलाशामध्ये मुद्या क्र.१ बाबतचा खुलासा असमाधानकारक आहे. निविदा अंतिम करतांना एकच निविदा प्राप्त झाल्यानंतर अंतिम करणे योग्य नाही. दिनांक २ जानेवारी १९९२ मधील तरतूदीनुसार कमीत कमी तीन निविदा विधीग्राह्य प्राप्त होणे आवश्यक आहे.

करिता, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.४९ : सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-२ ५९० येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन देखभाल विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.६८,३९७/- प्रत्यक्ष खर्च ५७,३६३/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-२, ५९० येथील उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणे करिताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामासाठी एकूण ०२ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०१ निविदा प्राप्त झाली. लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांची निविदा होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३५८, दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते दिनांक ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२००७ असा असतांना निविदा दिनांक २४.४.२००७ रोजी उघडल्या असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना

संबंधित एजन्सीस अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ३३,४६२/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रू.२९४६/- कपात का केलेली नाही याचा बोध होत नाही.

३. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबी बाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

४. लेखाविभागाचे अंदाजपत्रकीय तरतूदीचे अभिप्राय न घेता काम करण्यात आले आहे.

५. २ जानेवारी १९९२ च्या शासननिर्णयाचे पालन केलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. मुद्या क्र.१ बाबत विभागाचे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. निविदा उघडल्यानंतर विनाकार्यादेश एजन्सीकडून काम करुन घेणे योग्य नाही. एजन्सीने कार्यादेशापूर्वी काम केल्याबाबत साशंकता आहे. करिता, कार्यादेशाविना अदा केलेली रक्कम रू.३३,४६२/- संबंधितांकडून वसूल करणे उचित राहील. निविदेतील अटी /शर्ती प्रमाणे लेखी पुरावे सादर करण्यास उद्यान विभाग असमर्थ ठरलेला आहे. निविदा अंतिम करतांना शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ मधील तरतूदींचे पालन विभागाने केलेले नाही.

करिता, उपरोक्त महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५० : सन २००७-०८ या वर्षातील एन-११ स्मशानभूमी उद्यानाची बारा महिने, संगोपन, संरक्षण बाबतच्या संचिकेतील अपूर्ण कागदपत्रांबाबत.(अं.प.रक्कम रू.४९,६९७/-)**

सन २००७-०८ या वर्षातील सिडको भागातील एन-११ स्मशानभूमीची उद्यानाची संचिका तपासली असता संचिकेत ज्या गुत्तेदारास काम देण्यात आले. त्यांची निविदा कागदपत्रे उपलब्ध नाहीत. त्यामुळे परिशिष्ट - ब प्रमाणे झालेली कामे व देयकाची तपासणी करता आली नाही. एकूणच लेखापरीक्षण करता आले नाही.

विभागाने लेखापरीक्षण अंतिम होईपर्यंत सदरील उद्यानाची उपरोक्त माहिती सादर केलेली नाही. त्यामुळे पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवण्यात यावे. तसेच संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५१ : सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-१ उद्यान येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.१,७१,७११/-) (प्रत्यक्ष खर्च १,३४,३४६/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-१ उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन ,संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची निविदा दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामाकरीता एकूण ०४ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (२१.५%) निविदा वनश्री गार्डन यांची होती. सदरील एजन्सीज उद्यान विभागाने कार्योत्तर

कार्यादेश क्र. ३४८, दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना निविदा दिनांक २४.४.२००७ रोजी उघडल्या असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीज अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ७८,३६९/- ही संबंधिताकडून वसूलीस पात्र आहे.

३. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षित ठेव रक्कम रू.७७३२/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

४. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबी बाबत पुरावे सादर केलेले नाहीत.

५. सन २००६-०७ या वर्षात उद्यानाची देखभाली करीता सदरील उद्यानात हिरवळ १५०० चौ.मी.वर रू.४६,८००/- व झाडांचे ताटवे १०० चौ.मी.वर रू.३१२०/- झालेला खर्च निष्फळ ठरतो. कारण सन २००७-०८ या वर्षातील निविदेमध्ये उपरोक्त ॲटम कमी झालेले आहेत. याचाच अर्थ सन २००६-०७ मध्ये दोन ॲटमच्या देखभाल झालेली नाही असा होतो.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.७८,३६९/- आणि मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.४६,८००/- व रक्कम रू.३१२०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५२ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको कॅनॉट प्लेस येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत.**
**(अं.प.रक्कम रू.१,६५,६८९/-) (प्रत्यक्ष खर्च १,२८,८१३/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील कॅनॉट प्लेस येथील उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणेकरीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामाच्या एकूण ०६ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०६ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (२१%) निविदा लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा संस्था यांची होती. सदरील एजन्सीज उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३४९, दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना निविदा दि.२४.४.२००७ रोजीच उघडल्या असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७

रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीज अदा केलेली ७ महिन्यांची रक्कम रुपये ७५,१४१/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु.७१९४/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

३. देयक अदा करतांना ॲटम क्र.(३) शोभिवंत झाडे २८५ नगाच्या देखभालीसाठी रु.१.७८ दर असतांना रु.६,०८८/- अदा करावयास पाहिजे होते. प्रत्यक्षात रु.६,८८८/- अदा केलेले आहे. म्हणजेच रु.८००/- जास्तीचे अदा करुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबीबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

५. सन २००६-०७ या वर्षात उद्यानांची देखभाली करीता सदरील उद्यानात झाडांचे ताटवे करिता अदा केलेली रक्कम रु. ४२१२/- ही निष्फळ अदा केल्याचे ठरते. कारण सन २००७-०८ या वर्षात नविन निविदेमध्ये १३५ चौ.मी. झाडांचे ताटवे याचा उल्लेख नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्दा क्र.१ अन्वये रक्कम रु.७५१४१/- , मुद्दा क्र.३ अन्वये रक्कम रु.८००/- व मुद्दा क्र. ५ अन्वये रक्कम रु.४२१२/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५३ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-४ पोलिस चौकी येथील उद्यानाचे बारा महिने, संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रु.५१०५६/-)(प्रत्यक्ष खर्च ४२,८६६/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-४ पोलिस चौकी येथील उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन, संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामाकरीता एकूण ०४ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची (१६%) कमी निविदा शिवम नर्सरी यांची होती. निविदा मंजूर असतांना , विना निविदा काम लोककल्याण समिती या एजन्सीस देण्यात आले. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.१८२ दिनांक १.८.२००७ अन्वये दिनांक १.८.२००७ ते ३१.७.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु.४२८७/- कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

२. कार्यादेशातील कालावधी दिनांक ३१.७.२००८ पर्यंत असतांना संबंधित एजन्सीचे काम दिनांक ३१.३.२००८ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देवून एजन्सीला ४ महिन्याचे काम न करताच रक्कम रु.१४,२८९/- अदा केलेले आहे. जादा अदा रक्कम संबंधिताकडून वसूल करुन मनपा फंडात जमा करणे गरजेचे आहे.

३. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.१४,२८९/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५४ :सन २००७-०८ या वर्षात सिडको एन-२ B- सेक्टर येथील उद्यानाचे बारा महिने, संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.४९,७०१/- ) (प्रत्यक्षात खर्च ४१,३८९/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-२ बी सेक्टर येथील उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.२.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामाच्या ३ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०२ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (१६%) निविदा संत कबीर सुशिक्षित बेरोजगार सहकारी सेवा संस्था यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३७७ दिनांक ३०.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००७ असा असतांना निविदा दिनांक २४.४.२००७ रोजी उघडल्या असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक ३०.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियम बाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये २४,१४४/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रू.२६५३/- कपात का केलेली नाही याचा बोध होत नाही.

३. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

४. सन २००६-०७ या वर्षात उद्यानाची देखभाली करीता मोठी झाडे, रक्कम रू.१०४३/- व बोगनवेल लागवड रक्कम रू.१८११/- व वरील अदा केलेली रक्कम ही निष्फळ अदा केल्याचे ठरते. कारण सन २००७-०८ या वर्षात नविन निविदेमध्ये मोठी झाडे -३८, बोगनवेल ६६ नग याचा उल्लेख नाही.

५. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयाच्या तरतूदीचे पालन केलेले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.२४,१४४/-, मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रू.१०४३/- व १८११/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५५ : सन २००७-०८ या आर्थिक वर्षात टाऊन सेंटर सी-४ सिडको येथील उद्यानाचे बारा महिने, संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.१,१६,६४१/- ) (प्रत्यक्षात खर्च ९८,५००/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील टाऊन सेंटर उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन / संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामासाठी एकूण ०३ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (१५.५५%) निविदा पियुष नर्सरी यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र. ३५० दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००७ असा असतांना निविदा दिनांक २४.४.२००७ रोजी उघडल्या असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीला अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ५७४५८/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

३. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु.३२४१/- कपात केली नाही. त्यामुळे निविदा अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

४. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

५. देयकातून रू.६००/- रॉयल्टी कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचा निधी वसूल न झाल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. सन २००६-०७ या वर्षात उद्यानांची देखभालीकरीता सदरील उद्यानात हिरवळ १२०० चौ.मी. वर रु.३७४४०/- झाडे ७८ नग वर २१४०/- हेज १७८ चौ.मी.वर ५५५४/- , शोभिवंत झाडे २० नगवर ५४९/-, फुलांचे ताटवे ८० चौ.मी.वर रू.२४९६/- अशा प्रकारे झालेला खर्च निष्फळ अदा केल्याचे ठरते. कारण सन २००७-०८ या वर्षात नविन निविदेत हिरवळ १२०० चौ.मी. झाडे, ७८ नग, हेज -१७८ चौ.मी., शोभिवंत झाडे -२० नग, फुलांचे ताटवे ८० चौ.मी. असल्याचा उल्लेख नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.५७,४५८/-, मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.६००/- व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू. ४८,१७९/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५६ : सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-२ सी सेक्टर येथील उद्यानाचे बारा महिने, संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.९१,५४२/- )(प्रत्यक्षात खर्च ७५,३४७/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-२ सी सेक्टर येथील उद्यान बारा महिने साठी संगोपन, संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामी एकूण ०२ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०२ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (१६%) निविदा लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३४७ दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना निविदा दिनांक २४.४.२००७ रोजी उघडल्या असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ४३,९५२/- ही संबंधितांकडून वसूली पात्र आहे.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु.४४३९/- कपात का केलेली नाही याचा बोध होत नाही.

३. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

४. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयाचे पालन केलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.४३,९५२/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५७ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको ११ वी योजना शिवाजीनगर (C.B. व E.) येथील उद्यानाचे बारा महिने, संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.१,१५,११८/- )(प्रत्यक्षात खर्च ८९,०६१/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील ११ वी योजना शिवाजीनगर येथील उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन संरक्षण विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामाकरीता एकूण ०२ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०२ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची (२२.५%) निविदा प्रतिभा नर्सरीज यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३५४, दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २.१.१९९२ च्या शासन निर्णयाचे पालन केलेले नाही.

२. लेखा विभागाचा अंदाजपत्रकीय तरतूदींबाबत अभिप्राय नाही.

३. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रू.५१,९५२/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

४. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रू.४६०३/- कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

५. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबी बाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

६. अंदाजपत्रक तयार करतांना खालील ॲटमचे दर जास्तीचे नमूद करुन मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे त्याचा तपशील पुढील प्रमाणे -

| **अ.क्र.** | **ॲटमचे नांव** | **जादा अं.प.रक्कम रूपये** | **प्रत्यक्ष रक्कम रूपये** | **तफावत रुपये** | **एकूण क्षेत्र** | **जादा अदा रक्कम रूपये** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १ | हेज लागवड | १३५ | ११५ | २० | ५० | १००० |
| | | | | | **एकूण** | १००० |

७. निविदा अंतीम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.५१,९५२/-व मुद्या क्र.६ अन्वये १०००/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५८ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-२ D सेक्टर येथील उद्यानाचे बारा महिने, संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.९०,९७६/- ) (प्रत्यक्ष खर्च ७२,८६७/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-२ D सेक्टर येथील उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन ,संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामाच्या एकूण ०३ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०२ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (१५%) निविदा पुजा नर्सरी यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३६२, दिनांक ३०.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८

या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना निविदा दिनांक २४.४.२००७ रोजी उघडल्या असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ४२,५०६/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

३. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु.४३३९/- कपात का केलेली नाही याचा बोध होत नाही.

४. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

५. कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना खालील ॲटमचे दर जास्तीचे नमूद केले. ज्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | ॲटमचे नांव | अं.प. रक्कम रुपये | प्रत्यक्ष रक्कम रुपये | तफावत रक्कम रुपये | एकूण क्षेत्र | जादा अदा केलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरवळ | २.६० | १.६६ | ०.९४ | १५०० | १४१०/- |
| २ | हेज | २.६० | १.७८ | ०.८२ | ४०० | ३२८/- |
| ३ | मोठी झाडे | २.६० | १.७८ | ०.८२ | ३० | २५/- |
| ४ | शोभिवंत झाडे | १११.०० | ८०.०० | ३१.०० | ९० | २७९०/- |
| | | | | | **एकूण** | **४५५३/-** |

६. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन केलेले नाही.

७. सन २००६-०७ या वर्षात उद्यानाची देखभालीकरीता सदरील उद्यानात झाडे लावण्याकरीता अदा केलेली रक्कम रु.१४,६६४/- ही निष्फळ अदा केल्याचे ठरते.कारण सन २००७-०८ या वर्षात नविन निविदेमध्ये झाडे ४७० कमी असा उल्लेख आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रु.४२,५०६/-, मुद्या क्र.५ अन्वये ४५५३/-व मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रु.१४,६६४/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.५९ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-३ येथील उद्यानाचे बारा महिने, संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रु.३,९४,२१०/-) (प्रत्यक्ष खर्च २,९८,५३५/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-३ उद्यान येथील उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन, संरक्षण व विकास संवर्धन करणे करिताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामाकरीता एकूण ०५ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०५ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (२४%) निविदा रेणूका नर्सरीज यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३९६ दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रु.१,७४,१४५/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

३. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु. ११,१२८/- कपात का केलेली नाही. याचा बोध होत नाही.

४. अंदाजपत्रक तयार करतांना खालील ॲटमचे दर जास्तीचे नमूद करुन मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | ॲटमचे नांव | जादा अं.प. रक्कम रुपये | प्रत्यक्ष रक्कम रुपये | तफावत रक्कम रुपये | एकूण क्षेत्र | जादा अदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हेज लागवड | १३५ | ११५ | २० | २०० | ४०००/- |
| २ | लॉन लागवड | १६१ | १३० | ३१ | ११५० | ३५६५०/- |
| ३ | शोभिवंत झाडे लागवड | १११ | ८० | ३१ | ३०० | ९३००/- |
| | | | | | **एकूण** | **४८९५०/-** |

५. दुस-या दरम्यानच्या देयकात रु.४०९/- जादा अदा केले. बेरजेत तफावत दिसून आली. जादा अदा रक्कम संबंधितांकडून वसूल करुन मनपा फंडात जमा करणे योग्य राहील.

६. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्तीपैकी अट क्र. १४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

७. सन २००६-०७ या वर्षात उद्यानाची देखभालीकरीता सदरील उद्यानात शोभिवंत झाडे रू.१६०२०/- व ग्राउन्ड कव्हर रू.२९८८/- रक्कम ही निष्फळ अदा केल्याचे ठरते. कारण सन २००७-०८ या वर्षात नविन निविदेमध्ये झाडे -७५० व ग्राउन्ड कव्हर १५० चौ.मी. कमी असा उल्लेख आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.१,७४,१४५/-, मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रू.४८,९५०/- , मुद्या क्र.५ अन्वये ४०९/- आणि मुद्या क्र. ६ अन्वये रक्कम रू. १९००८/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६० :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-४-H सेक्टर येथील उद्यानाचे बारा महिने, संगोपन, देखभाल, विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.१,२२,१३२/- (प्रत्यक्ष खर्च ९०,६२६/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-४, H सेक्टर येथील उद्यान बारा महिन्यासाठी संगोपन संरक्षण विकास संवर्धन करणे करिताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामाकरीता एकूण ०२ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०२ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची (२१%) निविदा लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सहकारी सेवा संस्था यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३५७ दिनांक २०.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयाच्या तरतूदीचा भंग झालेला आहे.

२. लेखा विभागाचा अंदाजपत्रक तरतूदींबाबत अभिप्राय नाही.

३. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रू.५२,८६५/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

४. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रू.५,९५३/- कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

५. दुस-या दरम्यानच्या देयकात रू.५९५/- जादा अदा केले. निविदेतील कमी दर २१% , रू. १२,५००/- वजा जाता येणारी रक्कम रू.४७,०२६/- इतकी होती. परंतू रू.४७,६२१/- अदा केले. त्यामुळे रू.५९५ /- जादा अदा केले. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. अंदाजपत्रक तयार करतांना खालील ॲटमचे दर जास्तीचे नमूद करुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | ॲटमचे नांव | जादा अं.प.रक्कम रूपये | प्रत्यक्ष रक्कम रूपये | तफावत रक्कम रूपये | एकूण क्षेत्र | जादा अदा रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शोभिवंत झाडे | २.६० | १.७८ | ०.८२ | २२ | १८ |
| २ | हेज | २.६० | १.७८ | ०.८२ | २३२ | १९० |
| ३ | मोठी झाडे | २.६० | १.७८ | ०.८२ | ४८ | ३९ |
| ४ | शोभिवंत झाडे लागवड | १११.०० | ८०.०० | ३१.०० | ५० | १५५० |
| ५ | लॉन लागवड | १६१.०० | १३०.०० | ३१.०० | ५०० | १५५०० |
| | | | | | एकूण | १७२९७ |

७. सन २००६-०७ या वर्षात उद्यानाच्या देखभालीकरीता सदरील उद्यानात -

हिरवळ . रक्कम रू.६२४००/-
हेज . रक्कम रू.३६८२/-
फुलांचे ताटवे - रक्कम रू.६२४०/-
झाडांचे ताटवे - रक्कम रू.५६१६/-

इत्यादी रकमा निष्फळ अदा केल्याचे ठरते. कारण सन २००७-०८ च्या निविदेमध्ये खालील प्रमाणे ॲटम वाईज व साईज वाईज कमी उल्लेख आहे.

हिरवळ - २००० चौ.मी.
हेज - ११८ चौ.मी.
फुलांचे ताटवे - २०० चौ.मी.
झाडांचे ताटवे - १८० चौ.मी.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.३ अन्वये रक्कम रू.५२,८६५/-, मुद्दा क्र.५ अन्वये रू.५९५/- व मुद्दा क्र.६ अन्वये रक्कम रू. १७,२९७/- आणि मुद्दा क्र.७ अन्वये रक्कम रू. ७७,९३७/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६१ : सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-६ एन-२ येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अ.प.रक्कम रू.१०६२११/-) (प्रत्यक्ष खर्च रू. ८१२५९/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-६ एन-२ येथील उद्यान बारा महिनेसाठी संगोपन संरक्षण विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामासाठी ०४ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (२३.५%) निविदा माऊली महिला बचत गट यांची होती. सदरील बचत गटास उद्यान

विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३४५ दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित बचत गटास अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ४७,४०१/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेमधील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु.४१७५/- कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

३. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्तीपैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

४. ॲटम क्र.३ सदरील कामाचे अंदाजपत्रक जास्तीच्या रकमेचे तयार करुन मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| अ. क्र. | ॲटमचे नांव | जादा अ.प. रक्कम रु. | प्रत्यक्ष रक्कम रु. | तफावत रक्कम रुपये | क्षेत्र संख्या | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शोभिवंत झाडे लागवड | १११.०० | ८०.०० | ३१.०० | १३५ | ४१८५/- |

५. उद्यानाचे क्षेत्रफळ ४५५० असतांना ५४०० चौ.मी. जागेच्या बाबत रक्कम अदा केलेली आहे.

६. ८५० चौ.मी. जागेची देखभालीसाठी रुपये १२,७९१/- जादा अदा केले.

७. दुस-या देयकात बेरजेत तफावत रु.३३०/- जादा अदा केले.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रु.४७,४०१/-, मुद्या क्र.४ अन्वये रु.४१८५/- , मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रु. १२,७९१/- व मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रु.३३०/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६२ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको टाऊन सेंटर जी सेक्टर येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अ.प.रक्कम रु.८६,९६७/-) (प्रत्यक्ष खर्च ७३,४२७/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील टाऊन सेंटर जी सेक्टर येथील उद्यान बारा महिनेसाठी संगोपन, संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामासाठी ०५ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०५ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (१५.५५%) निविदा पियुष नर्सरीज यांची होती. सदरील एजन्सीज उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश ३५३ दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीज अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ४२,८३२/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु.३६४५/- कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

३. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्तीपैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

४. सन २००६-०७ या वर्षात उद्यानाच्या देखभाली करीता सदरील उद्यानात
१) हिरवळ ६३० चौ.मी. रु.१९६५६/-
२) झाडे २२३ नग रु.६११९/-
३) शोभिवंत झाडे ५० नग रु.१३७२/-
४) फुलांचे ताटवे ४५ चौ.मी. रु.१४०४/-

इत्यादी रकमा निष्फळ अदा केल्याचे ठरते. कारण सन २००७-०८ या वर्षात नविन निविदेमध्ये कमी असा उल्लेख आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रु.४२,८३२/- व मुद्या क्र.४ अन्वये रु.२८,५५१/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६३ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-८ पंडित जवाहरलाल नेहरू उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अ.प.रक्कम रु.२,७०,१४६/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-८ पंडील जवाहरलाल नेहरू उद्यान बारा महिनेसाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ०५ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०५निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (३२%) निविदा गौरवाभिषेक कन्सल्टींग यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र. ३६३ दिनांक ३०.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ९०,९५१/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु.६७७२/- कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

३. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.१ अन्वये रक्कम रू.९०,९५१ /- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६४ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात १२ वी योजना शिवाजीनगर येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अ.प.रक्कम रू.६३४३१/-) (प्रत्यक्ष खर्च ५५४७१/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील १२ वी योजना शिवाजीनगर येथील उद्यानाचे बारा महिनेसाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ०३ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृतीपैकी सर्वात कमी दराची (१२.५५%) निविदा पियुष नर्सरीज यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र. ३५१ दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली रक्कम रुपये ३५३५८/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रू.१८८५/- कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

३. अंदाजपत्रकीय तरतूदींबाबत लेखा विभागाची संमती नाही.

४. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

५. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.१ अन्वये रक्कम रू.३५,३५८ /- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६५ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात एन-१२ सलीम अली सरोवर येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अ.प.रक्कम रू.२६८०२०/-) (प्रत्यक्ष खर्च २१०९९९/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-२ सलीम अली सरोवर या उद्यानाचे बारा महिनेसाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७

रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ०५ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०५निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (२१.५%) निविदा प्रतिभा नर्सरीज यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र. ३५६ दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली रक्कम रुपये १२३०८२/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रू.१०५२०/- कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

३. जादा अदा रक्कम पहिल्या देयकात निविदादर २१.५% कमी असल्यामुळे रू.२८,८१५/- ऐवजी २८,२१२/- देयकातून कपात केली, त्यामुळे कंत्राटदाराला ६०३/- रू. जादा अदा झाले.

४. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

५. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.१,२३,०८२/- व मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.६०३/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६६ : सन २००७-०८ या आर्थिक वर्षात अयोध्यानगर येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अं.प.रक्कम रू.७१५७२/-) (प्रत्यक्ष खर्च ३२७१२/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील अयोध्यानगर येथील उद्यानाचे बारा महिनेसाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ०४ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (५१.५%) निविदा जे.एच. मिर्झा यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र. ३५९ दिनांक ३०.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली रक्कम रुपये १९०८२/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

२. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

३. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रु.३२७१/- कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

४. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

५. सदरील कामाचे अंदाजपत्रक जास्तीच्या रकमेचे तयार करुन मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | ॲटमचे नांव | जादा अ.प.रक्कम रु. | प्रत्यक्ष रक्कम रुपये | तफावत रक्कम रुपये | क्षेत्र संख्या | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरवळ | २.६० | १.६६ | ०.९४ | १३३१ | १२५१ |
| २ | शोभिवंत झाडे | २.६० | १.७८ | ०.८२ | ८० | ६६ |
| ३ | हेज | २.६० | १.७८ | ०.८२ | १४७ | १२१ |
| | | | | | **एकूण** | **१४३८/-** |

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.१ अन्वये रक्कम रु.१९०८२/- व मुद्दा क्र.५ अन्वये रक्कम रु.१४३८/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६७ : सन २००७-०८ या आर्थिक वर्षात एन-११ स्मशान भूमी येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अं.प.रक्कम रु.४९,६९७/-) (प्रत्यक्ष खर्च ४२,५८३/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात एन-११ स्मशान भूमी येथील उद्यानाचे बारा महिनेसाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ०४ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (११%) निविदा पुजा नर्सरीज यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र. ३६१ दिनांक ३०.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली रक्कम रुपये २४८४०/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

२. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

३. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.२४,८४०/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६८ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-६ येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अ.प.रक्कम रू.११४८०२/-) (प्रत्यक्ष खर्च ४०९३८/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-६ येथील उद्यान बारा महिनेसाठी संगोपन ,संरक्षण विकास संवर्धन करणे करीता कामाची ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत सदरील कामासाठी १ निविदा विक्री झाली. निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०१ निविदा प्राप्त झाली. सदरील निविदा (१%) कमी दराची होती. सदरील निविदा जे.एच.मिर्झा यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र.३५९ दिनांक ३०.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये २३,८८१/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

३. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयाचे पालन केलेले नाही.

४. दिनांक ३१.७.२००८ रोजी कृषी सहाय्यक यांनी दिलेल्या अहवालानुसार संबंधित एजन्सीने २००७-०८ मध्ये उद्यान विकासाचे काही काम केले नाही. त्यामुळे संबंधित एजन्सीला अदा केलेले देयक रूपये ४०९३८/- नियमबाह्य आहे.

५. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

६.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १)हिरवळ | = | रू.१५६००=०० | - | ५०० चौ.मी. |
| २)हेज | = | रू.३१२०=०० | - | १०० चौ.मी. |
| ३)झाडे | = | रू.२७४४=०० | - | १०० चौ.मी. |
| ४)फुलांचे ताटवे | = | रू.६२४०=०० | - | २०० चौ.मी. |
| **एकूण** | = | **रू.२७७०४=००** | | |

सन २००७-०८ या वर्षात नविन निविदेमध्ये कमी असा उल्लेख आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.२३,८८१/- , मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रू.४०,९३८/ व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.२७,७०४/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.६९ :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-७F सेक्टर येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अ.प.रक्कम रू.१६०२६०/-) (प्रत्यक्ष खर्च १४७३१०/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-७ F सेक्टर येथील उद्यान बारा महिनेसाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ०२ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०२ निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (२२.५५%) निविदा पियुष नर्सरीज यांची होती. सदरील एजन्सीज उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश ३५२ दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीला अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ८५,९३१/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रू.४३५९/- कपात का केली नाही.

३. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियमानुसार २% सुरक्षा ठेव न ठेवणे ही बाब नियमबाह्य आहे.

४. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयाच्या तरतूदीचा भंग झालेला आहे.

५. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्ती पैकी अ.क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

६. मागील वर्षातील ॲटम कमी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १)हिरवळ | = | रू.२०१२४=०० | - | ६४५ चौ.मी. |
| २)झाडे | = | रू.१०९५६=०० | - | ५५० नग |
| ३) हेज | = | रू.३१२०=०० | - | १०० चौ.मी. |
| **एकूण** | = | **रू.३४२००=००** | | |

सन २००७-०८ या वर्षात नविन निविदेमध्ये कमी असा उल्लेख आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.८५,९३१/-व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.३४,२००/ संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७० :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको एन-९ वाहतूक येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल विकास कामे करण्याबाबत (अं.प.रक्कम रू.१६२४३६/-) (प्रत्यक्ष खर्च रक्कम रू.१०९९३०/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सिडको भागातील एन-९ वाहतूक उद्यान बारा महिनेसाठी संगोपन संरक्षण व विकास संवर्धन करणे करीताच्या कामाची दिनांक ३०.३.२००७ रोजी वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ०६ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृती तारखेपर्यंत ०६ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची (३२.५%) निविदा प्रतिभा नर्सरीज यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने कार्योत्तर कार्यादेश क्र. ३५५ दिनांक २९.१०.२००७ अन्वये दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीचे काम देण्यात आले होते. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा कामाचा कालावधी १.४.२००७ ते ३१.३.२००८ असा असतांना सदरील कामाचे कार्यादेश दिनांक २९.१०.२००७ रोजी देवून कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीला अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रुपये ६४१२६/- ही संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.

२. निविदा अंतिम झाल्यावर दुसरे व दरम्यानचे देयकातून निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम रू. ४३७३ कपात का केली नाही याचा बोध होत नाही.

३. निविदा अंतिम झाल्यावर कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित एजन्सीकडून निविदा रकमेच्या २% रक्कम रुपये मनपा फंडात भरणा केलेली नाही.

४. जादा अदा रक्कम ॲटम क्र. ३ (१) माती १२० घ.मी. टाकणे करीता प्रथम देयकात रू.१६८०० जादा अदा व दुस-या देयकात ११८.४० घ.मी. ची रक्कम रू.१६५२०/- वजा करण्यात आली. पहिल्या देयकात रू.२८० जादा अदा केले. (२) निविदा ३२.५% कमी दराची असतांना दुस-या देयकात ३२% रक्कम वजा करण्यात आली ०.५% रक्कम रू.३२२/- जादा अदा केली.

५. कृषी सहाय्यकाने सदरील एजन्सीने त्यांना दिलेले कामे केलेली नसल्याचे अहवाल संचिकेत आहे. तरी सुध्दा देयक अदा करण्यात आले आहे.

६. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अटी व शर्तीपैकी अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाही.

७.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १)हिरवळ | = | रू.२८८७६=०० | - | १०४८ चौ.मी. |
| २)शोभिवंत झाडे | = | रू.८५४ =०० | - | ४० नग |
| ३)फुलांचे ताटवे | = | रू.९९६ =०० | - | ५० चौ.मी. |
| **एकूण** | = | **रू.३०७२६=००** | | |

सन २००७-०८ या वर्षात नविन निविदेमध्ये कमी असा उल्लेख आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.६४,१२६/-, मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रू.६०२/- व मुद्या क्र.७ अन्वये ३०,७२६/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७१ :सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात एन-१ सिडको सेक्टर सी/ सेक्टर -ई उद्यान विकसित करणे व साफसफाई करणे.(अं.प.रक्कम रू.३,५५,४२५/-)(अदा रक्कम रू.३,०८,३१८/-)**

सन २००७-२००८ या वर्षातील एन-१ सिडको सेक्टर सी / ई उद्यान विकसित करणे व साफसफाई करणे यासाठी कार्यालयीन (ई) निविदा सूचना अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ५ निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ५ निविदा प्राप्त झाल्या असता ठेकेदार श्री.गोसावी एस.के. यांची १३.००% कमी दराची निविदा प्राप्त झाली असून त्यांना जा.क्र.मनपा/उद्यान/५०८/ दिनांक १५.१.२००८ अन्वये दोन वर्ष कालावधी पर्यंत १५.१.२००८ ते १४.१.२०१० पर्यंत कार्यादेश देण्यात आले आहे.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अटी शर्ती क्रमांक ६ अन्वये कंत्राटदारावर उद्यानाचे चोवीस तास संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. मात्र यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही असे असतांना परिशिष्ट - ब अन्वये अ.क्र.५ नुसार Maintenance of Garden अन्वये २ x १२० x ७३० = १७५२००/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

२. मोजमाप पुस्तिका क्रमांक २५८३ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे अंतीम देयक तपासणी करता आलेले नाही.

३. अंतीम देयक रू.५७००५/- अदा करतांना त्यामध्ये खाडाखोड करून दिनांक २८.२.२०११ पर्यंत मुदतवाढीसह देयक मंजूरीस्तव सादर असे करुन १ वर्षाची मुदतवाढ दर्शविली आहे. मुदतवाढ घेतांना सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. मुदतवाढीचे आदेश काढलेले नाही.

४. १०% सुरक्षा ठेव रक्कम रू.७४२९/- वजावट झालेली नाही. देयक क्रमांक २ मधून १७७०२/- एवढी वजावट होणे आवश्यक असतांना १६४४१/- वजावट करण्यात आली. देयक क्रमांक ३ मधून रक्कम रू.५७००/- वजावट झालेली नाही.

५. काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिनांक १३.१.२०११ पर्यंत देण्यात आले आहे.

६. स.नगरसेवकांनी दिनांक ०४.०२.२००८ रोजी उद्यान अधिक्षक यांना पत्र देवून कळविले आहे की, दोन आठवड्यापासून काम बंद करण्यात आले आहे. संबंधिताने केलेले काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे व असमाधानकारक आहे. उद्यान विभागाने संबंधित कंत्राटदारास जा.क्र.मनपा/उद्यान/५५९, दिनांक १२.२.२००८ अन्वये पत्र दिले व जा.क्र.मनपा/उद्यान/५७४, दिनांक २१.२.२००८ अन्वये पत्र दिले असता त्यावर काय कारवाई करण्यात आली आहे याचा उल्लेख नाही. या दरम्यानचे संपूर्ण देयक अदा करण्यात आले आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

७. निविदा अटी शर्ती १४,२१,२२,२३ ची पूर्तता केलेली नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७२ :शहरातील रस्ता दुभाजक व झाडांना पाणी देण्याकरीता ट्रॅक्टर ट्रॉली सहीत भाड्याने लावणे बाबत.**

सन २००७-२००८ मध्ये रोडसाईड, रस्तादुभाजक व खुल्या जागेमधील झाडांना पाणी देण्यासाठी प्रतिभा नर्सरीज औरंगाबाद एन-९ शिवाजीनगर सिडको यांच्या मालकीचे ट्रॅक्टर ट्रॉली प्रति महिना १८,६००/- याप्रमाणे भाडे तत्वावर घेण्यात आले. त्यास जा.क्र.मनपा/उद्यान/६३२/, दिनांक १९.३.२००८ नुसार कार्योत्तर आदेश देण्यात आले आहेत. संचिके मधील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लेखा विभागात मूळ संचिका गहाळ झाली आहे. उपलब्ध संचिकेनुसार पाहणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. जा.क्र.मनपा/उद्यान/६३२, दिनांक १९.३.२००८ अन्वये प्रतिभा नर्सरीज यांना कार्योत्तर आदेश देण्यात आले असून कामाची मुदत ४ महिने दर्शविली आहे. परंतु कालावधी नमूद केलेला नाही.

२. नियम व अटीनुसार आकस्मित खर्च अधिनियम १९६५ (६९) अन्वये सरासरी दिवसात ८ तास किंवा ५ ट्रिप टाकणे आवश्यक असतांना त्याबाबतचे लॉग बुक सोबत असणे आवश्यक होते. परंतू लॉग बुक लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

३. उद्यान अधिक्षक किंवा उद्यान विभागातील कृषी सहाय्यक यांचा काम केल्याबाबत दैनंदिन अहवाल असणे आवश्यक असतांना अहवाल संचिकेत नाही.

४. शासन निर्णय २ जानेवारी १९९२ नुसार निविदा मागविणे आवश्यक असतांना निविदा मागविलेली नाही.

५. ट्रॅक्टर क्रमांक, ट्रॉली क्र.,टँकर क्र. आर.सी.बुक, वैधता प्रमाणपत्र संचिकेमध्ये नाही.

६. प्रतिभा नर्सरीज यांनी दिनांक २५.३.२००८, २८.११.२००८,५.१.२००९ रोजी उद्यान अधिक्षक यांना पत्र देवून बिलाची मागणी केली आहे. परंतू काम कोणत्या कालावधीत केले हे नमूद केलेले नाही.

७. काम पूर्ण केल्याबाबत दिनांक २९.२.२००८ रोजी प्रमाणपत्र देवून मा.मुख्य लेखाधिकारी यांनी त्यास १९.०१.२००९ रोजी मान्यता प्रदान केली आहे व दिनांक २१.१.२००९ रोजी रक्कम रू.७४,४००/- अदा करण्यात आले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. विभागाने सदरील प्रकरणांत केलेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्‍चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७३ : आर्थिक वर्ष २००७-०८ मध्ये सिंधी कॉलनी येथील उद्यान विकसित करणे.(अ.पं. रक्कम रू.४,९५,३५०/-)**

सिंधी कॉलनी येथील उद्यान विकसित करणे बाबत संबंधित नगरसेवक यांनी लेखी पत्र देवून कळविले आहे. दिनांक १८.७.२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त विषय क्र.९३३, अ.क्र. ३८ अर्थसंकल्प पा.क्र.१२४ प्रभाग क्र.६५ कुशलनगर येथे फुटपाथ बसविणेचे लेखाशिर्षामध्ये बदल करुन सुधारित कामाचे नांव सिंधी कॉलनी येथे उद्यान विकसित करणे असे आहे. सदरील कामाकरीता (ई) निविदा सूचना अन्वये B-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ निविदा विक्री झाल्या असून निविदा सादरीकरणाच्या अंतीम तारखेस ३ निविदा प्राप्त झाल्या. दिनांक २१.११.२००७ रोजी निविदा उघडल्या असता तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.गोसावी एस.के. १४.००% कमी दराची असून यांना जा.क्र.मनपा/उद्यान/५४१/, दिनांक २९.१.२००८ / २८.१.२०११ अन्वये तीन वर्षासाठी कार्यादेश देण्यात आले आहे.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. संबंधित नगरसेवक यांनी दिलेल्या पत्रामध्ये ३० उद्यान विकसित करणे असाच उल्लेख आहे. संगोपन विकास व देखभाल तीन वर्षाकरीता देण्याबाबत उल्लेख नाही.
२. उद्यान संगोपन, विकास व देखभाल तीन वर्षाकरीता करण्याकरीता (खाजगी उद्यान विकासकाकडून) कोणत्या अटी/ शर्ती आहेत याचा बोध होत नाही.
३. उद्यान तीन वर्ष खाजगी तत्वावर देतांना उद्यान अधिक्षक व कृषी सहाय्यक यांनी काम केल्याबाबत देयक अदा करतांना दैनंदिन रिपोर्ट लावणे आवश्यक होते. परंतू संचिकेमध्ये तसे अहवाल दिसून आलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७४ :शहरामध्ये वृक्षारोपण करणे करीता विविध ठिकाणी खड्डे खोदणे. (अं.प.रक्कम रू.४,०९,३१८/-)(अदा रक्कम रू.३,५०,७०४/-)**

सन २००७-०८ या वर्षाचे शहरामध्ये जागतिक पर्यावरण दिवस ५ जून २००७, वटपौर्णिमा ,महाराष्ट्र वृक्ष दिन या कार्यक्रमाकरीता विविध वॉर्डात खुल्या जागेमध्ये व रोडसाईड या ठिकाणी वृक्षारोपणासाठी ५००० खड्डे खोदून त्यामध्ये माती व खत भरणे या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.४०९३१८/- तयार करण्यात आले आहे. सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई/निविदा/२३/२००७, दिनांक ०३.०७.२००७ अन्वये बी -१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण दोन (२) निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मक दृष्ट्या १०.००% कमी दराची निविदा श्री.संतोष चव्हाण यांची असून जा.क्र.मनपा/उद्यान/२१२/०७, दिनांक २१.८.२००७ अन्वये कार्यादेश देण्यात आला. कामाचा कालावधी २१.८.२००७ ते २०.१०.२००७ दोन महिन्याचा आहे. सदरील संचिका तपासली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. शासन निर्णय २ जानेवारी १९९२ नुसार ३ निविदा प्राप्त होणे आवश्यक असतांना २ निविदा प्राप्त झाल्यानंतरही निविदा अंतीम करण्यात आली आहे.

२. अ.क्र.४ अन्वये १५३३.६६x$M^3$ x११.५०= १७६३७/- माती व खत (Mixing) टाकण्यासाठी दिलेली रक्कम वसूलीस पात्र आहे. कारण याच परिशिष्टात माती व शेणखत टाकण्यासाठी स्वतंत्र रकमा अदा केलेल्या आहे.

३. सदरील काम कार्यादेश प्रमाणे २ महिन्यात करणे आवश्यक होते. परंतू संबंधिताने काम पूर्ण केल्याबाबत दिनांक ३१.३.२००८ रोजी काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आले. उशिरा काम केल्याबाबत विभागाने दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही.

४. वृक्षारोपणासाठी वॉर्ड अ,ब,क,ड,ई व फ येथे ५००० खड्डे खोदल्याबाबत कृषी सहाय्यक यांचे अहवाल संचिकेत दिसून आलेले नाही.

५. Royalty charges रक्कम अदा करतांना खालील प्रमाणे अदा करण्यात आली आहे.

| अ.क्र. | तपशिल | मागणी ($M^3$) | दर (Royalties) $M^3$ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | माती | ९०.७० $M^3$ | १० | ९७०० |
| २ | माती | ५६३ $M^3$ | १० | ५६३० |
| | **एकूण** | **६५३.७ $M^3$** | **१०** | **१५३३०** |

परंतू देयक अदा करतांना १०५३.४७ x १४०= १४७४८५ एवढ्याचे देयक अदा झालेले आहे. Royalty अदा करतांना ६५३.७ $M^3$ एवढ्याचा भरणा केला आहे. तरी याबाबत विभागाने खुलासा सादर करावा.

६. ४% VAT रक्कम रु.७५४७/- व रु. ६४८१/- वजावट केलेली नाही.

७. संचिकेत निविदा अटी शर्ती लावलेल्या नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रु.१७६३७/- आणि मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रु.१४,०२८/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७५ : सन २००७-०८ या वर्षात रामनगर येथे रस्ता दुभाजक व दुतर्फा वृक्षारोपण करून दोन वर्ष संवर्धन करणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.**
**(अं.प.रक्कम रु.४,११,६९८/-)(खर्च रु. ३,७०,६१४/-)**

सन २००७-०८ या वर्षात रामनगर येथे रस्ता दुभाजक व दुतर्फा वृक्षारोपण करुन २ वर्ष संवर्धन करणे करीता ई -टेंडरिंग विभागामार्फत निविदा प्रसिध्द केली असता एक निविदा विक्री झाली व एक निविदा प्राप्त झाली. सुमित कन्स्ट्रक्शन यांची ९.९०% कमी दराची निविदा असून एजन्सीने मनपा सोबत करारनामा रु.२०/-च्या मुद्रांकावर केला तद्नंतर एजन्सीस कार्यालयीन आदेश क्र.मनपा /१७३ / २००८ दिनांक ११.८.२००८ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ३४ मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

३. कामाची मुदत दिनांक १०.८.२०१० रोजी संपल्यावर दिनांक २८.२.२०११ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. सदरील दिलेली मुदतवाढीचे आदेश संचिकेत नाहीत.

४. दिनांक १०.८.२०१० नंतर २८.२.२०११ पर्यंत कामास विलंब झाल्यामुळे विलंब दंड आकारलेला नाही.

५. देयकावर संबंधित कंत्राटदाराची स्वाक्षरी नाही.

६. अंतीम देयकात Royalty रक्कम कपात केलेली नाही.

७. निविदा अटी शर्ती संचिकेत लावलेल्या नाहीत.

८. मोजमाप पुस्तिका क्र.२५८३ उपलब्ध झालेली नाही.

९. ट्री गार्ड पुरवण्याबाबत साठा नोंद, वितरण व शिलकी बाबतच्या नोंदी असलेले १०९,११०,१११ क्रमांकाचे रजिस्टर उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्यामुळे पुरवठ्याबाबत शंका निर्माण होते .

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने मोजमाप पुस्तिका तसेच स्टॉक रजिस्टर १०९,११० व १११ उपलब्ध करुन दिलेले नाही. त्यामुळे लेखापरीक्षण अपूर्ण राहिलेले आहे. संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७६ : सन २००७-०८ या वर्षात वॉर्ड क्र.२६ अंतर्गत खुल्या जागेमध्ये उद्यान विकसित करणे, झाडे लावणे दोन वर्ष संगोपन करणे करीताच्या कामातील अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम .६,१३,३९५/-)(खर्च रू. ५,१८,०२४/-)**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२६ अंतर्गत खुल्या जागेमध्ये उद्यान विकसित करणे, झाडे लावणे दोन वर्ष संगोपन करणे करीता ई-टेंडरिंग विभागाद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. २ निविदा विक्री झाल्या व दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १५% कमी दर एस.के.गोसावी यांची होती. एजन्सीने करारनामा रू.२०/- च्या मुद्रांकावर करुन दिल्यानंतर कार्यालयीन आदेश क्र.मनपा/ उद्यान / ५०७/०८, दिनांक १५.१.२००८ अन्वये निर्गमित केलेले आहेत. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ३४ मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

३. कामाचा कालावधी दिनांक १४.१.२०१० पर्यंत असतांना कामास दिनांक २८.२.२०११ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. सदरील मुदतवाढ देयक अदायगीपूर्वी दिलेली आहे. याबाबत स्वतंत्र प्रशासकीय मुदतवाढीचे कार्यादेश निर्गमित केलेले नाहीत.

४. कामाची मुदत २ वर्ष असतांना काम १ वर्ष विलंबाने पूर्ण झाले. तब्बल एक वर्षाच्या विलंबाबाबत संबंधित कंत्राटदारास दंड आकारलेला नाही.

५. देयक अदायगीपूर्वी कंत्राटदाराने केलेले काम योग्य असल्याबाबत पर्यवेक्षण करणा-या कर्मचा-यांचे प्रमाणपत्र नाही.

६. देयकावर कंत्राटदाराची स्वाक्षरी नाही.

७. परिशिष्ट - ब मधील ॲटम क्र.४ मधील Quantity व दर बाबत तांत्रिक कक्ष प्रमुख यांच्या परिच्छेद (३१) मध्ये नमूद अभिप्रायानुसार दुरुस्ती केलेली आहे. वास्तविक पहाता परिशिष्ट -ब तयार करतांनाच सर्व बाबी तपासल्या जाणे गरजेचे असते.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७७ : सन २००७-०८ या वर्षात टाऊन सेंटर एन-१ उद्यान विकसित करणे व ३ वर्ष संगोपन करणेचे कामातील अनियमिततेबाबत.**
**(अं.प.रक्कम .४,८५,२००/-)(खर्च रु. ४,०५,५३७/-)**

सन २००७-८ या वर्षात टाऊन सेंटर एन-१ उद्यान विकसित करणे व ३ वर्ष संगोपन करणे बाबत ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा प्रसिध्द झाली होती. २ निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा पैकी संतोष चव्हाण यांनी १५.९९% कमी दराची निविदा प्राप्त झाली. संबंधितांनी रु.२०/- च्या मुद्रांकावर करारनामा मनपा सोबत केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/१८८ २००७ दिनांक ६.८.२००७ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दि.२ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. ५% अतिरिक्त ठेव रु.२४,२६०/- मनपा फंडात जमा न झाल्यामुळे मनपाचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

४. निविदा अटी शर्ती संचिकेत लावलेल्या नाहीत.

५. सदरील उद्यानासाठी सन २००७-०८ मध्ये रु.९८,५००/- व रु. ९७,२७०/- सन २००९-१० मध्ये खर्च झालेला असून संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नाही. पुनश्च याच उद्यानाची निविदा प्रसिध्द करुन मनपाचे रु.४,०५,५३७/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे, जे की वसूलीस पात्र आहे.

६. सदरील उद्यानाच्या पर्यवेक्षनासाठी नियुक्त अधिकारी कर्मचारी यांचे अहवाल संचिकेत नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्दा क्र.५ अन्वये रक्कम रु.४,०५,५३७/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७८ :सन २००७-०८ या वर्षात सिडको एन-१ ते एन-५ येथील खुल्या जागेवर वृक्षारोपण व संवर्धन ३ वर्षाकरीता करणे. (अं.प.रक्कम .९,४२,७००/-)(खर्च रू. ७,३६,८५६/-)**

सन २००७-०८ या वर्षात सिडको एन-१ ते एन-५ येथील खुल्या जागेवर वृक्षारोपण व संवर्धनासाठी ३ वर्षाकरीता ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविल्या असता एक निविदा विक्री झाली व एक निविदा स्वीकृत झाली. प्राप्त निविदा व्ही.आर.सरोदे यांची असून २१.२१% कमी दराची आहे. संबंधितांनी मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/२९९/०७, दिनांक ११.१०.२००७ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. संचिकेची तपासणीअंती खालील त्रुटी आढळल्या.

१. कार्यादेश देण्यापूर्वी ५% अतिरिक्त रक्कम रू.४७,१३५/- मनपा फंडात जमा न झाल्यामुळे मनपाचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.
२. कामाची मुदत दिनांक १०.१०.२०१० रोजी पूर्ण होत असतांना दिनांक २८.२.२०११ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. तसेच मुदतवाढीस स्वतंत्र मान्यता घेतलेली नाही आणि स्वतंत्र आदेशही निर्गमित केलेले नाहीत.
३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.
४. दि.२ जानेवारी १९९२ शासन निर्णयाच्या मध्ये नमूद तरतूदींचे पालन केलेले नाही.
५. परिशिष्ट - ब मध्ये दिलेल्या Note या सदराखाली अ.क्र. ६ मध्ये कामाच्या शेवटी तिस-या वर्षी लावलेल्या झाडांची उंची १० फूटापेक्षा जास्त असावयास हवी असे नमूद आहे. याबाबत उद्यान विभागाने मोजमाप घेतली काय ? तसेच प्रत्यक्ष खात्री झाल्याचे प्रमाणित केलेले नाही.
६. ३ वर्षातील कामाबाबत पर्यवेक्षण केलेल्या अधिकारी कर्मचारी यांचे अहवाल संचिकेत नाहीत.
७. मोजमाप पुस्तिका क्र.२५८३ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नाही.
८. उद्यान विभागाने कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/४०९/२००९, दिनांक १७.१.२००९ अन्वये संबंधित कंत्राटदारास पत्र देवून कामाबाबत होत असलेल्या निष्काळजीपणाबाबत खुलासा मागविला असता याबाबत कोणतेही कागदपत्रे /अहवाल संचिकेत नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मोजमाप पुस्तिका २५८३ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे लेखापरीक्षण पूर्णत: करता आले नाही. तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.७९ : सन २००७-०८ या वर्षात रणजित नगर, उद्यान विकसित करणे व ३ वर्ष संगोपन करणे. (अं.प.रक्कम. रू.२,५०,९२६/-) (खर्च रू. २,२२,१३४/-)**

सन २००७-०८ या वर्षात रणजित नगर येथील उद्यान विकसित करणे व ३ वर्ष संगोपन करणे करीता ई- टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आली होती. २ निविदा विक्री झाल्या व २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेमध्ये एन-ए सईद यांची १०.१०% कमी दराची निविदा होती. संबंधितांनी मनपा सोबत करारनामा रू.२०/- च्या मुद्रांकावर केलेला आहे. संबंधितांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/उद्यान/४९५/०८, दिनांक ११.१.२००८ अन्वये कार्यादेश देण्यात आले. संचिकेच्या तपासणीअंती खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयामध्ये नमूद तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. निविदा अटी शर्ती संचिकेत नाहीत.

३. मोजमाप पुस्तिका क्र.२५०६ व २५८७ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेल्या नाहीत.

४. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

५. परिशिष्ट - ब नुसार कामे पूर्ण झाल्याबद्यल व त्यावर पर्यवेक्षण करणा-या अधिकारी /कर्मचारी यांचे अहवाल नाहीत.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मोजमाप पुस्तिका २५०६ व २५८७ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे लेखापरीक्षण पूर्णत: करता आले नाही. तसेच इतर अनियिमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८० :सन २००७-०८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.९४ बन्सीलालनगर अंतर्गत उद्यान विकसित करण्याच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.**
**(अं.प.रक्कम .४,८५,५३९/-)(खर्च रू. ४,५६,८७४/-)**

सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.९४, बन्सीलालनगर अंतर्गत उद्यान विकसित करणे बाबतच्या कामासाठी ई- टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील कामाच्या ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा काझी गोहर मोहीयोद्दीन यांची होती. एजन्सीस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान /४१८/०९, दिनांक २१.१.२००९ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. सदरील कामाच्या पाहणी बाबत दिनांक १८.११.२००९ रोजी कृषी सहाय्यक यांनी दिलेल्या अहवालावर कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

२. देयकातून कंत्राटी कामाचा विमा १% रक्कम कपात केलेली नाही.

३. निविदा पुस्तिकेतील अट क्र.३८ नुसार खालील ॲटमची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त वाढ झालेली आहे. त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

| अ. क्र. | तपशिल | परिशिष्ट ब मधील संख्या | देयक अदा संख्या | तफावत | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लॉन लागवड | ५०० चौ.मी. | १२२८.४६ चौ.मी. | ७२८.४६ चौ.मी. | १२ | ८७४२/- |
| २ | शोभिवंत झाडे | | | | | |
| | १) Ficas Benjamin | ५० | १०० | ५० | १५० | ७५००/- |
| | २)Botta Palm CReures | ५० | १०० | ५० | १५० | ७५००/- |
| | ३) Mor Pankh | ५० | ७५ | २५ | ७५ | १८७५/- |
| | | | | | | **२५,६१७/-** |

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.४८५५/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८१ :उद्यान विभागाकरीता पॉवर टिलर (T-Farem-३२०F) खरेदीतील अनियमिततेबाबत. (अं.प.रक्कम रू.१,०७,७७७/-)**

सन २००८-०९ या वर्षात उद्यान विभागाकरीता पॉवर टीलर खरेदीसाठी दरपत्रके मागविण्यात आली असता ३ दरपत्रके प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रकामध्ये कमी दराचे दरपत्रक इन्टलेक्च्युल फार्मींग प्रा.लि., पिंपरी, पुणे यांचे होते. संबंधित एजन्सीसोबत रू.५०/- च्या मुद्रांकावर करारनामा झाल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा /उद्यान/३८१/०९, दिनांक ९.१.२००९ अन्वये पुरवठा आदेश निर्गमित करून दोन दिवसांत पुरवठा करण्याचे कळविण्यात आले आहे. संबंधितांचे संचिकेत वस्तूचा पुरवठा केल्याबाबत D.C. नाही. तसेच Invoice सुध्दा नाही. संबंधितांना देयक अदायगी करण्यात आलेली आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. रू.५०,०००/- च्या वरील खरेदीसाठी शासननिर्णय दि.२.१.१९९२ च्या तरतदूीप्रमाणे जाहिर निविदा प्रसिध्द करून खरेदी करण्यात आलेली नाही.

२. पुरवठा आदेशात वस्तूचा दोन दिवसांत पुरवठा करावा असा उल्लेख आहे. परंतू उशिराने पुरवठा झाल्यास विलंब दंडाचा उल्लेख नाही.

३. संचिकेत वस्तूचा पुरवठा झाल्याबाबत डीलेव्हरी चालान, बील उपलब्ध नाही.

४. सन २००८-०९ या वर्षाचे स्टॉक रजिस्टर, वितरण व शिल्लक साठा रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून प्राप्त साहित्याची नोंद स्टॉक रजिस्टरमध्ये घेण्याचे राहून गेलेले आहे असे कळविले आहे. विभागाने नोंदी अद्ययावत करून तसेच इतर मुद्यांबाबतच्या अनियमिततेसंबंधी जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८२ :स्मृतीवन उद्यानामधील विविध कामे करणे बाबतच्या कामात कंत्राटदारास जादा रक्कम अदाई करणे व संचिकेत अपूर्ण असलेल्या कागदपत्राबाबत. (अ.प.रक्कम रू.२,४४,९६५/-)**

सन २००८-०९ या वर्षात स्मृतीवन उद्यानामधील विविध कामे करणे करीता ई-टेंडरींग मार्फत निविदा मागविल्या असता ६ निविदा विक्री झाल्या, त्यापैकी ५ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांमध्ये २९% कमी दराची निविदा श्री.के.बी.पवार यांची होती. निविदा अंतीम झाल्यानंतर एजन्सीने मनपासोबत रू.५०/- च्या मुद्रांकावर करारनामा करून दिला. उद्यान विभागाने कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/५००/२००९, दिनांक २७.२.२००९ अन्वये कार्यादेश निर्गमित केलेले आहे. संबंधित एजन्सीस रू.१८१६२२/- चे देयक अदा करण्यात आले. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. देयक अदायगी करण्यापूर्वी काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसे प्रमाणपत्र संचिकेत नाही.

२. संबंधित एजन्सीने केलेले कामाबाबत उद्यान विभागातील पर्यवेक्षण करणा-या अधिकारी कर्मचारी यांचे संचिकेत अभिप्राय नाहीत.

३. देयक अदायगी करतांना देयकाची एकूण बेरीज रु.२,४५,८०६/- येते. परंतू रु.२,५५,८०६/- दर्शवून रु.१०,०००/- जादा रक्कम कंत्राटदारास अदा केलेली असल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. संबंधितांकडून जादा अदा केलेली रक्कम वसूल करुन महानगरपालिका फंडात भरणा करणे आवश्यक आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रु.१०,००० /- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८३ : आर्थिक वर्ष २००८-०९ मधील गुरु-ता-गद्दी कार्यक्रमासाठी सिंधी कॉलनी व उस्मानपुरा येथील खुल्या जागेमध्ये साफसफाई करणे, खड्डे खोदणे, झाडे लावणे व लॉन लावणे बाबत.**

दिनांक १ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २००८ या कालावधीमध्ये नांदेड येथे गुरु-ता-गद्दी कार्यक्रमासाठी जाणा-या भाविकांना सुविधा देणेस्तव करावयाच्या कामासाठी कार्यालयीन (ई) निविदा जा.क्र.मनपा/ई निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण १ निविदा व एकच निविदा प्राप्त झाली असता १४.९% कमी दराची श्री.रमेश विठ्ठल हिवाळे यांची निविदा प्राप्त झाली आहे. त्यान्वये जा.क्र.मनपा/उद्यान/२१७/ दिनांक १६.९.२००८ / १५.१०.२००८ १५ दिवस मुदतीत काम करण्यासाठी कार्यादेश निर्गमित करण्यात आले.

संचिकाची तपासणी करतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. जा.क्र.मनपा/ई निविदा/६८, दिनांक १३.८.२००८ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आले असता १ निविदा प्राप्त झाली आहे. शासन निर्णय दि.२ जानेवारी १९९२ मधील परि. ८.३ नुसार निविदेचा कालावधी कमीत कमी (३) आठवड्याचा असावा. विधीग्राह्य ३ निविदा प्राप्त न झाल्यास दोन वेळा मुदतवाढ देणे आवश्यक होते. परंतू याचे पालन केलेले दिसून येत नाही.

२. दिनांक १ ऑक्टोबर ते ५ नोंव्हेंबर २००८ या कालावधीमध्ये गुरु-ता-गद्दी कार्यक्रमासाठी दिलेल्या मुदतीत काम पूर्ण होणे आवश्यक होते. परंतू विभागाने दिलेल्या काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रावरुन सदरील काम १४.०१.२००९ रोजी पूर्ण केल्याचे दिसते. म्हणजे जवळ जवळ ९० दिवस उशिरा काम झाले असतांनाही संबंधिताला देयक अदा करण्यात आले आहे.

३. संबंधित गुत्तेदार यांनी ९० दिवस उशिरा काम केल्यानंतरही दंडात्मक कार्यवाही केलेली दिसत नाही.

४. ज्या उद्येशाने काम तातडीने करणे , दिलेल्या कालावधीत करणे आवश्यक असतांना काम केलेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.१ अन्वये शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ च्या तरतूदींचे पालन केलेले नाही. संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८४ :पॉलिथिन बॅग खरेदी करणे बाबत. (अ.प.रक्कम रू.२४९५८/-)**

आर्थिक वर्ष २००८-०९ या कालावधीत सिध्दार्थ उद्यानामध्ये शोभिवंत व फुलांच्या कटिंग लावून रोपे तयार करण्यासाठी पॉलिथीन बॅग खरेदीच्या कामाकरीता दरपत्रके मागविण्यात आली आहे. एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली असता पल्लवांकुर नर्सरी यांचे दर १३५ प्र.कि. तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/४८८, दि.२०.२.२००९ अन्वये विविध आकाराच्या प्लास्टीक बॅग (काव्ळ्या) पुरवठा करण्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आला. संचिकेची तपासणी करतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. संचिकेची तपासणी करतांना दिनांक, आवक-जावक क्रमांक, पान क्रमांक, परिच्छेद क्रमांक दर्शविलेला नाही. त्यामुळे संचिका कधी मंजूर केली याचा बोध होत नाही.

२. पल्लवांकुर नर्सरी यांना पुरवठा करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले. पुरवठा केल्याबाबत दिनांक २४.२.२००९ प्रमाणपत्रात नमूद करण्यात आले.

३. पॉलिथिन बॅग उद्यान विभागास पुरवठा केल्याबाबत रजिस्टर क्रमांक १०९,११०,१११ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

४. पुरवठा आदेशात दर्शविलेल्या आकाराच्या पॉलिथीन बॅग दरपत्रकामध्ये दर्शविलेल्या आकारामध्ये (size) नमूद नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. पुढील लेखापरीक्षणापूर्वी स्टॉक रजिस्टर १०९,११० व १११ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात यावे. इतर अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८५ :रासायनिक खत खरेदी बाबत. (अं.प.रक्कम रू.२३,५५६/-)**

उद्यान विभागातील विविध उद्यानाकरीता व वृक्षारोपणाकरीता, किटकनाशके व रासायनिक खतांची आवश्यकता आहे . सदरील कामाकरीता स्थानिक पुरवठा धारकाकडून कोटेशन मागविले असता एकूण तीन कोटेशन दर भरून प्राप्त झाले. आदर्श कृषी सेवा केंद्र यांचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/८९३, दिनांक ७.१२.२००९ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. संचिका सादर करतांना त्यावर दिनांक दर्शविलेला नाही, आवक-जावक क्रमांक नाही. त्यामुळे संचिका कधी प्रस्तावित केली याचा बोध होत नाही.

२. परिच्छेद क्र.१० नुसार कामाकरीता किटकनाशके व खते यांचे दर मागविण्यात आले असता महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांना काम देण्यात आले होते. परंतू सदरील विभागाने किरकोळ खत व किटकनाशक पुरवठा करता येत नाही असे पत्रान्वये कळविले आहे. म्हणजेच आर्थिक वर्ष २००८-०९ मध्ये रासायनिक खत खरेदी केले असल्याचा बोध होत नाही.

३. परिच्छेद क्र.१९,२० अन्वये मुख्य लेखाधिकारी यांनी नविन दरपत्रके मागवून प्रकरण सादर करावे त्यानुसार परि.२१ नुसार दरपत्रके मागविले असता आदर्श कृषि सेवाकेंद्र यांचे दर कमी असल्याने त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला आहे. परंतू सदरील खरेदी ही आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये झाली आहे

४. परिशिष्ट - ब वर संबंधित पुरवठाधारकाची स्वाक्षरी नाही व निविदा रक्कम वसूल केलेली दिसून आली नाही, त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. जरी खरेदी दरपत्रका मार्फत झालेली असली तरी निविदा रक्कम मनपा फंडात भरणा करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८६ : गुलाब रोपे व शोभिवंत रोपे खरेदीबाबत. (अं.प.रक्कम रू.२५,०००/-)**

आर्थिक वर्ष २००८-०९ मध्ये सिध्दार्थ उद्यान, महापौर बंगला, मा.आयुक्त बंगला व रस्ता दुभाजकां मध्ये झाडे लागवड करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात आली आहे. त्यानुसार तीन दरपत्रके प्राप्त झाले. तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराचे दरपत्रक साकला लॅन्डस्केपींग यांचे असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/४८९, दिनांक २०.२.२००९ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. माल प्राप्त झाल्याबाबत संचिकेत D.C. नाही.

२. साठा रजिस्टर, वितरण रजिस्टर, ताळमेळ रजिस्टर, लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

३. करारनामा करतांना त्यावर पुरवठाधारकांची स्वाक्षरी नाही.

४. आवक / जावक क्रमांक ,दिनांक दर्शविलेला नाही. त्यामुळे संचिका कधी सादर केली याचा बोध होत नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. स्टॉक रजिस्टर १०९,११० व १११ पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपलब्ध ठेवावे. प्रशासकीय कार्यवाहीअंती जबाबदारी निश्चित करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८७ :फुल झाडांची रोपे खरेदी बाबत. (अं.प.रक्कम रू.२४,८८०/-)**

उद्यानामध्ये विविध प्रकारची फुल झाडांची रोपे लावण्यासाठी रोपे खरेदी करावयाची असून सदरील उद्यानातील कामाकरीता स्थानिक रोप वाटिका धारकांकडून कोटेशन दरपत्रके मागविण्यात आले असून एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाले असता सर्वात कमी दराचे दरपत्रक साकला लॅन्डस्केपींग यांचे असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/४०८, दिनांक २०.०१.२००९ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला.

संचिकेची पाहणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. संचिके मधील परिशिष्ट - ब पाहिले असता त्यावर पुरवठा धारकांची स्वाक्षरी नाही.

२. संचिकेमध्ये परिच्छेद क्रमांक, दिनांक, जा.क्र. दर्शविलेला नाही.

३. संचिकेमध्ये दरपत्रक रक्कम वसूल केलेली दिसून येत नाही.

४. स्टॉक रजिस्टर क्रमांक १०९,११०,१११ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

५. माल प्राप्त झाल्याबाबत D.C. नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. स्टॉक रजिस्टर १०९,११० व १११ पुढील लेखापरीक्षणापूर्वी अद्ययावत उपलब्ध करावे. प्रशासकीय कार्यवाहीअंती जबाबदारी निश्चित करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८८ :विविध उद्यानात उपलब्ध हौदामध्ये कमळाची रोपे टाकणे बाबत. (अं.प.रक्कम रू.२२,०००/-)**

आर्थिक वर्ष २००८-०९ या कालावधीत महानगरपालिकेचे मालकीच्या विविध उद्यानातील हौदामध्ये कमळाची रोपे टाकणेसाठी पुरवठाधारकांकडून कोटेशन दरपत्रके मागविण्यात आली असता एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली असता सतीश गादीया यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/४१०, दिनांक २०.०१.२००९ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. संचिका सादर करतांना विभागाने जावक क्रमांक / दिनांक कोठेही दर्शविलेला नाही.

२. माल कधी प्राप्त झाला याबाबत संचिकेत D.C. नाही.

३. माल प्राप्त झाल्याबाबत साठा रजिस्टर, वितरण रजिस्टर व ताळमेळ रजिस्टर उपलब्ध झालेले नाही.

४. Estimate संचिकेमध्ये दर्शविलेले नाही.

५. निविदेवर व परिशिष्ट - ब वर पुरवठाधारकांची स्वाक्षरी नाही.

६. करारनामा केला आहे. त्यावर पुरवठाधारकांची स्वाक्षरी नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. स्टॉक रजिस्टर १०९,११० व १११ पुढील लेखापरीक्षणापूर्वी अद्ययावत करून ठेवण्यात यावे. प्रशासकीय कार्यवाहीअंती जबाबदारी निश्चित करून अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८९ : आर्थिक वर्ष २००८-०९ मध्ये शहरामध्ये वृक्षारोपण करीता विविध ठिकाणी खड्डे खोदणे.(अं.प.रक्कम रू.२,०४,९३०/-)**

आर्थिक वर्ष २००८-०९ मध्ये शहरामध्ये वृक्षारोपण करीता वॉर्ड अ,ब,क या विभागात वृक्षारोपण जागतिक पर्यावरण दिवस ५ जून २००८, वट पौर्णिमा या कार्यक्रमाकरीता खुल्या जागेमध्ये व रोडसाईड या ठिकाणी ७५०० खड्डे खोदून त्यामध्ये माती भरणे या कामासाठी २,०४,९३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

त्यासाठी ४ निविदा विक्री झाल्या असून ४ निविदा प्राप्त झाल्या आहे. सुमित कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकापेक्षा १६% कमी दराची निविदा प्राप्त झाली असून जा.क्र.मनपा/उद्यान/४१७, दिनांक २१.१.२००९ अन्वये कार्यादेश देण्यात आला.

संचिकांची तपासणी करतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. जा.क्र.मनपा/ई/निविदा/३१, दिनांक २९.५.२००८ अन्वये जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली असून निविदा विक्रीचा दिनांक ३०.५.२००८ निविदा दाखल करण्याची दिनांक ३०.५.२००८, निविदा उघडण्याची दिनांक ०३.०६.२००८ हा फार कमी कालावधी असून शासन निर्णय २ जानेवारी १९९२ परिच्छेद ८.३ नुसार जाहिर निविदेचा कालावधी कमीत कमी (३) आठवड्याचा देण्यात यावा.

२. निविदा दिनांक ०४.०६.२००८ या दिवशी प्रसिध्द करण्यात आली असून कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/४१७, दिनांक २१.१.२००९ रोजी देण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कामाचा कालावधी व निविदा काढलेला कालावधी याचा बोध होत नाही.

३. कार्यादेश देतांना कामाचा कालावधी देणे आवश्यक असतांना कामाचा कालावधी दर्शविलेला नाही. परंतू अल्प मुदतीची निविदा सुचनामध्ये कामाची मुदत तीन महिने दर्शविली असतांना कार्यादेश मध्ये नमूद करणे आवश्यक होते.

४. उद्यान विभागातील कृषि सहाय्यक यांनी खड्डे खोदण्याचा रिपोर्ट दिनांक न दर्शविता सादर केलेला आहे. ३०४९,९०९,५६८ असे एकूण ४५२६ खड्डे खोदण्याचा रिपोर्ट आहे.

५. सुमीत कन्स्ट्रक्शन निविदा ज्या कालावधीत निघाली त्याच आर्थिक वर्षात काम देणे आवश्यक असतांना विभागाने पूर्तता केलेली नाही.

६. कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/४१७/२१.१.२००९ रोजी देण्यात आला असून काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र completion certificate १३.१.२०११ म्हणजे दोन वर्ष होवूनही विभागाने रक्कम रू.१,७१,९९६/- संबंधिताला अदा केली आहे ही बाब गंभीर स्वरूपाची आहे.

७. देयकातून कपात केलेली ३% F.S.D. रक्कम ५०५०/-, २२०६/- व २% अनामत रक्कम जप्त करणे आवश्यक होते. परंतू रक्कम संबंधिताला अदा करण्यात आली आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्यांबाबत जबाबदारी निश्चित करून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९० :सन २००८-०९ या वर्षातील सिडको प्रभागातील एन-१ उद्यान संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत**

जा.क्र.मनपा/ई/निविदा/०८/२००८, दिनांक २५.४.२००८ अन्वये सिडको भागातील विविध उद्यानाचे बारा महिने संगोपन देखभाल करीता निविदा मागविण्यात आलेल्या आहे. या निविदेतील एन-१ उद्यानाची संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा दिशाभूल करणारा आहे. विभागाने लेखापरीक्षणास संचिका उपलब्ध करून दिलेली नाही. परंतू खुलाशात संचिका उपलब्ध करून दिलेली आहे असे म्हणणे योग्य नाही. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून पुढील लेखापरीक्षणापूर्वी संचिका उपलब्ध करून द्यावी व तसा अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९१ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको एन-४, पोलिस चौकी उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.५२,९६४/-) (प्रत्यक्ष खर्च रू.५७,२४०/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-४, पोलिस चौकी उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाली. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची ५% निविदा रेणुका नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.३२६, दिनांक २६.११.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २६.११.२००९ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ६महिन्याची रक्कम रू.२१४६५/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

४. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

५. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

७. निविदा अंतिम झाल्यावर निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात दुस-या व अंतिम देयकातून रू.३३७२/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

८. निविदा अटी शर्तीचा करारनामा करण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव मनपा फंडात जमा करून घेतलेली नाही. त्यामुळे रू.१०५९/- रकमेचे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.२१,४६५/- व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.५३०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९२ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात अशोकनगर भगवती कॉलनी उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.७७,४४३/-)(प्रत्यक्ष खर्च रू.८२,२०५/-)**

सन २००८-०९ या वर्षात अशोकनगर भगवती कॉलनी उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल कामाची निविदा दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची ७.५५% निविदा पियुष नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने त्यांचे पत्र क्र.२८३, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते दिनांक ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास दिनांक ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा अंतीम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन केलेले नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

३. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रू.१५४९/- मनपा फंडात भरणा न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले.

४. निविदा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे अयोग्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली रक्कम रू.२५६८९/- संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

५. देयक अदा करण्यापूर्वी निविदा अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

६. निविदा अट क्र.१० प्रमाणे १०% सुरक्षा ठेव रक्कम दुस-या देयकातून रू.२८०४/- व तिस-या देयकातून रक्कम रू.१९९५/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

७. परिशिष्ट ब मधील अ.क्र.१३ हेज लागवडीचे दर प्रतीवर्ष रू.११५/- असतांना रू.१३०/- ने प्रथम देयक पारीत केले. २५० चौ.मी.चे रू.१५/- प्रमाणे रू.३७५०/- जादा अदा करण्यात आले. जादा अदा रक्कम संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

८. सन २००७-०८ वर्षाची निविदा कालावधी दिनांक ३१.३.२००८ रोजी संपुष्टात आला असता दिनांक ६.५.२००८ पर्यंत सदरील उद्यानाचे संगोपन कोणी केले?

९. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. त्याचप्रमाणे देयकातून १% रक्कम कपात झालेली नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रू.२५,६८९/-, मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रू.३७५०/- व मुद्या क्र.९ अन्वये रक्कम रू.७७४/-

संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९३ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-३ उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.२,४८,१३८/-) (प्रत्यक्ष खर्च रू.२,२०,४२५/-)**

सन २००८-०९ या वर्षात एन-३ उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल कामाची निविदा दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १२% निविदा प्रतिभा नर्सरी या एजन्सीची होती. सदरील काम मिळालेल्या एजन्सीने काम करण्यास नकार दिल्यामुळे परमार्थ महिला बचत गटास प्रायोगिक तत्वावर या गटास प्रतिभा नर्सरी यांचे दराने काम देण्यात आले. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने पत्र क्र.२७२, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते दिनांक ६.४.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास दिनाक ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा अंतीम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन केलेले नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

३. देयक अदा करण्यापूर्वी निविदा अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

४. निविदा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करण्यात आले. ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.६८८८३/- संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

५. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% कपात सुध्दा झालेले नाही.

७. निविदा अंतिम झाल्यावर निविदा अट क्र.१८ नुसार दुस-या देयकातून रू.२४३२/- व तिस-या देयकातून रू.९२४६/- ची कपात झालेली नाही. त्यामुळे १०% सुरक्षा ठेव कपात न केल्यामुळे निविदा अटी शर्तीची पूर्तता नाही.

८. सन २००७-०८ या वर्षात शोभिवंत झाडे लागवडीसाठी रू.३३,३००/- खर्च करण्यात आला. सन २००८-०९ च्या निविदेमध्ये ३००+५० असे ३५० शोभिवंत झाडे देखभालीचा समावेश असणे गरजेचे होते. तसे न होता केवळ ५० झाडांचाच समावेश आहे. त्यामुळे सन २००७-०८ मध्ये ३०० शोभिवंत झाडे लागवडीसाठी झालेला खर्च निष्फळ ठरतो. निष्फळ खर्च वसूलीस पात्र आहे.

९. हिरवळ देखभालीसाठी ४१५० चौ.मी. क्षेत्रासाठी रू.१.६६ प्रतीमाह दराने रू.७५,७७९/- ११ महिन्याचे दुस-या व दरम्यान देयकातून रक्कम अदा केलेली आहे. प्रत्यक्षात अंतीम देयकात हिरवळीचे क्षेत्र ४०३९ चौ.मी. दर्शविलेले आहे. म्हणजे सदरील उद्यानात एजन्सीने ४०३९ चौ.मी.ची देखभाल केलेली आहे. त्यामुळे दुस-या व दरम्यानचे देयकात १११ चौ.मी. क्षेत्राचे ११ महिन्याचे अदा केलेले रू.२०२७/- हे जास्तीचे अदा झालेले असून मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

१०. प्रतिभा नर्सरीज यांचे विरुध्द काम करण्यास नकार दिल्यामुळे कार्यवाही होणे आवश्यक होते. परंतू तसे झालेले संचिकेतील कागदपत्रावरुन दिसत नाही. निविदेसोबत इसारा रक्कम जप्तीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रू.६८,८८३/-, मुद्या क्र.८ अन्वये रक्कम रू.३३,३००/- व मुद्या क्र.९ अन्वये रक्कम रू.२०९७/- संबंधितांकडून वसूल करणे तसेच मे.प्रतिभा नर्सरीज यांनी काम करण्यास नकार दिल्यामुळे निविदा अटी/शर्तीनुसार त्यांचेविरुध्द कार्यवाही व्हावी त्याचप्रमाणे संबंधितांनी निविदेसोबत भरणा केलेली इसारा रक्कम जप्तीची कार्यवाही करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९४ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको ११ वी योजना शिवाजीनगर B.C. व E. उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.१,१२,९९२/-)(प्रत्यक्ष खर्च रू.१,३१,२५२/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात ११ वी योजना शिवाजीनगर B.C. व E उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची ९.२% निविदा प्रतिभा नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२७५, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतीम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

४. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

५. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

६. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे योग्य नाही. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.४१०१६/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

७. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रू.२२६०/- संबंधितांकडून वसूल करून मनपा फंडात जमा झालेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

८. सन २००७-०८ मध्ये २१० शोभिवंत झाडे लागवडीसाठी रू.१६,८००/- व २० शोभिवंत झाडे देखभालीसाठी रू.४२७/- असे एकूण रू.१७,२२७/- खर्च झाला आहे. सन २००८-०९ च्या निविदेत २३० शोभिवंत झाडे देखभालीचा समावेश केलेला नाही. त्यामुळे सन २००७-०८ या वर्षातील उपरोक्त झालेला खर्च निष्फळ ठरतो. तसेच सदरील वर्षात झालेले नुकसानीबाबत जबाबदारी निश्चित करणे योग्य. आर्थिक नुकसान वसूल करून मनपा फंडात जमा करणे योग्य.

९. निविदा अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात दुस-या देयकातून रू.४७४१/- व तिस-या देयकातून रू.३७५७/- वसूल झालेले नाही. त्यामुळे निविदा अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

१०. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

११. दुस-या व दरम्यानच्या देयकात रू.९५,५६८/- मधून प्रथम देयकाचे रू.५०९४/- वजा जाता रू.४४६२२/- येते. यामध्ये ९.२% कमी रू.४१०५/- वजा जाता निव्वळ देय रक्कम रू.४०५१७/- येते. परंतू रू.४७४१८/- दर्शवून रू.६९०१/- जास्तीचे कंत्राटदारास अदा केलेले आहे. मनपाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून मनपा फंडात रक्कम जमा करण्यात यावी.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.६ अन्वये रक्कम रू.४१,०१६/-, मुद्दा क्र.८ अन्वये रक्कम रू.१७,२२७/- , मुद्दा क्र.१० अन्वये रक्कम रू.११३०/- व मुद्दा क्र.११ अन्वये रक्कम रू. ६,९०१/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९५ : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-१ उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.१,६७,२७१/-) (प्रत्यक्ष खर्च रू.१,६६,२५३/-)(१६ महिने)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन -१ सिडको उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी ई टेंडरींग विभागाद्वारे प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १९% निविदा प्रतिभा नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२७९, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ६.५.२००९ या कालावधीचे कार्योत्तर कार्यादेश निर्गमित केलेले आहे. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करण्यात आले. ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.५१९५४/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा अंतीम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

४. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

५. परिशिष्ट ब मध्ये अ.क्र.१३ हेज लागवड चे अंदाजपत्रक १५० चौ.मी. x ११५ प्रतीवर्ष रू. १७२५०/- होते. प्रत्यक्षात रू.१९५००/- अं.प.रक्कम दर्शवून व देयक अदा करून रू.२२५०/- चे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% कपात सुध्दा झालेली नाही.

७. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

८. निविदा अंतिम झाल्यावर देयकातून निविदा अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची रक्कम दुस-या देयकातून रू.५३३२/- व तिस-या देयकातून रू.५३३८/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

९. करारनामा करण्यापूर्वी निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात जमा झालेली नाही, त्यामुळे मनपाचे रू.३३४५/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियम ५४ प्रमाणे ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रू.८३६३/- मनपा फंडात भरणा न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.५१,९५४/-, मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.२२५०/- व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रु.१६७३/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९६ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-८ पंडीत जवाहरलाल नेहरु उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.**
**(अं.प.रक्कम रू.२,३३,५६३/-) (प्रत्यक्ष खर्च रू.२,३८,२९८/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन -८ पंडील जवाहरलाल नेहरू उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची ११% निविदा गौरव अभिषेक या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.३८२, दिनांक ९.१.२००९

अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक ९.१.२००९ रोजी निर्गमित करणे अयोग्य आहे. कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ८ महिन्याची रक्कम रु.१,१९,१४९/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रु.४६७१/- संबंधितांकडून वसूल करुन मनपा फंडात जमा झालेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

३. दुस-या देयकातून रु.९२५२/- व तिस-या देयकातून रु.४७५३/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अट क्र.१८ चा भंग झालेला आहे.

४. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

५. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

६. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

७. परिशिष्ट- ब नुसार हेज लागवड १५० चौ.मी. करीता रु.११५ चौ.मी. प्रतीवर्षा प्रमाणे दर ठरलेले आहेत. दुस-या देयकात १५० चौ.मी. चे रु.१७२५०/- रक्कम अदा केलेली आहे. प्रत्यक्षात अंतीम देयकात १३० चौ.मी. हेज लागवड दर्शविली म्हणजेच दुस-या देयकात २० चौ.मीचे जादा रक्कम रु.२३००/- अदा केली. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. जादा अदा रक्कम संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रु.१,१९,१४९/- व मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रु.२३००/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९७ : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-२ -ए सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन,देखभाल विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रु.१,०१,५३७/-) (प्रत्यक्ष खर्च रु.१,१३,९१३/-)**

सन २००८-०९ या वर्षात एन-२-ए सेक्टर उद्यान बारा महिने संगोपन देखभाल कामाची निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली. सदरील कामाच्या निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदेचा दर १९.५% निविदा शिवम नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने त्यांचे पत्र क्र.२६८, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास दिनांक ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन केलेले नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ तरतूदींची पूर्तता झालेली नाही.

३. निविदा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ पासून निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्यांची रक्कम रू.३५,५९८/- संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

४. देयक अदायगीपूर्वी निविदा अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

५. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रू.२०३१/- व ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रू.५०७७=०० मनपा फंडात जमा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. निविदा अट क्र.१८ प्रमाणे १०% सुरक्षा ठेव रक्कम दुस-या देयकातून रू.३३००/- व तिस-या देयकातून रू.३९६२/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

७. सन २००७-०८ वर्षाची निविदा कालावधी दिनांक ३१.३.२००८ रोजी संपुष्टात आला. तद्नंतर दिनांक ६.५.२००८ पर्यंत सदरील उद्यानाचे संगोपन कोणी केले?

८. कंत्राटी कामाचा विमा नाही. तसेच १% कपातसुध्दा केलेली नाही.

९. दुस-या दरम्यानच्या देयकातून रू.७७५०/- जास्तीचे अदा केलेले आहे. रू.३०२४८/- देयक पारीत करण्याऐवजी रू.३७९९८/- देयक पारीत केले. जादा अदा रक्कम संबंधितांकडून वसूल करुन मनपा फंडात जमा करण्यात यावी.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.३५,५९८/-, मुद्या क्र.८ अन्वये रक्कम रू.१०१५/- व मुद्या क्र.९ अन्वये रक्कम रू.७७५०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९८ : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-१२ सलीम अली सरोवर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.**
**(अं.प.रक्कम रू.२,४९,३५६/-)(प्रत्यक्ष खर्च रू.३,२३,७५५/-)**

सन २००८-०९ या वर्षात एन-१२ सलीम अली सरोवर उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल कामाची निविदा दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची ६.३% निविदा रेणुका नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने त्यांचे पत्र क्र.२८१, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते दिनांक ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास दिनांक ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रू.४९८७/- मनपा फंडात भरणा न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ चे पालन केलेले नाही.

३. निविदा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे अयोग्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली रक्कम रू.१,०१,१७३/- वसूल करणे योग्य.

४. देयक अदा करण्यापूर्वी निविदा अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

५. निविदा अट क्र.१८ प्रमाणे १०% सुरक्षा ठेव रक्कम दुस-या देयकातून रू.९४६५/- व तिस-या देयकातून रक्कम रू.१०६७३/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

६. सन २००७-०८ वर्षाची निविदा कालावधी दिनांक ३१.३.२००८ रोजी संपुष्टात आला असता दिनांक ६.५.२००८ पर्यंत सदरील उद्यानाचे संगोपन कोणी केले?

७. सन २००७-०८ या वर्षात ३०० फुलांचे ताटवे देखभालीकरीता रू.५९७६/- खर्च झाला. प्रत्यक्षात सन २००८-०९ च्या निविदेत १०० फुलांचे ताटवे दर्शविले म्हणजे २०० फुलांचे ताटवे नष्ट झाले. २०० फुलांचे ताटवे देखभालीवर झालेला खर्च रू.३९८४/- खर्च निष्फळ ठरतो.

८. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच १% रक्कम देयकातून कपात केलेली नाही.

९. दुस-या व दरम्यानचे देयकात मागील पहिल्या व दरम्यानचे देयकातून रू.१,२०,०१८/- कपात न करता रू.१,०९,८७१/- कपात केली आहे. ६.३% रक्कम वजा जाता रू.९४६५/- येते. प्रत्यक्षात रू.१,०४,१५९/- अदा केली आहे. रू.९५०८/- जास्तीचे अदा केले असल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. करीता जादा अदा रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात यावी.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.१,०१,१७३/-, मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रू.३१८४/-, मुद्या क्र.८ अन्वये रक्कम रू.२४९४/- व मुद्या क्र.९अन्वये रक्कम रू.९५०८/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.९९ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-७-F सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.१,४५,०२९/-)(प्रत्यक्ष खर्च रू.१,३५,३४४/-)**

सन २००८-०९ या वर्षात एन-७-F सेक्टर उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल कामाची निविदा दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १७.१५% निविदा पियुष नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने त्यांचे पत्र क्र.२७८, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते दिनांक ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित

करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास दिनांक ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. कार्यादेश करण्यापूर्वी रू.२९०१/- २% सुरक्षा ठेव तसेच रू.७२५१/- ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव ठेवलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

३. देयक अदा करण्यापूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

४. निविदा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करण्यात आले. ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.४२२९५/- संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

५. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% कपात सुध्दा झालेली नाही.

६. निविदा अंतिम झाल्यावर देयकातून निविदा अट क्र.१८ प्रमाणे १०% सुरक्षा ठेव दुस-या देयकातून रू.५१११/- व तिस-या देयकातून रू.२९०१/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

७. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रू.४२,२९५/-, व मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.१४५०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०० : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको एन-६, उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.१,४२,९६४/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-६, उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत १ निविदा विक्री झाली. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत १ निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १७.५% निविदा शिवम नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२८७, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ६.४.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. संबंधित एजन्सीला कार्यादेश देतांना निविदेतील अटी शर्तीच्या अधिन राहून कार्यादेश निर्गमित केलेले आहेत. मनपा प्रशासनाने निविदेतील अट क्र.३८ प्रमाणे कार्यवाही केल्याचा संचिकेतील उपलब्ध अभिलेख्यावरुन खात्री झाली नाही.

२. संबंधित एजन्सीने निविदेसोबत भरणा केलेली १% रक्कम व कार्यादेश देण्यापूर्वी २% रक्कम जप्तीची कार्यवाही झालेली नाही.

३. सदरील उद्यानाचे संगोपन, देखभाल झाले की नाही याचे संचिकेतील कागदपत्रावरुन बोध होत नाही. त्यामुळे उद्यानाचे झालेल्या नुकसानीबाबत जबाबदारी निश्‍चित करणे योग्य राहील.

४. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

५. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

६. सन २००७-८ या वर्षाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली. तद्नंतर दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाचे संगोपन कोणी केले ?

७. सन २००७-८ या वर्षात शोभिवंत झाडे लागवडीसाठी रू.११,२००/- खर्च करण्यात आले. परंतू सन २००८-०९ या वर्षातील निविदेत त्यांच्या देखभाली बाबत समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे सन २००७-०८ मध्ये झालेला खर्च निष्फळ ठरतो.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रू.११,२००/- संबंधितांकडून वसूल करावी तसेच संदर्भ वर्षात सदरील उद्यानाचे देखभाल करण्यासाठी ज्या एजन्सीला काम दिले होते त्यांनी काम केले नसल्याचे दिसून येते. याबाबत निविदेतील अटी/शर्तीनुसार संबंधित एजन्सीवर कार्यवाही बाबत खुलासा करून व इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०१ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-६, एम-२ उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.१,४५,२७९/-) (प्रत्यक्ष खर्च रू.१,३७,७४१/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-६,एम-२ उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १७.५५% निविदा पियुष नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२७७, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे योग्य नाही. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.४३०४४/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

३. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

४. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रू.२९०४/- व ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम रू. ७२५९/- संबंधितांकडून वसूल करुन मनपा फंडात जमा झालेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

५. निविदा अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात दुस-या देयकातून रू.५००९/- व तिस-या देयकातून रू.३२८८/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

६. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

७. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.२ अन्वये रक्कम रू.४३,०४४/-,व मुद्दा क्र.७ अन्वये रक्कम रू.१४५३/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०२ : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको कॅनॉट प्लेस टाऊन सेंटर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.१,५०,३८८/-) (प्रत्यक्ष खर्च रू.१,३३,६९७/-) (१६ महिने)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात कॅनॉट प्लेस टाऊन सेंटर सिडको उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची २२.५% निविदा शिवम नर्सरी या एजन्सीची होती. सदरील काम मिळालेल्या एजन्सीने काम करण्यास नकार दिल्यामुळे लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था या एजन्सीस शिवम नर्सरी यांचे दराने काम देण्यात आले. सदरील एजन्सीची दुस-या क्रमांकाची निविदा होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२६४, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे योग्य नाही. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.४१७८०/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा सूचनेतील अटी शर्तीनुसार सदरील उद्यानाचे काम बारा महिनेसाठी असतांना कार्यादेश देतांना १३ महिनेसाठी दिला.

३. शिवम नर्सरी यांनी काम करण्यास नकार दिल्यामुळे त्यांचे विरुध्द काय कार्यवाही केली याचा बोध होत नाही.तसेच संबंधितांनी निविदेसोबत जमा केलेली रक्कम जप्तीची कार्यवाही करणे योग्य.

४. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदीनुसार कंत्राटी कामाचा करारनामा रू.१०/- लक्ष पर्यंतसाठी रू.१००/- च्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे . सदरील कामासाठी रू.२०/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा केलेला आहे. त्यामुळे अधिनियम १९५८ च्या कलम ३४ मधील तरतूदींचा भंग झालेला आहे.

५. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% कपात सुध्दा झालेली नाही.

७. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

८. निविदा अंतीम झाल्यावर निविदेतील अटी शर्ती तील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात दुस-या देयकातून रू.४६९४/- व तिस-या व अंतीम देयकातून रू.३५१३/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.४१,७८०/- व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.१५०४/- संबंधितांकडून वसूल करून तसेच मे.शिवम नर्सरीज यांनी काम करण्यास नकार दिल्यामुळे निविदा अटी/शर्तीनुसार त्यांचेविरुध्द कार्यवाही व्हावी त्याचप्रमाणे संबंधितांनी निविदेसोबत भरणा केलेली इसारा रक्कम जप्तीची कार्यवाही करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०३ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-२, डी सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.१,१२,१८६/-) (प्रत्यक्ष खर्च रू.९३,६९३/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-२, डि सेक्टर,येथील उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत १ निविदा विक्री झाली. निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत १ निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १३.५% निविदा शिवम नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२७१, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.२९२७९/-/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

४. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

५. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

६. निविदा अंतिम झाल्यावर निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात दुस-या देयकातून रू.३४४४/- व तिस-या देयकातून रू.२१७९/- कपात झालेले नाही. त्यामुळे निविदा अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

७. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

८. सन २००७-०८ या वर्षात सदरील उद्यानात ९० नग शोभिवंत झाडे लागवडीसाठी रू.१११/- प्रती झाड प्रमाणे रू.९,९९०/- खर्च झालेला आहे. पुढील वर्षाचे सन २००८-०९ च्या निविदेमध्ये परिशिष्ट ब मध्ये ९० नग शोभिवंत झाडे देखभालीसाठी दाखविणे गरजेचे असतांना त्याचा उल्लेख नाही. म्हणजेच मागील वर्षात झालेल्या लागवडीबाबत साशंकता निर्माण होते. व झालेला खर्च निष्फळ ठरतो. शहानिशा करून मनपाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करावे.

९. करारनामा करण्यापूर्वी निविदा रकमेच्या २% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून मनपा फंडात जमा केलेली नाही. त्यामुळे रू.२२४३/- चे मनपाचे नुकसान झालेले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.२९,२७९/-, मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.११२२/- व मुद्या क्र. ८ अन्वये रक्कम रू. ९९९०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०४ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको एन-२, ५९० उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.७७०३५/-) (प्रत्यक्ष खर्च रू.८७३११/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-२, ५९० उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी ई टेंडरिंग विभागाद्वारे प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत १ निविदा विक्री झाली. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची ४.७५% निविदा लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२६७, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

३. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.२७२८५/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

४. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

५. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

६. निविदा अंतिम झाल्यावर निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात दुस-या देयकातून रू.३१०६/- व तिस-या देयकातून रू.२१८३/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

७. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

८. निविदा सूचनेतील अटी शर्तीनुसार सदरील उद्यानाचे काम बारा महिने कालावधीचे असतांना कार्यादेश देतांना १३ महिन्यासाठी दिले याचा बोध होत नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.२७,२८५/- व मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.८७३/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०५ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको अयोध्यानगर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.७५,९९६/-) (प्रत्यक्ष खर्च रू.५८,०४०/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात अयोध्यानगर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ०१ निविदा विक्री झाली. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत १निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदेपैकी सर्वात २०% कमी दराची निविदा प्रतिभा नर्सरी यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.३३१, दिनांक ०३.१२.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ६.४.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रू.१५२०/- व ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम रू.३८००/- मनपा फंडात भरणा केलेली नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक ३.१२.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ७ महिन्याची रक्कम रू.२५३९३/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

४. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

५. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

६. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

७. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

८. निविदा अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात होणे क्रमप्राप्त आहे. दुस-या देयकातून रू.१९९२/- व तिस-या देयकातून रू.२१४९/- कपात झालेली नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

९. सदरील उद्यानाचे अंदाजपत्रक बनवितांना पाणी कंत्राटदाराने स्वत: आणून टाकण्याचे दर दर्शविले. प्रत्यक्षात देयक अदा करतांना मनपाचे पाणी असलेले दर नमूद आहे. देयक अदा करतांना सदरील उद्यानात मनपाचे पाणी असलेले दर लागू केले तर अंदाजपत्रकात जास्तीचे दर नमूद करण्याचा हेतू काय होता याचा खुलासा व्हावा.

१०. हिरवळ देखभाली करीता १३३१ चौ.मी. करीता दुस-या देयकात रू.२४,३०४/- खर्च झालेला आहे. तिस-या व अंतिम ९३१ चौ.मी.करीता रू.३५,३५१/- अदा केलेले आहे. दुस-या देयकात हिरवळ क्षेत्र जास्तीचे असतांना तिस-या देयकात क्षेत्र कमी होणे ही बाब आक्षेपार्ह असून दुस-या देयकात ४०० चौ.मी. हिरवळीसाठी झालेला रू.७३०४/- संबंधितास जादा अदा झालेला आहे. तसेच तिस-या देयकात ९३१ चौ.मी. चे अदा रक्कम ३५,३५१/- आहे. प्रत्यक्षात रू.२४,७२७/- अदा करावयास पाहिजे होती. रू.१०,६२४/- जादा अदा झालेली आहे. करीता रू.१०६२४ + ७३०४ = रू.१७,९२८/- संबंधितांकडून वसूल करणे योग्य राहील.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.२५,३९३/-व मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रू.७६०/- व मुद्या क्र.१० अन्वये रू.१७९२८/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०६ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-२ बी सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.७०,९५०/-) (प्रत्यक्ष खर्च रू.६३,८४८/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-२, बी सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास या कामाची निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी ई टेंडरिंग विभागाद्वारे प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत १ निविदा विक्री झाली. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत १ निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा २१.५% कमी दराची निविदा शिवम नर्सरी यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२६९, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात

आलेले आहेत. तसेच सदरील कामास जा.क्र.६३१, दिनांक १८.६.२००९ अन्वये मुदतवाढ देण्यात आली.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.१९,९५३/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

४. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

५. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

७. निविदा अंतिम झाल्यावर निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात होणे क्रमप्राप्त आहे. दुस-या देयकातून रू.२३५३/- व तिस-या देयकातून रू.१४६५/- कपात झालेली नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

८. करारनामा करण्यापूर्वी निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात जमा झालेली नाही. त्यामुळे मनपाचे रू.१४१९/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा नियम ५४ प्रमाणे ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव ठेवलेली नाही. त्यामुळे मनपाचे रू. ३५४७/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.१९,९५३/- व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.७१०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०७ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात-एन-४ H सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.९६,१२९/-)(प्रत्यक्ष खर्च रू.९२,८०३/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-४-H सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत १ निविदा विक्री झाली. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत १ निविदा प्राप्त झाली, प्राप्त निविदा ११% कमी दराची निविदा सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२७३, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर

आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.२९,०००/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

४. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

५. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

७. निविदा अंतिम झाल्यावर निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात होणे क्रमप्राप्त आहे. दुस-या देयकातून रू.३७४७/- व तिस-या देयकातून रू.१६४५/- कपात झालेली नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

८. हेज देखभालीसाठी दुस-या व दरम्यानचे देयकात २३० चौ.मी.चे २.६० प्रतीमाह प्रमाणे रू.६५७८/- अदा केले. अंतीम देयकता १७० चौ.मी.चे काम पूर्ण केल्याचे दर्शविले आहे. दुस-या देयकात ६० चौ.मी.चे जादा रक्कम अदा केलेली आहे. त्यामुळे रू.१७१६/- रकमेचे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. संबंधितांकडून जादा अदा रक्कम वसूल करण्यात यावी.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.२ अन्वये रक्कम रू.२९,०००/-, मुद्दा क्र.६ अन्वये रक्कम रू.९६१/- व मुद्दा क्र.८ अन्वये रू.१७१६/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०८ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको सम्राटनगर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.८१,९१४/-) (प्रत्यक्ष खर्च रू.७५,७३०/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सम्राटनगर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ०१ निविदा विक्री झाली. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत १ निविदा प्राप्त झाली. प्राप्त ७.५५% कमी दराची निविदा पियुष नर्सरी यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२८४, दिनांक

२२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रू.१६३८/- मनपा फंडात भरणा केलेली नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.३१,५५४/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

४. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

५. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

६. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

७. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

८. निविदा अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेव रक्कम अंतीम देयकातून रू.७५७३/- कपात झालेली नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.३१,५५४/- व मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रू.८१९/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१०९ : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको टाऊन सेंटर सी-४ उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.९७०१८/-) (प्रत्यक्ष खर्च रू.९७,२७०/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको टाऊन सेंटर सी -४ येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १०.५५% निविदा पियुष नर्सरी यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२६६, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.३०३९७/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

४. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

५. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

७. निविदा अंतिम झाल्यावर निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात होणे क्रमप्राप्त आहे. दुस-या देयकातून रू.४२६१/- व तिस-या देयकातून रू.१५२८/- कपात झालेली नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

८. सन २००७-०८ या वर्षात सदरील उद्यानात खालील प्रमाणे नविन लागवड करणेबाबत खर्च झालेला आहे.

| अ.क्र. | तपशिल | संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | हेज लागवड | १२५ नग | ११५ | १४३७५/- |
| २ | लॉन लागवड | ३०० चौ.मी. | १३० | ३९०००/- |
| ३ | शोभिवंत झाडे लागवड | ५० नग | ८० | ४०००/- |
| | | | **एकूण** | **५७३७५/-** |

पुढील आर्थिक वर्ष २००८-०९ या वर्षाचे निविदेमध्ये उपरोक्त नविन लागवड ही देखभालीच्या ॲटम मध्ये समाविष्ट होणे गरजेचे होते. परंतू तसे झालेले नसल्यामुळे रू.५७३७५/- झालेला खर्च निष्फळ ठरतो. पर्यायाने नविन लागवड झालेली नसल्याची शक्यता नाकारता येत नाही.

९. करारनामा करण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रू.१९४०/- मनपा फंडात जमा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.३०,२९७/-, मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.९७३/- व मुद्या क्र.८ अन्वये रक्कम रू.५७,३७५/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११० :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको अलंकार उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.१,२५,६९१/-) (प्रत्यक्ष खर्च रू.१,२१,०६३/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात अलंकार उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी १०% दराची निविदा प्रतिभा नर्सरी यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२८२, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ६.४.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. दिनांक ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.३७८३२/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

४. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

५. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

७. निविदा अंतिम झाल्यावर निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात होणे क्रमप्राप्त आहे. दुस-या देयकातून रू.५०४२/- व तिस-या देयकातून रू.१८१४/- कपात झालेली नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

८. करारनामा करण्यापूर्वी निविदा रकमेच्या २% रक्कम मनपा फंडात जमा झालेली नाही. त्यामुळे मनपाचे रू.२५१४/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.३७,८३२/- व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.१२१०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१११ : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-२, सी -सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.८१,७०१/-) (प्रत्यक्ष खर्च रू.७५०४२/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-२, सी-सेक्टर उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी ई-टेंडरिंग विभागाद्वारे निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १४.५% निविदा शिवम नर्सरी यांची होती. सदरील काम मिळालेल्या एजन्सीने काम करण्यास नकार दिल्यामुळे लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था या एजन्सीस शिवम नर्सरी यांचे दराने काम देण्यात आले. सदरील एजन्सीची दुस-या क्रमांकाची निविदा होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२७०, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे योग्य नाही. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.२३,४५१/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

३. शिवम नर्सरी यांनी काम करण्यास नकार दिल्यामुळे त्यांचे विरूध्द काय कार्यवाही केली याचा बोध होत नाही.तसेच संबंधितांनी निविदेसोबत जमा केलेली रक्कम जप्तीची कार्यवाही करणे योग्य.

४. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

५. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% कपात सुध्दा झालेली नाही.

७. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

८. निविदा अंतीम झाल्यावर निविदेतील अटी शर्ती तील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात दुस-या देयकातून रू.३०८१/- व तिस-या देयकातून रू.११९०/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रू.२३,४५१/- व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.८१७/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११२ : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात १२ वी योजना शिवाजीनगर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.७३,२११/-) (प्रत्यक्षात खर्च रक्कम रू.७५,२५३/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात १२ वी योजना शिवाजीनगर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची ७.५५% निविदा पियुष नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२७४, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. करारनामा करण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रू.१४६४/- मनपा फंडात भरणा केलेली नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

३. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

४. सन २००७-०८ या वर्षाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली. तद्नंतर दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाचे संगोपन कोणी केले ?

५. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे अयोग्य आहे. कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.२३५१६/- संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात झालेली नाही.

७. निविदा अंतीम झाल्यावर निविदा अट क्र.१८ प्रमाणे दुस-या देयकातून रू.२८१४/- व तिस-या देयकातून रू.१६९५/- कपात करण्यात आलेले नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

८. सन २००७-०८ या वर्षात सदरील उद्यानात मोठी झाडे लागवडीसाठी ८३६०/- खर्च झालेला आहे. सन २००८-०९ या वर्षाचे देखभाली मध्ये उपरोक्त ४४ झाडांचा समावेश नाही. त्यामुळे सन २००७-८ मध्ये झालेला खर्च निष्फळ ठरतो.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.२३,५१६/-,मुद्या क्र.६अन्वये रक्कम रू.७५३/- व मुद्या क्र.८ अन्वये रक्कम रू.८३६०/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११३ : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिडको साईनगर-२उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.६१,२६४/-) (प्रत्यक्ष खर्च रू.६०,४४६/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात साईनगर -२ उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ५ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत ५ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १७.५% निविदा प्रतिभा नर्सरी यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२८५, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास दिनांक ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.१८,७६४/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

३. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

४. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

५. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात केलेली नाही.

६. निविदा अंतिम झाल्यावर निविदेतील अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात होणे क्रमप्राप्त आहे. दुस-या देयकातून रू.२२६०/- व तिस-या देयकातून रू.१४८८/- कपात झालेली नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

७. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रू.१२२५/- व ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम रू.३०६३/- मनपा फंडात जमा झालेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्दा क्र.१ अन्वये रक्कम रू.१८,७६४/- व मुद्दा क्र.५ अन्वये रक्कम रू.६१३/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११४ : सन २००८-०९ या आर्थिक वर्षात टाऊन सेंटर जी सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत. (अं.प.रक्कम रू.६४,५२३/-) (प्रत्यक्षात खर्च रक्कम रू.६१,१७७/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात टाऊन सेंटर जी सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात निविदा

प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत ३ निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १२.५५% निविदा पियुष नर्सरी या एजन्सीची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२७६, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आले. कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. करारनामा सोबत २% सुरक्षा ठेव रक्कम रू.१२९०/- मनपा फंडात भरणा केलेली नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

३. देयक अदायगीपूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींबाबत सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

४. सन २००७-८ या वर्षाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली. तद्नंतर दिनांक १.४.२००८ ते दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाचे संगोपन कोणी केले ?

५. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे अयोग्य आहे. कार्यादेश नसतांना संबंधित एजन्सीस अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.१९११८/- संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

६. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात झालेली नाही.

७. निविदा अंतीम झाल्यावर देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात करणे आवश्यक आहे. दुस-या देयकातून रू.२४५१/- व तिस-या देयकातून रू.१०८८/- कपात करण्यात आलेले नाही. त्यामुळे निविदा अट क्र.१८ चे पालन झालेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.१९,११८/- व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.६४५/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११५ :सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-११ स्मशानभूमी उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल,विकास कामे करण्याबाबत.(अं.प.रक्कम रू.५२,२२६/-) (प्रत्यक्ष खर्च रू.५८,९५९/-)**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एन-११ स्मशानभूमी उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास यासाठी निविदा सूचना दिनांक २५.४.२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ०२ निविदा विक्री झाल्या. सदरील कामाच्या निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत ०२ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची १३.५% निविदा शिवम नर्सरी यांची होती. सदरील एजन्सीस उद्यान विभागाने जा.क्र.२८०, दिनांक २२.१०.२००८ अन्वये दिनांक ६.५.२००८ ते ५.५.२००९ या कालावधीचे काम देण्यात आलेले आहेत. तसेच सदरील कामास कार्योत्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदरील कामास दिनांक ३१.८.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१. निविदा अंतिम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम रू.१०४५/- मनपा फंडात भरणा केलेली नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. निविदा कामाचा कालावधी दिनांक ६.५.२००८ पासून असतांना कार्यादेश दिनांक २२.१०.२००८ रोजी निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य आहे. कार्यादेश नसतांना अदा केलेली ५ महिन्याची रक्कम रू.१८,४२४/- ही संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

४. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

५. देयक अदायगी पूर्वी निविदेतील अट क्र.१४,१६,२०,२३,५९,६० मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत.

६. सन २००७-०८ या वर्षाचे कामाची निविदा दिनांक ३१.३.२००८ रोजी संपली असतांना दिनांक ६.५.२००८ पर्यंत उद्यानाची देखभाल व संगोपन कोणी केले?

७. निविदा अट क्र.१८ नुसार १०% सुरक्षा ठेवीची कपात होणे क्रमप्राप्त आहे. दुस-या देयकातून रू.१७२२/- व तिस-या देयकातून रू.२३९५/- कपात झालेली नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

८. देयकात कंत्राटदारास रू.१७,२२४/- रक्कम अदा केली. प्रत्यक्षात रू.१४,८२२/- अदा व्हावयास पाहिजे होती. रू.२४०२/- जास्तीची रक्कम अदा केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. करीता संबंधितांकडून जादा अदा रक्कम वसूल करून मनपा फंडात भरणा करण्यात यावी.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.१८,४२४/- व मुद्या क्र.८ अन्वये रक्कम रू.२४०२/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११६ : लाकडी ट्री गार्ड खरेदी करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.२,४२,०००/-)**
**(अदा रक्कम रू.२,२४,४३९/-)**

सन २००८-०९ मध्ये लाकडी ट्री गार्ड खरेदी करण्यासाठी २,४२,०००/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून उद्यान विभागा अंतर्गत विविध प्रभागामध्ये, शाळांमध्ये, रस्त्यावर व इतर ठिकाणी वृक्ष लागवड करण्यासाठी २२००/- नग लाकडी ट्री गार्ड खरेदी करणे आवश्यक आहे.

लाकडी ट्री गार्ड खरेदी करणे करीता कार्यालयीन (ई) निविदा सूचना अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ४ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण -४ निविदा प्राप्त झाल्या. श्री.जफर उल हक यांची निविदा दर ५.१% कमी दराने असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/४९८, दिनांक २६.२.२००९ अन्वये १ महिन्यांत ट्री गार्ड पुरवठा करण्यासाठी आदेशित करण्यात आले आहे.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. सन २००८-२००९ मध्ये संचिकेचे सादरीकरण झाले असून कार्यादेश ४९८/२६.२.२००९ व काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र २४.२.२०१० रोजी दिलेले आहे. म्हणजे ज्या कामासाठी संचिका सादर केली आहे तो उद्येश सफल झालेला नाही.

२. मालाचा पुरवठा केल्याबाबत संचिकेत D.C नाही. लेटरपॅड वर संख्या दर्शवून मालाचा पुरवठा दाखविलेला आहे. त्यावर ट्री गार्ड प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी नाही.

३. पुरवठा धारकाने देयक सादर केलेले नाही.

४. मुदतवाढीला सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

५. मालाचा पुरवठा १ महिन्यांत करणे आवश्यक असतांना संबंधिताने खालील प्रमाणे टप्प्या - टप्प्याने पुरवठा केल्याचे दर्शविले आहे.

| अ.क्र. | दिनांक | एकूण |
|---|---|---|
| १ | १२.३.२००९ | ५०० |
| २ | १६.४.२००९ | ४०० |
| ३ | २३.५.२००९ | ३०० |
| ४ | २५.६.२००९ | २०० |
| ५ | २२.९.२००९ | ४०० |
| ६ | १८.२.२०१० | ३५० |
| | | २१५० |

६. काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिनांक २४.२.२०१० रोजी देण्यात आले आहे. परंतू संबंधितावर दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून आलेली नाही.

७. नमुना क्रमांक १०९,११०,१११ रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. पुढील लेखापरीक्षणापूर्वी रजिस्टर क्र. १०९, ११०, १११ उपलब्ध ठेवावे. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११७ :सिडको भागातील उद्यानांच्या संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देणे बाबत.**

लेखापरीक्षणासाठी सिडको भागातील उद्यानांच्या संचिका उपलब्ध झालेल्या नाहीत. सन २००९-१० या वर्षातील खालील संचिका त्वरीत उपलब्ध करून द्याव्यात.

१. टाऊन सेंटर सी-४ व साईनगर -२ उद्यान, एन-५ पाणीटाकी ते एम.जी.एम. हॉस्पिटल उद्यानाचे १२ महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे करीता.
२. अशोकनगर, भगवतीकॉलनी व अलंकार उद्यान व रोड दुभाजक गजानन महाराज मंदिर ते शिवाजीनगर सावरकर चौक ते गारखेडा पोलिस स्टेशन उद्यानाचे १२ महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे करीता.

३. एन-७ अयोध्यानगर उद्यानाचे १२ महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे करीता.
४. ११ वी योजना बी. सी. व ई व १२ वी योजना शिवाजीनगर ,सातारा उद्यानाचे १२ महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे करीता.
५. एन-२ बी, सी, व डी सेक्टर सिडको बसस्टॅण्ड ते जयभवानीनगर रस्ता दुभाजक यांचे १२ महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे करीता.
६. एन-६ ,एम-२ उद्यानाचे १२ महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व देखभाल करणे करीता.
७. एन-७ एफ सेक्टर उद्यान, संभाजीनगर महाराज पुतळा व कैलास शिल्प समोरील दुभाजक.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. तसेच लेखापरीक्षणा दरम्यान उपरोक्त संचिका उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. पुढील लेखापरीक्षणापूर्वी संचिका उपलब्ध ठेवाव्यात.

करिता, संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११८ : आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये सिध्दार्थ उद्यान येथे मध्यवर्ती ठिकाणी फाऊन्टेन बसविणे बाबत.(अं.प.रक्कम रु.३,८४,४००/-)(अदा रक्कम ३,५३,२०५/-)**

सिध्दार्थ उद्यान येथील विहिरीच्या बाजूस असलेल्या जुन्या गोलाकृती जागेवर फवारे योग्य व्यवस्था आहे. त्या ठिकाणी आठ हत्तीच्या सोंडीतून पाणी पडण्याची व्यवस्था करणे, नोझल (Nozles) बसविणे व बाजूचे दोन्ही हौदाची दुरुस्ती व त्यामध्ये नविन प्रकारचे १६ (Nozles) बसविणे इ. कामाकरीता रु.३,८४,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई/निविदा/११६, अन्वये B-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण १ निविदा विक्री झाली व स्वीकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत १ निविदा प्राप्त झाली असता श्री.मुबारक महेबुब पठाण यांचे दर ६.५१% कमी दराने असल्याने त्यांचे दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. जा.क्र.मनपा/उद्यान / १५१ , दिनांक २६.२.२०१० अन्वये कार्यादेश देण्यात आला. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा काढतांना शासन निर्णय २ जानेवारी १९९२ ची विभागाने पूर्तता केलेली नाही.
२. कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/१५१, दिनांक २६.२.२०१० देतांना कामाचा कालावधी दर्शविलेला नाही.
३. काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देतांना त्यावर काम पूर्ण झाले बाबत दिनांक दर्शविलेला नाही. परंतू पर्यावरण संवर्धन अधिकारी यांची स्वाक्षरी आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ४. अनामत रक्कम - | इसारा रक्कम | - | ३८४४/- |
| | F.S.D. ५% | - | १७६६०/- |
| | F.S.D. ३% | - | १०५९६/- |
| | अनामत D.D. २% | - | ८०००/- |

इत्यादी रक्कम काम पूर्ण झाल्यामुळे संबंधितास परत करणे आहे. परंतू संचिकेत परतावा केल्याबाबत परतावा प्रमाणपत्र संचिकेत नाही. त्यामुळे रक्कम परत केल्याबाबतचा बोध होत नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. प्रकरणांतील अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११९ : मातीच्या कुंड्या खरेदी बाबत.**

२००९-१० या आर्थिक वर्षात मातीच्या कुंड्या खरेदी बाबत लेखाशिर्ष बागा मशागत व देखभाल या शिर्षा अंतर्गत खर्च करण्यात आला असून सदरील कामासाठी जा.क्र.मनपा/उद्यान/३६, दिनांक १९.०१.२०१० अन्वये स्थानिक पुरवठाधारकाकडून कोटेशन दरपत्रक मागविण्यात आले असता एकूण तीन दरपत्रक प्राप्त झाले. शांतीलाल जिरे यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/१४४, दिनांक २४.०२.२०१० अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. कुंड्या प्राप्त झाल्या बाबत संचिकेत पोच पावती नाही, दिनांक दर्शविलेला नाही.

२. साठा रजिस्टर, वितरण रजिस्टर, ताळेबंद रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. मातीच्या कुंड्या प्राप्त झाल्याबाबत संचिकेत अभिलेखे उपलब्ध नाही. तसेच स्टॉक रजिस्टर १०९,११० व १११ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेले नाही. पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवावीत. प्रकरणांतील अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२० : सन २००९-१० या वर्षात एन-१ उद्यान बारा महिने संगोपन देखभाल इत्यादी करीता देण्यात आलेल्या कामातील अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रू.१५८२८२/- (खर्च रू.१८६२३९/-)**

सन २००९-१० या वर्षात एन-१ उद्यान बारा महिने संगोपन देखभाल करीता अल्पमुदतीची निविदा सूचना दिनांक १८.८.२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आली. तीन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या दिनांकास तीन निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची १% कमी दराची निविदा शिवम नर्सरी यांची होती. संबंधितांना वाटाघाटीस बोलावून ५% कमी दर मंजूर करून निविदा स्विकारली. जा.क्र.मनपा/उद्यान/७३८/०९, दिनांक ३१.८.२००९ अन्वये दिनांक ३१.८.२००९ ते ३०.८.२०१० या कालावधीचे कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर कार्यालयीन पत्र मनपा/ उद्यान/५०९/१०, दिनांक ४.११.२०१० अन्वये दिनांक १५.११.२०१० पर्यंत सदरील कामास मुदतवाढ देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र. मनपा/ उद्यान/७९४/११, दिनांक २१.३.२०११ अन्वये दिनांक १५.२.२००११ पर्यंतचे मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश निर्गमित केलेले आहे.

संचिकेतील आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

१. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात करणे आवश्यक होते. परंतू पहिल्या देयकातून रू.३२६२/- दुस-या देयकातून रू.११७७४/- व मुदतवाढीच्या देयकातून रू.३५८८/- असे एकूण रू.१८६२४/- कपात न केल्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

२. देयक अदायगीपूर्वी निविदा अट क्र.१३ व १४ प्रमाणे नमूद बाबी संबंधी सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

३. मोजमाप पुस्तिका क्र.२५०६ व २५८५ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. मोजमाप पुस्तिका क्र.२५०६ लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध न झाल्यामुळे पूर्णत: लेखापरीक्षण करता आले नाही. करिता, इतर अनियमिततेबाबत संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२१ : सन २००९-१० या वर्षात कॅनॉट प्लेस उद्यान, टाऊन सेंटर जी सेक्टर, रोड दुभाजक व वाहतूक बेटाचे बारा महिने संगोपन देखभाल इत्यादी करीता देण्यात आलेल्या कामातील अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रु.२,४७,१६५/-) (खर्च रू.२,२३,६३६/-)**

सन २००९-१० या वर्षात कॅनॉट प्लेस उद्यान, टाऊन सेंटर व वाहतूक बेटाचे बारा महिने संगोपन देखभाल करीता अल्पमुदतीची निविदा सूचना दिनांक १८.८.२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आली. तीन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या दिनांकास तीन निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची १७% कमी दराची निविदा सावित्रीबाई फुले महिला बचतगट यांची होती. जा.क्र.मनपा/उद्यान/७५१/०९, दिनांक ३१.८.२००९ अन्वये दिनांक ३०.८.२०१० या कालावधीचे कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर कार्यालयीन पत्र मनपा/ उद्यान/८०१/२०११, दिनांक २१.३.२०११ अन्वये दिनांक १५.०२.२०११ पर्यंतचे कार्योत्तर कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहे. तसेच कार्यालयीन आदेश क्र. मनपा/ उद्यान/२०११/५१२, दिनांक ४.११.२०११ अन्वये दिनांक १५.११.२०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

१. निविदा स्विकारतांना ५% अनामत सुरक्षा ठेव रू.१२३५८/- मनपा फंडात जमा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये नमूद बाबींची देयक अदायगी पूर्वी पूर्तता केलेली नाही.

३. सन २००८-०९ मध्ये बाबनिहाय झालेला खर्च व त्याचा उल्लेख २००९-१० मध्ये समाविष्ट न होणे म्हणजेच सन २००८-०९ मधील खर्च निष्फळ ठरतो. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| **अ.क्र.** | **तपशिल** | **सन २००८-०९ मधील क्षेत्रफळ व खर्च** | **सन २००९-१० मध्ये उल्लेखित क्षेत्र** | **फरक क्षेत्र व रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | हिरवळ | <u>३४५०</u><br>रू.१२९२६८/- | १८७६ | १५७४ चौ.मी<br>९१८९८/- |

उपरोक्त रू.९१८९८/- खर्च निष्फळ ठरतो व तो वसूलीस पात्र आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.९१,८९८/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२२ :आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये एन-९ वाहतूक उद्यान/ एन-११ स्मशानभूमी येथील उद्यानाचे १२ महिने संगोपन, देखभाल कामे करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.२,३९,३४०/-)(अदा रक्कम ३,०४,२१०/-)**

सिडको भागातील उद्यानाच्या देखभाल व दुरूस्तीच्या कामाकरीता खाजगी ठेकेदारा मार्फत २००९-१० मध्ये कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/निविदा/०७/२००९, दिनांक १८.८.२००९ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या दिनांक २१.०८.२००९ पर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या निविदा स्वीकृतीच्या दिनांक २४.०८.२००९ पर्यंत एकूण तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असता मे. प्रतिभा नर्सरी यांचे दर अंदाजपत्रकीय दराने तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/७४४, दिनांक ३१.०८.२००९ अन्वये १२ महिन्यासाठी ३१.०८.२००९ ते ३०.०८.२०१० कार्यादेश देण्यात आला. संबंधितास वाटाघाटीकरीता बोलावण्यात आले असता ५% कमी दराने काम करण्यास संमती दिली आहे. दिनांक २४.१०.२०१० रोजी मा.आयुक्त यांची मंजूरी घेवून जा.क्र.उद्यान/५०४, दिनांक ४.११.२०१० अन्वये दिनांक १५.११.२०१० पर्यंत मुदतवाढ कार्यादेश देण्यात आले होते.

संचिकेची तपासणी करतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. सिडको भागातील विविध उद्यानाचे १२ महिने संगोपन, देखभाल करण्यासाठी बचतगटाकडून जाहिर निविदा मागवून बचत गटाला काम देण्यासाठी परिच्छेद क्रमांक १९ अन्वये दिनांक १८.८.२००९ रोजी मंजूरी घेण्यात आली. परंतू काम देतांना खाजगी ठेकेदाराला देण्यात आले.

२. एन -९ वाहतूक उद्यान व एन-११ स्मशान भूमी उद्यानाचे परिशिष्ट -ब ची तपासणी केली .

**आर्थिक वर्ष २००८-०९**
**एन-९ वाहतूक उद्यान**

| अ.क्र. परि.ब मधील | कामाचा तपशिल | संख्या | दर मनपाचे पाणी | प्रति चौ.मी. | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ३ | शोभिवंत झाडे | ३६५ | १.७८ | चौ.मी. | ७७९६/- |
| ४ | हेज | ५१४ | १.७८ | चौ.मी. | १०९७९/- |
| ५ | जागेची साफसफाई ठेवणे | ४००० | ०.८२ | चौ.मी. | ३९३६०/- |
| १२ | शोभिवंत झाडे (नविन) | १२० | ८० | प्र.न॰ | ९६००/- |
| १३ | हेज लागवड (नविन) | १५० | ११५ प्र.ब. | चौ.मी. | १७२५०/- |

**आर्थिक वर्ष २००८-०९**

**एन-११ स्मशानभूमी**

| अ.क्र. परि.ब मधील | कामाचा तपशिल | संख्या | दर मनपाचे पाणी | प्रति चौ.मी. | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २ | शोभिवंत झाडे | १०० | १.७८ | चौ.मी. | २१३६/- |
| ४ | हेज | १९० | १.७८ | चौ.मी. | ४०५८/- |
| ६ | जागेची साफसफाई | १५०० | ०.८२ | चौ.मी. | १४७६०/- |

**आर्थिक वर्ष २००९-१०**

**एकत्रित**

| अ.क्र. परि.ब मधील | कामाचा तपशिल | दर्शविलेली संख्या | दर मनपाचे पाणी | प्रति चौ.मी. | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ३ | शोभिवंत झाडे | १२० | १.७८ | चौ.मी. | २५६३ |
| ४ | हेज | ८९० | १.७८ | चौ.मी. | १९०१० |
| ५ | साफसफाई ठेवणे | ७५०० | ०.८२ | चौ.मी. | ७३८०० |

या प्रमाणे दर्शविलेले आहे. परंतू प्रत्यक्षात देयक अदा खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. **शोभिवंत झाडे -**

आर्थिक वर्ष २००८-०९ मध्ये एन-९ वाहतूक उद्यान येथे ३६५ शोभिवंत झाडे होती व नविन १२० झाडे, एन-११ स्मशानभूमी येथे १०० झाडे असे एकूण ५८५ झाडे असतांना आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये उद्यान,संगोपन देखभाल/ विकासकामे करण्यासाठी देतांना फक्त १२० झाडे दर्शविलेली आहे. म्हणजेच ४६५ झाडे कमी दर्शविलेली आहे. एकत्रित

३४५ X १.७८ X १७.५ = १०७४७/-

१२० X ८० नग = ९६००/-

रक्कम रू.२०३४७/- वसूलीस पात्र आहे.

२) **हेज -**

आर्थिक वर्ष २००८-०९ मध्ये एकत्रित हेज ८५४ चौ.मी. असतांना आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये ८९० चौ.मी. दर्शविण्यात आला. म्हणजे ३६ चौ.मी. जास्तीचा दर्शविण्यात आला आहे. ३६ X १.७८ X १७.५ = ११२१/- रू. जास्तीचे अदा करण्यात आले आहे.

३) **जागेची साफसफाई -**

आर्थिक वर्ष २००८-०९ मध्ये एकत्रित उद्यान साफसफाई ५५०० चौ.मी. असतांना आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये ७५०० चौ.मी. एवढे दर्शविण्यात आले. म्हणजे २००० चौ.मी. जास्तीचे दर्शविण्यात आले.

२००० X ०.८२ X१७.५ = २८७००/- अदा करण्यात आले.

४) निविदा अटी व शर्ती ७ नुसार उद्यानासाठी वेळोवळी लागणारी माती, शेणखत अथवा उद्यानामध्ये विकास व देखभालीसाठी लागणारे साहित्य हे कंत्राटदाराने स्वखर्चाने आणावे असे अटी शर्ती मध्ये नमूद केलेले आहे. व परिशिष्ट -ब मध्ये सदरील माती १५३००/- शेणखत ६६००/- असे एकूण २१९००/- अदा करण्यात आले आहे. परि-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकाशी ताळमेळ साधत नाही. तसेच परिशिष्ट-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दर्शविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

५) २% अनामत रक्कम रु.४७८७/- निविदा कार्यादेश देतांना घेणे आवश्यक असतांना अनामत रक्कम घेतलेली नाही.

६) देयकातून १०% सुरक्षा रक्कम ७०१७/-, १५६८/- , ७७१८/- वजावट होणे आवश्यक असतांना वजावट केलेली नाही.

७) मोजमाप पुस्तिका क्रमांक २५८५ , २५०६ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

८) निविदा अटी व शर्ती १३,१४,२१,२२,३८ ची पूर्तता केल्याचे दिसून येत नाही.

९) संचिकेत नकाशा लावलेला नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रु.२०,३४७/- , मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रु.११२१/- व मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रु.२८,७००/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२३ :सन २००९-१० या वर्षात एन-३ उद्यानाचे बारा महिने संगोपन देखभाल इत्यादी करिता देण्यात आलेल्या कामातील अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रु.१,६३,०११=००) (खर्च रक्कम रु.१,२४,९७३=००)**

सन २००९-१० या वर्षात एन-३ उद्यान बारा महिने संगोपन देखभाल करीता अल्पमुदतीची निविदा दिनांक १८.८.२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आली असता दोन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या दिनांकास दोन निविदा प्राप्त झाल्या. सर्वात ११% कमी दराची निविदा अहिल्याबाई होळकर महिला बचत गट यांची होती. परंतू सदरील बचत गटाने काम करण्यास नकार दिला. त्यामुळे परमार्थ महिला बचत गटाने काम करण्याची तयारी दर्शविली.जा.क्र.मनपा /उद्यान /८०६ /०९, दिनांक २६.१०.२००९ अन्वये दिनांक ३०.८.२००९ ते ३०.८.२०१० या कालावधीचे कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५१५/१०, दिनांक ४.११.२०१० रोजी मान्यता घेवून १५.११.२०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली व कार्योत्तर कार्यादेश निर्गमित केलेले आहे. तसेच जा.क्र.मनपा/उद्यान/७९९/११, दिनांक २१.३.२०११ अन्वये दिनांक १५.२.२०११ पर्यंत कार्योत्तर मुदतवाढ दिलेली आहे.

संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. निविदा अट क्र.३५ प्रमाणे कमी दराची निविदा भरणा केलेल्या कंत्राटदाराने काम करण्यास नकार दिल्यानंतर कार्यालयातर्फे त्यांचे विरुध्द केलेल्या कार्यवाही बाबत कागदपत्रे संचिकेत उपलब्ध नाहीत.

३. निविदेनुसार काम करण्यास नकार दिल्यामुळे संबंधितांचे निविदेबाबतचे १% रक्कम रु.१६३०/- जप्त करुन मनपा फंडात जमा करावी तसा अहवाल सादर करावा.

४. निविदा अटी व शर्ती ७ नुसार उद्यानासाठी वेळोवळी लागणारी माती, शेणखत अथवा उद्यानामध्ये विकास व देखभालीसाठी लागणारे साहित्य हे कंत्राटदाराने स्वखर्चाने आणावे असे अटी शर्ती मध्ये नमूद केलेले आहे. व परिशिष्ट -ब मध्ये सदरील माती व शेणखत याचे एकूण १८,८२४/- अदा करण्यात आले आहे. परि-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकाशी ताळमेळ साधत नाही. तसेच परिशिष्ट-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दर्शविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

५. निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे देयक अदायगीपूर्वी सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

६. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव रक्कम कपात करणे आवश्यक होते. परंतू पहिल्या देयकातून रु.३२७६/- दुस-या देयकातून रु.६१३५/- तिस-या देयकातून रु.१४०३/- व चौथ्या देयकातून रु.१६८३/- एकूण १२४९७/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन तर झालेले नाहीच. तसेच मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

७. लेखापरीक्षणा दरम्यान मोजमाप पुस्तिका क्र.२७०४ उपलब्ध करुन दिलेली नाही.

८. सन २००८-०९ मध्ये परिशिष्ट - ब मध्ये उल्लेख केलेले व देयक अदा केलेल्या ॲटमचा सन २००९-१० च्या परिशिष्ट - ब मध्ये कमी क्षेत्राचा उल्लेख आहे. त्यामुळे सन २००८-०९ मध्ये झालेला खर्च निष्फळ ठरतो. तक्ता पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | सन २००८-०९ मधील क्षेत्र | सन २००९-१० मधील क्षेत्र | तफावत क्षेत्र | दर | निष्फळ अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरवळ | ४१५० | १३८८ | २७६२ | १.६६ | ७३३५८/- |
| २ | लॉन लागवड | ६०० | -- | ६०० | १३० | ७८०००/- |
| ३ | शोभिवंत झाडे | ५० | ५० | | -- | -- |
| ४ | शोभिवंत झाडे लागवड | १५० | ४५ | १०५ | ८० | ८४००/- |
| ५ | हेज | ५०० | ३९० | ११० | १.७८ | ३१३३/- |
| ६ | जागेची स्वच्छता | ५००० | ३४७० | १५३० | ०.८२ | २००७४/- |
| ७ | मोठी झाडे | ९० | ६९ | २१ | १.७८ | ५९८/- |
| | | | | | | **१,८३,५६३/-** |

९. कार्यादेश नसतांना अदा केलेली २ महिन्याची रक्कम रु.१०९२१/- संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्दा क्र.८ अन्वये रक्कम रु.१,८३,५६३/- व मुद्दा क्र.९ अन्वये रक्कम रु.१०,९२१/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२४ : सन २००९-१० या आर्थिक वर्षात एन-४ पोलिस चौकी, एन-४-एच सेक्टर येथील उद्यान १२ महिने संगोपन देखभाल विकास यासाठी दिलेल्या कामातील अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रु.१०८४८२/- खर्च रु.११२४३१/-)**

सन २००९-१० या आर्थिक वर्षात एन-४, पोलिस चौकी व एन-४ एच सेक्टर येथील उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास कामासाठी देण्यासाठी जाहिर निविदा दिनांक १८.८.२००९ अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असता ३ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी २ निविदा स्वीकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत प्राप्त झाल्या. दोन निविदेपैकी १३% कमी दराची निविदा अहिल्याबाई होळकर महिला बचत गटाची आहे. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७४७/०९, दिनांक ३१.८.२००९ अन्वये कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर दिनांक १५.११.२०१० पर्यंत मुदतवाढ कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/५१३/११, दिनांक ४.११.२०११ अन्वये देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/८००/११ दिनांक २१.३.२०११ अन्वये दिनांक १५.२.२०११ पर्यंत मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश दिलेले आहेत. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन करण्यात आलेले नाही.
२. मोजमाप पुस्तिका क्र.२५०६ व २७०४ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत.
३. निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये नमूद बाबी बाबत देयक अदा करण्यापूर्वी सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.
४. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव रक्कम कपात करणे आवश्यक असतांना प्रथम देयकातून रु.३३०३/- दुस-या देयकातून रु.३०६२/- तिस-या देयकातून रु.२०९८/-, चौथ्या देयकातून रु.१२६४/- व पाचव्या देयकातून रु.१५१६/- असे एकूण रु.११२४३/- कपात न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे तसेच निविदा अटींचे पालन झालेले नाही.
५. सन २००८-०९ मध्ये सदरील दोन्ही उद्यानात खालील प्रमाणे कामे देण्यात आली. त्याचा समावेश सन २००९-१० मध्ये केलेला नाही. त्यामुळे मागील वर्षात झालेला खर्च निष्फळ ठरतो.

| अ.क्र. | तपशील | देखभाल खर्च | नविन लागवड खर्च | खर्च २००७-०८ | २००८-०९ मध्ये समावेश | फरक | निष्फळ खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शोभिवंत झाडे | १२२<br>रु.३३१४ | ४०<br>रु.३२०० | १६२<br>रु.६५१४ | १०७ | ५५ | ४०७+३२००<br>= ३६०७ |
| २ | हेज | ३७०<br>रु.१०१६६ | ५०<br>रु.५७५० | ४२०<br>रु.१५९१६ | १५० | २७० | ६०४५+५७५०<br>=११७९५ |
| | | | | | | एकूण | १५४०२/- |

रू. १५४०२/- निष्फळ खर्चाबाबत जबाबदारी निश्चित करून वसूल करण्यात यावा.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. उपरोक्त मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.१५,४०२/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२५ :एन-२, एल.आय.जी. व एन-२ ए उद्यानाचे १२ महिने संगोपन, देखभाल व विकास करणे या कामातील संचिकेच्या तपासणीत आढळलेल्या अनियमितता.**
**(अं.प.रक्कम रू.१,९५,२५९/-)(अदा रक्कम २,४७,५०३/-)**

सन २००९-१० या वर्षात एन-२ एलआयजी व एन-२ ए उद्यानाचे देखभाल, संगोपन व विकास कामासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या दिनांका पावेतो एक निविदा विक्री झाली व एकच निविदा प्राप्त झाली. मे.प्रतिभा नर्सरीज यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्राप्त झाली. निविदा दर व एजन्सी मंजूरीसाठी लेखा शाखेकडे दिनांक १४.९.२००९ रोजी संचिका पाठविली असता मुख्य लेखाधिकारी यांनी शासन निर्णयातील तरतूदीनुसार किमान तीन वैध निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. असे अभिप्राय नोंदविले. मा.आयुक्त यांनी संबंधित विभागप्रमुखांशी चर्चा करून अंदाजपत्रकीय दराने दर स्विकारले. संबंधित एजन्सीस कार्योत्तर कार्यादेश क्र.मनपा/उद्यान/३०४/२००९ दिनांक २६.१०.२००९ अन्वये पत्र निर्गमित केले. कामाचा कालावधी दिनांक ३१.८.२००९ ते ३०.८.२०१० पर्यंतचा दर्शविलेला आहे. तद्नंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान /५०३ / २०१० दिनांक ४.११.२०१० रोजी मुदतवाढ कार्यादेश दिनांक १५.११.२०१० पर्यंतचे वाढविले. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७९७/२०११, दिनांक २१.३.२०११ अन्वये कार्योत्तर मुदतवाढ दिलेली आहे. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. लेखा शाखेने शासन निर्णयातील तरतूदींचा उल्लेख करून किमान ३ वैध निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे असे अभिप्राय नोंदविले असूनही दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन केलेले नाही.

२. कार्यादेश नसतांना दोन महिन्याचे रू.२२८३६/- एजन्सीस अदा केलेली रक्कम संबंधितांकडून वसूल करणे योग्य.

३. निविदा अटी व शर्ती ७ नुसार उद्यानासाठी वेळोवळी लागणारी माती,
शेणखत अथवा उद्यानामध्ये विकास व देखभालीसाठी लागणारे साहित्य हे कंत्राटदाराने स्वखर्चाने आणावे असे अटी शर्ती मध्ये नमूद केलेले आहे. व परिशिष्ट -ब मध्ये सदरील माती व शेणखत याचे एकूण २०,४०८/- अदा करण्यात आले आहे. परि-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकाशी ताळमेळ साधत नाही. तसेच परिशिष्ट-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दर्शविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपाई आहे.

४. देयक अदा करण्यापूर्वी निविदा अट क्र.१३,१४ मध्ये नमूद बाबींची पूर्तता न करताच देयक अदा करून निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

५. निविदा नियम १६ अन्वये प्रत्येक देयकातून १०% रक्कम कपात करून मनपा फंडात जमा करणे आवश्यक आहे. परंतू पहिल्या देयकातून रू.५७०९/- दुस-या देयकातून रू.१२७६१/-

व मुदतवाढीच्या देयकातून रू.६२८०/- कपात केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी शर्तीचा भंग झालेला आहे.

६. मोजमाप पुस्तिका क्र.२५०६ व २५८५ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून दिलेली नाही.

७. सन २००८-०९ या वर्षात लॉन देखभालीकरीता ३००० चौ.मी.करीता रू.५९७६०/- व नविन लॉन लागवडीसाठी २०० चौ.मी. करीता रू.२६०००/- खर्च झाला. सन २००९-१० या वर्षाचे परिशिष्ट - ब मध्ये केवळ १९०० चौ.मी. चेच देखभाल दाखविणे म्हणजे मागील वर्षाच्या देखभालीनंतर ११०० चौ.मी. कमी क्ष्ज्ञेत्र व २०० चौ.मी. नविन लागवडीचे क्षेत्र दर्शविलेले नाही. त्यामुळे रू.४७९१२/- खर्च निष्फळ ठरतो. तसेच शोभिवंत झाडे २५० देखभालीसाठी सन २००९-१० मध्ये न दर्शविता १२३ दर्शविली म्हणजेच रू.२०४५/- चा मागील वर्षाचा खर्च निष्फळ ठरतो. हेज लागवडीसाठी रू.९६१२/- खर्च झाला यात ४५० चौ.मी. क्षेत्र होते. नविन वर्षात ३१३.५० क्षेत्र दर्शविले. १३६.५० चौ.मी. कमी क्षेत्र दर्शवून मागील वर्षी झालेला खर्च रू.२९१५/- वसूलीस पात्र आहे. मोठी झाडे १६५ देखभालीवर रू.३५२४/- खर्च झाला. नविन वर्षात १०० झाडे दर्शविली म्हणजे ६५ झाडांवर झालेला खर्च रू.१३८६/- खर्च निष्फळ ठरतो. तसेच लॉन, हेज, शोभिवंत झाडे संख्या कमी होणे म्हणजेच महानगरपालिकेचे पूर्णत: नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्‍चित करणे योग्य.

८. साफसफाईचे क्षेत्र मागील वर्षाचे तुलनेत ११०० चौ.मी. ने वाढवून दर्शविले आहे. अंदाजपत्रकात क्षेत्रफळ दर्शविलेले नाही. एकूण क्षेत्रफळ कळविण्यात यावे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.२२,८३६/-, मुद्या क्र. ७ अन्वये रक्कम रू. ५४,२५८/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२६ : सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात एन-७ अयोध्यानगर उद्यानाचे १२ महिने संगोपन, देखभाल दुरुस्ती करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.७३०९७/-) (अदा रक्कम रू. ८८०४९/-)**

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात महानगरपालिका हद्यीतील एन-७ अयोध्यानगर उद्यान १२ महिने संगोपन, देखभाल कामे करणे बाबत अं.प.रक्कम ७३०९७/- तयार करण्यात आले असून सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/निविदा/०७/२००९, दिनांक १८.०८.२००९ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक २१.०८.२००९ पर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या दिनांक २४.०८.२००९ पर्यंत एकूण -१ निविदा दर भरून प्राप्त झाली. त्यानुसार प्रतिभा नर्सरी यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने असल्याने मंजूर करण्यात आली. जा.क्र.मनपा/उद्यान/८०७, दिनांक २६.१०.२००९ रोजी कार्योत्तर कार्यादेश देवून दिनांक ३१.८.२००९ ते दिनांक ३०.८.२०१० पर्यंतच्या कालावधी करीता कार्यादेश देण्यात आला. कार्यादेशावर पर्यावरण संवर्धन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. दिनांक १०.०३.२०१० रोजी मा.आयुक्त यांची मान्यता घेवून पुन्हा दिनांक १५.०२.२०११ पर्यंत जा.क्र.मनपा/उद्यान/७९०, दिनांक २१.३.२०११ रोजी मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आला.

संचिकेची तपासणी करतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. सिडको भागातील विविध उद्यानाचे १२ महिने संगोपन, देखभाल करण्यासाठी बचतगटाकडून जाहिर निविदा मागवून बचत गटांना काम देण्यासाठी परिच्छेद क्र.१९ अन्वये मा.आयुक्त यांची दिनांक १८.८.२००९ रोजी मंजूरी घेण्यात आली. परंतू काम देतांना खाजगी ठेकेदाराला देण्यात आले.

२. शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ नुसार निविदा अंतिम करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे निविदाची पूर्तता झालेली नाही.

३. प्रथम १२ महिने संगोपन करण्यासाठी रक्कम रू.६६२००/- अदा करण्यात आली. कार्योत्तर कार्यादेश देवून २ महिन्याची रक्कम रू.११०३/- जास्तीची अदा करण्यात आली. तद्‌नंतर पुन्हा कार्योत्तर कार्यादेश देवून रक्कम रू.२१८४९/- देयक अदा करण्यात आले. ही बाब आक्षेपार्ह आहे.

४. निविदा अटी व शर्ती ७ नुसार उद्यानासाठी वेळोवळी लागणारी माती, शेणखत अथवा उद्यानामध्ये विकास व देखभालीसाठी लागणारे साहित्य हे कंत्राटदाराने स्वखर्चाने आणावे असे अटी शर्ती मध्ये नमूद केलेले आहे. व परिशिष्ट -ब मध्ये सदरील माती व शेणखत याचे एकूण ८८३४/- अदा करण्यात आले आहे. परि-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकाशी ताळमेळ साधत नाही. तसेच परिशिष्ट-ब मध्ये सदरील
ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दर्शविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

५. कार्यादेश देण्यापूर्वी ठेकेदार यांचेकडून २% अनामत रक्कम रू.७३०९/- घेणे आवश्यक असतांना अनामत रक्कम घेतलेली नाही.

६. देयक १,२,३ देतांना १०% सुरक्षा ठेव म्हणून रक्कम रू.१९८६, ४६३४, २१८५ वसूल करणे आवश्यक असतांना वसूल केलेली नाही.

७. मोजमाप पुस्तिका क्रमांक २५८५ ,२५०६ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

८. संबंधित ठेकेदारांची निविदा अंदाजपत्रकानुसार असतांना पहिले व तिसरे देयकातून ५% कमी (below) वजावट करण्यात आले आहे. परंतू दुस-या देयकातून वजावट झालेली नाही.

९. निविदा अटी व शर्ती १३,१४,२१,२२,३८ ची पूर्तता केल्याचे दिसून येत नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मुद्दा क्र.३ अन्वये अदा रक्कम रू.२२९५२/- संबंधितांकडून वसूल करावी तसेच उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२७ :नांगरणी करून तण्याचा कुळव मारणे बाबत. (आयुर्वेदिक उद्यान कांचनवाडी ऑक्सीडेशन पॉण्ड) (अं.प.रक्कम रू.२४९०७/-)**

आयुर्वेदिक उद्यान कांचनवाडी ऑक्सीडेशन पॉण्ड येथे लागवड करण्यात आलेल्या फळ झाडामध्ये जंगली गवत व झुडपे फार मोठ्या प्रमाणात वाढल्याने झाडांची वाढ योग्य होत नसल्याने जा.क्र.मनपा/लेखा/२७०९, दिनांक ३०.११.२००९ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून A-१ निविदा मागविण्यात आल्या असता निविदा स्विकृतीच्या दिनांक ८.१२.२००९ पर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त

झाल्या. श्री.भगवान गडपे यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/९१८, दिनांक १८.१२.२००९ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. संचिका सादर करतांना दिनांक आवक/जावक क्रमांक दर्शविलेला नाही.

२. निविदेतील अट क्र. Clause ५४ क्र/वि.मा.स/१०९१/प्र.क्र./२८/९८, शासन हमी मंत्रालय मुंबई दिनांक १९.८.१९९८ नुसार १% विमा रक्कम रू.२४९/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेली नाही.

३. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ अन्वये १००/- रू.चा करारनामा करणे आवश्यक असतांना २० /- रु चा करारनामा करण्यात आला आहे.

४. उद्यान विभागास स्वतंत्र ट्रॅक्टर दिले असतांना सदरील काम हे खाजगी ठेकेदारामार्फत करण्यात आले आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. कंत्राटी कामाचा विमा रक्कम रू. २४९/- शासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी. इतर अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२८ : कोरियन जातीचे कारपेट लॉनचा पुरवठा करणे बाबत.**
**(अ.प.रक्कम रू.५,०००,००)(अदा रक्कम ४२४९१७/-)**

प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर अंतर्गत विविध उद्यानात कोरीयन जातीचे कारपेट लॉनचा पुरवठा विविध प्रकारचे फुलझाडे व शोभिवंत झाडे लावणे बाबत ई. टेंडर विभागा मार्फत व वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आली असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण -२ (दोन) निविदा प्राप्त झाल्या. सॅन इंटरप्राईजेस यांची दर ४.८२% कमी दराने असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/१३४ दिनांक २२.०२.२०१० रोजी पुरवठा कार्यादेश देण्यात आला.

संचिका तपासली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. सन २०१०-११ चे अर्थसंकल्पात spill कामाच्या यादीमध्ये तरतूद ठेवण्यात आलेली नसतांनाही संबंधिताचे देय रक्कम रू.४,२४,९१७/- दिनांक २९.११.२०१० रोजी अदा करण्यात आले आहे.
२. संचिकेतील पान क्रमांक ३ परिच्छेद क्रमांक १६,१७ अन्वये कामासाठी वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात विभागाने तरतूद करून घ्यावी. या अटीवर देयक अदा अदाई करण्यात आली. तर यासाठी विभागाने तरतूद केली आहे का याबाबत सविस्तर माहिती द्यावी.

३. शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ नुसार विधीग्राह्य ३ निविदा प्राप्त होणे आवश्यक असतांना २ निविदा प्राप्त झाल्या आहे.

४. कोरियन जातीचे लॉन, विविध प्रकारची फुलझाडे व शोभिवंत झाडे प्राप्त झाल्याबाबत साठा रजिस्टरला नोंद घेणे आवश्यक असतांना त्याबाबतचा संचिकेत उल्लेख नाही.
५. कार्यादेशातील माल प्राप्त झाल्याबाबत D.C. नाही.
६. साठा रजिस्टर, वितरण रजिस्टर, ताळेबंद रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.
७. मोजमाप पुस्तिका क्रमांक २५०६ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. मोजमाप पुस्तिका २५०६ उपलब्ध झालेली नसल्यामुळे लेखापरीक्षण करता आलेले नाही. तसेच स्टॉक रजिस्टर १०९,११० व १११ सुध्दा उपलब्ध झालेले नाहीत. करिता, पुढील लेखापरीक्षणा पूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२९ :सन २०१०-११ या आर्थिक वर्षात वेदांतनगर उद्यान व खुल्या जागेमधील झाडांना ड्रिप सिस्टीम बसविणे मध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रू.२४,९८२/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात वेदांतनगर उद्यान व खुल्या जागेमधील झाडांना ड्रिप सिस्टीम बसविणे करीता ए-१ निविदा मागविण्यात आल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेस ३ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी ०.१०% कमी दराची निविदा श्री.शांतीलाल चौंडीये यांची होती. एजन्सीने रू.१००/- च्या मुद्रांकावर करारनामा करून दिल्यानंतर उद्यान विभागाने जा.क्र.मनपा/उद्यान/६४७/११, दिनांक ३१.१.२०११ रोजी १० दिवसात काम पूर्ण करण्याचे कार्यादेश देण्यात आले. सदरील कामाचे completion certificate दिनांक ३०.३.२०११ रोजी काम पूर्ण झाल्याबाबत दिलेले आहे.

उपरोक्त प्रकरणी खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. कार्यादेशात नमूद कालावधीत काम पूर्ण झालेले नाही. विलंबाने काम पूर्ण केल्याबाबत दंड आकारलेला नाही.

२. शासकीय विमा निधीकडे कंत्राटी कामाचा विमा उतरविला नाही. तसेच देयकातून १% रक्कम कपात सुध्दा केलेली नाही.

३. संबंधित एजन्सीने केलेले कामे योग्य असल्याबाबत पर्यवेक्षण करणा-या अधिकारी / कर्मचारी यांचे प्रमाणपत्र तथा अभिप्राय संचिकेत नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. कंत्राटी कामाचा विमा सादर केलेला नसल्यामुळे १% विमा रक्कम कपात करुन शासनाकडे पाठविणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार विभागाने कार्यवाही करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३० : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात पंडित जवाहरलाल नेहरू, एन-८ येथील उद्यानाचे १२ महिने संगोपन देखभाल विकास यासाठी दिलेल्या कामातील अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रू.१,९०,९४८/- खर्च रू.१,९०,५७८/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात पंडित जवाहरलाल नेहरु एन-८ येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व विकास कामासाठी देण्यासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असता ५ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २५% कमी दराची निविदा डॉ.बाबासाहेब आंबेडकर महिला बचत गटाची होती. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७१०/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर दिनांक १५.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान / २६७/१२, दिनांक १८.६.२०१२ अन्वये देण्यात आली.

तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६२४/१२,दिनांक १०.१०.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर कार्यालयीन पत्र क्र. उद्यान/७९६/१२, दिनांक २०.१२.२०१२ नुसार १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अट क्र.६ मध्ये कंत्राटदारावर उद्यानाच्या चोवीस तास संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी दिली असतांनाही रू.७६२३०/- संबंधितांना वेगळे अदा करून मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. दिनांक १५.८.२०१२ ते १५.१०.२०१२ पर्यंत संचिकेत मुदतवाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसतांना सुध्दा उद्यान अधिक्षक यांनी आपल्या स्तरावर मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश निर्गमित केले. तसेच रू.१८०३९/- कंत्राटदारास अदा करून मनपाचे आर्थिक नुकसान केलेले आहे.

३. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात करणे बंधनकारक आहे. तथापि एकाही देयकातून कपात न करता रू.१९०५७/- चे मनपाचे आर्थिक नुकसान केले व मनपा निविदा अटी शर्तीचे पालन केलेले नाही.

४. शासनाचे ४% VAT TAX प्रत्येक देयकातून कपात केलेला नाही. रू.६२९९/- कपात न केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे.

५. कंत्राटी कामाचा विमा मुदतवाढीच्या देयकातून १% कपात केलेला नाही.

६. निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये उल्लेखित बाबींचे सक्षम पुरावे संचिकेत उपलब्ध नाहीत. म्हणजे अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.१ प्रमाणे रू.७६२३०/-, मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.१८०३९/-, मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रू.६२९९/- व मुद्या क्र. ५ अन्वये रक्कम रू.१९०९/-, संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३१ :सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-७ F सेक्टर सिडको उद्यान व संभाजी महाराज पुतळा ते कैलास शिल्प रस्ता दुभाजकाचे १२ महिने संगोपन, देखभाल व विकास करणे या कामातील संचिकेच्या तपासणीत आढळलेल्या अनियमितता. (अं.प.रक्कम रू.१,४६,००८/-)(अदा रक्कम १,७१,४१३/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-७ F , सेक्टर सिडको उद्यान व संभाजी महाराज पुतळा ते कैलास शिल्प रस्त दुभाजकाचे बारा महिने देखभाल, संगोपन व विकास कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत पाच निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २५.५५% कमी दराची पियुष नर्सरी या संस्थेची होती. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/६९७/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक १५.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ मनपा/उद्यान/२६२/१२, दिनांक १८.६.२०१२ नुसार देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५००/१२, दिनांक १.९.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत

मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/७९२/१२, दिनांक २०.१२.२०१२ नुसार १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. मे.पियुष नर्सरी यांचे दर २५.५५% कमी दराचे असल्यामुळे ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव २% अनामत रक्कम भरून घेणे आवश्यक असतांना रक्कम भरणा केलेंली नाही.

२. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ चा परवाना सन २००८-२०१० पर्यंत नुतनीकरण झालेला आहे.

३. देयक व मोजमाप पुस्तिकेवर ठेकेदार यांची स्वाक्षरी नाही.

४. करारनामा रू.१००/-च्या मुद्रांकावर करणे आवश्यक असतांना रू.५०/- च्या मुद्रांकावर करारनामा करण्यात आला आहे.

५. देयकातून खालील प्रमाणे १०% सुरक्षा ठेव वजावट करणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

| **देयक क्रमांक** | **रक्कम रू.** |
|---|---|
| १ | ३३३८/- |
| २ | ४१८४/- |
| ३ | २९२४/- |
| ४ | ३३४८/- |
| ५ | ३३४८/- |
| एकूण | **१७,१४२/-** |

६. देयकातून खालील प्रमाणे VAT ४% वजावट करणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

| **देयक क्रमांक** | **रक्कम रू.** |
|---|---|
| २. | १६७४/- |
| ३. | ११७०/- |
| ४. | १३३९/- |
| **एकूण** | **४,१८३/-** |

७. एन-७ अयोध्यानगर उद्यानाचे १२ महिने संगोपन, देखभाल ,विकासकामे करणे याचे परिशिष्ट - ब सन २००९-१० व २०१०-११ पाहिले असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

**सन २००९-२०१० (२८०० चौ.मी.)**

**परिशिष्ट - ब**

| अ.क्र. परि.ब नुसार | कामाचा तपशिल | संख्या | दर मनपा पाणी | प्रति चौ.मी. | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| २ | हिरवळ | १३३१ | १.६६ | चौ.मी. | २६५१४/- |
| ३ | शोभिवंत झाडे | १४० | १.७८ | नग | २९९०/- |
| ४ | हेज | १४७ | १.७८ | चौ.मी. | ३१४०/- |
| ५ | जागेची साफसफाई | ४८० | ०.८२ | चौ.मी. | ४७२३/- |
| १० | शोभिवंत झाडे लावणे | ३५ | ७५ | नग | २६२५/- |
| ११ | नविन बाड लागवड करणे | ३० | १४१ | चौ.मी. | ४२३०/- |
| १२ | फुलझाडे लावणे | २५ | ५५ | नग | १३७५/- |
| ०७ | मोठी झाडे | -- | -- | -- | -- |

**सन २०१०-२०११ (६५९० चौ.मी.)**

**परिशिष्ट - ब**

| अ.क्र. परि.ब नुसार | कामाचा तपशिल | संख्या | दर मनपा पाणी | प्रति चौ.मी. | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| २ | हिरवळ | -- | -- | -- | -- |
| ३ | शोभिवंत झाडे | ६२ | १.७८ | नग | १३२४/- |
| ४ | हेज | ३०० | १.७८ | चौ.मी. | ६४०८/- |
| ५ | जागेची साफसफाई | ४००० | ०.८२ | चौ.मी. | ३९३६०/- |
| ७ | मोठी झाडे | ७१ | १.७८ | नग | १५१६/- |

आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे परिशिष्ट - ब नुसार तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. **हिरवळ** : सन २००९-१० मध्ये उद्यानामध्ये १३३१ चौ.मी. हिरवळ असतांना सन २०१०-११ मध्ये परिशिष्ट - ब मध्ये निरंक दर्शविण्यात आले आहे. म्हणजेच हिरवळ वर केलेला खर्च १३३१ चौ.मी. x १.६६ x १७.५ = ३८,६६६/- हा निष्फळ खर्च केला असून सदरील खर्च संबंधितांकडून वसूल करणेस्तव पात्र आहे.

२. **शोभिवंत झाडे** : सन २००९-१० मध्ये एकूण संख्या १४० नविन झाडे ३५ असे एकूण १७५ शोभिवंत झाडे असतांना पुढील आर्थिक वर्षामध्ये एकूण झाडे ६२ दर्शविण्यात आले आहे. म्हणजेच ११३ झाडे कमी दर्शविलेली आहे म्हणजेच

७८ x १.७८x १७.५ = २४३०/-

३५ x ७५= २६२५/-

रक्कम रूपये ५०५५/- संबंधिताकडून वसूल करावे.

३. **<u>जागेची साफसफाई</u>** : सन २००९-१० मध्ये जागेची साफसफाई ४८० चौ.मी.असतांना सन २०१०-११ मध्ये ४००० चौ.मी.दर्शविण्यात आली आहे. म्हणजेच ३५२० चौ.मी.जास्तीचे दर्शविलेली आहे.

३५२० X ०.८२ X १७.५ = ५०५१२/- एवढा खर्च दर्शविण्यात आला आहे.

४. मोठी झाडे : सन २००९-१० मध्ये मोठी झाडे निरंक असतांना पुढील आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये ७१ झाडे दर्शविण्यात आली आहे.
म्हणजेच ७१ X१.७८ X १७.५ = रु.२२१२/- जास्तीचे देण्यात आले आहे.

८. निविदा अटी व शर्ती क्रमांक ६ नुसार कंत्राटदारावर उद्यानाच्या चोवीस तास संरक्षण व संवर्धानाची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. मात्र यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही. असे असतांना देयक अदा करतांना परिशिष्ट - ब अ.क्र.१५ वॉच ॲण्ड वॉर्ड असे दर्शवून २ X ३६३० X १२ = ८७१२०, १ X३६३०X८= २९०४०/- असे एकूण १,१६,१६०/- अदा करण्यात आले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

९. उद्यानाचे संगोपन, संरक्षण देखभाल / विकास कामे १२ महिने झाल्यानंतर पुन्हा निविदा न काढता ३ महिने कार्योत्तर मुदतवाढ असे २ वेळेस व पुन्हा २ महिने मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आला असून संबंधितांचे देयक अदा करतांना ४ महिन्याचे देयक असे करुन २ वेळेस ४ महिन्याचे देयक अदा करण्यात आले. परंतू शासन निर्णयाप्रमाणे विभागाने कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे २ महिन्याची जास्तीची रक्कम रु.१६७३८/- अदा केलेली आहे.

१०. निविदा अटी व शर्ती १३,१४,२२,३८ ची संचिकेत पूर्तता केलेली नाही.

११. उद्यानाचा नकाशा संचिकेत नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. ६ अन्वये रक्कम रु.४,१८३/-, मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रु.९६,४४५/-,मुद्या क्र.८ अन्वये रु.१,१६,१३०/-व मुद्या क्र.९ अन्वये रक्कम रु.१६,७३८/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३२ : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-१ उद्यान १२ महिने संगोपन, देखभाल व विकास करणे या कामातील संचिकेच्या तपासणीत आढळलेल्या अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रु.१,६१,०७१/-)(अदा रक्कम २,०४,३५५/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-१ , उद्यान बारा महिने देखभाल, संगोपन व विकास कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता चार निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २५% कमी दराची निविदा तक्षशिला महिला बचत गट यांची होती. संबंधित बचत गटास कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/७०७/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक १५.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. कार्यादेश क्र.

मनपा/उद्यान/२६४/१२, दिनांक १८.६.२०१२ नुसार देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६१८/१२, दिनांक १०.१०.२०१२ नुसार दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर कार्यालयीन पत्र क्र./उद्यान/८०९/१२, दिनांक २०.१२.२०१२ नुसार १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव रक्कम कपात करणे आवश्यक होते. परंतू खालील प्रमाणे रक्कम रु.२१०४४/- ची कपात झालेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

| अ.क्र. | देयक क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | १ | २४३१=०० |
| २ | २ | ५८७५=०० |
| ३ | ३ | ३९०४=०० |
| ४ | ४ | ९७६=०० |
| ५ | ५ | २९४७=०० |
| ६ | ६ | २९४७=०० |
| ७ | ७ | १९६४=०० |
| | एकूण | २१०४४=०० |

२. देयकातून ४% VAT TAX रक्कम कपात होणे आवश्यक असतांना दुस-या देयकातून रु.२३५०/- तिस-या देयकातून रु.१५६२/- चौथ्या देयकातून रु.३९०/-, पाचव्या देयकातून ११७९/- सहाव्या देयकातून रु.११७९/- असे एकूण रु.६६६०/- कपात केलेली नाही.

३. निविदा अटी शर्ती क्र.६ नुसार कंत्राटदारावर संवर्धन व संरक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. मात्र यासाठी मोबदला दिला जाणार नाही. असे असतांना अंदाजपत्रकात watch and ward ॲटमचा उल्लेख केलेला आहे. तसेच संबंधित कंत्राटदारास रक्कम रु.७२,६००/- अदा केले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

४. शासन नियम प्रमाणे निविदा मुदतवाढ देतांना ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी करीता मुदतवाढ देता येत नाही. सदरील प्रकरणी ८ महिन्याची मुदतवाढ देवून देयक अदा केलेले आहे.

५. उद्यान विभागाने दिनांक १५.८.२०१२ ते दिनांक १५.१०.२०१२ पर्यंत कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/८०६/२०१२ दिनांक २५.१२.२०१२ अन्वये निर्गमित केलेली मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश सक्षम प्राधिकरणाच्या मान्यताविना आहेत. तसेच त्या आधारे संबंधित गुत्तेदारास अदा केलेली रक्कम रु.१९६४२/- नियमबाह्य असून वसूलीस पात्र आहे.

६. सदरील उद्यानाचे परिशिष्ट - ब मध्ये उल्लेखित ॲटमच्या संख्येपेक्षा जास्त संख्या दर्शवून कंत्राटदारास रकमा अदा करून मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्याचा तपशील पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | कामाचा तपशिल | देयक अदा संख्या | परिशिष्ट ब नुसार संख्या | तफावत | दर प्रती माह | जादा रक्कम अदा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शोभिवंत झाडे | १७५ | १०० | ७५ | १.७८ | १६०२ |
| २ | हेज | ११४४ | ५९५ | ५४९ | १.७८ | ११७२७ |
| ३ | जागेची साफसफाई | ८२०० | ३५०० | ४७०० | ०.८२ | ४६२४८ |
| ४ | मोठी झाडे | १७५ | १२६ | ४९ | १.७८ | १०४७ |
| | | | | | **एकूण** | **६०६२४** |

## दिनांक १५.२.२०१२ ते दिनांक १५.५.२०१२ पर्यंतचे देयक

| अ.क्र. | कामाचा तपशिल | देयक अदा संख्या | परिशिष्ट ब नुसार संख्या | तफावत | दर प्रती माह | जादा रक्कम अदा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शोभिवंत झाडे | १७५ | १०० | ७५ | १.७८ | ४०० |
| २ | हेज | ११४० | ५९५ | ५४५ | १.७८ | २९१० |
| ३ | जागेची साफसफाई | ८२०० | ३५०० | ४७०० | ०.८२ | ११५६२ |
| ४ | मोठी झाडे | २२५ | १२६ | ९९ | १.७८ | ५२९ |
| | | | | | **एकूण** | **१५४०१** |

## दिनांक १५.५.२०१२ ते दिनांक १५.८.२०१२ पर्यंतचे देयक

| अ.क्र. | कामाचा तपशिल | देयक अदा संख्या | परिशिष्ट ब नुसार संख्या | तफावत | दर प्रती माह | जादा रक्कम अदा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शोभिवंत झाडे | १७५ | १०० | ७५ | १.७८ | ४०० |
| २ | हेज | ११४० | ५९५ | ५४५ | १.७८ | २९१० |
| ३ | जागेची साफसफाई | ८२०० | ३५०० | ४७०० | ०.८२ | ११५६२ |
| ४ | मोठी झाडे | २२५ | १२६ | ९९ | १.७८ | ५२९ |
| | | | | | **एकूण** | **१५४०१** |

३

## दिनांक १५.८.२०१२ ते दिनांक १५.१०.२०१२ पर्यंतचे देयक

| अ.क्र. | कामाचा तपशिल | देयक अदा संख्या | परिशिष्ट ब नुसार संख्या | तफावत | दर प्रती माह | जादा रक्कम अदा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शोभिवंत झाडे | १७५ | १०० | ७५ | १.७८ | २६७ |
| २ | हेज | ११४० | ५९५ | ५४५ | १.७८ | १९४० |
| ३ | जागेची साफसफाई | ८२०० | ३५०० | ४७०० | ०.८२ | ७७०८ |
| ४ | मोठी झाडे | २२५ | १२६ | ९९ | १.७८ | ३५२ |
| | | | | | **एकूण** | **१०२६७** |

करिता, उपरोक्त प्रमाणे परिशिष्ट -ब पेक्षा जादा अदा केलेली रक्कम रू.१,०१,६९३/- संबंधितांकडून वसूल करुन मनपा फंडात भरणा करण्यात यावी.

७. सन २००९-१० या वर्षातील परिशिष्ट -ब मध्ये समाविष्ट ॲटम चे क्षेत्र सन २०१०-११ या वर्षातील निविदेत समावेश केलेला नाही. त्यामुळे सन २००९-१० मध्ये झालेला खर्च निष्फळ ठरतो. तसेच कामे झाले किंवा नाही याबाबत साशंकता निर्माण होते. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

| **अ.क्र.** | **तपशिल** | **२००९-१० मधील संख्या** | **२०१०-११ मधील संख्या** | **तफावत** | **दर प्रती माह** | **निष्फळ अदा रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरवळ | १२०० | -- | १२०० | १.६६ | ३४८६०/- |
| २ | शोभिवंत झाडे लागवड | १५० | ३५ | ११५ | ७५ | ८६२५/- |
| ३ | हेज लागवड | १५० | -- | १५० | १४१ | २११५०/- |
| ४ | हेज | ७३६ | ५९५ | १४१ | १.७८ | ४३९२/- |
| ५ | जागेची सफाई | ४००० | ३५०० | ५०० | ०.८२ | ७१७५/- |
| ६ | फुलझाडे लावणे | १६० | -- | १६० | ५५ | ८८००/- |
| ७ | फ्लॉवर बेड तयार करणे | १२० | -- | १२० | १६० | १९२००/- |
| | | | | | **एकूण** | **१०४२०२/-** |

करीता रू.१,०४,२०२/- खर्च निष्फळ ठरतो व तो वसूलीस पात्र आहे.

८. निविदा अट क्र.१३, १४ मध्ये उल्लेख केलेल्या बाबी संबंधी देयक अदायगी पूर्वी पूर्तता केलेली नाही. त्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. २ अन्वये रक्कम रू.६६६०/-, मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.१९,६४२/- , मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रू.१,०१,६९३/- , मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रू.१,०४,२०२/-व संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३३ :सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-२, ५९० एल.आय.जी./एन-२, जे सेक्टर उद्यानाचे १२ महिने देखभाल दुरूस्ती व संगोपन करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू. २,५८,५६९/-)(खर्च रू.२,०१,६६८/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-२ ५९० एल.आय.जी./एन-२, जे सेक्टर उद्यानाचे बारा महिने संगोपन देखभाल दुरूस्ती व विकास कामासाठी दिनांक १०.१.२०११ रोजी दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या. दोन निविदापैकी २१% कमी दराची निविदा वैशाली महिला बचत गटाची आहे. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७०९/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश दिनांक १५.२.२०११ ते दिनांक १४.२.२०१२ पर्यंतचा कालावधी देण्यात आला. त्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/२७४, दिनांक १८.६.२०१२ अन्वये दिनांक १५.२.२०१२ ते १५.५.२०१२ पर्यंत कार्योत्तर मुदतवाढ दिली. तसेच कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/६२५, दिनांक १०.१०.२०१२ अन्वये दिनांक १५.५.२०१२ ते दिनांक १५.८.२०१२ पर्यंत कार्योत्तर मुदतवाढ देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/८०३/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये दिनांक १५.१०.२०१२ पर्यंत २ महिने मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश दिलेले आहेत. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. देयकातून ४% VAT रक्कम रू.८०६५/- कपात केलेली नाही.

३. निविदा अट १३ व १४ मध्ये नमूद बाबीं संबंधी सक्षम पुरावे सादर केलेले नाहीत.

४. मा.आयुक्त यांनी मुदतवाढ देतांना विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करण्याचे अभिप्राय संबंधित संचिकेच्या परिच्छेद (६८) मध्ये नमूद आहे. त्यानुसार कार्यवाही काय केली याचा बोध होत नाही.

५. सन २००९-१० मध्ये परिशिष्ट 'ब' मध्ये उल्लेखीत ॲटम सन २०१०-११ या वर्षातील निविदेत समाविष्ट नाहीत म्हणजे सदरील उद्यानातील नविन वर्षात समावेश नसलेले ॲटम नष्ट झाले असा होतो आणि त्यावर झालेला खर्च निष्फळ ठरतो. असा बाबींचा तक्ता पुढील प्रमाणे -

| अ. क्र. | तपशिल | सन २००९-१० मधील क्षेत्र | सन २०१०-११ मधील क्षेत्र | तफावत क्षेत्र | दर | निष्फळ अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरवळ | १९०० | १६८० | २२० | २.६० | १००१०/- |
| २ | शोभिवंत झाडे | १२३ | -- | १२३ | २.६० | ५५९७/- |
| ३ | हेज लागवड | ९० | १०.५० | ७९.५ | १४१ | ११२१०/- |
| ४ | फुलझाडे लावणे | १२० | -- | १२० | ५५ | ६६००/- |
| ५ | शोभिवंत झाडे लागवड | १४० | -- | १४० | ७५ | १०५००/- |
| | | | | | **एकूण** | **४३,९१७/-** |

उपरोक्त निष्फळ खर्च वसूलीस पात्र आहे.

६. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/८०३/२०१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ ते १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढीचे कार्योत्तर आदेश उद्यान अधिक्षक यांचे स्वाक्षरीने निर्गमित आहेत. तथापि मुदतवाढीबाबत सक्षम प्राधिकरणाची मान्यता संचिकेत नाही.

७. निविदा अट क्र.६ अन्वये कंत्राटदारावर उद्यानाच्या चोविस तास संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. मात्र यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही असे नमूद असतांना वॉच ॲन्ड वॉर्ड करीता अंदाजपत्रकात रकमेचा समावेश करून रू.१,१२,५३०/- देयकातून अदा केलेली आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. २ अन्वये रक्कम रू.८,०६५/-, मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.२,५८६/-, मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.४३,९१७/- व मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रू. १,१२,५३०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३४ :सन २०१०-११ या आर्थिक वर्षात टाऊन सेंटर, एन-१ उद्यान व १२ महिने संगोपन, देखभाल व विकास करणे या कामातील संचिकेच्या तपासणीत आढळलेल्या अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रू.१,१०,७६७/-) (खर्च रू.१,१८,६४०/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात टाऊन सेंटर एन-१ उद्यानाचे १२ महिने दुरुस्ती, देखभाल, संगोपन, कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता पाच निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी २७.५% कमी दराची शिवम नर्सरी यांची होती. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७००/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक १५.६.२०१२ पर्यंत मुदतवाढ जा.क्र.मनपा/उद्यान/२७५/१२, दिनांक १८.६.२०१२ अन्वये देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५०४/१२, दिनांक १.९.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर जा.क्र.मनपा/उद्यान/८०४/१२, दिनांक २०.१२.२०१२ नुसार दिनांक १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. कार्यादेश देण्यापूर्वी २% ठेव रू.२२१५/- व अतिरिक्त ५% ठेव रू.५५३८/- मनपा फंडात जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. देयक अदायगी पूर्वी निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये उल्लेखित बाबी संबंधी सक्षम पुरावे संचिकेत लावलेले नाही. निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

३. देयकातून ४% VAT TAX ची कपात देयक क्र.२,३,४ मधून एकूण रू.३२०६/- करण्यात आलेली नाही.

४. निविदा अट क्र.६ मध्ये कंत्राटदारावर २४ तास उद्यानाच्या संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. मात्र यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही. असे असतांना

सुध्दा संबंधित कंत्राटदारांना watch and ward या ॲटम नुसार रु.७२६००/- रक्कम अदा केलेली आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

५. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात करणे बंधनकारक असतांना एकाही देयकातून १०% कपात झालेली नाही, एकूण रु.११८६४/- रक्कम कपात न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. शासकीय नियमानुसार ६ महिन्याच्या कालावधी पर्यंतच मुदतवाढ ग्राह्य धरली जाते. सदरील प्रकरणी ८ महिने मुदतवाढ दिलेली असून २ महिन्याचे रु.११०९७/- खर्च वसूलीस पात्र आहे.

७. सन २००९-१० या वर्षाची सदरील उद्यानाची देखभालीची संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध झाली नसल्यामुळे ताळमेळ घेता आला नाही.

८. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. ३ अन्वये रक्कम रु. ३२०६/-, मुद्या क्र.४ अन्वये रु.७२६००/- व मुद्या क्र.६ अन्वये रक्कम रु.११०९७/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३५ : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात अलंकार/अशोकनगर/भगवती कॉलनी उद्यान व रस्ता दुभाजकाचे १२ महिने संगोपन, देखभाल व विकास करणे या कामातील संचिकेच्या तपासणीत आढळलेल्या अनियमिततेबाबत. (अं.प.रक्कम रु.२,४३,४८०/-)(अदा रक्कम ३,२२,५२१/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात अलंकार/अशोकनगर/भगवती कॉलनी, उद्यान व रस्ता दुभाजकाचे १२ महिने दुरुस्ती, देखभाल, संगोपन, कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ अन्वये प्रसिध्द करण्यात आली असता तीन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी १% कमी दराची पियुष नर्सरी यांची होती. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६९६/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक १५.६.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्यादेश जा.क्र.मनपा /उद्यान / २७३/१२,दिनांक १८.६.२०१२ नुसार देण्यात आले. कार्यालयीन पत्र क्र.मनपा / उद्यान/४९९/१२, दिनांक १.९.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर दिनांक १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/८०२/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये देण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. आर्थिक वर्ष २००९-१० ची संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे परिशिष्ट - ब चा ताळेबंद घेता आला नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ अन्वये रु.१००/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना रु.५०/- च्या मुद्रांकावर करारनामा करण्यात आला आहे.

३. shop act नोंदणी २००८-१० पर्यंत असल्याचे संचिकेवरुन दिसून आले.

४. संचिकेत स्थळ दर्शक नकाशा नाही.

५. १०% सुरक्षा ठेव देयकातून वजावट होणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

१. ४७३१/-
२. ११९८५/-
३. ६३०९/-
४. ५०१२/-
५. ५०१२/-
**एकूण ३२२४९/-**

६. देयकातून ४% VAT वजावट होणे आवश्यक असतांना वजावट झालेला नाही.

| देयक क्रमांक | रक्कम रु. |
|---|---|
| २ | ४४७४/- |
| ३ | २५२४/- |
| ४ | २००५/- |
| **एकूण** | **९००३/-** |

७. देयकावर, मोजमाप पुस्तिकेवर ठेकेदाराची स्वाक्षरी नाही.

८. विमा रक्कम रु.२४३५/- वजावट करणे आवश्यक असतांना मोजमाप पुस्तिकेवर वजावट झालेले नाही.

९. आर्थिक वर्ष २०१०-११ चे १२ महिन्याचे परिशिष्ट - ब व मुदतवाढ दिलेले ३ महिन्याचे परिशिष्ट चा ताळेबंद पाहिला असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

**परिशिष्ट - ब**
**सन २०१०-११ (१२ महिने)**

| अ.क्र. (परि.ब नुसार) | तपशिल | संख्या | दर (मनपा पाणी) | प्रती | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | शोभिवंत झाडे | ५० | १.७८ | चौ.मी. | १२ | १०६८/- |
| ७ | मोठी झाडे | १२० | १.७८ | नग | १२ | २५६३/- |
| ११ | शोभिवंत झाडे लावणे (नविन) | २१० | १३९ | नग | १२ | २९,१९०/- |
| १५ | मोठी झाडे लागवड | १०० | २३१ | नग | १२ | २३,१००/- |

**परिशिष्ट - ब**

**सन २०१०-११ (३ महिने)**

| अ.क्र. (परि.ब नुसार) | तपशिल | संख्या | दर (मनपा पाणी) | प्रती | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | शोभिवंत झाडे | १९० | १.७८ | नग | ३ | १०१५ |
| ७ | मोठी झाडे | १८० | १.७८ | नग | ३ | ९६१ |

१) **<u>शोभिवंत झाडे</u>** : सन २०१०-११ मध्ये परिशिष्ट - ब नुसार १२ महिने देखभाल, दुरुस्ती संगोपन करतांना शोभिवंत झाडे ५० नविन लावणे, २१० असे एकूण २६० शोभिवंत झाडे असतांना पुढील ३ महिन्याच्या -ब परिशिष्ट मध्ये १९० झाडे दर्शविण्यात आले आहे. म्हणजेच ७० झाडे दर्शविलेले नाही. ७०x१३९=९७३०/- वसूलीस पात्र आहे.

२) **<u>मोठी झाडे</u>** : सन २०१०-११ मध्ये परिशिष्ट -ब नुसार १२ महिने देखभाल, दुरुस्ती संगोपन करतांना मोठी झाडे १२० नविन लागवड १०० असे एकूण २२० असतांना १८० एवढेच दर्शविण्यात आले आहे म्हणजेच ४० झाडे कमी दर्शविलेले आहे. ४०x२३१= ९२४० एवढी वसूली संबंधिताकडून करणे आवश्यक आहे.

१०. अलंकार/ अशोकनगर /भगवती कॉलनी उद्यान व रस्ता दुभाजकाचे १२ महिने देखभाल दुरुस्ती/ संगोपन करणे साठी आदेश काढण्यात आले व त्यानंतर ३ महिन्याची २ वेळेस मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आले व पुन्हा २ महिन्यासाठी मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आला. परंतू २ महिन्यासाठी मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आला आहे तो नियमबाह्य असल्याने झालेला खर्च रक्कम रु.२५०६४/- वसूलीस पात्र आहे.

११. निविदा अटी व शर्ती १३,१४,२१,२२,३८ ची पूर्तता झालेली नाही.

१२. निविदा अटी /शर्ती ६ कंत्राटदारावर उद्यानाच्या चोवीस तास संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. मात्र यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही असे असतांना परिशिष्ट - ब अ.क्र.१७ वॉच ॲण्ड वॉर्ड २x३६३०x१२=८७१२०, १x३६३०x८=२९०४० असे एकूण १,१६,१६०/- अदा करण्यात आले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. ६ अन्वये रक्कम रु. ९००३/-, मुद्या क्र.८ अन्वये रक्कम रु.२,४३५/-, मुद्या क्र.९ अन्वये रक्कम रु.१८,९७०/-, मुद्या क्र.१० अन्वये रक्कम रु. २५,०६४/- व मुद्या क्र.१२ अन्वये रु.१,१६,१६०/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३६ : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात ११ वी योजना B,C व E/ १२ वी योजना उद्यानाचे १२ महिने संगोपन, देखभाल व विकास करणे या कामातील संचिकेच्या तपासणीत आढळलेल्या अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रू.१,५६,८९६/-)(अदा रक्कम १,१०,५२७/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात ११ वी योजना B,C व E / १२ वी योजना येथील उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व विकास कामे करण्यासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असता पाच निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत पाच निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी २५% कमी दराची निविदा पंचशिल महिला बचत गटाची आहे. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/७०५/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आला. त्यानंतर दिनांक १५.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्यादेश जा.क्र.मनपा /उद्यान / २७१ /१२,दिनांक १८.६.२०१२ अन्वये देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान /६२१/१२, दिनांक १०.१०.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदवाढीचे कार्योत्तर कार्यादेश दिलेले आहे. तसेच जा.क्र.मनपा/ उद्यान / ८०० /२०१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ ते १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश दिलेले आहेत.

संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अट क्र.६ प्रमाणे उद्यान संरक्षण व संवर्धन करणे करीता उद्यान विभागाने संबंधित गुत्तेदारास रू.६५,३४०/- अदा केलेले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

२. दिनांक १५.५.२०१२ ते १५.८.२०१२ या तीन महिन्याचे कालावधी करीता रू.२२,१४१/- रक्कम अदा केली. जेव्हा रू.२१,८२०/- अदा करावयास पाहिजे होती. रू.३२१/- जास्तीची अदा रक्कम वसूल व्हावी.

३. देयकातून VAT TAX कपात करणे बंधनकारक असतांना पाच देयकातून रू.४०९३/- कपात केलेली नाही.

४. निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये नमूद बाबी संबंधी सक्षम पुरावे संचिकेत सादर केलेले नाहीत. तरीसुध्दा देयक अदा करुन निविदा अटी शर्तीचे पालन केलेले नाही.

५. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात करणे बंधनकारक असतांना सहा देयकातून रू.११०५३/- रक्कम कपात न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा अटी व शर्तीचे पालन करण्यास उद्यान विभाग असमर्थ ठरला आहे.

६. शासनाचे नियमाप्रमाणे ६ महिने मुदतवाढ विधीग्राह्य ठरल्या जाते, तथापि संचिकेत ८ महिने मुदतवाढ देवून २ महिने अतिरिक्त कालावधीचा खर्च रू.१०९११/- अदा करणे अयोग्य आहे. देयक अदा करण्यासाठी संचिकेत टिपणी सादर आहे.

७. सन २००९-१० या वर्षातील सदरील उद्यानाची संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नसल्यामुळे ताळमेळ घेता आला नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. १ अन्वये रू.६५,३४०/-, मुद्या क्र. २ अन्वये रक्कम रू. ३२१/-, मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू.४०९३/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३७ : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-९ वाहतूक उद्यान / एन-११ स्मशानभूमीचे १२ महिने संगोपन, देखभाल व विकास करणे या कामातील संचिकेच्या तपासणीत आढळलेल्या अनियमिततेबाबत.**
**(अं.प.रक्कम रू.३,२०,८६८/-)(अदा रक्कम ३,२४,९१५/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-९ , वाहतूक उद्यान/ एन-११ स्मशानभूमीचे बारा महिने देखभाल, संगोपन व विकास कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ अन्वये प्रसिध्द करण्यात आली असता सहा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २९% कमी दराची पल्लवांकुर नर्सरी या संस्थेची होती. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/७०२/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक १५.६.२०१२ पर्यंत मुदतवाढ मनपा/उद्यान/२६३/१२, दिनांक १८.६.२०१२ नुसार देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५०३/१२, दिनांक १.९.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर कार्यालयीन पत्र क्र./उद्यान/७९३/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा कार्यादेश देण्यापूर्वी २% रक्कम रू.६४१७/- मनपा फंडात भरणा केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

२. निविदा अट क्र.६ नुसार सदरील उद्यानाचे संरक्षण व संवर्धन कंत्राटदाराकडे आहे. मनपातर्फे रू.१,३०,६८०/- अदा केले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

३. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात केलेली नाही. एकूण ५ देयकाप्रमाणे रू.३२४९१/- कपात केलेली नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

४. ३ देयकात रू.८८०२/- VAT TAX कपात झालेली नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

५. शासकीय नियमाप्रमाणे ६ महिन्यापर्यंत मुदतवाढ देय आहे. तथापि २ महिने जास्तीच्या मुदतवाढीचा खर्च रू.२७०७५/- अमान्य करण्यात येतो.

६. निविदा अट क्र.१३ व १४ प्रमाणे उल्लेखित बाबी संबंधी सक्षम पुरावे संचिकेत उपलब्ध नाही.

७. सन २००९-१० या वर्षात सदरील उद्यानावर झालेला खर्चाचे ॲटमच्या संख्येत तफावत झालेली असून सन २०१०-११ च्या निविदेमध्ये उल्लेख केलेल्या संख्येनुसार झालेला खर्च निष्फळ ठरतो. दोन्ही वर्षातील ॲटम निहाय तफावतीचा खर्चाबाबत खालील प्रमाणे तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | तपशिल | सन २०१०-११ मधील संख्या | सन २००९-१० मधील संख्या | तफावत संख्या | दर | निष्फळ खर्च (१७-५ महिने ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरवळ | ३७१४ | ३८५० | १३६ | १.६६ | ३९५१ |
| २ | शोभिवंत झाडे | ११३ | १२० | ०७ | १.७८ | २१८ |
| ३ | मोठी झाडे | २०० | २६१ | ६१ | १.७८ | १९०० |
| ४ | शोभिवंत झाडे लागवड | -- | २२५ | २२५ | ७५.०० | १६८७५ |
| ५ | हेज | ९१३ | ९६५ | ५२ | १४१.०० | ७३३२ |
| ६ | फुलझाडे लावणे | -- | ५० | ५० | ५५.०० | २७५० |
| ७ | फ्लॉवर बेड तयार करणे | -- | ६० | ६० | १६०.०० | ९६०० |
| | | | | | **एकूण** | **४२६२६/-** |

उपरोक्त रू.४२६२६/- खर्च निष्फळ ठरतो व तो वसूलीस पात्र आहे.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रू.१,३०,६८०/-, मुद्या क्र. ४ अन्वये रक्कम रू. ८८०२/-, मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.२७०७५/- व मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रू.४२,६२६/-, संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३८ : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-२ B,C,D सेक्टर उद्यानाचे १२ महिने संगोपन, देखभाल व विकास करणे या कामातील संचिकेच्या तपासणीत आढळलेल्या अनियमितता.(अं.प.रक्कम रू.१,२३,१४३/-)(अदा रक्कम १,३४,५२३/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-२ B,C व D सेक्टर उद्यानाचे बारा महिने देखभाल, संगोपन व विकास कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ अन्वये प्रसिध्द करण्यात आली असता एक निविदा विक्री झाली. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदेचा दर १३% कमी दराची सुंदर कन्स्ट्रक्शन यांची होती. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/७२६/११, दिनांक २२.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/२७९/२०१२, दिनांक १८.६.२०१२ अन्वये मुदतवाढ दिनांक २३.५.२०१२ पर्यंत देण्यात आली. त्यानंतर दिनांक २२.८.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/५०६/१२, दिनांक

२.९.२०१२ अन्वये देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/८०८/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये दिनांक २०.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. संचिका तपासणी करतांना खालील त्रुटी निदशर्नास आल्या.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन केलेले नाही.

२. निविदा अट क्र.६ अन्वये उद्यान संवर्धन संरक्षणाची जबाबदारी कंत्राटदाराची आहे. तरीसुध्दा रू.७२,६००/- कंत्राटदारास अदा केले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

३. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात होणे क्रमप्राप्त होते. तथापि सदरील प्रकरणी रू.१३,४५२/- रकमेची कपात देयकातून केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

४. सन २००९-१० मधील सदरील उद्यानाची संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध न झाल्यामुळे मागील वर्षाचा ताळमेळ घेता आला नाही.

५. निविदा अट क्र.१३ व १४ मधील बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत उपलब्ध नाहीत.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मुद्या क्र.२ अन्वये रू.७२६००/- संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३९ :सिध्दार्थ उद्यानातील विविध कामांच्या संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देणे बाबत.**

लेखापरीक्षणासाठी सिध्दार्थ उद्यानातील सन २००६ ते सन २०१३ या वर्षातील विविध कामांच्या संचिका त्वरीत उपलब्ध करुन द्याव्यात.

| अ. क्र | वर्ष | कामाचे नांव | अं.प.रक्कम रूपये | टेंडर नं. |
|---|---|---|---|---|
| १ | २००९ | सिध्दार्थ उद्यान येथील रोपवाटिका , पॉलीहाऊस दुरूस्ती व सुधारण करणे बाबत. (ठेकेदाराने ग्रिन हाऊस व पॉली हाऊसच्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) | ३,३५,७९०/- | २४-०९-०५ |
| २ | २०१० | सिध्दार्थ उद्यानातील लॉन, बाडी, शोभिवंत झाडे, फुलझाडे लावणे व पाण्याची व्यवस्था करणे आणि खेळणी बसविणे बाबत. | ४,७५,६४५/- | २४-१०-०८ |
| ३ | २००७ | लाकडी ट्रि गार्ड पुरवठा करणे बाबत. | ४,५०,०००/- | २४-०७-०३ |
| ४ | २०१२ | रोड साईट व उद्यानामध्ये लागवड करण्यासाठी झाडांची रोपे खरेदी करणे बाबत. (चौथी वेळ) | ४,९८,७५०/- | २४-१२-०३-A |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | २०१२ | रबर पाईप खरेदी करणे (एक इंच) (I.S.I. Mark) | २,१२,५००/- | २४-१२-०७ |
| ६ | २०१२ | रोड राईट व रस्ता दुभाजकामध्ये लागवडीसाठी ५ ते ६ फुटा पेक्षा जास्त उंचीची झाडांची रोपे खरेदी करणे बाबत. | ९,९९,२००/- | २४-१२-१७ |
| ७ | २०१२ | वृक्षसंवर्धन पिंजरे पुरवठा करणे बाबत. | ९,५५,२९५/- | २४-१२-१८ |
| ८ | २०१३ | मिनीट्रेन प्लांट सिध्दार्थ उद्यान येथे पाथवेच्या बाजूने ग्रील बसविणे बाबत. | ४,९९,६५३/- | २४-१३-४५ |
| ९ | २०१३ | वृक्षसंवर्धन लोखंडी जाळ्या खरेदी करणे बाबत. | ८,६८,४५०/- | २४-१३-४७ |

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. तसेच उपरोक्त संचिका लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून दिलेल्या नाही, त्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही. पुढील लेखापरीक्षणा पूर्वी संचिका उपलब्ध कराव्यात. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४० :सन २०१०-२०११ या वर्षात सलीम अली सरोवर उद्यान व मनपा जॉगिंग ट्रॅक चे १२ महिने देखभाल, दुरूस्ती संगोपन करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम .२,५४,२६९/-)(खर्च रू. २,९३,५०२/-)**

सन २०१०-२०११ या वर्षात सलीम अली सरोवर उद्यान व मनपा जॉगिंग ट्रॅकचे १२ महिने देखभाल दुरुस्ती, संगोपन करणे बाबत जा.क्र.मनपा/प.स.वि/६०३, दिनांक १०.०१.२०११ रोजी दैनिक लोकविजय, दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या.

पंचशिल महिला बचतगट यांची तुलनात्मक दृष्ट्या २३% कमी दराची निविदा असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/७०६, दिनांक १५.२.२०११ अन्वये दिनांक १५.२.२०११ ते दिनांक १४.२.२०१२ कालावधी करीता कार्यादेश देण्यात आला. जा.क्र.मनपा/उद्यान/२६६ / १८.६.२०१२ रोजी दिनांक १५.२.२०१२ ते १५.५.२०१२ पर्यंत मा.आयुक्त यांची दिनांक २९.५.२०१२ च्या मंजूरी अन्वये ३ महिन्याची कार्योत्तर कार्यादेश देण्यात आला. त्यानंतर जा.क्र.मनपा/उद्यान/६२०, दिनांक १०.१०.२०१२ रोजी दिनांक १५.५.२०१२ ते १५.८.२०१२ पर्यंत कार्योत्तर मुदतवाढ देण्यात आली. व पुन्हा जा.क्र.मनपा/उद्यान/७९५, दिनांक २०.१२.२०१२ रोजी १५.८.२०१२ ते १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आला. परंतू यास सक्षम अधिकारी यांची मंजूरी नाही. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक १.९.२००९ ते १४.२.२०११ या कालावधीत सलीम अली सरोवर उद्यानाचे देखभाल, संगोपन व विकास कामे कोणी केली याबाबत माहिती द्यावी.

२. २००८-०९ या कालावधीत खाजगी ठेकेदारामार्फत संगोपन, संरक्षण देखभाल विकास कामे करतांना उद्यानाचे क्षेत्रफळ २९००० चौ.मी. दर्शविले आहे. सन २०१०-११ या कालावधीत ११८०८ चौ.मी. दर्शविलेले आहे.

३. सन २००८-०९ परिशिष्ट - ब नुसार असलेला तपशिल खालील प्रमाणे -

| अ.क्र. (प.ब नुसार) | तपशिल | संख्या | दर (मनपा पाणी) | प्रति | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | हिरवळ | ९००० | १.६६ | चौ.मी. | १२ | १७९२८०/- |
| ३ | शोभिवंत झाडे | ५०० | १.७८ | चौ.मी. | १२ | १०६८०/- |
| ४ | हेज | ४१८ | १.७८ | चौ.मी. | १२ | ८९२८/- |
| ५ | जागेची साफसफाई | २००० | ०.८२ | चौ.मी. | १२ | १९६८०/- |
| ६ | फुलांचे ताटवे | १०० | १.६६ | चौ.मी. | १२ | १९९२/- |
| ७ | मोठी झाडे | ३५० | १.७८ | नग | १२ | ७४७६/- |
| १२ | शोभिवंत झाडे (नविन) | १५० | ८० | नग | १२ | १२०००/- |

2

**सन २०१०-२०११ परिशिष्ट - ब नुसार असलेला तपशिल.**

| अ.क्र. (प.ब नुसार) | तपशिल | संख्या | दर (मनपा पाणी) | प्रति | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | हिरवळ | ४२०० | १.६६ | चौ.मी. | १२ | ८३६६४/- |
| ३ | शोभिवंत झाडे | ७५ | १.७८ | चौ.मी. | १२ | १६०२/- |
| ४ | हेज | ६५० | १.७८ | चौ.मी. | १२ | १३८८४/- |
| ५ | जागेची साफसफाई | ६६५० | ०.८२ | चौ.मी. | १२ | ६५४३६/- |
| ६ | फुलाचे ताटवे | -- | -- | -- | -- | -- |
| ७ | मोठी झाडे | १२० | १.७८ | नग | १२ | २५६३/- |

सन २००८-०९ परिशिष्ट - ब व सन २०१०-११ परिशिष्ट -ब मध्ये दर्शविलेल्या कामाच्या तपशिलामध्ये फार मोठ्या प्रमाणात फरक दर्शविलेला आहे.

१. **हिरवळ :** सन २००८-०९ मध्ये ९००० चौ.मी.असतांना सन २०१०-११ मध्ये ४२०० चौ.मी. दर्शविलेली आहे.

२. **शोभिवंत झाडे :** २००८-०९ मध्ये ६५० नग असतांना सन २०१०-११ मध्ये ७५ नग दर्शविलेले आहे. म्हणजेच ५७५ नग कमी दर्शविलेले आहे.

३. **जागेची साफसफाई :**२००८-०९ मध्ये २००० चौ.मी. असतांना सन २०१०-११ मध्ये ६६५० दर्शविलेली आहे. म्हणजेच ४६५० चौ.मी.जास्तीचे दर्शविलेले आहे.

४. **<u>फुलांचे ताटवे</u> :** २००८-०९ मध्ये १०० असतांना सन २०१०-११ मध्ये निरंक आहे.

५. **<u>मोठी झाडे</u> :** सन २००८-०९ मध्ये ३५० असतांना सन २०१०-११ मध्ये १२० दर्शविलेली आहे. देयक अदा करतांना १८८ नग दर्शवून देयक अदा करण्यात आले.

याबाबत विभागाने खातरजमा करुन फरक रक्कम संबंधितांकडून वसूल करावी.

४. निविदा अटी व शर्ती क्रमांक ०६ नुसार कंत्राटदारावर उद्यानाच्या चोवीस तास संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. मात्र यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही असे स्पष्ट दर्शविलेले असतांना संबंधित ठेकेदारास परिशिष्ट ब अ.क्र.१६ वॉच ॲण्ड वॉर्ड ३६३० प्र.युनिट प्रमाणे १२ महिने साठी संगोपन २ प्रमाणे रक्कम रू.८७१२०/- ८ महिन्याची ५८०८०/- असे एकूण १४५२००/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

५. जा.क्र.मनपा/उद्यान/७०६, दिनांक १५.२.२०११ अन्वये दिनांक १५.२.२०११ दिनांक १४.२.२०१२ या १२ महिने कालावधीसाठी कार्यादेश देण्यापूर्वी रू.१००/- च्या मुद्रांकावर करारनामा करण्यात आला. परंतू तद्नंतर निविदा न काढता तीन महिन्याचे दोन वेळेस मुदतवाढ व २ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली असतांना करारनामा केलेला नाही.

६. जा.क्र.मनपा/उद्यान/७९५, दिनांक २०.१२.२०१२ दिनांक १५.८.२०१२ ते १५.१०.२०१२ या दोन महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली. त्यास सक्षम अधिकारी यांची मंजूरी नाही. परंतू मोजमाप पुस्तिका क्रमांक २७०८ पान क्र.९१ वर त्याची नोंद घेवून रक्कम रू.३३८९८/- चे देयक मंजूरीस्तव सादर करण्यात आले आहे.

७. १०% सुरक्षा ठेव प्रत्येक देयकातून वजावट होणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

| | | |
|---|---|---|
| १) | - | ३९५७/- |
| २) | - | ७०७२/- |
| ३) | - | ६५५४/- |
| ४) | - | १५९८/- |
| ५) | - | ५०८५/- |
| ६) | - | <u>५०८५/-</u> |
| एकूण | | **<u>२९,३५१/-</u>** |

८. ४% VAT वजावट होणे आवश्यक असतांना VAT वजा करण्यात आला नाही.

| | | |
|---|---|---|
| १) | - | १५८२/- |
| २) | - | २८२९/- |
| ३) | - | २६२२/- |
| ४) | - | ६३९/- |
| ५) | - | २०३४/- |
| ६) | - | <u>२०३४/-</u> |
| एकूण | | **<u>११,७४०/-</u>** |

९. १२ महिने देखभाल दुरुस्ती संगोपन केल्यानंतर निविदा न काढता ३ महिन्याची २ वेळेस मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतू १% विमा रक्कम रू.२५४३/-, २५४३/-, असे एकूण ५०८६/- वजावट करणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. ३ अन्वये रक्कम रू. १६३५०४/-, मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रू. १,४५,२००/- , मुद्या क्र.८ अन्वये रक्कम रू.११,७४०/-, व मुद्या क्र.९ अन्वये रक्कम रू.५०८६/-, संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४१ :सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-६ , एम-२ उद्यान बारा महिने देखभाल, दुरूस्ती व संगोपन करणे यासाठी दिलेल्या कामातील अनियमिततेबाबत. (अं.प.रक्कम .१,३९,२४०/-)(खर्च रू. १,५५,३१६/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-६, एम-२ उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल दुरुस्ती कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ५ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत पाच निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २५.५५% कमी दराची निविदा पियुष नर्सरी या संस्थेची होती. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६९९/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक १५.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ मनपा/उद्यान/२६५/१२, दिनांक १८.६.२०१२ नुसार देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५०२/१२, दिनांक १.९.२०१२ नुसार दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७९४/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये दिनांक १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. २००९-१० या वर्षातील संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे परिशिष्ट - ब चा ताळेबंद घेता आला नाही.

२. पियुष नर्सरी यांचे दर २५.५५% कमी दराने असल्याने ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव व २% अनामत रक्कम घेणे आवश्यक होते. परंतू संबंधितांकडून रक्कम वसूल केलेली नाही.

३. अटी शर्ती नियम ६ नुसार कंत्राटदारास उद्यानाच्या चोवीस तास संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. मात्र यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही असे असतांना परिशिष्ट - ब मध्ये अ.क्र.१६ वॉच ॲण्ड वॉर्ड असे दर्शवून रक्कम रू.७२,६००/- अदा करण्यात आले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

| **संख्या** | **दर** | **प्रति** | **महिने** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | ३६३० | प्र.युनिट | १२ | ४३,५६०/- |
| १ | ३६३० | प्र.युनिट | ०४ | १४,५२०/- |
| १ | ३६३० | प्र.युनिट | ०४ | १४,५२०/- |
| | | | | **७२,६००/-** |

४. १०% सुरक्षा ठेव वजावट करणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

| देयक क्र. | रक्कम रू. |
|---|---|
| १ | २११७/- |
| २ | ४८५६/- |
| ३ | २८२४/- |
| ४ | २८६१/- |
| ५ | २८७३/- |
| एकूण | १५,५३१/- |

५. ४% VAT वजावट करणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

| देयक क्र. | रक्कम रू. |
|---|---|
| २ | १९४२/- |
| ३ | ११३०/- |
| ४ | ११४४/- |
| एकूण | ४२१६/- |

६. मुंबई मुद्रांक अधिनियम -१९५८ अन्वये रू.१००/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना रू.५०/- च्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे.

७. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्थेच्या नोंदणीचा दाखला २००८-२०१० पर्यंत आहे.

८. १% विमा (८ महिने) रक्कम रू. ९२८/- वजावट झालेली नाही.

९. संचिकेतील १२ महिन्याचे व मुदतवाढीचे ३ महिन्याचे परिशिष्ट - ब चा ताळेबंद तपासला असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

**परिशिष्ट - ब (१२ महिने)**
**२०१०-२०११ क्षेत्रफळ ३४४० चौ.मी.**

| अ.क्र. (प.ब नुसार) | तपशिल | संख्या | दर (मनपा पाणी) | प्रति | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | मोठी झाडे | ९३ | १.७८ | नग | १२ | १९८६/- |
| १५ | मोठी झाडे लागवड (नविन) | ५० | २३१ | नग | १२ | ११५५०/- |

**परिशिष्ट -ब** **(०३ महिने)**

**२०१०-२०११**

| अ.क्र. (प.ब नुसार) | तपशिल | संख्या | दर (मनपा पाणी) | प्रति | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | मोठी झाडे | ९३ | १.७८ | नग | ३ | ४९७/- |

* **मोठी झाडे :** परिशिष्ट - ब नुसार (१२ महिने) मोठी झाडे ९३ नग व नविन लागवड ५० नग असे एकूण १४३ नग दर्शविलेले आहे. परंतू १२ महिन्याचे देयक अदा करतांना जुने ९३ नग व नविन ३५ नग लागवड करून एकूण १२८ नग झाडाचे देयक अदा करण्यात आले आहे. परंतू ३ महिने मुदतवाढ कार्यादेश दिल्यानंतर परिशिष्ट - ब व देयक अदा करतांना एकूण ९३ नग मोठी झाडे दर्शविण्यात आली आहे. म्हणजेच नविन लागवड मोठी झाडे ३५ नग दाखविण्यात आलेली नाही.

त्यावर ३५ x २३१ = ८०८५/- एवढा खर्च करण्यात आला आहे. झालेला खर्च संबंधिताकडून वसूलीस पात्र आहे.

१०. उद्यानाचे १२ महिने संगोपन, संरक्षण, देखभाल / विकास कामे करणे करीता खर्च करण्यात आला. निविदा न काढता संबंधितास ३ महिने २ वेळेस मुदतवाढ व २ महिने मुदतवाढ देण्यात आली आहे, एकूण ८ महिने मुदतवाढ दिलेली आहे. शासन नियमानुसार सहा महिने मुदतवाढ विधीग्राह्य आहे. २ महिन्याचा खर्च रक्कम रू.१४३०५/- संबंधिताकडून वसूल करावा.

११. अटी शर्ती अ.क्र.१४,२१,२२,२३ ची पूर्तता केलेली दिसून आलेली नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रु. ७२,६००/-, मुद्या क्र. ५ अन्वये रक्कम रु. ४,२१६/-, मुद्या क्र.८ अन्वये रक्कम रु.९२८/-, मुद्या क्र.९ अन्वये रक्कम रू.८०८५/- व मुद्या क्र.१० अन्वये रक्कम रु.१४,३०५/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४२ :सन २०१०-११ या आर्थिक वर्षात प्रियदर्शनी जॉगिंग व सह्याद्री नगर उद्यानाचे बारा महिने देखभाल दुरुस्ती, संगोपन यासाठी दिलेल्या कामातील अनियमिततेबाबत. (अं.प.रक्कम .१,१२,८५८/-)(खर्च रू. १,४४,५७६/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात प्रियदर्शनी जॉगिंग व सह्याद्रीनगर उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल, दुरुस्ती कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता तीन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराची निविदा पियुष नर्सरीज यांची होती. संबंधित एजन्सीस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६९८/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक १५.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ मनपा/उद्यान/२६८/१२, दिनांक १८.६.२०१२ नुसार देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५०१/१२, दिनांक १.९.२०१२ नुसार दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आले. कार्यालयीन पत्र

क्र.मनपा/उद्यान/७९७/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. कार्यादेश देण्यापूर्वी २% ठेव रक्कम रू.२२५७/- मनपा फंडात जमा केलेली नाही.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे नियम ३४ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

३. निविदा अट क्र.६ प्रमाणे उद्यानाची संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी कंत्राटदाराची असल्याने व त्याबाबत मोबदला देण्यात येणार नाही असा स्पष्ट उल्लेख असतानाही मनपातर्फे रू.७२,६००/- रक्कम अदा केलेली आहे. परिशिष्ट - ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर महानगरपालिकेने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलममध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

४. देयक अदाईपूर्वी निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये नमूद बाबी संबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत. त्यामुळे निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

५. प्रत्येक देयकातून VAT TAX कपात करण्यात आलेला नाही. रू.४२२८/- कपात न केल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. निविदा अट क्र.१६ नुसार १०% सुरक्षा ठेव प्रत्येक देयकातून कपात होणे आवश्यक आहे. तथापि एकाही देयकातून कपात केलेली नसल्यामुळे मनपाचे रू.१४,४५९/- रकमेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये रक्कम रू. ७२,६००/- व मुद्या क्र. ५ अन्वये रक्कम रू. ४२२८/-, संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४३ : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात अभिनंदन /शंकरनगर, विटखेडा उद्यान बारा महिने देखभाल दुरूस्ती, संगोपन यासाठी दिलेल्या कामातील अनियमिततेबाबत. (अं.प.रक्कम .१,६७,९७९/-)(खर्च रू. १,४५,२७४/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात अभिनंदन/ शंकरनगर/ विटखेडा येथील उद्यानाचे बारा महिने संगोपन, देखभाल व दुरूस्ती कामासाठी, जाहिर निविदा दिनांक १०.९.२०११ रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असता चार निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या. पैकी सर्वात कमी २०% दराची पंचशिल महिला बचत गटाची आहे. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७०४/११, दिनांक २५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आला. त्यानंतर दिनांक १५.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/२७८/१२, दिनांक १८.६.२०१२ अन्वये देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६२३/१२, दिनांक १०.१०.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश दिलेले आहेत. त्यानंतर मनपा/उद्यान/८०७/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये निांक १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक १५.८.२०१२ ते १५.१०.२०१२ पर्यंत दिलेले मुदतवाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. त्याचे रू.१२२७२/- चे देयक प्रस्तावित असून अदा करण्यास पात्र नाही.

२. निविदा अट क्र.६ अन्वये उद्यानाची संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी कंत्राटदाराची आहे. यासाठी वेगळा मोबदला देय नाही. तरीसुध्दा उद्यान विभागाने सदरील प्रकरणी रू.१,०८,९००/- गुत्तेदारास अदा केले. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

३. प्रत्येक देयकातून VAT TAX कपात करणे आवश्यक असतांना रू.५४२३/- कपात केलेला नाही. त्यामुळे शासकीय निधीचे नुकसान झालेले आहे.

४. निविदा अट क्र.१३ व १४ प्रमाणे देयक अदायगी पूर्वी सदरील अटीमध्ये उल्लेखित बाबी संबंधी सक्षम पुरावे संचिकेत सादर नाहीत.

५. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव ठेवणे क्रमप्राप्त आहे. तथापि एकाही देयकातून १०% ठेव कपात केलेली नाही. मनपाचे रू.१४५२८/- रकमेचे तात्पुरते नुकसान झालेले आहे. तसेच १ निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

६. सन २००९-१० या वर्षातील सदरील उद्यानाच्या संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या नसल्यामुळे ताळमेळ घेता आला नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्दा क्र.२ अन्वये रक्कम रू. १,०८,९००/- व मुद्दा क्र. ३ अन्वये रक्कम रू. ५४२३/-, संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४४ : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात नाथपुरम,कांचनवाडी उद्यान व रस्ता दुभाजकांचे १२ महिने देखभाल दुरूस्ती व संगोपन यासाठी दिलेल्या कामातील अनियमिततेबाबत. (अं.प.रक्कम रू. १,०१,३०२/-)(खर्च रक्कम रू. ९४,१८२/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात नाथपुरम, कांचनवाडी उद्यान व रस्ता दुभाजकांचे १२ महिने देखभाल दुरूस्ती व कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असता चार निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी २०% दराची निविदा पंचशिल महिला बचतगटाची आहे. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/७०३/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. तद्नंतर दिनांक १८.६.२०१२ नुसार कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/२७७, दिनांक १५.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६२२/१२, दिनांक १०.१०.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश दिलेले आहेत. तद्नंतर मनपा/उद्यान/८०६/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये दिनांक १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. दिनांक १५.८.२०१२ ते १५.१०.२०१२ पर्यंत दिलेल्या मुदतवाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही. तसेच निविदा मुदतवाढ ६ महिने कालावधीपर्यंत विधीग्राह्य धरली जाते. ८ महिन्याचा कालावधी अवैध आहे. देयक रू.१०४६५/- अदाईस्तव प्रस्तावित आहे. कंत्राटदारास देयक अदा करणे अयोग्य आहे.

२. निविदा अट क्र.६ चे पालन झालेले नाही. रू.६५३४०/- कंत्राटदारास अदा केलेले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

३. निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये उल्लेखित बाबी संबंधी सक्षम पुरावे संचिकेत सादर केलेले नाहीत.

४. देयकातून VAT TAX ची रक्कम रू.३४८९/- कपात केली नाही. त्यामुळे शासनाचे निधीचे नुकसान झालेले आहे.

५. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात करणे बंधनकारक असतांना कपात केलेली नाही. रू.९४१९/- रकमेचे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. सन २००९-२०१० मधील संचिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेल्या नाही. त्यामुळे ताळमेळ घेता आला नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.२ अन्वये रू. ६५३४०/-, मुद्या क्र. ४ अन्वये रक्कम रू. ३४८९/-, संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४५ :साईनगर -१ उद्यानाचे बारा महिने देखभाल दुरूस्ती व संगोपन करणेच्या कामातील अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रू.९९,२९७/-) (खर्च रू.१०६३७०/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात साईनगर -१ उद्यान बारा महिने देखभाल, दुरूस्ती व संगोपन कामासाठी स्थानिक वृत्तपत्रात दिनांक १०.१.२०११ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असता एकूण चार निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २६% कमी दराची निविदा शिवम नर्सरी यांची आहे. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७०१/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आला. त्यानंतर मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/उद्यान/२६९/१२ दिनांक १८.६.२०१२ अन्वये दिनांक १५.६.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/५०५/१२, दिनांक १.९.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७९८/१२, दिनांक २०.१२.२०१२ नुसार देण्यात आली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी दिसून आल्या.

१. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रू.१९८६/- व ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रू.४९६५/- असे रू.६९५१/- मनपा फंडात जमा न केल्यामुळे मनपाचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या नियम ३४ चे पालन झालेले नाही.

३. सन २००९-१० या आर्थिक वर्षातील संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे परिशिष्ट - ब सोबत ताळमेळ घेता आला नाही.

४. निविदा करार ६ महिने कालावधीपर्यंत मुदतवाढीस विधीग्राह्य शासन निर्णयानुसार मानल्या जातो. तथापि सदरील प्रकरणी ८ महिन्याची मुदतवाढ देवून २ महिन्याचा झालेला खर्च रू.९५२४/- अवैध आहे. तसेच तो वसूलीस पात्र आहे.

५. निविदा अट क्र.६ नुसार उद्यान संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी कंत्राटदाराची आहे. तरी सुध्दा रू.७२,६००/- कंत्राटदारास अदा केलेले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

६. निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये नमूद बाबींबाबत देयक अदायगीपूर्वी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत. निविदा अटी शर्तीचे पालन झालेले नाही.

७. देयकातून VAT TAX रू. २९२२/- कपात झालेली नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

८. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात करणे आवश्यक असतांना रू.१०३६८/- कपात झालेली नाही. मनपाचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

९. मुदतवाढीचे परिशिष्ट - ब तयार केले. त्यात मागील वर्षातील लागवडीसाठी झालेल्या खर्चाचे ॲटम देखभालीमध्ये समाविष्ट केलेले नाहीत. त्यामुळे खालील प्रमाणे झालेला खर्च निष्फळ ठरतो व तो वसूलीस पात्र आहे.

१) शोभिवंत झाडे लागवड ५० नग X१३९ = ६९५०/-

२) मोठी झाडे लागवड ३५ नग X२३१= ८०८५/-

**एकूण १५०३५/-**

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. ४ अन्वये रक्कम रू. ९५२४/-, मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू. ७२६००/-, मुद्या क्र.७ अन्वये रक्कम रू.२९२२/- व मुद्या क्र.९ अन्वये रक्कम रू. १५०३५/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४६ : सन २०१०-११ या आर्थिक वर्षात उद्यान विभागाकरीता ट्री गार्ड खरेदी करणेबाबत.(अं.प.रक्कम रू.३१,८६,०००/-) (खर्च रू.१९,७५३२०/-)**

सन २०१०-११ या वर्षात उद्यान विभागा करीता ट्रि गार्ड खरेदी करण्यासाठी ई निविदेद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता दिनांक २०.२.२०१० रोजी एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त ११.५% दराची निविदा शेख मसूद शे.अमीन यांची होती. सदरील कामा करीता कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/३९९/१०, दिनांक ३१.८.२०१० नुसार पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले. सदरील खरेदीचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरणी ५ नियम (२)(२) अंतर्गत उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील २ (ब) अन्वये ११००/- रू.चे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना १००/- रू.च्या मुद्रांकावर केलेला आहे.
२. कामगार विमा १% कपात केलेला नाही.
३. संचिकेत D.C. बिल दिसून आलेले नाही.
४. रजिस्टर नमुना क्रमांक १०९,११०,१११ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. २ अन्वये रक्कम रू. १९,७५३/- संबंधितांकडून वसूल करुन मुद्या क्र.४ बाबत पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४७ :चिकन जाळी बाबत.(अं.प.रक्कम रू.४९,८९६/-)**

शहरातील विविध वॉर्डामध्ये व रस्त्याच्या बाजूला लागवड करण्यात आलेल्या झाडांच्या संरक्षणासाठी बांबुचे ट्री गार्ड तयार करण्यासाठी चिकन जाळीची आवश्यकता असून या करीता दरपत्रक मागविण्यात आले असता स्थानिक पुरवठा धारकाच्या दरानुसार रू.४९८९६/- एवढा खर्च येईल. दिनांक ७.७.२०१० रोजी कोटेशन दरपत्रके मागविण्यात आले असता एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाले. त्यापैकी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची दरपत्रक स्टार ट्रेडर्स रू.३८/- प्रति स्क्वेअर मीटर प्रमाणे आहे. (४६२ ट्री गार्ड) त्या अन्वये जा.क्र.मनपा/उद्यान/३०८ दिनांक १३.७.२०१० रोजी पुरवठा आदेश देण्यात आला आहे. त्यानुसार १५ दिवसांचा पुरवठा कालावधी देण्यात आला.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. संचिका सादर करतांना दिनांक आवक /जावक क्रमांक दर्शविलेला नाही.
२. माल प्राप्त झाल्याबाबत D.C. नाही.
३. C.S.T., B.S.T. क्रमांक नाही.
४. मोजमाप पुस्तिका क्रमांक २५०६ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.
५. साठा रजिस्टर, वितरण रजिस्टर, ताळेबंद रजिस्टर उपलब्ध झालेले नाही.
६. काम पूर्णत्वाबाबत प्रमाणपत्र संचिकेत नाही.
७. शासकीय विमा कपात केलेला नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. देयकातून कंत्राटी कामाचा विमा रक्कम १% कपात होवून शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिका २५०६ उपलब्ध झालेली नसल्यामुळे लेखापरीक्षण करता आलेले नाही. करिता पुढील लेखापरीक्षणा पूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४८ : सिध्दार्थ उद्यानातील विविध ठिकाणची साफसफाई,पेव्हर ब्लॉक दुरूस्ती करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.४९७६७/-)(अदा रक्कम ४९,८८३/-)**

वाहतूक उद्यानातील पेव्हर ब्लॉक निघालेले असून त्यांचे दुरूस्ती करणे , वाढलेले गाजरगवत व इतर काटेरी झुडपे काढणे बाबत उपलब्ध गुत्तेदार भगवान गडपे यांच्या कडून कामे करण्याबाबत व सदरील काम ६७ (३) (क) अन्वये करण्यात येईल असे नमूद करण्यात आले.

परंतू मा.आयुक्त यांनी निविदा काढून काम करावे असे दर्शविले आहे. त्यानुसार निविदा काढण्यात आली. निविदा मागविण्यात आली असता १ निविदा प्राप्त झाली. त्यानुसार श्री.भगवान गडपे यांची असल्याने त्यानुसार त्यांना जा.क्र.मनपा/उद्यान/५६५, दिनांक २२.१२.२०१० रोजी कार्यादेश देण्यात आला. सदरील काम अंदाजपत्रकीय दराने मंजूरी करण्यात आले.

संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. मोजमाप पुस्तिका क्रमांक २५८७ पेज क्र. १ नोंद दर्शवितांना पेव्हर ब्लॉक दुरूस्तीबाबत उल्लेख नाही.

३. १% विमा रक्कम रु. ४९९/- वजावट केलेली नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. कंत्राटी कामाची विमा रक्कम रू.४९९/- शासनाकडे भरणेची कार्यवाही व्हावी. इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१४९ : स्मृतीवन उद्यान येथील झाडांना लावण्याकरीता प्लेट तयार करून घेणे बाबत.**

स्मृतीवन उद्यानामधील वृक्षारोपन व जुन्या झाडांना लोखंडी पत्र्याच्या प्लेट तयार करून व पेन्टींग करून मिळणे बाबत जा.क्र.मनपा/उद्यान/३८१, दिनांक १९.१०.२०१० अन्वये स्थानिक पेंटर काम करणा-या मार्फत कोटेशन दरपत्रके मागविले असता एकूण तीन दरपत्रक प्राप्त झाले. त्यानुसार श्री.सुनिल दादाराव उबाळे यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी असल्याने जा.क्र.मनपा/उद्यान/१४१, दिनांक २४.२.२०१० अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला. संचिका तपासतांना खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. मालाचा पुरवठा करतांना D.C. नाही.

२. मालाचा पुरवठा केल्यावर साठा रजिस्टरवर नोंद घेतल्याची दिसून आलेली नाही.

३. साठा रजिस्टर, वितरण रजिस्टर, ताळेबंद रजिस्टर, लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून पुढील लेखापरीक्षणापूर्वी साहित्य प्राप्त असल्याबाबतची नोंदीचे स्टॉक रजिस्टर १०९,११० व १११ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन ठेवावेत. इतर अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५० : सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात कॅनॉट प्लेस व टाऊन सेंटर जी सेक्टर येथील उद्यान १२ महिने संगोपन, देखभाल दुरुस्ती यासाठी दिलेल्या कामातील अनियमिततेबाबत. (अं.प.रक्कम रू.२,३७,९९७/-)(अदा रक्कम रू.२,८४,३६९/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात कॅनॉट प्लेस व टाऊन सेंटर जी सेक्टर येथील उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल, दुरुस्ती कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ रोजी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असता चार निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २५% कमी दराची निविदा तक्षशिला महिला बचत गटाची आहे. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/७०८/११, दिनांक १५.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक १५.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्यादेश जा.क्र.मनपा / उद्यान/२७६/१२दिनांक १८.६.२०१२ अन्वये देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र जा.क्र.मनपा/उद्यान / ६१९/१२, दिनांक १०.१०.२०१२ अन्वये दिनांक १५.८.२०१२ पर्यंत मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश दिलेले आहेत. त्यानंतर मनपा/उद्यान/८०५/१२, दिनांक २०.१२.२०१२ नुसार दिनांक १५.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. दिनांक १५.५.२०१२ ते १५.८.२०१२ पर्यंतचे अदा केलेले देयकाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

२. निविदा अट क्र.६ अन्वये दिलेल्या सूचनांचे पालन केलेले नाही. कंत्राटदारास रू.७२,६००/- अदा केले आहे. परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

३. निविदा अट क्र.१३ व १४ मध्ये नमूद बाबींसंबंधी सक्षम पुरावे संचिकेत नाहीत. निविदा अटी शर्तीचे पालन केलेले नाही.

४. शासन नियमाप्रमाणे मुदतवाढ ६ महिने विधीग्राह्य आहे. प्रकरणांत ८ महिने मुदतवाढ देवून २ महिने कालावधीची अदा रक्कम रू.२८०८३/- वसूलीस पात्र आहे.

५. देयकातून VAT TAX कपात होणे आवश्यक असतांना रू.८५७८/- कपात झालेला नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. निविदा अट क्र.१६ प्रमाणे प्रत्येक देयकातून १०% सुरक्षा ठेव कपात केलेली नाही. रू.२८,४३८/- चे तात्पुरते मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

७. कंत्राटी कामाचा विमा सर्व देयकातून कपात केलेला नाही.

८. सन २००९-१० या वर्षात सदरील उद्यानात विविध ॲटम वर केलेल्या खर्चाप्रमाणे त्याची संख्या सन २०१०-११ मध्ये समाविष्ट केलेली नाही. सन २००९-१० मध्ये झालेला खर्च निष्फळ ठरतो.

| अ.क्र. | तपशिल | सन २००९-१० मधील संख्या | सन २०१०-११ मधील संख्या | तफावत | दर | निष्फळ खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फुलझाडे लावणे | १२० | ३८ | ८२ | ५५ | ४५१० |

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्दा क्र.२ अन्वये रू.७२६००/-, मुद्या क्र. ४ अन्वये रक्कम रू. २८०८३/-, मुद्या क्र.५ अन्वये रक्कम रू.८,५७८/- , मुद्या क्र. ७ अन्वये रक्कम रू. २,८४४/-, व मुद्या क्र. ८ अन्वये रक्कम रू. ४,५१०/- संबंधितांकडून वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५१ :सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात एन-३ उद्यानाचे १२ महिने संगोपन, देखभाल दुरुस्ती करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.१,४३,४३८/-)(अदा रक्कम रू.२,२२,८०९/-)**

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात एन-३ उद्यान बारा महिने संगोपन, देखभाल व दुरुस्तीसाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ रोजी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असता तीन निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी १% कमी दराची निविदा श्री.साई बहुउद्येशिय जनसेवा संस्था यांची होती. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान ७२५/११, दिनांक २२.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले.त्यानंतर दिनांक २२.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान/२७०/१२, दिनांक १८.६.२०१२ अन्वये देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/६२६/१२, दिनांक १०.१०.२०१२ नुसार दिनांक २२.८.२०१२ पर्यंत कार्योत्तर मुदतवाढ देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र जा.क्र.मनपा/उद्यान/७९९/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये दिनांक २२.१०.२०१२ पर्यंत मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश दिलेले आहेत.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अटी शर्ती क्रमांक ६ नुसार कंत्राटदारावर उद्यानाच्या चोवीस तास संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. मात्र यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही असा स्पष्ट उल्लेख असतांना परिशिष्ट - ब अ.क्र.१६ वॉच ॲण्ड वॉर्ड असे दर्शवून खालील प्रमाणे रक्कम अदा करण्यात आली.

| संख्या | दर | प्रति | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ३६३० | प्र.युनिट | १२ | ४३,५६०/- |
| १ | ३६३० | प्र.युनिट | ०६ | २१७८०/- |
| | | | | ६५३४०/- |

परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

२. १०% सुरक्षा ठेव प्रत्येक देयकातून वजावट होणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

| देयक क्रमांक | रक्कम रू. |
|---|---|
| १ | ३३१३/- |
| २ | ४६३९/- |
| ३ | ३७२३/- |
| ४ | १६५५/- |
| ५ | ६६६५/- |
| **एकूण** | **१९,९९५/-** |

३. ४% VAT प्रत्येक देयकातून वजावट होणे आवश्यक असतांना वजावट झालेला नाही. फक्त २ महिन्याच्या देयकातून VAT रक्कम वजावट झालेली आहे.

| देयक क्रमांक | रक्कम रू. |
|---|---|
| १ | १३२५/- |
| २ | १८५६/- |
| ३ | १४८९/- |
| ४ | ६६२/- |
| ५ | २६६६/- |
| **एकूण** | **७,९९८/-** |

४. देयक क्रमांक २ रक्कम रू.४४६२९/- देणे असतांना संबंधितास ४६३९२/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. म्हणजेच रक्कम रू.१७६३/- जास्तीचे अदा करण्यात आले असून रक्कम वसूलीस पात्र आहे.

५. देयक क्रमांक ६ (२ months) रक्कम रू.२२,२१७/- एवढी रक्कम देणे असतांना २६,९२७/- एवढ्या रकमेचे देयक (MB No. २७०८/८७) वर दर्शवून ४७१०/- एवढे जास्तीचे देयक प्रस्तावित करण्यात आले आहे.

६. विमा रक्कम १% देयकातून (८ month) कपात करणे आवश्यक असतांना कपात झालेली नाही.

७. २ महिने दिलेली मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश शासन निर्णयानुसार नियमबाह्य असून २ महिन्याची रक्कम रू.२२८५/- अदा करण्यास पात्र नाही. त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजूरी नाही.

८. परिशिष्ट -ब सन २००९-१० व सन २०१०-११ चा ताळेबंद तपासला असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

**सन २००९-२०१० (क्षेत्रफळ ९५८२ चौ.मी.)**

**परिशिष्ट - ब**

| अ.क्र. परि.ब नुसार | तपशिल | संख्या | दर मनपा पाणी | प्रति चौ.मी. | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | हिरवळ | १३८८ | १.६६ | चौ.मी. | १२ | २७६४९/- |
| ३ | शोभिवंत झाडे | ९५ | १.७८ | नग | १२ | २०२९/- |
| ११ | शोभिवंत झाडे (नविन) | ३५० | ७५ | नग | १२ | २६२५०/- |

**सन २०१०-२०११ (क्षेत्रफळ ७२३९ चौ.मी.)**

**परिशिष्ट - ब**

| अ.क्र. परि.ब नुसार | तपशिल | संख्या | दर मनपा पाणी | प्रति चौ.मी. | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | हिरवळ | १२१२ | १.६६ | चौ.मी. | १२ | २४१४३/- |
| ३ | शोभिवंत झाडे | ७० | १.७८ | चौ.मी. | १२ | १४९५/- |
| ५ | जागेची साफसफाई | ५५०० | ०.८२ | चौ.मी. | १२ | ५४१२०/- |

**हिरवळ :** सन २००९-१० मध्ये हिरवळ १३८८ चौ.मी. असतांना सन २०१०-११ मध्ये १२१२ चौ.मी. दर्शविण्यात आली. म्हणजेच १७६ चौ.मी. कमी दर्शविण्यात आली.
१७६ X १०६६ X १२ = ३५०६ = ००

**शोभिवंत झाडे** : सन २००९-१० मध्ये ९५ व नविन ३५० एकूण ४९५ असतांना सन २०१०-१ मध्ये देयकात २० शोभिवंत झाडे दर्शविण्यात आली.

७५ X १.७८ X १२ = १६०२/-

३५०X ७५ X -- = २६२५०/-

**२७८५२/- वसूलीस पात्र आहे.**

९. निविदा अटी शर्ती १४,२१,२२,२३ ची पूर्तता केलेली नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रु. ६५,३४०/-, मुद्या क्र. ३ अन्वये रक्कम रु. ७,९९८/-, मुद्या क्र.४ अन्वये रक्कम रु.१७६३/- , मुद्या क्र. ५ अन्वये रक्कम रु. ४७१०/-, व मुद्या क्र. ८ अन्वये रक्कम रु. ३१,३५८/- संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५२ :सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात एन-४ एच सेक्टर व एन-४ पोलिस चौकी उद्यान १२ महिने संगोपन, देखभाल दुरूस्ती करणे बाबतच्या कामातील अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रू.१,१६,९७४/-)(खर्च रक्कम रू.१,२६,७३१/-)**

सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात एन-४ एच सेक्टर व एन-४ पोलिस चौकी उद्यान १२ महिने संगोपन देखभाल व विकास कामासाठी जाहिर निविदा दिनांक १०.१.२०११ अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असता तीन निविदा विक्री झाल्या. त्यापैकी ३ निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत प्राप्त झाल्या. तीन निविदापैकी सर्वात कमी १% दराची निविदा साई बहुउद्येशिय जनसेवा संस्था यांची आहे. संबंधित संस्थेस कार्यालयीन पत्र क्र. मनपा/उद्यान/७२४/११, दिनांक २२.२.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर दिनांक २२.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ कार्यादेश जा.क्र.मनपा/उद्यान /२७२ / १२, दिनांक १८.६.२०१२ अन्वये देण्यात आली. तसेच कार्यालयीन पत्र क्र.मनपा /उद्यान /६२७ /१२, दिनांक १०.१०.२०१२ अन्वये दिनांक २२.८.२०१२ पर्यंत मुदतवाढीचे कार्योत्तर कार्यादेश दिलेले आहेत. पुन्हा कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/८०१/१२, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये २२.१०.२०१२ पर्यंत दोन महिने मुदतवाढ देण्यात आली.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अटी शर्ती क्रमांक ६ नुसार कंत्राटदारावर उद्यानाच्या चोवीस तास संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. मात्र यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही असा स्पष्ट उल्लेख असतांना परिशिष्ट - ब अ.क्र.१६ वॉच ॲण्ड वॉर्ड असे दर्शवून खालील प्रमाणे रक्कम अदा करण्यात आली.

| संख्या | दर | प्रति | महिने | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ३६३० | प्र.युनिट | १२ | ४३,५६०/- |
| १ | ३६३० | प्र.युनिट | ०६ | २१७८०/- |
| | | | | ६५३४०/- |

परि.-ब मधील रकमा व निविदा अटी शर्ती यातील मजकूराचा एकमेकांशी ताळमेळ साधत नाही. तसेच परि.-ब मध्ये सदरील ॲटमचे दर मनपाने पाणी पुरविणे / स्वत: पाणी पुरविणे या कॉलम मध्ये दाखविलेले आहेत. त्यामुळे सदरील रक्कम आक्षेपार्ह आहे.

२. १०% सुरक्षा ठेव प्रत्येक देयकातून वजावट होणे आवश्यक असतांना वजावट झालेली नाही.

| देयक क्रमांक | रक्कम रू. |
|---|---|
| १ | २०२३/- |
| २ | २६८९/- |
| ३ | २२५८/- |
| ४ | ६३३/- |
| ५ | ३८०२/- |
| **एकूण** | **११,४०५/-** |

३. ४% VAT प्रत्येक देयकातून वजावट होणे आवश्यक असतांना वजावट झालेला नाही.

| **देयक क्रमांक** | **रक्कम रू.** |
|---|---|
| २ | १०७५/- |
| ३ | ९०३/- |
| ४ | २५३/- |
| ५ | १५२०/- |
| **एकूण** | **३,७५१/-** |

४. विमा रक्कम १% देयकातून (८ month) कपात करणे आवश्यक असतांना कपात झालेली नाही.

५. जा.क्र.मनपा/उद्यान/८०, दिनांक २०.१२.२०१२ अन्वये मुदतवाढ कार्योत्तर कार्यादेश दिनांक २३.८.२०१२ ते २२.१०.२०१२ पर्यंत दोन महिने मुदतवाढ आदेश काढण्यात आले असून त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजूरी असल्याचे संचिकेत दिसून आलेले नाही. तरी त्याचे रक्कम रू.१२६७३/- चे देयक मंजूरीस्तव सादर करण्यात आले. सदरील रक्कम शासन आदेशानुसार अदा करण्यास पात्र नाही.

६. उद्यानाचे सन २००९-१० व २०१०-११ चे परिशिष्ट - ब नुसार ताळेबंद तपासला असता खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

**<u>हिरवळ</u>** : सन २००९-१० मध्ये १३०० चौ.मी. असतांना सन २०१०-११ मध्ये ७१४ चौ.मी. दर्शविण्यात आली व देयकात १९२ चौ.मी. ची नोंद घेवून देयक अदा करण्यात आले. म्हणजेच ११०८ चौ.मी. कमी दर्शविण्यात आली. यावर ११०८X२.६०X१७.५= ५०४१४ एवढा खर्च करण्यात आलेला आहे. झालेला खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात यावा.

**<u>शोभिवंत झाडे</u>** : सन २००९-१० मध्ये १०७ व नविन १२० असे एकूण २२७ झाडे असतांना सन २०१०-११ मध्ये ३२ झाडे दर्शविण्यात आली. म्हणजेच १९५ शोभिवंत झाडे कमी दाखविण्यात आली.

७५ X२.६०X१७.५ = ३४१३/-
१२०X७५X - = ९०००/-
**एकूण** = **१२४१३/-**

यावर रक्कम रू.१२४१३/- एवढा खर्च करण्यात आला. सदरील खर्च वसूलीस पात्र आहे.

**<u>फुलझाडे लावणे</u> :** सन २००९-२०१० मध्ये १२० फुलझाडे लावण्यात आली होती. परंतू सन २०१०-११ च्या परिशिष्ट -ब मध्ये यांची नोंद दर्शविलेली नाही. यावर ८० X५५=४४००/- एवढा खर्च करण्यात आला आहे.

७. एन-४ पोलिस चौकी व एन-४, एच सेक्टर या उद्यानाच्या १२ महिने संगोपन देखभाल / विकास कामे करण्यासाठी सन २००९-१० मध्ये २.६० पैसे प्रति.चौ.मी. दर देण्यात आला होता. हा दर स्वत: पाणी टाकणेचा होता. सन २०१०-११ मध्ये १.६६ पैसे हा दर महानगरपालिकेने पाणी दिले असेल तर आहे.
तरी उद्यानामध्ये महानगरपालिकेने पाण्याची व्यवस्था केली आहे. तर पाणी केव्हा पासून देण्यात आले आहे. याबाबत खुलासा सादर करावा.

८. निविदा अटी शर्ती १४,२१,२२,२३ ची पूर्तता केल्याचे दिसून आले नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र.१ अन्वये रक्कम रु. ६५,३४०/-, मुद्या क्र. ३ अन्वये रक्कम रु. ३७५१/-, मुद्या क्र. ६ अन्वये रक्कम रु.६७,२२७/-, संबंधितांकडून वसूल करुन इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५३ :सन २०११ -१२ या आर्थिक वर्षात लाकडी ट्री गार्ड खरेदी मध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.(अं.प.रक्कम रु.२,२०,०००/-)(खर्च रु.१,७६,०००/-)**

सन २०११-१२ या वर्षात उद्यान विभागाने लाकडी ट्री गार्ड खरेदी करण्याबाबत ई - टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविली असता एक निविदा विक्री झाली. निविदा स्विकृतीच्या तारखेस एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा बी.आर.गडपे यांची १५% जास्त दराची होती. मा.शहर अभियंता यांनी सदरील निविदा अंदाजपत्रकीय दराने स्वीकारली. एजन्सीने रु.१००/- च्या मुद्रांकावर करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/३२७/२०११, दिनांक १५.१०.२०११ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आले. सहा महिन्यात ट्री गार्ड पुरवठा करण्याबाबत कळविले. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदा अंतीम करतांना दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.
२. २२०० ट्री गार्ड पुरवठा करण्याचे आदेश असतांना १६०० ट्री गार्ड पुरवठा केल्याचे देयक अदा केले आहे. ६०० ट्री गार्डचा पुरवठा संबंधित एजन्सीने का केला नाही ? याबाबत संचिकेत अभिलेखे नाहीत.
३. १६०० ट्री गार्ड पैकी फक्त १००० ट्री गार्ड पुरवठा झाल्याचे डिलेवरी चालान संचिकेत आहेत. ६०० ट्री गार्डचा पुरवठा बाबत डिलेव्हरी चालान संचिकेत नसल्यामुळे पुरवठाबाबत साशंकता निर्माण होते. आणि ६०० ट्री गार्ड पुरवठ्यावर झालेला खर्च रु.६६,०००/- निष्फळ ठरतो तसेच वसूलीस पात्र ठरतो.

४. लेखापरीक्षणा दरम्यान सदरील ट्री गार्ड चे साठा नोंदवही, वितरण व ताळमेळ नोंदवही उपलब्ध झालेली नाही.

५. अदा केलेले देयकाची मोजमाप पुस्तिका २७०५ व २७०७ लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्या क्र. ३ अन्वये रक्कम रु. ६६,०००/-, संबंधितांकडून वसूल करुन मुद्या क्र. ४ व ५ मधील अभिलेखे पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपलब्ध ठेवावीत व इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५४ : सन २०१२ -१३ या आर्थिक वर्षात उद्यान विभागाकरीता लॉन मशीन व इतर साहित्य खरेदी बाबत.**

सन २०१२-१३ या वर्षात उद्यान विभागाकरीता लॉन मशीन व इतर साहित्य खरेदी करीता ई - टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील कामाच्या ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी १.१% दराची निविदा मुबारक मेहबूब पठाण यांची होती. एजन्सीस कार्यालयीन पत्र क्र.मनपा /उद्यान /३५५ / २०१२, दिनांक ९.७.२०१२ अन्वये पुरवठा आदेश निर्गमित केले. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. निविदेमध्ये कामगार कल्याण उपकराची १% रक्कम देयकातून कपात करण्यात येईल अशी अट असतांना कपात झालेली नाही.

२. प्राप्त साहित्याचे साठा, वितरण शिल्लक नोंदवही लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नाही.

३. पुरवठा आदेशातील अ.क्र.१ ची संख्या २ असतांना ४ नग खरेदी केले त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मुद्या क्र.२ बाबतचे अभिलेखे पुढील लेखापरीक्षणापूर्वी उपलब्ध ठेवावेत. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१५५ :सन २०१२-१३ या वर्षात सिध्दार्थ उद्यान येथे गुलाब लागवड व फुल झाडे लागवड करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.४,९९,९८७/-) (खर्च रू.४,९५,९९५/-)**

सन २०१२-१३ या वर्षात सिध्दार्थ उद्यान येथे गुलाब लागवड व फुलझाडे लागवड करण्यासाठी निविदा मागविल्या असता तीन वेळा एकही निविदा प्राप्त झाली नाही. तद्नंतर दरपत्रके मागविण्यात आली. दरपत्रकात प्राप्त दरानुसार परिशिष्ट -ब तयार करण्यात आले. ई टेंडरिंग विभागामार्फत चौथी वेळ निविदा मागविली असता साई पल्लवी नर्सरीज ॲन्ड पेस्ट कन्ट्रोल यांचे दर प्राप्त झाले. संबंधितांनी परिशिष्ट - ब मधील एकाच ॲटमचे दर भरलेले आहेत. उद्यान विभागाने कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उद्यान/३६१/२०१२ दिनांक १०.७.२०१२ अन्वये पुरवठा आदेश परिशिष्ट -ब मधील दोन्ही ॲटम बाबत दिलेले आहे. संचिकेत खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

१. साई पल्लवी नर्सरीज ॲन्ड पेस्ट कन्ट्रोल यांनी एकाच ॲटमचे दर निविदेत नमूद केले असतांना दोन्ही ॲटमचे पुरवठा आदेश कोणत्या आधारे देण्यात आले.

२. दरपत्रके मागविली त्यावेळी फ्लोरीबंडा जातीचे गुलाब रोपे प्रती नग दर रू.८७/- आले होती. निविदा मागविल्यावर याच ॲटमचे दर रू.९५/- प्राप्त झाले. विभागाने निविदा अंतीम करतांना

दर पत्रकातील दराप्रमाणे ई- टेंडरिंग द्वारे प्राप्त निविदा धारकासोबत वाटाघाटी केली नाही. त्यामुळे प्रती रोप रु.८/- प्रमाणे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. पुरवठा आदेशात फ्लोरीबंडा जातीचे गुलाब रोपे ३०९८ पुरवठा करण्याचे आदेशित केले असतांना देयक ५२२१ रोपांचे अदा केले. निविदा नियम ३८ प्रमाणे २५% संख्येत वाढ अपेक्षित आहे. त्यापेक्षा जास्त वाढ झालेली आहे. जास्तीच्या वाढीव रोपे खरेदीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

४. प्राप्त ५२२१/- रोपांबाबत संचिकेत D.C. उपलब्ध नाही. तसेच साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे रोपांच्या पुरवठ्यांबाबत साशंकता निर्माण होते.

५. लेखापरीक्षणा दरम्यान मोजमाप पुस्तिका २५८५ उपलब्ध झालेली नाही.

विभागाने खुलासा सादर केलेला नाही. पुढील लेखापरीक्षणापूर्वी अभिलेखे उपलब्ध ठेवावीत. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

# *मालमत्ता विभाग*
# सन २००५-०६ ते सन २०१२-१३
# लेखापरीक्षण अहवाल

**प्रस्तावना :**

मा.स्थायी समिती सभेच्या दिनांक ४.०९.२०१३ च्या निर्णयाप्रमाणे कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेप/२०१३/२०८, दिनांक ११.९.२०१३ अन्वये मालमत्ता विभागाचे सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे जमा बाजूचे लेखापरीक्षण करण्यात आले.

त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या व्यावसायिक मालमत्ता,होर्डिग्ज संचिका, आरक्षित जागेबाबतच्या संचिका, आठवडी बाजाराच्या संचिका, भाडे तत्वावर दिलेले गाळे/ सभागृह व मोकळ्या जागा बाबतच्या संचिका, अधिकारी /कर्मचा-यांच्या निवासस्थानाबाबतच्या संचिका, महानगरपालिकेच्या मालकीचे सांस्कृतिक सभागृह व इतर सभागृहाबाबतच्या संचिका, महानगरपालिकेने शहरातील नागरीकांच्या सुविधेसाठी विविध ठिकाणी पे ॲण्ड पार्क नुसार पार्कीगच्या संचिका व इतर अभिलेखे विभागाने **अपूर्ण** स्वरूपात उपलब्ध करून दिले आहे.

लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता विभागाचे जमा बाजूचे एकूण **२८** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**मालमत्ता अधिकारी यांच्या कार्यकाळाबाबत :**

सन २००५- २००६ ते सन २०१२-१३ या कालावधीत मालमत्ता अधिकारी या पदावर कार्यरत अधिका-यांची नांवे आस्थापना -१ विभागाकडून प्राप्त झालेली आहेत ती खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री.शिरीष रामटेके | १.४.२००५ ते ३१.७.२००५ |
| २ | श्री.दिपक कालेले | १.८.२००५ ते ११.६.२००८ |
| ३ | श्री.फहीमोद्दीन सिद्दीकी | १२.६.२००८ ते १६.१०.२००८ (अति.कार्य.) |
| ४ | श्री.टि.जी.जाधव | ५.११.२००८ ते ६.६.२०१० |
| ५ | श्री.रविंद्र निकम | ७.६.२०१० ते २६.७.२०१० |
| ६ | श्री.हेमंत कोल्हे | २७.७.२०१० ते १३.९.२०१० |
| ७ | श्रीमती अलका खैरे | १४.९.२१०१० ते १६.३.२०११ |
| ८ | श्री.एस.डी.काकडे | १७.३.२०११ ते ३०.४.२०११ |
| ९ | श्री.एस.पी.खन्ना | १.५.२०११ ते आजपावेतो |

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-याची नांवे :**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक श्री.मो.रा.थत्ते यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे -

१. श्री. संजय जक्कल,कार्यालयीन अधिक्षक तथा पथक प्रमुख
२. श्री. नासेर लईख, वरिष्ठ लिपीक
३. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक
४. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक

मालमत्ता विभागाकडील प्रलंबित लेखा परीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे सन २०००-२००१ ते सन २००५-०६ एकूण प्रलंबित आक्षेप ५९ व एकूण आक्षेपित रक्कम रू. १,८९,०२,४८३/- इतकी आहे.प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन त्वरीत करून आक्षेपाधित रकमेचा निपटारा विभागाने करून घेणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र.१ : लेख्यांची सर्वसाधारण स्थिती बाबत.**

मालमत्ता विभाग हा महानगरपालिकेच्या मिळकतींची अद्यावत नोंद ठेवणारा विभाग आहे. महानगरपालिकेतील मालमत्ता विभागाने महानगरपालिकेच्या सर्व मिळकतींची माहिती ठेवणे अभिप्रेत आहे. या माहिती मध्ये मिळकतींची चतु:सिमा , क्षेत्रफळ, किंमत, मिळकतीचा उपभोग घेत असलेल्यांची संख्या, इमारत बांधलेली असल्यास इमारतीच्या बांधकामाचे वर्ष इत्यादी माहिती वॉर्ड निहाय उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. परंतू लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, मालमत्ता विभागाने अभिलेखे अद्यावत ठेवलेले नाही. उपलब्ध अभिलेखे अत्यंत खराब स्थितीत असून अपूर्ण आहेत.

मालमत्ता विभागाने महानगरपालिकेच्या मोकळ्या जागा, मनपाने विविध ठिकाणी बांधलेल्या इमारती, इमारती मधील व्यापारी दुकाने, बांधा वापरा हस्तांतरण करा या तत्वावर वाटप केलेल्या जमिनीतील मनपाच्या हिस्सा असलेली मिळकती, बाजारपट्टे, भाजीमंडई इत्यादी ठिकाणी विविध व्यक्तींना भाडे तत्वावर दिलेल्या करारनाम्याच्या संचिका, मूळ संचिका अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६० (अ) प्रमाणे अशा अभिलेख्यांची माहिती संकेतस्थळावर सर्व नागरीकांसाठी उपलब्ध करून देण्याची तरतूद अधिनियमात विनिर्दीष्ट केलेली आहे.

प्रत्यक्षात लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आलेले आहे की, मालमत्ता विभागासारख्या महत्वाच्या व महानगरपालिकेच्या मालमत्तांचे संरक्षण/ संवर्धन करणे अभिप्रेत असलेल्या व कायम अभिलेखे जतन करण् (Permanent Record) आवश्यक असलेल्या विभागातील लेख्यांची अत्यंत दयनिय अवस्था आहे. असलेल्या मालमत्ता सुरक्षित आहेत काय ? त्यांचे पासून अपेक्षित उत्पन्न मिळते काय ? थकबाकी किती आहे ? याचे संनियत्रणच केले जात नसल्याचे अहवालात समाविष्ट पुढील परिच्छेदांवरून निदर्शनास आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या मालमत्ता सुरक्षित असले बाबत, त्यापासून योग्य प्रमाणात उत्पन्न मिळत असलेबाबत तसेच येणे बाकी रकमांच्या वसूली करीता पर्याप्त प्रयत्न केले जात असले बाबत लेखापरीक्षणात तपासणी व खात्री करता आलेली नाही.

विभागाने सर्व मालमत्तांचे अभिलेख परिपूर्ण करून तसेच महानगरपालिकेच्या सर्व मालमत्ता सुरक्षित असलेबाबत प्रमाणित करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२ : सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या वर्षात मालमत्ता विभागा अंतर्गत वापरण्यात आलेले जनरल पावती पुस्तके, विविध वाहनतळे, आठवडी बाजार पुस्तके व पे ॲण्ड पार्क वसूलीबाबत.**

सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या वर्षातील मालमत्ता विभागा अंतर्गत जमा बाजूच्या लेखापरीक्षणा अंतर्गत अभिलेख्याची तपासणी हाती घेण्यात आली असता खालील जनरल पावती पुस्तके, सिध्दार्थ उद्यान वाहनतळ, आठवडी बाजार वाहनतळ व पे ॲण्ड पार्क पुस्तकांची वर्षनिहाय पडताळणी रोखकिर्द सोबत करण्यात आली.

| अ.क्र. | सन | जनरल पावती पुस्तक |
|---|---|---|
| १ | २००५-२००६ | २३ |
| २ | २००६-२००७ | २६ |
| ३ | २००७-२००८ | ९८ |
| ४ | २००८-२००९ | ४२ |
| ५ | २००९-२०१० | २२ |
| ६ | २०१०-२०११ | ५८ |
| ७ | २०११-२०१२ | ३० |
| | **एकूण** | **२९९** |

उक्त पावती पुस्तकांद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश रजिस्टर मध्ये नोंद घेवून महापालिका फंडात रक्कम जमा केल्याबाबतची तपासणी करण्यात आली. वसूली संबंधीच्या आक्षेपाची नोंद स्वतंत्रपणे घेण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्र.३ : मालमत्ता विभागाने जनरल पावती पुस्तके व इतर पावती पुस्तके उपलब्ध करून न देणे बाबत.**

मालमत्ता विभागाचे सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणा दरम्यान मालमत्ता विभागास भांडार विभागाने जा.क्र.मनपा/भांडार/१२२/२०१३, दिनांक २७.९.२०१३ अन्वये जनरल पावती पुस्तके व इतर पावती पुस्तकांचा तपशिल लेखापरीक्षण विभागास सादर केलेला असून त्याप्रमाणे तपासणी केली असता खालील पुस्तके लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत.

| अ.क्र. | पावती पुस्तक | सन | एकूण पावती पुस्तके |
|---|---|---|---|
| १ | जनरल पावती पुस्तके | २०१२-१३ | १९ |
| २ | सिध्दार्थ उद्यान वाहनतळ | २००५-०६ ते २०१२-२०१३ | ८० |
| ३ | आठवडी बाजार रू.१५ | २००५-०६ ते २०१२-२०१३ | १५५ |
| ४ | आठवडी बाजार रू.२० | २००५-०६ ते २०१२-२०१३ | ३०५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | आठवडी बाजार रू.१० | २००५-०६<br>ते<br>२०१२-२०१३ | १२५ |
| ६ | वाहनतळ रू.५/- | २००५-०६<br>ते<br>२०१२-२०१३ | १९९ |
| ७ | वाहनतळ रू.१०/- | २००५-०६<br>ते<br>२०१२-२०१३ | १०५ |
| ८ | पे ॲण्ड पार्क रू.२/- | २०१२-२०१३ | १० |
| ९ | पे ॲण्ड पार्क रू.५ /- | २०१२-२०१३ | ८० |
| १० | पे ॲण्ड पार्क रू.१० /- | २०१२-२०१३ | ३० |
| ११ | पे ॲण्ड पार्क रू.५० /- | २०१२-२०१३ | १० |

त्यामुळे मोठ्या प्रमाणात पावती पुस्तके लेखापरीक्षणा करीता **उपलब्ध करून न देणे ही बाब अत्यंत संशयास्पद आहे.** वर नमूद पावती पुस्तकाद्वारे वसूल केलेली रक्कम महानगरपालिका निधीत जमा झाली किंवा नाही याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही. उपरोक्त पावती पुस्तकाआधारे जमा केलेली रक्कम ती महानगरपालिका निधीत जमा केल्याचा तपशिल त्याच्या चलनांच्या प्रतींसह लेखापरीक्षणास सादर करून अनुपालन करावे.

**परिच्छेद क्र.४ :मालमत्ता विभागात होणा-या वसूलीची संचिका व डिमांड रजिस्टर उपलब्ध करून देण्याबाबत.**

लेखापरीक्षणा कामी जाहिराती होर्डिंग, सर्व सामाजिक सभागृहे, लिजवर देण्यात आलेल्या जागेच्या संचिका, दुकाने, निवासस्थाने, सर्व नाट्यगृहे, आठवडी बाजार, वाहनतळ, पे ॲण्ड पार्क, रसवंती, राखी स्टॉल, फटाका स्टॉल, मिना बाजार, तात्पुरते सेल इ. बाबतच्या संचिका व डिमांड रजिस्टर तात्काळ लेखापरीक्षणाकरीता मागणी केलेली होती. परंतू हे अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत.

**विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम (७६) मधील तरतूदीचे पालन करून वरील बाबींचे** अभिलेखे लेखापरीक्षणात उपलब्ध करूनच दिलेले नसल्याने **या पोटी जमा होणा-या रकमा योग्य असल्याचे,तसेच प्रलंबित येणे रकमांचा तपशिल लेखापरीक्षणात पडताळता आलेला नाही. अभिलेखा अभावी या बाबींवर व महत्वाचे उत्पन्नाचे स्त्रोतावर कशा प्रकारे संनियंत्रण विभागामार्फत केले जाते हे लेखापरीक्षणा दरम्यान स्पष्ट होवू शकले नाही.**

**करिता, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.**

परिच्छेद क्र.५ : **सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात मालमत्ता विभागातील न वटलेल्या धनादेशाची यादी उपलब्ध करून देणे बाबत.**

सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात मालमत्ता विभागातील न वटलेल्या धनादेशाची तपशिलवार माहिती तात्काळ लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात यावी असे विभागास कळविण्यात आले होते. तथापि संबंधित विभागाने माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे येणे रकमेपोटी प्राप्त सर्व धनादेश वटले किंवा त्यापैकी काही धनादेश अनादरित (dishonered) झाले याचा तपशिल उपलब्ध न झाल्याने धनादेशापोटी प्राप्त रकमा प्रत्यक्षात वसूल झाल्या किंवा नाही हे लेखापरीक्षणात पडताळता आलेले नाही. न वटलेल्या धनादेशासंबंधी मालमत्ता विभागाने माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. तथापि लेखापरीक्षण पथकाने लेखाशाखेकडून माहिती मागविली असता खालील प्रमाणे वर्षनिहाय न वटलेल्या धनादेशाबाबतच्या रकमांचा गोषवारा पुढील प्रमाणे आहे -

| अ.क्र. | वर्ष | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | २००५-२००६ | ४,८१,७४५/- |
| २ | २००६-२००७ | ६१,०००/- |
| ३ | २००९-२०१० | ४,५०,०००/- |
| ४ | २०१०-२०११ | ६,९७,०८८/- |
| ५ | २०११-२०१२ | १०,०००/- |
| | **एकूण** | **१६,९९,८३३/-** |

धनादेश न वटल्याने संबंधित संदर्भ वर्षात संबंधित व्यक्ती विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रीमेंट ॲक्ट चे कलम १३८ नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

विभागाने न वटलेल्या धनादेशाची रक्कम रु. **१६,९९,८३३/-** संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**वसूलीस पात्र रक्कम रु.१६,९९,८३३/-**

परिच्छेद क्र.६ : **विविध गाळेधारकांकडील भाड्याच्या वसूल रकमेबाबत.**

मालमत्ता विभागाने विविध गाळेधारकांकडील सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील भाड्याच्या वसूल रकमेबाबतची वर्षनिहाय माहिती अर्धसमास पत्र क्र. ११ अन्वये विहित नमुन्यात मागविण्यात आली होती. परंतू विभागाने लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

भाड्याने दिलेल्या गाळ्यापासून येणे असलेले उत्पन्न महानगरपालिका निधीत जमा होते किंवा नाही तसेच भाड्यापोटी येणे रकमेचा तपशिल लेखापरीक्षणात पडताळता आला नाही. वरील प्रमाणे सर्व अभिलेखे अद्ययावत करून तपशिलवार अनुपालन सादर करावे. तसेच लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करून न देणे बाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही करावी व त्याचा तपशिल लेखापरीक्षणास कळविण्यात यावा.

**परिच्छेद क्र.७ : महानगरपालिकेच्या मालकीची नाला जमिन, जमीन, इमारती, सभागृह भाडेपट्टयावर दिलेल्या धारकांनी भाडे बाबत न्यायालयांत अपील दाखल केली त्यांची नावासह माहिती द्यावी.**

मालमत्ता विभागाशी संबंधित न्यायालयीन प्रकरणांचा तपशिल अर्धसमास पत्र क्र. २० अन्वये विहित नमुन्यात मागविण्यात आला होता. परंतू विभागाने लेखापरीक्षण अंतिम होईपर्यंत माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

विभागाने माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्याने न्यायप्रविष्ट प्रकरणांची तपासणी लेखापरीक्षणात करता आलेली नाही. तपशिलवार अनुपालन करावे व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.८ : मालमत्ता अधिकारी यांनी सन २००५-०६ ते सन २०१२-१३ पर्यंत वेळोवेळी घेतलेले अग्रिम / समायोजनाबाबत.**

लेखापरीक्षण कामी उक्त माहिती आवश्यक असल्याने मालमत्ता अधिकारी यांनी वेळोवेळी घेतलेले अग्रिम व त्याचे केलेले समायोजन याची वर्षनिहाय माहिती तात्काळ लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात यावी असे कळविण्यात आलेले होते. परंतू सदरची माहिती लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे मालमत्ता विभागाच्या अग्रिमाबाबत लेखा शाखेकडून माहिती मागविली असता त्यांनीही माहिती देण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.

विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी माहिती उपलब्ध ठेवावी. तसेच माहिती उपलब्ध न करून दिल्याबद्यल मालमत्ता विभाग व लेखा विभागातील अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ९ : मनपा मालकीच्या जागा इमारती, सभागृह व नाला जमीन लिज, मंगल कार्यालय व इतर बाबतचे वसूली डिमांड रजिस्टरच्या अनियमितते बाबत.**

विभागातील भाडे वसूलीचे डिमांड रजिस्टरची चाचणी स्वरूपात पाहणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मालमत्ता भाडे वसूली डिमांड रजिस्टरला वर्षनिहाय मागणी दर्शविलेली नाही.

२. डिमांड रजिस्टरला पेजींग नाही व मालमत्ता अधिकारी यांनी प्रमाणित केले नाही.

मालमत्ता विभागामार्फत वेळेतच महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता १९७४ चे नियम (७६) मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

उक्त मुद्या क्र. १ व २ ची पूर्तता न झाल्यामुळे वसूलीच्या कामामध्ये सुसूत्रता / ताळमेळ राहिलेला नसल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी मालमत्ता विभागाने डिमांड रजिस्टरबाबतच्या सर्व पूर्ततेअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.:१० : महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी / विविध व्यक्ती, संस्था यांना भाडेतत्वावर दिलेल्या प्रकरणांची माहिती / लेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

सदर लेखापरीक्षणासाठी महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी, विविध व्यक्ती, संस्था यांना भाडेतत्वावर दिलेल्या प्रकरणांची माहिती / अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावी. याबाबत अर्धसमास पत्र क्र.३१ अन्वये विहित नमुन्यात माहिती मागविण्यात आली होती. परंतू लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंतही माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्याने लेखापरीक्षण पूर्ण होवू शकले नाही.

विभागाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.११ : मालमत्ता विभागात कार्यरत कर्मचा-यांची माहिती बाबत.**

मालमत्ता विभागात काम करणा-या अधिकारी / कर्मचारी व त्यांना दिलेले काम याबाबतची माहिती मालमत्ता अधिकारी, आस्थापना अधिकारी -२ यांचेकडून मागविण्यात आली होती. मालमत्ता विभागाने सादर केलेली अधिकारी / कर्मचारी यांची यादी व आस्थापना -२ विभागाने दिलेली माहिती यामध्ये मालमत्ता विभागात आस्थापना विभागाने नियुक्त न केलेल्या कर्मचा-यांचा समावेश आहे. एकूण १६ कर्मचा-यांची नांवे आस्थापना -२ विभागाने दिलेल्या यादीत समाविष्ट नाहीत. या १६ कर्मचा-यांवर प्रतिमाह रू. २,५४,९७८/- इतका खर्च वेतनावर होत आहे.

प्रकरणांत विभागाने उपरोक्त १६ कर्मचा-यांबाबत सदरील कर्मचारी हे स्थायी कर्मचारी आहेत काय ? तसेच १६ कर्मचा-यांची पदे मंजूर आहेत काय ? याबाबत माहिती संकलन करून त्यांना देण्यात येणारे वेतन योग्य आहे याबाबतची खात्री करावी. कार्यवाहीअंती अनुपालन लेखापरीक्षण विभागास दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१२ : महानगरपालिकेच्या मालकीचे भाड्याने दिले जाणारे गाळे / मोकळ्या जागा यांच्या मालमत्ता कर वसूलीबाबत.**

शहरातील नागरीकांना/व्यापा-यांना विविध व्यवसायासाठी तसेच प्रयोजनासाठी महानगरपालिकेच्या मालकीचे विविध गाळे/ मोकळ्या जागा भाडेतत्वावर देण्यात येतात.

अशा लिज धारकांकडून लिज रकमेसोबत मालमत्ता कराची वसूली करणे आवश्यक आहे. याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ (२) (ब) व १३९ (अ) मध्ये मालमत्ता कराबाबतची जबाबदारी जागा प्रत्यक्ष मनपाकडून धारण केल्या असतील तर त्यांच्या प्रत्यक्ष भोगवटाधारकाकडून मालमत्ता कराची वसूली करावी अशी स्पष्ट तरतूद आहे.

विभागाने अशा भोगवटादारांना मालमत्ता कर लागू केला किंवा नाही व त्यांचे कडून मालमत्ता करापोटी वसूल केलेल्या रकमेच्या तपशिलाबाबत त्यांच्या नावाच्या यादीसह तपशिल लेखापरीक्षणात उपलब्ध करून दिलेला नसल्याने अशा मालमत्तांच्या प्रत्यक्ष भोगवटा दारांकडून मालमत्ता कराची आकारणी व वसूली करण्यात येत आहे किंवा नाही , नसल्यास मालमत्ता करापोटी येणेबाकी रक्कम निर्धारित करून ती वसूल करण्यात यावी व तपशिलासह अनुपालन सादर करावे.

लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केल्याबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१३ : औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये रस्ता बांधणे, शाळा बांधणे, दवाखाना, नाका इमारत, आरक्षण जागा, शॉपींग सेंटर, उद्याने बनविणे व इतर कामासाठी भूसंपादन केलेल्या व त्यांना जमिनीचा देण्यात आलेल्या मोबदला (रक्कम )ची संचिका व नोंद रजिस्टर उपलब्ध करून न देणे बाबत.**

महानगरपालिका क्षेत्रामध्ये रस्ता बांधणे, शाळा बांधणे, दवाखाना बांधणे, नाका इमारत ,आरक्षण जागा, शॉपींग सेंटर, उद्याने बनविणे व इतर कामासाठी नागरीकांकडून भूसंपादन करण्यात आले व जमिनीचा मोबदला देण्यात आला त्या संचिका व नोंद रजिस्टर मध्ये केलेल्या नोंदी बाबतचा तपशिल लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देणेबाबत कळविण्यात आले होते. मात्र विभागाने लेखापरीक्षण पूर्ण होईपर्यंत सदरची माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्याने लेखापरीक्षण करता आले नाही, व योग्यतेबाबत खात्री करता आलेली नाही. या विषयाचे भूसंपादन व दिलेला मोबदला याचा अभिलेख परिपूर्ण व अद्ययावत करून लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१४ :मे.कार्टेल आऊट डोअर यांच्या कडून जाहिरातीची फी रक्कम रू.९,३७,९०३/- वी वसूली करणे बाबत.**

औरंगाबाद महानगरपालिका मार्फत जाहिरातीचे फलकाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ अन्वये जाहिरातीचे व आकाश चिन्ह इ.वर नियंत्रण करण्याची तरतूद आहे. या तरतूदीचा प्रभावीपणे अंमलबजावणी करून महानगरपालिका हद्दीत प्रदर्शित केल्या जाणा-या जाहिरातीवर नियंत्रण करण्याचे व त्यापासून महानगरपालिकेस उत्पन्न मिळविण्याचे प्रस्तावित केले आहे.

त्या अन्वये मे.कार्टेल, आऊट डोअर यांच्या संचिकाची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. क्रांतीचौक औरंगाबाद न.भू.क्र.१७३७५/३ (ला.न.१३१) संचिकेची तपासणी करतांना सन २०११-१२ व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात जाहिरातीचे मोजमाप हे ४०" x २०" = ८०० चौ.मी. अन्वये रक्कम रू.७६,३२०/- वसूल करावयास पाहिजे होती. परंतू संबंधिताने जाहिरातीचे मोजमाप हे २०" x २०" = ४०० चौ.मी. दर्शवून रक्कम

रू.३९,०००/- भरले आहेत. म्हणजेच रक्कम रू.३७३२०/- ही कमी वसूल करण्यात आली आहे.

२. सोबत तक्त्यातील अ.क्र. २, ६, ७ मध्ये (लायसन नं.१३५,१४४) बाबत सन २००५-०६ ते सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षापासून मनपाच्या धोरणानुसार जाहिरात फलक , अ वर्गानुसार शुल्क आकारणी करणे आवश्यक असतांना ब वर्गानुसार वसूली करण्यात आली आणि लायसन नं.१४३ बाबत सन २००५-२००६ ते सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षापासून मनपाच्या धोरणानुसार जाहिरात फलक ब वर्गानुसार शुल्क आकारणी करावयास पाहिजे असतांना क वर्गाचे दराने वसूली करण्यात आली. म्हणजेच अ.क्र.२,६ व ७ ची मनपाच्या धोरणानुसार जाहिरात फलकाची कमी वसूल केलेली रक्कम रू.३,८४,०३२/- वसूल करण्यात यावी, व चलनाचे प्रतिसह अनुपालन दर्शवावे.

३. मे.कार्टेल आऊट डोअर यांच्या सोबतच्या तक्त्यातील अ.क्र.३,४,५ व ८ यांची वर्षनिहाय एकत्रित थकित रक्कम रू.५,०३,८४९/- संबंधितांकडून वसूल होणे बाकी आहे.

४. कोतवालपुरा सी.बी.एस.रोड, घ.क्र.४-१७-४६/पी लायसन नं.१५२ मध्ये रोषणाई केलेले किंवा इलेक्ट्रॉनिक्स जाहिराती अन्वये रोषणाई चार्जेस वसूल होणे आवश्यक असतांना सन २००८-०९ व सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचे रोषणाई चार्जेस रक्कम रू.४२३४X३= १२७०२/- ही वसूल होणे आवश्यक असतांना वसूल करण्यात आली नाही.

त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५,३८६ व ठराव क्र.५७८/८ दिनांक २८.२.२००२ अन्वये मालमत्ता विभागाने पूर्तता न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने मुद्दा क्र. १ ते ४ बाबत विभागाने मे.कार्टेल आऊट डोअर यांच्याकडून जाहिरात फलकाची एकत्रित रक्कम रू.९,३७,९०३/- ची वसूली करावी. ती मनपा निधीत जमा करून संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून अनुपालन दर्शवावे. (सोबत : परिशिष्ट -अ)

**<u>वसूलीस पात्र रक्कम रू.९३७९०३/-</u>**

**परिच्छेद क्र.१५ : मे.अनिल ॲडस्, एस.बी.कॉलनी,औरंगपुरा यांच्या जाहिरात फलक संचिकाची तपासणी बाबत.(रक्कम रू.२,०६,३३५/-)**

औरंगाबाद महानगरपालिके मार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी दिलेल्या जाहिरात फलकाच्या एजन्सी मे.अनिल ॲडस यांच्या संचिकाची तपासणी केली असता सोबत जोडलेल्या तक्त्यात संबंधिताने जाहिरातीचे मोजमाप कमी दर्शविणे, जाहिरात फलकाच्या वर्गवारीनुसार वसूली न होणे इत्यादी बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. त्याबाबतचे सविस्तर वर्णन पुढील प्रमाणे -

१. मे.राजु बोरसे,ड्रायक्लिनर्स, मिलकॉर्नर घ.क्र.५-६-४८, लायसन नं.१८५ मध्ये रोषणाई केलेले किंवा इलेक्ट्रॉनिक्स जाहिराती अन्वये रोषणाई चार्जेस वसूल होणे आवश्यक

असतांना सन २०११-१२ व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे रोषणाई चार्जेस रक्कम रू.५६०८/- ही वसूल करण्यात आलेली नाही.

२. मे.कृष्णा भोसले, अंबा टॉकीज जवळ,नागेश्वरवाडी, लायसन नं.१८९ बाबत सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून मनपाच्या धोरणानुसार जाहिरात फलक ब वर्गानुसार शुल्क आकारणी करणे आवश्यक असतांना क वर्गाच्या दराने वसूली करण्यात आली. त्यामुळे महानगरपालिकेचे रू.३२,०००/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. मे.अनिल ॲडस् एस.बी.कॉलनी, औरंगपुरा यांच्या तक्त्यातील अ.क्र.३,४,५ वर्षनिहाय एकत्रित थकित रक्कम रू. १,६८,७२७/- ही रक्कम संबंधिताकडून वसूल करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ व मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.५७८/८ दिनांक २८.२.२००२ अन्वये मालमत्ता विभागाने पूर्तता न केल्यामुळे मनपाचे रू. २,०६,३६५/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने मुद्या क्र. १ ते ३ बाबत संबंधित एजन्सीकडून कमी भरणा केलेली रक्कम वसूल करून मनपा फंडात जमा करावी तसेच इतर अनियमिततेबाबत संबधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

(सोबत : परिशिष्ट -ब)

**<u>वसूलीस पात्र रक्कम रू.२,०६,३६५/-</u>**

## परिच्छेद क्र.१६ : राहुल मस्के यांना एन-९ एम-२ कम्युनिटी सेंटर भाडेतत्वावर पुल टेबल चालविण्यास देणे बाबत.

एन-९ एम-२, येथील महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले कम्युनिटी सेंटर मधील हॉल, क्रिडा विभागामार्फत भाडेतत्वावर देण्यात आले होते. सदरील हॉल दिनांक ७.८.२०१२ रोजी जा.क्र.मनपा/क्रिडा/८१/२०१२ रोजीच्या पत्रान्वये पुल टेबलचा हॉल नोटीस अन्वये २४ तासाच्या आंत रिकामे करावे असे आदेशित झाल्यानंतर दिनांक ८.८.२०१२ पासून हॉल रिकामे करून बंद करण्यात आले होते.

त्यानंतर दिनांक १६.१०.२०१२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत वरील हॉलबाबत श्री.राहुल मस्के यांनी पुल टेबल चालविण्यासाठी सन २०१२च्या सिध्द शिघ्र गणकाये भाडे रू.६१००/- प्रतिमाह एवढे आकारून मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम व इतर शुल्क आणि इतर कर इत्यादीसह अटी / शर्तीस अधिन राहून तीन वर्षाचे कालावधी करीता हॉल भाडे तत्वावर देण्यास मंजूरी देण्यात आली. त्यानुसार दिनांक ७.११.२०१२ रोजी मालमत्ता विभागामार्फत सदरील हॉलचा ताबा देण्यात आला.

संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. एन-९ एम-२ येथील कम्युनिटी हॉल हा क्रिडा विभागामार्फत दिनांक ८.८.२०१२ पूर्वी चालविला जात असे. म्हणजेच संबंधित हॉल बाबत विभागाने केलेला करारनामा व संबंधितांकडून किती वर्षापासून भाडे वसूल केले याबाबतचे सर्व लेखे मालमत्ता

विभागाने क्रिडा विभागाकडून हस्तगत करून लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात यावे असे कळविल्यानंतरही संबंधित विभागाने अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत.

२. एन-९ एम-२ येथील कम्युनिटी सेंटरच्या वरील पहिल्या मजल्यावरील हॉल श्री.राहुल दादाराव मस्के यांना करारनामा करून दिल्यानंतर ताबा पावती संचिकेत उपलब्ध आहे. परंतू ताबा पावतीवर तारीख नमूद नसल्याने संबंधितांना ताबा कोणत्या तारखेपासून दिला याचा बोध होत नाही.

विभागाने मुद्या क्र. १ व २ बाबत माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्याने लेखापरीक्षण करता आले नाही. पुढील लेखापरीक्षणापूर्वी सर्व अभिलेखे उपलब्ध ठेवावेत. त्याचप्रमाणे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.१७ : श्रेयनगर येथील सभागृह हॉल भाडे वसूली बाबत. (रक्कम रू.३७,०८०/-)**

मोहल्ला श्रेयनगर हनुमान मंदिरा समोरील महानगरपालिकेच्या मालकीचे सभागृह श्रेयनगर उत्कर्ष मंडळ या संस्थेस दि.३०.३.२००७ रोजी संपन्न झालेल्या (कार्यालयीन परिपत्रक क्र.२६) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त विषय क्र.३३७ प्रमाणे प्रति माह भाडे रू.१०००/- प्रमाणे वार्षिक भाडे रक्कम रू.१२,०००/- तसेच भाडेतत्वावर देणे करीता अनामत रक्कम रू.१२,०००/- व सेवाशुल्क रू.५/- प्रति चौ.मी.प्रतिमाह नुसार क्षेत्रफळ १०८.९९ चौ.मी.देण्यात आले.

तसेच मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व विद्युत देयक संबंधित सोसायटीस भरणा करावे लागेल त्यास मा.आयुक्त यांनी संचिकेतील पृष्ठ क्र. एनएस-३ परिच्छेद क्रमांक ८ अन्वये मंजूरी देण्यात आली. त्यानुसार करारनामा करण्यात आला.

संचिकेतील तपासणीअंती खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेतील पृष्ठ क्रमांक एनएस-७ व एमएस-८ वर सन २००७-०८ मध्ये प्रति माह रू.१०००/- प्रमाणे वार्षिक भाडे रू.१२,०००/- जनरल पावती पुस्तक क्रमांक २२०२ पा.क्र.२२०१७२ दिनांक १९.५.२००७ आणि एका वर्षाची अनामत रक्कम व सेवाशुल्क रक्कम अशी एकत्रित रक्कम रू.१७९६५/- जनरल पावती पुस्तक क्र.२३०६ पा.क्र.२३०५५१ दिनांक ६.१०.२००७ अन्वये वसूली करण्यात आली. सन २०१०-११ व सन २०११-१२ ची भाड्याची रक्कम भरलेली आहे. परंतू सन २००८-२००९, सन २००९-१० व सन २०१२-२०१३ या वर्षाची भाड्याची रक्कम रू. ५३,८९५/- संबंधितांकडून वसूल केलेली नाही असे निदर्शनास आले.

२. भाडेपट्टा करारनाम्यामधील अट क्र.५ अन्वये करारनाम्याच्या तारखेपासून तीन वर्षांनी प्रचलित भाड्यात १५% इतकी वाढ करण्यात येईल असे असतांना विभागाने भाडेवाढीसह रक्कम वसूल केलेली नसल्याने महानगरपालिकेचे रू.१८००/- प्रतिवर्ष

प्रमाणे ३ वर्षाचे रक्कम रू.५४००/- वसूली न झाल्यामुळे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. संचिकेतील दिनांक ३०.३.२००७ रोजी संपन्न झालेल्या (का.प.क्र.२६)स्थायी समिती सभेचे इतिवृत्तातील मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व विद्युत देयक संबंधित सोसायटीस भरणा करणे आवश्यक असतांना संस्थेने संबंधित कर व विद्युत देयक भरणा केल्याबाबतचे अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नसल्याने अभिलेख्यांची तपासणी करता आलेली नाही.

विभागाने मुद्या क्र. १ अन्वये ५३,८९५/-, मुद्या क्र. २ अन्वये ५४००/- असे एकूण ५९,२९५/- संबंधितांकडून वसूल करून मनपा फंडात भरणा करावे. तसेच मुद्या क्र.३ बाबत मालमत्ता कर व इतर बाबी संबंधी संबंधितांवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. सदरील जागेवर मालमत्ता कराची आकारणी झालेली नसल्यास त्याची आकारणी करून संबंधितांकडून रक्कम वसूल करून अनुपालन दर्शवावे.

**वसूलीस पात्र रक्कम रू.५९,२९५/-**

**परिच्छेद क्र.१८ : औरंगाबाद महानगरपालिका सिडको कार्यक्षेत्रासह जाहिरात फलकाबाबत.**

महानगरपालिके अंतर्गत शहरात जाहिरात फलके, कि-ऑक्स ॲड पोल्स, होर्डिंग्ज लावण्या संदर्भात महानगरपालिकेने दिनांक ८.१०.२००३ रोजी मे.सेल्स ॲड एजन्सीला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार एकूण २५२ होर्डिंग्ज, १५०० किऑक्स व ५०० ॲड पोल्स लावण्यास मान्यता दिलेली आहे. औरंगाबाद शहरात जाहिरात होर्डिंग्ज, किऑक्स आणि जाहिरात फलक लावण्याकरीता मे.सेल्स ॲड या एजन्सीने उपायुक्त (म), महानगरपालिका , औरंगाबाद यांनी दिनांक ११.६.२००३ च्या कार्यदेशानुसार व दिनांक ८.१०.२००३ च्या सविस्तर आदेशानुसार परवानगी दिलेली आहे. जाहिरात बुथ ४ ते १९ मधील एकूण १६ कॅटेगरी A,B व c असे एकूण २५२ होर्डिंग्ज, १५०० किऑक्स व ५०० ॲड पोल्स लावण्यास अनुमती देण्यात आली असून करारनाम्यानुसार अ.क्र.१ - ८ (ए) सदरील एजन्सीने रक्कम रूपये ३८,८१,२५१/- च्या ५०% रक्कम करारनामा करतेवेळी व उर्वरीत ५०% रक्कम तद्नंतर सहा महिन्याच्या आंत महानगरपालिकेत भरणा करणे आवश्यक होते. त्यापैकी पहिला हप्ता १९,४०,९२६/- चा भरणा दिसून येतो. मात्र त्यानंतर उर्वरीत रक्कम १९,४०,९२६/- ज्या दिवसापासून रक्कम भरणा केली नाही त्या दिवसापासून अट क्र. १.८(बी) वार्षिक १८% व्याजासह अदा करणेबाबत स्पष्ट उल्लेख आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मा.लवादाचा निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमधील जाहिरात फलक, ॲड पोल्स व किऑक्स अशा प्रकारे मे.सेल्स ॲड यांनी जाहिरात केलेली आहे. सदरील जाहिरात शुल्क व कर वसूली प्रकरणांत एजन्सीने दाखल केलेल्या आरबीट्रेशन प्रोसेडिंग मध्ये लवाद प्रमुख मा.न्यायमुर्ती श्री.नरेंद्र चपळगांवकर यांनी दिनांक ०३.०६.२००८ रोजी अवॉर्ड घोषित करून मे.सेल्स ॲड यांना रक्कम रू.

५२,४१,३१६/- महानगरपालिकेत भरणा करण्याबाबत निर्णय दिला आहे. त्याच बरोबर सदर निर्णयातच असेही नमूद केले आहे की, अवॉर्ड घोषित केलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ३.६.२००८ पासून एक महिन्यात महानगरपालिकेस उक्त नमूद रक्कम ५२,४१,३१६/- भरणा करणे बाबत आणि सदरील रकमेचा भरणा न केल्यास दिनांक ३.६.२००८ पासून ९% प्रमाणे व्याजासह रकमेचा (भरणा करेपर्यंत) भरणा करण्याचे आदेशित केले आहे. लवादाच्या निर्णयानुसार मे.सेल्स ॲड्स एजन्सी यांचे कडून रू.५२,४१,३१६/- अधिक त्यावरील ९% दराने व्याज वसूल होणे आवश्यक आहे. उपलब्ध संचिकेनुसार सदर एजन्सीने अद्यापपावेतो रक्कम जमा केल्याचे दिसून आलेले नाही. तेंव्हा लेखापरीक्षण कालावधीपर्यंतचे व्याजासह एकूण रू.७७,१७,८३८/- महापालिका निधीत जमा करून घेवून अनुपालन दर्शवावे.

२. तसेच सदरील प्रकरणांत दिनांक ३०.६.२००८ च्या अवॉर्डानुसार दिनांक ८.१०.२००८ रोजीच सदरील एजन्सीबरोबरचा कराराचा कालावधी संपलेला आहे. त्यामुळे सदरील एजन्सीने लावलेले जाहिरात फलक ॲड पोल्स व किऑक्स हे अनधिकृत असून ते तात्काळ काढून घेण्याच्या सूचना दिनांक १०.८.२००९ रोजीच्या पत्राने दिल्याचे दिसून येते. मात्र विभागाने त्यानंतर काही कार्यवाही केल्याचे दिसून आली नाही. परंतू त्या संदर्भातील पुढील कार्यवाहीचा तपशिल उपलब्ध करून दिलेल्या संचिकेत आढळून आलेला नाही. त्यामुळे सदर एजन्सी अद्यापही जाहिरात फलक, होर्डिंग्ज लावणे इ. मूळ करारानुसार करत असल्याचे स्पष्ट होते. सदर प्रकरण न्याय प्रविष्ट असल्यास त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे? याबाबत खुलासा करण्यात यावा. मूळ करार दोन वर्षाकरीता होता, त्यानंतर पुन्हा निविदा प्रक्रिया करून नैसर्गिक वाढीच्या तत्वाने यात मनपास होणा-या आर्थिक लाभांपासून वंचित राहावे लागले आहे. या बाबींचा विचार करून न्यायालयीन प्रक्रिया पूर्णत्वास नेणेकरीता विभागाने काय प्रयत्न केले याबाबत खुलासा करण्यात यावा.

विभागाने मुद्या क्र.१ अन्वये संबंधितांकडून ७७,१७,८३८/- वसूल करून मुद्या क्र.२ बाबत खुलासा सादर करावा. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**<u>वसूलीस पात्र रक्कम रू.७७,१७,८३८/-</u>**

**परिच्छेद क्र.१९ : पैठणगेट येथील सादिया मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील मिर सलामी हॉल मधील जागा शहर वाहतूक शाखा कार्यालयास भाडेतत्वावर देणे बाबत.**

पैठणगेट येथील मिरसलामी हॉल येथे वाहतूक शाखेच्या कार्यालयासाठी स्थायी समिती सभेचे इतिवृत्त विषय क्र.३१, दिनांक ३.८.२०१२ नुसार हॉलचे क्षेत्रफळ २८० चौ.मी. २५,५००/- प्रतिमाह भाडे दराने पाच वर्षाचे कालावधी करीता मंजूरी देण्यात आली. मा.आयुक्त यांनी दिनांक ४.८.२०१२ नुसार मान्यता दिली आहे.

संचिका तपासणी मध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरील हॉलचा ताबा दिनांक ८.८.२०१२ रोजी देण्यात आला जागा भाडेचा करारनामा करण्यात आलेला नाही.

२. प्रतिमाह भाडे २५५००x१२ = ३,०६,०००/- सेवाकर १२.३६% ने ३७८२१/- असे एकूण रू. ३४३८२२/-, एक वर्षाचे अनामत रक्कम ३,०६,०००/- चा भरणा केला नाही. एका वर्षाची अनामत रक्कम व एक वर्षाचे भाडे अशी एकूण रक्कम रू.६,४९,८२१/- संबंधित विभागाकडून वसूल केलेली नाही.

विभागाने मुद्या क्र.१ अन्वये संबंधितांसोबत करारनामा करण्याची कार्यवाही करावी. मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.६,४९,८२१/- मनपा फंडात भरणा करावी. उपरोक्त बाबींबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**<u>वसूलीस पात्र रक्कम रू.६,४९,८२१/-</u>**

**परिच्छेद क्र.२० : उस्मानपुरा पीर बाजार येथील मनपा शाळा क्र.४१ ची इमारत पोलिस स्टेशन साठी भाडेतत्वावर देणे बाबत. ( सिटी सर्वे क्र.१६५६१ ते १६५६५)**

भाडे समितीने ठरविलेल्या बैठकीत महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध ठिकाणच्या जागा भाड्याने घेणे व देणे बाबत दर निश्चित करण्यात आले. त्यानुसार इतिवृत्तातील अ.क्र.४ अन्वये मोहल्ला पीर बाजार उस्मानपुरा येथील महानगरपालिका शाळा शहर पोलिस वाहतूक शाखा यांना भाडेतत्वावर देणेसाठी क्षेत्रफळ ३१५.३२ प्रति चौ.मी.सिध्दशिघ्र गणकानुसार भाडे रूपये १२५/- प्रति चौ.मी.प्रति माह दराने आकारणी करणे आणि मासिक भाड्याच्या बारापट रक्कम अनामत रक्कम म्हणून स्विकारणे. भाड्याची वसूली करतांना सेवाशुल्क स्वतंत्रपणे वसूल करणे इत्यादीबाबत निर्णय घेण्यात आला. असे संचिकेतील अभिलेख्यावरून निदर्शनास आले. संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-३ परिच्छेद क्र.१४ अन्वये मा.आयुक्त यांनी दिनांक ८.२.२०१० रोजी मान्यता देण्यात आली. त्यानुसार शहर पोलिस वाहतूक शाखा यांना जागेचा ताबा दिनांक १.७.२०१० रोजी देण्यात आला.

संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१ . भाडे समितीने इतिवृत्तामध्ये नमूद असल्याप्रमाणे उस्मानपुरा पीरबाजार येथील शाळा भाडेतत्वावर पोलिस स्टेशनसाठी देण्यापूर्वी मा.स्थायी समिती / मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रशासकीय प्रस्ताव ठेवून त्यास मान्यता घेणे आवश्यक होते. तथापि, मालमत्ता विभागाने उपरोक्त प्रकरणी मंजूरी न घेता सदरील जागा संबंधितांना देण्यात आली.

२. सदरील प्रकरणी उस्मानपुरा पोलिस स्टेशन यांना भाडेतत्वावर दिलेल्या जागेसंबंधी भाड्याची रक्कम व अनामत रक्कम भरणा करणे संदर्भाने स्मरणपत्र-१ जा.क्र.मनपा/जनगणना/२९६८/२०१३, दिनांक ३०.१.२०१३ नुसार पोलिस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना भाडे अदा करणेसाठी पत्र देण्यात आले. पत्रात दि.१.७.२०१० ते ३१.७.२०१३ पर्यंतचे भाडे तसेच एक वर्षाचे अनामत रक्कम रू.३,९५,०००/- असे एकत्रित रक्कम रू.१७,९०,५०४/- चा भरणा करण्यासाठी कळविण्यात आले होते. मालमत्ता विभागाने सदरील पत्रात दुरूस्ती करून सुधारित पत्र देवून त्यात रक्कम रू.१९,७०,५७४/- भरणे बाबत संबंधित भोगवटादारास

कळविले आहे. संबंधिताने रक्कम महापालिकेत भरणा केलेली नाही. तसेच भाडेतत्वावर दिलेल्या जागेबाबत करारनामा सुध्दा केलेला नाही.

विभागाने मुद्या क्र. १ अन्वये सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी. मुद्या क्र.२ अन्वये रक्कम रू.१९,७०,५७४/- संबंधितांकडून वसूल करून मनपा फंडात भरणा करावी तसेच इतर अनियमिततेबाबत संबंधित कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.२१ : महानगरपालिकेच्या मालकीच्या पन्नालालनगर /श्रेयनगर आरक्षण क्र.१०५ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी ३३ केव्ही उपकेंद्रासाठी भाडे तत्वावर दिलेल्या जागेच्या भाडे वसूलीबाबत.**

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीची औरंगाबाद शहराच्या विकास योजनेमधील आरक्षण क्र.१०५, खुली जागा मो.पन्नालालनगर न.भू.क्र.१५८५६/४ जिचे एकूण क्षेत्रफळ ८४२४ चौ.मी. असून त्यापैकी ५५२५ चौ.मी. जागा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास उपकेंद्रासाठी भाडेपट्टयावर देण्यात आलेली आहे.

शासन नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई कडील निर्णय क्रमांक टिपीस -३०९३ /०७१ /सीआर /७५/९३,दिनांक ८.३.९५ अन्वये ताबा देण्यात आलेला आहे. तद्नंतर मनपा स्थायी समितीस ठराव क्र.३१७१, दिनांक २८.१२.७५ नुसार प्रति वर्ष रक्कम रू.२,०८,०००/- एवढी रक्कम भाडेपोटी निश्चित करण्यात आली. जागेचे संरक्षण भिंती व जागेचे सपाटीकरणाकरीता झालेल्या खर्चाची रक्कम रू.१,८४,३५९/- इतका आहे. भाडे व खर्च याबाबतची एकत्रित रक्कम रू.३,९२,३५९/- विद्युत विभागाने भरणा करणे आवश्यक आहे. असे निदर्शनास आले.

संचिकेची सविस्तर तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. पन्नालालनगर / श्रेयनगर आरक्षण क्र.१०५, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना जागेचा ताबा दिल्यानंतर अटी/शर्तीनुसार करारनामा करणे आवश्यक असतांना मालमत्ता विभागाने तसा करारनामा करून घेतलेला नाही.

२. संचिकेतील एनएस-५ परि.क्र.१७ प्रमाणे श्रेयनगर येथील आरक्षण क्र.१०५ खुल्या जागेचे भाडे सन १९९५ ते १९९७ या दोन वर्षाचे भाडे ४,१६,०००/- व सपाटीकरणाची रक्कम रू. १,८४,३५९/- अशी एकूण रक्कम रू.६,००,३५९/- चेक क्र.८४७२१७, दिनांक ३१.२.९७ जनरल पावती पुस्तक क्र. १०९८ / १०९७५३ दिनांक ३१.३.९७ अन्वये भरणा करण्यात आलेली आहे. तद्नंतर प्रतिवर्ष भाडे वसूल न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. संचिकेतील परि.क्र.८०,८१, १०७ व १०८ नुसार सन २००४ साली रू.२६,५६,७१८/- माहे जून २००४ मध्ये मनपा कडून महावितरण कंपनीचे देय असलेल्या विज बिल क्र. (ग्राहक क्र.) ४९९०१९०००७९०/ दिनांक १६.६.२००४ मध्ये खालील प्रमाणे रकमेचे समायोजन करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| मागील थकबाकी | - | १२,८०,६०१/- |
| व्याजाची एकूण रक्कम | - | १४,००,१६२/- |
| | - | **२६,८०,७६३/-** |

महावितरणचे पत्र क्र.०४९५४ दिनांक १.११.२०१० मध्ये थकित बाबी रकमेचा समायोजित करण्यात आले. समायोजन केलेली रकमेबाबत मा.स्थायी समिती किंवा मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली नाही व मुद्यल रक्कम रू.१२,८०,६०१/- असे असतांना महावितरण कंपनीने रक्कम रूपये १४,००,१६२/- चे व्याज समायोजन बिलात वसूल केले. महावितरण कंपनीने थकित विद्युत बिलाच्या मुद्यल रकमेवर मुद्यलीपेक्षा जास्तीचे व्याज आकारलेले आहे. याबाबतची शहानिशा महानगरपालिकेचा विद्युत विभाग व मालमत्ता विभाग यांनी केलेली नाही असे स्पष्ट होते. महानगरपालिकेच्या जागा भाडेतत्वावर दिल्यानंतर जागेचे भाडे भरणा करणे ही संबंधित भाडेकरूची जबाबदारी आहे. या प्रकरणांत भाडेकरू महानगरपालिकेकडून येणा-या विद्युत बिलापोटीच्या रकमेतून भाड्याची रक्कम परस्पर वळती करीत असेल तर ही बाब महानगरपालिका भाडेकरू सोबत करीत असलेल्या करारनाम्यातील अटी / शर्तीमध्ये नमूद नाही. मालमत्ता विभागाने वेळीच संबंधितांसोबत करारनामा केलेला नसल्यामुळे महानगरपालिकेचे उपरोक्त नुसार आर्थिक नुकसान होत आहे.

४. दिनांक २४.२.२०१२ रोजी मा.आयुक्त यांनी मा.सहाय्यक संचालक नगररचना व मालमत्ता अधिकारी यांना सदरील Allotment रद्द करण्यासाठी आदेशित केलेले आहे.

विभागाने संबंधितांकडून रक्कम रू.२०,४७,३९९/- वसूल करून, महापालिका फंडात भरणा करावा तसेच इतर अनियमिततेबाबत मालमत्ता व विद्युत विभागातील अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२२ :सेवानिवृत्त कर्मचारी / मयताचे वारस अद्याप मनपाच्या निवासस्थानाचा वापर करत असल्याबाबत.**

मालमत्ता विभागाचे सन २००५-०६ ते सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षणा दरम्यान महानगरपालिकेने पुरविलेल्या निवासस्थांनाचा जे कर्मचारी सेवानिवृत्ती नंतर, तसेच ज्या मयत कर्मचा-यांचे वारस कर्मचा-याच्या मृत्यू नंतरही वापर करीत आहेत अशा निवासस्थानांचा तपशील, त्यापासून वेळोवेळी सुधारित दराने होणारे भाडे, वसूल रक्कम, थकित रक्कम इ.ची मागणी करून देखील विभागाने तसे काहीच अभिलेखे तपासणी करीता उपलब्ध करून दिलेले नाहीत. सध्या रिक्त असलेल्या निवासस्थानांचा तपशिल देखील लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करून दिलेला नाही. महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ६० (१) (ब) नुसार कर्मचा-याने नोकरीचा राजीनामा दिल्यावर बडतर्फ करण्यात आल्यावर, काढून टाकण्यात आल्यावर किंवा तो सेवानिवृत्त झाल्यावर अशी जागा सोडली पाहिजे किंवा आयुक्तास महानगरपालिकेच्या संमतीने, त्यास तसे करण्यास फर्माविणे आवश्यक व इष्ट आहे असे वाटेल तेव्हा त्याने अशी जागा सोडली पाहिजे व तसे न केल्यास कलम ६० (२) नुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे. परंतु सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाने अशी कोणतीही कार्यवाही केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध

झालेले नाही. त्यामुळे अशा निवासस्थानांच्या वापरापासून कार्यरत कर्मचारी वंचित राहत आहेत. थकित भाडे वसूलीबाबत कार्यवाही करण्यात येत नसल्याने महानगरपालिका आर्थिक हानी सोसत आहे. प्रकरणी सर्व माहितीसह तपशिलासह अनुपालन करणे आवश्यक आहे तसेच या संदर्भातील त्रुटींबाबत प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.२३ : महानगरपालिकेच्या विविध निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांच्या वेतनातून घरभाडे कपात होत नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, महानगरपालिके अंतर्गत विविध विभागातील कर्मचारी निवासस्थानाचा वापर साधारणपणे एक ते २० वर्षापासून करीत आहेत. या संदर्भात मालमत्ता विभागास माहिती मागविली असता त्यात कर्मचारी प्रत्यक्ष कोणत्या दिनांकापासून निवासस्थानात वास्तव करत आहेत ते नमूद न करता माहिती देण्यात आली आहे. तेंव्हा या संदर्भात प्रत्येक कर्मचा-यांस निवासस्थान दिल्यापासून त्यांच्या कडून वसूल करण्यात आलेल्या रकमेचा तपशील लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून देण्याबाबत मागणी करून देखील तसा तो उपलब्ध करून दिलेला नाही. या बाबत असे निदर्शनास आले आहे की, कित्येक कर्मचा-यांकडून निवासस्थान भाड्यापोटी रक्कम वसूल करण्यात येत नसल्याने महानगरपालिकेचे अत्यंत मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. पुरविलेल्या माहिती नुसार अनेक ठिकाणी नुसते ‘मयत’ व ‘सेवानिवृत्त ’ असे नमूद केले आहे. सदर निवासस्थान प्रत्यक्ष कोणाचे ताब्यात आहे त्याचा तपशील दिलेला नाही. तसेच त्यापासून रक्कम देखील वसूल होत नाही असे स्पष्ट होत आहे.

**उद्यान अधिक्षक यांच्या कडून प्राप्त माहितीनुसार**

**महानगरपालिकेच्या निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांची यादी**

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | निवासस्थानाचे ठिकाण | कालावधी | कोड नं. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.अशोक भावराव जाधव | सिध्दार्थ उद्यान | १० वर्ष | २९६७ |
| २ | श्री.माधव जयराम दाभाडे | नंदनवन कॉलनी उद्यान | १० वर्ष | २३९६ |
| ३ | श्री.नारायण धर्मा चव्हाण | भावसिंगपुरा उद्यान | १० वर्ष | ४६६१ |
| ४ | श्री.अमरसिंग यशवंता सुरडकर | नेहरू बाल उद्यान | १० वर्ष | ४५४३ |
| ५ | श्री.राधाकिसन देवराव बनकर | स्मृतिवन उद्यान हर्सूल | १० वर्ष | २४०४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | श्री.शिवाजी मुरलीधर माने | भाग्यनगर उद्यान | ६ महिने | ४५६७ |
| ७ | श्री.सुदाम गोविंद कुलकर्णी | जालाननगर उद्यान | १० वर्ष | १४०२ |
| ८ | श्रीमती पुष्पाबाई रमेश साळवे | पदमपुरा उद्यान | १० वर्ष | ३३९८ |
| ९ | श्री.अरूण मच्छिंद्र लावंड | कवितेची बाग ज्योतिनगर | १० वर्ष | ४५६२ |
| १० | श्री.हरीभाऊ सखाराम घोडके | जवाहर कॉलनी उद्यान | १० वर्ष | ४५७९ |
| ११ | श्री.धनंजय उत्तरेश्वर इंगोले | अहिंसानगर उद्यान | १० वर्ष | ४५२३ |
| १२ | श्री.अंकुश शेषराव भाकरे | विश्वभारती कॉलनी उद्यान | १० वर्ष | ४५२० |
| १३ | श्री.जगन्नाथ लक्षमण पवार | सहकारनगर उद्यान | १० वर्ष | २३८५ |
| १४ | श्री.उत्तम रूपा चव्हाण | शास्त्रीनगर उद्यान | १० वर्ष | ४२१० |
| १५ | श्री.नामदेव संभाजी दवणे | साईनगर उद्यान | १० वर्ष | ४५७५ |
| १६ | श्री.पुंडलिक भावराव मानकापे | सेवन हिल उद्यान | १० वर्ष | ४५६० |
| १७ | श्री.मुकुंद सखाराम साळवे | सुराणानगर उद्यान | १० वर्ष | २४०१ |
| १८ | श्री.शेख रहिम शेख नुर | मोतीवालानगर उद्यान | १० वर्ष | २४०० |
| १९ | श्री.सुभाष रंगनाथ खैरनार | विद्यानगर उद्यान | १० वर्ष | ४५२६ |
| २० | श्री.सौदागर फुलचंद कांदे | आदित्यनगर उद्यान | १० वर्ष | ४५८६ |

**मालमत्ता अधिकारी यांच्या प्राप्त माहितीनुसार**

**महानगरपालिकेच्या निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांची यादी**

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | निवासस्थानाचे ठिकाण | कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| १ | पाटील नयनसिंग | शहागंज जलकुंभ | पाणी पुरवठा विभाग |
| २ | कांबळे विलास धोंडीराम | दिल्ली गेट | |
| ३ | शेजवळ किशोर शेषराव | बायजीपुरा | उद्यान विभाग |
| ४ | सोनवणे गयाबाई सुर्यभान | बायजीपुरा | उद्यान विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | हफीजाबी फजल | बायजीपुरा | शिक्षण विभाग |
| ६ | कांबळे केतन बळीराम | बायजीपुरा | वॉर्ड -क |
| ७ | धिल्लोड धरमवीर | बायजीपुरा | झु विभाग |
| ८ | अब्दुल शफिक सिद्यीकी | भडकलगेट | वॉर्ड -ड |
| ९ | गायकवाड किरण | कांचनवाडी | वॉर्ड -फ |
| १० | रणयेवले पप्पुलाल | कांचनवाडी | वॉर्ड - फ |
| ११ | पवार कैलास गंगाराम | राहुलनगर | सेवानिवृत्त |
| १२ | शेख परवेज शेख बाबु | कोटला कॉलनी | यांत्रिकी विभाग |
| १३ | शेख युसुफ शेख महमुद | नेहरू भवन | सेवानिवृत्त |
| १४ | अखिल अहमद | नेहरू भवन | मालमत्ता विभाग |
| १५ | शिंदे दत्तात्रय विनायक | पैठणगेट | मयत |
| १६ | पवार रमेश नामदेव | ज्युब्लीपार्क | सेवानिवृत्त |
| १७ | दिपक आर पारधे | विद्यापीठ गेट | शिक्षण विभाग |
| १८ | शेख हफीज शेख हनीफ | सिध्दार्थ उद्यान | उद्यान विभाग |
| १९ | एल दलबहादूर | एन-११ | |
| २० | अकबर जमाल | कें.प्रा.शा.किराडपुरा-१ | शिक्षण विभाग |

तरी वरील निवासस्थानाचा वापर करीत असलेले कर्मचा-यांच्या वेतनातून निवासस्थान वापर करीत असलेल्या दिनांकापासून थकबाकी व चालू हप्ते कपात करण्याची कार्यवाही केली किंवा नाही याबाबतचा खुलासा अहवाल अंतिम होईपर्यंत लेखापरीक्षण विभागास सादर केलेला नसल्याने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२४ : कर्मचारी / अधिका-यांना मनपा अंतर्गत वाटप केलेल्या निवासस्थानाच्या दुरूस्ती खर्चाबाबत.**

मनपा अंतर्गत कार्यरत कर्मचारी / अधिका-यांना राहण्यासाठी निवासस्थान विविध ठिकाणी वाटप करण्यात आले असून त्या निवासस्थाना करीता सन २००५-०६ ते आजपावेतो निवासस्थान निहाय किती खर्च करण्यात आला याबाबतची तपशिलवार माहिती उपलब्ध

करून देण्यासाठी उपअभियंता (इमारत /बांधकाम) यांना जा.क्र.मनपा/मुलेप/२८८/१३, दिनांक २९.११.२०१३ अन्वये पत्र देण्यात आले असून त्यांनी अद्यापपर्यंत सदरील माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्याने त्याबाबत वसूल होणारे भाडे आणि देखभाल दुरूस्तीवर होणारा खर्च याचा ताळमेळ लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

विभागाने पुढील लेखापरीक्षणापूर्वी सर्व अभिलेखे अद्ययावत ठेवावेत. माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्याने मालमत्ता विभाग , उपअभियंता (इमारत व बांधकाम) विभाग यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२५ : श्री. अखील अहेमद (वॉचमन) यांच्या निवासस्थानाबाबत.**

श्री.अखील अहेमद (वॉचमन) यांना नेहरू भवन येथील निवासस्थान रेन्ट फ्री तसेच घरभाडे भत्ता वसूल करण्यात येणार नाही या अटीवर २४ तास सेवेसाठी/राहण्यासाठी आदेश जा.क्र.मनपा/मा.म.अ/५०१/२००७ दिनांक ३०.३.२००७ प्रदान करण्यात आले आहे. माहे जुलै २००६ ते फेब्रुवारी २००७ या कालावधीत संबंधित कर्मचा-याच्या मासिक वेतनातून कपात करण्यात आलेले घरभाडे व घरभाडे भत्ता संबंधितास परत देण्यात यावा तसेच माहे मार्च २००७ च्या मासिक वेतनातून घरभाडे भत्ता कपात करण्यात येवू नये असा उल्लेख करण्यात आला.

कोणताही कर्मचारी सतत चोवीस तास सेवा वर्षानुवर्षे देवू शकत नाही, हे प्रचलित कामकाज नियमात अनुकुल नाही. कर्मचा-यास दिवसातून आठ तास सेवा, आठवडी सुट्टी या सवलती प्रचलित कायद्यान्वये देणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे भाडे माफ (Rent Free) निवासस्थान देण्याकरीता आदेशात नमूद केलेले कारण समर्थनिय ठरत नाही. वास्तविक महानगरपालिकेकडील अत्यावश्यक सेवेतील कोणत्या पदांना भाडे माफ (Rent Free) निवासस्थान अनुज्ञेय करावयाचे याबाबत एक समान धोरण निश्चित करून त्यानुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. या संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार सक्षम प्राधिकरणाची मान्यता न घेता एका विशिष्ट प्रकरणांत अशा प्रकारे भाडे माफ (Rent Free) निवासस्थान देणे लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

विभागाने संबंधित कर्मचा-याकडून त्यांना निवासस्थान दिल्याच्या तारखेपासून भाड्याची रक्कम परिगणित करून, वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करण्यात यावी. तसेच संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२६ : महानगरपालिकेचे अधिकारी /कर्मचारी निवासस्थानाबाबत.**

महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी निवासस्थानाबाबतची खालील प्रमाणे माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी.

१) महानगरपालिका अधिकारी वर्ग १ व वर्ग - २ यांची एकूण संख्या व निवासस्थानाचे ठिकाण आणि किती अधिकारी निवासस्थानात राहतात त्याची माहिती व रिक्त निवासस्थानाची माहिती.

२) महानगरपालिका कर्मचारी वर्ग -३ व वर्ग -४ यांच्या एकूण निवासस्थान संख्या व ठिकाण व देण्यात आलेल्या निवासस्थानाची माहिती तसेच रिक्त निवासस्थानाची माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

३) महानगरपालिकेचे निवासस्थानामध्ये जे सेवानिवृत्त व मयताचे वारस सदर निवासस्थान रिक्त न करता अद्यापही राहत आहेत अशा कर्मचा-यांचे नांव, सेवानिवृत्त दिनांक,आजपर्यंत निवासस्थानाचे थकित भाडे, कार्यालयाने त्यांचेवर केलेली आजपर्यंतची कार्यवाही तसेच एकूण रिक्त निवासस्थानाबाबत सविस्तर माहिती उपलब्ध करून द्यावी.

४) महानगरपालिका मालकीच्या विविध शाळेच्या निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांच्या नावाची यादी व केव्हापासून राहतात तो कालावधी उपलब्ध करून देण्यात यावा.

५) महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध आरोग्य केंद्राच्या निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांची नावाची यादी व केव्हापासून राहतात तो कालावधी उपलब्ध करून देण्यात यावा.

विभागाने मुद्या क्र. १ ते ५ बाबतची माहिती लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे लेखापरीक्षण करता आलेले नाही. तरी पुढील लेखापरीक्षणापूर्वी सर्व अभिलेखे अद्ययावत ठेवावेत. अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबद्यल संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२७ : मालमत्ता विभागाकडून लेखापरीक्षणा करीता अभिलेखे उपलब्ध होत नसल्याबाबत.**

महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले व्यावसायिक मालमत्ता, होर्डिग्ज संचिका, आरक्षित जागांबाबतच्या संचिका, आठवडी बाजाराच्या संचिका, भाडेतत्वावर दिलेल्या गाळाबाबतच्या संचिका, हॉलबाबतच्या संचिका, पार्किंगच्या संचिका, महानगरपालिकेच्या विविध उद्यानाच्या निवासस्थानात राहणा-या तसेच शाळेच्या क्षेत्राच्या निवासस्थानात राहत असलेल्या कर्मचा-यांच्या नावाची यादी व इतर संपूर्ण अनुषंगिक अभिलेखे तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. मात्र मालमत्ता विभागाने लेखे / अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी एकाही कर्मचा-याची नियुक्ती केली नाहीच व लेखापरीक्षण करण्याकरीता उदासिनता दाखवून असहकार्य/ टाळाटाळ व उडवाउडवीची उत्तरे दिली आहे. ही बाब अतिशय खेदाची वाटते. ही बाब मालमत्ता विभागाचे नियंत्रण अधिकारी असलेल्या उपायुक्तांच्या वारंवार निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे.

मालमत्ता विभागात महानगरपालिकेच्या विविध मोकळ्या जागा, शॉपिंग सेंटर मधील दुकाने, BOT तत्वावर दिलेल्या जमिनीत महानगरपालिकेच्या प्राप्त हिस्सा, महानगरपालिकेच्या इमारती, शाळा, दवाखाने, कार्यालये इत्यादींची माहिती जागेच्या क्षेत्रफळासह उपलब्ध ठेवणे ही विभागाची जबाबदारी आहे. राज्यातील इतर महानगरपालिकेने आपल्या मालमत्तांची माहिती सर्व नागरीकांसाठी खुली ठेवून संबंधित संकेत स्थळावर उपलब्ध केलेली आहे. परंतू औरंगाबाद महानगरपालिकेकडे लिखित स्वरूपात सुध्दा माहिती उपलब्ध नाही.

त्यामुळे पूर्णतः लेखापरीक्षण करता आलेले नाही. पुढील लेखापरीक्षणापूर्वी सर्व अभिलेखे अद्ययावत करून ठेवावे. तसेच संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.२८ : महानगरपालिका औरंगाबाद मार्फत दंडवसूलीसाठी (महानगरपालिका क्रेन) दिलेल्या पुस्तकांबाबत.**

सन २००३-०४ ते सन २०११-१२ या आर्थिक वर्षात वाहतूक शाखा सिटी चौक औरंगाबाद यांना महानगरपालिकेतर्फे क्रेन दंड वसूलीसाठी पुरविण्यात आलेल्या पावती पुस्तकांचे वितरण यांत्रिकी विभागामार्फत करण्यात आले आहे. उक्त पावती पुस्तकांद्वारे जी रक्कम वसूल झाली त्याची माहिती यांत्रिकी विभागा मार्फत झेरॉक्स प्रतीत उपलब्ध करून देण्यात आली होती.

मात्र मालमत्ता विभागाकडे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून वाहतूक शाखा सिटी चौक,औरंगाबाद यांना महानगरपालिकेतर्फे क्रेन दंड वसूलीसाठी पुरविण्यात आलेल्या पावती पुस्तके लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध झालेली नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षण करता आलेले नाही. तसेच या २० पावती पुस्तकांच्या आधारे वसूल करण्यात आलेली महानगरपालिका फंडात जमा झाल्याबाबतची खात्री करता आली नाही. तरी पुढील लेखापरीक्षणापूर्वी सर्व अभिलेखे उपलब्ध करून ठेवावेत.

विभागाने वाहतूक शाखा, सिटी चौक यांनी २० पावती पुस्तकाआधारे सन २०१२-१३ या वर्षात वसूल केलेल्या रकमांची खातरजमा करून महापालिका फंडात जमा झाल्याची शहानिशा करून सविस्तर अनुपालन दर्शवावे. तसेच उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

# ई-निविदा विभाग

## लेखापरीक्षण अहवाल.

**प्रस्तावना :**

ई- निविदा विभागाकडून करण्यात येत असलेल्या कामकाजाबाबत विशेष लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले होते. ई- निविदा विभागाच्या संदर्भात लेखा शाखेस केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती कार्यकारी अभियंता यांनाही देण्यात आलेल्या होत्या. ई- निविदा विभाग हा कार्यकारी अभियंता यांच्या अधिपत्याखाली येत असल्याने त्या विभागाच्या कामकाजाच्या प्रक्रियेत आढळून आलेल्या त्रुटी / नियमबाह्य बाबी वेळोवेळी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत.

ई -निविदा कक्षाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत स्वतंत्रपणे परिच्छेद निर्गमित करण्यात येत आहेत.

**परिच्छेद क्र. १:** ई-निविदा विभागाकडून प्राप्त माहिती नुसार (४२) प्रकरणात निविदादारांच्या विनंती वरून त्यांची निविदा उघडण्यात आली नाही. निविदादार जेव्हा निविदा सादर करून स्पर्धेत सहभाग घेतात पण अचानकपणे त्यातून अंग काढून घेतात त्यावेळी त्यांनी निविदा अटी नुसार भरलेली ईएमडीची रक्कम जप्त करून ती मनपा फंडात जमा करणे क्रमप्राप्त ठरते, परंतू तसे झाल्याचे दिसून आलेले नाही, त्यामुळे महानगरपालिका रक्कम रू.४,६९,८०३/- च्या उत्पन्नापासून वंचित राहिली आहे.

प्रकरणांत महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२:** ई- निविदा प्रक्रियेमध्ये ऐनवेळी स्पर्धेतून निविदाधारकाने माघार घेणे हा प्रकारच संशयास्पद आहे. प्रशासनाने या पध्दतीने त्यात सहभागी होणे ही त्याहून अधिक गंभीर बाब आहे. या प्रकरणांत निविदादारांची साखळी (Ring) झाली असल्याची शक्यता स्पष्टपणे जाणवते. निविदादारांचे विनंतीवरून त्यांची निविदा उघडली गेली नसल्याने त्यांनी भरलेले दर कळलेले नाहीत. ते स्वीकृत दरांपेक्षा कमीही असू शकतात. त्यामुळे त्याही दृष्टीकोणातून महानगरपालिका आर्थिक लाभांपासून वंचित राहिली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत विभागाने सविस्तर खुलासा सादर करावा. तसेच या संबंधी जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेविरूध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.३:** उपरोक्त ४२ पैकी अनेक निविदा दारांनी ईएमडी भरणे पासून सुटीच्या प्रमाणपत्राचा लाभ घेतला आहे. (ही प्रमाणपत्रे मुळातच नियमबाह्य पध्दतीने अनधिकृत व्यक्तीने निर्गमित केलेली होती.) जेव्हा निविदादारांचे विनंतीवरून निविदा उघडण्यात आली नाही, त्या वेळी वर परिच्छेद (१) मध्ये नमूद

केलेनुसार त्या निविदेची ईएमडी जप्त होणे क्रमप्राप्त होते. सूट मिळण्याचे प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता (EMD Exemption Certificate) जेवढी अनामत रक्कम त्या निविदादाराने भरली होती त्यातून ती रक्कम वजा करणे अपेक्षित होते. परंतू तसे केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे तेथून पुढे ते प्रमाणपत्रंच अवैध ठरते. त्यानंतर संबंधित निविदादाराने अशा प्रमाणपत्राआधारे जेवढ्या निविदा सादर केल्या व काही प्रकरणी त्या स्वीकृतही झाल्या असतील, ती पूर्ण कार्यवाहीच अवैध ठरते, असे स्पष्ट होते. (या संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, Appendix - ११ पहावे)

ई - निविदा पध्दत ही अधिक पारदर्शीपणे कामकाज होणेचे उद्यिष्टाने लागू केली असावी असे मत आहे, त्या उद्यिष्टास अशा प्रकाराने बाधा पोहचविण्यात आलेली असल्याने या संपूर्ण प्रकरणाची प्रशासकीय चौकशी करून जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच प्रकरणी महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान निर्धारण करून त्याचीही वसूली करून महानगरपालिका निधीत जमा करणे आवश्यक आहे. केलेल्या कार्यवाही संबंधी लेखापरीक्षण विभागास अवगत करण्यात यावे.

**परिच्छेद क्र.४:** लेखा परीक्षणात असे निदर्शनास आले आहे की, ई- निविदा सादर करतांना ईएमडी भरण्यापासून Exemption सर्टिफिकेट निर्गमित करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना सोपविलेले आहेत. परंतू ई-निविदा विभागातून प्राप्त माहितीनुसार १२४ निविदादारांना ईएमडी भरण्यापासून सूट देण्याचे प्रमाणपत्र खाजगी संस्थेचे प्रतिनिधी यांनी निर्गमित केलेले आहेत. संबंधितांना अशी प्रमाणपत्रे निर्गमित करण्याचे अधिकार नसतांनाही अशा प्रमाणपत्राच्या आधारे महानगरपालिका,औरंगाबाद येथे ई-निविदा उघडण्याची व स्विकृत करण्याची कार्यवाही देखील करण्यात येत आहे. जे, की नियमबाह्य आहे.

उपरोक्त प्रकरणी कार्यकारी अभियंत्यांनी आपले अधिकार खाजगी संस्थेच्या प्रतिनिधीस कोणत्या आधारे प्रदान केले त्याचे खुलाशासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.५:** EMD Exemption Certificate करीता जमा केलेली F.D.R./D.D लेखा शाखेकडे जमा करणे आवश्यक आहे. ई - टेंडरिंग हा विभाग out sourcing माध्यमातून खाजगी संस्थे मार्फत चालविले जात आहे. सदर संस्थेकडे प्राप्त F.D.R. व D.D. हे लेखा शाखेकडे हस्तांतरीत केली जातात. परंतू सदरील D.D. च्या रकमा महानगरपालिकेच्या खात्यात जमा झाल्यानंतरच E.M.D. Exemption Certificate देणे अभिप्रेत आहे. ई - निविदा विभागाने दिनांक २०.७.२०१३ रोजी लेखा शाखेकडे जमा केलेले D.D. मुदतबाह्य झालेल्या आहेत. व F.D.R. चा कालावधी पूर्ण झालेला आहे. १० D.D. ची रक्कम रूपये १,५४,९७७/- हे मनपाच्या ठेव खात्यात जमा होणे आवश्यक होते. परंतू मुदतबाह्य झाल्यामुळे महानगरपालिका या रकमेपासून वंचित राहिलेली आहे. त्याचप्रमाणे ई-निविदा विभागाने soft copy स्वरूपात दिलेल्या माहितीनुसार संबंधित विभागाकडे निविदादाराने १३५ D.D. जमा केलेले आहेत. परंतू D.D. मुदतबाह्य झालेले आहेत. या मुदतबाह्य D.D. ची एकूण रक्कम १३,९२,६९७/- एवढी असून D.D.खाजगी

संस्थेने वेळीच मनपाच्या खात्यात जमा केलेली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

उपरोक्त बाबीसंबंधी महानगरपालिकेच्या झालेल्या नुकसानी बाबत जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रकारच्या अनियमितता भविष्यात घडणार नाही याची दक्षता घेवून प्रशासकीय कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.

# वॉर्ड - अभियंता
# वॉर्ड - अ कार्यालय
# विशेष लेखापरीक्षण

**परिच्छेद क्र.१ : सिध्दार्थ उद्यानासमोरील मुख्य रस्त्यावर उद्यानाच्या मुख्य प्रवेश द्वारासमोर फूट ओव्हर ब्रीज बांधणे बाबत.**

सिध्दार्थ उद्याना समोरील मुख्य रस्त्यावर उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळ फूट ओव्हर ब्रीज बांधकामाच्या संचिकेचे लेखापरीक्षण करणे करीता कार्यालयीन पत्र क्र.मनपा/ उपअभियंता/वॉर्डअ /४१६/२०१३ दिनांक २२.७.२०१३ अन्वये संचिका प्राप्त झाली.

मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.८५० दिनांक २१.१२.२००९ अन्वये सदरील कामासाठी रू.३०/- लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान केलेली आहे. मा.स्थायी समितीने विषय क्र. ४६४ दिनांक २६.२.२०१० अन्वये सदरील कामासाठी ई - टेंडरिंग विभागामार्फत प्राप्त एक निविदेतील श्री.मुबारक मेहबूब पठाण यांची अंदाजपत्रकापेक्षा १५% जास्त दराची निविदा स्विकारली. मुबारक पठाण कंत्राटदार यांना कार्यादेश क्र.मनपा/अशअ/वॉर्डअ/३०४/२०१०, दिनांक २६.२.२०१० अन्वये सहा महिन्याचे कालावधीपर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश दिले. संबंधित कंत्राटदार यांनी दिनांक २२.१०.२०१० रोजी पत्र देवून सदरील जागेवरील काम मिल मालक वारंवार बंद करीत असल्यामुळे प्रचंड नुकसान होत आहे, तसेच steel चे दर वाढलेले असल्यामुळे मुदतवाढ व दरवाढ देण्याबाबत कळविले आहे.

तद्नंतर मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.८३२, दिनांक ९.८.२०१२ अन्वये प्रत्यक्ष ठिकाणच्या डिझाईननुसार आणि परिस्थितीनुरूप बदला नुसार उर्वरीत कामासाठी आवश्यक रक्कम आणि १५% जास्त दराची निविदा असल्यामुळे वाढीव रक्कम अशी एकूण रू.२०,००,०००/- च्या अतिरिक्त निधीसह सुधारित अंदाजपत्रक रू.५०,००,०००/- मान्यतेस आणि वाढीव बाबींची परिमाणे मंजूर निविदा दराप्रमाणे तसेच अतिरिक्त बाबी चालू दरसूचीनुसार संबंधित कामाचे मूळ कंत्राटदाराकडून नियमाप्रमाणे करून घेण्यास व सुधारित अंदाजपत्रकास मान्यता प्रदान केलेली आहे. कंत्राटदाराचे काम दिनांक १५.५.२०१३ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत आहे. सदरील कामावर एकूण रू.५०,०६,३३३/- खर्च झालेला आहे.

सदरील प्रकरणी मा.सभापती, स्थायी समिती,महानगरपालिका,औरंगाबाद यांचे आदेशानुसार स्वतंत्रपणे लेखापरीक्षण करण्यात आले. त्यात प्रामुख्याने खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. सदरील काम सुरू करण्यापूर्वी प्रत्यक्ष जागेवरील सर्वेक्षण झालेले नाही. त्यामुळे या फूट ओव्हर ब्रीजची खरोखरच आवश्यकता होती काय ? तसेच प्रस्तावित केलेला ब्रीज त्याची उंची, डिझाईन, स्थान यांचा विचार करता तो वापरला जाईल काय ? याची माहिती घेवून परिपूर्ण समर्थन संचिकेत उपलब्ध नसल्याने कामाची आवश्यकता व योग्यते बाबत खात्री करता आलेली नाही.

२. प्रत्यक्ष जागेवर उद्‌भवणा-या अडीअडचणी बाबत प्रशासनाने काम सुरू करणे पूर्वी अडचणींचा निपटारा करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे सदरील कामास विलंब झाला. पर्यायाने सदरील कामाचे अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे.

३. सदरील कामासाठी प्राप्त एकच निविदा असतांना व ती १५% जास्तीची असतांना तीच निविदा अंतीम केली. निविदा अंतीम करतांना प्राप्त दर माफक आहेत याची खात्री केलेली नाही.

४. वारंवार मागणी करूनही संबंधित विभागाने मोजमाप पुस्तिका क्र.२०४५ व २४६१ लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नसल्याने संपूर्णतः लेखापरीक्षण करता आलेले नाही.

५. काम पूर्णत्वाचे फॉर्म क्र.१३२ मधील अंदाजित रक्कम, प्रत्यक्ष खर्च रक्कम यातील तफावत रक्कम फरकाच्या तक्त्यात समाविष्ट केलेली नाही. तक्ता सोबत जोडला आहे.

६. कंत्राटदारास कामाची मुदतवाढ दिल्याचे आदेश संचिकेत नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात मुदतवाढ दिली किंवा कसे हे तपासता आलेले नाही.

७. सदरील कामाचे सुधारित अंदाजपत्रक रू.४२,१४,१४२/- असे असतांना तांत्रिक मान्यता रू.४७,४४,३९२/- या रकमेस दिलेली आहे. म्हणजेच रू.५,३०,२५०/- इतक्या जास्तीच्या रकमेस तांत्रिक मान्यता देण्याचे प्रयोजन समजू शकले नाही. तसेच प्रत्यक्ष खर्च रू.५०,०६,३३३/- झालेला आहे. यामुळे रू.७,९२,१९१ /- जास्तीचा खर्च झालेला आहे.

८. सदरील संचिकेतील एनएस-२९ ,परि.११८ वर नमूद टिपणी मध्ये या कामासाठी २००८ मध्ये रू.४०/- लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. परंतू फक्त रू.३०/- लक्ष बी.आर.जी.एफ मध्ये तरतूद प्राप्त झाल्यामुळे रू.३०/- लक्षचे सिमित अंदाजपत्रक तयार करून निविदा बोलावण्यात आलेली असल्यामुळे मंजूर रकमेतून प्रकल्प पूर्ण होणार नसल्यामुळे सुधारित अंदाजपत्रकीय प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदरील बाब ही अयोग्य असून जर रू.३०/- लक्ष तरतूदीतून सदरील काम पूर्ण होत नव्हते तर कमी रकमेचे अंदाजपत्रक बनविणे संयुक्तिक वाटत नाही. या कामाऐवजी बी.आर.जी.एफ. प्राप्त निधीतून इतर कामेही प्रस्तावित होवू शकली असती.

९. सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देतांना बी.आर.जी.एफ. मधील प्राप्त निधीतील व्याजाच्या रकमेतून सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. प्राप्त व्याज हे एकूण प्राप्त निधीवरील असून यातून इतर अनेक कामे प्रस्तावित झालेली आहेत. त्या कामासाठी निधी अपूरा पडत असेल तर एकाच कामावर व्याजाची रक्कम वापरणे ही बाब अनाकलनिय आहे.

१०. सदरील रू.५०/- लक्ष खर्च केलेल्या फूट ओव्हर ब्रीजचा किती नागरीकांनी प्रत्यक्ष उपयोग केला याबाबत अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाही. त्यामुळे फूट ओव्हर ब्रीज उभारणीचा उद्येश सफल झाल्याचे सिध्द होत नाही व त्यावर केलेला खर्च रू.५०.०६ लक्ष हा पर्यायाने निष्फळ ठरला आहे.

विभागास उपरोक्त मुद्यांवर खुलासा मागविला असता संबंधित विभागाने दिनांक २२.५.२०१४ व दिनांक १८.१०.२०१४ अन्वये सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. मूळ मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर केल्यानंतरच सविस्तर लेखापरीक्षण करण्यात येईल. करिता विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत सविस्तर खुलाशासह मूळ मोजमाप पुस्तिकेसह अनुपालन दर्शवावे.

# भाग - ब

## *विशेष चौकशी अहवाल*

# शहरातील साथरोगासंबंधी औषधी साठा तपासणी अहवाल

## प्रस्तावना :

औरंगाबाद शहरात सध्या साथरोगासंबंधी महानगरपालिका आरोग्य केंद्रात औषधीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे की नाही, साठा पुरेसा उपलब्ध नसल्यास त्यास कोण जबाबदार आहेत, आरोग्य विभागाने त्यासाठी काय उपाययोजना केल्या, या बाबीसंबंधी मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी पत्र क्र. मनपा/मआ/स्वीस/२०१२/४१४ दि.१२.११.२०१२ रोजी कार्यालयीन पत्र लेखापरीक्षण विभागास देवून उपरोक्त कार्याकरीता एक पथक निर्माण करुन सर्व आरोग्य केंद्राची साथरोगांची औषधी अहवाल सादर करणे बाबत सुचविले आहे.

## आरोग्य विभागास पत्र

कार्यालयीन पत्र क्र.मनपा/मुलेप/२०१२/३५८ दि.१२.११.२०१२ अन्वये आरोग्य अधिकारी, एन ८, हॉस्पीटल,महानगरपालिका,औरंगाबाद यांना पत्र देवून सर्व आरोग्य केंद्रावर लेखे/अभिलेखे, उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले.

## लेखापरीक्षण विभागाने केलेली कार्यवाही

साथरोग संदर्भाने लेखा शाखेकडील गेल्या तीन वर्षाचे अर्थसंकल्पीय तरतूद तपासली असता खालील नोंदी आढळुन आल्या आहेत.

(आकडे हजारात)

| अ क्र | लेखाशिर्ष रोगप्रतिबंधक योजना | सन २०१०-११ | | सन २०११-१२ | | सन २०१२-१३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुधारीत अंदाज | प्रत्यक्ष खर्च | सुधारीत अंदाज | प्रत्यक्ष खर्च | मुळ अंदाज | नोव्हेबर २०११ पर्यंतचा खर्च |
| १ | लस खरेदी | १००० | १६७१ | ३००० | १३३७ | २००० | १७८२ |
| २ | औषध खरेदी | ६०० | ९४१ | २५०० | १३४३ | २००० | ९९८ |

उपरोक्त आकडेवारी तपासली असता असे निदर्शनास येते की, आरोग्य विभागास सन २०१०-११ या आर्थिक वर्षात साथरोग लस खरेदी करीता दहा लक्ष तरतूद सुधारीत अंदाजपत्रकात ठेवण्यात आली असता रु.१६ लक्ष ७१ हजार खर्च झालेला आहे. तसेच साथरोगाच्या औषधी खरेदी साठी रुपये ६लक्ष तरतूद सुधारीत अंदाज पत्रकात उपलब्ध असताना रुपये ९ लक्ष ४१ हजार प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. सुधारीत अंदाजपत्रकातील तरतूदी पेक्षा जास्तीचा खर्च नोंदविणे ही बाब नियमबाह्य असून जास्तीच्या केलेल्या खर्चाबाबत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे क्रम प्राप्त होते.

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात आरोग्य विभागास साथरोगाच्या लस खरेदी व औषध खरेदी साठी ठेवण्यात आलेल्या सुधारीत अंदाज पत्रकातील तरतूदी व प्रत्यक्ष खर्च यात जवळ पास ५० टक्केची तफावत आहे. आरोग्य विभागास उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदी आरोग्य विभागाने १०० टक्के खर्च केलेला नाहीत उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदी मधुन परिपुर्ण औषध साठा खरेदी न केल्यास शहरातील नागरिकांना आरोग्य सुविधा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहित असा निष्कर्ष निघतो.

उपरोक्त दोन्ही वर्षातील लेखाशिर्षानुसार ठेवण्यात आलेल्या तरतूदी व प्रत्यक्ष खर्च या मधील रक्कमाची तफावत बघता संबंधित दोन्ही विभागाचे विभाग प्रमुखावर जबाबदारी निश्चित करणे उचित राहील.

साथरोगाचे औषधी साठा तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले की, लेखाविभागाकडे दि.३१.५.२०१२ ते १९.७.२०१२ या कालावधीचे रुपये ३५,७२,५८०/- रक्कमेचे औषधी खरेदीचे विविध एजन्सीचे देयके प्रलंबित असल्याचे समजते. आरोग्य विभागाच्या औषध खरेदीची देयके प्रलंबित ठेवल्यामुळे संबंधित औषधी पुरवठा धारकाकडुन त्यांना पुढील औषधी पुरवठया संदर्भाने दिलेल्या पुरवठा आदेशानुसार औषधी पुरवठा पुरविणे बाबत आरोग्य विभागाने पाठपुरावा केला असता एजन्सी तर्फे मागील प्रलंबित देयके अदा करावी, तदनंतरच पुढील औषध पुरवठा आदेशानुसार करण्यात येईल असे सांगितल्याचे आरोग्य विभागाकडुन समजते महानगरपालिकेची विविध देणी देताना आरोग्य विभागाच्या प्रलंबित देयका संबंधि विचार न झाल्यास त्यांचा विपरीत परिणाम होऊन पुरवठा धारकाकडुन औषधी पुरवठा वेळेवर न झाल्यामुळे शहरातील  नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकाराता येत नाही. त्यामुळे महानगरपालिके तर्फे देण्यात येणाऱ्या विविध देयकांमध्ये आरोग्य विभागाच्या देयकांचा प्रामुख्याने अदाई बाबत विचार होणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त यांचे निर्देषा नुसार खालील लेखापरीक्षण पथकाने आरोग्य केंदाचे व मलेरीया विभागाची  तपासणी केली आहे.

१. श्री. संजय जक्कल, कार्यालयीन अधिक्षक
२. श्री. अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक
३. श्री. चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक
४. श्री. विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक
५. श्री. ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक

लेखा परीक्षण पथकाने दि.१६,१७,१९ व २१.११.२०१२ रोजी सर्व आरोग्य केंद्राना साथरोगासाठीचा औषधी साठा व साठा नोंदवही तपासणी संदर्भाने भेटी दिल्या.

संबंधीत आरोग्य केंद्रात असलेल्या साथरोगाच्या औषधी साठया संदर्भाने नोंदी घेण्यात आलेल्या असुन त्याचे सविस्तर केंद्रनिहाय व साथरोगासाठी लागणाऱ्या औषधी संदर्भाने औषधी निहाय विवरण तक्ता प्राप्त करुन घेण्यात आलेला आहे.

सर्व आरोग्य केंद्रात असलेला साथरोगांचा औषधी साठा व मुख्य औषधी भांडारा मधून पुरवठा केलेला औषधी साठा याचा ताळमेळ घेण्यात आला असता मुख्य औषधी भांडारातुन पुरवठा केलेला औषधी साठा आणि आरोग्य केंद्रात उपलब्ध औषधी साठा तसेच सन २०१२-१३ मध्ये आरोग्य केंद्रास प्राप्त औषधी साठा यांचा ताळमेळ लागत नाही.

प्रत्येक आरोग्य केंद्र निहाय विवरण पुढील प्रमाणे आहे साठा वहीतील नोंदी व प्रत्यक्ष साठा यातील फरका बाबत संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना त्यांचे विभाग प्रमुख मार्फत कळविणे आवश्यक आहे

## आरोग्य केंद्र भावसिंगपुरा

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Tab. Paracetamol ५०० mg. | ९,००० | १०,३०० | - | १,३०० | |
| २ | Oral Rehydration Salts (ORS) | ५०० | १,००० | - | ५०० | |
| ३ | Sol Sodium Hypo Chlorite २००ml | ३०० | ५०० | - | २०० | |
| ४ | Tab Norfloxacin ४००mg | - | २०० | - | २०० | |
| ५ | Glass Slide. | - | १००० | - | १,००० | |

## आरोग्य केंद्र जुनाबाजार

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Sol Sodium Hypo Chlorite २००ml | ३०० | - | ३०० | - | |

## आरोग्य केंद्र भिमनगर

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Sol Sodium Hypo Chlorite २०० ml | ३०० | - | ३०० | - | |
| २ | Glass Slide. | १,००० | २५० | ७५० | - | |
| ३ | Pricking Lancets | १,००० | ५०० | ५०० | - | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | Spirit Swab | १,५०० | १,००० | ५०० | - | |
| ५ | Cap. Tetracyellin २५० mg | २०० | - | २०० | - | |

## आरोग्य केंद्र हर्षनगर

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Tab. Paracetamol ५०० mg. | १०,४०० | ११,२०० | - | ८०० | |

## आरोग्य केंद्र जिन्सी

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Tab. Furazolidone १०० mg. | २,००० | १,००० | १,००० | - | |
| २ | Tab. Paracetamol ५०० mg. | ८,५०० | ९,८०० | - | १,३०० | |
| ३ | Sol Sodium Hypo Chlorite २०० ml | २०० | - | २०० | - | |
| ४ | Glass Slide. | १० | ३२ | - | २२ | |
| ५ | N-९५ Mask | - | २५ | - | २५ | |

## आरोग्य केंद्र गरमपाणी

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Tab. Paracetamol ५०० mg. | ३,००० | ४,००० | - | १,००० | |
| २ | Sy Cotrim ५० ml | ५० | २५ | २५ | - | |
| ३ | Tab. Chloroquin १५० ml | १,५०० | १,००० | ५०० | - | |
| ४ | Glass Slide. | - | २०० | - | २०० | |
| ५ | Pricking Lancets | - | २०० | - | २०० | |

## आरोग्य केंद्र औरंगपुरा

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Tab. Paracetamol ५०० mg. | १३,४०० | १८,७०० | - | ५,३०० | |
| २ | Tab. Cotrim ss. | १,५०० | ४,७३० | - | ३,२३० | |
| ३ | Sy Cotrim ५० ml | १५० | १२५ | २५ | - | |
| ४ | Sol Sodium Hypo Chlorite २०० ml | ३९९ | ६९९ | - | ३०० | |
| ५ | Tab. Chloron २५० ml | २२०० | २७०० | - | ५०० | |
| ६ | Tab. Chioroquin १५० mg | ११,५०० | ११,००० | ५०० | - | |
| ७ | Glass Slide | १,००० | १,५०० | - | ५०० | |

## आरोग्य केंद्र बायजीपुरा

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Tab. Paracetamol ५०० mg. | ९,००० | १०,००० | - | १,००० | |
| २ | Sol Sodium hpo Chlorite २०० mg | ४५० | ३०० | १५० | - | |
| ३ | OT Solution ४५० ml | - | २ | - | २ | |
| ४ | Tab. Norfloxacin ४०० mg | ४,००० | २,००० | २,००० | - | |
| ५ | Tab. Chioroquin १५० mg | १,५०० | ५०० | १,००० | - | |
| ६ | Cap. Fluvir ७५ mg | - | ५० | - | ५० | |
| ७ | Cap. Fluvir ४५ mg | - | ३० | - | ३० | |
| ८ | N-९५ Mask | - | १० | - | १० | |

## आरोग्य केंद्र कैसर कॉलनी

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Tab. Paracetamol ५०० mg. | ३५,३०० | ३९,३०० | - | ४,००० | |
| २ | Cap. Tetracycllin | १,००० | ८०० | २०० | - | |
| ३ | I.V. Ringer Lactate | - | ५० | - | ५० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | Tab. Oflaxacin | - | ६०० | - | ६०० | |
| ५ | Tab Norfloxacin + Tinidazole | ६,००० | ५,००० | १,००० | - | |
| ६ | N-९५ Mask | - | २१० | - | २१० | |
| ७ | I.V.Set. | २०० | १४५ | ५५ | - | |

## आरोग्य केंद्र कैलासनगर (दादा कॉलनी )

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Tab. Paracetamol ५०० mg. | ५,००० | ५,३०० | - | ३०० | |
| २ | Cap. Tetracycllin | - | २०० | - | २०० | |
| ३ | Sod Hypochloride २०० ml | ३०० | - | ३०० | - | |

## आरोग्य केंद्र भवानीनगर

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १. | Tab. Paracetamol ५०० mg. | ८,२०० | १०,५०० | - | २,३०० | |
| २ | Tab.Furazolidone १०० ml | १,००० | २,००० | - | १,००० | |
| ३ | Sod Hypo Chiloride २०० ml | - | २०० | - | २०० | |
| ४ | Tab. Chloron २५० ml | १,२०० | १,५०० | - | ३०० | |
| ५ | Glass Side. | ५०० | १,००० | ५०० | - | |

## आरोग्य केंद्र नेहरुनगर (कटकटगेट )

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | २०,००० | २२,३०० | - | २,३०० | |
| २ | Tab.Furazolidone १०० ml | ४,००० | ४,५०० | - | ५०० | |
| ३ | Sy. Cotrim ५०ml | ३७५ | २७५ | १०० | - | |
| ४ | Sod Hypo Chiloride २०० ml | ३०० | - | ३०० | - | |
| ५ | Tab. Chloron २५० mg | २,५०० | १,५०० | १,००० | - | |
| ६ | Tab. Chloroquin १५ mg | ८,००० | ६,५०० | १,५०० | - | |
| ७ | Glass Side. | १,००० (२०) | २,८७५ | - | १,८७५ | |
| ८ | Pricking Lancets | २,६०० | २,००० | ६०० | - | |

## आरोग्य केंद्र हर्सुल

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | २१५०० | १४,५०० | ७,००० | - | |
| २ | Tab.Furazolidone १०० mg | ३,४०० | ३,००० | ४०० | - | |
| ३ | ORS | ११०० | १,००० | १०० | - | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | Sy. Paracetamol ६० mg. | ७५ | १०० | - | २५ | |
| ५ | Sod Sodium hypo Chlorite २०० ml | ३०० | - | ३०० | - | |
| ६ | Tab. Norfloxacin ४०० mg | ५,००० | ५,४०० | - | ४०० | |
| ७ | Pricking Lancets | १,००० | १,१०० | - | १०० | |
| ८ | Spirit Swab | ७,००० | २,००० | ५,००० | - | |
| ९ | S V Set. | २५ | १० | १५ | - | |

## आरोग्य केंद्र क्रांतीचौक

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Sod Sodium hypo Chlorite २०० ml | ३०० | ५०० | - | २०० | |
| २ | Tab.Chloroquin १५० mg | १,००० | - | १,००० | - | |
| ३ | Glass Slide | १० | - | १० | - | |
| ४ | Pricking Lancets | १,००० | - | १,००० | - | |
| ५ | Spirit Swab | १,००० | - | १,००० | - | |

## आरोग्य केंद्र जवाहरकॉलनी

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | ४,२०० | ३,६०० | ६०० | - | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | Tab. Nalidixic Acid ५०० mg | - | ४०० | - | ४०० | |
| ३ | Cap Tetracyclline २५०mg | २०० | - | २०० | - | |
| ४ | Sy. Cotrim ५०ml | २५ | - | २५ | - | |
| ५ | Sod Sodium hypo Chlorite २०० ml | ३०० | - | ३०० | - | |
| ६ | Tab. Norfloxacin ४०० mg | ४,००० | ४,२०० | - | २०० | |
| ७ | Tab. Chloron २५० mg | ५०० | - | ५०० | - | |
| ८ | Tab. Chloroquin १५० mg | ५,००० | ४,००० | १,००० | - | |
| ९ | Glass Side. | - | ५०० | - | ५०० | |
| १० | Pricking Lancets | १,२०० | ६०० | - | ६०० | |
| ११ | Spirit Swap | ४,००० | ५,००० | - | १,००० | |

## आरोग्य केंद्र राजनगर

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | १५,४०० | १६,८०० | - | १,४०० | |
| २ | Sy. Cotrim ५०ml | १७५ | १२५ | ५० | - | |
| ३ | Sy Sodium hypo Chlorite २०० ml | ४०० | - | ४०० | - | |
| ४ | Glass Slide. | - | १० | - | १० | |
| ५ | Spirit Swab | ६,००० | २,००० | ४,००० | - | |

## आरोग्य केंद्र बन्सीलालनगर

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | ६,४०० | ८,४०० | - | २,००० | |
| २ | Sy Sodium hypo Chlorite २०० ml | ४०० | ७०० | - | ३०० | |
| ३ | Pricking Lancets | ६०० | - | ६०० | - | |

## आरोग्य केंद्र पिर बाजार (नागसेननगर)

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | १५,४०० | १७,४०० | - | २,००० | |
| २ | Sy Sodium hypo Chlorite २०० ml | ३०० | ५०० | - | २०० | |
| ३ | Tab. Norfloxacin ४०० mg | ६०० | १०० | ५०० | - | |
| ४ | Tab. Chloron २५० mg | ५०० | ३०० | २०० | - | |
| ५ | Tab. Chloroquin १५० mg | ३,५०० | ४,००० | - | ५०० | |
| ६ | Glass Slide. | १० | २५ | - | १५ | |
| ७ | Pricking Lancets | ६०० | २,५०० | - | १,९०० | |

## आरोग्य केंद्र सिल्क मिल कॉलनी

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | ४८,००० | ३९,५०० | ८,५०० | - | |
| २ | Tab. Cotrim Ss | १,००० | १,५०० | - | ५०० | |
| ३ | ORS | ३,००० | २,५०० | ५०० | - | |
| ४ | Sy. Cotrim ५०ml | ७२५ | ४७५ | २५० | - | |
| ५ | I.V Ringer Lactate | - | १२५ | - | १२५ | |
| ६ | Sod. Hypo Chloride २००ml | ६०० | - | ६०० | - | |
| ७ | OT Solution ४५०ml | - | ०१ | - | ०१ | |
| ८ | Tab. Oflaxacin | ७,००० | ५,००० | २,००० | - | |
| ९ | Tab Chloron २५०mg | १,५०० | १,००० | ५०० | - | |
| १० | Glass Slide | - | ५० | - | ५० | |
| ११ | Spirit Swap | २,००० | १,६०० | ४०० | - | |

## आरोग्य केंद्र नक्षत्रवाडी /कांचनवाडी

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | ४,००० | ९,००० | - | ५,००० | |
| २ | Tab. Furazolidone १००mg | १,००० | २,००० | - | १,००० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ORS | १०० | ५०० | - | ४०० | |
| ४ | Sod. Hypo Chloride २००ml | २०० | - | २०० | - | |
| ५ | Tab. Oflaxacin | १,००० | १,५०० | - | ५०० | |
| ६ | Tab. Norfloxacin ४०० mg | २०० | - | २०० | - | |
| ७ | Glass Slide | १० | - | १० | - | |

## आरोग्य केंद्र चिकलठाणा

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | १८,५०० | १९,८०० | - | १,३०० | |
| २ | Tab. Norfloxacin ४०० mg | १,००० | - | १,००० | - | |
| ३ | Tab. Norfloxacin +Tinidazole | २,१०० | २,२०० | - | १०० | |
| ४ | Tab Chloron २५०mg | २०० | - | २०० | - | |
| ५ | Tab. Chloroquin १५० mg | २,००० | - | २,००० | - | |

## आरोग्य केंद्र नारेगांव

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | १७,९०० | १७,४०० | ५०० | - | |
| २ | ORS | - | ५०० | - | ५०० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | Sol. Sodium hypo Chlorite २००ml | ४०० | १०० | ३०० | - | |
| ४ | Glass Slide | - | २० | - | २० | |
| ५ | Pricking lancets | - | १,००० | - | १,००० | |

## आरोग्य केंद्र मुंकूदवाडी

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | १३,००० | ११,००० | २,००० | | |
| २ | Tab Chloron २५०mg | २०० | - | २०० | - | |
| ३ | Tab. Chloroquin १५० mg | ३,५०० | २,५०० | १,००० | - | |

## आरोग्य केंद्र अंबिकानगर

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | २१,४०० | २०,४०० | १,००० | - | |
| २ | ORS | - | १,००० | - | १,००० | |
| ३ | Sy Cotrim ५०ml | २५० | २७५ | - | २५ | |
| ४ | Tab. Chloroquin १५० mg | ४,००० | ४,५०० | - | ५०० | |
| ५ | Glass Slide | - | १,२२५ | - | १,२२५ | |

## आरोग्य केंद्र सिडको एन -११

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | ६०,९०० | ६६,९०० | - | ६,००० | |
| २ | I.V. Ringer Lactate | - | १५० | - | १५० | |
| ३ | Sy Hypo Chloride २००ml | ४०० | - | ४०० | - | |
| ४ | Tab. Norfloxacin ४०० mg | ५,००० | ६,००० | - | १,००० | |
| ५ | Tab. Norfloxacin +Tinidazole | १०,९०० | ६,९०० | ४,००० | - | |
| ६ | Pricking Lancets | २,६०० | ६०० | २,००० | - | |
| ७ | Cap Fluvir ७५mg | - | ४४० | - | ४४० | |
| ८ | Cap Fluvir ४५mg | - | २०० | - | २०० | |

## आरोग्य केंद्र सिडको एन -०८

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | ३४,००० | २७,००० | ७,००० | - | |
| २ | Ringer Lactate | - | ४०० | - | ४०० | |

## आरोग्य केंद्र पुडंलिकनगर

| अ. क्र | औषधीचे नांव | मुख्य औषधी भांडार मधुन पुरवठा | केंद्रास प्राप्त | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | Tab. Paracetamol ५०० mg. | १३,००० | १४,३०० | - | १,३०० | |
| २ | ORS | ६०० | १,६०० | - | १,००० | |
| ३ | OT Solution | ०१ | - | ०१ | - | |

तसेच N-८ मुख्य औषधी भांडार यांचे प्रत्यक्ष साथरोगाच्या औषधी साठयांचे तपासणी केली असता साठा नोंदवहीतील नोंदी व प्रत्यक्ष साठयात तफावत दिसून आली अशा वस्तु पुढील प्रमाणे

| अ. क्र | वस्तुचे नांव | साठा नोंदवही तील नोंद | प्रत्यक्ष उपलब्ध साठा | फरक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त | |
| १ | स्पीरीट सॉब | १४,५०० | १३,७५० | ७५० | - | |
| २ | N-९५ मास्क | ४६० | ४३५ | २५ | - | |

उपरोक्त प्रमाणे मुख्य औषधी भांडार मधुन आरोग्य केंद्रावर देण्यात आलेल्या औषधी साठयामध्ये कमी औषधी साठा ज्या आरोग्य केंद्रात आढळुन आलेला आहे त्याची जबाबदारी निश्चित करुन फरकाच्या औषध साठयाची रक्कम महानगरपालिका फंडात भरणा करुन व संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करणे योग्य राहिल. त्याप्रमाणे ज्या आरोग्य केंद्रात जास्तीचा साठा उपलब्ध असल्याच्या नोंदी आढळुन आल्या त्या आरोग्य केंद्राकडुन जास्तीचा साठा कोणा कडुन प्राप्त झ ाला या बाबतचा खुलासा संबंधित आरोग्य केंद्राकडुन मागविणे योग्य राहिल

आरोग्य केंद्राची साथरोगांचा औषधी तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले की, शासनाने विहित केलेल्या नमून्यात स्टॉक रजीस्टर नोंदविलेली नाही.

सर्व आरोग्य केंद्रासोबत नागरी हिवताप योजना अंतर्गत अळीनाशक/कीटकनाशक औषधी मागणी,औषधी प्राप्त व वितरण आणि शिल्लक औषधीचा तपशील घेण्यात आला शासनाने विहित केलेल्या नमुन्यात साठा नोंदवही ठेवलेली नाही.

मुख्य औषधी भांडारामध्ये खालील औषधी साठा पूर्णपणे निरंक असल्याची माहिती प्राप्त झाली असून त्या औषधांची यादी पूढील प्रमाणे.

१. Sy.Fyrazolidone ६० ml.
२. I.V. Normal Saline
३. Sol Sodium hupo chlorite २०० ml
४. Chloroscope
५. Tab. Chloron २५ mg
६. Tab. Ciprofloxacin TZ
७. Tab. Chloroquin ६०० mg
८. Sy.Fluvir

ही औषधे ज्या साथ रोगाकरीता वापरली जातात ते रोग शहरात उद्भवल्यास त्याचा मुकाबला आरोग्य विभाग कसा करेल या बाबत शंका घेण्यास वाव आहे. विभागाने या संदर्भात लक्ष घालुन औषधांचा न्युनतम साठा तरी राहिल याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

साथरोगासाठी पुरेसा औषधी साठया संदर्भाने लेखापरीक्षण विभागातील पथकाने आरोग्य केंद्रास भेटी दिल्या असता खालील आरोग्य केंद्रात फार्मासीस्ट यांचे मार्फत औषधी वाटपाचे काम न होता त्या आरोग्य केंद्रातील ANM औषधी वाटपाचे काम करीत आहेत. ANM औषधी वाटपाचे काम करीत असल्यामुळे त्यांनी औषधी संदर्भाने जतन केलेले अभिलेखे समाधान कारक ठेवलेले नसल्याचे लेखापरीक्षण पथकाचे निदर्शनास आले आहे. ANM ना औषधांच्या Dispensing चे ज्ञान असणे अपेक्षित नाही. त्यामुळे एखादी विपरीत घटना घटल्यास ती त्रासदायक ठरु शकते.

## फार्मासीस्ट नसलेल्या आरोग्य केंद्राची यादी.

१. भिमनगर २.जिन्सी (शहाबाजार ) ३. गरमपाणी ४. बाजयीपुरा ५.कैलासनगर ६.भवानीनगर ७.हर्सुल ८.राजनगर ९.जवाहरकॉलनी १०.पिरबाजार (नागसेननगर) ११.नक्षत्रवाडी (काचंनवाडी)

१२. चिकलठाणा १३.नारेगांव १४.अंबिकानगर १५.पुडंलिकनगर

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या साथरोग औषध खरेदीबाबतच्या संचिका तपासली असताना असे निदर्शनास आले आहे की, सन २०१२-१३ ची औषधी खरेदीची बैठक दि.२३.५.२०१२ रोजी बोलविण्यात आली प्रत्यक्ष औषध खरेदीचे आदेश दि.२७.१०.२०१२ रोजी देण्यात आले. प्राथमिक बैठक व प्रत्यक्ष पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही या मध्ये पाच महिन्याचा कालावधी लागला आहे जो औषध खरेदी सारख्या संवेदनशिल विषयाचे बाबत असमर्थनीय आहे. सद्यस्थितीत देण्यात आलेल्या औषधी खरेदीच्या पुरवठा आदेशातील केवळ दहा औषधेच महानगरपालिकेच्या मुख्य औषधी भांडार एन-८ येथे प्राप्त झाल्याचे समजले प्रत्यक्षात साथरोगाच्या कालावधी साधारणपणे जुन ते डिसेंबर पर्यंतचा असतो आणि संपूर्ण साथरोगाचा कालावधी संपत आल्या नंतर औषधी खरेदीचे पुरवठा आदेश देणे ही बाब अयोग्य वाटते.

सध्या महानगरपालिकेच्या आरोग्य केंदात उपलब्ध औषध साठा हा मागील वर्षाच्या खरेदीतील असल्याबाबत संबंधिताकडून समजले सन २०१२-१३ च्या औषध खरेदीची मागणी दि.१०.९.२०१२ रोजी अंतिम होते ही बाब गंभीर असुन प्रत्येक वर्षी औषधांच्या मागणी बाबत Materials Management च्या तत्वानुसार साठयाचे ABC Analysis करुन प्रत्येक बाबींचा जास्तीत जास्त व न्युनतम साठा व

Re-Ordring Level ठरवुन कार्यवाही करणे अपेक्षित असताना सर्व आरोग्य केंद्राकडुन औषधाची वार्षिक मागणी मागवुन तीन महिन्यांचा कालापव्यय झालेला आहे.

कार्यालयीन पत्र क्र.मनपा/मुलेप/२०१२/३६१ दि.२१.११.२०१२ अन्वये शहरातील साथरोगा संदर्भाने माहिती मागविण्यात आली. प्रत सोबत संलग्न केली आहे.

उपरोक्त मुद्द्यांच्या अनुषंगाने आरोग्य विभागाने त्यांचे पत्र क्र मनपा/आरोग्य/१६३२/२०१२ दि.१.१२.२०१२ लेखापरीक्षण विभागास प्राप्त दि.३.१२.२०१२ मध्ये मुद्देनिहाय सविस्तर निवेदन सादर केलेले आहे, तसेच आरोग्य विभागाने साथरोग नियंत्रणात आणण्यासाठी उपाय योजनाबाबत सुध्दा सविस्तर माहिती सादर केलेली आहे त्याच प्रमाणे आरोग्य विभागाच्या सन २०११-२०१२ या वर्षाची ३० ते ३५ लाखाची देयके अदाई करणे बाकी असल्याने आर.सी.पुरवठा धारक विलंबाने औषधी पुरवठा करतात त्यामुळे कित्येकदा डिमांड सप्लाय गॅप निर्माण होते. असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी निवेदनात म्हटले आहे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडुन प्राप्त खुलासांचे प्रत या सोबत जोडण्यात येत आहे.

सदर पत्रातील मुद्या क्र.३ व ४ बाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी समर्पक खुलास केलेला नाही. वास्तविक साथरोग निर्मूलन/नियंत्रण या करिता शासनाकडुन औषधी साठा पुरविला जातो. परंतू महानगरपालिकेचा आरोग्य विभाग शासनाकडे अपेक्षित वार्षिक मागणीच नोंदवित नाही. जर वेळीच मागणी नोंदविली तर शासनाच्या आरोग्य विभागाकडुन पुरेसा औषधी साठा प्राप्त होवू शकेल व महानगरपालिकेचा निधी वाचून तो आपत्कालीन व्यवस्थापना करिता वापरता येवू शकेल पण तशी कार्यवाही होत नसल्याचे दिसून आले आहे.

त्याच प्रमाणे मुद्या क्र.४ मध्ये औषधी साठा पुरेसा उपलब्ध आहे किंवा कसे या बाबत निश्चित माहिती देणे अपेक्षित होते परंतु आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी उपलब्ध साठयांची माहिती दिली. वास्तविक तो साठा लेखा परीक्षण पथकाने प्रत्यक्ष मोजलेलाच होता. त्यामुळे साठा पुरेसा आहे किंवा नाही यांची माहिती खुद्य विभाग प्रमुखानाच नाही असा निष्कर्ष निघतो.

## निष्कर्ष व अभिप्राय

१. अर्थसंकल्पीय उपलब्ध तरतूदीचे वापरावर नियंत्रण नाही.

२. तरतूद उपलब्ध असताना देयके प्रलंबित राहतात व त्यामुळे पुढील औषध पुरवठयावर विपरीत परिणाम होतो.

३. अभिलेख विहीत नमुन्यात व व्यवस्थित पणे ठेवला गेलेला नाही.

४. आरोग्य केंद्र व मुख्य औषधी भांडार यांचे मध्ये औषधी साठयाबाबत ताळमेळ नाही.

५. खरेदी प्रक्रियेत अनाकलनीय विलंब.

६. Materials Management च्या तंत्वाचे पालन केलेले नाही.

७. शासनाकडे साथरोग निर्मूलन/ नियंत्रणाकरिता आवश्यक औषधांचे मागणी पत्र सादर करण्याची दक्षता विभागामार्फत घेतली गेलेली नाही.

# जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाच्या चौकशी बाबत प्राथमिक अहवाल

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरातील घन कचरा व जैविक कचरा हा वेगवेगळा ठेवून त्याची विल्हेवाट करण्यांत आल्यास शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही बाब हितावह आहे. भारत सरकारच्या पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व भारतसरकार वन मंत्रालय अधिसूचना १९९८ व सुधारणा २००० ह्या कायदा द्वारे कचरा व्यवस्थापना विषयी नियम आखून दिले आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे ह्यांत जैविक कचरा घनकच-यापासून वेगळा केला आहे. या दृष्टीकोनातून औरंगाबाद महानगरपालिकेने शहरामध्ये जैविक कचरा गोळा करण्याचे काम सुरवातीस महापालिकेच्या कर्मचा-यांकडून केले जात होते. परंतू आरोग्य विभागाकडे कर्मचारी वर्ग अपूरा असल्यामुळे व प्रभावीरित्या प्रकल्प राबविण्यांसाठी सदरील जैविक कचरा गोळा करणे व त्याची विल्हेवाट लावणे हे काम खाजगी एजन्सीमार्फत करण्यांचा मनोदय समोर आला. त्यानंतर मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने तसेच शासनाने ठरवून दिलेल्या शुल्कानुसार शहरातील हॉस्पीटल्सकडून शुल्क व कचरा जमा करण्यांचे कामासाठी खाजगी एजन्सी मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

सदरील प्रकल्पाबाबत मा.सभापती स्थायी समिती यांनी चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत जा.क्र.मनपा/सभापती/२०१०/१८१/ दिनांक २८/०९/२०१० रोजी लेखा परीक्षण विभागास पत्र देण्यांत आले आहे.

**<u>जैविक कचरा प्रकल्प व कच-याची विल्हेवाट :</u>**

जैविक कचरा म्हणजे जो पेशंटच्या डायग्नॉस्टिक ट्रिटमेंट, लसीकरण व बायोलॉजीकल रिसर्च ॲक्टीव्हीटीच्या माध्यमातून गोळा होतो ह्याला जैविक कचरा असे म्हणतात.

ह्या जैविक कच-यामध्ये AIDS, Hepatitis B, Jaundis Tuberculosis असे भयंकर आजार पसरवणारे जंतु असल्याने हा कचरा घनकच-यासोबत जर मिसळला तर संपूर्ण कचराच संसर्गजन्य (इनफक्टेड) बनतो त्यामुळे रोगराईचा प्रसार अतिशय वेगाने होऊ शकतो त्यामुळे हा १५% जैविक कचरा वेगळा करून त्यांचे निर्जतुंकीकरण करून त्याला ८००. डिग्री सेल्सीयस ते १०००. डिग्री सेल्सीयस तापमानात जाळून सर्व जंतु मारले जातात व अशी निर्जतुक राख लॅन्ड फिलींगला पाठविली जाते जेणेकरून पर्यावरणातील इतर घटक जसे जमीन, पाणी याचेही प्रदुषण होणार नाही.

या कायद्या अंतर्गतच जैविक कचरा विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेवून शहरातील सर्व हॉस्पिटल, क्लिनिक, डायग्नोस्टीक सेंटर, जनावरांचे दवाखाने या सर्वांचा जैविक कचरा विल्हेवाटीसाठी " कॉमन डिस्पोजेबल फॅसिलीटी " उपलब्ध करून देण्याचे ठरविले.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती तसा प्रकल्प उभा करून तो चालविणे शक्य नव्हते त्यामुळे महानगरपालिकेने BOLT तत्वावर हा प्रकल्प नोव्हेंबर २००३ पासून औरंगाबाद शहरात कार्यान्वीत केला.

शहरातील सर्व वैद्यकीय संघटना म्हणजेच.

१) इंडियन मेडिकल असोसिएशन IMA

२) इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन IMA

३) होमीओपॅथ मेडिकल असोसिएशन IMA

४) पॅथॅलॉजी मेडिकल असोसिएशन IMA

५) Govt Medical College of Hospital

६) एम.जी.एम.मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल

७) डेंटल मेडिकल असोसिएशन

ह्या सर्व संघटनांशी चर्चा करून महानगरपालिकेचा उद्येश त्यांच्यापर्यंत पोहचवून त्या सर्वांना आपण जैविक कचरा प्रकल्पाचे सभासद करून घेतले त्यानंतर त्यांच्याशी सेवाशुल्क किती असावे या विषयी चर्चा केली शेवटी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनुसार सेवाशुल्क ठरविले पण तरी ब-याच डॉक्टरांना हे सेवाशुल्क मान्य नव्हते परंतू २००७ पासून सेवाशुल्क कमी करून देण्यात आले. २००४ ते २००७ ह्या काळात सेवाशुल्काची वसुली ही मनपामार्फत केली जात होती. पण मनपाकडे कर्मचारी वर्ग आरोग्य विभागात नसल्याने ती वसुली ठेकेदाराकडे देण्यात आली.

## जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाच्या ठळक बाबी.

- पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ आणि भारत सरकार पर्यावरण, वन मंत्रालय यांची अधिसुचना दि.२०/१/१९९८ व सुधारणा दि.२/६/२००० कायदा अंतर्गत बायो मेडीकल वेस्ट प्रकल्प दि.०१ नोव्हेंबर २००३ पासून कार्यान्वीत झाला आहे.

- सदरील जाहिरातीच्या प्रतिसादात आलेल्या निविदांमध्ये मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स यांना सदरील प्रकल्पाचे काम करण्यास संबंधित ठेकेदारास (BOLT) Build operate lease transfer या पध्दतीवर देण्यात आले हा प्रकल्प गेवराई तांडा पाटोदा शिवार येथे सुरू करण्यात आला.

- औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत येणा-या सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी स्वंयसेवी धर्मदाय संस्था अथवा ज्या व्यक्ती जैविक कचरा निर्माण करतात अशा संस्थांना बायो मेडीकल वेस्टचे सदस्य करण्यांत येत आहे .

- दिनांक ३०/०८/२०१० पर्यंत मनपा जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाचे एकूण ७६८ सदस्य झाले आहे.

- सभासद फी रू.५००/- ठेवण्यात आलेली आहे व अर्ज फीस रू.१०/- आहे. अशी एकूण बायो-मेडीकल वेस्टच्या सभासदांकडून रू.५१०/- वसूल करण्यात येते.
- आजपर्यंत या प्रकल्पामध्ये एकूण ७६८ वैद्यकीय व्यावसायीकांनी प्रकल्पाचे सभासदत्व स्विकारले असून त्यापोटी ३,९१,६८०/- रूपये मनपा फंडात जमा आहे.
- संबंधीत ठेकेदार हे दररोज त्यांच्याकडे असलेल्या ०५ वाहनाद्वारे जैविक कचरा निर्माण करणा-या संस्थाकडून दररोज जैविक कचरा गोळा करतात.
- पाटोदा शिवार गेवराई तांडा येथे उभारलेल्या प्रकल्पात नेऊन त्या कच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली जाते.
- सर्व वैद्यकीय व्यवसायीकांना सेवा शुल्काचे दराबाबत मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.१२.२००१ मध्ये प्रस्ताव ठेवण्यात आला व त्या दरास मा.सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली.
- महानगरपालिकेने ठरविलेले दर काही वैद्यकीय व्यावसायिक संघटनांना मंजूर नसल्याने महानगरपालिकेने सल्लागार समितीची मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या दालनामध्ये बैठक दिनांक १०.०३.२००५ रोजी घेण्यांत आली व दि.१६.०८.२००५ रोजी मा.आयुक्त यांच्या दालनांत सर्व संघटनेचे पदाधिकारी व ठेकेदार यांच्यात झालेल्या चर्चेनुसार नविन सुधारित दर मा.सर्वसाधारण सभेमध्ये प्रशासकीय ठराव क्रमांक ६७/८ दि.७.१०.२००५ रोजी ठेवण्यात आला.
- नोव्हेंबर २००३ प्रकल्प सुरू झाल्यापासून सेवा शुल्काची वसूली महानगरपालिका करीत होती. त्यानंतर जुलै २००७ पासून सेवा शुल्काची वसुली ठेकेदार मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स करीत आहेत व वसूल रकमेच्या २२% करारनाम्यातील अटीनुसार रॉयल्टी मनपा फंडात दर महिन्याला जमा करणे बाबत सूचना देण्यात आल्या.
- संबंधित ठेकेदारास जा.क्र.मनपा/आरोग्य/८८९/दिनांक ०४/१०/२०१०, रोजी पत्र देवून सभासदांकडून जमा झालेले सेवा शुल्क कोणत्या बँकेत जमा करतात त्या बँकेचे नांव व बँकेच्या खात्याचा गोषवारा देण्याबाबत पत्र दिले असता संबंधीत ठेकेदाराने दिलेली माहिती अपूर्ण स्वरूपात कार्यालयास दाखल केली आहे.
- सदरील प्रकल्प उभारणी साठी लागणारा सर्व खर्च हा कराराप्रमाणे ठेकेदाराने करावयाचा होता. महानगरपालिकेचा काहीही खर्च यामध्ये झालेला नाही.

## मनपा आरोग्य विभागाच्या जैविक कचरा प्रकल्पाच्या अडचणी

सध्या शहराचा विस्तार खूप झालेला आहे. शहरातील हॉस्पीटलची संख्याही वाढली आहे. जैविक कचरा प्रकल्पाचे ७८६ हॉस्पीटल, Clinic सदस्यआहेत. सध्या या कामाचा विस्तार लक्षात घेता प्रकल्पाचे सुपरव्हीजन करण्यास कर्मचारी वर्गाची अत्यंत कमतरता आहे. फक्त १ मेडिकल ऑफिसर व एक क्लर्क (६ महिन्यांपासून Election Duty साठी गेलेले आहेत.) एवढाच स्टाफ आहे. त्यामुळे ठेकेदार प्रत्यक्ष दरमहिन्यास किती सेवाशुल्क गोळा करतो ? काही डॉक्टर सेवाशुल्क देत नाहीत ते का देत नाहीत त्यांना सेवा मिळते का ? हे

सर्व डॉक्टरांच्यापर्यंत प्रत्यक्ष पोहचविल्याशिवाय होणार नाही त्यासाठी कर्मचारी वर्ग प्रत्येक वॉर्डनिहाय व वाहनव्यवस्था असणे गरजेचे आहे.

तसेच ऑफिसमध्ये सभासदनिहाय सर्व रेकॉर्ड अद्यावत करण्यासाठी जसे सभासदांकडील मासिक शुल्क मागणी, सभासदांनी जमा केलेली रक्कम याबाबतचा सर्व गोषवारा अद्यावत असणे गरजेचे आहे. यासाठी एक कॉम्प्युटर ,कॉम्प्युटर ऑपरेटर असणे गरजेचे आहे.

आजपर्यंत प्रत्येक महिन्यास मिळणा-या रॉयल्टी पोटी मनपा फंडात ३९,२२,५१५/- जमा केले आहेत. तसेच आजीवन सभासदांच्या पोटी ३,९१,६८०/- रूपये मनपा फंडात जमा केले आहेत. महानगरपालिकेचा एकही रूपया खर्च न करता जैविक कचरा प्रकल्पाने मनपास एकूण ४३,१४,१९५ /- रूपये मिळवून दिले आहेत.

| वर्ष | सभासदाची एकूण संख्या | मनपा नोंदीनुसार देयक | एकूण झालेली वसूली | ठेकेदारास अदा रक्कम | मनपास मिळालेली २१% रॉयल्टी |
|---|---|---|---|---|---|
| १.११.०३ ते ०४ | १०३ | ५४६३१८ | निरंक | निरंक | निरंक |
| २००४-२००५ | ३८० | ३५५११०८ | १२३८२६४ | ९७८२२८ | २६००३५ |
| २००५-२००६ | ४७८ | ४५९१२५७ | २९९४४३३ | २३६५६०२ | ६२८८३१ |
| २००६-२००७ | ५६० | ५१६४४८९ | ४०००२३७ | ३१६०२११ | ८४००५६ |
| २००७-२००८ | ६६६ | ४२२०९९३ | २४३०३७३ | ०० | ५१०३७८ |
| २००८-२००९ | ६८७ | ४५६८४५३ | २५३१३२३ | ०० | ५३६९९७ |
| २००९-२०१० | ७६८ | ४९९८४६१ | ३४१६७०४ | ०० | ७५१६७३ |
| एप्रिल २०१० ते ऑगस्ट २०१० | ०० | ०० | ०० | ०० | ३९४५५५ |
| | **एकूण** | **२७६४१०७९** | **१६६११३३४** | **६५०४०४१** | **३९२२५२५** |

जुलै २००७ पासून मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस (संबंधीत ठेकेदार ) यांना देण्यता आलेली आहे.

वरील तक्त्यामध्ये दाखविल्यानुसार सभासदांकडून वार्षिक मागणी एकूण झालेली वसुली व मनपास मिळालेली रॉयल्टी यांची सदस्यनिहाय माहिती आरोग्य विभागात उपलब्ध आहे. एकूण मागणी रजिस्टर प्रत्येक वर्षाचे ०५ एकूण ३० रजिस्टरमध्ये माहिती उपलब्ध आहे. आपण माहिती मागविल्यास आपणांस माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

## निष्कर्ष व अभिप्राय :

१. जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाबाबत माहिती घेतली असतांना असे निदर्शनास आले आहे की, २,७६,४१,०७९/- रकमेपैकी १,६६,११,३३४/- इतकी रक्कम वसूल झालेली आहे. उर्वरीत रक्कम रूपये १,१०,२९,७४५/- इतकी रक्कम वसूल होणे बाकी आहे. सदरील माहिती ही दिनांक १.११.२००३ ते ३१.३.२०१० पर्यंतची आहे.

२. कमी वसूली झाल्याची कारणे शोधून संबंधित हॉस्पीटल्स कडून वसूली करणे ही आरोग्य विभागाचे काम आहे.

३. जुलै २००७ पासून मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस या एजन्सीने कमी वसूली करून रॉयल्टी कमी भरल्याचे निदर्शनास आले. जेव्हा की संबंधित एजन्सी सोबत झालेल्या करारनाम्याप्रमाणे एजन्सीची हॉस्पीटलकडून वसूली करण्यांची जबाबदारी असून सुध्दा एजन्सीने वसूली केलेली नाही. यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत आरोग्य विभागाने एजन्सीकडे व हॉस्पीटलकडे पाठपुरावा करून रक्कम वसूली बाबत तातडीने पावले उचलावी.

४. एजन्सीने दवाखाने बंद असल्याचे नमूद करून एकूण वसूलीमध्ये बंद दवाखान्याची वसूली कमी दाखवून त्यानुसार वसूली केलेली आहे. परंतू बंद दवाखान्याचा कोणताही अहवाल संचिकेत उपलब्ध नाही.

५. मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स यांच्या सोबत झालेल्या करारनाम्याच्या अटी शर्तीचे संबंधिताकडून पालन होते किंवा नाही याबाबत आरोग्य विभागाकडून वेळोवेळी पाहणी होत नसल्याचे दिसून येते. यापुढे संबंधित एजन्सीतर्फे होत असलेल्या कामाचा पाठपुरावा घेण्याकरीता आरोग्य विभागाने दक्षता घ्यावी.

आपला,

(मो.रा.थत्ते)
मुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका,औरंगाबाद.

## : अ नु क्र म णि का ::
## लेखा परीक्षण अहवाल : सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४


**मुख्य लेखा परीक्षक यांचे लेखापरीक्षणाबाबत निवेदन** : (पृ.क्र. १ ते ३ )

प्रलंबित परिच्छेदांचा तपशिल : (पृ.क्र. ४ ते ५ )


### भाग -अ

**(अ) विभागनिहाय लेखापरीक्षण तपशिल** :


| अ.क्र. | विभागाचे नांव | लेखा परीक्षणाअंतर्गत कालावधी | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | लेखा विभाग | | ६ ते १७ |
| ०२ | वॉर्ड - अ कार्यालय | सन २००७-०८ ते सन २०११-१२ | १८ ते ५५ |
| ०३ | वॉर्ड - ब कार्यालय | सन २००६-०७ ते सन २०१२-१३ | ५६ ते १०१ |
| ०४ | वॉर्ड - ई कार्यालय | सन २००६-०७ ते सन २०११-१२ | १०२ ते १२८ |
| ०५ | स्थानिक संस्था कर विभाग | सन २०१२-१३ दि. १ जुलै ते ३१.८.२०१२ | १२९ ते १४८ |
| ०६ | भांडार विभाग | सन २००३-०४ ते सन २०११-१२ | १४९ ते १९९ |
| ०७ | सांस्कृतिक /महिला व बाल कल्याण समिती / पर्यटन विभाग | सन २००५-०६ ते सन २०१२-१३ | २०० ते २३९ |
| ०८ | उद्यान विभाग | सन २००५-०६ ते सन २०१२-१३ | २४० ते ३८४ |
| ०९ | मालमत्ता विभाग | सन २००५-०६ ते सन २०१२-१३ | ३८५ ते ४०६ |
| १० | ई-निविदा पध्दती आढळून आलेल्या त्रुटी नियमबाह्य बाबी. | | ४०७ ते ४०९ |
| ११ | सिध्दार्थ उद्यान समोरील मुख्य रस्त्यावर उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ फुट ओव्हर ब्रिज बांधले बाबत. | | ४१० ते ४१२ |

| (ब) विशेष चौकशी अहवाल : | | | |
|---|---|---|---|
| ०१ | शहरात साथरोग झाल्यासंदर्भाने औषध साठ्याची तपासणी करणे बाबत. | जा.क्र.मनपा/मुलेप/३७२ दि.०५.१२.२०१२ | ४१४ ते ४३१ |
| ०२ | जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाचा चौकशी बाबत प्राथमिक अहवाल. | जा.क्र.मनपा/मुलेप/३७५ दि.१३.१२.२०१२ | ४३२ त ४३६ |

(कार्यालयीन उपयोगासाठी)

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.

## (मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये)
## मुख्य लेखा परीक्षक यांचा लेखा परीक्षण अहवाल

वार्षिक अहवाल

**सन २०१२-२०१३**

व

**सन २०१३-२०१४**